
म. ना. सहस्रबुद्धे

मराठी शाहिरी वाङ्मय



मराठी शाहिरी वाङ्मय

मराठी शाहिरी वाङ्मय

लेखक म. ना. सहस्त्रबुद्धे

किंमत सहा रुपये

प्रकाशक : ग. ल. ठोकळ
ठोकळ प्रकाशन, ६२ बुधवार,
पुणें २.

मुद्रक : चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती,
४६१।४ सदाशिव, पुणें २

शाहिरांच्या--दैवताला
शिवशक्तीला वंदन

ऐसी इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ।
तिय वंदिली मियां मूळिकें । देवो देवी ॥
म्हणौनि भूतेषु आणि भवानी ।
वंदिली न करूनी सिनानीं ।
मीं रिघालों नमनीं । तें हें ऐसे ॥
शिवशक्ति समावेशे । नमन केलें म्यां ऐसे ।
रंभागर्भ आकाशें । रिघाला जैसा ॥

श्री ज्ञानेश्वर—अमृतानुभव.

ॐ

नमो भगवते वासुदेवाय ।

लक्ष्मीनारायणाभ्याम् नमः ।

माझे मातुल व गुरु

कै. वासुदेव गोविंद आपटे (आनंदकर्ते)

आणि

माझे कै. मातापिता–लक्ष्मी-नारायण

यांच्या पवित्र स्मृतीस ही अल्पकृति

अर्पण असो.

नमनाचा टाळ

मराठी शाहिरी वाङ्मय, हा अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनीं लिहिलेला ग्रंथ त्यांचें वयोमान पाहतां शेंडेफळाप्रमाणें म्हणावा लागेल. ५० वर्षांपूर्वी मीं जेव्हां त्यांना चुटपुटतें पाहिलें होतें तेव्हां ते कांहीं लिहीत असतील अशी कल्पना नव्हती. कै. गु. वासुदेवराव आपटे ह्यांचे ते भाचे म्हणून मला माहीत होते. एक दिवस असा उजाडला कीं, ' मौज ' मासिकाच्या अंकांत शाहिरी संगीतावर अभिनव विवेचन करणारा आणि निराळ्या ढंगांनीं लिहिलेला असा एक लेख माझ्या वाचण्यांत आला. अण्णांचे चिरंजीव भैय्यासाहेब यांनीं तो लेख अण्णासाहेबांचा असल्याबद्दल माहिती दिली. त्या वेळीं मीं भैय्यासाहेबांस सांगितलें कीं, ' कांहींहि करा, पण अण्णासाहेबांच्या हातून अशा प्रकारचे अधिक अधिक लेख तयार करवून ते प्रसिद्ध करा.' हळूहळू अण्णासाहेबांचे लेख प्रसिद्ध होऊं लागले. त्यावरून अण्णासाहेबांचें या विषयाचें ज्ञान केवळ वाङ्मयीन किंवा ग्रांथिक नसून प्रत्यक्षाची त्यांना चांगली मुरब्बी जोड आहे हें दृष्टोत्पत्तीस आलें. असा दुअंगबाजी करणारा त्या वेळीं तरी अण्णासाहेबांच्याशिवाय कुणीहि नव्हता. मग लक्षांत आलें कीं, अण्णा बारामतीच्या पालिकेचे अनेक वर्षे कार्यवाह होते आणि त्यामुळें त्यांना तिकडे शाहिरी फडांचा सहवास व आस्वाद पुष्कळच घडला. सरकारनें तमाशा सुधारणा कमेटी नेमण्याचें जेव्हां ठरविलें व मला त्या समितीचें अध्यक्षपद स्वीकारण्यास आग्रह केला तेव्हां या कामासाठीं ' मी मागेन तो जाणता चिटणीस सरकारनें मला जर दिला तर हें काम मी करूं शकेन, ' असें, मी सांगितलें. त्याप्रमाणें श्री. अण्णासाहेबांची सेक्रेटरी म्हणून सर-

कारनें नेमणूक केली व त्यामुळें कमेटीचें काम तत्परतेनें, मार्मिकपणानें व प्रामाणिकपणें करणें सुलभ झालें. अण्णांनीं व्यासंग हातीं घेतला. ते लिहूं लागले, बोलूं लागले, संग्रह जमा करूं लागले. आणि पूर्वी जीं कित्येक मतें या वाङ्मयासंबंधीं रूढ होतीं तीं योग्य नसून शाहिरी वाङ्मयाचें स्थान मराठी वाङ्मयांत केवळ मनोरंजनाचें नसून त्याच आध्यात्मिक अंगहि उपेक्षिण्यासारखें नाहीं असा पक्ष ते आग्रहानें मांडूं लागले.

शाहीर, शाहिरी हे शब्द फारसी आहेत. म्हणून तर ते सर्व कवींना लागू पडावे. परंतु मराठींत ज्ञानेश्वर, मोरोपंत वगैरेंना मराठीच्या मोडणीप्रमाणें कोणी शाहीर म्हणत नाहीं. शाहीर म्हणजे लावणी व पोवाडे करून गांवोगांव मंडळी घेऊन पोट भरणारे लोक होत, असा एक साधारण लोकांचा समज. ज्यांना सुशिक्षित म्हणावें त्या लोकांना उघडपणें तमाशाला जाणें शक्य नसे. चोरून जात, पण थोडे. तमाशा हलकट लोकांनीं ऐकावा, अचकट विचकट लावण्या आणि बीभत्सता यांनीं भरलेल्या असल्या वाङ्मयाकडे सुशिक्षित म्हणणाऱ्यांनीं ढुंकून बघूं नये, असा त्या वेळचा दंडक असे. नंतर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं शं. तु. शा.ना हाताशीं घेऊन शाहिरी वाङ्मय प्रसिद्ध करण्यास प्रोत्साहन दिलें. येथून पुढें शाहिरी वाङ्मयाचा थोडा थोडा अभ्यास होऊं लागला. आकाशवाणी व रंगभूमि यांचीं तोंडें इकडे वळलीं. लोकसमाजांत शाहिरी वाङ्मयाचें आकर्षण उत्पन्न झालें. तथापि, शाहिरी वाङ्मयाचा मूलग्राही अभ्यास वाढला असें कांहीं झालें नाहीं. अभ्यासाची मशाल वृद्ध अण्णांनीं

धैर्यानें तेवत ठेवली आहे, म्हणून त्यांना भरपूर धन्यवाद दिले पाहिजेत. या ग्रंथाच्या प्रकाशनानें अण्णांच्या डोळ्यांचें पारणें फिटेल आणि रसिक वाचकांना अभ्यासाचें आणि विचाराचें पुष्कळच नवें खाद्य मिळेल. इथें एका गोष्टीचा उल्लेख केला तर तें अस्थानीं होणार नाहीं, असें वाटतें. आमच्या हिंदुस्थानांत वैदिक परंपरा, जिचा विस्तार, विकास पुढें उत्स्फूर्त परंपरेनें, उपनिषदमार्गानें, पौराणिक परंपरेनें भक्तिमार्गापर्यंत येऊन थडकला, ती परंपरा बहुतांशीं संस्कृत भाषेच्या आश्रयानें विकास पावली. बुद्धादिकांनीं प्राकृतांचा आश्रय केला. कदाचित हीं प्राकृतें संस्कृतांपेक्षां जुनीं असावींत. या प्रदीर्घ काळांत भारतीय बुद्धिवंतांनीं जें झगमगणारें विचार-मंथन केलें त्यांतच वर पसरलेलें आकाश, खालची ही विशाल भूमि, वायुमंडल, नियमानें येणारा मृत्यु, इत्यादिकांचा विचार करून अविनाशी तत्त्वज्ञान सिद्ध केलें. हा जो त्यांनीं प्रचंड खटाटोप केला तो समस्त जनतेनें खेड्यापाड्यांत मुलांपासून म्हाताऱ्यांपर्यंत, बायकापोरांपर्यंत, अगदीं डोंगरदऱ्याच्या टोकापर्यंत खेळविला. हें त्यांनीं कसें केलें असेल ? मोठ्या मोठ्या पंडितांनीं संस्कृत भाषेंत अवघड अवघड शब्द वापरून आणि घटपटाचा काथ्याकूट करून, माया-ब्रह्मवाद केले, त्याचे अनेक पापुद्रे काढले. या शुष्क वादांतून मनाला रिझविणारा रस बाहेर पडत नाहीं अशा तक्रारी लोक करूं लागले. तिकडे पंडितांनीं लक्ष दिलें नाहीं. गर्वाचें घर खालीं याप्रमाणें पंडितांना कोणा पुसेनासे झाले. परमेश्वराकडे जाण्याच्या सोप्या वाटा लोक शोधूं लागले. गुरूंस शिष्य तयार झाले.

पंथ उभे राहिले. प्रतिभेचीं उत्तरें बाहेर पडूं लागलीं. आणि ऋषिमुनींनीं विचाराअंतीं शोधून काढलेलें गहन ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान, त्यांनीं सर्व गांवोंगांवीं पसरवून पोरासोरांच्या तोंडीं केलें. मात्र एक आडाखा ठेवला. गुरुपरंपरा पाहिजे. तसें पूर्वीं उपनयन प्रसंगांत होत असे. 'मीं शोधून काढलें नाहीं. आमच्या गुरूनें सांगितलें आहे–' असे परंपरांचे ओघ सुरू झाले. कीर्तनपरंपरेचे आद्य मुनि नारद, संगीत परंपरेचे आद्य मुनि भरत अशीं शेंकडों उदाहरणें सांपडतील. शेकडों पंथ – नाथ पंथ, भागवत पंथ – म्हणून कोणती ना कोणती तरी परंपरा लोकांनीं लावली. परंपरेशिवाय मान्यता नाहीं. तोच नमुना शाहिरी वाङ्मयासंबंधीं होणें अपरिहार्य होतें. म्हणून तशा परंपरा दाखवितां येतात. या परंपरा उलगडण्याचा प्रयत्न श्री. अण्णासाहेबांनीं केला आहे. गहन तत्त्वें आमच्या जनतेच्या मांडीवर कशीं सुखावलीं याचें खरें चित्र दिसण्यासाठीं जनतेच्या आविष्काराचे धागेदोरे सूक्ष्मपणानें व जागरूकपणानें धांडोळले पाहिजेत. ही दृष्टि श्री. अण्णा यांचे ठिकाणीं आहे. त्यांची एक पठडी आहे आणि ती त्यांनीं आपल्या पुस्तकांत आपल्या अभिनव शैलीनें, अस्सल मराठी शब्दांत व्यक्त केली आहे.

या पुस्तकाच्या अंतरंगांत अधिक बुड्या मारून मिळणारा संतोष व्यक्त करावा अशी इच्छा थोडी अपुरी ठेवून मनांत आले ते विचार सादर करून ग्रंथ-प्रकाशन सिद्धीला जावें म्हणून हा नमनाचा टाळ वाजविला आहे.

—दत्तो वामन पोतदार

प्रा. न. र. फाटक यांनीं करून दिलेला

ग्रंथपरिचय

मराठी शाहिरी वाङ्मय या ग्रंथाचे लेखक श्री. म. ना. सहस्रबुद्धे हे सत्तरी उलटून गेलेले ऐशीच्या घरांत आलेले असून महाराष्ट्रांतील शाहिरी वाङ्मयाचे एक उत्तम ज्ञाते व भोक्ते गृहस्थ आहेत. चालू स्वराज्याच्या उषःकालीं महाराष्ट्रांतील तमाशाच्या कलाव्यवसायाची पाहणी करून त्या व्यवसायाची सामाजिक उपयुक्तता किंवा निषिद्धता ठरविण्यासाठीं तेव्हांच्या नेमलेल्या समितीचे श्री. सहस्रबुद्धे हे चिटणीस होते व तमाशा-विषयीं सरकारांत रुजू केलेल्या अहवालांत त्यांचाच हात प्रामुख्यानें होता. समितीची बैठक आटोपल्यानंतर केव्हां केव्हां होणाऱ्या आपसांतील सुखसंवादांत पुष्कळ वेळा त्यांनीं आपले तमाशा, त्यांतील लावण्या किंवा पोवाडे यांसंबंधींचें हृद्गत पुढील अर्थाच्या शब्दांत व्यक्त केल्याची माहिती येथें अनाठायीं होणार नाहीं, 'महिन्यांतून एकदा तरी तमाशा पहिल्याशिवाय समाधान वाटत नाहीं.' अशा तऱ्हेचा उद्गार हा त्यांच्या हृद्गताचा दर्शक आहे. त्यांचें सारें उमेदीचें आयुष्य एक प्रकारें कारकुनीच्या खर्डेघाशींत गेलें; परंतु या खर्डेघाशीला त्यांची जातिवंत रसिकता मारून टाकतां आली नाहीं. त्या रसिकतेनें तमाशाची कला आस्वादण्याची दिशा स्वीकारून आपल्या गुणांत भर टाकली. श्री. सहस्रबुद्धे हे संगीताचेहि चांगले अभिज्ञ आहेत. यामुळें तमाशांतील संगीताच्या खांचाखोंचा ओळखून त्यांतील ग्राह्यतेची परीक्षा करण्याला ते समर्थ ठरावे यांत नवल नाहीं. ही समर्थता जाणूनच तमाशाच्या सरकारी उत्सवांत त्यांची समिति सभासद व व्यख्याते म्हणून सरकारनें नेमणूक केली होती.

मराठी शाहिरीबद्दल प्रस्तुत ग्रंथ लिहिण्यापूर्वी सहस्रबुद्धे यांनीं बरेंच विद्वन्मान्य लेखन चालविलें होतें. त्याकडे लक्ष जाऊन मुंबई मराठी साहित्यसंघानें श्री. सहस्रबुद्धे यांना मुद्दाम बहुमानपूर्वक बोलावून वामन मल्हार जोशी स्मारकार्थ (दरसाल जीं व्याख्यानें होतात त्यांत) कांहीं वर्षांमागें यांचीं शाहिरी वाङ्मयावर व्याख्यानें करविलीं. तीं मुंबईत चांगलीं वाखाणलीं गेलीं. हीं व्याख्यानें झालीं तेव्हां वा. म. जोशी स्मारकानिमित्त होणारीं व्याख्यानें प्रसिद्ध करावीं असा मुं. म. साहित्यसंघाचा संकेत होता. त्यास अनु-

सरून श्री. सहस्रबुद्धे यांनीं व्याख्यानविषयाच्या ग्रंथलेखनाला आरंभ केला. ग्रंथ लिहून पुरा करण्यास लागलेल्या कालावधींत संघानें ग्रंथप्रकाशनाचा संकेत सोडला. इतरत्र प्रकाशनाची लवकर सोय होईल, असें दिसेना. शेवटीं श्री. ठोकळ यांनीं ग्रंथ प्रसिद्ध करण्याची जबाबदारी अंगावर घेऊन पार पाडली, यासाठीं श्री. ठोकळ यांना खरोखरीच मनःपूर्वक धन्यवाद देणें अवश्य आहे.

शाहीर म्हटला कीं, लावण्या—त्याहि उत्तान शृंगाराच्या—आणि प्रसंगविशेषीं पोवाडे रचणारा असा अर्थ चटकन् मनांत भरतो. लावणीचा अतिनिकट संबंध तमाशा या लोकनाट्यप्रकाराशीं असून तमाशाला सांप्रत शिक्षित किंवा सभ्य गणल्या जाणाऱ्या समाजांत मान उरलेला नाहीं. ही वस्तुस्थिति सर्वांच्या परिचयाची आहे. अलीकडे लावण्या–पोवाड्यांचे संग्रह महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांत अधूनमधून दिसतात; पण ते योग्य रीतीनें शिकविले जात नाहींत. किंबहुना त्यांतील पुष्कळशा कवनांची त्यांत शृंगार म्हणून हेटाळणी करणें हें ब्रिटिश राजवटीमध्यें निर्माण झालेल्या सभ्यतेचें लक्षण होऊन बसलें आहे. मराठेशाहींत खेड्यांतला तरुण शेतकरी स्वाऱ्या-मोहिमांच्या शिपाई-गिरींत भाग घेत असे. तळहातावर शिर घेऊन दूर शत्रूच्या प्रदेशांत तळ देऊन राहि-लेल्या त्या शेतकरी शिपायांकरितां गाइल्या जाणाऱ्या लावण्यांत शृंगार असणें हें स्वाभाविक आहे. शत्रूच्या प्रदेशांतला तळ म्हणजे मृत्यूचा जबडाच. जीविताची क्षण-भंगुरता यथार्थतेनें त्या ठिकाणीं अनुभवास येत असतां त्या शिपाईगिरीचे साथी जे शाहीर, त्यांनीं तारुण्याला शोभणारा विषय गाऊन शिपाईगिरी पत्करलेल्या शेतकऱ्याला खुलवावें, रिझवावें, हेंच योग्य ठरतें. मागील जागतिक महायुद्धांतील तरुण शिपायांचीं लिखाणें मिळवून तीं तपासण्याचा प्रयोग इंग्लंडांतील मानसशास्त्रज्ञांनीं केला, तेव्हां त्या लिखाणांत शृंगार हाच विषय प्रामुख्यानें आढळला. पुढच्या क्षणीं आपण सजीव असूं कीं मरणाधीन होऊं याची खात्री नसलेला पहिल्या उमेदीचा तरुण रणांगणावर प्रेयसी, पत्नी, प्रेम याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि विषयाला आपल्या अंतरंगांत सहसा थारा

टेऊं शकत नाहीं, हें त्या पूर्वोक्त लिखाणाच्या तपासणीचें तात्पर्य निघालें. या तात्पर्याच्या कसोटीवर लावणींतला शृंगार क्षम्य ठरणारा आहे. लावणींतील शृंगाराची उत्कटता शिपाईगिरींत शिरलेल्या खेडवळ शेतकऱ्याच्या राकट मनोरचनेकडे पाहिल्यास आवश्यक होती, असेंच म्हणावें लागतें. आज महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षक यांच्या मनोवृत्तीनें शंभर सवाशें वर्षांमागील शेतकरी शिपायाच्या मनोवृत्तीची तुलना कर णें सयुक्तिक नाहीं. शिपाईगिरीशीं शृंगारप्रधान लावण्यांची सांगड त्या लावण्यांतील विरह ाच्या भावनांचें चित्रण पाहून घालतां येते. नवरा मोहिमेवर गेला असून त्याची तरुण या पत्नी त्याच्या विरहानें तळमळत असल्याची कल्पना कितीतरी लावण्यांतून रंगविले राठ ी पाहायला सांपडते. लावणींतील (आजच्या दृष्टीचा) उत्तान शृंगार कोणासाठीं च कां ह सा ा दोन्ही प्रश्नांचें उत्तर वरील विवेचनांत सांपडेल.

अनै पण लावणीकार शाहीर हे केवळ स्त्रीपुरुषांच्या प्रणयाचे उद्गाते नव्हते; त्यांच्या शाहि अ रीमागें जीवनविषयक कांहीं निश्चित तत्त्वज्ञान होतें, त्या तत्त्वज्ञानाचा बहुजनसमाजांत प्रसा र करण्याचें काम ते बजावीत होते, ही सकृद्दर्शनीं बहुधा लक्षांत न येणारी शाहिरीची मह त्त्वाची बाजू परोपरीनें उघडकीस आणण्याची कामगिरी श्री. सहस्रबुद्धे यांनीं आपल्या या ग्रंथांत पार पाडली आहे. निरनिराळ्या शाहिरांच्या लावण्या वाचकांपुढें ठेवून त्यांतील तात्त्विक विचारांचा उगम उपनिषदादि वाङ्मयांत आढळतो, याचीहि श्री. सहस्रबुद्धे यांनीं चांगली फोड केली आहे. ती फोड करीत असतां शाहिराच्या काळांतील महाराष्ट्रीय जीवन कसें होतें, हा प्रश्नहि त्यांनीं छेडला आहे. हें महाराष्ट्रीय जीवन शिवाजीमहाराजांच्या काळांतलें नसून पेशवाईच्या अस्तकाळांतलें आहे. त्या काळांत महाराष्ट्रीय जीवन नैतिक दृष्ट्या खालावलें होतें, हा अपवाद लावणीकारांच्या तात्त्विक निष्ठेचा भक्कम आधार दाखवून श्री. सहस्रबुद्धे यांनीं खोडून टाकला आहे. ज्यांच्यापुढें शाहीर तात्त्विक अधिष्ठानाच्या लावण्या गात होते त्या अप्रबुद्ध, निर्बुद्ध, मानल्या जाणाऱ्या निरक्षर असलेल्या किंवा ' आहारनिद्राभयमैथुनं च ' एवढ्याच क्रियांचा दास

मानल्या गेलेल्या बहुजन समाजाला त्या लावण्यांचा गर्भितार्थ कळत असल्याशिवाय ते शाहीर लोकप्रिय झाले नसते हें मुद्दा प्रस्तुतप्रकरणीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तो समाज प्राचीन औपनिषदिक तत्त्वज्ञानाचीं मूलतत्त्वें बिनचूक जाणणारा होता, हा श्री. सहस्रबुद्धे यांच्या एकंदर विवेचनांतील बोध वाचकाला टाळतां येण्यासारखा नाहीं.

श्री. सहस्रबुद्धे यांच्या पुस्तकांतील पहिलीं दोन प्रकरणें शाहिरी वाङ्मय आणि शाहिराची भूमिका या दोन विषयांच्या छाननीचीं आहेत. नंतर ते शाहिरी वाङ्मया[...] प्रकार सांगण्याकडे वळले आहेत. त्यांच्या लेखनांत पुष्कळदा पुनरुक्ति दृष्टीस प[...] चोखंदळ वाचक या पुनरुक्तीला दोष म्हणेल. कोणी पाल्हाळ या संज्ञेनें त्या पुनर[...]च्या संभावना करील. परंतु अर्वाचीन काळांतील तथोक्त विद्वत्समाजांत शाहिरी वाङ्मयाकडे जें अज्ञान किंवा गैरसमजांचें विपर्यस्त ज्ञान वळावलेलें आहे, त्याचे पुस[...]पण सटीक निर्देश पाहिल्यास श्री. सहस्रबुद्धे यांनीं केलेली पुनरुक्ति समर्थनीय मा[...]त हरकत नाहीं.

[...]ण

येथवर लावणीकारांची तत्त्वज्ञानासाठीं सामान्यतः, उपनिषदें, गीता, भागवत प्राचीन ग्रंथांवर आधारलेल्या संतवाङ्मयास अनुसरणारी लोकोद्धाराची भूमिका वा[...] कांच्या निदर्शनास आणली. श्री. सहस्रबुद्धे यांनीं निवडलेले लावण्यांतील उतारे व त्यांच्या स्पष्टीकरणार्थ संस्कृत तत्त्वज्ञानपर साहित्यांतील समर्पक वचनांचे नमूद केलेले आधार हे ग्रंथकाराच्या अभ्यासाची जशी साक्ष पटवितात, तशीच त्यांच्या रसिकतेची साक्ष त्यांनीं वाचकांपुढें ठेवलेल्या लावण्यांवरून पटते. उत्तम विचार, उत्तम शब्दरचनेच्या द्वारें श्रोत्यांच्या हृदयांत बिंबविणाऱ्या लावण्या त्यांनीं निवडल्या आहेत, याचा प्रत्यय त्या लावण्या वाचतांना सहज येतो. लावण्या माणसाच्या नीतीला बाधणाऱ्या नसून उलट नीतीला तत्त्वज्ञानाच्या शिकवणीनें दृढत्व आणणाऱ्या असतात हें श्री. सहस्रबुद्धे यांचें प्रतिपाद्य आहे. भाषेच्या गोडीनें तत्त्वज्ञान समाजाच्या गळीं उतरवायचें, हा उद्देश श्री. सहस्रबुद्धे यांनीं आपल्या प्रतिपादनासाठीं पुस्तकांत घेतलेल्या लावण्यांच्या द्वारें सफल

झाला असेल, हा तर्क चुकीचा ठरूं नये. लावण्यांतून ग्रथित झालेलीं किंवा परमार्थाचीं तत्त्वें नीति स्पष्ट करण्याकडे श्री. सहस्रबुद्धे यांचा रोख असल्यामुळें लावण्यांतून हातीं पडणारे लोकस्थितीच्या इतिहासाचे कण त्यांनीं कांहींसे दृष्टिआड केले आहेत. परंतु श्री. सहस्रबुद्धे यांचा हा ग्रंथ लावणीविषयक आधुनिक दुष्ट पूर्वग्रह नाहींसे करूं शकल्यास 'उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा' या कव्युक्तीप्रमाणें भावी पिढींतील साक्षेपी अभ्यासू येथें निर्देशिलेले इतिहासाचे कण गोळा न केल्याची उणीव भरून काढतील असा विश्वास बाळगायला हरकत नाहीं. ब्रिटिशांच्या राजवटींत शंभर वर्षांमागें खरी मराठी भाषा लावण्या, पोवाडे, अभंग इत्यादिकांत पाहावी. मुक्तेश्वर, श्रीधर, मोरोपंत यांचें वाङ्मय खऱ्या अर्थानें मराठी नव्हे असा वाद उपस्थित झाला होता. त्यावरूनच …राठी साहित्याचे संत व पंत असे साहित्यकारांचे दोन वर्ग मानण्याचा प्रघात रूढ झाला. …सा भेद करतां येत नाहीं, एवढें श्री. सहस्रबुद्धे यांनीं दाखवून दिलें आहे. लावणीकार …नैतिक आचारविचाराचे पुरस्कर्ते मुळींच नव्हते, असाहि त्यांच्या ग्रंथाचा सुसिद्धान्त आहे. पेशवाई अखेरच्या लावणीकार शाहिरांच्या तुटपुंज्या उपलब्ध वाङ्मयावर श्री. सहस्रबुद्धे यांना आपला अभ्यास करावा लागला, तरी तें वाङ्मय कोणत्या रीतीनें किती उपयुक्त आहे, याविषयीं वाचकाला योग्य निष्कर्ष काढतां येईल.

पेशवाईच्या अस्तकालीं भ्रष्ट विलासांचें लोकांत प्राबल्य वाढलें व त्याचें प्रतिबिंब लावण्यांतून उमटलें आहे, असा एक प्रवाद ऐकूं येतो. पेशवाईच्या अखेरीस विलास वाढले, कारण तेव्हां लोकांत सुबत्ता व स्वस्थता होती, ही एक लावण्यांतील शृंगारिक वर्णनाला बुजलेल्यांनीं काढलेली शक्कल आहे. इतिहास पाहूं गेल्यास सुबत्तेऐवजीं दुष्काळ व स्वस्थतेऐवजीं रक्तपाताची धामधूम अशीं संकटें दिसतात. कदाचित् शेवटचा पेशवा व त्याचे चार दोन किंवा ही संख्या लहान वाटल्यास दहावीस म्हणूं – एवढे साथीदार विलासाचे रंगढंग करीत असतील. तत्कालीन शाहीर हे ह्या रंगढंगाचे प्रतिनिधि किंवा प्रचारक नाहींत. शृंगार हा विषय मानवेतिहासाच्या आदिकाळापासून आहे. पेशवा

ईच्या आधीं शाहीर असले पाहिजेत, याला पुराव्याची आवश्यकता नाहीं. पेशवाई ही शाहिरांची जननी नसून मानवी व्यवहार शाहिराला जन्म देतो, हें सत्य श्री. सहस्रबुद्धे यांनीं पुस्तकाच्या प्रारंभीं सुचविलें आहे. मग पेशवाई प्रारंभींच्या शाहिरांचें नांव गांव सुद्धां का लुप्त व्हावें? याचें उत्तर फारसें कठीण नाहीं. पेशवाई चालू राहती तर रामजोशी, सगन, होनाजी यांचीं नांवें आज ऐकूं आलीं नसतीं. पेशवाई गेल्यानंतर आपलें शिल्लक तरी काय आहे. या प्रश्नाच्या अनुरोधानें लोक जेव्हां शोध घेऊं लागले तेव्हां त्यांच्या हातीं ज्यांचीं नांवें व काव्यें सांपडलीं त्यांना लोकांनीं जतन करून ठेवलें. पेशवाई धुळीस मिळाल्यावर पेशवाई अखेरचे शाहीर कांहीं काळ लोकांच्या पाहण्यांत व नंतर स्मरणांत राहिले व त्यावरच समाधान मानणें भाग आहे.

श्री. सहस्रबुद्धे यांच्या ग्रंथाच्या परिचयाला फाटे फुटून विस्तार पुष्कळच झाला. त्या शाहिरी वाङ्मयाला हीन लेखून त्याची उपेक्षा करणें हिताचें नाहीं. तें वाङ्मय नाथपंथासारख्या परमार्थसंप्रदायाच्या अनुयायांचें असून त्यांत प्राचीन तत्त्वज्ञानाची भरपूर शिकवण आहे; वरून शृंगारिक वाटणाऱ्या लावण्यांतहि तशीच शिकवण आहे, शृंगारसुद्धां बहुतांशीं निर्मळ सोज्वळ आहे, हें लावणी वाङ्मयाचें स्वरूप निदर्शनास आणणें हा श्री. सहस्रबुद्धे यांच्या ग्रंथाचा मुख्य विशेष असल्याचें वाचकांना सांगितलें. श्री. सहस्रबुद्धे यांनीं तमाशे पाहून व लावण्या ऐकून त्यांचें चिंतनमनन करून जी तन्मयता संपादली ती तन्मयता त्यांच्या लेखनांतहि उतरली आहे. जिज्ञासूला ही तन्मयता आकर्षून घेईल, याबद्दल शंका नको. श्री. सहस्रबुद्धे यांची प्रकृति अलीकडे बरींच वर्षे खालावत असूनहि त्यांना हा ग्रंथ हातावेगळा केल्याची कृतार्थता लाभली याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें हें कर्तव्य आहे. शाहिरी वाङ्मयावर अलीकडे पुष्कळ पुस्तकें झालीं आहेत, पण श्री. सहस्रबुद्धे यांचें हें पुस्तक त्या सर्वांहून निराळ्या थाटाचें व अधिकाराचें आहे. असें पुस्तक लिहिलें म्हणून महाराष्ट्राच्या साहित्यप्रेमी लोकांनीं श्री. सहस्रबुद्धे यांचे उपकार मानले पाहिजेत.

न. र. फाटक

लेखकाचें निवेदन

माझे मातुल व गुरु कै. वासुदेव गोविंद आपटे यांच्याजवळ राहून लेखनाचे धडे घेत असतांना, स्फुट लेखांपेक्षां पुस्तकरूपानें लेखन करणें प्रशस्त, अशी शिकवण मला नेहमीं मिळत होती. त्या मार्गांत एक दोन वेळां प्रयत्न झाले, पण ते कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें अयशस्वी ठरले. मुख्य कारण असें कीं, ग्रंथलेखनाला स्वतःच्या अभ्यासाची व मुळांत वाङ्मयीन साधनेची जरुरी असते. ह्या वयांत माझ्याकडे दोन्हीहि नव्हतीं. म्हणून मासिकांतील लेखांवर मला समाधान मानून घ्यावें लागलें. पोटाच्या उद्योगाला सुरुवात 'ज्ञानप्रकाश' वृत्तपत्रांत झाली. त्याचा फायदा लेखनाची पद्धति ठसण्यांत झाला. त्या काळांतहि राजकीय संघर्षाचा प्रभाव फार असल्यामुळें उत्कट व कडक भाषेला भाव फार होता. माझी शाळा त्याच्या उलट होती. म्हणून सरळ आणि समजण्यास सोपें लेखन करण्याकडे माझी प्रवृत्ति झाली. तीच आतांहि कायम आहे.

ती. मामांच्या देखत हें पुस्तक प्रसिद्ध झालें असतें तर त्यांच्या मनाला केवढें मोठें समाधान झालें असतें याची जाणीव मला आहे. माझे बंधु कै. व्यंकटेश नारायण (बापूसाहेब) यांनाहि माझ्या या विषयावरील लेखनाचें पुस्तकरूपानें प्रकाशन व्हावें अशी तीव्र इच्छा होती, पण माझ्या दुर्दैवानें मला ती त्यांच्या डोळ्यादेखत पूर्ण करतां आली नाहीं. त्यांचें वर्षश्राद्ध नुकतेंच झालें. उच्च शिक्षणाचा अभाव व द्रव्याचाहि अभाव हीं दोन्हीं कारणें तर होतींच. त्यांत आणखी वयोमानानें होणाऱ्या शारीरिक स्वास्थ्याचा अभाव याची भर पडली. पण शेवटीं माझे थोरले चिरंजीव श्री. श्रीपाद (भय्या) यांच्या सतत तगाद्यानें व प्रोत्साहनानें पुस्तक लिहून झालें, व अनेक स्थित्यंतरें होऊन आतां 'ठोकळ प्रकाशन' संस्थेच्या करवीं पुस्तक प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे.

शाहिरी वाङ्मयाचे सार्वजनिक प्रयोग पाहण्याची सुरुवात माझ्या वयाच्या ८-१० वर्षांचे वयांत पुणें जिल्ह्यांतील खेड येथील यात्राप्रसंगापासून झाली. त्यानंतर नासिक जिल्ह्यांत सिन्नर, सटाणें, येवलें, नासिक येथें आणि सातारा जिल्ह्यांत माहुली येथें कार्यक्रम पाहिले. नगर जिल्ह्यांत कर्जतलाहि कार्यक्रम पाहिले. खुद्द पुण्यांत मला पूर्व-

वयांत ते पाहण्यास मिळाले नाहींत. पण तरुण व मध्य अवस्थेत तो वचपा मीं भरून काढला. खेडच्या प्रयोगांत प्रथम डफ-गाण्याचा नमुना दिसला. नासिक जिल्ह्यांत सगन-भाऊ, परशुराम यांच्या कवनाचा, कडेतंबुरीच्या लावणीचा प्रभाव जास्त होता. सातारा जिल्ह्यांत मात्र ढोलकीची लावणी जास्त म्हटली जात असे. उत्तरेकडील पठडीचा संथ लयींतील लावणीगायनाचा व दक्षिणेकडील पठडींतला जलद लयींतील उंच स्वरांत म्हटली जाणारी लावणी व झीलकऱ्यांचा आवेश यांचा प्रत्यय येऊन दोन्ही पठड्यांतील स्पष्ट फरक ध्यानीं आला होता.

पुढें वयाच्या तेविसाव्या वर्षी म्युनिसिपालिटीचा सेक्रेटरी म्हणून नोकरीस बारा-मतीस आल्यावर असे कार्यक्रम पाहण्याची चांगली संधि मिळत गेली. कै. पट्ठे बापूराव रेटरेकर यांचा तमाशा तेथें पाहिला. त्या वेळच्या त्यांचा रुबाब मनावर चांगलाच ठसला. माझे मित्र व सहकारी शेख कलंदर यांचें भांडवल. शेख अमीनभाई बागवान हे स्वतः भेदिक गाणारे होते. त्यांच्या दुकानावर बसून भेदिक गाण्याचा कार्यक्रम दरवर्षी नाग-पंचमीस पाहात असे. नंतर नोकरीनिमित्त रत्नागिरीस गेलों. तेथें स्थानिक तमाशे नव्हते. तरी पुण्याकडील कोणी फड फिरतीवर येत. त्यांचे कार्यक्रम पाहण्याला सुशिक्षित शिष्ट मंडळी उघड तयार नसत. मी घाटावरचा म्हणून मला एका प्रसंगीं मुद्दाम आमंत्रण आलें. माझ्यामागून अनेक मंडळी आली. येरवडेकरांचा हा कार्यक्रम मीं मुद्दाम सुशिक्षित शिष्टमंडळीकरितां करविला.

शहरापासून कोसभर दूर अशा बंदिस्त जागेंत झालेल्या या कार्यक्रमानें शिष्टमंडळी बेहद्द खुष झाली. वर्गणी जमवून एक रकमी देणगी हस्तस्पर्शाविना दिली. कोंकणांतून परत बारामतीस आलों.

येथें पुनः पूर्वीप्रमाणें तमाशा पाहणें सुरू झालें. गणेशोत्सवांत सुप्रसिद्ध तुरेवाले शाहीर श्री. रामचंद्रपंत दादा दळवी यांचा कार्यक्रम ऐकला. भेदिक डफगाणें ऐकणें सुरू झालें. शाहिरीपैकीं एका मुख्य अंगांत निष्णात असलेल्या दोन तीन गृहस्थांची गांठ

पडली. पुण्यांतील सगनभाऊचे गुरु सिद्राम रावळ यांचे वंशज बुवा रावळ व कै. तुकाराम भोई यांचे कार्यक्रम ऐकण्यांत आले. उरसांत श्री. आबाजी गुंडाजी मोरे व उदाजी बुरूड यांचा परिचय झाला. पहिले दोघे कलगीवाले व तिसरे चौथे तुरेवाले. या मंडळींच्या साहवासानें व साहाय्यानें शाहिरींतील डफगाण्याविषयीं पुष्कळच माहिती मिळूं लागली. त्याबद्दल त्यांचे आभार मी मनःपूर्वक मानतों. तें काम करण्याची हीच वेळ आहे.

या सुमारास प्रा. नरहर रघुनाथ फाटक यांनीं आपला शाहिरी कवनांचा संग्रह माझ्याकडे दिला. त्यांत दोनतीन हस्तलिखितें व एक संस्कृत लावणी होती. याहि मूळच्या अस्सल नसून नकला होत्या. माझ्या शाहिरी वाङ्मयाच्या व्यासंगाला बहर येऊं लागला.

पुण्याचे कै. वि. द. साठे हे आपण होऊन मजकडे, कांहीं जुन्या नाटकांविषयींच्या माहितीसाठीं आले. त्यांच्यामुळें कवि श्री. मनमोहन नातू यांचा परिचय झाला. श्री. नातू यांजकडून एक जुन्या लावण्यांची हस्तलिखित चोपडी मिळाली. श्री. साठे यांनीं हें माझें कार्य आपलें स्वतःचें समजून मला पुत्रवत् साहाय्य केलें. त्यांचे आभार समक्ष मानणें आतां शक्य नाहीं. सर्वांना चटका लावून ते ऐन तारुण्यांत देवाघरीं गेले. पण मला मात्र त्यांनीं कायमचा ऋणी करून ठेवला.

माझें मुंबईस येणेंजाणें असे. अशा एका प्रसंगीं 'मौज' कार्यालयांत गेलों असतां संपादक श्री. विष्णुपंत भागवत व माझे चिरंजीव श्रीपाद (मुंबई-पुण्यांत वृत्तपत्रसृष्टींत भैया या नांवानें ओळखले जाणारे) यांच्या कांहीं खुणा मुद्रा झाल्या. मला प्रथम तें कळलें नाहीं. नंतर समजलें कीं, मी आदल्या रात्रीं 'रामजोशी' चित्रपट पाहून आलों होतों, त्याबद्दल हें सांकेतिक बोलणें होतें. शेवटीं श्री. विष्णुपंतांनीं स्पष्टच माझ्या गळ्यांत लोढणें अडकविलें. रामजोशी चित्रपटाच्याविषयीं मीं त्यांच्या नियतकालिकासाठीं लेखन करावें असा त्यांचा आग्रह. मीं आढेवेढे घेतले. सुशिक्षित समाजाला रुचणारा तो विषय नाहीं, अशा हरकतीवर मी घुटमळलों. पण ते ऐकेनात. शेवटीं आमच्या ऋणानुबंधावर

नजर देऊन कबूल केलें. अशा रीतीनें या वाङ्मयावरचें माझें लेखन ' लावणी संप्रदाय ' या मथळ्यासाठीं ' सत्यकथा ' मासिकांत स. १९४८ मध्यें सुरू झालें. तेच लेख त्या वर्षाच्या दिवाळी अंकांत 'मौज'मध्यें प्रसिद्ध झाले. 'सत्यकथें'तील या लेखांमुळें माझ्या ' गळ्यांत ढोलकी अडकली. ' सरकारच्या ' तमाशा सुधारणा समिती'ला एक चिटणीस हवा होता. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनीं अध्यक्षाच्या अधिकारानें माझी नेमणूक केली. ती समितीच्या सभासदांनीं एकमतानें संमत केली व सरकारनेंहि मंजूर केली. मला पुष्कळ वेळ या विषयाकडे लक्ष देण्याला मिळाला. याबद्दल समितीचे मी मनःपूर्वक आभार मानतों. कार्यक्रम पाहण्याला भरपूर संधि मिळाली व जाणत्या आणि कलाकार मंडळींशीं विचारविनिमय करण्याला अवकाश मिळाला. समितीनें माझ्या अहवालाच्या मसुद्याला अक्षरशः पूर्ण संमति दिली. या माझ्यावरील सभासदांच्या विश्वासाबद्दल मी कायमचा ऋणी राहिलों आहें. समितीच्या सभासदांत (१) प्रा. न. र. फाटक, (२) श्री. मामा वरेरकर, (३) कवि सोपानदेव चौधरी, (४) श्री. गजानन ल. ठोकळ ही मंडळी होती. समितीच्या कार्यानिमित्त सभासदांशीं झालेला माझा परिचय दुणावला आणि स्नेहांत परिणत होऊन स्थिरावला. त्याचा परिचय या पुस्तकांत दिसून येईलच.

सन १९५२ मध्यें पुणें विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. ना. ग. गोरे यांच्याशीं परिचय झाला. त्यांनीं माझ्या लावणी संप्रदाय लेखांतील माहिती बरोबर असल्याबद्दल एका तमाशा प्रयोगास माझ्याबरोबर येऊन खात्री करून घेतली, आणि नंतर ' बहिःशाल शिक्षण ' मंडळानें मला ' शाहिरी ' विषयासाठीं व्याख्याता म्हणून यादींत दाखल करून घेतलें. त्यांनीं पाठविलेल्या यादीवरून निरनिराळ्या केंद्रांनीं मला व्याख्यानांसाठीं आमंत्रण देण्यास सुरुवात केली. त्याप्रमाणें मनमाड, कल्याण, बारामती, ठाणें, कँप देवळाली, वाई, अंमळनेर व पनवेल या केंद्रांत शाहिरी वाङ्मय या विषयावर प्रत्येकीं तीन व्याख्यानें झालीं. हैदराबाद व औरंगाबाद, ठाणें, ग्वाल्हेर येथेंहि व्याख्यानें झालीं.

या मध्यंतरींच्या काळांत कै. विष्णुपंत साठे यांच्या सूचनेनें पुण्यास **नगर ग्रंथालय, केळकर विचार मंडळ** व **कलोपासक मंडळ** या तीन प्रसिद्ध संस्थांत माझीं व्याख्यानें झालीं. कलोपासक मंडळांतल्या व्याख्यानाचे प्रसंगीं माझे मित्र शाहीर आबाजी गुंडाजी मोरे यांचा भेदिक डफगाण्याचा कार्यक्रम करविला. त्यांत गाणारे रामभाऊ किरवे, सदाशिव व इतर यांनीं साथ दिली. या कार्यक्रमास म. म. पोतदार, प्रा. ओतुरकर अशी निवडक विद्वान् मंडळीं हजर होती. त्यांना कार्यक्रम पटला. त्यानंतर थोड्याच महिन्यांत नागपंचमीनिमित्त माझें पुण्याच्या **साहित्य परिषदेच्या पटवर्धन स्मारक मंदिरांत** व्याख्यान झालें. तेव्हां प्रा. माटे, वाटवे, मंगरूळकर इत्यादि साहित्यिक व विद्वान् उपस्थित होते. या साऱ्या परिभ्रमंतीची परिणति मुंबई मराठी साहित्य संघानें मला कै. वामन मल्हार जोशी यांच्या स्मृतिदिनानिमित्त तीन व्याख्यानें देण्यास आमंत्रण दिलें, त्यांत झाली. त्यांनीं मला 'मराठी शाहिरी वाङ्मय' असा विषय दिला. मी माझ्या तत्पूर्वीच्या विचारानें स्थिर झालेली सारिणी मांडली.

विद्यापीठांत मराठी भाषेच्या अभ्यासांत 'बखर व शाहिरी वाङ्मय' असा विषय आहे. त्यावर नजर ठेवून निरनिराळ्या लेखकांनीं मराठी लावणीकारांच्या रचनेवर ग्रंथ निर्माण करणें सुरू केलें. त्यांत मुख्यत्वेंकरून तमाशांत म्हटल्या जाणाऱ्या कवनांवर भर आहे. जणू काय तोच एकमेव भाग आहे, असा आभास उत्पन्न करण्याकडे जास्त कल होता. माझ्या विचारानें तमाशांतली लावणी हें शाहिरी रचनेचें एक अंग असून दुसरीं दोन अंगेंहि आहेत. मराठी शाहिरी वाङ्मयाविषयीं बोलतांना असें व्यापक रीतीनें बोलणें जरूर आहे, असें मला वाटतें, म्हणून मीं तसें प्रतिपादन मुं. म. सा. संघांतील व्याख्यानांत केलें आणि तसें करतांना निरनिराळ्या वर्गांना नांवें दिलीं. 'मनोविनोदात्मक शाहिरी', 'मनोरंजक शाहिरी' व 'कीर्तिकाव्य' हे तीन विभाग मीं दाखविले. या तीन्ही भागांची मराठीपुरती ओळख मीं करवून दिली. या व्याख्यानांचा विस्तृत गोषवारा तेव्हां मुंबईच्या 'लोकसत्ता' दैनिकानें छापून माझ्या सारिणीला जणू

काय संमतीच दिली. 'मनोविनोद' व 'मनोरंजन' या शब्दांचे निरनिराळे अर्थ मीं बसविलेले कांहीं जाणत्यांना रुचले. कोणास ते पसंत नाहींत. त्याचप्रमाणें मनोरंजक शाहिरी कवनांत अनीतिप्रवर्तक भागच पुष्कळ आहे व तो त्या काळच्या राज्य-कर्त्याच्या स्वैर वर्तनाचा परिणाम आहे, असेंहि कोणीं स्पष्ट सांगितलें आहे. मला तें मत एकांगी वाटतें. सबंध शाहिरीला तें लागू होत नाहीं, असें माझें म्हणणें आहे. येथें सर्व वादाचा ऊहापोह करणें प्रशस्त नाहीं. पण माझ्या लेखनाची दिशा आणि तिच्यां-तील विशेषत्व दर्शित केलें आहे, इतकेंच.

मी विद्वान् नाहीं, संशोधक नाहीं, कवनांचीं वाडें मुळांत हुडकून काढणें, व त्यांचे पाठभेद तपासून निर्णय देणें, हें कार्य मीं अंगिकारलेलें नाहीं. केवळ मराठी भाषेंतल्या एका शाखेची यथातथ्य प्रशस्ति करण्याचें कार्य मीं अंगावर घेतलें आहे; त्याची परीक्षा करण्याचा अधिकार विद्वान् व साक्षेपी वाचकांचा आहे.

या विषयांत मनन करीत असतांना अध्यात्म शास्त्राशीं बराच संबंध येई. त्यांत बिनचूक मार्गदर्शन माझे खोल व्यासंगी पण प्रसिद्धपराङ्मुख मित्र श्रीयुत मनोहर हरि दाते यांनीं केलें. त्यांचें ऋण मान्य करण्याला त्यांची परवानगी नाहीं; तथापि केवळ कर्तव्य म्हणून मी तें करतों आहें.

या अवघड कामीं–विशेषतः शारीरिक व बौद्धिक प्रतिकूल परिस्थितींत–मला ज्यांनीं ज्यांनीं साहाय्य केलें त्या सर्वांचें ऋण मी मान्य करीत आहें.

कवनें प्रसिद्ध पुस्तकांतून घेतलीं आहेत, त्या पुस्तकांच्या संपादकांचें व प्रकाशकांचें ऋणहि मी मान्य करतों.

शेवटीं महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, प्रा. नरहर रघुनाथ फाटक व श्री. गजाननराव टोकळ यांनीं मला या कामीं आत्मीयतेच्या भावनेनें केलेल्या बहुमोल साहाय्याचें ऋण मान्य करून पुस्तक वाचकांच्या हातीं देतों.

म. ना. सहस्रबुद्धे

विषयानुक्रमणिका

टीप : सूचिपत्राभावीं विस्तृत विषयानुक्रमणिका पृष्ठवार दिली आहे.

प्रकरण दुसरें : शाहिरांची भूमिका (पृष्ठ २८ ते ४०)

तुकनगीर, गंगागीर (३९) जर्जरीजरी वक्षाचे मित्र शनदिननाथ (४०) समाजाच्या निरीक्षणासाठीं (४०)

प्रकरण तिसरें : मनोविनोदात्मक शाहिरी (पृष्ठ ४१ ते ७०)

'विनोद' शब्दाचा अर्थ, संतांची भूमिका बोधकाराची वा उपदेशकाची नाहीं.–खेळीमेळीनें सांगण्याची आहे. (४१) प्रसंगीं स्वतःला सूचना.–खेळ्या वगैरे शब्द आतां-प्रमाणें पूर्वींदेखील त्याच अर्थानें रूढ होते.––(४२) शाहीर बोधकार म्हणून मिरवत नाहींत. (४२) भिन्न सारिणीशीं वाद, संघर्ष-अभिनिवेश–मनोविनोद व मनोरंजन यांतील फरक ध्यानीं घेऊन शाहिरीकडे पाहणें इष्ट. (४३ ते ४६) शिवशक्तिमत–शाहिरींतून कसें दिसतें. (४७) हैबतीचें पद. (४८) ज्ञानेश्वरांचा आधार. (४९) महावाक्यें. शाहिराचें पद. 'अस्ति' 'भाति' 'प्रियु' पंचदशीचा व योग-वासिष्ठाचा आधार. (५०) पंडितांपुढें डफगाणें व्यर्थ. समर्थांचा आधार. (५१) 'योग-मार्ग' शाहिरीपद. (५२) शिवशक्ति 'समरूपि' (५२) पश्चिममार्ग. (५३) संकल्प-विकल्प–रूपक. (५४) तूर्याउन्मनि. ज्ञानेश्वरांचा आधार–कुंडलिनी–सारिणी ज्ञानेश्वरांची. (५६) नाथपंथ. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे भ्रष्ट उद्योग. ब्रिग्ज. (५७) नाथपंथाचें यथार्थ-स्वरूप–चांगदेवकृत तत्त्वसार, सिद्ध पंथ सांख्य–योग एकच. गीतेचा व ज्ञानेश्वरांचा आधार. (५८) नाथसंप्रदायांतलें ज्ञानाचें बीज. सहजस्थिति नारोपा–(५९) एकनाथांचा आधार–कान्हया. (६०) सिद्धेश्वर–नामदेव. (६१) ज्ञानेश्वरांचा आधार–नाथपंथाचें तत्त्वज्ञान 'अमृतानुभवांत' (६४) शाहिरींत शक्तिरूप. (६४) ब्रह्म. (६५) अव्याप्ति व्याख्या. ब्रह्मप्राप्तीचा मार्ग. (६६) शिव तेंच ब्रह्म. अनेक ब्रह्म. छांदोग्य उपनिषद्. समर्थ रामदास. (६७) काश्मिरी शिवागम. शिवसूत्र. अभिनव गुप्ताचार्यांची पंचदश श्लोकी. (६८) तुरेवाले शक्तीला कां मानीत नाहींत. रामा नरूचें पद. (६९) 'ज्ञान' 'योग'–'नाथपंथी'–(७०) शिव व काश्मिरी सदाशिव एकच.


प्रकरण चवथें : मनोरंजक शाहिरी वाङ्मय. (पृष्ठें ७१ ते २०६)

मनोरंजन व मनोविनोद निराळें कसें ? (७२) भेद स्थूल. मॅक्डोनल पद्धति-कालाचा अनुक्रम व विषयवारी (७३) सामूहिक नीतीचें मूल्य. सुखांत सुखाचीं साधनें विपत्तींत विरंगुळा. (७४) प्रकृष्ट प्राकृत व मराठी, क्रांतिकारी वाङ्मय मनोरंजकापेक्षां उच्च. (७५) मनोरंजक कवनाविषयीं सुशिक्षितांची दृष्टि. लावणी हें गेय कवन. (७६) गणेशवंदनाचें स्थान. (७७) लावणींतला 'गण'. पंचायतनास नमन. (७८) विस्तारांतून एकत्व. बापू सगनचा 'गण' प्रतिकूल पूर्वग्रह. (७९) दुला रखमाचा गण. (८०) शाहिरी वाङ्मय इतराहून निराळें कां ? शास्त्राची कसोटी. (८१) ज्ञानेश्वरांचा गणेश हा गणाचा उगम. (८२) गवळण—कृष्णचरित्र सोईचें कां ? तान्हा-कान्हा व गोपाळ कान्हा—लीला. (८३) विषयानंद ब्रह्मानंदाला द्वारभूत—शर्त. (८४) सलिल व कलिल. (८५) यशोदेचा पुत्रवात्सल्यभाव. शिशु अवस्थेंतील लीला. 'हरे-रिह मुग्ध वधूनि परे (जयदेवाची अष्टपदी.) (८७) मराठी रूपांतर नाथ माधव कृत. सवंगडी प्रौढ स्त्रिया. मुग्ध गोपी—होनाजीची लावणी. (८८) यशोदेची द्विधा मनः-स्थिति (८९) कृष्णाची मुरली मुरलीध्वनि शिव, सत, आनंदमय. मुरलीची चटक—लावणींत. (९०) 'राधा'—सगनचें वर्णन. होनाजीची मुरली. (९१) तीन शाहिरांची परंपरा. मुरली वाद्य कसें ? निषाद गांधार भावांचें वादन. (९२) वैदिक उद्गीथ. गौहरनी बानी. प्रेमरस. प्रभाकराची लावणी. (९३) विश्वव्यापि नाद. 'पांगुळली, स्थिरावली वृत्ती' श्री. तुकाराम. 'यम' अवस्था. 'व्या हिसकुनी कोणी मुरली'. (९४) समष्टीं-तील रसाचा भोग, 'कुंजांत वाजवी वेणू.' (९५) रुसवा. यशोलीला (९६) रंगक्रीडा (९७) रसौ वै सः (९८) आत्मदर्शन. (९९) तुकारामांची पातळी, 'तुका त्यांचे बरोबर'. (१००) कृष्णगोपी निंदा. संगीतांत महत्तर प्रमाण. (१०१) संघर्ष व मीलन. संत (१०२) तुकारामांची गवळण. (१०३) देवाचें देणें due. (१०४) होनाजीची गवळण. तोल सुटण्याची जागा. पट्ठे बापूरावांची गवळण. (१०५) महेश्वराची विभूति


मूढ जाणत नाहींत.– अवतारांतील विभूतिमत्त्व. (१०७) पाहिलें नाहीं रवीनें तें केलें कवीनें (१०८) तीन पिढ्यांनीं पाहावें–हा केवळ आदर्श–शृंगारिक प्रसंग (१०९) विलोभनीय दर्शन. मोहिनी संभवनीय चार्वाकी आळवणी. (११० व १११) आसक्ति. बंधमुक्तता. हंस. रथांतील बुंदखडा. होनाजीची सूचना सगननें कार्यवाहींत आणली. हंस म्हणजे अहंसः –(११२) शाहिरांच्या कल्पनेचा विपर्यास शाहीर केवळ चाटुस्तुति पाठक नव्हत. कहाणीवर कवन. चंद्रावळी कथा. (११३) रूप सुंदर गुजरी व ' मवास ' राजपुत्र, (११५) पतिव्रता गुजरीण (११६) राजपुत्राचें विलोभन आणि त्याचा अत्याचार गुजरणीकडून धिक्कार (११७) राजपुत्राचें गवळ्याला द्वंद्वयुद्धाचें अव्हान व त्यांत राजपुत्राचा पराभव पण गुजरीच्या विनवणीनें त्याला जीवदान. राजाकडून गुजरीचा सत्कार. (११८) राजपुत्राची आत्महत्या. पतीच्या आज्ञेवरून गुजरीचें राजपुत्रासमवेत सती जाणें. शाहीर मिश्ररूपाची कविता करणारे. – विविध आग्रक. – अलौकिक पति. (११९) आसक्त व अनासक्त जीव. – उपनिषदाचा ' अजा ' दृष्टान्त. सौंदर्यदर्शन. (१२०) सोनपुरळी उमा. दीप्तिमानाच्या द्वारें अरूपाचें दर्शन. केनोपनिषद्कथेवरून संस्कृत सौंदर्यवर्णन. (१२१) त्या अनुरोधाचें मराठी शाहिरी कवन. रामजोशी शाहिरांत वडील–होनाजीचें कवन. (१२२) शंकराचार्यांच्या शतःश्लोकीचा विस्तार. ' सखु ' (१२३) ' सखी, ' ' सखा, ' रया, ' ' सज्जन मन, ' ' राया. ' पुरुषाकृतीचें सौंदर्य–षोडशकलापूर्ण कृष्ण. ' घनःशाम सुंदरा श्रीधरा ' (१२४) गुणवर्णन. ज्ञानेशांचा कान्हा. (१२५) बाजीराव कीं देव. ' गुणी राया ' निराळा ' बिसनी ' निराळा. (१२६) ' षोडशकला–युक्तचंद्र ' ' राजेंद्र '. अजून निर्णय नाहीं. (१२७) अनवस्था चालू–इंद्र कोण ?–आणखी कांहीं सांकेतिक शब्द. माझी ' करामत ' नाहीं. आत्मरूपदर्शनाची आसूशी. (१२८) ' आत्मनस्तुकामाय '. हें दर्शन आनंददायक असून विक्षेपदायक सबब तेथें घुटमळावयाचें नाहीं. सगनशिष्य रामजीचें कवन. (१२९) पंथभेदांतहि पर्यवसानाचें ऐक्य. (१३०) क्षणिक दर्शन–साधु विष्णुदासांचें कवन. (१३१) वेसबूर साधक भांबावतो. (१३२–१३५) सहवासाची

आसुशी–हिंदी बटाऊ. गोविंदरावाची मोहनाबटाऊ. ' मदनजगायेरी ' ' आत्माराम शेजे आला ' इ. संतवचनांचा अर्थ. (१३६) ' रात्र ' ' मधेरात ' ' एकरूपाचा ठसा ' रूपदर्शनांतील भंगामुळें देहत्याग. ' इष्काचा फिरका '. (१३८) देहाचा निरास. प्रेमोत्सुक मुशाफर. (१३९) परस्परांची परीक्षा. दोघेंहि कर्मानें जर्जर. (१४०) समदुःखी. (१४१) जोडी जमली.–रामजोशी. प्रभाकर–सगनभाऊ. (१४२) 'आत्मज्ञानीफुडा–जात्यंधु' (१४३) इष्किलरंग(१४४)एकपंथीयांचा सामना. बहुकोणी रंगढंग, एकचित्तें वागा.(१४५)प्रियकराला प्रेयसी सजवी. (१४६) दृष्टीचा ताईत. (१४७) शृंगारप्रसाधनें. तुरा कोणी बनविला. (१४८) सौंदर्यदर्शन. ' मज्मून–इ–हुस्न ' शाहिरी कनिष्ट भजन. सुंदरा. (१४९–५०) ' सब्रीवाली ' हा दर्द कठीण बेताल. (१५१) तम मायेचें रूपक. श्रीशंकराचार्यांचें वर्णन. साम्यावस्था आनंद. दुरत्यया माया. (१५२) लावणी पुणेंप्रांताचा मक्ता नव्हे. गंगथडीचा नमुना. **परशुराम बाळकृष्ण.** (१५३) परशरामाची लावणी. (१५४) अद्भुत ! पण ग्रामीण. पैठणचा बाळकृष्ण. (१५५) पतिव्रता स्त्री मूर्खाला फटकारते. (१५६) मुक्तेश्वरी भारतांतला दाखला. पदरीं पडलें प्रिय झालें. (१५७) भागवतांतील दाखला. (१५८) **अनंतफंदी.** कांहीं अनाम कवींच्या रचनेचा शाहिरीवर शिंतोडा. (१५९) उदाहरण. **शिवनेरीचा नूर** बहिरु मल्हारी. गोविंदराव साळी. दुला रखमा. (१६०) आक्षेपकांची भांग उतरेल असें कवन. हेंहि शाहिरी कवन आहे. (१६१) विकृत प्रश्नकाला ज्ञानेश्वरांचा फटका.संगीतकला व शास्त्र.प्रभाकराची सोळा रागांची लावणी. (१६२) गंगालहरी (१६३) शास्त्राची बाजू. हैबतीचें कवन. (१६४) स्वराचा उगमच उत्क्रमण. (१६५) सहा **राग छत्तीस रागिण्या** (१६६) सहाछतिसा शास्त्राची चर्चा. दिलखुष कवन (१६७) सुखिसंपत्तिवर्णन. मुरब्बा प्रभाकर. (१६८) **चौसरबाजी.** (१६९) बाजीरावाविषयीं लोकवार्ता. जीवंत नरदा. सगनच्या कवनाचा अनर्थ. चतुर्विध भक्ति (१७०) **सौभाग्यकांक्षिणेचें प्रेमपत्र** (१७१) रुक्मिणीचें पत्र (१७२) भक्ताची पत्रिका. प्रियाकांताचें नातें (१७३) **सौभाग्यवतीचें सौभाग्य.** त्या काळचें वैभव (१७४)

♣ ♣ ♣



श्री. म. ना. सहस्त्रबुद्धे



म. भा. भू. ज. र. आजगांवकर,
श्री. म. ना. सहस्त्रबुद्धे व श्री. न. र. फाटक

प्रकरण पहिलें

शाहिरीची उपपत्ति

विषयाची व्याप्ति : प्रमाण ग्रंथ

'मराठी शाहिरी वाङ्मय' या तीन शब्दांत मिळून व्यक्त होणारी जी वस्तु तिचा विचार प्रस्तुत करावयाचा आहे. वाङ्मय असें म्हटल्यानें कशाचा बोध व्हावा याची निश्चिति करण्याचा माझा अधिकार नाहीं. तेव्हां अधिकारी पुरुषांनीं जें ठरवून दिलें आहे, त्याचा आदर करणें माझें काम आहे. कै. हरि नारायण आपटे यांनीं याबाबत जें ठरवून दिलें आहे तें मी प्रमाण मानतों. त्यांनीं सांगितलें आहे—

" मनुष्याची सदसद्विवेक बुद्धि जागृत करून त्यास नेहमीं सन्मार्गांत ठेवण्यास कारण होणारे, त्याच्या विविध मनोवृत्तींचा विकास करून शुद्ध अशा आनंदाचा आस्वाद त्यास देऊन जें काय अशुद्ध, अपवित्र व क्षणिक त्यापासून दूर राहण्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष बोध करणारे, नेहमीं उदार व रमणीय अशा विचारांचा त्याच्या मनांत संचार करवून, सत्याचे ठिकाणीं तो सदा लीन होईल असें करणारे, त्यास मनुष्यत्वांतून काढून देवत्वास पोचविणारे, असे जे कोणाचेहि अंतःस्फूर्तीनें शब्दरूपानें बाहेर पडलेले, लिहून ठेवलेले किंवा उच्चारलेले विचार, त्या सर्वांना समुच्चयानें वाङ्मय ही संज्ञा आहे."

हे विचार ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दहाव्या वार्षिक समारंभाच्या वेळी अध्यक्षपदावरून कै. आपटे यांनीं काढले (सन १९०७). त्यांत त्यांनीं आदर्श ठरवून दिला आहे, कांहीं मर्यादा घातली आहे, ती ध्यानांत ठेवून मला विचार करावयाचा आहे.

मराठी या शब्दानें आणखी एक मर्यादा पडते. ती नुसती भाषेपुरती आहे, असें निदान मी तरी समजत नाहीं. मराठी भाषेनें एकत्र आलेला जनसमुदाय असा अर्थ मी घेत आहें, तरी त्या जनसमुदायाच्या जास्तींत जास्त समान अशा संस्कृतीवर माझी नजर आहे. ती असणें युक्त अगर अयुक्त हा वाद मी घालूं इच्छित नाहीं. अनेक भिन्न भिन्न संस्कृतींचे जनसमुदाय एखादी भाषा बोलूं शकतील, लिहूं शकतील, समजूं शकतील. पण केवळ भाषा एक असल्यामुळें त्या सर्वांना एकाच संस्कृतीचे मानणें चुकीचें होईल. समान संस्कृति नसणारे पण मराठी भाषा बोलणारे, लिहिणारे लोकसमाज आहेत. पण त्या सर्वांना एकच वाङ्मय सारखेंच पटेल, रुचेल अगर लागू होईल असें नाहीं. म्हणून समान संस्कृति व ती व्यक्त करणारी भाषा हीं दोन्हीं अंगें 'मराठी' या शब्दांत आहेत असें मी धरून चालतों.

तिसरा शब्द शाहिरी. मराठींत रूढ असलेल्या शाहीरकवि या नामावरून बनलेलें हें विशेषण. हा शाहीर शब्द अरबी व फारसी शायर (षाइर्) या शब्दावरून आलेला आहे, याविषयीं वाद नाहीं. अन्य कोणत्याहि शास्त्रोक्त रीतीनें त्याची व्युत्पत्ति अद्यापि कोणीं सांगितलेली नाहीं. अरबी, फारसी या भाषांचा मराठी समाजाशीं कोणत्यातरी काळांत विशेष संबंध आला आणि त्या भाषेंतल्या कांहीं विशिष्ट वाङ्मय-प्रकाराचें ग्रहण मराठी रचनाकारांनीं केलें म्हणून मराठीला पूर्वीं अपरिचित अशा रचनेला व ती रचना करणाऱ्यांना अनुक्रमानें शायरी व शायर या शब्दांचे अपभ्रंश शाहिरी व शाहीर अशीं नांवें रूढ झालीं, असा समज होणें शक्य आहे. तथापि प्रकार असा आहे कीं, हा समज कोणीं स्वीकारलेला नाहीं. पण त्याबरोबर हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, हा समज जर पत्करणार नाहीं, तर दुसऱ्या कोणत्या रीतीनें हें प्रकरण उलगडतां येतें तेंहि कोणीं दाखविलेलें नाहीं. शब्दाची म्हणजे वस्तूच्या नांवाची व्युत्पत्ति ठरली, पण त्या नांवानें ओळखली जाणारी वस्तु मात्र व्युत्पत्तीच्या मुळाशीं संबंध न ठेवणारी, असा अनवस्थेचा प्रसंग आहे. मराठी परंपरेंत नसलेलीं नांवें आहेत, पण वस्तु मात्र मराठी परंपरेंतली आहे, असें आहे कीं काय, असा प्रश्न ओघानें येतो.

या प्रश्नाचा विचार करतांना पूर्वीं कोणीं याचा निर्वाह कसा केला, हें पाहणें क्रमानें आलें. तेव्हां या विषयावर लिहिणाऱ्या निबंधकारांचा मागोवा घेण्यापूर्वीं त्या सर्वांचें सार ज्यांत सांपडेल त्या शब्दकोशकारांचा आश्रय घेणें सध्यां सोईचें आहे. सर्वमान्य असा महाराष्ट्र शब्दकोश यासंबंधांत जें सांगतो तें असें:—

शाहिरी म्हणजे शाहिराचें कवित्व. आणि शाहीर म्हणजे पोवाडे, लावण्या व या धर्तीचीं कवनें करणारा कवि. शाहीर या शब्दाचा उगम शायर या अरबी, फारसी शब्दापासून. यानंतर या शाहिरींतले मुख्य प्रकार, जे पोवाडा व लावणी, ह्यासंबंधांत कोशकार सांगतात तें असें—पोवाडा--पवाडा या शब्दाचा अर्थ— 'वीरांच्या पराक्रमांचें, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचें, तसेंच एखाद्याचें सामर्थ्य, गुण,

कौशल्य इत्यादिकांचें काव्यात्मक वर्णन, प्रशस्ति, स्तुतिस्तोत्र' असा दिला आहे. दुसरा प्रकार लावणी. ह्याचा अर्थ--' एक प्रकारची कविता, गाणें, चीज. ' असा प्रथम देऊन पुढें असें सांगितलें आहे कीं, ' ही खास महाराष्ट्रीय आहे. हींत शृंगार, वैराग्य वगैरे दृष्टीस पडतात. ' कोशकारांनीं आणखी असें दाखविलें आहे कीं, याशिवाय आणखी प्रकार संभवतात. ते म्हणजे ' डफगाणें अथवा डफावरचें भजन, गाणें ', आणि ' भेदिक म्हणजे हृदयापर्यंत खोल जाऊन पोहोंचणारें (वेदान्तपर व गूढ अर्थांचें गाणें, पोवाडा, लावणी इ.)'. याशिवाय ' देशावरचें गाणें--गीत-अभंग--पद--लावणी--कवन, दोन अर्थांचें काव्य ' असा प्रकार सांगून ' ह्याचा उत्तानार्थ शरीरविषयक असतो व गूढार्थ आत्मा किंवा ब्रह्म याविषयीं असतो ' असें म्हटलें आहे.

महाराष्ट्र शब्दकोशकारांच्या साहाय्यानें इतका अर्थ निष्पन्न झाला. येथें लक्षांत ठेवण्यासारखी एक बाब अशी आहे कीं, वर सांगितलेल्या गीतप्रकारांपैकीं लावणी ही खास महाराष्ट्रीय आहे असें निश्चयानें सांगितलें असून त्याशिवाय जे प्रकार वर उल्लेखिले आहेत त्यांतला कोणताहि परदेशीय असावा असा संशयदेखील व्यक्त केलेला नाहीं. अशा रीतीनें वस्तु निव्वळ मराठी आणि तिचें नांव परदेशीय असा विस्मयकारक प्रसंग येथें आहे. कोशकारांनीं शाहिरी कवनाचे मुख्य प्रकार पोवाडा व लावणी असे सांगून इत्यादींत आणखी काय येतें हेंहि सांगितलें आहे. वैराग्यापासून शृंगारापर्यंत आणि प्रशस्तीपासून गूढार्थापर्यंत अनेक विपुल अवस्थांचें व विषयांचें वर्णन अथवा विवेचन करणारा हा मराठी कवनप्रकार कोणत्या-तरी एका मराठी नांवानें ओळखला जात नसून त्याला अगदीं परक्या अशा भाषेंतलें नांव लागलें आहे, हा प्रकार चिंत्य आहे. भाषा आणि संस्कृति यांच्या संबंधावर मीं सुरुवातीलाच लक्ष वेधून ठेवलें आहे. त्या अनुरोधानें या प्रकाराचा शोध पुढें चालू ठेवावयाचा आहे.

शब्दकोशकारांच्या नंतर ज्ञानकोशकारांचा आश्रय घ्यावयास गेलों. त्यांनीं मराठी काव्याचा विचार करतांना शाहिरी प्रकाराचा अगदीं थोडक्यांत परामर्श घेतला आहे. पण त्यांत त्याची उपपत्ति सांगितलेली नाहीं. त्यांचें मत मराठी काव्याविषयीं विशेष अनुकूल नाहीं. पण त्यांना मराठी पोवाडा हें उत्तम काव्य वाटतें. त्यांच्या मतें पोवाडे व लावण्या हें उत्तान काव्य आहे. लावण्या देवावर व उपदेशपर अशा थोड्या असून शृंगारपर जास्त आहेत. कित्येकांची भाषा अत्यंत गोड व उदात्त वर्णनपर आहे, असा त्यांचा अभिप्राय आहे. मोठ्या आशेनें धाव घेतली खरी, पण येथें पूर्ण निराशा झाली. ' काव्य ' या शब्दाच्या भोंवतीं फिरत राहिल्यानें त्यांच्याकडून हा प्रकार झाला. एरव्ही त्यांच्या शोधक व विवेचक दृष्टीचा कांहींतरी लाभ या बाबतींत झाला असता.

निबंधकार

आतां निबंधकारांच्याकडे वळावयाचें. त्यांत दोन प्रकार. संपूर्ण मराठी वाङ्मयाचा आढावा घेणारे, अर्थात् कालानुक्रमानें, त्यांचा वर्ग निराळा. आणि विषयाची निवड करून तेवढ्यापुरतें तपशिलानें विवेचन करणारे, त्यांचा वर्ग निराळा. पहिल्या वर्गात प्रा. वि. पां. दांडेकर यांचा ' मराठी साहित्याची रूपरेषा ' हा ग्रंथ आणि दुसरा प्रा. तुळपुळे यांनीं संपादलेली आणि वाढविलेली कै. भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत ' या ग्रंथाची चवथी आवृत्ति हे दोन्ही ग्रंथ येतात. दोन्हीहि अगदीं ताजे (स. १९५२) आहेत. प्रा. दांडेकर यांच्या ग्रंथांत आपला विषय असलेल्या रचनेविषयीं भरपूर प्रशस्ति आहे, पण मुख्य मुद्दा जो उपपत्तीचा, त्याला हात लावलेला नाहीं. गुणाचा विचार करावयाची वेळ येईल तेव्हां त्यांच्या अभिप्रायाचा आदर अवश्य होईल. पण सुरुवातीचा प्रश्न सोडविण्यास साहाय्य अगर मार्गदर्शन होत नाहीं, इतकाच अर्थ व्यावयाचा. ' महाराष्ट्र सारस्वत ' या ग्रंथांत उगमाचा थोडा उल्लेख आहे. ' शाहिरांचा जुन्यांत जुना उल्लेख शके ११०० च्या सुमारच्या महिकावतीच्या बखरींत सांपडतो ', असा स्पष्ट निर्देश करून पुढें असें सांगितलें आहे कीं, त्यानंतर शहाजीच्या कालापर्यंत त्याचा उल्लेख होत नाहीं. यांत कांहीं चांगली सूचना मिळते, पण त्याबरोबर एक आपत्तीहि येते. शाहिरी हें नांव शके ११०० मध्यें रूढ होतें हें मान्य करण्याची वेळ आली आहे. ज्ञानेश्वरांच्यापूर्वी शंभर वर्षांच्या काळांत ' शाहिरी ' रूपाचीं कवनें असणें संभवनीयच नव्हे तर अगदीं शक्य आहे. पण त्यांना तें नांव होतें असें मान्य करण्याला अडचण आहे. या काळांतली मराठींतली एक एक ओळ मोठ्या साक्षेपानें उजेडांत आणणारीं शोधक माणसें, एक कविता प्रकार सांपडण्याचा योग आला असतां तो डावलतील हें शक्य वाटत नाहीं. समुद्रकांठीं अरबी शायर त्या काळांत असणें शक्य आहे. पण त्यांचा ' झगा ' पांघरून मराठी सारस्वतांत मिरवणारे कोणी लहानमोठे मराठी रचनाकार होते कीं काय हा प्रश्न आहे. तसे ते होते असें ठरत असलें, तर त्यांना अरबी झगा घेण्याचा प्रसंग कां आला ? त्यांनीं नुसता झगाच अरबी घेतला कीं कांहीं मुख्य वस्तुहि मराठींत नव्हती म्हणून अरबींतून घेतली याचाहि उलगडा झाला पाहिजे. 'झगा' हा शब्द मीं नांव या अर्थानें घेतला आहे हें उघड आहे. पुढें शहाजीच्या कालापर्यंत त्याचा उल्लेख येत नाहीं, या अर्थाच्या वाक्यानें ही गुंतागुंत अधिकच कठीण होते. शाहिरांच्या रचनेंत ज्यांचा समावेश होतो म्हणून वर पाहिलें आहे, ते अनेक प्रकार शहाजीच्या काळालगतच्या शिवाजीच्या काळांत जर सांपडले तर पुनः अडचण येईल. हे सर्व प्रकार शाहिरींतून काढून टाकावयाचे कीं राहूं द्यावयाचे असा प्रश्न येईल. कारण मूळची अरबी शायरी, जी महिकावतींत ठाण मांडून बसली होती आणि जिच्यांतल्या नावीन्यामुळें मराठी रचनाकारांना तशीच रचना मराठींत करावीशी वाटली असें ध्वनित केलें जात आहे, तिच्यामध्यें लावणी, पोवाडा, भेदिक

गाणें इत्यादि प्रकारांचा समावेश होऊं शकतो असें कबूल करावें लागेल. इतकेंच नव्हे, तर त्या प्रकारांच्या मराठी उपपत्तीवर पाणी फिरवावें लागेल. ते सर्व प्रकार मराठीचे नव्हत, तर नुसत्या अनुकरणानें मराठींत अरबींतून आले असें ठरेल. तसा प्रकार खरोखरच असला तरी खेद मानण्याचें कांहीं कारण नाहीं. मराठी भाषेची अशा रीतीनें उणीव भरून निघाली, समृद्धि झाली असा समाधानाचा श्वास सोडतां येईल. इतकेंच नव्हे, तर मराठी संस्कृतींत तिच्या स्वगृहींच्या वारशांतून न आलेले गौरवास्पद नमुने आले, यामुळें मराठी संस्कृतिहि समृद्ध झाली असा आनंद उपभोगतां येईल.

व्युत्पत्ति

वास्तविक रीतीनें असा कांहीं प्रकार नाहीं. पोवाडा, लावणी यांची उपपत्ति कोणत्याहि अरबी शब्दापासून लागत नसून ती संस्कृत–प्राकृत अशा क्रमानें आलेली आहे. पवाडणें म्हणजे स्तुति करणें असा अर्थ देऊन प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांनीं पवाडा म्हणजे कीर्तिकाव्य असें सांगितलें आहे. व्युत्पत्ति अरबींतून एवढ्यापुरतें हें पाहणें आहे. त्याचा तपशील पुढें पाहावयाचा आहे. लावणी या शब्दाची व्युत्पत्ति संस्कृत लापनिका या शब्दापासून असल्याचें प्रा. कुलकर्णी सांगतात. म्हणजे शाहिरींत ज्यांचा प्रामुख्यानें व्याप आहे तीं दोन्हीं अंगें शुद्ध संस्कृताच्या वारशानें आलेलीं आहेत, अरबींकडून घेतलेलीं नाहींत असें सिद्ध होतें. मग शाहिरांचा उल्लेख अकराव्या शतकांतल्या बखरींत आहे या म्हणण्याला काय अर्थ शिल्लक राहतो ? तें एक संदिग्ध विधान आहे इतकेंच समजावयाचें कीं कसें ?

प्रचलित शब्दप्रयोग

शाहीर व शाहिरी या नांवांच्या भोंवतीं घोटाळत राहिल्यानें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. तें कांहीं एका कवन-प्रकाराच्या विशिष्ट गटाला दिलें गेलेलें नांव आहे, पण त्याचा देह व साजशृंगार पूर्णपणें देशी आहे, एवढें तरी प्रत्ययास आलें. व्यापक नांवाचा उपयोग करण्याची वृत्ति शास्त्रीय आहे पण ती शास्त्रीयता टिकवून नांवें दिलीं गेलीं नाहींत, तर असा प्रसंग येतो. यासंबंधांत प्रा. दांडेकर यांच्या ग्रंथाचा काय उपयोग होतो तें पाहणें अगत्याचें आहे. त्यांनीं मराठी काव्याचे दोन गट पाडले आहेत. पहिल्यांत त्यांनीं तुकाराम, रामदास, वामनपंडित, मोरोपंत इत्यादिकांना घातलें आहे; आणि पुढें असें सांगितलें आहे कीं, ' त्यानीं, ज्या जगांत ते वावरत होते, त्यांतून काव्यविषय न निवडतां उपनिषदें, भारत, रामायणांतून आपले विषय निवडले. लौकिक जगाहून निराळ्या जगांत ते वावरत असल्यागत त्यांची काव्यसृष्टि आहे. ' प्रा. दांडेकरांच्या दृष्टीनें वरील वर्णन ज्यांना लागू होत नाहीं असा दुसरा वर्ग मात्र अधिक जागरूक होता. या प्रस्तावनेनें दर्शित होणारा वर्ग म्हणजे मराठी शाहिरांचा–त्यांना उत्तम प्रशस्तिपत्र मिळालें आहे तें असें:—

" मुकुंदराजापासून मोरोपंतांपर्यंतच्या काव्याला मराठी काव्य म्हणण्यापेक्षां भारतीय काव्य म्हटलेलें अधिक शोभेल. कारण त्यांत महाराष्ट्राची विशिष्टता अशी फार थोडी उतरली आहे. अखिल भारतीय कथा आणि अखिल भारतीय तत्त्वज्ञान यांचाच काव्यात्मक व पद्यात्मक परामर्श त्यांनीं घेतला आहे. याच्या उलट शाहिराच्या लावण्यांची व पोवाड्यांची स्थिति आहे. मराठ्यांचें मनगट, मराठ्यांचें मन, मराठ्यांच्या भावभावना, मराठ्यांचे आचार-विचार, मराठ्यांचा पोशाख आणि मराठ्यांचा मानधनी मोठेपणा या सर्वांचें प्रतिबिंब लावण्यांत व पोवाड्यांत उत्तम प्रकारें पडलें आहे. हें खरें मराठी काव्य होय. "

या प्रशस्तीमुळें अंतःकरणाला गुदगुल्या होतात, पण आपल्यापुढें असलेल्या अडचणी दूर करण्यासारखें यांत कांहीं सांपडत नाहीं. शाहिरी या शब्दावरून कांहीं माग लागत नाहीं, असें अनुभवास येत असल्यामुळें तें कवच टाकून देऊन आंत असलेल्या वस्तूंचा व तिच्या घटकांचा परिचय करून घेणें इष्ट वाटतें. प्रमाण मानल्या जाणाऱ्या ग्रंथांत याचा थोडासा निर्देश जरी सांपडला, तरी पुढचा मार्ग सुकर झाला असता. असो.

लोकाभिमुख काव्य, मराठी काव्याची पहाट, लोकगीत, तंतकाव्य वगैरे शब्दप्रयोग असेच भ्रामक आहेत. उपपत्ति पाहण्याला त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. कांहीं निश्चित टप्प्यावर गाडी आली म्हणजे या वर्गीकरणाचा विचार करतां येईल. तो पावेतों शाहीर हा शब्द सोडतां येत नाहीं. मात्र त्याचा वकूब ध्यानांत राहिला म्हणजे बिघाड होणार नाहीं. शब्दांत गुरफटल्यानें मागचा शोध बंद होतो आणि त्या शब्दाचा अर्थहि संकुचित होतो. अशा परिस्थितींत प्रत्यक्ष अनुभव बराच उपयोगी पडेल. उदाहरणानें हें स्पष्ट होईल. शाहिरींत पोवाडा येतो. त्याचा अर्थ कीर्तिकाव्य असा आहे. अरबींत त्या कवनप्रकाराला कसीदा असें नांव आहे. मराठींत असें कवन रचणारा तो शाहीर आणि तो जें कवन रचतो त्याचें वर्गनांव कसीदा नसून पोवाडा. बरें, पोवाडा हें कीर्तिकाव्य म्हणावयाचें तर पुराणांत अगर धर्मग्रंथांत ज्यांचें वर्णन आलें आहे त्याला कोणी पोवाडा म्हणत नाहीं, अशी आजची स्थिति. पुराणापर्यंत ज्यांची कीर्ति पोंचली, त्यांच्या व्यतिरिक्त, अलीकडे झालेल्या वीरांच्या शौर्याच्या कवनांत गोवलेल्या कथांना पोवाडा म्हणतात. पण ज्ञानेश्वरकालीं पोवाडा याचा अर्थ देवांचें स्तुतिपर कवन असा होता. निवृत्तिनाथ आपल्या अभंगांत म्हणतात—

निवृत्ति मुक्ताबाई चांगदेव गाढा ।
हरिचा पवाडा झेलिताती ।

अभंग स्वरूपाच्या कवनांचीं कडवीं झेलणें म्हणजे काय तें भजनाचे कार्यक्रम ऐकणारांना माहीत आहे. आणखी एक प्रकार पाहावयाचा. उपनिषदें,

महाभारत वगैरेंना दूर ठेवून शाहिरांनीं लोकाभिमुख होऊन कवनें केलीं म्हणून प्रा. दांडेकरांची त्यांच्यावर बहाल मर्जी आहे. या शाहिरांतला एक मराठवाड्यांतला कवि रामा देवंग कसें कवन करतो तें पाहा—

> निरखुनि त्वंपद जाणुनि तत्पद तुच्छ मानिले दिनरजनी ।
> असिपदापलिकडे जाउनी परमपदीं आनंद मानी ॥

उपनिषदांच्या गाभ्यांत शिरुन महाकाव्यावर व्याख्यान करणारा हा शाहीर गेल्या पन्नास-पाऊणशें वर्षांतलाच आहे. त्याच्यावर अरबी शिक्का आहे. त्याची वस्तु उपनिषदांत सांगितलेली तीच आहे. त्यानें केलेल्या रचनेंत काव्य आहे कीं नाहीं हा वाद बाजूस ठेवला तरी तें वाङ्मय आहे. रूढ आहे. त्याचा आदर समाजांत केला जातो. तें म्हटलें जातें. तेव्हां त्याला शाहिरांतून वगळावयाचा कीं कसें ? जरी कोणीं मनांत आणलें तरी तें शक्य होणार नाहीं, इतकें दृढ स्थान रामा देवंगाचें आहे. तिसरा प्रकार एका पौराणिक आख्यानावरच्या होनाजीच्या लावणीचा. त्याची सुलोचना सतीची लावणी अशी सुरु होतेः--

> सुलोचना वेल्हाळी राया इंद्रजिताची राणी ।
> सदनीं असतां सुखी आंगणीं पडला अतारपाणी ॥

यांत कोणत्याहि मराठा व्यक्तीचें वर्णन नाहीं. पण हें आख्यान शाहिरांत अति प्रिय आहे. अनेकांनीं तें रंगविलें आहे. मग तें लोकाभिमुख काव्यांतून वगळावयाचें कीं कसें ? तें शक्य झालें तरी शाहिरींतून तें कसें वगळतां येईल ? शाहिरींतल्या पोवाडा या अंगावर आजमितीस जास्तींत जास्त परिश्रम केलेले आणि त्या अंगाच्या अनुषंगानें लावणी अंगाचें सूक्ष्म निरीक्षण केलेले असे श्री. यशवंत नरसिंह केळकर यांचे ग्रंथ उपपत्तीच्या बाबतींत विशेष साहाय्य करूं शकत नाहींत. लोकाभिमुख होऊन केलेली रचना म्हणून ते तिचें कौतुक करतात पण तिची उत्पत्ति सांगतांना शिवशाहीच्या पलीकडे जात नाहींत. किंबहुना ते त्या दृष्टीनें प्रयत्नच करीत नाहींत. शिवशाहींत शौर्याचीं कृत्यें झालीं म्हणून पोवाडे झाले आणि उत्तर पेशवाईत लावणीला बहर आला अशा अर्थाच्या त्यांच्या निवेदनानें शोधाची दिशा खुंटते. जणू काय हीं दोनच अंगें शाहिरीला आहेत आणि त्यांची जोपासना होण्याला अनुकूल काल आला तेव्हां ती झाली, एवढ्यावर त्यांनीं समाधान मानून घतलें आहे. याचें कारण असें. त्यांनीं पोवाडे पुष्कळच ऐकले आहेत, शोधून काढले आहेत. त्या कामांत त्यांचा हात धरणारा आजमितीस दुसरा कोणी नाहीं. लावणीचें त्यांचें वाचनहि सूक्ष्म आहे, पण त्यावर त्यांचा भर नाहीं. कदाचित् त्याहि अंगाचा त्यांचा अभ्यास लवकरच लोकांच्या नजरेस येईल अशी आशा बाळगण्यास जागा आहे. (ती आशा आतां पूर्ण झाली आहे. ' अंधारांतील लावण्या ' या रूपानें, १९५६ मध्यें.) पोवाड्याच्या ऐतिहासिक भागांत त्यांनीं इतकी खोल दृष्टि

चालविली आहे कीं, ती पाहून मन थक्क होतें. पण साकल्यानें शाहिरी त्यांच्यापुढें उभी राहात नसल्यामुळें कित्येक सहज उलगडणारे प्रश्न त्यांनीं हाताबाहेर टाकले आहेत. इतक्या दीर्घ काळाच्या त्यांच्या एकनिष्ठेच्या परिश्रमांत ते प्रश्न त्यांना सोडवितां आले असते, पण तसें न झाल्यामुळें शाहिरीच्या उपपत्तीपुरता भाग तसाच अंधारांत राहिला आहे. प्रत्यक्ष अनुभव घेतांनासुद्धां एकदेशीयता ठेवल्यामुळें अपुरेपणा शिल्लक उरतो तो असा.

शाहीर कां म्हणावयाचें

शाहिरांना शाहीर असें कां म्हणावयाचें याला एकच उत्तर आहे, व तें असें कीं, ते लोक आपणाला शाहीर म्हणवून घेतात म्हणून. शाहीर हें नांव अरबी फारसी भाषांतून आलेलें आहे हें निःसंशय. त्या भाषांना संस्कृतींत मान देणारा अशी सत्ता महाराष्ट्रांत होती, त्या काळांत हें नांव केवळ सत्ताधीश वर्गाच्या अनुकरणानें घेतलें गेलें. हा काळ म्हणजे तेराव्या शतकापासूनचा म्हणजे अल्लाउद्दीन खिलजीनें महाराष्ट्राचें राजकीय केंद्र असें देवगिरीचें राज्य यादवांच्याकडून जिंकून घेतलें तेव्हांचा. त्यानंतर ही मुसलमानी राजसत्ता बहामनी राज्यांच्या रूपानें महाराष्ट्रांत विस्तार पावली. मराठ्यांचें स्वतंत्र राज्य झालें, तरी महाराष्ट्राचा एक मोठा भाग त्या मुसलमानी सत्तेखालीं राहिला. तीनचारशें वर्षें महाराष्ट्राच्या कमी अधिक भागांत त्या सत्तेबरोबर येणाऱ्या बाह्य संस्कारांचा परिणाम होत राहिला. त्यांत भाषेंत शिरलेले शतशः शब्द हे मुख्य आहेत. धर्मांतरानें दूर झालेले लोक वगळले तर बाकीचे लोक अंतःकरणानें व आचारानें मूळच्या मराठी संस्कृतींतच राहिले. अशा अवस्थेंत मराठी समाज असतांना शाहीर या नांवाचा उगम सांपडतो. त्यापलीकडे अजून सांपडलेला नाहीं आणि निदान माझ्या मतें तो तसा सांपडण्याचा संभव नाहीं, व तसें कांहीं कारणहि नाहीं. शाहीर व शाहिरी म्हणजे कवि आणि कविता हीं दोन्हीं मराठी संस्कृतींतलींच आहेत. त्यांच्यांत नांवाखेरीज परकीय संस्कृतीचा भाग नाहीं. त्या राजवटींत केवळ ऐट म्हणून हे शब्द स्वीकारले गेले इतकेंच. शाहिरीच्या तपशिलाचा विचार होईल तेव्हां हें सर्व आपोआप ध्यानीं येईल.

मराठी पण नागर

या पाहणीवरून असें दिसून आलें कीं, महाराष्ट्रांत दोन निरनिराळ्या नांवांची कवनरचना चालू होती. हीं दोन नांवें कांहींतरी तत्त्वावर पडलीं असलीं पाहिजेत. त्यांचाहि विचार व्हावयास हवा. सत्ता परकीय असण्यापूर्वीं म्हणजे यादव राजघराण्याचा अंमल महाराष्ट्रावर असतांना जी कांहीं रचना झाली असेल, ती सर्व आज उपलब्ध नाहीं हें निर्विवाद आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वरांचे ग्रंथ व महानुभाव पंथाच्या आद्य ग्रंथकारांचे ग्रंथ एवढेच आज शिल्लक आहेत. मुकुंदराजाचे व

ज्ञानेश्वरांचे ग्रंथ साऱ्या महाराष्ट्रावर आजमितीस प्रभाव पाडीत आहेत. अशा प्रौढ तऱ्हेची रचना होण्याइतकी उच्च त्या काळची संस्कृति होती हेंहि ठरतें. त्याबरोबर हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, ती त्यांची रचना संस्कृत विरुद्ध मराठी अशा अभिमानानें झालेली असली तरी ती ' नागर ' असण्यावर त्यांच्या कर्त्यांचा कटाक्ष आहे. ' जरी भाषा मऱ्हाटी । तरी दशोपनिषदांची राहाटी ' असा निर्वाळा मुकुंदराज विवेकसिंधूंत देतो. म्हणजे त्याचें लक्ष दशोपनिषदें जाणणाऱ्या पंडितांवर खिळलेलें आहे आणि त्याच वेळेस मराठींत तें सर्वांना समजावून देण्याचा तो अट्टाहास करीत आहे. संस्कृताशीं तुलनेनें मराठी भाषा ग्राम्य ही बोच त्याला आहे. ज्ञानेश्वर अध्यात्म व सारस्वत अशा दोन्हींत प्रभुत्व गाजविणारे. आपली रचना ' आबालसुबोध ' व्हावी ही त्यांची इच्छा. पण ती पूर्ण करूं जातांना ' नागरपण ' न सोडल्याची त्यांची ग्वाही पाहिली, म्हणजे हें असें द्वैध कां व कसें उत्पन्न होतें तें ध्यानांत येऊं लागतें. ही स्थिति महाराष्ट्रांतील विद्वान् आजमितीसहि सृष्टिविज्ञानक्षेत्रांत विवेचन करतांना अनुभवीत असल्याचें दिसून येतें. कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्यापासून चार पिढ्या झाल्या तरी हें द्वैध कायम आहे. अध्यात्म अथवा इतर तशींच दुर्गम भौतिक शास्त्रें या दोन्ही क्षेत्रांतला अनुभव सर्वत्र सारखाच राहतो, असें मानण्यापर्यंत मजल गेली, तर त्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. ' व्यासोच्छिष्टं जगत् सर्व ' हें सर्वांना मान्य. पण त्यांच्या त्या उष्ट्या सामग्रीवर आपआपल्या परीनें निरनिराळे पाक करणाऱ्यांची अहमहमिकाहि ध्यानांत आल्यावांचून राहात नाहीं. आपआपल्या शक्तीप्रमाणें व साधनसामग्रीचा मसाला घालून केलेल्या व्यासांच्या कृतीच्या अनुवादाची रास पाहिली म्हणजे मग त्यांत विवेचक शक्तीला उद्योग सुचतो. हें मुळाला धरून, हें स्वैर, हें पंडिती, हें अपंडिती असे वर्गभेद पाडण्याची बुद्धि उत्पन्न होते. हें सिद्धान्ती, हें लापणिक असे भेद पडलेले दिसतात ते यामुळेंच. ते सर्व खरे असूं शकतात. कारण ते कांहीं एक शास्त्र निर्माण करून त्याच्या आधारानें पाडलेले असतात. पाहणाराला त्या शास्त्राच्या दृष्टीनें पाहणें सोईचें असतें. यादवकालीन वाङ्मयांत असे भेद किती पडले होते आणि त्यांचा प्रवाह कसा चालू राहिला हा शोध मोठा मनोवेधक होईल. त्याचा आपल्या विषयाशीं संबंध लावता आला तर उत्तमच. असो. हे सर्व वर्ग ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या आरंभीं केलेल्या नमनांत आहेत. त्यांत षड्दर्शनापासून काव्यनाटकापर्यंत सर्व प्रकार नमूद केले आहेत. ते सर्व त्यांच्या काळीं मराठी भाषेंत येऊन पोहोंचले होते असा दावा सांगता येत नसला, तरी त्या सर्वांची माहिती त्या काळच्या नागरांना होती, असें समजण्यास हरकत नाहीं. त्यांपैकीं कांहीं प्रकार संस्कृतांत राहिलेले, पण त्या काळच्या पंडितांना ज्ञात असतील. कांहींचा आवेश तत्कालीन मराठींतहि उतरला असेल. महाराष्ट्रानें व्यासोच्छिष्ट अशा संस्कृतीचा वारसा संपादन केलेला आहे. तेव्हां तत्कालीन वाङ्मयरचनेंत त्याचा

प्रभाव दिसणें क्रमप्राप्त आहे. व्यास हें केवळ एक प्रतीक नांव आहे. सर्व आर्य-संस्कृतीचें तें प्रतीक आहे. त्या संस्कृतीचा प्रसार जेथें झाला तेथें तिच्याविषयीं आदर सारखाच आहे. ज्ञानेश्वरांनीं हें एका ओवींत असें सांगितलें आहे—

> **नातरी नगरांतरीं वसिजे । तरी नागरच होईजे ।**
> **तैसें व्यासोक्तीतेजें । धवळत सकळ ॥**
>
> —*ज्ञानेश्वरी १:४१*

व्यासोक्तितेजानें धवळत असलेलें पण व्यासोक्तीला अगदीं धरून चिकटून न राहणारें असें वाङ्मय निर्माण होत असल्याचा सुगावा या ज्ञानेश्वरांच्या ओवी-वरून लागतो. व्यासोक्ति प्रत्यक्ष समजूं शकणारे लोक, अर्थात् संस्कृत भाषेचें ज्ञान असणारे लोक आणि तदितर असे जरी स्पष्ट दोन भेद न मानले तरी निराळेपणा दिसण्याला सुरुवात कशी होते एवढें तरी उमजणें शक्य आहे. व्याससंस्कृतीचें सूत्र कायम ठेवून यथाशक्ति यथामति रचना मराठींत होत जाणें हा स्वाभाविक क्रम आहे. रामदेवराव यादवांच्या राजसभेंत ज्याला मान होता असा महानुभाव पंथाचा कवि रुक्मिणीस्वयंवरावर निव्वळ मराठींत रचना करतांना दिसला, म्हणजे या क्रमाचा एक टप्पा गाठतो आणि त्याच्या पाठोपाठ याच आख्यानावर रचना कर-णारी स्त्री महदंबा हिचें दर्शन घेतलें म्हणजे हा क्रम कसा पसरत जात होता या-विषयीं शंका उरत नाहीं. मराठी भाषेपुरतेंच बोलावयाचें तर हे आदी अस-ल्याचा समज सर्वस्वीं चुकत नाहीं, पण ते अपवाद नसून स्वाभाविक क्रियेंतले आज उपलब्ध असलेले अवशेष आहेत असें मानणें सयुक्तिक होईल. मराठी भाषें-तील रचनेच्या संसरणाची ती खूण आहे,

पाठ्य व गेय

ही मराठींत झालेली स्वाभाविक संसरणाची क्रिया वाङ्मयाच्या गद्य व पद्य अशा दोन्ही प्रकारांत झालेली दिसून येते. पद्य रचनेंतहि पुनः पाठ्य व गेय असे वर्ग परंपरेप्रमाणेंच पडलेले दिसतात. ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु हे व असे ग्रंथ पाठ्य आहेत आणि अभंग या नांवानें आतां ओळखली जाणारी रचना गेय आहे हें उघड आहे. पाठ्यांतला विस्तार व ठाशीवपणा हीं दोन्हीं साधारण जनांना आक-लन करण्याला अडचणीचीं होतात, म्हणून त्यांचें तज्ज्ञाकडून पठण विवेचनासह झालेलें ऐकणें जरूर होतें. गेय रचना जरी अगदीं ढिली नसली तरी नित्याच्या श्रवणानें अगर गायनानें मुखीं आणि मनांत बसण्याला सोईची असते; आणि त्यामुळें पाठ्य ग्रंथाचें पठन व त्यावरील पाठकाचें विवेचन हीं दोन्हीं सुकर होतात. राजस्थानांत व्यास आणि महाराष्ट्राच्या उत्तर भागांत पाठक हीं आडनांवें विशेष प्रमाणांत आहेत, हें या संबंधांत चिंत्य आहे. पैठण, नाशिक या व्याससंस्कृतीच्या केंद्रांच्या आसमंतांत पाठकाची वृत्ति चालविणारे लोक असल्याचें कारण ध्यानांत येऊं शकतें. गेय रचनेंतसुद्धां पाठ्य रचनेसारखी मूळच्या विषयाशीं प्रामाणिक

राहण्याची जरुरी असते. तथापि कांहीं थोडा अवकाशहि घेतला आतो, हें सुट-सुटित गेय कवनांच्या पाहणीनें समजू शकतें. प्रामाणिकपणा राखणें आणि अवकाश घेणें हीं दोन्हीं अंगें साधून शिवाय छंदोबद्ध करण्याचें कौशल्यहि येणें महत्त्वाचें आहे. हें ज्याला जमलें त्याचें कवन मान्यता पावतें व त्याचा प्रसार होतो. त्यांत पुनः भाषाशुद्धीनें भेद पडतात. प्रौढ भाषा पंडितीचा संस्कार असणारांच्या तोंडीं लवकर बसते. यामुळें त्या वर्गीतील श्रोत्यांत व पाठकांत तशा भाषेंतील कवनांचा आदर होतो. प्रौढपणांत थोडी कमतरता असलेल्या कवनांचा स्वीकार साधारण जनांकडून होतो, असा प्रकार आहे.

यादवकाल ते शिवकाल

ज्या काळाची पाहणी वर केली आहे त्यांत गेय कवनांचे प्रकार तरी कोणते होते हें पाहणें उपयोगी पडेल. महानुभाव पंथाच्या ग्रंथांत (स्मृतिस्थळ-स्मृ. ८८) येथें दामोदर पंडिताचें वर्णन चालू असतांना ते ' विजनी बैसती आणि **धुवा वोवी चौपदी गीतु** ऐसे आवडे ते म्हणती ' असा उल्लेख महाराष्ट्र सारस्वतांत पृ. ८०२ येथें आहे. या चारांत रुक्मिणी-हरणांतील आणखी एका उल्लेखाची भर पडते. श्रीकृष्ण द्वारकेंत प्रवेश करीत असतां ' भाट पढती ब्रीदावळी ' असा उल्लेख नरेंद्र करतो. भाटांचीं स्तुतिपर कवनें अशा रीतीनें पदरांत पडतात. याच काळांत ज्ञानेश्वर एक भाटीव कवनांचा उल्लेख करतात तो चिंत्य आहे. ज्ञानेश्वरीच्या सतराव्या अध्यायांत तामसी वर्तनाचें वर्णन करतांना ज्ञानेश्वर सांगतात–

> मग म्लेंच्छांचे वसौटे । दांगाणे हन कैकटे ।
> कां शिबिरें चोहोटे । नगरींचे ते ॥ २९४
> तेही तेही ठाईं मिळणी । समयो सांजवेळ कां रजनी ।
> तेव्हां उदार होणें धनीं । चोरियेच्या ॥ २९५
> पात्रें भाट नागारी । सामान्य स्त्रिया कां जुवारी ।
> जियें मूर्तिमंतें भुररीं । भुतलिया ॥ २९६
> रूपानृत्याची पुरवणी । ते पुढां डोळेभारणी ।
> गीत भाटीव तो श्रवणीं । कर्णजपू ॥ २९७

–*ज्ञानेश्वरी १७ : २९४–९७*

भाटीव कवनाचा अगदीं हीन प्रकार येथें सुचविला आहे, पण तेवढ्यावरून भाट व त्यांची कृति निंद्य असल्याचा ज्ञानेश्वरांचा अभिप्राय होता असें मुळींच म्हणतां येत नाहीं. भाट म्हणजे स्तुति करणारा, पण यथार्थ स्तुति करणारा, असा उदात्त अर्थहि भाटीव या शब्दांत असल्याचें त्यांच्याच ओवीवरून कळतें.

जया मार्गातें जगीं । सांख्य म्हणती योगी ।
जयाचिये भाटिवेलागीं । मी कपिल जहालों ॥

–ज्ञानेश्वरी १३ : ९५८

एवंच दामोदर पंडिताचे चार व आणखी भाटीव हा पांचवा असे पांच प्रकार गेय कवनाचे आढळून आले. ही अगदीं वरवरची पाहणी आहे. शोधकाला यांत आणखी सांपडेल. ज्ञानेश्वरकाळांत रूढ असलेला पवाडा हा शब्द घेऊन त्याची छाननी येथेंच केलेली बरी. भाटीव कवन म्हणजे पोवाडा असा ध्वनि निघूं शकतो. पण त्या काळीं तसा निघत नव्हता. देवाच्या स्तुतीचें कवन अशा अर्थानें निवृत्तिनाथांनीं हा शब्द वापरल्याचें सुरुवातीला पाहिलें आहे. आणखी दोन उल्लेख पाहावयाचे आहेत.

मृत गुरुपुत्र आणिला । तो तूं पवाडा देखिला ।

–ज्ञानेश्वरी ३ : १६३

यांत सांदीपनि गुरूचा यमानें नेलेला पुत्र कृष्णानें सोडवून आणला, त्या प्रसंगाचा उल्लेख आहे. ज्यावर पवाडा व्हावा असा तो प्रसंग. त्यांत अलंकार साधून काव्य केलें आहे कीं कसें तें पाहण्यासारखें आहे. आणखी एका प्रसंगीं पवाडा हा शब्द ज्ञानेश्वरांनीं कसा योजला आहे तें पाहणें आहे. अर्जुन हातपाय गाळून युद्धपराङ्.मुख होऊन बसला असतां त्याच्या पूर्वचरित्राची आठवण श्रीकृष्ण करून देतात, ती अशी—

तुवां संग्रामीं हरु जिंकिला । निवात-कवचांचा ठावो फेडिला ।
पवाडा तुवां केला । गंधर्वांसीं ॥

–ज्ञानेश्वरी २ : १०

या ठिकाणच्या पवाडा शब्दाच्या अर्थाच्या बाबतींत दुमत आहे. कोणी गंधर्वांकडून स्तुति करवून घेतली असा अर्थ घेतात. पवाडा म्हणजे युद्ध, झगडा असा अर्थ येथें आहे.

गीताचे चारी प्रकार चालू राहिले आणि त्यांत भर पडली असें दिसतें. समर्थ रामदासस्वामींनीं एके ठिकाणीं अशा प्रकारांची झडती घेतली आहे. त्यांच्या दृष्टीनें कवित्वाची जी व्याख्या आहे ती धरूनसुद्धां जे प्रकार आहेत ते असे सांगितले आहेत—

नाना पदें नाना श्लोक । नाना बीर नाना कडक ।
नाना साक्या दोहोरे अनेक । नामाभिधानें ।
डफगाणें माची गाणें । दिंडी गाणें कथा गाणें ।
नाना मानें नाना जसनें । नाना खेळ ।

–दासबोध १२ : ५

व्याससंस्कृतीच्या संसरणांत गेय प्रकार जे झाले त्यांची ओळख होण्याइतके उल्लेख आतांपर्यंत पाहिले. शिव-समर्थकालाचा टप्पा गांठला तरी शाहिरीच्या उल्लेखानें जे प्रकार नजरेपुढें येतात ते म्हणजे लावणी आणि पोवाडा. या दोहोंचाहि यांत पत्ता नाहीं. तेव्हां शिवकालाच्या मध्यानंतर पोवाडा व लावणी आली म्हणजेच शाहिरी आली असा सिद्धान्त करण्याला पुरेशी तयारी मींच पुढें करून ठेविली आहे. शाहिरी या शब्दावर ठाण मांडणारांना सकृद्दर्शनीं बळकट पुरावा मीच दाखवून दत आहें.

आतां याच्या उलट बाजूची पाहणी करावयाची. ध्रुवा, वोवी, चौपदी, गीत हे छंदशास्त्राच्या नजरेनें पाहिलेले विविध प्रकार आहेत. त्यांतला ज्ञानेश्वरांनीं उल्लेखिलेल्या कवन प्रकाराची भर पडलेली नाहीं. कांहीं एक सूचना मिळाली आहे इतकेंच. तेव्हां ईश्वरभक्तिपर कवनांचे प्रकार किती रूढ होते म्हणजे त्याचे छंद कोणते होते एवढें समजण्यापुरती त्या उल्लेखांची मातब्बरी निःसंशय आहे. यापेक्षां जास्त कांहीं अर्थ त्यांतून निघत नाहीं. गेय कवनांच्या प्रकारांत समर्थांनीं घातलेली भर फार महत्त्वाची आहे. तिचा विचार करण्यापूर्वीं कोशकारांनीं शाहिरी रचनेंत ज्या प्रकारांचा समावेश केला आहे त्यांच्याकडे वळणें आहे. पोवाडा, लावणी, डफगाणें, भेदिक गाणें, देहावरचें गाणें हे प्रकार कोशकारांनीं सांगितले आहेत. त्यांचा समुच्चय ती शाहिरी, असें म्हणतां आलें तरी सर्व विषय एकाच रचनाकारानें हाताळलेले असतात असें नाहीं. कोशकारांची यादी त्या त्या प्रकारच्या कवनांच्या प्रत्यक्ष पाहणीवरून त्या कवनांत गोविलेल्या विषयांच्या निदर्शनासह दिलेली आहे. आतां प्रथम त्या यादींतल्या रकमांचा विचार समर्थांच्या यादीशीं मेळ घालून करावयाचा आहे. व्याससंस्कृतींत श्रुतीपासून लौकिकी काव्यापर्यंत सर्व प्रकार येतात हें पूर्वींच पाहिलें आहे. ती परंपरा अजूनहि चालू आहे. गेल्या शेंपन्नास वर्षांत जी कांहीं भर पडली आहे ती नजरेआड ठेविली आहे. कारण तिचा शाहिरीशीं कांहीं संबंध येत नाहीं.

पोवाडा

पहिला पोवाडा. याचा अर्थ वीरांच्या पराक्रमाचें, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचें, तसेंच एखाद्याचें सामर्थ्य, गुण, कौशल्य इ. चें काव्यात्मक वर्णन, प्रशस्ति, स्तुतिस्तोत्र असा दिला आहे. वस्तु पाहून सांगितलेला हा अर्थ आहे. संस्कृतांतील वद् या धातूच्या मागें प्र असें उपपद लागून होणाऱ्या शब्दावरून मराठींत पोवाडा आल्याचें प्रा. कुलकर्णी सांगतात. असें ठासून स्तुति करणारें वचन गीतांत आलें म्हणजे त्याला मराठींत पोवाडा म्हणावयाचें असा अर्थ निघतो. ही ठासून स्तुति करण्याची कल्पना आर्यसंस्कृतींत अगदीं पुरातनची आहे. नांव बदललेलें दिसून आलें तरी वस्तु तीच असें ओळखतां येतें. इंद्राला सम्राटाभिषेक झाल्यावर तो

आसंदीवर बसला असतां विश्वेदेवांनीं 'अभ्युत्क्रोश' केला असें ऐतरेय ब्राह्मणांत वर्णन आहे. यावर भाष्य करतांना सायणाचार्यांनीं असें सांगितलें आहे कीं 'यथा लोके बन्दिनो गुणकथनेन राज्ञः कीर्तिं कुर्वन्ति एवमत्रापि गुणकीर्तनमभ्युत्क्रोशनम्।' विश्वेदेवांनीं ही इंद्राची स्तुति करण्याचें कारण ध्यानांत घेण्याजोगें आहे. 'विश्वेदेवा अब्रुवन् न वा अनभ्युत्क्रुष्ट इंद्रो वीर्यं कर्तुमर्हति.' इंद्र पराक्रमी म्हणून सम्राट्-पदाला योग्य ठरला. म्हणून त्याची त्या पदावर स्थापना झाली. पण त्याला त्याच्या पराक्रमाची आठवण करून दिल्याखेरीज तो कार्यक्षम होणार नाहीं, असा विचार करून इंद्राची इंद्रपदावर स्थापना करणाऱ्या विश्वेदेवांनीं म्हणजे सर्व देवांनीं त्याच्या स्तुतिपर असा अभ्युत्क्रोश केला. इंद्राला स्वकर्तव्योन्मुख करण्याच्या हेतू-बरोबर यांत शत्रूंना धाक बसविण्याचाहि हेतु होता. प्रत्यक्ष जो मंत्र म्हटला गेला त्याचें भाऊशास्त्री लेले यांनीं केलेलें भाषांतर असें आहे—"सम्राट्स्वरूप, साम्राज्य-पदास योग्य, भोक्ता, भोजपालक, स्वयंप्रकाश, स्वाराज्यपदास योग्य, विराट्, वैराज्यपदास योग्य, राजा, राज्यपालक, परमेष्ठी व परमेष्ठीपदास योग्य अशा इंद्राचें त्यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें—इंद्र ही एक क्षत्रिय जाती उत्पन्न झाली आहे. हा प्रजाजनांचा भोक्ता उत्पन्न झाला आहे. हा शत्रुनगरें विदीर्ण करणारा उत्पन्न झाला आहे. हा असुरांचा घातक उत्पन्न झाला आहे. हा वेदरक्षक उत्पन्न झाला आहे. हा वेदोक्त धर्मांचा रक्षक उत्पन्न झाला आहे." अशा प्रकारचा हा अभ्युत्क्रोश हेतूसह व अर्थासह कालाच्या क्रमांत परिवर्तन पावत पावत यादवकालांत भाटांच्या बिरुदगानांत प्रकट होता. आणि तोच पुढें शिवकालांतहि भाटांच्या जागीं आलेल्या शाहिरांच्या मुखानें पोवाड्याच्या रूपांत प्रकट झालेला आहे. मात्र स्थान व प्रसंग हीं बदललीं आहेत. यादवांच्या राज्याच्या अस्तानंतर राज्याभिषेक प्रसंग असा प्रथम शिवछत्रपतींच्या काळांत आला. वैदिक संस्कारांपैकीं एक अशा थाटानें तो अभिषेक झाला तेव्हां त्या प्रसंगीं वैदिक मंत्रांचा विनियोग करण्याची जी सारिणी रूढ असेल तिला अनुसरून बहुधा वर उल्लेख केलेला अभ्युत्क्रोश उच्चारला गेला असेल. त्यानंतर राजस्थानांतून आलेल्या भाटांचें हिंदींत यशोगीतांचें गायन झालें असेल. असे भाट बहुतेक सर्व राजपूत कुळांच्या मागोमाग महाराष्ट्रांत येत असत व त्यांपैकीं कित्येकपुढें येथेंच कायम वस्ती करून राहिले. उत्तर पेशवाईत प्रसिद्ध असलेला सिद्धनाथ ऊर्फ सिदू रावळ शाहीर हा असा भाटच होता. शिवछत्रपतींचा भाट भूषण या नांवाचा होता. त्यानें शिवभूपाच्या प्रशस्तीचीं कवनें केलीं होतीं. त्यांतलें नमुन्यासाठीं एक येथें देतों—

इंद्रजिमि जंभपर, वाढव ज्यौं अंभपर, रावन सदंभपर रघुकुलराज है।
पौनवारिवाहपर, संभुरतिनाहपर ज्यौं सहस्त्र बाहपर रामद्विजराज है।
दावाद्रुमदंडपर, चिंतामृगझुंडपर, भूषण वितुंडपर जैसे मृगराज है।
तेजतम अंसपर, कान्ह जिमि कंसपर, त्यौं म्लेंछवंशपर सेर शिरवाज है।

या प्रकारचीं दीर्घ कवनें फार पुरातन कालापासून म्हणजे दहाव्या शतकापासून हिंदींत तयार होत असत. पृथ्वीराज राठोड याचा भाट चंद याचीं कवनें सुप्रसिद्ध आहेत. यादवांच्या राज्यानंतर अशा कवनांची रचना कौतुकानें करण्याचे प्रसंग आले नाहींत हें खरें, पण मराठी कवींच्या अंगच्या त्या गुणाचा अगदीं लोप झाला होता असें म्हणतां येत नाहीं. शिवछत्रपतींच्या राज्यारोहणापूर्वींच त्यांच्या व त्यांच्या सरदारांच्या शौर्याची प्रशस्ति दीर्घ रचना करून गाइली गेली आहे. अज्ञानदास व तुळशीदास यांनीं रचलेलीं कवनें शौर्यवर्णनाचे उत्तम नमुने आहेत. ही शक्ति कांहीं पूर्वसंस्कारावांचून एकदम उफाळली असें म्हणतां येत नाहीं. यादवकालीन भाट व शिवकालीन शाहीर यांच्यांत कांहीं एक सांखळी असली पाहिजे. ती आज स्पष्ट नाहीं, इतकेंच.

लावणी

लावणी या शब्दाची व्युत्पत्ति पाहिली तर ती संस्कृतमधील रोवणें, चिकटणें, जोडणें अशा अर्थाच्या लग्, ली, रग्, री यांपैकीं कोणत्याहि धातूपासून असू शकेल असें प्रा. कुलकर्णी सुचवितात. पण लापनिका या शब्दापासून हा शब्द सिद्ध झाल्याचें सांगतात. लापिका या शब्दाचा अर्थ प्रा. वा. शि. आपटे 'A sort of enigma or riddle' असा देतात. अशीं लापनिक नांवाचीं कवनें म्हणण्याचा प्रघात होता असें दशकुमारचरितांतील उल्लेखावरून दिसतें. प्रा. पां. दा. गुणे आपल्या अपभ्रंश वाङ्मयावरील निबंधांत लापणिका म्हणजे ग्रामीण गीतें असा अर्थ सांगतात. म्हणजे मुळांतच ही वस्तु अपंडिती म्हणून अशिष्ट गणली जात असावी. लापणिकेचें उदाहरण कोणी सांगू शकत नाहीं याचें कारण हेंच असावें. संस्कृतांत अशिष्ट ठरलेला हा शब्द मराठींत तसा राहिलेला नाहीं, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. महानुभाव पंथांतला एक पंडित रचनाकार केशवराज यानें या शब्दाचा कांहीं विशिष्ट रीतीनें उपयोग करून घेतला आहे. त्याचा विषय तत्त्वज्ञानाचा होता. त्यानें सिद्धान्ती वचन अथवा सूत्र व्यावहारिक सारिणींत आणून सोडतांना शेवटची पायरी म्हणून जें सांगावयाचें त्याला लापणिक असें नांव दिलें आहे. लापणिक म्हणजे विषयानुक्रमें पृथक्करणात्मक अनुक्रमणिका असें प्रा. तुळपुळे सारस्वताच्या पुरवणींत (पृ. ८६९) सांगतात. समर्थ रामदासांनीं कीर्तनांत कोणकोणत्या बाबींचा समावेश करावा तें सांगतांना लापणिकांचा उल्लेख केला आहे.

कथान्वय लापणिका । नामघोष करतालिका ।
प्रसंगें बोलाव्या अनेका । धाटी माता नेमस्त ॥

—दासबोध ४:२: १०

या उल्लेखावरून केवळ अनुक्रमणिका असा अर्थ समर्थांच्या डोळ्यापुढें होता असें वाटत नाहीं. श्रावणमासांत उपाकर्मविधि द्विजांना करावयाचा असतो. त्या प्रसंगांतील

' अथातो ब्रह्मजिज्ञासा, अथातो धर्म व्याख्यास्यामः ' इत्यादि संकल्पित उच्चार प्रा. तुळपुळे यांच्या व्याख्येप्रमाणें ' लापणिक ' म्हणतां येतील. पण समर्थांनीं निर्देश केलेली वस्तु तशी नसावी. कथानुक्रम शुद्ध राखून जें बोललेलें वा म्हटलेलें ती लापणिका असा अर्थ असावा असें वाटतें. मुळांतली कथा अनेक रचनाकारांनीं वर्णिलेली असते तेव्हां त्यांतील कथानुक्रमशुद्धीच्या कसाला उतरणारी कोणती तरी रचना अथवा तसें निवेदन यांचा कीर्तनकारांनीं उपयोग करावा असें सांगितलें आहे. यांत अनेक धाटींची रचना येईल इतकेंच नव्हे तर माता म्हणजे गोष्टीहि नेमस्त सांगाव्या असा नियम घालून दिलेला आहे. ज्ञानेश्वरांच्या दृष्टान्तांत अशा अनेक माता गोंवलेल्या आहेत. आपल्याला लापणिकापुरतें पाहावयाचें आहे. तेव्हां त्या वस्तूचा धागा जो अगदींच तुटल्यासारखा वाटत होता तो सांपडूं शकतो इतकाच अर्थ घ्यावयाचा. शिष्ट पद्धतीच्या कीर्तन, प्रवचन अशा प्रकारापासून दूर ठेविलेल्या लावणीचा शोध पूर्व पेशवाईच्या अखेरच्या काळांत लागतो. सवाई माधवरावापासून पेशवाई बुडालेली पाहिलेला शाहीर होनाजी याचा आजा सातप्पा याची लावणी मिळते, ती आजमितीस उपलब्ध असलेल्या लावण्यांत सर्वांत जुनी आहे. त्याचा काळ बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांची कारकीर्द हा येतो. आपल्या वडिलांनीं मस्तानी या कलावंतिणीला आश्रय दिला म्हणून पूर्ववयांत बिथरलेला हा पेशवा पुढील आयुष्यांत पुष्कळच पालटला. त्यानें राजकारणाच्या प्रसंगानें राजस्थानांतील जयपूर वगैरे शहरांशीं जो संबंध ठेवला त्यांतून त्यानें तेथील नागर संस्कृतीचा आपल्या मनावर पुष्कळच परिणाम करून घेतला, इतकेंच नव्हे तर तिचा पुरस्कार पुणें शहरांत केल्याचें इतिहासकार सांगतात. यांत संगीत कलेचाहि समावेश होऊन नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत सरूपी, अमाक्का सावनूरकरीण, मुसाहेब, मैना, बना, हेमंती, मोहना पालकर, गुलाब आणि हिरा अशा निदान दहा गाणारणी सरकारी आश्रयानें पुण्यांत होऊन गेल्या असें दिसून येतें. तो भाग पुढें तपशिलानें लक्षांत घ्यावयाचा आहे म्हणून तूर्त लावणीकडे पुनः वळावयाचें. सातप्पाची लावणी जरी सर्वांत जुनी असें म्हटलें तरी त्यापेक्षांहि जुनी लावणी असल्याचें आढळतें. रामदासी संप्रदायाचा ज्ञानकोश असें ज्याला मानतात त्या दासविश्रामधाम ग्रंथांत समर्थ रामदासांची म्हणून एक लावणी दिली आहे. ती अर्थात् शृंगारिक नसून उपदेशपर आहे. दा. वि. धा. चा कर्ता आत्माराम स्वामी याचा काळ समर्थकालानंतर सुमारें शंभर वर्षांचा आहे. म्हणून त्याच्या विधानाविषयीं जागरूकपणा कायम ठेवून बोलणें बरें. यासाठीं मी ती लावणी समर्थांची आहे असा निर्वाळा देत नसलों, तरी विरुद्ध पुरावा मजपुढें नसल्यामुळें ती त्यांची नाहीं असेंहि म्हणत नाहीं. दा. वि. धा. भा. ४ पृ. ९६८ येथें समर्थांची आणि अल्लमखानबाबाची भेट झाल्यावेळीं

समर्थांनीं अशाश्वत लक्षणाचें जें निरूपण केलें त्यांत पुढील कवन म्हटलें, त्याला लावणी असें नांव आत्मारामबुवानें दिलेलें आहे—

ऐक सजणा, मनमोहना, संपत्ति पहातां कवणाची।
जाइल काया जाइल बाया, उसणी आणिली पांचाची ॥ १ ॥
रावण ज्ञानी अभिमानी, लंका ज्याची सोन्याची।
तेहातिस कोटि बंदी सूटले, घडी घडी त्याना हो जाची ॥ २ ॥
सूर्यवंशीं राम जन्मले, केवळ माय भक्ताची।
हनुमंतानें दहन केलें, नगरी जाळिली पाप्याची ॥ ३ ॥
दहा अवतार ऋषिजावर, वार्ता मार्कंडेयाची।
चौदा कल्प उष्ण सोशिले, छाया नाहीं गुंफेची ॥ ४ ॥
कौरव गेले, पांडव गेले, काय कथा आणिकांची।
छप्पन कोटि यादव गेले, कुडी नाहीं कृष्णाची ॥ ५ ॥
सावध व्हावें, भजन करावें, भक्ति करावी देवाची
असो, तरी गोष्टी ऐका रामीरामदासाची ॥ ६ ॥

रामीरामदास हें नांव समर्थांनीं अशा निरनिराळ्या छंदांत केलेल्या स्फुट-रचनेसाठीं घेतलेल्या सोळा नांवांपैकीं एक आहे, हें चिकित्सकांनींहि अमान्य केलेलें नाहीं. आपल्याला फक्त लावणी प्रकाराच्या रचनेच्या कालाचा विचार करावयाचा आहे. त्यांत हें एक गमक सांपडलें म्हणून घेतलें. यांत पुनः लक्ष घालावें लागणार आहे.

पोवाड्याची पाहणी जशी सहज करतां आली तशी लावणीची करणें शक्य नाहीं. पवाडा मुळांत कांहीं एका विशिष्ट विषयावर रचलेला असावा असा संकेत आहे. म्हणजे त्याचें अंतःस्वरूप स्थिर आहे. बाह्यरूप थोड्याशा फरकानें बदललेलें दिसेल इतकेंच. पण लावणी ही अशी बांधून पडलेली वस्तु नाहीं. तिचा विषय निश्चित् नाहीं, आणि स्वरूपहि निश्चित् नाहीं. यामुळें महाराष्ट्र-सारस्वताच्या विशाल उद्यानांत अमुक हा वृक्ष लावणी असें दुरून सांगणें अशक्य आहे. व्यतिरेक पद्धतीनें असें सांगतां येईल कीं, संस्कृत वृत्तांपैकीं कोणतेंहि वृत्त ज्या कवनासाठीं योजलें आहे तें लावणी नव्हे. ती गेय आहे, तेव्हां कोणता तरी गेय छंदच योजला असणार. त्याच्या विषयाचाहि नेम नाहीं. तूर्त कालाच्या अनुरोधानें विचार चालू, आहे सबब येथेंच थांबावें तें बरें.

डफगाणें

या पुढचे तीन प्रकार डफगाणें, भेदिक गाणें व देहावरचें गाणें यांचा विचार करावयाचा. या तिहींचा विचार एकत्र करणें प्राप्त आहे. शाहिरींत या तिहींचा समावेश कोशकारांनीं केला आहे तो यथार्थ आहे. डफगाणें हा प्रकार समर्थांच्या

यादींत आहे आणि तो परमार्थिक विषयाचा आहे हेंहि ठरलें आहे. समर्थकालीं डफगाणें होतें हें दासबोधांतील उल्लेखावरून सिद्ध झालें तरी त्याचें रूप तेथें सांगितलेलें नाहीं. तसें करण्याला अवकाश नव्हता. डफगाणें हा गेयकवनाचा एक शाहिरींतला सर्वसामान्य प्रकार आहे. त्यांत पुढील दोन्हींचा म्हणजे भेदिक व देहावरचें गाणें यांचा समावेश होतो. दोहोंचा विषय अध्यात्मिक असतो. क्वचित् भेदिकांत सर्वसामान्य ज्ञानाचाहि समावेश असतो. समर्थांनीं उल्लेख केलेलें डफगाणें त्यांनीं स्वतः रचलेलें असें दाखवितां आलें तर उत्तम होईल. म्हणून येथें थोडासा विस्तार करणें जरूर आहे.

शाहिरीविषयींच्या कांहीं रूढ कल्पनांना आणि पूर्वग्रहांना धक्का देणारा असा प्रसंग आतां वर्णावयाचा आहे. पूर्वीं उल्लेख केलेल्या दासविश्रामधाम या ग्रंथांत हा प्रसंग आला आहे.

' चाफळामाजी असतां गुरुदेव । सहसमुदायीं पातला राव ।
चहूंकडून मिळाला शिष्यसमुदाव । कथन एक वर्तलें पवाडसें ॥ ७१
गोळा होऊनी शाहिरु लोक । जिंतू खटपटती वादतीं तबकें ।
ऐकणार नगरीचे हटेली मूर्ख । धन वेचोनी कळ लाविती ॥ ७२

—दा. वि. धा. खंड ३

या वर्णनांत ' शाहिरु लोक ' हा शब्द व त्यांच्या उद्योगाचें रूप ध्यानांत येण्यासारखें आहे. ' वादती तबकें' हा शब्दप्रयोगहि चिंत्य आहे. समर्थांच्या यादींत स्तबक हा शब्द आला आहे त्याचेंच हें अपभ्रष्ट रूप आहे हें सहज ध्यानांत येईल. स्तबक, लंबक हे शब्द कथासंग्रहांच्या निरनिराळ्या भागांना लावलेले आढळतात. शाहिरांचा शिष्ट वाङ्मयांतील हा बहुधा पहिलाच उल्लेख आहे. आत्मारामबोवा स्वतः शिष्टच असल्याकारणानें त्याचा या लोकांविषयीं अनुकूल ग्रह नाहीं तो कां तें समजूं शकतें. पण त्याच्या कथनांत शाहिरांच्याविषयीं जी माहिती आली आहे ती शोधनांसाठीं उपयुक्त आहे यांत संशय घेण्याचें कारण नाहीं. यानंतरच्या वर्णनावरून असें दिसतें कीं, या शाहिरू लोकांच्या मुख्यानें इतर अनेक शाहिरांचीं ब्रीदें म्हणजे निशाणें जिंकून घेतलीं होतीं. अर्थात् प्रश्नोत्तररूपानें कवनांत वाद करून प्रतिपक्षास त्यांनीं हरविलें होतें. या लोकांनीं समर्थांची परीक्षा पाहण्याच्या हेतूनें आणि आपला प्रभाव शिवाजीराजाला दाखवून त्याच्याकडून कायमच्या भाकरीची व्यवस्था करून घेण्याच्या इराद्यानें या योग साधला होता, असा आत्मारामबुवाच्या कथनाचा आशय आहे. शिवाजीराजाकरवीं समर्थांना हा प्रकार कळला तेव्हां त्यांनीं त्या लोकांचा कार्यक्रम ऐकण्याचें ठरवून सभा बोलाविली. शाहीर आले, तेव्हां त्यांना समर्थांनीं उन्मत्तपणाला यश येत नसतें असा उपदेश केला आणि स्वस्थ मानसानें कार्यक्रम सुरू करण्याविषयीं सांगितलें. तेव्हां तो शाहीर ' पुसेन तें सांगा

म्हणे निवाड । किंवा जें कांहीं असेल अवघड । सिद्ध असे मी सांगावया ' असें म्हणाला. यावर समर्थांनीं ' कासया इतुकें । देवमायेचें नेणसी कौतुक । शहाणा आहेस जा नांद सुखें । जन्मसार्थक हें नव्हे कीं । ' असा खरमरीत जबाब दिला. त्यावरून शाहिरानें इरेला पेटून समर्थांना वादाला आव्हान केलें. त्यावरून समर्थ डफगाण्याच्या आखाड्यांत उतरले. पहिला प्रश्न तुमचा येऊं द्या असें शाहिरानें म्हटल्या-वरून समर्थांनीं पुढील पद डफगाणें धाटीनें डफ, झालर (झांज) यांची साथ घेऊन म्हटलें.

समर्थांचें डफगाणें

किती पृथ्वीचें वजन । किती अंगुळें गगन ।
सांग सिंधूचें जीवन । किती टाक ॥ १
वायूसरिसे उडती । सांग अणुरेणू किती ।
लक्ष चौऱ्यांशी उत्पत्ति । रोम किती ॥ २
किती आकाशींचा वारा । किती पर्जन्याच्या धारा ।
तृण भूमीवरी चतुरा । सांग किती ॥ ३
सर्व सरितांची वाळू । सप्त सागरीं केवाळू ।
किती आहे ते हरळू । सांग मज ॥ ४
बीजें वडीं आणि पिंपळीं । किती आहेत भूमंडळीं ।
सर्व धान्यांची मोकळी । संख्या सांग ॥ ५
अठरा भार वनस्पति । भूमंडळीं पानें किती ।
फुलें फळें मजप्रती । सांग आतां ॥ ६
जें जें पुसलें म्यां तुज । तें तें सांग आतां मज ।
अनंत ब्रह्मांडीं बेरीज । किती झाली ॥ ७
सांग माझें डफगाणें । कीं ते सोडी जाणपणें ।
देहबुद्धीचीं लक्षणें । सोडवीन ॥ ८

या प्रश्नावर शाहिराला उत्तर सुचलें नाहीं, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. खुद्द प्रश्न करणाऱ्याला आपल्या प्रश्नाचा शब्दशः अर्थ घेऊन त्याचें उत्तर देतां येणें शक्य होतें कीं कसें याचा विचारच आहे. तथापि समर्थांनीं या प्रसंगांत निवळ चातुर्यानें मात केली. ते म्हणाले—

श्रोतीं व्हावें सावचित्त । आतां सांगतो गणित ।
सर्व आहे अगणित । सत्यवाचा ॥ ९
रामदासाचे विनोदें । सोडा अहंतेचीं ब्रीदें ।
मग सर्वही स्वानंदें । सुखी रहा ॥ १०

या प्रसंगानें ज्या बाबी ठरतात त्या अशा. डफगाण्याची पद्धति म्हणजे तिच्या एका अंगाची–वादाची–ओळख पटली. त्यांतील प्रतिपादन अंगाचा नमुना या काळांतला नसला तरी त्यानंतरचा. ' निरसुनि त्वंपद जाणुनि तत्पद ' इत्यादि शब्दांनीं सुरुवात होणारा दोन चरणांचा नमुना पूर्वींच पोवाड्याचा विचार चालू असतां दिला आहे. पुढें या बाबतींत विचार करावयाचा आहे. कीर्तिकाव्यापासून चातुर्याच्या कवनापर्यंत मजल आली. यांत शाहिरांचा संबंध आला. अर्थात् वर वर्णिलेला प्रसंग शाहिरांचा गौरव करणारा नाहीं. तथापि त्यांचें अस्तित्व व त्यांचा उद्योग यांचा भाग शिवशाहीपर्यंत लागला. शाहिरांच्या परंपरेंत जी दंतकथा चालू आहे तिच्यांत अशा एका प्रसंगीं शाहिरांनीं समर्थांची भगवी छाटी आपल्यासाठीं निशाण म्हणून मागून घेतली असा भाग येतो. शाहिरांचे आज जे दोन प्रमुख गट आहेत त्यांतल्या एका गटाचें निशाण भगवें असतें हें खरें आहे. त्याचा विचार पुढें व्हावयाचा आहे.

भेदिक गाण्यांपैकीं एक प्रकार आतांच पाहिला. दुसरा प्रकार अध्यात्मिक कूटांचा. प्रकार असा आहे कीं हा म्हणजे अध्यात्मविषय शाहिरीचा पाया आहे. यामुळें अगदीं नांवासह शाहिरी सांप्रदायाचा माग या कालाच्या मागें लावीत जाणें दुरापास्त आहे. शाहिरीला जो अशिष्टपणाचा आरोप शृंगारिक लावणीमुळें गैरसमजुतीनें आला आहे तो नाकारतां येत नाहीं, पण तो सर्व शाहिरांच्यासाठीं स्वीकारतां येत नाहीं अशी स्थिति आहे. शाहिराचें भेदिक आणि तदितरांचें भेदिक यांत फरक करण्याचें वास्तविक कारण नाहीं. पण शाहीर हा शब्द आणि शृंगारिक लावणी हा प्रकार त्यांना कायमचा नडतो आहे. वस्तुतः आतांच अशी वेळ आली आहे कीं, शाहिरींतल्या अध्यात्माची इतर रचनाकारांच्या कृतीशीं तुलना करून एक दुसरीपासून कशी भिन्न नाहीं हें दाखविणें सोईचें होईल. त्यासाठीं शिल्लक राहिलेला ' देहावरील गाणीं ' हा भाग काय आहे तें प्रथम थोडक्यांत दाखविलें पाहिजे. **देहा**वरचें गाणें असें म्हणण्यांतहि थोडी चूक आहे. वास्तविक तें **देहीं**-वरचें गाणें आहे. देह व देही म्हणजे शरीर व आत्मा. त्या दोन्हींचा विचार यांत असतो. म्हणजे हें सांख्य पद्धतीचें गाणें असतें. ब्रह्मसूत्रावरील आपल्या भाष्याला श्रीशंकराचार्यांनीं ' शारीरभाष्य ' असें नांव दिलें आहे. देव व भक्त असें द्वैत सुरुवातीपासून अखेरपर्यंत कायम राखणाऱ्या पंथापासून निराळा असा अद्वयवादीपंथ महाराष्ट्रांत प्रभावी आहे, आणि शाहिरींतला हा देहावरच्या गाण्याचा प्रकार ही त्याची साक्ष देत आहे. या प्रकारच्या रचनेंत पिंडब्रह्मांडाचा विचार ओघानेंच येणार. त्याची सुरुवात मनुष्याच्या स्वतःच्या देहापासून होते. शरीर, शरीरी असा आत्मा व परमात्मतत्त्व हा क्रम यांत येतो. हा क्रम सिद्ध झाल्यावर म्हणजे दोन्ही बाजूंनीं या ज्ञानाची सारिणी जिज्ञासूला अवगत झाल्या-वर त्याची चिंतनिका सूक्ष्माकडून स्थूलाकडे व स्थूलाकडून सूक्ष्माकडे अशा

मार्गांनीं करतां येते. देहावरचीं गाणीं पहिल्यांत येतात आणि कूटें असें ज्यांना म्हटलें जातें तीं दुसऱ्यांत येतात. तो कुतूहल उत्पन्न करून, विचारशक्तीस चालना देऊन, जें गूढ आहे तें उकलीत जाण्यांला आव्हान देण्याचा सहेतुक उद्योग आहे. अद्वैत पंथांतील सर्व समाजांत हे भाग दिसून येतात. ते हिंदींत आहेत, कानडींत आहेत, तसेच मराठींत आहेत. कबीर मोठ्या खोल व क्लिष्ट सारिणीनें अध्यात्म न सांगणारा भक्त आहे, पण त्याला ही भेदी रचना माहीत आहे, व त्यानें तशी रचनाहि केली आहे.

' साकी दोहिरा पुरा भेदी लिख गई संत सुजान '

—*कबीर*

मराठी वाङ्मयांतील अध्यात्मिक कवनप्रकाराचा विचार व्यापकपणें करावयाचा असता तर अडचण नव्हती. पण येथें एका विशिष्ट शाखेचा विचार कर्तव्य आहे. तिचें इतर शाखांशीं द्वैत नाहीं. इतर शाखांनीं मात्र जणू काय वाळीत टाकलेली ही शाहिरी शाखा आपला कार्यभाग अध्यात्मविषयांतसुद्धां करीत होती हें दाखवावयाचें ; आणि इतर सोवळ्या शाखांना विटाळ होऊं द्यावयाचा नाहीं, अशी अवघड कसरत करण्याचा प्रसंग आहे. ज्यांत अध्यात्मविषय प्रतिपादला आहे व ज्यांत कांहीं गूढ ठेवून तें उकलून दाखविण्यास आव्हान आहे अशीं गेय कवनें फक्त शाहिरींत आहेत असें नाहीं. इतर शाखांतहि तीं दिसून येतात. कीर्तनांत म्हटलीं जाणारीं पदें अध्यात्मपर असूं शकतात व त्यांचें विवरण केलें जातें. शिवदिन केसरी, दासोपंत, शिवराम, विठोबाआण्णा दत्तरदार व अलीकडचे बाबा गर्दे यांचीं कवनें अशीं आहेत. त्यांच्या आधारावरून पूर्व रंगांत निरूपण करण्याचा कीर्तनकारांचा प्रघात आहे. त्याचीं उदाहरणें देण्याची आवश्यकता नाहीं. तथापि दुसरा प्रकार मात्र फार जुन्या काळापासून मराठींत आहे. भेदिक व देहावरचें गाणें यांचा उगम ज्यांत सांपडूं शकतो असे कवनप्रकार ज्ञानेश्वर, एकनाथ, दासोपंत यांनीं केले आहेत. ज्ञानेश्वर व एकनाथ यांच्या रचनेचें वर्गीकरण करतांना त्यांना रूपक या सदरांत घातलें आहे. पण शाहिरींतलीं सर्व भेदिक गाणीं रूपकांच्या सदरांतील नाहींत. प्रतिपादनात्मक जास्त आहेत आणि प्रश्नोत्तररूपानेंहि बरेच अध्यात्मिक प्रश्न उलगडण्याचा प्रयत्न शाहिरांनीं केलेला आहे. तो सर्व भाग पुढें स्वतंत्र प्रकरणांत पाहावयाचा आहे. येथें ज्ञानेश्वरांच्या व दासोपंतांच्या रचनेंतले दोन नमुने देत आहें. सर्वसाधारण वाचकांना हे नमुने असूं शकतील अशी कल्पना येणार नाहीं, पण ते आहेत. तेव्हां तशी रचना कांहीं हेतूनें झाली आहे आणि तशी प्रथा होती असें म्हणावयास हरकत नाहीं. ज्ञानेश्वरांचें कवन असें:—

आगरीचे क्षीरसागरीं, पैल डोंगरीं, दुभते गाय रे ।
दोहो जाणे त्याचे दुभते, जेवी, त्याची मेली माय रे ॥ १

कान्हो पहाले रे, कान्हो पहाले रे नवल विपरीत कैसे।
जाणत्या नेणत्या झासा, पैल चतुरा लागले पिसे ॥ ध्रु. ॥
पाणियानें विस्तव पेटविला, वारियानें लाविली वाती।
आपेआप दीप प्रकाशला तेथे न दिवस राती ॥ २
खोकरी आधन ठेविले, तेथे न दिसे, माझी भाक।
इंधनावीण पेटविले, तेथे चुली ना राख ॥ ३
जाणत्या नेणत्या झासा, पैल चतुरा बोलिजे हाळी।
निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव बोले, ढिवरी पडले जाळी ॥ ४

हें कवन गोंधळेकर-प्रकाशित गाथेंत क्रमांक ३८७ येथें आहे. ही गाथा संपादकानें आळंदीच्या हैबतीबुवांच्या ओवरींत असलेल्या वहीवरून नकलून घेतली. साखरे-संपादित गाथेंत रूपकें या प्रकरणांत त्याला क्रमांक ८५२ असा दिला आहे. पूर्वी रामदासांच्या एका कवनाचा (किती पृथ्वीचें वजन इ.) उल्लेख केला आहे. त्यापेक्षां वरच्या दर्जाचें हें कवन आहे. त्यांत कोणत्यातरी एका दूरच्या डोंगरावर एक दुभती गाय असते, तिचें दूध काढून जो त्याचें सेवन करतो त्याची माय मरते असें ज्ञानेश्वर सांगतात. आईची तरुण माणसांना वाटणारी कटकट दूर करणारा हा सुलभ उपाय आहे ! आणि वर हा सर्व विपरीत प्रकार आपण स्वतः पाहिल्याचें ज्ञानेश्वर कान्होला सांगतात. अर्थात् नुसत्या चतुराला वेड लागण्यासारखेंच हें आहे म्हणून तें त्यांनीं ध्रुवपद केलें आहे. पुढें विज्ञानशास्त्रानें सर्वस्वीं अशक्य असे पाण्यानें विस्तव पेटविल्याचा आणि वाऱ्यानें वात लावल्याचा चमत्कार सांगितला आहे. जेथें दिवसरात्र असा भेदच नव्हता, तेथें आपोआप दिवा उजळला असें दाखविलें आहे. अनेक छिद्रांच्या भांड्यांत आधण ठेवलें असून तेथें कांहीं दिसतच नाहीं असें ज्ञानेश्वर शपथेवर सांगतात. विस्तव पेटला पण सर्पण मात्र नाहीं इतकेंच नव्हे तर चूलहि नाहीं आणि राखहि नाहीं. अशा विलक्षण प्रकारानें नेणत्याला कांहीं उमज पडणार नाहींच, पण जाणताहि बुचकळ्यांत पडणार. तेव्हां समोर पलीकडे बसलेल्या चतुराला याचा उलगडा कर, हाळी दे असें आव्हान केलें आहे. शेवटीं धीवरच स्वतः जाळ्यांत पडत असल्याचें ज्ञानेश्वरांना दिसलें, तें निवृत्तीच्या प्रसादामुळें ज्ञानदेवांनीं बोलून दाखविलें आहे. या कवनांतून कांहीं स्पष्ट अर्थ तर निघतो आहेच. पण कांहीं विशेष प्रसंगाची सूचनाहि येथें स्पष्ट आहे. कीर्तन, निरूपण, भजन अथवा देवतामूर्तींच्या नित्यनैमित्तिक पूजाअर्चादि विधि यांपैकीं कोणताहि प्रसंग अशा कवनासाठीं संभवत नाहीं. तथापि उत्सवासारख्या वेळीं अथवा एरव्हीं समाज जमून मनोविनोदाचा कार्यक्रम चालू असतांना तेथें गाण्यासारखें हें कवन आहे. असा प्रसंग साधून मान्यता पावलेल्या आणि होतकरू, स्थानिक व परकीय, आणि भिन्नभिन्न मतांच्या अगर रुचीच्या लोकांच्या कवनांचें गायन होणें हें ग्रामीण जीवनांतलें एक अंग आहे. आजमितीस पुण्यामुंबईसारख्या शहरांत राहणाऱ्या

सुशिक्षित तरुण पिढीच्या डोळ्यापुढें हा प्रकार शब्दांनीं उभा करणेंसुद्धां कठीण आहे. पण मी असें निश्चयानें सांगतों कीं, असे प्रसंग येत होते म्हणून शाहिरी उफाळली, उदयास आली. ज्ञानेश्वरांच्या या कवनांत उपनिषदांचा होमिओपाथिक डोस आहे. त्यानें कांहीं सुपरिणाम कालांतरानें होणें शक्य. निदान दुष्परिणाम तरी होण्याची शंका नको. त्याचा अर्थ मी येथें सांगत नाहीं. मात्र तो लावून पाहण्याची संवय लावून घेणें हिताचें होईल असें सुचवितों. ज्ञानेश्वरांच्या काळांत रूढ असलेले हे प्रसंग चालू राहिले आणि म्हणूनच दासोपंतासारख्या त्याच परंपरेंतील रचनाकारांना अशीं कवनें करण्याची इच्छा झाली. त्यांचें एक कवन पुढें देत आहें.

जळ नाहीं, स्थळ तेथें कमलिनी आहे ।
चतुःशृंगाची गाय रे ॥ १
नवामाजी दहावा मुनिजन वदती ।
कमळ कमळी सांग काय रे ॥ २
अग्निविण जळताहे, त्रिभुवन पोहोळ्या ।
सिख, पंचविधिता हे सिख रे ॥ ३
जाणसी जरी, तरी सांगसी ते न घडे ।
कळला भेदासी काय रे ॥ ४
सांग सांग सरोजे काय रे ।
मुन्यांवरील बोल आहे रे ।
खेळिया मुन्या सावधान ॥ ध्रु० ॥
कमळ कमळी तेथें भ्रमर भ्रमरी भ्रमती ।
पावती ते पद अविनाश रे ॥ ५
तयामाजी पहाता पुत्र त्रया देखिला ।
ब्रह्मा विष्णु महेशा रे ॥ ६
चंद्र सूर्य दोन्ही ग्रहण, सकल चराचर बहुच रे ।
दिगंबरविण कमळी कळे ।
तरी पाणी वाहीन सहामास रे ॥ ७

दासोपंतांचा काळ सोळाव्या शतकाचा उत्तरार्ध हा आहे. त्यांच्या वर दिलेल्या कवनांत शाहिरी पद्धतींतील आध्यात्मिक शाखेचें मूळ सांपडतें. भेदिक डफगाण्यांत दिसून येणारीं सर्व लक्षणें स्पष्ट आहेत. ‘ खेळिया ’ या शब्दानें मनोविनोदाच्या कार्यक्रमांत भाग घेणारा आणि ‘ मुन्या ’ या शब्दानें कोणी प्रतिपक्षीय असा अर्थ निघतो. ‘ सावधान ’ या शब्दानें या प्रसंगांत भरणारा आवेश प्रत्ययास येतो, आणि शेवटीं आपलें गूढ उकलून दाखविण्यासाठीं लावलेली होडहि स्पष्ट दिसून येते. ‘ दिगंबर ’ हें दासोपंतांच्या गुरूचें व उपास्य देवतेचें नांव अर्थात्

दत्त. या कवनांतला अर्थ भक्ति व योग या दोहोंसंबंधांचा आहे, तो जिज्ञासूंनीं अवश्य समजावून घ्यावा.

आतां आणखी एक दोन नमुने दाखवून हें उपपत्तिप्रकरण संपवावयाचें. समर्थांच्या काळापूर्वी होऊन गेलेले अलमखान बाबा यांचे शिष्य समर्थांच्या दर्शनास आले होते. तो प्रसंग येथें वर्णिला आहे.

'कीर्तन केलें सुगळी ग्रामीं । श्रोते भिळाले विरक्त निस्पृही ।
आलमखान बाबाचे सांप्रदाई । ज्या बाबासी नागोबा उपदेशिले ॥ ७ ॥
खानजी कष्टता तो शुद्ध हृदयीं । नसरुदिन नागोबा भाळे गोसावी ।
लयलक्ष योगी जाला अनुभवी । मंडळी त्याची तैसीच ॥ ८ ॥

या मंडळींनीं आलमखानाचें एक कवन म्हटलें, तें सरळ विरक्ति मार्गाचें आहे. तें असें:—

योगी दग्धपट परिवर्तति संसारी ।
असोनि निर्विकार विरक्त रे ॥ १
साधुसंतांची अगाध लीला आकळे रे ॥ ध्रु० ॥
उदकामाजी वसे कमळीपत्र जैसे ॥
जीवनीं अलिप्त असे वेगळे रे ॥ २
मंडळीं असे भानु, घटीं बिंबला दिसे पूर्ण ।
तंव तो न लिंपे जाणा एकला रे ॥ ३
तैसा देही आत्मा आहे सर्वांघरीं व्यापक पाहे ।
व्यापोनि निराळा राहे, नातळे रे ॥ ४
ऐसा बोले आलमखान, नागेश प्राप्तीची खूण ।
स्वस्वरूपी समाधान सावध रे ॥ ५ ॥

पुढें आत्मारामबोवा म्हणतात—

"आलमखान बाबाची हे सुंदर वचन ।
जयाचे अंगीं गुरुकृपा लेणं । साधुसंताला बहुतरा मान्य ।
गोंधळयादि भोंवत तयाचे ॥

आलमखानाचें हें कवन व्यासंसस्कृतींतलें निःसंशय आहे. त्यासाठीं प्रमाणें देण्याची आवश्यकता नाहीं इतकें तें स्पष्ट आहे. त्याला 'नागेश' या सत्पुरुषाचा अनुग्रह झालेला होता. 'उदित भाग्य आलमखानाचें बोध नागेशाचा' असा उल्लेख आहे. बाबांच्या सांप्रदायिक मंडळींत 'गोंधळ्यादिक' लोक होते असें आत्मारामबोवा म्हणतो. लिखित प्रमाणाची जरुरीच असेल, तर हें प्रमाण मानून अशा कवनांशीं एका बाजूस साधुसत्पुरुष व दुसऱ्या बाजूस 'गोंधळी' वगैरे लोक

यांची कशी सांगड लागली असेल तें ध्यानांत येईल. हल्लींच्या शाहिरींतील शक्ति-पक्ष म्हणजे कलगीपक्ष हा आपल्याला नागेश वळीचें म्हणवून घेतो हें ध्यानांत आलें म्हणजे नागेशापर्यंत साखळी लागते. या नागेश नांवानें जुन्यांत जुने असे दोन पुरुष होऊन गेले असें दिसतें. एक बालेघाटाकडील सिद्ध नागेश व दुसरा वडवालसिद्ध नागेश. दोघेहि श्रेष्ठ दर्जाचे होते. पहिला ज्ञानेश्वरांशीं समकालीन होता. त्याचा शिष्य कान्हो पाठक, याच्याकडे ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतांना आपली सर्व चीजवस्तु सोपविली. या कान्हो पाठकाच्या वंशजाकडे ज्ञानेश्वरांच्या समाधि-तिथीच्या उत्सवांत खिरापत वाटण्याचा मान आहे अशी माहिती सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनीं चरित्रकोशांत दिली आहे. कान्हो पाठकानें आपण नागेशाचे शिष्य असल्याचें नमूद करून ठेवलें आहे.

" गुरूपदेश नागनाथू । कान्हो पाठक विनवीतु ।
हृदयीं धरी नागेश । म्हणे कान्हो पाठक । "

आलमखानबाबाचा गुरु हा असणें असंभवनीय दिसतें. काळाची अडचण आहे. दुसरा वडवालसिद्ध नागेश याचें स्थान दक्षिण मराठवाड्यांत लातूर नजिक आहे. त्याच्या स्थानानजिक असलेल्या रेल्वे स्टेशनाचें नांव वडवाल नागनाथ असें आहे. विकाराबादेहून परळीवैजनाथकडे जाणाऱ्या फाट्यावर हें स्टेशन आहे. भालकी, उदगीर, पानगांव वगैरे इतिहासांत नमूद असलेल्या गांवांच्या लगत हें स्थान आहे. या नागेशाचें एक कवन तंजावरच्या राजवाड्यांतील मराठी हस्तलिखितांचें प्रकाशन मद्रास सरकारच्या विद्यमानें सध्या होत आहे, त्यांत ' लोकगीत ' असा भाग स. १९५० मध्यें प्रसिद्ध झाला आहे, त्यांत आहे. त्याचा मथळा 'घुसळण' असा आहे. हें घुसळण म्हणजे 'वारियानें कुंडल हाले' या एकनाथांच्या लहान कवनाची दीर्घ विस्तारानें पूर्तता आहे. अध्यात्मिक सारिणींत व्यावहारिक कृतींचें रूपक करून सांगण्याची पद्धति मराठींत आहे. नागेशाच्या कवनाच्याबरोबरच आणखी तशींच रूपकात्मक कवनें 'लोकगीतांत' घेतलीं आहेत. त्यांत उमानपद व भावपद असे आणखी दोन प्रकार दिले आहेत, म्हणजे त्या प्रकारांचीं कवनें दिलीं. या उमान-पदांपैकीं कांहीं तंजावरचे राजे शहाजी (दुसरे) [सन १६८४ ते १७१०] यांना 'अभिनवभोज' अशी पदवी लौकिकांत होती, त्यांचीं आहेत. त्यांत त्यांचें नांव त्यागेश असें आहे. या उमानपदांतील कल्पना शाहिरींत उचललेल्या दिसून येतात, म्हणून त्या प्रकाराची छाननी आतांच करणें प्राप्त आहे.

उमानपद

उमानपद म्हणजे उखाण्यासारखें कवन. या शब्दाचा अर्थ पाहणें जरूर आहे. उमाणणें म्हणजे मोजणें, मापणें, ताडून पाहणें, तुलना करणें या अर्थावरून उमाणें म्हणजे कोडें, कूट, उखाणा असा अर्थ असल्याचें कोशकार सांगतात. हे दोन्ही

शब्द यादव कालापासून रूढ होते आणि ते ज्ञानेश्वर व त्यानंतर नारायण व्यास यांनीं व निळोबांनीं वापरले आहेत. या उमाण्याचा एक नमुना कोशांत दिला आहे तो असा.—

पुरुषेंवाचून जाली। आपणा आपण व्याली।
पोटीचें घेऊनि गेली। उमाणें माझें।

शहाजी राजे तंजावरकर यांचें उमानपद असें आहे:—

ज्ञानी ब्रह्मवेत्ता नव्हे अज्ञानी पंडित।
कुसुम सुगंध नव्हे कोकिल काक होईल।
शशधर शीतल नव्हे चंदन उष्ण॥ १
असूर भीकर नव्हे अंबर वसुमती होईल।
वसुहाता दीन रक्षक नव्हे वाचाल मुका॥ २
भोग सुखकर नव्हे भूजन निर्जर होईल।
त्यागेश भक्त सर्वज्ञ नव्हे नागवाद्य स्वरूप॥ ३

उमान शब्दाची व्युत्पत्ति उत्+मान अशी प्रा. कुलकर्णी सांगतात. दुसऱ्याची बुद्धि, ज्ञान ही मोजून मापून पाहण्याचा हा प्रकार, म्हणून कोडें, कूट अशा अर्थानें भाषेंत रूढ आहे. कूट कोडें सरळ अर्थाचें नसतें, तर विपरीत भासणाऱ्या अर्थाचें असतें. या विपरीतानें प्रथम आश्चर्य उत्पन्न होतें. हा आश्चर्य उत्पन्न होण्याचा प्रसंग अगदीं प्रथम आला तो उम् अशी मात्रा तयानें निषिद्ध झाली (बाहेर पडली) तेव्हां. आश्चर्यकारक असें कांहीं दिसलें तेव्हां जो ध्वनि निघाला तो उम्. नंतर त्या दृश्यालाच उम् वरून पूर्ण झालेलें उमा असें नांव मिळालें. कालिदासानें सृष्ट्युत्पत्तीची आदी वर्णन करण्याच्या हेतूनें जें विशाल रूपक कुमारसंभव काव्यांत केलें आहे त्यांत असा श्लोक आला आहे.

उमेति मात्रा तपसा निषिद्धा पश्चात् उमाख्या सुमुखी जगाम।

इंद्राला महत्प्रयासानें जें प्रत्यक्ष दर्शन झालें तें हैमवती उमेचें, परब्रह्माचें नव्हे असें वर्णन केनोपनिषदांत (३:१२) आहे. सारांश असा कीं, उमानपद हें अध्यात्मिक सारिणींतलें गूढ अशा अर्थानें रचलें जाण्याची प्रथा फार जुनी आहे. ती ज्ञानेश्वरांच्या काळांतहि रूढ होती. समर्थांनीं अशीं कांहीं कोडीं रचलीं आहेत. "तूं देह का देहाचा जाण। तूं देह जाणे का तूं तयाचें ज्ञान" अशीं हीं कूटें अथवा कोडीं असत. तीं अध्यात्मिक सारिणी मनांत पक्की ठसविण्याच्या हेतूनें रचलीं जात असत. शाहिरीव्यतिरिक्त अशा मराठी रचनेंत असलेली ही प्रथा शाहिरींत आली आहे, तें साहजिक झालें आहे. याशिवाय एकाखडी या नांवानें महदाइसेनें रचलेली कवनपद्धति शाहिरींतहि स्वीकारली गेली आहे.

पाहणीचा इत्यर्थ

या सर्व पाहणी-तपासणीवरून असा स्पष्ट अर्थ निघतो कीं, शाहिरी हें महाराष्ट्रांतील व्याससंस्कृतीच्या वाङ्मयाचें एक अंग आहे. त्या संस्कृतीपासून निराळी अशी कोणतीहि संस्कृति यांत मिसळलेली नाहीं. मात्र शाहीर व शाहिरी हें नांव बहामनी राज्यांच्या अंमलापासून उचललें आणि अजून तें रूढ आहे. त्यापूर्वीं अशी रचना चालू असणें स्वाभाविक आहे असें माझें म्हणणें. अर्थात् ही तर्कावर आधारलेली सूचना आहे. नांवाबरोबर आणखी दोनचार शब्द व्यासबाह्य संस्कृतींतले शाहिरींत शिरल्याचें दिसेल. त्यांचा विचार योग्य त्या प्रसंगांत होईल. शाहिरीनें मराठी समाजाच्या स्थितीचें कांहीं विशिष्ट दृष्टिकोणांतून दर्शन घडूं शकतें हेंहि **मला मान्य** आहे, इतकेंच नव्हे तर तो प्रस्तुत उद्योगांतील एक हेतु आहे. आतांचा हा प्रयत्न केवळ प्रास्ताविक स्वरूपाचा आहे. शाहिरीचीं दोन अंगें उजेडांत आलीं आहेत, पण तिसरें आणि महत्त्वाचें अंग अजून सुशिक्षितांच्या नजरेंत येण्यासारखें प्रकट नाहीं. त्याचा शोध करतांना आणि त्याची छाननी करतांना गेल्या दीडदोनशें वर्षांतील ग्रामीण भागापुरती तरी सांस्कृतिक स्वरूपाची बाजू निदर्शनास येईल. तो कांहीं विशेष महत्त्वाचा लाभ ठरेल असा माझा अंदाज आहे. त्याची पूर्वतयारी मी येथें करून ठेवीत आहें.

♣ ♣

प्रकरण दुसरें

शाहिरांची भूमिका

शाहीर कोण ? पोवाड्यांतून

शाहिरीच्या उपपत्तीविषयींचा विचार केला. त्यानंतर आतां शाहिरां-विषयीं पाहावयाचें आहे. शाहीर हा एक विशिष्ट प्रकारचें कवन करणारा, म्हणून निराळा भासणारा, समाजांतला एक वर्ग फक्त वाङ्मयापुरता आहे. रोटीबंद, बेटीबंद अशी निराळी जात नव्हे. गोंधळी, भराडी, डौरी, वाघे असे निरनिराळ्या देवतांचे उपासक व त्या उपासनेंतल्या सेवेवर उपजीविका चालविणारे असे वर्ग महाराष्ट्रांत आहेत. ते सर्वस्वीं रोटीबंद नसले तरी बेटीबंद आहेत. यांतील कोणी शाहिरी कवनें करतात. आजमितीस उपलब्ध असलेले दोन ऐतिहासिक प्रसंगां-वरील पोवाडे रचणारे अज्ञानदास व तुळशीदास हे दोघे गोंधळी होते असा समज आहे, पण तसा स्पष्ट उल्लेख त्यांच्या कवनांत नाहीं. अज्ञानदासानें कवनाच्या शेवटीं तुळजाभवानीनें शिवाजीराजाला यश दिलें, कारण ती त्याला प्रसन्न होती, असें सांगितलें आहे. आरंभीं आपल्या गुरुला ' नारायण ' या नांवानें नमन केलें आहे व त्याच्या प्रसादामुळें आपल्याला अंबेचें संपूर्ण वरदान असल्याचें कवीनें सांगितलें आहे. दुसरा तुळशीदास यानें आपल्या उपास्याचें अगर गुरूचें नांव सांगितलें नाहीं, पण आपण ' शाहीर ' असें स्पष्ट सांगितलें आहे. तथापि कांहीं अंतर्गत पुराव्यावरून हा पोवाडा प्रत्यक्ष शिवकालीन नव्हे असा स. म. पोतदार यांचा अभिप्राय आहे. बाजी पासलकराच्या पोवाड्याचा कर्ता यमाजी हा ' नारा-यणाचें ' स्मरण करतो व आपल्यावर गुरूची कृपा असल्याचें सांगतो. हे पोवाडे मराठशाहीच्या पूर्वार्धातले आहेत असें स्थूलमानानें म्हटलें तर हरकत येत नाहीं. उतरार्धातले पोवाडे या नजरेनें तपासले तर काय दिसतें तें पाहावयाचें. खड्यांच्या

लढाईवरील पोवाड्याचा कर्ता हसन आपण ' कलगीवाल्यावर लावी नोकी ' असें म्हणतो. त्याच विषयावरचा आणखी एक कवि राणू गुदाजी हा आपण ' गावन हरदासी बाणा जरी झोक ' असें सांगतो. खर्ड्यांच्या लढाईचा कवि बाळा लक्ष्मण हा कोणा स्वकीयाला उद्देशून म्हणतो ' आईक रे शाहिरा तुझी कलगी आहे थोर, हर-दास मनामधें झुर. ' खर्ड्यांच्या लढाईचा आणखी एक कवि भुजंग आप्पा आपल्याला 'गैबीचें देणें ' असून आपण 'जाऊन गाठले हरदास' असें सांगतो. पट्टणकुडीच्या लढाईचा कवि खेमू ओमू आपल्यावर ' गैबीची दया ' असल्याची खबर देतो. नाना फडणविसावर कवन करणारा बाळा बहिरू हा आपल्या शाखेची 'दस-नामी भगवा बाणा' अशी खूण सांगतो. आळत्याची लढाई रंगविणारा जिवाजी पंचाळ आपल्याला नागनाथ प्रसन्न आहे व आपल्या डफावर पांच निशाणें व त्रिशूळ आहे अशी माहिती देतो. टिपूवरच्या स्वारीवर रचना करणाऱ्या फत्तूला गैबीची भक्ति असून आपली शाखा सांगण्यासाठीं ' तुरेवाल्याची उपटली शेंडी ' असा आपला पराक्रम वर्णितो. आर्कीवाटच्या लढाईचा पोवाडा रचणारा मानसिंग भोबाना आपण शिवभक्त धनगीर गोसाव्याचे शिष्य आहों, असें सांगून प्रतिपक्षीयाला उद्देशून उद्गार काढतो, 'किति गाशील नागीशा आता किंमत तुझी पाहूं.' आप्पा देसायाचा भाट आपलें निशाण भरजरी आणि डफावर कलगी आहे असें सांगतो. कोंकणांतल्या उमाजी नाइकावर पोवाडा रचणारा मूळचा खानदेशचा आहे व त्याचा गुरु आत्मागिरी फकीर आहे असें पोवाड्याच्या शेवटच्या उल्लेखावरून कळतें.

शाहीर हे कोण ? लावणींतून

हे उल्लेख फक्त पोवाड्यांतले आहेत. लावण्यांत अशा प्रकारचे उल्लेख विपुल आहेत.

' कवि म्हणे बाळाबहिरू......
ज्ञानवळीची फत्ते तलवार रेवडी रावळाची. '

हें लावणीकार होनाजीचें वचन आहे. कवि महादू विश्वनाथ म्हणतो,

' नागेशवळीचे कवी बोलले भारती ।
भगवे झेंडे निशाण चंगावर देती. '

रामजोशी आपल्या फडाचा मुख्य धोंडीबा शाहीर याचा उल्लेख केलेल्या एका कवनांत म्हणतो,

' नाग्यास बैसली धडक ।
टाकुन दे कलगी व्यंकटपतीला हुडक '

फंदी मलिकचा शिष्य फंदी अनंत म्हणतो,

‘ अक्कल धरा । उमज गव्हरा दे कलगीवर सोटा ’

सगनभाऊचा गुरु सिद्धनाथ एका कवनांत म्हणतो,

‘ गुरु गोविंदराव वस्ती वाई ठिकाण ।
हा नाथ सांप्रदाय स्वतः ज्याचें दर्शन ।
द्वादश पंथाचे आदेश नाथ नमनीं ।
सिद्धनाथ कविची कविता नाथपंथी । ’

स्वतः सगनभाऊ म्हणतो

‘ नाथ सिद्ध सगनभाऊ कवन गाई रावळीं । ’
‘ सगनभाऊचें कवन अमोलिक नाथ सांप्रदाचे । ’

मराठवाड्यांतील संत नागूचा शिष्य नारूबापू सांगतो,

‘ नरू भिकचंद गोल उफावर कलगी लावून ।
उभे चंग तोडा निशाणजी ।

हे उतारे गेल्या पाऊणशें वर्षांच्या पलीकडच्या प्रसिद्ध झालेल्या कवनांतले आहेत. संतवाङ्मयांत अथवा पौराणिक वाङ्मयांत मोठ्या लहान कवनांत कवीचें नांव गोंवलेलें असतें. ती पद्धति महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून इतर प्रांतिक भाषांतहि रूढ आहे. पण शाहिरी कवनांत कांहीं विशेष असल्याचें दिसून येईल. नागेशवळी, ज्ञानवळी, नाथसांप्रदायी, अशा शाखा दिसतात व जरीझोंब, भगवे झेंडे, कलगी, तुरा अशा बोधचिन्हांचा उल्लेख सांपडतो. संतवाङ्मय, पंडिती वाङ्मय अथवा पौराणिक वाङ्मय यांत हे शब्द दिसून येत नाहींत. तथापि ते व्याससंस्कृतीपासून भिन्न असेहि वाटत नाहींत. ते उगाच कांहींतरी कौतुकासाठीं कवींनीं केवळ हौसेनें वापरलेले नाहींत. त्यांत कांहीं निश्चितपणा आहे, हें उघड आहे. प्रमाणग्रंथांत याविषयीं उलगडा मिळत नाहीं, म्हणून स्वतः केलेल्या तपासांत मिळालेल्या माहितीची जुळवाजुळव करून हा भाग स्पष्ट करणें प्राप्त आहे.

शाहीर-समर्थ भेट

या तपासणीसाठीं मागें उल्लेख केलेल्या शाहीर-समर्थ भेटीच्या वर्णनाकडे लक्ष देणें जरूर आहे. शाहिराचा सवाल असा होता—

‘ पुसेन तें सांगा म्हणे निवाड । किंवा जें असेल अवघड ।
सिद्ध असे मी सांगावया । ’

या सवालावर समर्थांचा जाब महत्त्वाचा आहे.

' कासया इतुके। देवमायेचें नेणसी कौतुक।
शहाणा आहेस जा नांद सुखें। जन्म सार्थक हें नव्हे कीं। ''

या समर्थांच्या उत्तरांतून शाहिराच्या विषयाचा सुगावा लागतो. तो विषय 'देवमायेचें कौतुक ' हा होता हें स्पष्ट] आहे. देवमायेचा विषय म्हणजे अध्यात्म; चरित्र, कथा व पुराण नव्हे हें निश्चित. समर्थांच्या जबाबावरून शाहिराचा धीर खचला नाहीं. त्यानें पुनः पूर्वोत्तर पक्ष अथवा प्रश्नोत्तर करण्याची हिंमत धरली. तेव्हां समर्थांनीं केवळ चातुर्याच्या आधारावर रचलेल्या प्रश्नानें शाहिराला कुंठित केलें. अध्यात्मांतला यत्किंचितहि अंश त्यांत येऊं दिला नाहीं, हें पूर्वीं पाहिलेंच आहे. शाहीर पराभूत झाल्यानंतर मात्र त्यांनीं त्याला ' देहबुद्धीचीं लक्षणें सोडवीन ' असें आश्वासन देऊन ठेवून घेतलें. मराठी वाङ्मयांत यापूर्वींचा शाहिरांतल्या अध्यात्मिक शाखेचा उल्लेख नांवासकट निदान मला तरी अजून सांपडलेला नाहीं. शाहिरींत अध्यात्म शाखा शोधावयाची म्हणजे रामजोशी कविरायाचीं वैराग्यपर कवनें पाहावयाचीं अथवा प्रभाकराची एखादी लावणी अध्यात्मपर आहे असें म्हणावयाचें यापलीकडे मजल अजून गेलेली नाहीं. या समजुतीचा निरास करावयाचा तर कांहीं प्रमाण दाखविणें जरूर. यासाठीं हा द्राविडी प्राणायाम करावा लागत आहे. समर्थांच्याकडे गेलेला शाहीर अध्यात्म विषयांत वादासाठीं गेला होता हें जरी दाखवितां आलें तरी तेवढ्यानें पूर्ण कार्यभाग होत नाहीं. त्यांत एवढेंच ठरलें कीं, त्या काळांत अध्यात्माशीं खेळ करणारे कांहीं गट होते. पूर्वीं वेदान्त, व्याकरण, अशा विषयांत वाद करून जयपत्र मिळवीत फिरणारे पंडित असत हें वाङ्मयांतल्या कथाभागांत नमूद असतें. त्या पंडितांहून निराळा असा हा वर्ग असल्याचें आत्मारामबुवानें केलेल्या वर्णनावरून दिसतें. त्यांत शाहीर हे अमुक एका देवतेचे उपासक होते व त्यांनीं आपलें दैवत तेवढें श्रेष्ठ असें भासविण्याचा प्रयत्न केल्याचें आत्मारामबुवा सांगत नाहीं. तेव्हां कोणत्याहि दैवताचे उपासक नसलेले पण अध्यात्माशीं लगट करणारे ते लोक होते एवढें खास निष्पन्न होतें. आतां पोवाड्यांच्या व लावण्यांच्या रचनाकारांनीं आपल्या खुणा सांगितल्या आहेत त्या समजूं शकतील. ज्ञानवळी, शक्तिवळी, नाथसांप्रदायीं इत्यादि वर्णनांत काय अर्थ आहे तो लक्षांत येईल. देवतांचे उपासक नसतांना देवांच्या शक्तीच्या व देवाविषयींच्या ज्ञानांत यथाशक्ति डुंबणारे असे हे लोक होते. नाथपंथी सांप्रदायाचा उल्लेख तर अगदींच स्पष्ट आहे. तमाशाच्या कार्यक्रमांत म्हणण्याच्या लावण्यांत आपल्या सांप्रदायाचे उल्लेख करणाऱ्या या रचनाकारांच्या बाबतींत आतां आणखी खोल जाणें अवश्य झालें आहे. लावणी रचनाकार आपली वाङ्मयात्मक मूळ पीठिका विशेषशी सांगतांना दिसत नाहीं. तसा प्रसंग अपवादानें आहे. पण त्या अपवादांतसुद्धां त्यापूर्वींच्या एखाद्या गोसाव्याचें नांव सांगण्यांत अथवा त्यावरील आपली निष्ठा

प्रकट करण्यांत कांहीं हेतु असला पाहिजे. आजमितीसहि साधा बी. ए. असलेला मुंबई किंवा कलकत्ता हें नांव अगदीं जरूर पडल्याशिवाय सांगत नाहीं. पण तोच ऑक्सफर्ड किंवा केंब्रिजचा बी. ए. असला तर तें अवश्य सांगतो. हाच दृष्टान्त येथें लागू पडत आहे. लावणीकार प्रभाकराला अशी कांहीं मूळ पीठिका नाहीं, तथापि त्याचें कवन सरस असूनहि त्याचें शाहिरांत नांव येणें दुरापास्त आहे. तोच कोणा एखाद्या साधूच्या गोसाव्याच्या शिष्यत्वानें कोणत्या तरी एखाद्या सांप्रदायांत शिरलेला असता तर त्याला आपलें नांव सांप्रदायासह सांगतांना अभिमान वाटला असता. लावणी रचनाकाराचें मूळपीठ मात्र कांहीं विशिष्ट आध्यात्मिक पातळीचें आहे असें मानणें भाग पडत आहे. लावणी, पोवाडा यांच्या रचनेविषयीं विचार करणारांनीं हा दुवा साधला नाहीं. म्हणून त्यांना शाहिरीचें साकल्यानें आकलन झालें नाहीं, आणि त्याचें कारणहि तसेंच सबळ आहे. आध्यात्मिक शाहिरी शाखेची कविता छापून प्रसिद्ध अशी बहुधा झालेली नाहीं. अगदीं एखाद्या दुसऱ्या चोपड्यांत कांहीं थोडेसें मिळूं शकतें, पण त्यांतील नांवें अपरिचित आहेत. त्याचा ठावठिकाण सांपडत नाहीं. यामुळें त्या शाखेशीं शोधकांचा संबंध पोहोंचूं शकला नाहीं, इतकेंच. पण त्याचा परिणाम मात्र शाहिरीविषयीं गैरसमज नसला तरी अपूर्ण समज पसरण्यांत झाला आहे.

साखळी जुळते ?

आध्यात्मिक शाहिरीचा रचनाकार हैबती हा निश्चित काळांतला, आणि मला माहीत असलेला, सर्वांत जुना असा आहे. त्यानें ' तूर्तबोध ' या नांवाचा साडेपांचशें ओव्यांचा ग्रंथ रचला आहे (रामतत्त्व प्रकाशन, बेळगांव). या ग्रंथाच्या रचनेचा काल ' शके सत्राशें बासष्ट ' असा दिला आहे, म्हणजे इ. स. १८४२ येतो. या हैबतीबुवाची पुणें, सातारा, कोल्हापूर या प्रदेशांत फार मान्यता आहे. त्याचे गुरु कैवल्यनाथ. त्याचा दुसरा मुलगा गोपाळनाथ त्रिपुरी, माहुलीजवळ. हैबतीबुवाचा समकालीन संभुआण्णा हा भिलवडीचा, हैबतीबुवांचाच आरंभींचा सहकारी. या दोघांची परंपरा पुण्याच्या दक्षिणेकडे अजून अनेक ठिकाणीं चालू आहे. हे दोघे अनुक्रमें कलगी व तुरा पक्षाचे म्हणजे पहिला शक्तिसह शिवपक्षाचा व दुसरा शिवपक्षाचा होता. तीच भूमिका त्यांच्या अनुयायांत अजून आहे. या तुरापक्षाचे श्री. रामचंद्रपंत दळवी, खेड, तालुका इस्लामपूर, हे नव्वद वर्षांचे विपुल रचना केलेले शाहीर हल्लीं हयात आहेत. नगर व उत्तर मराठवाडा या भागांत प्रसिद्ध असलेले सर्वांत जुने असे शाहीर नारुबापू यांनीं स. १८७६–७७ चा दुष्काळ स्वतः अनुभवलेला असून त्या तीन वर्षांच्या काळावर त्यांनीं पोवाडा केला आहे. हे देऊळगांव राजा येथील रहिवासी व तेथील संत नागूचे शिष्य. यांच्याशीं समकालीन असा रामा देवंग. त्याचाहि गुरु संत नागू हाच आहे. त्याशिवाय त्या

भागांत मोतीपुरीबुवाचा शिष्य त्रिंबक हा कवनकार होऊन गेला. संत नागूचीहि थोडी कविता उपलब्ध आहे. तोहि हैबतीबुवाचा समकालीन असावा असें धरून चालण्यास हरकत नाहीं. या संत नागू इत्यादींचा प्रभाव वऱ्हाडांतील बुलढाणा, खामगांवापर्यंत होता. त्याचा विचार पुढें होईल. तूर्त यांची भूमिका पाहण्यासाठीं कांहीं आधार सांगावे लागले.

या डफगाण्याच्या रचनेंत शुद्ध अध्यात्माचें शास्त्रशुद्ध प्रतिपादन असतें असें म्हटल्यानें बोध होणार नाहीं, म्हणून त्यांतील दोन श्रेष्ठांच्या दोन कविता येथें देतों.

संत नागूचा गण

गण सगुण निर्गुण नसुन तो आज दृष्टी देखिला।
सभारंगणीं गण ओळखिला ॥ ध्रु० ॥
चतुर्भुज गण नसून चौचरणीं गण हा प्रत्यक्ष।
गणाचे चरणीं माझें लक्ष।
अष्टभुजाचा गण भिरवतो, खोटा पाही अक्षी।
हा गण सर्वांच्या समक्ष ॥
वक्रतुंड गण नाहीं, पहा जसा एक वृक्ष।
अन्न खाईना वनस्पती भक्ष।
चाल–गण पहाता सदा आदर्श, आदर्श असून तो ना दिसे।
हा गण सर्वांच्या ठायीं वसे ॥ १ ॥
चौदा विद्यांचा गण हा नसून सदा मुका बहिरा।
याचा त्रिभुवनामधें थारा ॥
रिद्धिसिद्धीचा दाता नाहीं, सारा द्वैत पसारा।
सांगतो गिरजेच्या कुंवरा ॥
असा दृष्टिगण येती घरा।
घ्या तुम्ही ऐशा गुण गंभीरा।
चाल–अशा गणासी पाहुं नयें न्यारे। नमिती चंद्र सूर्य तारे।
तेहातिस कोटि देव सारे। मान सर्वांनीं राखिला।
सभारंगणीं गण ओळखिला ॥ २ ॥
पूज्य मान गण नाहीं गणाला तेरा नेत्र प्रचंड।
गणाचा कसा रचिला पिंड।
हात पाय गणासि नाहीं गण लुंड मुंड।
असा गाइला मी वक्रतुंड।
गणपतीसंगे सारजा नाहीं, गण हा निसर सांड।
गण पाहतां नाहीं कुभंड।

चाल–अशा गणाचा ध्यास राखा। दूर करितो द्वैत दुःखा।
अंतपार नलगे सुखा। गण संवाद म्या चाखिला।
सभारंगणीं गण ओळखिला ॥ ३ ॥
गण गिरजेचा नाहीं योनीद्वारें गण जन्मला।
याचा अचंबा वाटला।
संत नागुजी म्हणे गणाचा प्रमाण एक दाखला।
ज्ञानी तो एकदाच उमजला।
रामचंद्र तुका गण ओळखुनी आज पुसतो तुला।
पाखंडे नको करूं गलंबला।

चाल–दामू नारायण म्हणे ज्ञात्यासी। आजी गाठ आहे गुणवंतासी
म्हणून हा गण ठसतो तुम्हासी। संत भक्तानें भाकिला।
सभारंगणीं गण ओळखिला ॥ ४ ॥

या पदाचा उलगडा कोणत्याहि निव्वळ साहित्यिक पद्धतीनें होणारा नाहीं. कवि ‘ सभारंगणीं गण ओळखिला ’ आणि ‘ गणाचा सुखसंवाद चाखिला ’ असें सांगतो. या खुणा अध्यात्म जाणणाऱ्याला सहज समजण्यासारख्या आहेत. त्याचें मूळ मांडुक्योपनिषदांत आहे इतकेंच मी सुचवितों. सध्यां शाहिरांची भूमिका पाहावयाची आहे. तिचा प्रत्यय येतो कीं कसें हें पाहिलें तर तूर्त पुरें आहे. आतां हैबतीबुवाचें एक पद नमुन्यासाठीं देतों:—

ब्रह्म चतुर्दश भिळून त्यास एक आवरण माया।
मायेपोटीं ब्रह्म कसें तें ऐका मूळ पाया ॥ धृ० ॥
ब्रह्म सुनें जर म्हणाल तर तें निःशब्द जाणावें।
तें नपूंसक ऐसें वेदांत मत पहावें ॥
ब्रह्म नाम तें नर ना नारी चित्तीं शोधावें।
ऐसें असता ब्रह्म शिव म्हणून का बोलावें ॥
त्या ब्रह्मासी वेष्टण मायेचें आगळी माया।
प्रजापती इंद्रासी सांगे ऐका कविराया ॥ १ ॥
ब्रह्म नाम तें शून्य, शून्य तें सिद्ध कशावरून।
रेघेविरहित शून्य कसें तें पहा विचार करून ॥
रेघ मोडितां शून्यचि नाहीं शीव दावा धरून।
रेघेपोटीं शून्य ब्रह्म ओळखावेंरे।
रेघ तीच ती माया नय कवनाशीं आया ॥
मायेविरहित ठिकाण नाहीं ब्रह्माशीं सांगाया।
तीच रेघ लांबविली आकार झाला एकाचा ॥ २ ॥

तीच अर्ध मातृका रेघ जाणा ओंकाराचा।
त्याला रेघ तिकटिची सत्वरजतम त्रिगुण वाचा।
मायेपोटीं ब्रह्म आणि ओंकार सांगावा।
अद्वय भाषेमधीं बोले प्रजापती श्लोका या ॥ ३ ॥
तेहतिस कोटिसहित उपासक शक्तीचे सारे।
शक्तिविरहित शिव असा म्हणतोस कसा रे ॥
श्रेष्ठ तुझा सेवक सांगे ग्रंथाचे आधारें।
मायेविरहित ब्रह्म कसें निवडिलें श्लोकाधारें ॥
कविराय हैबती अखंडित ध्याती नाथ पायाला।
कृपा हस्त मस्तकीं शिरावर आहे कृपा छाया ॥ ४ ॥

छांदोग्य उपनिषदाच्या द्वादश खंडांत प्रजापति जो ब्रह्मदेव त्यानें इंद्राला केलेल्या उपदेशाच्या मूळ आधारावर हें पद रचलेलें आहे हें उघड आहे. हीं पदें महाराष्ट्राच्या उत्तर व दक्षिण अशा बाजूच्या गांवीं वस्ती असणाऱ्या कवींचीं आहेत. दोन्हीं पदें मनुष्यसमूहांत गाइलीं जाण्यासाठीं रचलेलीं आहेत. महाराष्ट्रांत जे रूढ देवता-उपासकाचे पंथ आहेत त्यांपैकीं कोणत्याहि पंथाच्या भजनांत, कथाकीर्तनांत हीं म्हटलीं जात नाहींत. वारकरी सांप्रदाय जरी भक्तिज्ञानमार्गीं आहे तरी पंथशुद्धि राखण्याचें हेतूनें कडक बंधनांनीं जखडलेला आहे. तीच स्थिति रामदासी सांप्रदायाची आहे. गाणपत्य व दत्तोपासक हे तर अगदींच सोवळे पंथ आहेत. त्यांत ब्राह्मणेतरांना प्रवेश नाहीं असें म्हटल्यानें अतिशयोक्ति होणार नाहीं. त्या पंथाच्या अधिष्ठानाविषयीं म्हणजे ज्ञानाविषयीं मला अत्यंत आदर आहे. अध्यात्मिक दृष्टीनें देवीची उपासना करणारे मला वंद्य आहेत. तथापि डफगाण्याशीं त्यांचा सरळ संबंध लागत नाहीं. माहूरगडचे विष्णुकवि देवीचे भक्त आहेत. त्यांची रूपकात्मक अशी कांहीं रचना शाहिरी धाटणीची आहे, पण त्यांचा समावेश शाहिरांत होणें कठीण आहे. सारांश, इतकाच कीं कोणत्याहि देवतेचे, अवताराचे अथवा प्रतीकाचे उपासक नसलेले, पण अध्यात्माच्या चिंतनांत रत असे शाहीर आहेत. अध्यात्म हीच त्यांची भूमिका आहे.

नांव नवें–पद्धति जुनी

अध्यात्मिक भूमिकेची शाहिरी मराठी राज्याच्या अस्तानंतर एकदम उत्पन्न झाली, कारण अशी अध्यामिक रचना त्यापूर्वींच्या काळांतली आज उपलब्ध नाहीं, हें म्हणणें कितपत टिकेल हा प्रश्न आहे. वर सांगितलेले संप्रदाय मराठी राज्याच्या कालांत होते. इतकेंच नव्हे तर एका रामदासी सांप्रदायाशिवाय इतर सर्व त्यापूर्वीं दीर्घकाल स्थिर झालेले होते याविषयीं वाद नाहीं. शाहिरांचा हा सांप्रदाय इतर सर्व सांप्रदायांहून दूर पडलेला असला तरी शुद्ध ज्ञानाच्या

कसोटींत इतरांना हार जाणारा नाहीं. शाहिरींतल्या अध्यात्मिक भागापैकीं तृतीय-वर्गीय भागाशीं सुशिक्षितांची चुकूनमाकून गांठ पडलेली आहे म्हणून त्यांच्या-कडून या शाखेवर अन्याय झाला आहे, म्हणजे त्याविषयींची जिज्ञासा मुळांतच खुरटली अथवा नष्ट झाली आहे. पोवाडा व लावणीचें संशोधन जसें व जितकें झालें त्याच्या दशांशानेंहि अध्यात्मिक शाखेकडे लक्ष पोहोंचलें नाहीं; आणि त्यामुळें शाहिरी भूमिका ध्यानीं आली नाहीं. शाहिरी या नांवानें नव्हे तरी तत्सदृश रचना चालू होती असें पूर्वीं पाहिलें आहे. ज्ञानेश्वरांचें कवन व दासोपंतांचें एक कवन पूर्वीं उद्धृत केलें त्याचा बारकाईनें विचार केला तर असें दिसून येतें कीं, तीं कवनें कोणत्याहि दैवतांची प्रशस्ति करणारी नसून ज्ञानमार्गाकडे लक्ष वेधण्यासाठीं विशेष पद्धतीनें रचलेलीं आहेत. त्यांच्या गायनाचा प्रसंग जनसमुदायाचा असून कोणत्याहि पंथीय बंधनानें जखडलेला नाहीं. ‘पैल चतुरा दे हाळीं’ असें म्हणून ज्ञानेश्वरांनीं कोणाला तरी आव्हान दिलें आहे. तीच तऱ्हा दासोपंतांच्या कवनांत आहे. ‘खेळिया मुन्या सावधान,’ ‘मुन्यावरील बोल आहे रे’ हें निव्वळ आव्हा-नच आहे. पंथीय कीर्तनांत क्वचित् शास्त्राच्या आधारें विषयाच्या मांडणीच्या ओघांत पूर्वोत्तर पक्ष अथवा खंडन-मंडन असलें, तरी उघड आव्हान नसतें. हा भेद सूक्ष्म भासत असला तरी आपल्या विषयाच्या बाबतींत महत्त्वाचा आहे. आव्हानाचा हेतु प्रतिपक्षीयाला डिवचण्याचा असतो हें उघड आहे. बुद्धीला चालना देऊन गूढाचा उलगडा करूं लागणारें हे कवनप्रकार भेदिक या नांवानें पुढें प्रसिद्ध झाले असले, तरी त्यांची परंपरा जुनी म्हणजे मुसलमानी सत्ता महा-राष्ट्रांत स्थापित होण्याच्या काळापूर्वींची आहे असें म्हणण्याला मला प्रत्यवाय दिसत नाहीं. हा प्रकार शाहिरींत उतरला आहे.

अध्यात्माचा प्रसार महाराष्ट्रांत संतपरंपरेनें केला हें सत्य आहे. मराठींत रचना करणाऱ्या संतांचा सर्वसाधारण समाजाशीं निकट संबंध लवकर येणें स्वाभा-विक आहे. पण तसें आहे एवढ्यावरून इतर कोणी यांत सहभागी नाहीं असें म्हणणें चुकीचें होईल. वारकरी सांप्रदायांतला ज्ञानभक्तीचा रंग यच्चयावत् श्रोत्यांना समजून पटतो, कीं पटल्यानंतर समजत जातो याचें उत्तर देणें फार अवघड आहे. वारकरी पंथांतला खोल व विशाल अध्यात्मिक प्रभाव तिसड करून पाहण्याला समर्थ न झालेले लोक त्यांत रंगतात. पण अशा रीतीनें दीर्घकाल रंगूनहि त्या पंथाची अध्यात्मिक सारिणी अवगत नसलेले असंख्य लोक आहेत. अशिक्षितांची गोष्टच कशाला? पण तुकारामबुवांच्या साध्यासुध्या दिसणाऱ्या अभंगांत ही अध्यात्मिक सारिणी अगदीं नित्याच्या व्यवहारांतल्या शब्दांत कशी ठासून भरलेली आहे हें सुशिक्षितांना कळणें अवघड होऊन बसलें आहे. प्राचार्य दांडेकरांसारखा अधि-कारी या अभंगावर कीर्तन करतो तेव्हां एखाद्या वाङ्मयप्रवीणानें लावलेल्या अर्थाशीं तुलना करण्याचा प्रसंग येतो आणि मग त्यांतला भेद कळून येतो. वार-

करी असो कीं रामदासी असो त्यांचा वेदान्त असा उघडा नाहीं. त्यांत शिरावें लागतें. शेवटीं लाभ होतोच. व्यवहारांत ज्याला सगुणभक्ति असें म्हटलें जातें, त्यांतला त्यांचा मार्ग.

शाहिरांचे मित्र कोण नाहींत ?

या सगुण भजनाहून निराळा पण मुळांतील सारिणीला तंतोतंत धरून असलेला कांहीं प्रघात महाराष्ट्रांत रूढ आहे. त्यांत थोडे वरवरचे भेद दिसत असले तरी मुळांतलीं तत्त्वें शुद्ध आहेत. अशांच्यापैकीं पूर्वी ज्यांच्या नांवाचा निर्देश झाला आहे असे नाथपंथी साधु होत. नाथपंथ हें नांव फार व्यापक आहे. त्याच्या अनेक शाखा आहेत. त्या सर्वांचा छडा लावून दाखविणें हा या लिखाणाचा हेतु नाहीं व तें कार्य करण्याला जरूर ती साधना मजकडे नाहीं. पण या बाबतींत जो कांहीं अल्प शोध मीं केला त्यावरून आपल्या विषयाला पुरेशी सामग्री मी जुळविण्याचा प्रयत्न करतों आहें. माझ्या पाहणींत असें आलें आहे कीं, शाहिरांतील निदान अध्यात्मिक शाखेच्या रचनाकारांचे मूळ गुरु कोणी गोसावी आहे; मग तो गिरी असो किंवा पुरी असो. उत्तर मराठवाड्यांत जे कवि विशेष प्रसिद्ध आहेत ते तुकनगिरी बुवाचे अनुयायी आहेत. दक्षिण महाराष्ट्रांतील मुख्य हैबतीबुवा हा कैवल्यनाथपुरी बाबाचा शिष्य होता. नगर जिल्ह्यांतील नेवासें तालुक्यांतील मठ, मिरीन.ीकची मढी, पश्चिम साताऱ्यांतील मच्छिंद्रगड व तिकडचें शिराळें हीं गांवें मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ व कानिफनाथ यांच्या वास्तव्याच्या खुणा आहेत. तेथें त्यांच्या अंत्य समाधि आहेत असें सिद्ध नाहीं. तथापि तेथें दरवर्षी भरणाऱ्या यात्रांवरून त्या त्या व्यक्तींचा त्या त्या स्थानांशीं निकट संबंध पोहोंचतो, एवढें तरी कबूल करणें प्राप्त आहे. ज्ञानेश्वर स्वतः नाथपंथी असून त्यांच्या नाथपंथीय परंपरेचा महाराष्ट्रांत स्पष्ट दाखला आहे. या शाखेंतल्या गैबी नाथाची भक्ति करणाऱ्या निदान दोन शाहिरांची ओळख पूर्वी पटलेली आहे. सावंतवाडीचे सोहिरोबानाथ हे या गैबी नाथाचे शिष्य. ग्वालियरचे महीपतिनाथ हे याच शाखेंतले. वऱ्हाडांतले देवनाथ नाथपंथी. थोडीशी नजर चाळविली तर असें स्पष्ट दिसतें कीं, शाहिरांचा व नाथपंथी गोसाव्यांचा दृढ संबंध महाराष्ट्राच्या पूर्व भागांत जास्त आहे. साताऱ्या जिल्ह्याच्या पूर्व भागांत चैत्र मासांत अनेक गांवीं अशा कोणातरी गोसाव्याच्या वसतिस्थानीं यात्रा भरत असतात. नासिक, पुणें या भागांत अशा यात्रा भरतात, पण त्या निश्चितपणें नाथपंथी गोसाव्यांच्या निमित्त भरतात असें सांगतां येत नाहीं. त्यांतल्या पुष्कळशा देवीच्या नांवानें असतात. पण त्यांतहि खोल तपास केल्यास असें दिसून येईल कीं, कोणातरी भक्ताची अगर वीराची स्मृति साकार झालेली असते. उत्सवांत हा जो फरक आहे त्याचा निर्देश येथें कांहीं हेतूनें केला आहे. ज्यांना ग्रामदेवता म्हणतात त्यांत राम कृष्ण या अवतारांचा समावेश नाहीं. पण हनुमानाला व भैरवाला त्यांत

स्थान आहे. देवीचा समावेश हा सर्वांत जुना आहे. शिवलिंगाबद्दल तर प्रश्नच नको. त्याची महति ग्रामीण महाराष्ट्रांत किती जुन्या कालापासून आहे याचा नक्की पत्ता लागत नाहीं. हा प्रकार थोड्याशा विस्तारानें येथें सांगण्याचा हेतु असा कीं, ग्रामीण महाराष्ट्रांतील अध्यात्मिक भाग नजरेपुढें निश्चित उभा राहावा. शाहिरीशीं त्याचा संबंध असा आहे कीं, या ग्रामदेवतांच्या उत्सवाचे प्रसंगानें शाहिरीच्या कार्यक्रमांची हजेरी लागण्याचा प्रघात आहे. वारकरी सांप्रदाय जरी सर्वांत जास्त प्रभावी आहे तरी त्याला शेंदरी दैवतांचें कांहींसें वावडें आहे. त्यामुळें तो सांप्रदाय या यात्रांत भाग घेत नसे. अलीकडे तालसुरावरचे भजनकरी खेड्यांतून वाढूं लागले आहेत. ते तितकासा भेद पाळीत नाहींत. पण शाहिरी सांप्रदायाच्या फडांत यात्राप्रसंगींसुद्धां वारकरी भजन करीत नाहींत. हा प्रकार येथें चिंत्य आहे. खेडेगांवांत लग्नकार्यानंतर अथवा षष्ठीपूजनानिमित्त शाहिरांच्या गाण्याचे म्हणजे अध्यात्मिक व चतुरपणाच्या कवनांच्या गाण्याचे कार्यक्रम होऊं शकतात. ती प्रथा दक्षिण व उत्तर महाराष्ट्रांत सारखीच आहे.

शाहिरांचे मित्र कोण आहेत ?

शाहिरी पंथाची मैत्री अशी कोणत्या सांप्रदायाशीं नाहीं हें पाहण्यासाठीं हा विचार केला. आतां फक्त ती आहे कोणाशीं एवढें पाहावयाचें उरलें आहे. या पंथाची बैठक जमण्यासारखा एकच पंथ आहे, व तो म्हणजे रामानंदांचा पंथ होय. कबिराचे गुरु असे हे काशींतले साधु प्रसिद्ध आहेत. कबिराचीं पदें एकतारीवर म्हणण्याचा प्रघात ग्रामीण महाराष्ट्रांत आहे तो मुख्यत्वेंकरून अगदीं अशिक्षित समाजांत. महार, चांभार व तत्सम वर्गांत कबीरपंथी भजनें वारकरी पंथाच्या भजनापेक्षां जास्त रूढ आहेत. शाहिरांच्या फडांत हें एकतारीचें भजन होत नसलें, तरी खाजगी बैठकींत दोन्ही पंथांचा मुकाबला होऊं शकतो. शाहिरी कवनें केव्हां एकतारी व खंजिरी यांच्या सूरतालावर म्हटलीं जातात. यांतलें कारण मुख्यत्वें करून असें आहे कीं, रामानंदी पंथांत जातपातीचें बंड मुळींच नाहीं. शाहिरींतहि तें नाहीं. वारकरी सांप्रदायाप्रमाणें एकमेकांच्या पायाला हात लावून नमस्कार करण्याचा प्रघात या दोन्ही पंथांत नाहीं. कोणत्याहि देवतेची भक्ति दोन्ही पंथांत नाहीं. पण भक्ति जरूर आहे. व ती परमात्म्याची आहे. त्या दोन्ही पंथांचा भर अध्यात्मिक ज्ञानावर आहे. तुकारामबुवांच्या बाबतींत सुशिक्षितांच्या मनांत असलेला गैरसमज रामानंदी पंथाच्या बाबतींतहि कायम असला तर नवल नाहीं. तुकारामबुवा जितके शुद्ध अध्यात्मिक सारिणीचे पुरस्कर्ते आहेत तितकेच कबीरहि आहेत. अध्यात्मिक उन्नतीच्या साधनांचा उल्लेख उभय पंथांत सारखाच स्पष्ट आहे. कोणताहि एक पंथ सारिणीसह कळला म्हणजे दुसरा आपोआप कळतो इतकें साम्य दोहोंत आहे. रामानंदांचे पंथांतील म्हणजे कबीर, दादू यांचीं कवनें म्हणत

देशभर भटकत फिरणारे अनेक लोक पूर्वीपासून महाराष्ट्रांत येत असत व अजूनहि येत असतात. अशांपैकीं औरंगाबादचा निपट निरंजन होय. औरंगजेब बादशहा महाराष्ट्रांत शेवटीं तळ देऊन बसला, त्या काळांत हा साधु औरंगाबादेस आला व शेवटीं तेथेंच समाधिस्थ झाला. त्याचीं शंभर सवाशें लहान लहान कवनें व कांहीं दोहे उपलब्ध आहेत. त्याची सारिणी लक्षांत येण्यासाठीं एक पद येथें देतों—

जगतसे हटकर ब्रह्मपद डटकर।
रामनाम रटकर लाखों तरे मुनिया।
वेद शास्त्र शोध कर आपसे विरोध कर।
आपही को बोध कर कोऊ नहीं सुनिया।
काम क्रोध दूर कर अहंकार चूर कर।
मैं मेरी को मार कर पार भये ज्ञानिया।
कहे निपट निरंजन जीवन में मरन।
आप जो मरे तो पीछे डूब-गई दुनिया।

—निपट निरंजन

निपट निरंजनाची हकीगत भीमस्वामीकृत भक्तलीलामृतांत व महिपतिबुवा ताराबादकरांच्या भक्तिविजयांत दिली आहे. यांच्या बाबतींत एक गोष्ट मुद्दाम सांगावीशी वाटते ती अशी कीं, यानें औरंगजेबाची खरपूस हजेरी घेऊन त्याला उद्देशून अध्यात्मबोध केला आहे. अशीं कवनें सुमारें पंचेचाळीश आहेत. आपला बाप, भाऊ, बहीण यांची दशा करून राज्यवैभव लाटल्याबद्दल त्याची स्पष्ट शब्दांत निर्भर्त्सना केली आहे. तथापि तो त्या बादशहाच्या कोपाचा बळी झाला नाहीं, ही केवढ्या आश्चर्याची गोष्ट आहे! तो भाग ज्या पदांत आहे तें येथें देतों—

लष्कर लवाज संग डफ ढोल चतुरंग
हातीये ही नौरंग तशरीफ लाई है।
संभूको सूली चढाया बेटीको यहां भगाया।
मुरादको मरवाया मारा दारा भाई है।
बापको तो कैद किया सर्मदका सर कटाया
फकर कौन दूर किया फकीर आजमाई है।
कहे निपट निरंजन सुनो आलमगीर
तसबीकी तलवार येही पातशाही है।

पूर्वी उल्लेख केलेला तुकनगीर याचीहि समाधि औरंगाबादेस असून त्याच्या परंपरेंतील अध्यात्मिक शाहीर महादू मल्हारी यांच्या समाधि त्या समाधीच्या शेजारीं आहेत. येवल्याच्या पूर्वेस जवळच वैजापूर येथें गंगागीरबुवाची समाधि

❀ *टिपण निरंजन—प्रकाशक श्री. धनराज सेठी, किराना चावडी, औरंगाबाद.*

आहे. त्याचें माहात्म्यहि त्या भागांत पुष्कळ आहे. औरंगाबादेनाजिक खुल्दाबाद येथें मुम्ताजुबुदिन जर्जरी जरीबक्ष या मुसलमान अवलियाची कबर आहे. त्याच्या उरसांत हिंदु व मुसलमान अशा दोन्ही जमाती श्रद्धेनें भाग घेतात. या जर्जरी-बक्षाची व नाथसांप्रदायी शिवदिननाथ यांची फार दोस्ती होती. शिवदिननाथांच्या नांवांतील दिन हा शब्द या दोस्तीची खूण आहे. येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या साधु-गोसाव्यांनीं मुसलमानांना जवळ केलें तरी त्यांची अध्यात्मसारिणी त्यांनीं घेतली नाहीं. उलट आपल्या भजनीं लागलेल्या मुसलमानांत आपल्या सारिणीची गोडी उत्पन्न केली व त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, पुष्कळ मुसलमान या अध्यात्मिक शाहिरीचीं कवनें आत्मसात् करून फडांत म्हणण्याला उभे राहतात. अशांचीं कांहीं नांवें मला कळलीं तीं या कवनांच्या बाडांत. कवि सय्यद हसन, सय्यद मोहिदिन, हुसेन नबी, हीं नावें बार्शीच्या आसपासच्या भागांतील आहेत. निजामशाहींतील मराठवाड्याचा जो भाग बार्शी भागाला लागून आहे त्यांतले हे लोक असावेत. बाबू रंगेला, लहिरी हैदर हे सातारा-कोल्हापूर प्रांतांतले आहेत. अशीं आणखी कित्येक नांवें सांगण्याचा प्रसंग येणार आहे. शाहिरीशीं मैत्री करणारे आणखी एका समाजाचे लोक आहेत. ते म्हणजे शैव समाजांतील लोक. त्यांतले कोणी शाहिरी कवनें रचणारे आहेत. मुंबईंत प्रसिद्ध असलेले महादेव शेटे यांचें नांव येथें सांगण्यासारखें आहे. सारांश इतकाच कीं, पंडिती ब्राह्मण समाज, वारकरी, रामदासी आदिकरून प्रथितयश पंथ यांच्याखेरीज शिल्लक उरलेला समाज शाहिरीशीं संबंध ठेवणारा आहे.

समाजाच्या निरीक्षणासाठीं

शाहिरांची अध्यात्मिक सारिणी पुढें सांगावी लागणार आहे. आतांपर्यंत सर्वसाधारणपणें शाहिरीविषयीं व शाहिरांविषयीं मूलभूत असें कांहीं सांगणें जरूर होतें तें थोड्याशा विस्तारानें सांगितलें आहे. आपलें अध्यात्मिक अधिष्ठान कायम ठेवून शाहिरांनीं मनोविनोद आणि मनोरंजन अशा दोन्ही शाखांत वाङ्मय निर्माण केलें आहे. युद्धप्रसंग, राजकीय अस्मानी सुलतानी, दुष्काळ, अत्याचार इत्यादि प्रसंगांचीं वर्णनें ज्यांत आहेत अशीं कवनें त्यांनीं समाजाला ऐकविलीं आहेत. सुख-स्वास्थ्यांत सुचणारे विषयहि त्यांनीं हाताळले आहेत. मनुष्याची प्रकृति पाहावयाची तर त्याचा आहार-विहार पाहावा लागतो. समाजाची नाडी पाहूं जाणारांना त्या समा-जाला जें मानसिक अथवा बौद्धिक खाद्य मिळत असेल त्याचा विचार करणें जरूर आहे. मराठी समाजांतील बहुसंख्य लोकांवर जे नित्यनैमित्तिक परिणाम वरचेवर होत आले आहेत, ते जाणणें हा समाजाच्या अभ्यासांतील निदान एक भाग आहे, असें मला वाटतें. म्हणून त्यांतले जे भाग मला अवगत झाले आहेत ते मी सांगत आहें. त्यांतली सर्व माहिती बिनचूक असेल असा माझा दावा नाहीं. माझा हा प्रयत्न म्हणजे या उद्योगाची प्रस्तावना आहे.

♣ ♣

प्रकरण तिसरें

मनोविनोदात्मक शाहिरी

शाहिरी वाङ्मयाची उत्पत्ति मनोविनोदासाठीं आहे, असें मला वाटतें म्हणून ' मनोविनोद ' हा शब्द मी सहेतुकपणें व विशेष अर्थानें वापरीत आहें. विनोद या शब्दाचा साहित्यांतला अथवा व्यवहारांत रूढ असलेला अर्थ येथें माझ्या डोळ्यांपुढें नाहीं. थट्टा, चेष्टा इत्यादि प्रकार मनावर परिणाम करणारे असतात. पण त्यांच्यामुळें कांहीं थोडासा तरी हीन अर्थ निष्पन्न होतो. ज्याची थट्टा झाली असेल त्याला आनंद होतो असें म्हणतां येत नाहीं. त्याच्या मनाला वाईट वाटत असतांहि इतरांनीं त्यांत आनंद मानावा हें वास्तविक प्रशस्त नाहीं. म्हणून तो अर्थ सोडून विनोद शब्द मीं स्वीकारला आहे. अध्यात्मांत विरक्तीची सूचना अथवा उपदेश व सारिणी समजावून देणें असे दोन भाग पडतात. ते एकमेकांला पूरक आहेत. शास्त्राप्रमाणें सारिणी हें विज्ञानच. पण तें सांगण्यालासुद्धां त्यांतला अधिकार असावा लागतो. सारिणीची समजूत करून देणें हें अति हळुवारपणें करण्याची जाणत्यांची रीति आहे. जसा ज्याचा अधिकार असेल तसें तो ग्रहण करील. पण सांगणाऱ्याला तें आकर्षक पद्धतीनें सांगणें जरूर असतें. ती पद्धति सांगणाराला स्वतःकडे बोधकाराची अगर उपदेशकाची भूमिका घेऊं देत नाहीं. विनयानें तें कार्य होतें. कोणत्याहि संताच्या वचनांत बोधकाराची भूमिका घेतलेली दिसत नाहीं. तें कार्य त्यांनीं खेळीमेळीनें केलें आहे.

' आतां अर्जुनेसीं श्रीमुकुंदें । नागरपणें सांगिजेलें विनोदें । '

—ज्ञानेश्वरी ६: ४१७

अथवा ' रामदासाचे विनोदें ' असा शब्दप्रयोग त्याची साक्ष आहे. उपदेश करण्याचा प्रसंग असतांनासुद्धां ज्ञानेश्वरांनीं ' अरे रया ' असें स्वतःला संबोधून जें काय सांगावयाचें तें सांगितलें आहे. समर्थ रामदासांनीं स्वतःच्या मनाला उद्देशून बोध केला आहे. ही रीति हिंदीं भाषेंतहि रूढ आहे. ' मन तेरी अक्कल मुलानी ' असा शब्दप्रयोग त्या भाषेंत संतांनीं केला आहे.

तुलसीदासांनीं म्हटलें आहे—

दया धर्मका मूल है। पापमूल अभिमान।
तुलसी दया न छाडिये। जवलग तनुमे प्राण।

खेळीमेळीनें ज्ञान पसरविण्याचा हा प्रघात पूर्वीपासून चालू होता. तोच शाहिरांनीं कायम ठेवला आहे. शाहिरीचा जो प्रतिनिधि-प्रकार कोकणांत रूढ आहे, तो करणाऱ्यांना ' खेळे ' असें नांव तात्पुरतें दिलें जातें. गणेशगौरी उत्सवांत ग्रामीण भागांतील सर्वसाधारण जनता या खेळ्यांचीं गाणीं ऐकण्याला व त्यांचे नाच पाहण्याला उत्सुक असते.

पहिल्या प्रकरणांत दासोपंतांचें एक कवन दिलें आहे. त्याचें ध्रुवपद ' खेळिया मुन्या सावधान ' असें आहे. हें पूर्वीं पाहिलेंच आहे. मराठवाड्यांत पांचशें वर्षांपूर्वीं अशा संबंधात रूढ असलेला ' खेळ्या ' हा शब्द आजमितीस कोकणांतहि चालू आहे. हा प्रकार चिंत्य आहे. समर्थांची व शाहिरांची गांठ झाली असतां घडलेलें वर्तमान पूर्वीं सागितलें आहे. शाहिराचा अहंकार गळून गेल्यानंतर समर्थांनीं त्याचा कार्यक्रम करविला. त्यासंबंधांत आत्मारामस्वामीनें वर्णन करतांना म्हटलें आहे—

तो याम एक लोटोनी जातां रजनीं। चंद्रप्रकाशी सभा करोनी।
शाहिरास प्रीतीनें बोलावूनी। खेळ वा म्हणितलें निर्भय।

—दा. वि. धा. भाग ३. १२०

हा तपशील वाढविण्याचा हेतु असा कीं, शाहिरीची अध्यात्माच्या प्रसारांतील जागा अथवा भूमिका ध्यानीं यावी. शाहीर हे बोधकार म्हणून मिरवत नाहींत. या मुद्दयावर भर आहे. संतांचें बोल शास्त्रशुद्ध पद्धतीनें समाजांत पसरविणारे हे स्वयंसेवक आहेत. त्यांनीं मोक्याच्या व मर्माच्या जागीं हें कार्य केवळ हौसेनें चालविलें. तो उपजीविकेचा व्यवसाय नव्हे. कार्यक्रम संपल्यावर यजमानाकडून त्याचा बहुमान करण्यांत येतो. त्यांत क्वचित् किंचित् व्यावहारिक द्रव्य असतें हें खरें. पण तो लाभ चरितार्थ चालविण्याला पुरेसा नसतो. हल्लींच्या व्याख्यात्यांना देण्यांत येणारें मानधन आणि हा शाहिरांचा विशेष प्रसंगांतला पुरस्कार, यांत कांहीं भेद आहे, असें मला वाटत नाहीं.

शाहिरांचा उद्योग खेळ स्वरूपाचा मानण्यांत कांहीं विशेष नजर आहे असें मला वाटतें. देवाची भक्ति आणि अध्यात्म शास्त्र हीं संबंधित आहेत, तथापि त्यांत तत्त्वज्ञान आणि उदाहरण असें नातें आहे. खेड्यापाड्यांतील जनतेच्या कानावर देवभक्तीबरोबर तत्त्वज्ञान घालण्याचा हा सहेतुक उद्योग शाहिरांनीं चालविला याला कांहीं कारण असलें पाहिजे. तत्त्वज्ञान म्हटलें म्हणजे त्यांत शुद्ध सारिणी, इतर विचारांचें खंडण, पूर्वोत्तरपक्ष हें सर्व आलें. कोणत्यातरी भिन्न सारिणीशीं वाद व त्यांत स्वमताची स्थापना हा भाग आला. शाहिरांच्या कार्यक्रमांत हे प्रकार दिसून येतात. भिन्न मतांचा संघर्ष चालू असतांना हें स्पष्टपणें ध्यानांत येतें. असा संघर्षाचा प्रसंग महाराष्ट्रांत आजमित्तीस नसल्याकारणानें या चर्चेतला अभिनिवेश आतां महत्त्वाचा वाटत नाहीं. तथापि त्या वादकौशल्याची जरुरी असल्याचा काळ महाराष्ट्रांतच काय पण अखिल भारतांत पूर्वकालीं होता आणि म्हणूनच ज्ञानी पुरुषांचे चर्चात्मक टीका ग्रंथ निर्माण झाले. ते वरच्या थरांत पठण केले जात, त्यांवर प्रवचनें होत. त्याहून जघन्य अशा समाजांत हे प्रकार पोहोंचविण्यासाठीं कांहीं विशिष्ट कवनरचना असणें जरूर झालें, म्हणून ज्ञानेश्वरासारख्यांनीं तशी सुरुवात करून दिली, अशी साखळी लागते, असें माझें म्हणणें आहे. मीं हातीं घेतलेल्या कवनप्रकाराचा नुसता बडेजाव माजविण्यासाठीं हा बादरायण संबंध जुळवतो आहे, असा आक्षेप निघणें शक्य आहे, हें मी जाणून आहें. पण तो आक्षेप टिकण्यासारखा नाहीं. पहिल्या प्रकरणांत 'आगरिचे क्षीरसागरीं पैल डोंगरी दुभते गाय रे' हें ज्ञानेश्वरांचें कवन दिलें आहे. त्याचें स्वरूप बारकाईनें पाहिलें म्हणजे अशी रचना कां झाली हें ध्यानीं येईल. मनोविनोद आणि मनोरंजन यांत असलेला फरक ध्यानीं घेऊन शाहिरींतल्या या शाखांच्याकडे पाहणें इष्ट कसें तें ध्यानीं येईल. वस्तुतः मराठी शाहिरी वाङ्मयसृष्टि ही स्वयंपूर्ण आणि व्यापक रचना आहे. तिच्यांतल्या मनोविनोदात्मक भागाचा विचार करतांना असें दिसून येतें कीं, या भागांत आलेलें प्रतिपादन इतर सर्वमान्य मराठी संत वाङ्मयाशीं सुसंगत आहे. पण त्यावर त्याचा पगडा नाहीं. बहुधा एका ज्ञानेश्वरांच्या खेरीज इतर संतांच्या रचनेचा अनुवाद त्यांत केलेला नाहीं. अनेक प्रसंगीं मूळ उपनिषदांपर्यंत त्यांत मजल मारलेली दिसते. कठ, ऐतरेय, मांडुक्य व केन या उपनिषदांतील तत्त्वज्ञान नाथसांप्रदायाच्या सारिणीनें ज्ञानेश्वरांनीं प्रस्तृत केलें आहे, असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. शाहिरांनीं स्वीकारलेली शिवशक्ति समावेशनाची सारिणी त्याची साक्ष पटवूं शकेल.

हा शिवशक्ति शब्दप्रयोग मराठी अध्यात्मिक शाहिरींत अत्यंत महत्त्वाचा असला तरी सर्वसाधारण मराठी वाचकांना तो परिचित नाहीं. महाराष्ट्रांत जी अध्यात्मिक सारिणी रूढ आहे, ती या शिवशक्ति मतावर आधारलेली आहे, हें साधारण वाचक काय पण तज्ज्ञ पंडितसुद्धां स्पष्ट कबूल करीत नाहींत. कित्येक शांकर-

(शंकराचार्य) मतानुयायी विद्वान् त्याचा उल्लेख कटाक्षानें टाळतात. महाराष्ट्रांतले त्या मताचे आद्य प्रणेते ज्ञानेश्वर. त्यांचें तत्त्वज्ञान शांकरमतानुयायी आहे, असा अनेक विद्वानांचा आग्रह आहे. असें म्हणताना औपनिषदिक तत्त्वज्ञानाची उकल करणारें शंकराचार्यांखेरीज इतर भाष्यकार होऊन गेले आहेत, आणि त्यांची सारिणी ज्ञानेश्वरांच्या प्रतिपादनांत ठळक दिसते, हें त्यांना मान्य नाहीं. ज्ञानेश्वर हे नाथपंथाचे अनुयायी आहेत. त्या शब्दाशीं समान अर्थाचा असा शब्द सिद्धपंथ हा आहे. भक्तिज्ञान या योगानें आपला मोक्ष ज्यांनीं साधला, अशा नारदादिक सर्वांना उद्देशून ज्ञानेश्वरांनीं सिद्ध असा शब्द योजला आहे.

अनंत सिद्ध गेले ऋषि मुनीच्या संगी ।
नारदादि अवधूत ते प्रपंची निःसंगी ।

—अमृता. ६: २१

ज्ञानेश्वरांच्याच पंथांतला पण प्रत्यक्ष संबंधित नसून समकालीन व समदेशीय असा चांगदेव वटेश्वर या मार्गाला सिद्धपंथ असें आपल्या तत्त्वसारग्रंथांत म्हणतो. या सिद्ध पंथाचें विशदीकरण करणारे अनेक टीकाकार काश्मिरांत होऊन गेले. एक काळ असा होता कीं, अध्यात्मविद्या आणि ब्रह्मविद्या हीं विशेष प्रभावानें काश्मिरांत तळपत होती; आणि म्हणून साधारण भाषेंत तिला काश्मिरी अथवा काश्मिरी विद्या असें म्हणत असत. चांगदेव आपल्या तत्त्वसारग्रंथांत गणेशवंदनानंतर शारदेला नमन करतांना 'जे काश्मिरीची मुळिका' असें वर्णन करतो. या काश्मिरी अध्यात्मसारिणींत शिवदर्शन, पाशुपतदर्शन, शक्तिदर्शन अशीं किंचित् भिन्न भिन्न दर्शनें असून प्रत्यभिज्ञा दर्शनाचाहि त्यांत समावेश आहे. काश्मिरी पंडित अभिनवगुप्ताचार्य यानें या दर्शनाचा विशेष प्रचार केला. चांगदेवाचा काश्मिरी हा शब्द आणि ज्ञानेश्वरांच्या लिखाणांत वारंवार येणारा अभिनव हा शब्द हे दोन्ही लक्षांत घेण्यासारखे आहेत. औपनिषदिक तत्त्वज्ञानावर खुद्द गौतम बुद्धाच्या धर्मप्रसारामुळें जें कांहीं आवरण आलें, त्याचा सातव्या आठव्या शतकांत अतिरेक झाला. बौध धर्मांतील अनेक मतमतांतरांच्या संघर्षांत खुद्द बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची ओळख साफ बुजून गेली होती; आणि मूळच्या औपनिषदिक ज्ञानाचा मागमूसहि राहिला नव्हता. अशा काळांत काश्मिरी आचार्य व मत्स्येंद्रादिक योगी यांचा उदय झाला. योग आणि सांख्य म्हणजेच ज्ञान याचा जेव्हां मिलाफ झाला, तेव्हां मूळ तत्त्वापासून दूर गेलेल्या आणि सर्वस्वीं च्युत झालेल्या बौद्ध पंथाचा सांगाडा खिळखिळा झाला. मंत्र, तंत्र, ध्यान, मुद्रा, किमया या अनावश्यक आणि बाह्य कृतीवर आधारलेल्या वज्रयान पंथांतील प्रकारांची किळस समाजाला आली. त्या काळांत नाथपंथ कार्यक्षम झाला आणि प्रभावीहि झाला. बुद्धाचा मूळचा धर्म इतक्या सहज रीतीनें कोसळून पडणारा नव्हता. पण त्यांत अत्यंत विकृति आली, तेव्हां त्या वेळच्या

बौद्धांचा पाडाव बुद्धि आणि प्रभाव यांच्या संयोगानें नाथपंथानें केला आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, इतिहासाच्या पुस्तकांत या प्रकाराचें याथातथ्य व सुसूत्र वर्णन अजून सांपडत नाहीं; आणि त्यामुळें शंकराचार्यांनीं बौद्ध धर्माचा उच्छेद केला असें ठोकळेबाज वर्णन शालेय विद्यार्थ्याला पाठ करावें लागत आहे. या क्रियेची जागती ज्योत महाराष्ट्रांत गोरक्षनाथादिकांच्या स्वरूपांत स्पष्ट दिसते. शिष्टांना अमान्य असूनसुद्धां महाराष्ट्रभर त्यांचा प्रभाव आहे; आणि जे कांहीं अध्यात्मिक स्वरूपाचें मराठी शिष्ट वाङ्मय आहे, त्याचा आधार काश्मिरी पंडित व नाथसांप्रदायी योगी यांनीं रूढ केलेल्या शिवशक्ति मताचा आहे. शिवशक्ति हा शब्दप्रयोग एकनाथ व समर्थ रामदास या दोहोंच्या लिखाणांत आहे. गोरक्षनाथांच्या प्रेरणेनें प्रसार पावलेल्या सगुणभक्तिमार्गांतील शिवशक्तिदर्शनाची सारिणी भागवत पुराणाच्या प्रभावांत सामावून गेली आहे, असें दिसून येईल.

हा शिवशक्ति शब्द मूळचा श्रुतींतला नाहीं, आगमांतला आहे. तत्त्वप्रणाली तीच परंतु उपनिषदांत ती कोणी तरी ऋषीनें जिज्ञासूंना सांगितलेली दिसते, तर आगमांत ती शिवानें शक्तिरूप उमेला सांगितलेली असते. त्याला शिवसूत्र असें नांव आहे. भागवत पुराणाचा प्रसार महाराष्ट्रांत झाल्यानंतर आगमांतील शब्द-प्रयोग लुप्त झाले, आणि त्यांची जागा भक्तियोगाला साजेशा शब्दांनीं घेतली. महाराष्ट्रांत भागवताचा प्रभाव जास्त आहे. तो त्या पुराणाचा टीकाकार महा-राष्ट्रीय बोपदेवामुळें. पुराणिक, कीर्तनकार या सर्वांचा भर भागवतावर आहे, तितका भगवद्गीतेवर नाहीं. सर्वसाधारण सुशिक्षित वर्गांत आजमित्तीस भगवद्-गीतेची प्रतिष्ठा आहे, ती अगदीं अलीकडची, गेल्या पन्नास वर्षांतील आहे. भाग-वताचें सप्ताह पठण हें गीतेच्या सप्ताहापेक्षां पुष्कळ जास्त होतें, हें थोड्याशा सूक्ष्म अवलोकनानें ध्यानांत येण्यासारखें आहे. एकनाथांनीं भगवताच्या एकादश-स्कंधावर मराठी टीका लिहिली, तिचा प्रसारहि जास्त असल्याचें दिसतें. ज्ञाने-श्वरीचा प्रसार त्या मानानें कमी आहे. भाषेच्या अवघडपणाचें कारण आहेच, पण भागवतांतील चरित्रासह भक्तीचा ओलावा लोकांना जास्त आकर्षक वाटला हें मुख्य कारण आहे, असें मला वाटतें. भगवद्गीतेवरील मराठी टीका अध्यात्म शास्त्रांतील विद्वत्तेच्या झगझगाटानें लोकांचे डोळे दिपवितात. पण एकनाथी भाग-वत त्यांना भक्तिरसांत बुडविण्याला समर्थ होतें. यामुळें ज्ञानेश्वरांचे ग्रंथ व त्यांत आगम मार्गानें आलेली परिभाषा हीं दोन्हीं लोकांच्या दृष्टीपासून दूर राहिलीं. त्याचा परिणाम शाहिरींतील मनोविनोदाच्या अंगाविषयीं नुसती अनास्थाच नव्हे तर त्यापेक्षांहि जास्त विरुद्ध भावना भाविक विद्वानांनींदेखील व्यक्त केलेली दिसून येते. मोरोपंतांच्या केकावलीवर ' यशोदापांडुरंगी ' या नांवाची टीका लिहि-णाऱ्या दादोबा पांडुरंगांनीं या प्रकाराचें ' शिवशक्तिचें भांडण ' असें वर्णन केलें

आहे. विद्वानांनीं तिरस्कारलेला हा प्रकार वस्तुतः काय आहे, हें दाखविण्यासाठीं हा तपशील सांगावा लागत आहे.

अध्यात्मशास्त्राची सोपपत्तिक मांडणी करणें हा प्रस्तुत लिखाणाचा हेतु नाहीं. माझा तसा अधिकारहि नाहीं. पण शाहिरींत त्याचें जें स्वरूप स्वीकारलें आहे त्याचें याथातथ्य दर्शन घडविणें हें माझें कर्तव्य आहे. तें करतांना विद्वानांच्या पूर्वग्रहावर माझी नजर आहे, आणि ते दूर करण्याचा यत्न करणें एवढेंच मला शक्य आहे. तो यत्न करतांना मला एक सूचना प्रथम द्यावीशी वाटते. ती अशी की, शिव हें विशेषनाम पुराणांतील शंकराशीं समानार्थक मानल्यानें घोटाळा होईल. शैव–वैष्णव वादाचा वास त्यांत आहे, असेंहि वाटेल. परंतु तो सर्व प्रकार नजरेआड करून शिवशक्ति मताकडे तात्त्विक नजरेनें पाहणें जरूर आहे. पौराणिक कथा या मूळच्या तत्त्वप्रतिपादनाच्या विशदीकरणासाठीं अवलंबिलेल्या आहेत, अशा दृष्टीनें पाहणें आवश्यक आहे. ज्ञानेश्वरांना ही अडचण जाणवली असतांना एक प्रसंगांत त्यांनीं तिचा परिहार कसा केला, तें पाहण्यासारखें आहे. ज्ञानाचा उगम कसा झाला हें सागतांना, तें प्रथम कोणीं प्रकट केलें तें दर्शविणें प्राप्त झालें. त्यांत द्रष्टयासाठीं कोणतेंहि एकच नाम योजणें शक्य आणि जें नाम योजलें जाईल, त्याच्या भजकांना त्यामुळें आदर वांटणें साहजिक. पण त्या नामाव्यतिरिक्त असें दुसरें नाम अन्य कोणा भजकाचें आराध्य असणार, येथें प्रपंच केल्याचा दोष उत्पन्न होईल. म्हणून ज्ञानेश्वरांनीं लिहिलें—

परि शिवें कां श्रीवल्लभें ।
बोलिलें येणेंची लोभें ।

—अमृतानुभव ३:१८

येथें शिव व श्रीवल्लभ या निराळ्या भासणाऱ्या नांवांत न गुरफटतां त्या पलीकडे जाण्याचा संकेत स्पष्ट आहे. ज्ञानेश्वरांनीं शिवशक्ति रूपानें असणाऱ्या जगताच्या आदीचें वर्णन अमृतानुभवांत केलें आहे तें असें—

ऐसी इयें निरुपाधिकें । जगाची जियें जनकें ।
तिथें वंदिलीं मिया मूळीकें । देवोदेवी ॥
जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी ।
चारू स्थळी एकाहारी । एकागाची ॥
आवडीचे नि वेगे । एकमेकांते गिळती अंगें ।
कीं द्वैताचे निपांगे । उगाळिते आहाती ॥
जे एकाचि नव्हे एक सरे । दोघा दोनीपण नाहीं पुरे ।
कांई नेणो साकारे । स्वरूप जिये ॥

कैसी स्वसुखाची आळुकी । जे दोनीपण मिळू येकी ।
नेदितीचि कवनीकी । येकपण फुटो ।
हा ठावभरी वियोग भेडें । जें बाळ जगायेवढें ।
थियाली परि न मोडे । दोघुले पणा ॥

ही अध्यात्म सारिणी शाहिरींत कशी मांडली आहे, तें ध्यानीं यावें म्हणून सातारा जिल्ह्यांतील पुसेसावळीचा शाहीर हैबती भोसले याचें एक पद नमुन्यासाठीं पुढें देतों—

ऐका खूण सिद्धांती सांख्य शास्त्र अनुभव ठसला ।
निराकार आकार, प्रकृति पुरुष एक अंगीं बसला ॥ ध्रु. ॥
जीव शिव हे कदी न सुटती एक एकासी ।
जीव काया शिव आत्मा जडले पूर्ण एकांताशी ॥

अध्यात्मशास्त्र हें अनुभवावर आधारलेलें आहे. या शास्त्रावरचा आपला ग्रंथ संपवितांना ज्ञानेश्वरांनीं सांगितलें आहे—

ययालागीं हें बोलणें । अनुभवामृतपणें ।
स्वानुभूति परगुणें । ओगारिलें ।

—अमृतानुभव १०:२४

शाहिरी रचना ही लौकिकी रचना तर खरीच. तींत भाषेचा म्हणजे शब्द-योजनेचा फरक दिसणारच, पण प्रतिपादनांत शुद्धता किती उंच पातळीपर्यंत जाऊं शकते, हें दाखविण्याकरतां नमुनेवजा घेतलेल्या पदाला कांहीं कसोटी लावणें जरूर आहे. आरंभींच्या चरणांत शक्ति, प्रकृति, जीव हे शब्द माया या अर्थानें आणि शिव व पुरुष ब्रह्म या अर्थानें स्थूलपणें योजले आहेत. वास्तविक हीं दोन्हीं ब्रह्माचींच अंगें आहेत. पहिलें सगुण, साकार तर दुसरें निर्गुण, निराकार असा फरक आहे. निवृत्तिनाथ म्हणतात—

' साकार निराकार । ब्रह्मींचेच विकार ॥

पदांत प्रथम मायाब्रह्मांचें ऐक्य सांगितलें आहे. पण तें द्वंद्व स्वरूपांत आहे. हें द्वंद्व एकमेकांस कधींच सोडून असत नाहीं, असें शाहिरानें सांगितलें आहे. निवृत्तिनाथ म्हणतात—

प्रकृति पुरुष नांदताती घरीं । अखंड शेजारी ब्रह्मसुखें ॥

समर्थ सांगतात.

' अविनाश तें ब्रह्म निर्गुण ।
नासे ते माया सगुण ।
सगुण आणि निर्गुण कालवलें ॥

प्रकृतिच्या संगें पुरुष आला आकारासी।
आधी होता निर्गुण नामची नाहीं तयासी।
तरुबिजाचे पोटीं बीज, तरु शेवटीं आले त्याला।
एक होतें एका पून नाहीं भिन्न भेद या दोघांला॥

ब्रह्मायेच्या अथवा प्रकृतिपुरुषाच्या संघापासून सृष्टि झाली ती कशी तें ज्ञानेश्वरांनीं असें सांगितलें आहे—

तरी माझी हे ग्रहिणी। अनादि तरुणी।
अनिर्वाच्यगुणी। अविद्या हे॥
इये नाहीं हेंचि रूप। ठाणें हें अति अमूप।
हें निद्रितां समीप। चेतां दूरी॥
पैं माझेनीचि आंगें। पहुडलिया हे जागे।
आणि सत्तासंभोगें। गुर्विणी होय॥

—ज्ञानेश्वरी अ. १४:८७८१

पहातां दिसतो पृथक उदकावरिल जसा तरंग।
विवेक करून पहातां तरंगाचें होय अंग।
न दिसे वेगळा विरोनी जाय जळापोटी सांग।
वातापासुनि प्रकृति झाली पहा चढला हय रंग॥
स्थूल सूक्ष्म कारण महाकारण वाचा अवस्था जिवाला।
जीवनकळा सत्रावी नसतां कोण जीवचील त्याला॥

या शेवटच्या दोन चरणांत शाहिरानें आपल्या साख्य सारिणीचा अनुक्रमवार उल्लेख केला आहे. स्थूल पंचमहाभूतें, सूक्ष्म मन, बुद्धि व अहंकार ही तीन आणि शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हीं पांच तन्मात्रें. कारण—पंच ज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें आणि मन, बुद्धि व अहंकार याचा समन्वय. महाकारण महामाया अथवा त्रिगुणाची साम्यवस्था. जीअष्टधा प्रकृतीच्या समवायाला जीव ही संज्ञा. परंतु मूळच्या सोळा कला असतांहि त्या सर्वांना संजीवनी देणारी ती सत्रावी अथवा जीवन कला, ज्ञान कला.

अवसेचिये दिवसीं। सतराविये अंशीं।
स्वयें जैसें शशी। रिगणें होय॥

अमृतानुभव ७:१५३

या संबंधांत ज्ञानेश्वरांच्या ओव्या अशा आहेत—

तरी अवधारी गा धनंजया। हे महदादिक माझी माया॥
जैसी प्रतिबिंबे छाया। निजांगाची॥
आणि इये ते प्रकृति म्हणिजे। जे अष्टधा जाणिजे॥
लोकत्रय निपजे। इयेस्तव॥
या आठांची जे सामावस्था। ते माझी प्रकृति पार्था।
तिये नाम अवस्था। जीव ऐसी॥
जे जडातें जीववी। चेतनेतें चेतवी।
मनाकरवी मानवी। शोक मोह॥
पैं बुद्धीच्या अंगीं जाणणें। ते जियें जवळिकेचें करणें।
जया अहंकाराचें बिंदाणें। जगचि धरिजे॥
ते सूक्ष्म प्रकृति कोडें। जे स्थूलाचिया अंगा घडे।
तैं भूतसृष्टीची पडे। टाकसाळ॥

शाहिराची सारिणी या ओव्यांशीं ताडून पाहण्यासारखी आहे. कवनाचा शेवट असा आहे—

ऐसा प्रकृति पुरुष पहाता अभिन्नच निर्मळसार।
प्रकृतिवाचुन पुरुष कैसा आहे करा विचार।
होती वेगळी तर करून दावावा सीनाकार।
कविराज हैबती शरण संताच्या चरणाला।
कृपाहस्त सिद्ध आहे संभाळित नित्य ब्रीदाला॥

अध्यात्मिक सारिणींत अनेक अंगें आहेत. शाहिरी कवनांत त्या अंगांची जपणूक कशी केली आहे, हें पाहणें जरूर आहे. म्हणून त्यांपैकीं आणखी एक अंग दाखविणारें एक कवन थोडयाशा खुलाशासह सांगतों.

महावाक्यें तीन

वाक्यासि जीवि धरिसी, सिद्ध होसी तूं पूर्णपणीं।
सत्‌चित् रूप, आनंद रूप तें स्वरूप पहा नयनीं॥
अस्ति भाति हें कळेल चित्तीं प्रियरूपा हो मिळणी।
परमानंद, आनंदकंद, सच्छिदानंद आनंदपणीं॥
त्याचा पसारा भरला सारा त्याविण थारा नसे भुवनीं।
अस्ति भाति जो का प्रिय। त्याचा पिंडीं कैसा प्रत्यय।
तेंचि सांगतों यथान्वय। दूर करोनिया संशय
बैस पुढें येऊन जरा॥
आत्मज्ञान करी श्रवण। घेई साधुन अर्थ पुरा॥ १

अध्यात्मांत ‘ असणारें ’ तें काय, ‘ भासणारें ’ तें काय, आणि मनुष्याला ‘प्रिय’ व्हावें असें सच्छिदानंद रूप तें काय याचें ज्ञान होणें हें अंतिम. मराठवाड्यांतील देऊळगांव (राजा) येथील संत नागो हा या कवनाचा कर्ता. त्यानें पहिल्या कडव्यांत विषयोपन्यास केला आहे आणि त्याचें स्पष्टीकरण पुढील एकएका कडव्यांत केलें आहे. वाक्यशब्दानें महावाक्याचा निर्देश आहे. अस्ति, भाति हे निव्वळ संस्कृत शब्द कवनांत विवेचनार्थ घेतलेले आहेत. अध्यात्म शास्त्राच्या संस्कृत ग्रंथांत ते योजिले जातात. उदाहरणार्थ, ‘स्पष्टं भाति जगच्चेदमशक्यं तं निरूपणम्’, ‘न भाति नास्ति चेत्येषा द्विविधापि विनश्यति’ हीं विद्यारण्यांच्या पंचदशींतील वचनें सांगता येतील. तसेंच योगवासिष्ठांत जगन्मिथ्या प्रकरणांत संमति श्लोक १७ असा—

अस्ति भाति प्रियं रूपं नामं चेत्यंशपंचकम् ।
जगद्‌धात्र्यं ब्रह्मरूपं जगद्रूपं ततो द्वयम् ॥

रंगनाथी टीकेंत पुढील स्पष्टीकरण आहे—

सत्ता प्रकाश आणि सुख । हे त्र्यात्मक एक ब्रह्म देख ।
जग तें नामरूपात्मक । ऐसें सम्यक् नाम द्वयें ॥

मराठी अध्यात्मिक शाहिरी ही निरर्थक शब्दांचें अवडंबर आहे, कीं त्यांत कांहीं तथ्य आहे, याचा निर्णय झाला पाहिजे. यासाठीं हा उल्लेख केला आहे—

अस्ति म्हणजे आहे पण, सद्रूपपूर्ण सर्वथा ।
स्वप्न जागृतिमध्यें सुषुप्ति त्याची प्रचिती कळे यथा ।
मी निजलों, मी जागा झालों, स्वप्नीं बरळलों वदे तथा ॥
आहेपणा हा जागृतपणा, असें प्रमाणा सत्यकथा ॥
आत्मप्रचिती चिद्‌घन व्याप्ति ज्ञानगभस्ती ये अर्था ।
सद्‌गुरुचरणीं भाव ठेवुनी घेई करोनी स्वार्था ॥
ऐसा आहे जो आपला । चराचरी जो असे संचला ।
तेथें संशय किमपि न उरला । आहेपणा सर्वत्रीं भरला ।
ह्या अस्तित्वें आत्मा खरा ।

अव्यक्त, अलक्ष, निर्गुण, प्रत्यक्ष सगुण हें लक्ष्य ऐक्य धरा ॥ २
चिद्रूप देखणा त्यासी प्रमाणा ध्यानीं आणा सत्वर ।
भाती नाम जे तया विराजे तेचि ऐकावे सविस्तर ॥
स्पर्श, शब्द जो करितसे लुब्ध, रसरूपादि निरंतर ॥
जाणपणा ज्या ज्ञानघना सद्‌गुरु खुणेशीं जीवीधर ॥
मूर्च्छा समाधि न कळे ज्याचि नसता कधिं ज्ञानांकूर ।
गभा जाच न बालतरुण ओळखी ज्ञान जें अमर ।

ऐसे अनंत देह धरिले। उदंड ऐसे कल्पहि झाले।
बहुधा चतुर्युग ही लोटले। अनिर्वाच्य जे अखंड वहिले।
ज्ञान एकले परंपरा ॥
त्रिकालावधि ज्ञान निरवधि, चिद्रूप, आबीजा निस्तरा।

या पदांत निरूपणासाठीं घेतलेल्या अस्ति, भाति, प्रिय या शब्दांपैकीं तिसरा म्हणजे प्रिय हा शब्द चौथ्या कडव्यांत उलगडून सांगितला आहे. मनुष्याला स्वतः-शिवाय म्हणजे आत्मरूपाशिवाय इतर कांहींहि प्रिय नाहीं, हा उपनिषदाचा सिद्धान्त आहे. आत्मा हा सत् म्हणजे चिरंतन असणारा, चित् म्हणजे चैतन्यमय असून आनंद हें त्याचें पर्यवसान आहे, असा वेदान्त शास्त्राच्या अनुभवानें ठरलेला निर्णय आहे. याप्रमाणें संत नागूच्या कवनांतील प्रतिपादन शास्त्रशुद्ध असलें, तरी तें लौकिकी कवन आहे, डफगाणें आहे, तें पंडितांना अर्थात् मान्य होणारें नाहीं, यांत कांहीं आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं. हा प्रकार समर्थांच्या ध्यानीं आलेला होता. ते स्वतः पंडिती व लौकिकी अशा दोन्ही प्रकारांच्या कवनांचे रचनाकार होते. त्यांनींहि डफगाणीं रचलेलीं आहेत. पण तीं पंडितांच्या पुढें म्हणणें व्यर्थ आहे, असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय होता. ' पंडितांपुढें डफगाण शोभा न पावे,' असें दासबोधांत ७ : ९ : १९ येथें म्हटलें आहे. यांतील मर्म ध्यानीं घेऊन शाहिरी कवनाकडे पाहणें जरूर आहे, इतकेंच मला सुचवावयाचें आहे.

अध्यात्मांत सांख्य व योग या दोहोंना सारखेंच महत्त्व आहे, किंबहुना तीं दोन्हीं एकच आहेत, असें स्पष्ट प्रतिपादन आहे. तथापि साधनक्रिया चालू असतांना भिन्नभिन्न नांवें असलेलीं अंगें साधकाला आत्मसात् होणें जरूर. त्याला समुच्चयानें योग अशी संज्ञा आहे. ' योगः कर्मसु कौशलम् ', ही गीतेंतली व्याख्या अथवा ' योगः चित्तवृत्तिनिरोधः ' ही पतंजलीची व्याख्या, फार उच्च कोटींतील आहे. त्यांत इंद्रियांपासून मनाच्या अगदीं शेवटच्या आविष्कारापर्यंत सर्वांवर प्रभुत्व सिद्ध करण्याच्या क्रियेला योग असें नांव पडलें आहे. मत्स्येंद्राच्या शाखेंत त्याची शुद्ध सारिणी सांपडते असें तज्ज्ञ म्हणतात. शाहीर हे नाथपंथी असल्यामुळें त्यांच्या कवनांत या योगमार्गाचा अथवा त्यांच्या भाषेंत बोलावयाचें तर समाधि-मार्गाचा संबंध येणें साहजिक आहे. सातारा प्रांतांतील भिलवडीचा तुरेवाला शाहीर संभु राजू याचा शिष्य गुंडु बाळा याचें एक कवन यापुढें देतों.

पद

ज्ञान खूण सद्गुरुनें मजला दाविली एकान्तीं।
अर्धचंद्र दाविले अर्धांगी अहं सोहं ज्योती ॥ ध्रु० ॥
पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर हे सारे फिरलों।
कोट्यान् कोटी येरझारा घालुनी व्यर्थ त्यांत श्रमलों ॥

कीटक वृक्ष पशुपक्षामधि कांहिं दिवस रमलों।
चौखाणीची धरुनि अवस्था व्यर्थ त्यांत भ्रमलों।
निर्गुण पिता सगुण माता यांची सेवा केली ॥ १ ॥

योगाची जरुरी आत्मज्ञानासाठीं आहे. त्याव्यतिरिक्त जे हेतु ते गौणच नव्हे तर त्याज्य आहेत. म्हणून शाहिर आपल्याला सद्गुरुनें योगमार्गाची शिकवण कशासाठीं व कशा स्थितींत दिली तें मुद्याच्या कलमांचा अनुक्रमवार निर्देश करून सांगत आहे. पहिल्या कडव्यांतील बहुतेक सर्व महत्त्वाचे शब्द अध्यात्माच्या सारिणींत संकेतरूपानें मान्य झालेले आहेत. त्याच्या मागची रूढ भाषेंतील व पौराणिक कथांतील पार्श्वभूमि बाजूस सारून संकेतांतला अभिप्रेत अर्थ ध्यानांत ठेवला म्हणजे घोटाळा उरत नाहीं. ही सूचना अर्थात् अगदीं साधारण वाचकांना उद्देशून दिलेली आहे. अधिकारी वाचकांसाठीं नाहीं. असो. अध्यात्मिक ज्ञान हें सामूहिक रूपानें दिलें जात नाहीं, तर एखाद्या व्यक्तीलाच तें देणें प्रशस्त. त्यांत एकेका व्यक्तीच्या अधिकाराचा विचार आवश्यक असतो, व त्या अधिकाराप्रमाणें त्या शिकवणीचा परिणाम म्हणजे अनुभव कमी अधिक गतीनें होतो, हें शाहिरानें डोळ्यापुढें ठेवून ' एकान्तीं ' हा शब्द योजला आहे. ज्ञान ही प्रत्यक्ष देण्याची वस्तु नसून नुसत्या निर्देशानें जाणीव उत्पन्न करून देणें एवढेंच शक्य असतें. तेंहि येथें स्पष्ट केलें आहे.

अर्धचंद्र—अध्यात्मांत परमात्म्याला सूर्याची व जीवाला चंद्राची संज्ञा देण्याचा संकेत आहे. आत्मरूपाचें स्वतःला दर्शन होतें. अर्थात् तें अर्धे असतें, म्हणून त्या रूपाला अर्धचंद्र म्हणतात.

अर्धांगी—शिवांतच शक्ति समाविष्ट असते. दोन्ही आहेत, म्हणून एकाला अर्ध म्हणावयाचें इतकेंच. वास्तविक कोण कोणाचें अर्ध हें न समजण्यासारखें तें ऐक्यमय आहे. ज्ञानेश्वर म्हणतात—

सार्धं केन कस्यार्धम् शिवयोः समरूपिणः।
ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहः ॥

अहं सोहं तत्त्वमसि या उपनिषदांतील महावाक्यांतिल त्वम् या पदानें निर्दिष्ट झालेला मी आणि तत् या पदानें निर्दिष्ट झालेला सः अथवा तो तो मीच आहें असा अर्थ. पुढील चार चरणांत वर्णिलेली स्थिति, ही मनुष्यजन्माच्या पूर्वींच्या जन्मांतली आहे. पुढें मनुष्यजन्मांत आल्यावर आत्मकल्याणाची इच्छा, जी सर्व मनुष्यांना स्वाभाविक आहे, तिच्या पूर्ततेसाठीं अर्धवट स्थितींत निराकार, निर्गुण असा परमात्मा आणि साकार, सगुण शक्ति यांची पृथक् पृथक् उपासना केली. ती अर्थात् फलद्रूप झाली नाहीं. अशा अवस्थेंत सद्गुरूची गांठ पडली. योग्य मार्ग-दर्शन असल्याखेरीज निर्गुण निराकाराची उपासना व्यर्थ आहे, हें शाहिरांना मान्य आहे. तसेंच केवळ शक्तिरूप असलेल्या दैवतांची उपासना आत्मरूपदर्शनाला

कांहीं मदत करीत नाहीं, असाहि त्यांचा अनुभव आहे. शाहिरांच्या मार्गाविषयींचे गैरसमज दूर होण्यासाठीं हा प्रकार ध्यानीं असणें जरूर आहे.

पूर्वेकडून काढले मजला पश्चिमेस आलों ।
तेथें बुद्धिचा भान उडाला अंधकार पाहुनि भ्यालों ।
गुरुज्ञानाचें अंजन घेऊनि जिताच मेलों ।
वाचें अभिन्न सद्गुरुवाचुनि इतर काय जाणती ॥ २ ॥

पूर्वमार्ग व पश्चिममार्ग या शब्दांनीं अनुक्रमें बहिर्मुख व अंतर्मुख दृष्टि सुचविल्या आहेत. हठयोगांतहि हे शब्द येतात. भ्रूमध्यावरील दृष्टीला पूर्वमार्ग व मानेच्या काड्यामधून जाणाऱ्या वाटेला पश्चिममार्ग अशा संज्ञा आहेत. परंतु शाहिरी कवनांत तो प्रकार अभिप्रेत नसतो. गीतेंत व ज्ञानेश्वरींत (अध्याय ६) सांगितलेला राजयोग शाहिरांनीं स्वीकारलेला आहे. हठयोगांतील निरनिराळ्या प्रकारांचीं आसनें व प्राणायामाचे भसरी वगैरे प्रकार त्यांनीं प्रशस्त मानलेले नाहींत, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. नाथपंथांत पवनावर विजय महत्त्वाचा मानला आहे, पण त्याच्या इतकाच महत्त्वाचा मनोविजय मानला आहे. त्याची पूर्तता म्हणजे ' जिताच मेलों ' ही अवस्था. देहबुद्धीचा पूर्णपणें त्याग हें तिचें पर्यवसान. तुकारामबोवांनीं ही स्थिति सांगितली आहे. ' तुका म्हणे बळी, जीव दिला पायातळी. ' शब्दशः पाहिजे तर समर्थांचें वचन असें आहे—' तुम्ही जितेच मरुन पाहा—मग अमर होऊनी राहा '. ज्ञानेश्वर सांगतात—

ऐसे आपणपा रिगोनि ठाये । मग देहाची वासू न पाहे ।
आणिकचि सुख होऊनि जाये । म्हणौनि विसरे ॥

सद्गुरुवरची अघटित करणी अघटित तें केलें ।
नाहीं तेंच, विपरीत, देहामधि देव दाखविले ॥
खेचरि मुद्रा आरक्तवर्ण दृष्टी न्याहाळे ।
भानुप्रकाश होतां क्षणीं तम निरशून्य गेलें ॥

देहबुद्धीचा विसर पाडण्याची क्रिया पूर्णपणें साधल्यानंतर जो अनुभव येऊं लागतो त्याचें क्रमवार वर्णन सुरु झालें आहे. हठयोगानें साधलेली अवस्था व सहज समाधीनें सिद्ध होणारी अवस्था या दोहींच्या अनुभवांत फरक आहे. पण दोन्ही शाखांत सांकेतिक शब्द एकच आहेत. तम म्हणजे ज्ञानाची अल्पता. त्यालाच अज्ञान असें म्हणतात. भानुप्रकाश म्हणजे ज्ञानोदय. ज्ञानाची विस्मृति मोहादि षड्विकारांच्यामुळें झालेली असते. तें विस्मृतीचें पटल दूर झालें म्हणजे ज्ञान प्रत्ययास येतें.

पूर्वेस गणपती उत्तरेस ब्रह्मा सावित्रीसहित बसले ।
सारजा सरस्वति गणानें गायन मांडियलें ॥

भूचरि मुद्रा नीलवर्ण विष्णु शेषशायी निजले ।
अकस्मात् नारद तंबुरीसहित ठेले ।
सूक्ष्म अवस्था पाहुनि दैवत झाली नेत्रा तृप्ति ॥ ३ ॥
चाचरि मुद्रा श्वेतवर्ण अनहत गजर कैलासभुवनीं ।
वैराग्यवृत्ति धारण शंकर जन दे स्मशानीं ।
अगोचर मुद्रा अलक्ष पहावे श्यामवर्ण नयनीं ।
ब्रह्मांड मंडपांतून निघाले चंद्रसूर्य दोन्ही ।
मोहनिमुद्रा लावुनि पहावा त्रिकूट तिकोनी ।
श्रीहार गोल्हाट औटपीठ ते गेलों ओलांडूनी ।
मध्यें सुषुम्नासंगम प्रयाग यमुना सरस्वती भिळोनी ।
स्नान करूनि मुनिजन बसले आसन घालोनी ।
पंचमुद्रास्थान पाहुनी हरली माझी भ्रांती ॥ ४ ॥

मनाचे बाह्य व्यापार बंद झाले तथापि अंतस्थ संकल्पविकल्पादिक घडामोडी चालू असतात. त्या तीन देवतांच्या निर्देशानें कवीनें सूचित केल्या आहेत. उत्पत्ति, स्थिति व लय हीं तीन कार्यें ब्रह्मा, विष्णु व महेश या देवतांच्या उल्लेखानें सुचविलीं आहेत. अर्थात् तें सर्व आंतल्या आंत म्हणजे अंतःकरणांत चालू आहे. म्हणून दैवतांची 'सूक्ष्म अवस्था' मुद्दाम सांगितली आहे. ती बाह्य जगतांतली जशी नव्हे तशीच स्थूलांतली नव्हे इतका अर्थ आहे. अशा रितीनें बाह्य जगताशीं संबंध सुटला तरी पूर्णपणें मनोव्यापार बंद होण्याच्या अगोदरची तूर्या अवस्था येथें साध्य होत आली आहे.

इडा पिंगळा दोन्ही ओलांडुनी तुर्यामधें जावें ।
कोटि तेजाचें तेज पाहुनी दृष्टी सुखावें ।
चैतन्याचा विचार, चित्कपाट उघडावें ।
सत्रावीसी नमन करूनी उन्मनीस न्याहाळावें ।

यासंबंधांत ज्ञानेश्वरींतील सहाव्या अध्यायांतील ओव्या अवश्य पाहाव्या:—

इडा पिंगळा एकवटती । गाठी तिन्ही सुटती ।
साही पदर फुटती । चक्रांचे हे ॥ २४४
मग शशी आणि भानु । ऐसा कल्पिजे जो अनुमानु ।
वातीवरी पवनू । गिंवसिता न दिसे ॥ २४५
बुद्धीची फुलिका विरे । परिमळू घ्राणीं उरे ।
तोही शक्तिसवें संचरे । मध्यमेमाजी ॥ २४६

आइकें प्राणाचा हातु धरूनी । गगनाची पाउटी करूनी ।
मध्यमेचेनि दादरावरूनी । हृदया आली ॥ २७१

ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।
जया विश्वबीजाचिया कोंभा । साऊली केली ॥ २७२
हें असो, ते कुंडलिनी बाळी । हृदयाआंतु आली ।
तंव अनुहताचा बोली । चावळी ते ॥ २७४
शक्तीचिया आंगा लागलें । बुद्धीचें चैतन्य होतें झालें ।
तें तिनें ऐकलें । आळुमाळु ॥ २७५

मग ते हृदयभूमि पोकळे । जिराली कां एके वेळे ।
तैसें शक्तीचें रूप मावळे । शक्तीचिमाजी ॥ २८७
तेव्हां तरी शक्तीचि म्हणिजे । एरव्ही तो प्राणू केवळ जाणिजे ।
आतां नादबिंदु नेणिजे । कळा ज्योती ॥ २८८
मनाचा हन मारू । कां पवनाचा आधारू ।
ध्यानाचा आदरु । नाहीं ॥ २८९

–ज्ञानेश्वरी ६

उन्मनी अवस्था म्हणजे काय तें ज्ञानेश्वरांनीं या वरच्या दोन (२८८ व २८९) ओव्यांत सांगितलें आहे. कवनांत सत्रावी असा शब्द आला आहे. तो सांकेतिक आहे. जीवाला चंद्राची व शिवाला सूर्याची उपमा देण्यांत येते. चंद्र हा स्वयंप्रकाश नाहीं. त्याचें तेज सूर्याकडून मिळालेलें. या परप्रकाश चंद्राच्या सोळा कला मानल्या आहेत. त्यांहून पलीकडची म्हणजे स्वयंप्रकाश ही सतरावी कला, जीवनकला. चंद्राच्या सोळाही कलांना संजीवन देणारी अशी. निवृत्तिनाथ सांगतात–

' शक्तिकलिका उन्मनी गोल्हार कवळी ।
सत्रावीचे जवळी आत्मा स्वामी । '

उन्मनि पहाता तन्मय झाले, कीं काय बोलावें ।
परब्रह्म निजवस्तु, निरंजन रूप ओळखावें ॥
आपण वस्तु आपण ब्रह्म आण तो आपण एक व्हावें ।
ज्ञानमार्ग अनुभव होण्या सद्‌गुरुला शरण जावें ॥
संभु राजू वस्ताद माझे ज्ञानांजन मूर्ती ।
गुंडु बाळा म्हणे सद्‌गुरुमहिमा वर्णूं किती ॥ ५

या पांच कडव्यांच्या पदांत शाहिरींत रूढ असलेला योगमार्ग सांगितला आहे. तो कोणत्या तरी प्रमाण सारिणीला धरून आहे कीं कसें हें ध्यानीं यावें म्हणून तसे कांहीं आधार दाखविले. वाचकांच्या लक्षांत हें आलें असेल कीं, गेय कवनांत सुटसुटीतपणा आणण्यासाठीं कोठें संक्षेप करावा लागला आहे. तथापि परिभाषा व सारिणी हीं दोन्हीं ज्ञानेश्वरांच्या सारखींच आहेत. तसें असणेंहि

स्वाभाविक आहे. शाहीर मुख्यत्वेंकरून नाथपरंपरेच्या आखाड्यांतले आहेत. या पंथांत ज्ञानमार्गावर व समाधिमार्गावर विशेष भर असल्याची ज्ञानेश्वरांना कशी व किती जाणीव आहे हें ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांतील एका ओवीवरून दिसून येतें.

पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथ संकेतींचा दंशु
परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णू॥

–ज्ञानेश्वरी ६ : २९१

मराठी शाहिरांचा हा प्रवास खांडववनांत इतस्ततः भटकण्यासारखा आहे कीं,

'कोकिळाकलरवाचेनि मिषें। सद्गद बोलवीत जैसे।
वसंत कां प्रवेशे। मद्भक्त आरामीं॥

या ज्ञानेश्वरांच्याच उक्तीप्रमाणें वर्णहीन असे शाहीर परमेश्वराच्या भक्तांच्या उद्यानांत वसंताची बहार पसरविण्यास निमित्तमात्र साधन होत आहेत, याचा विचार होणें जरूर आहे.

अध्यात्मिक शाहिरीची रचना करणारे व गाणारे बहुधा नाथपंथी असतात अशा आशयाचें विधान या प्रकरणांत पूर्वी केलें आहे, आणि थोडासा तपशीलहि तेथें सांगितला आहे. पण हा मुद्दा एवढ्यावर भागविण्यासारखा नाहीं. माझ्या प्रस्तुत लेखनांतलें एक सूत्र असें आहे कीं, शक्य तोंपर्यंत आजच्या घटकेस समाजाच्या जीवनांतला भाग होऊन राहिलेल्या शाहिरीची पीठिका शोधून तिच्या निरनिराळ्या काळांतल्या स्वरूपांचा संबंध दाखविण्याचा प्रयत्न करावयाचा. याला अनुसरून नाथपंथाविषयींहि थोडासा खोल विचार करणें प्राप्त आहे. नाथसांप्रदायाशीं ज्ञानेश्वरांचा संबंध पोहोंचतो आणि मराठी अध्यात्मिक शाहिरींत त्यासंबंधाचें तूर्तच्या कालापुरतें पर्यवसान होतें, हें पूर्वी पाहिलें आहे. पण हा नाथपंथ कांहीं उपटसुंभ्या असा पंथ नाहीं, असें सांगतांना लिहिणाऱ्याच्या चित्तांत कालवाकालव होत आहे. सकल विद्या, कला, वैभव यांचें ऐश्वर्य दीर्घकाल भोगणाऱ्या भारतानें एक हजार वर्षे अंधकाराच्या गर्तेत काल व्यतीत केला ही बाब नाकारतां येत नाहीं. तीच स्थिति नाथपंथाची आहे. एकाकालीं सर्व भरतखंडभर गौरवानें मिरविलेला हा पंथ आज तिरस्करणीय झाला आहे. त्या पंथाच्या इतिहासाच्या शोधाच्या मिषानें भारतांतील तत्त्वज्ञानाच्या विरोधकांनीं म्हणजे कांहीं युरोपियन ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं त्या पंथांतील अधोगत आचारांचीं वर्णनें लिहून भारुडें तयार केलीं आहेत (उ. पाहा Gorakhnath and the Kanphata Yogis by George W. Briggs). यांत या पंथाचा संकलित इतिहास लिहिलेला नाहीं. त्याच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून दिलेली नाहीं. मात्र ज्यापासून साहजिकपणें घृणा उत्पन्न होईल असें मलिन आचारविचारांच्या संस्थांचें व व्यक्तींचें वर्णन भरपूर करून

ठेवलें आहे. सुशिक्षितांना या पुस्तकाचा परिचय आहे. या विषयावर अनेक ग्रंथ हिंदी विद्वानांनीं लिहिलेले आहेत, पण त्यांतलीं वर्णनें तात्त्विक स्वरूपाचीं असल्यामुळें चटकदार नाहींत, आणि कदाचित् या कारणामुळें आमच्या बहुश्रुत वर्गांत त्यांचा प्रसार नाहीं. त्याचा परिणाम असा कीं, नाथपंथाचें वास्तविक स्वरूप दाखविणारा ग्रंथ इंग्रजींत वा मराठींत नाहीं. कोणी कबूल करो अगर न करो, पण महाराष्ट्रांत गेल्या पांच-सहाशें वर्षें रूढ असलेलें अध्यात्मज्ञान नाथपंथाच्याद्वारें आलेलें आहे; आणि हा नाथपंथ म्हणजे ज्ञात अशा अगदीं पुरातन काळापासून सर्वांना मान्य अशा सिद्धांचा पंथ आहे. ज्ञानेश्वरांचा समकालीन—पण मुक्ताबाईचा शिष्य नव्हे असा—वटेश शिष्य चांगदेव नाथपंथाला सिद्धपंथच म्हणतो. *(चांगदेवकृत तत्त्वसार—ओवी ८६५. संपादक: डॉ. ह. रा. दिवेकर, प्रकाशक: प्राच्य ग्रंथ संग्रहालय, उज्जयिनी. ग्रंथ समाप्ति श. १२३४. नगर जिल्ह्यांतील अकोलें तालुक्यांतील हरिश्चंद्रगड हें ग्रंथनिर्मितिचि स्थान. उपलब्ध प्रत मराठवाड्यांतील पाथरी येथील बोपदेव पाठकानें श. १४८३ मध्यें केलेली.)*

हा तपशील सांगण्याचें कारण असें कीं, ज्ञानेश्वरांच्या काळीं, त्यांच्याच परंपरेंतील पण स्वतंत्र असा प्रवाह चालू होता याचा पुरावा ध्यानीं यावा. असे आणखीहि आधार सांपडूं शकतात. दोन्ही चांगदेवांचे गुरु वटेश्वर हे आहेत. तत्त्वसारकर्ता चांगदेव ज्ञानेश्वरांचा अगर त्यांचे गुरु गैनीनाथ यांचा उल्लेख न करतां मच्छिंद्र, चौरंगी, गोरक्ष, चक्रपाणीच्या गुरुस्थानीं असलेल्या मुक्तादेवी योगिनीचा उल्लेख करतो. हीं दोन्हीं नांवें धारण करणारी व्यक्ति ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताई व त्यांचा शेवटचा उपदेश घेणारा चक्रपाणी चांगदेव या असाव्यात. या मुक्तादेवीचें वर्णन ' जे समस्त सिद्ध शिरोमणि ' असें तत्त्वसारांत केलेलें असून चक्रपाणी तिच्या प्रसादानें ज्ञानसिद्ध झाला असें म्हटलें आहे. यानंतर सुमारें ऐंशी नांवें सिद्धांचीं म्हणून दिलीं आहेत. हठयोगदीपिकेंत सुमारें चाळीस नांवें दिलीं आहेत. मध्ययुगीन चरित्रकोशांत ८४ सिद्धांचीं कमीजास्त त्रोटक वर्णनें आहेत. पण तीं कोणत्या ठिकाणच्या यादीवरून घेतलीं हें स्पष्ट होत नाहीं. चांगदेवांच्या नंतरच्या काळांत सिद्ध अगर नाथ उपपद धारण करणाऱ्या पुष्कळच व्यक्ति होऊन गेल्या आहेत. मच्छिंद्र, गोरक्ष, गैनी या नाथांच्या वास्तव्याशीं संबंधित असलेलीं स्थानें महाराष्ट्रांत आहेत. (मच्छेंद्रगड-मठ. त्र्यंबक)

रेवणसिद्धाचें स्थान नगर जिल्ह्यांत नेवाशाजवळ मर्सरगिरीस आहे. याशिवाय शिवदिननाथ, त्याचा गुरु केसरीनाथ, व त्याचा गुरु उद्बोधनाथ, ज्ञानेश्वरशिष्य सत्यामलनाथ, गैनीनाथाचे शिष्य सावंतवाडी—आजगांवचे सोहिरोबानाथ (अंबिये) असे अनेक सिद्धपुरुष नाथ उपपद धारण करणारे महाराष्ट्रांत होऊन गेले आहेत. मुकुंदराजाच्या दोन गुरुपिढ्या रघुनाथ, हरिनाथ अशा आहेत. अशा रीतीनें नाथपंथाचा म्हणजेच सिद्धपंथाचा प्रसार महाराष्ट्रभर गेल्या सातशें-

पेक्षां जास्त काल असल्याचा पुरावा सांपडतो. इ. स. पूर्वीच्या अशोकाच्या शिलालेखांत आरंभीं नमन आहे तें सिद्धांना. त्यानंतर सुमारें आठशें वर्षांनीं लिहिलेल्या पाटणच्या शिलालेखांतहि सिद्धांनाच आरंभीं नमन आहे. ही सिद्धांच्या मान्यतेची परंपरा पुढें तशीच चालू होती. गुरुचरित्र ग्रंथ सिद्ध व नामधारक यांच्यांतील संवादरूपाचा आहे. तेव्हां सिद्ध या उपपदानें कांहीं निश्चित बोध होत होता हें उघड आहे. सिद्ध म्हणजे जीवन्मुक्त, असा अर्थ कोशकार देतात. या सिद्धांनीं ही स्थिति ज्या साधनांनीं प्राप्त करून घेतली त्यांत सांख्य म्हणजेच आत्मज्ञान व योग हीं दोन्हीं होतीं व असतात.

' लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेण योगिनाम् । '

—भगवद्गीता ३ : ३

पण हीं दोन्हीं निरनिराळीं अथवा एकमेकांशीं विसंगत अशीं नसून तत्त्वतः एकच आहेत असा गीतेचा अभिप्राय आहे.

' यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।
एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति । '

—भगवद्गीता ५ : ५

हे दोन श्लोक वैदिक अध्यात्मशास्त्रांतील वादांचें एक मूलस्थान आहे, पण त्यांत शिरण्याचें येथें प्रयोजन नाहीं. साररूपानें दर्शविलेल्या या गूढाचा संबंध आपल्या विषयाशीं लागतो म्हणून त्याचा निर्देश केला आहे. भगवद्गीतेंत याचा उलगडा करून दाखविला आहे. ज्ञानेश्वरांच्या दृष्टीनें

तैसे शब्द ब्रह्म अनंत । जाले सवा लक्ष भारत ।
भारताचें शतें सात । सर्वस्व गीता ।

—ज्ञानेश्वरी १८ : १६६१

म्हणौनि श्रीव्यासाचा हा थोरु । विश्वासि जाला उपकारू ।
जे श्रीकृष्ण उक्ति आकारु । ग्रंथाचा केला ॥ १७०७
आणि तोचि हा मी आतां । श्रीव्यासाचीं पदें पहातां पहातां ।
आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया । १७०८

ज्ञानेश्वरांनीं गीतार्थाचा विस्तार केला तो गुरु निवृत्तिनाथांच्या आज्ञेवरून. त्यांची ज्ञानपरंपरा थेट आदिगुरु शंकरापर्यंत (म्हणजे शिवापर्यंत) पोहोंचते. या ज्ञानप्राप्तीचें वर्णन त्यांनीं ओ. १७५१ ते १७५७ पर्यंत केलेलें आहे. त्या ओव्या अशा—

क्षीरसिंधुपरिसरीं । शक्तीच्या कर्णकुहरीं ।
नेणों कैं श्रीत्रिपुरारी । सांगितलें जें ॥
तें क्षीरकल्लोळाआंतु । मकरोदरीं गुप्तु ।
होता तयाचा हातु । पैठें जालें ॥

–ज्ञानेश्वरी १८

नाथसांप्रदायाचे प्रवर्तक मत्स्येंद्रनाथ यांना ज्ञानप्राप्ति कशी झाली तें येथें सांगितलें आहे. पुराणश्रवणाचा परिपाठ असणाऱ्या लोकांच्या कानांना या वर्णनानें गुदगुल्या होतात, तशाच आत्मज्ञानाच्या मार्गांत थोडासा तरी प्रवेश झालेल्यांनाहि होतात. केवळ भाषाज्ञानी मात्र ' आश्चर्यवत् पश्यति ' अशा स्थितींत राहिला तर तेंहि आश्चर्य नव्हेच. ज्ञानेश्वरांनी येथें अगदीं ' वज्रगुढी ' नव्हे तरी सौम्यशी ' गुढी ' ठेविली आहे. पण तीहि त्यांचे गुरु निवृत्तिनाथ यांनीं उकलून टाकली आहे. या प्रसंगाचें त्यांचें वर्णन असें :—

आदिनाथ उमा बीज प्रकटिलें ।
मच्छिंद्रा लाधलें सहजस्थिती ॥

–अभंग ३३१.

यांतील श्रीत्रिपुरारी–आदिनाथ, शक्ति–उमा, सांगितलें जें बीज प्रकटिलें, या पदांचा समन्वय झाल्यावर शिल्लक राहिलें तें मुख्य गूढ. हें ' बीज ' मच्छेंद्राला सहजस्थितींत लाधलें आहे. ही सहजस्थिति आणि क्षीरकल्लोळ हीं दोन्हीं एकच. या क्षीरकल्लोळाच्या परिसरांत म्हणजे आसमंतात् श्रीत्रिपुरारीनें म्हणजे त्रिगुणातीत शिवानें आपल्या अर्धांगांत असलेल्या उमेच्या म्हणजे शक्तीच्या कानांत सांगितलें. याचा सरळ अर्थ असा शिवाकडून शक्तीच्या मार्फतीनें प्रज्वलित बुद्धीच्या आटोक्यांत आलें. तें प्रथम मकर–म्हणजेच मकाराच्या स्थानीं पोंचलेल्या मत्स्येंद्राला लाधलें. मकार म्हणजे ॐमधील अर्धमात्रा· हें ज्ञानस्फूर्तीचें स्थान. आणि सहजस्थिति म्हणजे निर्विकल्प अवस्था. कोणत्याहि प्रकारच्या बाह्य उपाधींनीं अथवा पूर्वग्रहानें विरहित अशा स्थितींत मत्स्येंद्र गेला तेव्हां त्याला गीतेचें बीज म्हणजे ज्ञान, बुद्धिगम्य स्वरूपांत लाधलें. मकर व मकार यावर थोडी कोटी करण्याला कवीनें अवकाश घेतला आहे. पण आपणांस Rationalist म्हणवून घेणारांवरहि कशी मात केली आहे हें पाहण्यासारखें आहे. या मत्स्येंद्रनाथाच्या सांप्रदायांतले ज्ञानेश्वर. म्हणजे सिद्ध म्हणून ज्यांना भारतांत मान्यता आहे त्यांतलेच एक. सहज अवस्था ही सर्व ज्ञानाच्या संपादनासाठीं अत्यंत महत्त्वाची मानली गेली आहे. भौतिकज्ञानाच्या शाखेंत हा अनुभव येतो. सिद्धपंथांतला इसवी सनाच्या अकराव्या शतकांतला नारोपा म्हणतो :—

अनुभव सहजमा मोल रे जोई ।
चौकोट्टि विमूका जइसो सइसो होई ॥

जइसने आछिले सवइसन अच्छा ।
सहज पथिक जोई भान्तिमाहो वास ॥

सहज सहज ऐशा करिताती गोष्टी ।
परी सहजाची भेटी विरळा जाणे ॥
सहजाचें आवडे विद्याअविद्या तोडी ।
जाणीव नेणीवेची राहूं नेदी बेडी ।
जाणीवा जाणपण नेणिवा नेणपण ।
दोहींच्या विंदानें सहजाचें दर्शन ।
एका जनार्दनी जाणीव जेणीव
सहज चैतन्याची देऊनि ठेला ठेव ॥

—एकनाथ

सहजाची आरती वाद्यांचा गजर
आठरा पद्में वानर करिती बुभुःकार
अयोध्येसी माधवदासा स्वामी आठवा ना विसर ।

—आत्मारामाची आरती

ज्ञानविषयाच्या खोलींत स्वतः बुडी मारून शुद्ध अंतःकरणानें म्हणजेच सहज अवस्थेंत बुद्धीला चालना दिल्यानें उमज पडतो, तसा नुसत्या शब्दांच्या चक्रव्यूहांत फिरत राहिल्यानें पडत नाहीं. सिद्ध कण्हया (इसवी सन नववें शतक) म्हणतो—

आगम वेद पुराणें पंडित मान वहन्ति ।
पक्क सिरिफल अलिय जिम बाहेरित भ्रमयन्ति ।

पक्क्या नारळाच्या बाह्य कवचांवर जसे भुंगे भ्रमण करतात तसे पंडित आज वेद, पुराणें इत्यादींच्या बाह्य स्वरूपांत घोटाळतात. आंत प्रवेश करून रसास्वाद घेत नाहींत असा अर्थ. हा कण्हया कपाली पंथाचा होता. शिवाचा ज्ञाननेत्र कपालांत भ्रूमध्यांत आहे. म्हणून कण्हया हा कपाली म्हणजे ज्ञानमार्गी आहे. (आतां त्या कपाली नांवाची विटंबना झाली आहे.)

नाडिशक्ति दिर धरिस खट्टे ।
अनहा डमरु बाजे बीर नादे ॥
कणह कपाली जोगी पइट अचारे ।
देह न अरी विहरए एकारे ॥

मत्स्येंद्रनाथांच्या नांवाबरोबरच ज्यांच्या नांवाचा उच्चार होतो अशा दोन सिद्धांचीं वचनें वर नमुन्यादाखल दिलीं आहेत. त्यांतला कण्हया हा तेलंगणांतला

रहिवासी पण मगधांत दीर्घकाल राहिलेला. त्याचे अनेक स्त्री-पुरुष शिष्य झाले व ते सिद्धांच्या यादींत स्थान पावले आहेत. नारोपा हा मगधचा, नालंदा विहारांत शिक्षण घेतलेला, त्याची कांहीं ग्रंथरचनाहि आहे. (दोन्ही सिद्धांसाठीं मध्ययुगीन चरित्रकोश–चित्रावकृत पाहावा. उतारे ' कल्याण ' मासिकाच्या वेदान्त विशेषांकांतून घेतलेले आहेत.) सिद्धांची जी यादी तंजूरची म्हणून चरित्रकोशकारांनीं दिली आहे तींत प्रत्येक नांवाच्या शेवटीं पा असें श्रेष्ठपददर्शक उपपद आहे. तें भारतीय नसून तिबेटी आहे. महाराष्ट्रांत तें पद गळतें आणि नाथ किंवा सिद्ध असें पद येतें. जसें–सिद्ध नागेश, सरळसिद्ध, रेवणसिद्ध, वटसिद्धनाथ, सिद्धनाथ–इ. सिद्धेश्वर या नांवानें शिवाची भक्ति करण्याची महाराष्ट्रांतील वैदिक व शैव सांप्रदायांतील जनतेला अत्यंत आवड असते. आळंदी हें पुरातन क्षेत्र, तेथील देवता सिद्धेश्वर. ज्ञानेश्वरांच्या आळंदी येथील समाधिप्रसंगाचें वर्णन करतांना नामदेवांनीं श्रीविठ्ठलाचें ज्ञानेश्वरास आश्वासन म्हणून जें कथन केलें आहे त्यांत सांगितलें आहे कीं––

> आणिक ऐकेरे ज्ञानराजा ।
> जो या सिद्धेश्वरी करी पूजा ।
> तो अंतरंग भक्त पैं माझा ।
> मुक्ती सहजा जाहलीं त्यासी ॥

–समाधिमहिमा ४-७

हें सिद्धेश्वरस्थान आळंदीस तेव्हां होतें आणि आतांहि आहे. ज्ञानेश्वर समाधि घेण्याचा निश्चय करून आळंदीकडे जाण्यास निघाले तेव्हां त्यांच्याविषयीं संतांनीं काढलेले उद्‌गार नामदेवानें नमूद आहेत ते असे––

> संत करिती महाखेद । म्हणती ज्ञानांजन सिद्ध

–स. म. ३ : ३

सिद्धेश्वर नांवाचीं शिवस्थानें महाराष्ट्रांत चहूंकडे आहेत (संगमेश्वर, पुणें, खेड, प्रवरासंगम, सोलापूर). तात्पर्य असें कीं, नाथ सिद्ध योगी या शब्दांनीं अर्थनिष्पत्ति होते ती एकच. यांत दोन हजार वर्षांपूर्वीपासून रूढ असलेल्या संत या नांवाची भर घातली म्हणजे या चारी शब्दांच्या अर्थाविषयीं कोणत्याहि प्रकारची शंका उरत नाहीं. ज्ञानेश्वरांनीं असा उलगडा ' मदालसा ' प्रकरणांत केला आहे. मदालसेनें आपल्या नूतनजन्मा पुत्रास उपदेश केला आहे त्याचें स्वरूप असें––

> तत्त्व हें एकरूप हरिविण नाहीं कोठें ।
> द्वैतभाव न धरीं मनीं, नीट जाय वैकुंठें ॥

हा मार्ग योगियांचा, संत गेले नीट वाटे ।
अभक्त गुंफले येथें, तेही गेले आडवाटे ।।
सनकादिकीं पंथ, हाचि सेविला उपजतां ।
नारदें विचार केला, मग न राहे तो निवांता ।।
गोरक्ष बुझला वेगीं, दडकास हनुमंता ।
अवधूत याचिपरी दत्तामाजी पूर्णता ।।

या पद्यांत ज्ञानेश्वरांनीं निरनिराळ्या महात्म्यांचा उल्लेख केला आहे. पण ते सर्व याच पंथानें गेले असें निश्चित सांगितलें आहे. या सर्वांचा समावेश सिद्धांमध्यें होतो. नाथपंथ ही त्याची एक शाखा आहे. ती ज्ञानयोगी आहे हें लक्षांत घेणें जरूर आहे. तिचा प्रसार इतर शाखांसारखाच महाराष्ट्रांत झालेला होता आणि त्या पंथाची ओळख पटण्यासारख्या खुणा भिन्नभिन्न उपशाखांत सांपडतात. या पंथाच्या उत्पत्ति व विस्तार याविषयीं अजून पूर्ण शोधन झालेलें नाहीं. तथापि हातीं असलेल्या साधनांवरून असें म्हणतां येतें कीं, बौद्ध धर्माच्या पूर्ण उत्कर्षानंतर तो अवनतीला लागला. त्या काळांत या पंथानें स्वीकारलेले विचार व आचार निरनिराळ्या ठिकाणीं उद्‌भवले आणि प्रभावी झाले. त्यांचें एकीकरण म्हणजे नाथपंथ होय, असा समज करून घेतां येतो. महाराष्ट्रांत पूर्वीं कै. डॉ. रा. गो. भांडारकर यांनीं जें कांहीं संशोधन केलें, त्यानंतर खंड पडला होता. सरदार सिरीकरांनीं कांहीं साधनांचें एकीकरण केलें आणि प्रस्तुत काळांत मुंबईचे सुप्रसिद्ध सर्जन डॉ. कैकिणी, एफ्. आर. सी. एस., यांचें संशोधन सुरू आहे. त्याचा परिचय त्यांनीं चार-पांच वर्षांपूर्वीं विविधवृत्तांत चार लेख लिहून करून दिला आहे. आपलें कुल नाथपंथी असल्याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. ते कारवारकडचे आहेत. मराठी अध्यात्मिक शाहिरीवर नाथपंथाची छाप असण्याचीं कारणें दाखविण्यासाठीं हा विस्तार करावा लागला.

आतां या नाथपंथाचे आणि त्या अनुषंगानें अध्यात्मिक शाहिरांचें अध्यत्म ज्ञान काय तें पाहावयाचें. त्याला एक आधार गोरक्षनाथांचे ग्रंथ हा आहे. पण त्यांचें सार ज्ञानेश्वरांनीं मराठींत आपल्या अमृतानुभव ग्रंथांत सांगितलें. त्यांची परंपरा ठरली आहे. तेव्हां ज्ञानाची पीठिकाहि निश्चित आहे. ज्ञानेश्वरींत गीतेचा अनुवाद पूर्ण करतांना आपलें परंपरागत ज्ञानसूत्र ' महेशान्वय संभूतें ' अशा शब्दांनीं आपलें स्वतःचें वर्णन करतांना सांगितलें आहे. त्यावरून हे शिवसांप्रदायी आहेत हें ठरतें. या सांप्रदायाची शिवाद्वैत, शक्तिदर्शन, प्रत्यभिज्ञादर्शन, पाशुपतदर्शन अशीं निरनिराळीं दर्शनें आहेत. ज्ञानेश्वरांनीं ग्राह्य धरलेलें शिवशक्तिदर्शन हें आहे. अमृतानुभवांत आरंभीं पांच संस्कृत श्लोकांत नमन केलें आहे. त्यांत या दर्शनाचें सार आणलें आहे आणि त्याचा अनुवाद पुढें मराठी ओव्यांत केला आहे.

ही शांकरी विद्या म्हणजेच ब्रह्मविद्या अखिल विद्यांमध्यें श्रेष्ठ, साक्षात् आनंद करून देणारी दयाळू व अत्यंत ज्ञानरूप आहे, असें सांगून शिवशक्तीच्या समरूपांत द्वैताचा भास होतो, कारण त्यांचा संबंध अनिर्वचनीय आहे, असा इषारा देऊन नंतर त्या भासाचा निरास करतांना ज्ञानेश्वर म्हणतात--

अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयंतौ मिथस्तराम् ।
तौ वन्दे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥

शिवशक्ति आपलें अद्वैत स्वरूप जें ब्रह्म त्याला परस्परांशीं मथून स्पष्ट दाखवितात. हीं दोघेंहि जगाचीं आदिकारण आहेत. त्यांच्या यथार्थ स्वरूपाच्या प्राप्तीच्या इच्छेनें त्यांना मी वंदन करतों.

यानंतर जगताचा आदि, स्थिति व लय असलेल्या पण जगताची आदि, स्थिति व लय हीं ज्याच्या स्वरूपांत नाहींत अशा शंभूला (परमात्म्याला) वंदन केलें आहे. यानंतर मराठींत व्याख्यान सुरू करतांना याचा खुलासा पुढील ओव्यांत केला आहे--

ऐसी इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ।
तियें वंदिली मिया सूळिकें । देवो देवी ॥ १ ॥
जो प्रियुचि प्राणेश्वरी* । उलथे आवडीचे सरोभरी ।
चारुस्थळीं एकाहारी । एकांगाची ॥ २
आवडीचेनि वेगें । एकमेकांतें गिळितीं अंगें ।
कीं द्वताचेनि पांगें ! उगळिते आहातीं ॥ ३
जे एकचि, नव्हे, एकसरे । दोघां दोन्ही पण नाहीं पुरे ।
काई नेणों साकारें । स्वरूप जिये ॥ ४
कैसी स्वसुखाची आळुकी । जें दोनी पण मिळून एकी ।
नेदितीचि कवतिकीं । एकपण फुटों ॥ ५
हा ठाव वरी वियोग भेडें । जें बाळ जगाएवढें
वियालीं परि न मोडे । दोघुलें पण ॥ ६
आपुलिये अंगीं संसारा । देखिले या चराचरा ।
परि नेदितीच तिसरा । झोंक लागों ॥ ७
जया एक सत्तेचें बैसणें । दोघां एका प्रकाशाचें लेणें ।
जे अनादि एकपणें । नांदती दोघे ॥ ८
भेदू लाजोनि आवडी । येकरसी देत बुडी ।
जो भोग नया ठाव काढी । द्वैताचा जेथें ॥ ९

---

*एका जनार्दनीं प्रकृति प्राणेश्वरी । मिरविती बोहरे एकारपणें

जेणें देवें संपूर्ण देवी। जियेविण कांहीं ना तो गोसावी।
किंबहुना येकोपजीवी। येकमेकांची ॥ १०

या शिवशक्तिस्वरूपाचा अनुवाद शाहिरांनीं आपआपल्या परीनें केला आहे. जत (पूर्वींचें संस्थान) जवळील काराजंगी गांवच्या काशिनाथ शाहिरांचें एक पद पुढें देतों—

पद

आड असे तो पडदा मायेचा चमके समोर विजली।
ब्रह्मरत्नावर घालुनि आवरण पर उपकार केली। ध्रु०।
समर्थाचे सावलीने सांपडे आत्मस्वरूप जीवन। १।
जरि उघडे असते ब्रह्म ते, तयाला न कोणी पुसती।
गुप्त आहे म्हणून तयापाथी सर्व कष्ट करिती॥
सृष्टीला प्रकाश, प्रत्यक्ष दिसतो गभस्ती।
भाव ठेवुनी कोण तयाला नमस्कार करिती॥
असुनि देव प्रत्यक्ष रवि, न तया भजती।
खरे टाकुनि खोटे पाषाण पर्वत पुजिती॥
म्हणून थोर मायेचा उपकार, देती संत मान॥ २॥
देह देऊळ आंत आत्माराम असे तो भगवान।
आत्मस्वरूप न जाणुनी बोलती बहुत ब्रह्मज्ञान॥
हृदय रतिमंदिर, शरीर हें आहे सुंदर भुवन।
पुरुष आत्माराम करी प्रकृति तूं आपलें मन॥
होतां बहुतांचा संग तेथें आनंद वर्षे घन॥ ३॥
निजतत्त्वाठायी मन प्रकृति आत्मस्वरूप रमता।
आत्यंतिक, आनंदी आनंद, ब्रह्मानंद सेविता।
तेव्हां तुम्हासि होईल प्राप्त गुरुकृपा होतां।
गुरु सिद्धेश्वर दिगंबर तुझी दया होता।
आत्मसुखाचा झाला लाभ कृपा तुझी दाता।
दास काशिनाथ अनन्य शरण संतपदीं लीना॥ ४॥

या पदांत फोड करून सांगितलें पाहिजे असें कांहीं नाहीं. पण मायेलाहि महत्त्व कां द्यावयाचें त्याचें विवेचन आहे. हा कवि कलगीवाला म्हणजे माया पक्षाचा आहे हें उघड आहे. ब्रह्माचें ज्ञान करून देतांना श्रुतीलाहि ‘ नेति नेति ’ अशा पद्धतीनें जावें लागलें, त्याच पद्धतीनें एक कलगीवाला कवि मदादेव इराप्पा (मुंबईत फार प्रसिद्ध असा) कसें वर्णन करतो तें दाखवितो—

ब्रह्म ब्रह्म म्हणतां कैक भ्रमामधें फसले ।
ज्यानीं पाहिलें ब्रह्म, तेच ब्रह्म होऊनी बसले । ध्रु० ।
ब्रह्मरूपाचा शोध कराया साधुसंत श्रमले ।
परि ब्रह्माचा अंत लागेना आडब्रह्मी भ्रमले ।
ऋषि, मुनि, दिगंबर आणि चार वर्ण शमले ।
व्यास, शुक, नारद, याज्ञवल्क्यादि दमले ॥
गण, गंधर्व, देव, राक्षस, यक्ष, किन्नर जमले ।
इंद्र, चंद्र, सूर्य, नवग्रह, तारामंडळ खमले ॥
किति देऊं दाखले, कितीक तें असूनही नसले ॥ १

ब्रह्मरूपाचा शोध करणारांत मुख्य असलेल्यांचा निर्देश करून कित्येक असून नसल्यासारखे आहेत असें सांगितलें आहे. आतां अव्याप्ति पद्धतीची व्याख्या कवि कशी करतो तें पाहा.

त्रिगुण, पंचभूतें, अष्टधा, ब्रह्मपदास मुकले ।
ब्रह्मा, विष्णु, हरिहर, रुद्र, शिवशंकर चुकले ॥
आणि प्रकृति, पुरुष, ओंकार, ऐसे तेही झुकले ॥
प्रणवबीज ओंकारांत सारे जीव सुखले ॥

आतां या सर्वांच्या पलीकडचें जें तें कवि कसें सांगतों तें पाहा––

पांच शून्य, ज्योत निरंजन अढळपदीं रुखले ।
परब्रह्म अलक्ष अगोचर, नाहीं तेथुन उखले ॥
त्याच्या पलीकडे निजरूप तें रूप आहे कसलें ।
ब्रह्म नांवानें ब्रह्मप्राप्ति हृदयामधें धरले ॥ २ ॥

या ब्रह्माचें ज्ञान होण्याचा मार्ग कवि सांगतो :––

ब्रह्मज्ञान सद्‌गुरुकृपें श्रवण करले ।
गुरुकृपेला नवविध भक्ति जगामधें भरले ।
भक्तीलागीं शक्ति होणें खरोखर ठरले ॥
ज्यांना नाहीं शक्ति ते तर मागेंच सरले ।
ज्यांच्या अंगीं शक्ति ते भक्ति करूनि तरले ।
शक्ति तेंच महत् ब्रह्म, सर्वांपरि ठसलें ॥ ३ ॥

या शेवटच्या चरणांतील ‘ शक्ति तेंच महत् ब्रह्म ’ या शब्दावरून या पंथाचें मत स्पष्ट होत आहे. चित् व आनंद ज्याच्या ठिकाणीं आहेत त्या ब्रह्मांत म्हणजेच

शिवांत त्याची शक्ति 'एकअंगी' अशी आहे आणि त्यामुळें इच्छा, ज्ञान आणि क्रिया या शक्ति शिवाच्या ठिकाणींच आहेत असा त्यांचा पक्ष आहे.

परास्य शक्तिः त्रिविधैव श्रूयते। स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च ॥

या मताचा विस्तार करून कवि पुढें सांगतो--

आणि तार्किकाचें मत सांगतों ऐका तुरेवाले।
वाचा ब्रह्म, मन ब्रह्म, जिव ब्रह्म जगत्र व्याले ॥
शब्द ब्रह्म, खग ब्रह्म, स्वयम् ब्रह्म झाले।
तारक ब्रह्म, दंडक ब्रह्म किती देऊं ताले ॥
कुंडल ब्रह्म, अर्धचंद्राकार ब्रह्म ध्याले।
बिंदु ब्रह्म, नीलवर्ण, मसुरे जसले ज्यानें पाहिले ॥ ४ ॥

येथें तार्किक या शब्दाकडे लक्ष वेधावेंसें वाटतें. आपला तो सिद्धान्त व दुसऱ्याचा तो केवळ तर्क असें मानण्याची प्रवृत्ति असते, हें सर्वश्रुत आहे. त्या अनुरोधानें तार्किक हा शब्द थोडा उपहासगर्भ अशा अर्थानें कवीनें वापरला आहे. वास्तविक पाहतां तर्क हें एक ज्ञानप्राप्तीचें सर्वमान्य शास्त्रीय साधन आहे आणि त्याच्या मर्यादा कायम ठेवून त्याला महत्त्वहि दिलेलें आहे. कवीनें तो शब्द त्या अर्थाच्या साधनाला अथवा त्याचा अवलंब करणाऱ्या कोणा पक्षाला उद्देशून वापरलेला नाहीं. चतुर्दश ब्रह्माची कल्पना मुळांत छांदोग्य उपनिषदांतली. समर्थांनीं तिचा विस्तार करून साधकानें नामापासून ब्रह्मत्वापर्यंत अवस्था कशा क्रमानें साध्य कराव्या तें सांगितलें आहे. यासंबंधांत पंचदशी ११ : ११ पाहावी. समर्थांची मांडणी अशी--

पहिलें तें शब्द ब्रह्म। दुजें ओमित्येकाक्षरं ब्रह्म।
तिसरें खंब्रह्म। बोलिली श्रुति ॥
चौथें जाण सर्व ब्रह्म। पांचवें चैतन्य ब्रह्म।
सहावें सत्ता ब्रह्म। साक्षी ब्रह्म सातवें ॥
आठवें सगुण ब्रह्म। नववें निगुण ब्रह्म।
दहावें वाच्य ब्रह्म। जाणावें पैं ॥
अनुभव तें अकरावें। आनंद ब्रह्म तें बाराव।
तदाकार तें तरावें। चौदावें अनिर्वाच्य ॥

–दासबोध ७ : १०

नाथपंथाची आध्यात्मिक सारिणी सांगण्याचें काम ज्याच्या उल्लेखावांचून पूर्ण होत नाहीं असा एक भाग सांगण्याचा राहिला. तो म्हणजे 'काश्मीरी' विद्या. या विद्येचें वर्णन वटेश्वरशिष्य चांगदेवानें आपल्या तत्त्वसारग्रंथांत केलें आहे.

तिची निदान रूपरेषा सांगणें जरूर आहे. ती शिवागमा, शिवसूत्र या नांवानें प्रसिद्ध आहे. हीं शिवसूत्रें अद्वैती शिवसांप्रदायिक वसुगुप्ताचार्यांनें ग्रंथरूपानें प्रकट केलीं आहेत. ज्ञानेश्वरांनीं हीं शिवसूत्रें शिरोधार्य मानलीं आहेत. (अमृतानुभव ३:१६). (म्हैसूर ओरिएंटल इन्स्टिट्यूटनें प्रकट केलेल्या शैव परिभाषा या ग्रंथांत हीं मूळ शिवसूत्रें व त्यांवर टीका आहे.)

याच परंपरेंतले अभिनवगुप्ताचार्य यांनीं प्रत्यभिज्ञा इमर्शिनी हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथांत सांख्यांच्या चोवीस तत्त्वांऐवजीं शिवापासून पृथ्वीपर्यंत छत्तीस तत्त्वें मानलीं आहेत. निवृत्तिनाथांच्या आणि ज्ञानेश्वरांच्या अभंगांत छत्तिसांचाच उल्लेख केलेला आहे. अभिनवगुप्ताचार्यांचा साहित्यशास्त्रांतला उच्च दर्जा आतां सर्वमान्य झाला आहे. त्यांनीं केलेली काव्यांतील रसाची चिकित्सा तत्त्वज्ञानावर आधारलेली असल्यामुळें जास्त दृढ आहे. तत्त्वज्ञान आणि साहित्य या दोहोंचा सुंदर मिलाफ या अशा दृढ पायांवर असल्याचें स्पष्ट दिसतें. हें असें कां व्हावें या प्रश्नाचा उलगडा या रीतीनें होऊं शकतो.

अभिनवगुप्ताचार्यांनीं अगदीं बालबोध अशी एक पंधरा श्लोकांची रचना केलेली आहे. ती येथें लागू पडत असल्यानें उतरून घेतों—

ॐ अनस्तमित भारूपस्ते, जसां, तमसामपि ।
य एकोऽन्तर्थदंतश्च तेजांसिच तमांसि च ॥ १ ॥
स एव सर्वभूतानां स्वभावाः परमेश्वरः ।
भावजालं हि तस्यैक शक्तिरीश्वरतामयी ॥ २ ॥
शक्तिश्च शक्तिमद्रूपात् व्यतिरेकं नवांचति ।
तादात्म्यमनयोर्नित्यं वन्हीदाहिकयोरिव ॥ ३ ॥
स एव भैरवो देवो जगत्भरणलक्षणः ।
स्वात्मादर्शे समग्रं हि यच्छक्त्या प्रतिबिंबितम् ॥ ४ ॥
तस्यैवैशा परादेवी स्वरूपामर्शनोत्सुका ।
पूर्णत्वं सर्वभावेषु यस्य नाल्पम् न चाधिकं ॥ ५ ॥
येश देवोऽनया देव्या नित्यं क्रीडारसोत्सुकाः
विचित्रान् सृष्टिसंहारान् विधत्ते युगपद्विभुः ॥ ६ ॥
अतिदुर्घटकारित्वमस्या अनुत्तमेष यत् ।
एतदेव स्वतंत्रमैश्वयम् बोधरूपता ॥ ७ ॥
परिच्छिन्नप्रकाशत्वं जडस्य किल लक्षणं
जडाद्विलक्षणो बोधो यतो न परिमीयते ॥ ८ ॥
एवमस्य स्वतंत्रस्य निजशक्त्युपभेदितः ।
स्वात्मगाः सृष्टिसंहाराः स्वरूपेन संस्थितः ॥ ९ ॥

तेषु वैचित्र्यमत्येतं मूर्ध्वाधास्तिर्यगेव यत् ।
भुवनानि यदौंशाश्च सुखदुःमतिभवः ॥ १० ॥
यदेतस्या परिज्ञानं तत् स्वातंत्र्यं हि वर्णितम् ।
स एव खलु संसारो जडानाम् यो बिभीषिका ॥ ११ ॥
तद् प्रसादरसादेव गुर्वागमत एव वा ।
शास्त्रात् वा परमेशस्य यस्मात् कस्मात् उपागतम् ॥ १२ ॥
यत्तत्त्वस्य परिज्ञानं स मोक्षदा परमेशता ।
तत्पूर्णत्वं प्रबुद्धानाम् जीवन्मुक्तिश्च सा स्मृतः ॥ १३ ॥
एतो बंधविमोक्षौ च परमेशः स्वरूपतः ।
न भिद्येते न भेदोहि तत्त्वतः परमेश्वरे ॥ १४ ॥
इत्यमिच्छा–कलाज्ञान, शक्तिशूलाम्बुजाश्रितः ।
भैरवः सर्वभावानाम् स्वभावः परिशीलयेत् ॥ १५ ॥
सुकुमारमतिशिष्यां प्रबोधयितुमंजसा
इमेऽभिनवगुप्तेन श्लोकाः पंचदशोदितः ॥ १६ ॥

शाहिरांत तुरेवाले आणि कलगीवाले असे दोन पक्ष दिसतात; इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्षांत ते आहेत. तुरेवाला पक्ष आणि कलगीवाला पक्ष या दोहोंचें अंतिम एकच म्हणजे परब्रह्म हें आहे; पण अज्ञानजनांची समजूत घालण्यासाठीं द्वैताचा आश्रय करून सिद्धान्त समजावून देण्याची ज्ञात्यांची पद्धति आहे. परमात्मतत्त्वाला महाराष्ट्रांत—विशेषतः ग्रामीण विभागांत—शिवशक्ति असें नांव रूढ आहे; पण त्यायोगानें मूळ अद्वैत सिद्धान्ताला सोडून ही शाहिरांची कांहींतरी चर्पटपंजरी आहे असें मानण्याला आधार नाहीं. तुरेवाला शिवशक्तीलाच मानणारा आहे; पण शक्तीवर म्हणजेच मायेवर विवेचनापुरता का होईना, भर दिल्यानें मूळ अद्वैताची निष्ठा ढळेल, असा विचार मनांत धरून, तुरेवाला पक्ष कलगीवाल्याची झाडणी करीत असतो. त्याचा नमुना खालीं देत आहे. हें पद रामा नरू या शाहिराचा शिष्य संभु राजू, राहणार भिलवडी, जि. सातारा याचें आहे. याची समाधि तेथून जवळच इस्लामपूर येथें आहे. दक्षिण महाराष्ट्रांतील सर्व तुरेवाले याला अग्रगण्य मानतात. तें पद असें—

परब्रह्म निजवस्तु परात्पर सोहं ध्वनि उमटे ।
तेंच ज्ञान या जगीं नराला खरें कीं खोटें ॥ ध्रु० ॥
नादासाठीं केवळ ईश्वरतनु शिवशक्ति मिळुनी ।
पुरुष असुनी पात्र मायेला इच्छा अमर ध्वनीं ॥
मतांतरें स्थापन केलीं वेद चतुरवाणी ।
नाहीं लागला अंतस्वरूपीं, मनश्चंद्रधरणी ॥
माप त्रिकुटी कांहीं कळेना क्रियाकर्म मोठें ॥ १ ॥

ध्वनी म्हणुनी कांहीं वस्तु नाहीं फक्त नादाकार ।
नाद गेला नवद्वारें ब्रह्मरंध्रांत तत्त्वाकार ।
कर्मासारखा गुण इंद्रियास तया विकार ।
ब्रह्मांड तीच कुंडलिनी पिंडीं झाली साकार ॥
आतां तरी हा योग नराला नारायण भेटे ॥ २ ॥
पंचमार्ग म्हणतात बिंदूचे प्रणवगुणवृत्त ।
तया अनुभव स्थळास राहाणें याच प्रक्षणांत ।
रामानरुला वर्म ठावें, प्रसन्न आदीनाथ ।
संभुराजुनें तेंच तुम्हाला केलें अनश्रुत ।
यांत मार्ग कोणता विचारला ते किती फाटे ॥ ३ ॥

या पदांत उलगडून सांगितलें पाहिजे, असें विशेष कांहीं नाहीं; तथापि सोहं–ध्वनी, शिवशक्ति, पिंडीं–ब्रह्मांडीं हे शब्दप्रयोग अध्यात्मशास्त्रांत सर्वमान्य आहे. शिवशक्ति असा शब्दप्रयोग या पदांतहि आहे, हें ध्यानांत घेणें जरूर आहे. नाथपंथाची अशी निराळी कांहीं अध्यात्मसारिणी मी यांत दाखवीन, अशी अपेक्षा कोणाची असेल तर ती पूर्ण झाली नाहीं हें मला मान्य आहे. नाथपंथांत ज्ञान, योग आणि भक्ति या तिहींचा सारखाच आदर आहे. किंबहुना यांपैकीं कोणतें एक दृढ झाल्यास बाकीचीं दोन्हीं आपोआप साध्य होतात असा या शास्त्रांतला सिद्धान्त आहे. म्हणून श्रुतिप्रणीत सिद्धान्ताहून निराळें असें कांहीं शास्त्र नाथपंथानें निर्माण केलें नाहीं, म्हणून तें निराळें शास्त्र दाखविण्याला अवकाश नाहीं. आत्मस्वरूपाचें ज्ञान आत्मस्वरूप व परमात्मतत्त्व यांची अभिन्नता अंतःकरणांत ठसणें, यालाच जीवब्रह्मैक्य असें शास्त्रांत म्हटलें आहे. त्या अनुरोधानेंच नाथपंथानें आपलें कार्य चालविलें, आणि त्याचाच अनुवाद शाहिरानें केला आहे.

आतां दुसरा शब्द योग. यासंबंधांत हठयोग प्रथम डोळ्यांसमोर येतो; पण त्यांतहि विचक्षणेची जरुरी आहे. हटयोग हा अगदीं मूढांच्यासाठीं सांगितलेला केवळ प्राथमिक मार्ग आहे. आणि अनेक प्रसंगीं तो कृत्रिम प्रयोग, मूळचा हेतु बाजूस राहून कांहीं चुकीच्या क्रियेमुळें फसला, तर साधकाला एक तर निरंतरचा शारीरिक अपाय होऊन बसतो; किंवा त्याहूनहि वाईट म्हणजे बुद्धिभ्रंश होतो. हटयोगांत प्रवीण झालेल्यांना कांहीं सिद्धि प्राप्त होतात, पण त्याचा मूळच्या अपेक्षेशीं कांहींहि संबंध असत नाहीं. लोकांना ते चमत्कार वाटतात म्हणून तोच गारुडीप्रकार करून दाखवीत. फिरण्याकडे साधक आकर्षित होतो व त्यामुळें मान्यताहि मिळवितो; पण या केवळ लौकिकी प्रकारामुळें साधकाची आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गांतील प्रगति खुंटते. यालाच मी बुद्धिभ्रंश असें म्हणतों. महाराष्ट्रांत नाथपंथप्रणीत जो योगमार्ग ज्ञानेश्वरादिकांनीं प्रचलित केला तो सहजसमाधि योग होय; हठयोग नव्हे. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत जें वर्णन आहे तें या सहज-

समाधि योगाचें आहे हें सूक्ष्म अवलोकनानंतर ध्यानीं येईल. प्रक्रिया आणि परिभाषा या दोनच बाबी पाहिल्या तर गोरक्षशतक, हठयोगदीपिका आणि पातंजलयोग यांत फरक आढळणार नाहीं. गुंडुबाळाचें समाधिमार्गावरचें एक पद यापूर्वी कांहीं तपशिलानें समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे. या पदांतहि प्रतिक्रिया तीच आहे व परिभाषाहि तीच आहे; पण मूळ मुद्द्यावरून दृष्टि ढळूं न देण्याची इच्छा आहे. केवळ हठयोगानें आणि त्यांतून उद्भवलेल्या तांत्रिक व कौल अशा मार्गांचा अवलंब करून अनेक ऐहिक फायदे जनांना करून देण्याची भुलभुलावणी दाखविणारे महाराष्ट्रांत आहेत; पण अत्यल्प आहेत. त्यांना समाजांत प्रतिष्ठा नाहीं. शैव, शाक्त, गाणपत्य व दत्त या चारी उपपंथांत या वाममार्गांचा अवलंब करणारे गुप्त संघ आहेत; पण सामाजिक सुचिता व नीति या कसांना ते उतरत नसल्यामुळें त्यांना केवळ स्वार्थी आणि भ्रष्ट मनःस्थितींतल्या लोकांतच मान्यता आहे. या विषयाला फक्त एवढाच स्पर्श करून पुढें जावयाचें आहे.

शिवशक्ति या शब्दप्रयोगांतला शिव म्हणजे काय हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून ध्यानीं आलें असेल. नुसता शिव हा शब्द काश्मीरी परंपरेंतील सदाशिव अथवा गीतेमधील पुरुषोत्तम अथवा परात्पर इत्यादि शब्दप्रयोगाशीं समानार्थक आहे, पण तें रूप नासदीय सूक्तांत वर्णन केलेलें तेंच समजावें. तेथें फक्त ज्ञानमय, आनंदमय, निरुपाधिक अशी स्थिति वर्णिली आहे.

☘ ☘

प्रकरण चवथें

मनोरंजक शाहिरी वाङ्मय

आतां मनोरंजक शाहिरीचा परिचय करून घ्यावयाचा आहे. मनोविनोदापासून मनोरंजन निराळें काढणें हें निवळ साहित्यिक दृष्टीनें शास्त्रशुद्ध ठरेल, कीं नाहीं, हें मला माहीत नाहीं. असें असूनहि हा भेद मी जाणूनबुजून करीत आहें. त्याचें कारण सांगणें जरूर आहे. शाहिरी वाङ्मयाचा विचार करणारांनीं असें कांहीं वर्गीकरण केलेलें नाहीं. तसें करण्याची जरुरी त्यांना वाटली नाहीं. त्यांच्या अधिकाराच्या दृष्टीनें त्यांचें करणें योग्य असेलहि. पण मला माझ्या पातळीवरून पाहावें लागतें; आणि मीं पाहिलेल्याचें दर्शन माझ्याच दृष्टीनें लोकांना मला घडवावयाचें आहे. याहून निराळा असा भाग येथें संभवत नाहीं; आणि जरी अट्टाहसानें मी करूं लागलों तरी तो यशस्वी होणार नाहीं, याची जाणीव मला आहे. असो. मनोविनोद आणि मनोरंजन या दोन्ही शब्दांत, म्हणजे त्यांच्या अर्थांत भेद नाहीं. पण वाङ्मयनिर्मिती करणाऱ्यांनीं तो भेद मानला आहे, पाळला आहे. येथें हेतु व कृति या दोन्ही बाबी विचारांत घेण्यासारख्या असतात. म्हणून ' जिथचें तिथें ' या अगदीं व्यावहारिक मराठी म्हणींतल्या मर्माला अनुसरून हा भेद पडला आहे. मनाचा संबंध केवळ इंद्रियांशीं असतो तेव्हां त्याला मन म्हणावें. आणि तेंच मन इंद्रियांशीं असलेला संबंध सोडून, त्यांच्या पलीकडच्या उच्च अशा आत्मस्वरूपाशीं संबंध पावलें म्हणजे त्या मनाचें शुद्ध रूप चित्, तें नंतर चैतन्य रूपांत आत्मस्वरूपाशीं योग पावतें, अशी शास्त्रसारिणी संतांनीं अनुभवानें बसविली आहे. या सारिणीला अनुसरून फक्त इंद्रियांना होणाऱ्या आनंदाचा प्रकार निराळा आणि त्यापलीकडच्या आनंदाचा प्रकार निराळा, असें गृहीत धरून हा भेद मीं पत्करला आहे.

मनोरंजक वाङ्मयांत मी कोणते प्रकार घालणार आहें याविषयीं सांगतांना केलेला भेद मात्र स्थूल आहे. वारादेखील जाण्याला अवकाश नाहीं अशी भिंत या दोहोंत नाहीं, हें लक्षांत ठेवून पुढील लिखाणाकडे पाहावें अशी माझी विनंती आहे. अगोदर भेद सांगितला कां, आणि आतां ही पळवाट शोधण्याची खटपट कां ? असा प्रश्न येणें साहजिक आहे. वास्तविकपणें पाहतां एकंदर वाङ्मयाचा हेतु एकच असावा, तो आरंभींच कै. हरिभाऊ आपटे यांनीं केलेल्या व्याख्येच्या रूपानें सांगितला आहे. शेवट देवाजवळ जाणें हा आहे. म्हणजे देवपराङ्मुख असेल अशा वाङ्मयाचा विचार कर्तव्य नाहीं. मनोविनोदात्मक वाङ्मयांत पहिली कसोटी पूर्णत्वानें लागते; आणि मनोरंजक वाङ्मयाचा विचार करतांना देवपराङ्मुखता नसणें ही कसोटी कायम ठेवून विचार व्हावयाचा. होकाराऐवजीं नकाराचा अभाव हा भाग गौण खराच. पण व्यवहार बऱ्याच प्रमाणांत तसा चालतो. म्हणून तो गृहीत धरून मनोरंजक शाहिरीचा परिचय करून घ्यावयाचा आहे.

आणखी एका मुद्द्याची सूचना मला येथेंच देणें योग्य वाटतें. प्रस्तुतचें लिखाण शाहिरी वाङ्मयाची सामग्र्येंवरून परिचय घडविण्यासाठीं आहे. त्याच्या पूर्णांगाची अथवा कांहीं अंशांची प्रशस्ति करावयाचा हा प्रसंग नाहीं. तसेंच केवळ नालस्तीहि करावयास मी बसलेला नाहीं. माझी भूमिका मुख्यत्वें दर्शकाची आहे, परीक्षकाची नव्हे. एका वाङ्मयस्वरूपाचें छायाचित्र मला दाखवावयाचें आहे, भाषाव्यवहाराचा थोडक्यांत आढावा घेऊन लोकांपुढें मांडावयाचा आहे. सारांश असा कीं, जें जसें होतें तें शक्य तितकें तसेंच दाखवावयाचें आहे. मला वाटतें एखाद्या वाङ्मयाचें आलोडन करण्याचा हाच प्रघात शिष्टसंमत असावा. प्रो. मॅक्डोनेल यांनीं संस्कृत वाङ्मयाचें दर्शन याच पद्धतीनें घडविलेलें असावें.

मनोरंजक शाहिरी वाङ्मयाचें स्वरूप उदाहरणांनीं दाखवितांना कालाचा अनुक्रम आणि विषयांची विविधता या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. कालाचा अनुक्रम ठरवून देतांना अडचणी अनुभवास येतात त्या प्रथमतः साधनांच्या. मनोरंजक शाहिरी कवनें मिळूं शकतात तीं प्रथमतः आठराव्या शतकाच्या उत्तरार्धांतलीं. त्यापूर्वींच्या रचना मिळत नाहींत. म्हणून कित्येक शोधकांना त्यासंबंधांत संभ्रम झाला आहे, किंवा निसरडीं विधानें करून वेळ भागवून न्यावी लागली आहे. पण तसें केल्यानें वाङ्मयाच्या अभ्यासाला योग्य वळण लागत नाहीं. उत्तर पेशवाईचा काल हा महाराष्ट्रीय समाजांत कांहीं विशेष घटना घडत असण्याचा काल होता, आणि त्याचा शेवट राज्यनाशांत झाल्यामुळें या अवनतीचें खापर फोडण्याला मनोरंजक शाहिरी वाङ्मय ही एक जागा झाली आहे. यांत जरी कार्यकारणभाव पुराव्यानिशीं दाखविता आला नाहीं, तरी त्या वाङ्मयप्रकारांतल्या कांहीं उत्तान भागाच्या आधारानें सर्व समाजाची नैतिक पातळी खालावली असल्याचा भास उत्पन्न करण्याचा प्रयत्न झाला आहे, हें निश्चित. आपल्याला

वाङ्मयाची ओळख करून घ्यावयाची आहे, सामूहिक नीतीचें मूल्य ठरवावयाचें नाहीं. तो विचार अन्य प्रसंगांत करण्याचा आहे. तथापि वाङ्मयाचा वापर करणारा समाज त्याच्या उत्पत्तीला आणि वाढीला बऱ्याच अंशानें जबाबदार धरतां येतो, हा मुद्दा दृष्टीआड करतां येत नाहीं. यासंबंधांत मला एक जुनापुराणा दाखला आठवतो. महात्मा गांधींनीं ' गटारतपासनिसाचा अहवाल ' असा शिक्का मारलेल्या कुप्रसिद्ध अशा पुस्तकाची मला आठवण होते. मिस् मेयो नांवाच्या एका ' ढालगज ' बाईनें लिहिलेलें ' मदर इंडिया ' नांवाचें पुस्तक व त्यावरून उठलेलें वादळ आतां जुनें झालें असलें तरी त्यांतलें वर्म ताजें आहे. घाण तेवढी भडकपणें दाखवून दिशाभूल करावयाचा यत्न सकृद्दर्शनीं परिणामकारक होतोसा वाटला तरी तो शेवटीं टिकत नाहीं, एवढेंच मला सांगावयाचें आहे.

मनोरंजक शाहिरी वाङ्मय उत्तर पेशवाईच्या कालांत रूढ असलेलें फक्त आज मिळूं शकतें. एवढ्यावरून त्यापूर्वीं असें वाङ्मय निर्माण होत नव्हतें असा सिद्धान्त निघूं शकत नाहीं. त्या कालांतलें तें वाङ्मय आतां नजरेआड व स्मृतिआड गेलें आहे, इतकाच अर्थ येथें घेतला पाहिजे. शिवकालांतले पोवाडे अगदीं थोडे सांपडतात. त्याला कारणहि तसेंच आहे. या वाङ्मयप्रकाराचा हेतुच प्रचलित राजस कृतींची प्रशस्ति हा आहे; आणि शिवकालांत तसा विशेष आविष्कार प्रत्ययास येण्याचे प्रसंग वारंवार घडूं लागले, म्हणून कवींची त्यांच्यावर नजर गेली, आणि पोवाडे रचले गेले. सारांश इतकाच कीं, कीर्तिकाव्य हें प्रसंगानें निर्माण होतें. मनोरंजक काव्याचा प्रकार याहून निराळा आहे. तें नेहमींच निर्माण व्हावें असें आहे. समाज जसा नेहमींच आहे, तशी त्याची मनोरंजनाची भूक नेहमींचीच आहे. अत्यंत संपन्नता अथवा आत्यंतिक विपत्ति यामुळें त्याच्या निर्मितींत किंवा उपयोगांत फरक पडूं शकेल हें खरें. पण अशी आत्यंतिक सुखावस्था वा दुरावस्था ही नेहमींची बाब नव्हे. सुखांत सुखाचीं साधनें वापरण्याकडे आसक्ति जास्त होऊं शकते तथापि विपत्तींतहि विरंगुळा म्हणून कशाची तरी गरज भासतेच. परकी राजसत्ता असली आणि तीहि घटकोघटकीं प्रत्यक्ष हानिकारक अशी असली, तर समाजाला स्वस्थता लाभूं शकत नाहीं हें खरें. पण त्याची जाणीव, ज्यांच्यावर प्रत्यक्ष परिणाम होतो, त्यांना तीव्रतेनें होते. इतरांना ती जाणीव तितकीशी नसते. यामुळेंच सक्रिय देशभक्त व प्रथम उदासीन पण मागाहून प्रवाहपतित देशभक्त असे लोक असल्याचें दिसून येतें. या लोकांचे सर्व उद्योग विशेष कांहीं होत नसल्यासारखे चालू राहतात. जीवधारण, पोषण, प्रजावृद्धि इत्यादि व्यापार चालू असतांना, म्हणजे देहविषयक सर्व सुखांची इच्छा व तिच्या पूर्तीसाठीं उद्योग हीं चालू असतांना मनोरंजनाला मात्र फाटा दिला गेला होता असें समजतां येत नाहीं. फक्त त्याचीं साधनें आज उपलब्ध नाहींत एवढेंच समजावयाचें. शिवकालांतील

मनोरंजक कवनें सांपडत नाहींत, तेव्हां त्यांचा उगम त्यानंतर झाला असा आशय ज्या विचारांत आहे त्याचा परामर्श हा असा घेतां येतो.

मराठी भाषेचें अगदीं प्रगल्भ असें रूप नवव्या शतकापासूनच्या लेखनांत सांपडतें. अकराव्या बाराव्या शतकांतली उत्तम ग्रंथरचना सिद्ध व प्रसिद्ध आहे. त्यांचा विषय गहन आहे. तो तसा होणें ज्या भाषेच्या शब्दसौष्ठवानें शक्य झालें त्या भाषेंत फक्त मनोविनोदात्मक वाङ्मय निर्माण झालें असें मानणें, त्या भाषेवर अन्याय करणारें ठरलें पाहिजे. या अगदीं पूर्वींच्या केवळ मराठी भाषेच्या स्वरूपाचा आविष्कार होण्यापूर्वीं रूढ असलेल्या महाराष्ट्री नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्राकृत भाषेला तत्कालीन इतर प्राकृत भाषांत मानाचें स्थान होतें. ' प्रकृष्टं प्राकृतं ' असा मान्यतेचा संस्कृत साहित्यकारांनीं शिक्का मारला तो मराठीच्या जननींच्या कपाळीं. अर्थात् विविध अंगांनीं त्या भाषेंतलें साहित्य नटलेलें असल्याचें पाहून हा अभिप्राय दिला गेला असला पाहिजे. प्राकृतांतील मनोरंजक वाङ्मयसुद्धां आतां दुर्मिळ आहे. पण जें उपलब्ध आहे त्यांत काव्यप्रकारांतला अत्युत्तम असा ध्वन्यालोक प्रत्ययास येतो. सारांश इतकाच कीं, मराठी वाङ्मयाची पाहणी करतांना सध्यां रूढ असलेली पद्धति सदोष आहे, पायापुरतें पाहण्याची वृत्ति अन्याय्य आहे हें ध्यानीं यावें.

समाजाच्या नेहमींच्या साहजिक अवस्थेंत वाङ्मयनिर्मिती होणें, हा अटळ भाग आहे. दुरवस्थेंतहि कांहीं विशेष हेतूनें विशेष दृष्टीचें वाङ्मय निर्माण होत असतें हा अगदीं अलीकडचा अनुभव आहे. पण तेवढ्यावरून सरसकट सार्वकालीन असा सिद्धान्त नुसत्या साहित्यिक वा राजकीय दृष्टीनें पाहणाराला मांडतां येत नाहीं. अलीकडे झालेल्या राज्यक्रांतीच्या पूर्वीं असें म्हणजे राज्यक्रांतीला पोषक वा क्षोभक वाङ्मय निर्माण होत होतें हें सिद्ध आहे. तें केवळ मनोरंजक म्हटलें जात नव्हतें. त्यापेक्षां त्याचा दर्जा उच्च होता. तथापि त्याच काळांत काव्यनाटकादि मनोरंजक प्रकार निर्माण होत होते हेंहि तितकेंच खरें आहे. या मनोरंजक प्रकारांतसुद्धां क्रांतिकारक विचारांना साहाय्यक असें विपुल साहित्य तेव्हां निर्माण झालें. त्या दोहोंत बांध घालतां येत नाहीं. उदाहरणें न देतांसुद्धां माझ्या लिहिण्याचा रोख ध्यानीं येण्यासारखा हा स्पष्ट प्रकार आहे. म्हणजे देवगिरीचें स्वराज्य जात असतांना अध्यात्मविद्येचा प्रसार करणारी वाङ्मयनिर्मिती करणारांना जसा दोष देतां येत नाहीं, तसाच उत्तर पेशवाईत मनोरंजक कवनें करणारांवर ताशेरा झोडतां येत नाहीं.

' शाहिरी ' या शब्दानें उत्पन्न होणारे गैरसमज जसे त्या वाङ्मयाच्या परामर्शांत नडतात तसेच ' लावणी ' या शब्दानें उत्पन्न होऊं पाहणारी अपेक्षा अडचणीची होते. त्याचें कारण त्या वाङ्मयप्रकाराशीं समाजांतील सर्व थरांचा सारखाच असलेला पूर्वींचा संबंध तुटला हें आहे. आतां ते संबंध पूर्ववत् जुळ-

विण्याच्या कृत्रिम खटाटोपानें या अडचणी जास्त होत आल्या आहेत. आतां मनोरंजक कवनांचा विचार चालू आहे. त्यापूर्वी मनोविनोदात्मक भागाचा विचार झाला. त्याच्या बाबतींत आरंभापासून अडचण भासली नाहीं. कारण, हल्लींच्या सुशिक्षितांना तो भाग पूर्णपणें अज्ञात होता, हें एक त्या प्रकाराचें सुदैव म्हणावें लागेल. गैरसमज नव्हते, ते दूर करण्याचा प्रसंगहि नव्हता आणि आतां मीं त्याचें दर्शन घडविलें तरी त्या प्रकाराशीं लगट करण्याला कोणी तयार नाहीं. फक्त मराठी वाङ्मयांतला एक चांगला भाग एवढें नमूद करण्याला मला संधि मिळाली. कोणाचाहि चित्तक्षोभ झाला नाहीं. पण मनोरंजक कवनांचें तसें नाहीं. कोणालाहि तीं तशींच्या तशीं समजून घेण्याची इच्छा नाहीं. कारण, त्यांत असे कांहीं गुण आहेत कीं, ज्यांमुळें तीं कवनें कोणाला घृणा उत्पन्न करतात तर कोणाला त्यांतला ‘ ठसका ’ ‘ चटकदारपणा ’ वेड लावतो. हा आतांच्या सुशिक्षितांविषयींचा निर्देश समजावयाचा आहे. ही रचना झाली तेव्हांहि तिच्यापासून दूर राहणारे लोक होतेच. आतांहि तसेच कांहीं लोक दीर्घकालपर्यंत दूर राहिले. दोहोंचें दूर राहण्याचें कारण मात्र एकच आहे. भाषाभिन्नत्व हें तें कारण. पूर्वींच्या दूर राहणारांना संस्कृत भाषेविषयीं अभिमान तर आतांच्यांना इंग्रजीविषयीं आदर. कालिदासाचें अथवा बायरनचें कवन मिटक्या मारून सेवन करणारांना हें न रुचणें अगदीं स्वाभाविक आहे. त्यांत रसिकतेचा तात्त्विक भाग नसून मानीव प्रतिष्ठेचा आहे हें आत्मनिरीक्षण करणाराला कबूल करावें लागेल. नडलें आहे तें येथेंच. कोणी म्हणतात त्या विकसित भाषेंत किती अर्थ सांठविलेला आहे तें पाहणें प्रशस्त. दुसरा म्हणतो चटणीच खावयाची तर ती उपोषणाच्या दिवशींची नुसतें तिखटमीठ घालून शेंगदाण्याची करण्यापेक्षां कांदालसूण घालून खोबऱ्याची करावी. हें रुचि-वैचित्र्य आहे आणि त्यापेक्षांहि थोडें अधिक आहे. एकादशीला कांदालसूण नको, साधी चटणी चालावी. म्हणजे वाङ्मयनिर्मिती ही नित्याची एकादशी, किंवा नित्याची चंपाषष्ठि नव्हे. ती दोन्हीहि आहे व त्यांपेक्षांहि कांहीं अधिक आहे. डाळभाकरी, सांबारेंभात, झुणकारोडगा असें साधारण जनांचें नित्याचें खाद्यहि यांत आहे. पण सणावारी होणारी पुरणपोळी किंवा खीरलाडू अर्थातच आहेत. प्रसंगपरत्वें, अधिकारपरत्वें नित्याचा साधारण परिपाठ सोडून उंच भरारी मारणारें असें वाङ्मयहि यांत आहे. ही लावणीच्या गुणांची साहित्यिक पद्धतीनें केलेली जंत्री नाहीं. पण लावणीचा नानारंगीपणा, बहुढंगीपणा मला सूचित करावयाचा आहे. त्यांत प्रवेशमात्र कोठून करावयाचा हा बिकट प्रश्न आहे. पण तोहि सोडविला पाहिजे.

‘ लावणी ’ ही गेय रचना आहे, पाठ्य नव्हे. म्हणजे ती गाइलेली ऐकली तरच समजेल, वाचून समजणार नाहीं, असें मानावयाचें कारण नाहीं. परिचयाच्या सुरुवातीला तें एक गमक हातीं घेतलेलें आहे इतकेंच. लावणीचें गायन

थोड्या अगर पुष्कळ श्रोत्यांच्या समूहांत होतें. अर्थात् सारस्वताच्या प्रस्तावनेचा संकेत शाहिरांनींहि पाळला आहे. शाहिरी लावणी दीर्घकाव्याच्या अथवा महाकाव्याच्या वर्गांत कधींच पडणार नाहीं. पण त्यांतले संकेत संक्षेपानें पाळणें हें आपलें कर्तव्य आहे असें लावणीकार मानतात. येथें महाकाव्याचा वगैरे जो उल्लेख आहे तो संस्कृत अथवा तद्भूत मराठी भाषेंतील कवितेविषयीं आहे हें पक्कें ध्यानांत पाहिजे. तदितर भाषांत काय संकेत आहेत त्याचा विचार येथें नाहीं. हा तौलनिक विचार नाहीं. शाहिरी कवनांचा यथातथ्य अभ्यास झाल्यावर तसा विचार करण्याचा उपक्रम कोणीं केल्यास तेव्हां तो भाग आवश्यक ठरेल. असो.

मराठी सारस्वताची सुरुवात गणेशशारदावंदनानें करण्याचा प्रघात आहे. तो न पाळतांहि आतां सारस्वताचा उपक्रम होतो, आणि केवळ या न्यूनामुळेंच त्याच्या गुणाला कमीपणा येत नाहीं. असा रूढ प्रकार असतांहि मुक्तेश्वर–वामनांच्या काव्याच्या वाचनांत प्रारंभीं गणेश-शारदावंदन येतें म्हणून आतांच्या सुशिक्षित लोकांना तें खटकत नाहीं, किंवा असेंहि म्हणतां येतें कीं, गणेशवंदनांत कांहीं विशेष असें जेथें कोठें दिसेल तेथें लक्ष जातें व त्यावरून पांडित्यपूर्ण चर्चाहि होते. ज्ञानेश्वरींतल्या गणेशवंदनाचें उदाहरण मनोरंजक साहित्यांतलें असें मानतां येत नाहीं. पण तो आदर्श इतर सर्व मराठी सारस्वतांत मानला गेला आहे. तसाच तो लावणीकारांनींहि मानला आहे. फरक इतकाच कीं, गणेशवंदनाचें निराळें कवन लावणी गायनाच्या कार्यक्रमाच्या सुरुवातीसाठीं रचण्याचा प्रघात आहे. अशा गणेशवंदनाच्या कांहीं कवनांचा आतां परिचय करून द्यावयाचा.

लावणीकारांचा कालानुक्रम लावतांना फक्त सुमारें आठराव्या शतकाचा उत्तरार्ध ते एकोणिसाव्या शतकांतला पूर्वार्ध इतका काल प्रमुखपणें नजरेपुढें येतो. त्यानंतरहि कांहीं लावणीकार उत्तम असे झाले पण ते थोडे आहेत. यामुळें शंभर वर्षांतलें लावणीवाङ्मय विचारासाठीं प्रथम घेतलें जातें. त्यानंतरच्या कवनांचा दर्जा कमी म्हणून नव्हे तर त्यांच्या अनुपलब्धीमुळें तसा प्रकार घडतो. एका कवीचीं कवनें याला अपवाद आहेत व तो कवि म्हणजे पट्ठे बापूराव या नांवानें ओळखला जाणारा कवि श्रीधरपंत रेठरेकर. याची विपुल कविता उपलब्ध आहे व त्या कवनांचा प्रभाव महाराष्ट्रावर सध्यां तरी इतरांपेक्षां अधिक आहे. असें असतांना वर उल्लेखिलेल्या विशिष्ट कालखंडांतील कवनांचे नमुने घेण्याकडे प्रवृत्ति होते ती त्या कालखंडांतील अनेक कवींच्या अंगच्या गुणांमुळें. अनेक कसोट्या ज्यांच्यावर लावतां येतील असा हा कविसमूह या विवक्षित कालांतला आहे. म्हणून ही मर्यादा घालून घेतली आहे. नंतरच्या कवींचा गौरव नंतर यथाक्रम होईल.

गणेशवंदनाला लावणींत नुसतें ' गण ' असें नांव आहे.

' **गंगू हैबती** ' या कवीचा गण असा आहे.

रंग राखि आज महाराज गणपती ॥ ध्रु. ॥

एकदंत वक्रतुंड
हास्यवदन सरळशुंड
फरशांकुश करिं प्रचंड
दुर्वांकुर गंडस्थळिं दिव्य मिरवती ॥ १ ॥

नमूं नाथ आदिविरा
शूळपाणी खड्गधरा
जननमरण नाहीं जरा
शरण त्या मि शंकरास, भावें निश्चिती ॥ २ ॥

टाळ विणे मोरचंग
वाजतात बिन मृदंग
गर्जती कवीजंग
सभारंगणीं गंगू हैबती ॥ ३ ॥

सभेंत लावणी-गायनाच्या कार्यक्रमाला सुरुवात करतांना काव्य व संगीत-कला यांच्या अधिष्ठात्री देवतांना—गणेश व शिव यांना कवीनें नमन केलें आहे व या कार्यक्रमाला रंग येण्यासाठीं त्या देवतांची करुणा भाकली आहे. दोन्ही देवतांचीं रूपें पौराणिक कथांना अनुसरून आहेत. साधारणजनांना या कथा माहीत असतात. यापेक्षां थोडा निराळा असा गण कवि प्रभाकराचा आहे. महाराष्ट्रांत देवतापंचायतन जास्त पूजिलें जातें. भिन्न भिन्न उपासनांचा समन्वय प्रत्यक्ष कृतींत घालण्याच्या हेतूनें आद्य शंकराचार्यांनीं तें चालू केलें असा प्रवाद आहे. प्रभाकर त्या कालाच्या मानानें थोडा जास्त साक्षर असणाऱ्या वर्गांतला म्हणजे ब्राह्मण आहे. संस्कृतमय विद्वत्ता व संस्कृतीच्या उच्च दर्जांतील परिपाठ त्याला विशेष रुचावे हें साहजिक आहे. प्रभाकराच्या गणाचें पहिलें कडवें असें :—

महाराज गौरिनंदना अमरवंदना दैत्यकंदना हे मंगलमूर्ती ।
ठेवी कृपादृष्टि एकदंत दीनावार पुरती ॥
हे स्वयंभु शुभदायका हे गणनायका गीतगायका अढळ दे स्फूर्ति ।
भवसमुद्र जेणेंकरुन सहजगती तरती ॥
दे देवा निरंतर स्मरणींच्या सुखा
दूर करी रे अंतःकरणींच्या दुःखा
जय हेरंबा लंबोदरा स्वरूपसुंदरा स्वामिसहोदरा हें विघ्न निवारी ।
मज रक्षि रक्षि सहकुटुंब सहपरिवारी
हे गणेश हे माधवा हे गौरिधवा लोकबांधवा मित्रतमारी ।
उदयोस्तु अंबे जगदंबे आदिकुमारी ॥

शिव, विष्णु, गणपति, सूर्य व देवी या पांच देवता मिळून झालेल्या पंचायतनाला नमन आहे. पिढ्यान्‌पिढ्या अंगीं मुरलेल्या संस्कृतींत वाढलेल्या कवीला तें करणें जरूर व योग्य वाटलें आहे. देवता म्हणजे अनंतशक्तिपरमेश्वराच्या शक्ति आहेत. त्यांना रूप व नाम देऊन मानवानें त्यांची उपासना करणें अगदीं स्वाभाविक आहे. अंशांच्या समुच्चयानें बनलेल्या पूर्णाची ही उपासना आमच्या संस्कृतींतला एक बहुमोल भाग आहे. त्याचें प्रत्यंतर प्रभाकराच्या या गणांत आलें तर त्यामुळें तो कवि शुद्ध परंपरेचा आदर करणारा आहे असेंच ठरेल. इंग्रजींतला थिऑलजी हा शब्द ह्या व्यवस्थेशीं समानार्थक वाटला तरी तो अपुरा पडतो असें मला सुचवावयाचें आहे.

विस्तारांतून एकत्वांत जाण्याचा हा प्रकार सांगितला. आतां या एकत्वांतून विस्तार कसा झाला हें दाखविणारा प्रकार सांगावयाचा आहे. बापू सगनचा गण असा :—

नमो गणां आदिगणा निर्गुणा संगे सारजा आदिमाया ।
आले सभेसी उभे गाया भक्तजनांला ताराया ॥ ध्रु० ॥
आदिरूप अविनाश नाम आकारासी ते हे आले ।
माया लाघवी रूप धरिलें ।
ब्रह्मा विष्णु महेश त्रिगुण त्यापासून अवघे झाले ।
पूर्णब्रह्म हें प्रकटलें ।
पांचतीस पस्तीस दुर्लभ छत्तिसावें तें आगळें ।
भक्तजनांसी लाधलें ।
सर्व व्यापुनी भरूनी उरले भक्तालागीं अवतरले ।
पूर्ण कृपेची करि छाया, दुष्ट विघ्न आलें ॥ १ ॥

गंगू हैबतीचा गण, त्यानंतरचा प्रभाकराचा गण व आतां बापू सगनचा हा गण यांत एका विशिष्ट दिशेनें चढती कमान असल्याचें दिसून येतें. येथें पुराणांतर्गत वर्णनाशीं शुद्ध तात्त्विक सारिणीशीं जोड लावलेला दिसेल. केवळ मनोरंजनासाठीं कवनें करणारांनीं हा हव्यास कां करावा असा प्रश्न येथें उपस्थित होणें अपरिहार्य आहे, आणि त्याचें कारण तसेंच सयुक्तिक आहे. साहित्याच्या क्षेत्रांत देवदेवता किंवा त्यांच्या यथार्थ रूपाविषयींचें अनुभवसिद्ध तत्त्वज्ञान यांना जागा नाहीं असें मानणाऱ्यांना येथें विस्मय वाटतो व प्रतिकूल पूर्वग्रहामुळें त्यांच्या बुद्धीचा तोल सुटतो. त्याचा परिणाम या प्रकारच्या रचनेविषयीं विकृत ग्रह बळावण्यांत होतो. तो होऊं नये म्हणून हा पाल्हाळ येथें करावा लागत आहे.

यासंबंधांत आणखी एक मुद्दा लक्षांत घेण्यासारखा आहे. त्याचा याच प्रसंगानें निर्देश आणि कांहीं खुलासा करणें इष्ट वाटतें. देवतांच्या नमनांत लावणी-

कारांनीं आध्यात्मिक शास्त्रसारिणीशीं जी लगट केलेली आहे, ती कां? असा हा मुद्दा आहे. येथेंहि पुनः पूर्वग्रहाला बाजूस सारून वास्तविक दृष्टीनें पाहणें जरूर आहे. राज्य कमावलें तेव्हां सर्व समाज एकदम सात्त्विकतेनें भरला आणि राज्य घालविण्याचा प्रसंग आला तेव्हां यच्चयावत् समाज नीतीलाहि पारखा झाला होता. तेव्हां देवदेवतांविषयींचा प्रश्नच काय? ही विचारसरणी या विषयांत पुढें आलेली आहे. प्रश्न बिनतोड आहे. पण एकांगी आहे एवढेंच वाईट आहे. आणि एकांगावरून पूर्णांगाविषयीं प्रतिकूल मतप्रदर्शन शुद्ध बुद्धीचें मानण्यांत येत नाहीं. मनुष्य संकटांत स्वार्थी झाला तर तो अगदीं देवपराङ्मुख झाला असा अतिरेकी सिद्धान्त स्थापित होऊं शकत नाहीं. हल्लीं स्वराज्य झालें आहे. सध्यांच्या समाजाला हा सिद्धान्त अक्षरशः लागू केला तर कसें? दर दिवशीं वृत्तपत्रांचे स्तंभ चोऱ्या, दरोडे, अपहरण इत्यादि अनीतिमान् प्रकारांनीं भरलेले असतात, असा अनुभव आहे, तो कां? असा उलट प्रश्न कां करूं नये? सारांश इतकाच कीं, प्रत्यक्ष राजकीय स्वसत्तेच्या उत्कर्षापकर्षावर समाजांतील रूढ देवविषयक भावनांचा निकष अवलंबून आहे असें निश्चयानें सांगण्यासारखी स्थिति कधींच अनुभवास येत नाहीं. राजकीय तत्त्वज्ञान या विषयापासून दूर ठेवण्याचा प्रघात दिसून येतो त्यांतलें मर्म ध्यानीं यावें. प्रस्तुत वाङ्मयाची पाहणी चालू आहे. तेव्हां त्याला आधारभूत असलेली तत्त्वप्रणाली आणि समाजस्थिति यांचा विचार जरूर केला जावा. म्हणून वर उल्लेखिलेल्या गणांत जें ज्ञान प्रकट झालें आहे त्याचा पाया कोणता आहे. यासाठीं आणखी दोन गणांचीं अवतरणें येथें देतों. जुन्नरचा लावणीकार दुल्लारखमा याचा गण असा :—

ओम् नमो श्रीआदिरूपा, तूं ज्ञानदीपा, करावी कृपा
पूर्ण मजवरती ।
श्रीसिद्धिविनायक नमितो मंगलमूर्ति ॥ ध्रु० ॥

जेजुरीचा राहणारा पण पुण्यास प्रख्यात झालेला शाहीर सगनभाऊ याचा लावणी गायनांतील गण असा.

जय श्रीसिद्धिविनायक तूं ज्ञानदीपारे ।
इच्छा धरितां शक्तिपुढें तूं निर्गुण स्वरूपारे ॥ ध्रु० ॥

आदिगणा, आदिरूपा, ज्ञानदीपा, इत्यादि संबोधनें हीं हल्लीं सर्वसाधारण साक्षरांच्या परिचयांतील नाहींत. सिद्धिविनायक, मंगलमूर्ति हें ज्याचें वर्णन आहे त्याच गणेशाला लागू अशीं हीं संबोधनें आहेत. पुराणांतील कथाप्रसंगांत घटनांवर भर जास्त असतो त्यामुळें ही तात्त्विक परिभाषा कानावर येऊनसुद्धां आकलनांत येत नाहीं. पण कीर्तन, प्रवचन इत्यादिकांच्या श्रवणाचा परिपाठ असणाऱ्या साधारण मनुष्याला त्या परिभाषेचा परिचय झालेला असतो; आणि हाच परिपाठ

वारंवार प्रसंगानें दृढ झाला म्हणजे त्या परिभाषेंतला गूढ भाग चांगला उमजूं लागतो. निदान त्यांत अगदीं भांबावून टाकणारें असें अगम्य अथवा अनाकलनीय असें कांहीं वाटत नाहीं. उलटपक्षीं स्वत:च्या शाब्दिक ज्ञानाविषयींच्या अतिरेकी अहंकारानें भारलेला सुविद्य मनुष्यहि पूर्वग्रहानें पछाडला असला तर त्याला त्याचा परिचय करून घेण्याचीदेखील इच्छा असत नाहीं. आणि त्याचा परिणाम त्यावर निरर्गल ताशेरे मारण्यावर होतो. शाहिरांच्या कवनांवर विचार करणाऱ्यांपैकीं कित्येकांच्याकडून असा प्रमाद घडला आहे. हा माझा अनुभव आहे, म्हणून मी सावधपणाचा इषारा येथें देत आहें. माझी भूमिका शाहिरी वाङ्मयाचें यथार्थदर्शन घडविणाराची आहे, म्हणून यथार्थतेशीं विसंगत असें जेथें कोठें उद्‌भवलेलें असेल तें त्या यथार्थतेला मारक होण्याचा संभव मला दिसला, तर असा इषारा देणें माझें कर्तव्य आहे.

शाहिरी वाङ्मय हें मराठी सारस्वतांतलें एक अंग आहे. विषयभेदामुळें ही जागा त्याला मिळाली नाहीं. त्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांचा विचार प्रारंभीं कांहीं प्रमाणांत केला आहे. पण तो पूर्ण कधींच होणें शक्य नाहीं. विषय, रचनाकार, श्रोते अगर भोक्ते, स्थान, काल, इत्यादि गमकें या भिन्नतेंत असूनहि हें वाङ्मय मराठी सारस्वताशीं अंगांअंगीभावानें स्थिर आहे. सारांश असा कीं, हा कांहीं एक ओवाळून टाकण्यासारखा प्रकार नसून समाजांत त्याला आदर होता आणि तो आदर त्याच्या अंगच्या गुणामुळें त्याला प्राप्त झाला होता. ते गुण त्यानें कोठून संपादन केले हेंहि याच प्रसंगानें पाहून टाकणें बरें होईल.

मनोरंजक शाहिरींतील गणाचा विचार चालू आहे. वर दिलेल्या नमुन्यावरून आध्यात्मिक सारिणीशीं परिचित असलेल्या कवींनीं ही रचना केली आहे एवढें सकृद्दर्शनीं ध्यानीं येतें. आतां फक्त त्या रचनेंतील सरिणीला शास्त्राची कसोटी लावावयाची आहे. यामुळें या रचनेंत हिणकस असेल तें उघडें पडेल, आणि शुद्ध दिसेल त्यावरून शाहिरीवरील अस्पृश्यतेचा दोष आपोआप उडून जाईल. असो. महाराष्ट्रांत शुद्ध आध्यात्मिक सारिणीचे प्रवर्तक ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास असे अनेक संत होऊन गेले. कालानुक्रमानें ज्ञानेश्वर सर्वांत जुने आणि अधिकारानेंहि महाराष्ट्राला गुरुस्थानीं आहेत. त्यांनीं श्रीमद्भभगवद्‌गीतेवर व्याख्यान करतांना बहुधा प्रत्येक अध्यायाच्या आरंभीं नमन केलें आहे. तीं नुसतीं नमनेंदेखील अर्थासकट आत्मसात् केलीं तर इतर शास्त्रग्रंथांचें अवलोकन करण्याची जरूर पडणार नाहीं, इतकीं तीं सूचक व उद्‌बोधक आहेत. प्रथमाध्यायांत नमनाची सुरुवात अशी :–

ओम् नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥

ज्ञानेश्वरांनीं आत्मरूपाला केलेलें हें नमन तीन विशेषणांनीं युक्त आहे. आणि त्यासह चारी चरणांत मिळून ज्याचा निर्देश झाला आहे त्याचें नांव त्यांनीं दुसऱ्या ओवींत सांगितलें आहे व त्याचें सामर्थ्यहि वर्णिलें आहे.

देवा तूंचि गणेशू । सकलार्थमति प्रकाशू ।

आदिगण, आदिरूप, ज्ञानदीप ह्या पदांनीं शाहिरांनीं आपलें कवन नटवलें. त्याचा उगम हा असा आहे. ही उधारउसनवारी तर खरीच; पण चोरी खास नव्हे. जेथून हें सारिणीचें ज्ञान शाहिरांनीं घेतलें त्या रचनाकार संतांना शाहीर पदोपदीं नम्रभावानें वंदन करतात. दुसऱ्याचें ज्ञान स्वतःचें म्हणून दडपून सांगणारे हल्लींचे विद्वान् आणि हे शाहीर यांची तुलना करण्याचा मोह या प्रसंगांत आवरत नाहीं. असो.

लावणी वाङ्मयांतला दुसरा चित्तवेधक प्रकार म्हणजे ‘ गवळण ’ या नांवानें प्रसिद्ध असलेला. जाहीर कार्यक्रमांत गणानंतर ही ‘ गवळण ’ गायिली जाते व नाटक पद्धतीनें संवादाच्या पुस्तीनें रंगविली जाते. सध्यां उपलब्ध असें या गवळणीचें आदिरूप ज्ञानेश्वरांच्या एका गवळणीच्या रूपानें पूर्वीं या लेखनांत नमूद केलेंच आहे. श्रीमत् भागवताच्या दशमस्कंधांत त्याचा उगम आहे. परमेश्वरानें कृष्ण अवतारांत बाल व शिशु या वयांत गोकुळांत जी लीला केली तिचें वर्णन या भागांत येतें. मत्स्यावतारापासून नृसिंहावतारापर्यंतचें पुराणांत वर्णन आहे, तें अगदीं त्रोटक आहे. पुढचे दोन वामन व परशुराम यांचा प्रकार तोच. अवताराचें मुख्य कार्य घडलें त्याचें वर्णन पुराणांत आहे. या पांच अवतारांत कालमानानें अंतर आहे. तें किती तें हल्लींच्या कालगणना रीतीनें सांगतां येत नाहीं. पण त्या त्या अवतारांत धारण केलेला देह पुढें कोठें विसर्जन केला याचा निर्देश कोठेंतरी सांपडतो. परशुराम अवतार व राम अवतार हे दोन्ही समकालीन होते. परशुरामाचें तेज रामाच्या अंगांत प्रविष्ट झालें असा उल्लेख आहे. याचा अर्थ असाहि करतां येतो कीं, कांहीं विशेष कृतीमुळें परशुरामाला अवतारांच्या मालिकेंत स्थान मिळालें. पुढें राम अवतार झाला. त्याच्या हेतूपासूनचें सविस्तर वर्णन पुराणांत व रामायणांत आहे. व्यक्तिमत्त्व आकर्षक पण सात्त्विक होतें, पण जन्म राजकुलांतला असल्याकारणानें रामाच्या बालपणांतील वागणुकीचें सामान्य जनांना दुरूनच कौतुक करतां येत होतें. अशी मर्यादा पडल्यामुळें दशरथाच्या उतारवयांत झालेल्या या पुत्राचें लीलाविषयक होऊं शकणारें चरित्र प्रकट नाहीं. कवींनाहि तसें करतां आलें नाहीं. पण त्यापुढच्या कृष्ण अवताराचा सर्वच प्रकार निराळा आहे. अनेक आश्चर्यकारक घटनांचा प्रभाव लोकांवर परिणामकारक असा जन्मापासूनच सुरू झाला. साधारणजनांत ही असाधारणाची अभिव्यक्ति प्रभावी व्हावी हें साहजिक आहे. श्रीमत् भागवतांतील या अवताराचा हेतु व त्याची पूर्वसूचना हीं बाजूस

ठेवूनहि गोकुळांतील सामान्य जनता या नूतनजन्मा बाळाच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वा-मुळें व त्याच्याशीं संघटन होण्याच्या सुलभतेमुळें, बालकृष्णाच्या शिशुपणांतील जीवन गोपींच्यासारख्या सात्त्विक, प्रेमळ, संसारी स्त्रियांत विशेष आकर्षण उत्पन्न करूं शकलें. या वयांत प्रत्यक्ष यशोदेला म्हणजे कृष्णाच्या पालक मातेला त्याच्या-विषयीं आत्यंतिक अपत्यस्नेहाच्या भावनेंतच रत होऊन राहणें पसंत पडत अस-ल्याचें वर्णन भागवतकारांनीं केलें आहे. मधून मधून अलौकिकपणाच्या खुणा तिला पटत असल्या तरी तो आपला पुत्र म्हणून प्रेमळ मातेची भावना ती कधींहि विसरूं शकल्याचें नमूद नाहीं. अशा परिस्थितींत तान्हा कान्हा व पुढें गोपाळ-कान्हा या दोन्ही अवस्थांतला कृष्ण एक कौतुकाचें केंद्र बनला होता. बालपणांत त्याच्या अलौकिक तेजस्वी लावण्यानें मोहित झालेल्या गोपललना त्याच्याविषयींचें आकर्षण त्याच्या शिशुअवस्थेंत विसरल्या नाहींत. पण कृष्णाचा खाक्याच निराळा होता. त्याला एकतर्फी आदराचें कौतुक समाधान देत नव्हतें. स्वतःचें कांहींतरी आपल्या हालचालींत प्रकट व्हावें व त्यामुळें मूळच्या आदरांत, आकर्षणांत, प्रेमांत भर पडेल अशा पर्यवसानाच्या बालवयसुलभ कृति कृष्ण करीत असे. व्यवहारांत त्या बालपणच्या ' खोड्या ' या नांवानें ओळखल्या जातात आणि देवविषयक लेखनांत त्यांना ' लीला ' असें म्हणतात.

हा ' लीला ' शब्द अध्यात्मशास्त्राप्रमाणें परमेश्वराच्या सृष्टिविषयक हेतूंचा विचार करतांना अगदीं शेवटचा म्हणून वापरला गेला आहे. सृष्टि कां असावी व तिचें सातत्य आहे तसें कां असावें हा प्रश्न सर्व गूढ प्रश्नांत अत्यंत गूढ आहे. वेदान्ताचें उत्तर जें आहे तें परमेश्वराची ' लीला ' असें सांगण्यापलीकडे आणखी कांहीं दाखवूं शकत नाहीं, सुचवूं शकत नाहीं. भारतीय अथवा अन्य देशीय दर्शनांत ' कसें ' या प्रश्नाला अखेरचें उत्तर म्हणून कांहीं प्रतिपादन आहे. त्याची संगति लावतां येते व त्यांतला अखेरचा शब्द म्हणून अध्यात्मशास्त्राचा सिद्धान्त आजपर्यंत कोणीहि ओलांडून जाऊं शकलें नाहीं. ' कां ' या प्रश्नाचें उत्तर ' लीला ' अथवा त्याशीं समानार्थक मानला गेलेला ' स्वभाव ' या शब्दांनीं देण्यापर्यंत मजल गेली आहे. पण या शब्दांचें आकलन करावयाचें तर निराकार निरवयव अशा परतत्त्वावर कर्तृत्वाचा आरोप करावा लागतो. तो त्याला लागू पडत नसल्यामुळें त्याची सत्ता व त्याच्या शक्तीची क्रिया असा सूक्ष्म भेद जाण-ण्यांत वेदान्ताची सुरुवात व समाप्ति हीं दोन्हीं होतात. ही व्यवस्था पत्करण्यानें पुढचा सर्व भाग सुलभ झाला आहे, अवतार शक्य झाला आहे, विभूति सिद्ध झाली आहे.

विभूतीचें सहज कार्य म्हणजे परमब्रह्माची पर्यायानें लीला असा भाग ओघानें आला. आणि या आधारावर कृष्णाच्या रूपानें झालेल्या पूर्णावतारांत बालवयांत दिसून आलेली कृति ' लीला ' या पदवीला पात्र झाली. हा लीला

शब्द महाराष्ट्रीय समाजांत अशा गौरवाच्या अर्थानें फार जुन्या काळापासून रूढ आहे. महानुभावपंथाचे प्रवर्तक ‘ चक्रधर ’ यांच्या चरित्रांत जें कांहीं विशेष सांगण्यासारखें घडलें त्याची नोंद त्यांच्या शिष्यांनीं ‘ लीला ’ या नांवानें केली आहे. अवतारी कृष्णाच्या लीलांच्या वर्णनासाठीं श्रीमद्‌भागवताचा दशम स्कंध खर्ची पडला आहे. मराठी संतवाङ्मयांत या लीलांना महत्त्वाचें स्थान आहे. आकलन होण्याला अवघड अशीं तत्त्वज्ञानविषयक प्रमेयें या प्रसंगाच्या वर्णनांत विशद होतात, असा त्या वाङ्मयाच्या अभ्यासकांचा अनुभव आहे. मात्र तो अभ्यास ‘ सहज ’ मनानें झाला तर हें शक्य होतें. पूर्वग्रहदूषित मनानें तें जमणार नाहीं. भजनांत अशा भारुडरूपी कवनांचा समावेश होतो, पण त्यांचें गायन करण्याला योग्य वेळ संप्रदायानें ठरवून दिली आहे ती भजनसप्ताहाच्या शेवटच्या दिवसाची. दीर्घकालपर्यंत शुद्ध अंतःकरणानें परमेश्वराचें आराधन केल्यावर जवळ जवळ त्याच्याशीं तादात्म्य पावल्यावर लीलांचा शुद्ध अर्थ मनांत बिंबावा अशा हेतूनें ही व्यवस्था झालेली आहे. संतवाङ्मय व त्याच्या अनुरोधानें रचलेलें शाहिरी वाङ्मय या दोहोंमधील या मुद्द्यावर वाचकांचें लक्ष मला दृढपणें वेधावयाचें आहे.

लीलांच्या दर्शनांत किंवा अनुभवांत आनंदाची उत्पत्ति होते. हा आनंदहि त्याज्य नाहीं. सुंदर असून शिव असें जें जें कांहीं प्रतीत होईल त्याचा अनुभव नाकारण्याचा हेतु शास्त्राला मान्य नाहीं. हा अनुभव इंद्रियांच्याद्वारा मनाला येतो आणि मन हें चंचल म्हणून त्याला आपलें कार्य मुळीं करूंच द्यावयाचें नाहीं असा कदापि हेतु नाहीं, फक्त त्यांचें अनिष्ट आहे. इंद्रियाच्या द्वारा होणारी सौंदर्याची प्रचीतिहि मन स्थिर असल्याखेरीज येत नाहीं; आणि स्थिर मन म्हणजेच तादात्म्य. या प्रचीतीला विषयानंद असें नांव शास्त्रीय परिभाषेंत आहे. श्रीविद्यारण्यां-सारख्या अगदीं शांत गंभीर प्रकृतीच्या द्रष्ट्यांनीं यासंबंधांत कांहीं मार्गदर्शन केलें आहे. तें म्हणतात—

अथात्र विषयानंदो ब्रह्मानंदांशरूपभाक्
निरूप्यते द्वारभूततदंशत्वं श्रुतिर्जगौ ॥

—*पंचदशी १५:१*

ब्रह्मानंदाच्या अनुभवाला द्वारभूत होणारा व तदंश असा विषयानंद आहे. मात्र

न घोरासु न मूढासु सुखानुभव ईक्षते ।
शान्तास्वपि क्वचित् कश्चित्सुखातिशय ईक्षताम् ।

तृष्णा, राग, द्वेष इत्यादि गुणांनीं व्याप्त अशा मनाच्या मनुष्याला त्यांनीं घोर असें म्हटलें आहे; आणि संमोह, भय अशा वृत्तींनीं पछाडलेल्यांना मूढ असें

म्हटलें आहे. या दोहोंहून निराळा असा वर्ग म्हणजे वैराग्य, क्षांति आणि औदार्य अशा गुणांनीं युक्त अशा मनाच्या मनुष्यांना विद्यारण्यस्वामींनीं शांत असें विशेषण दिलें आहे. अशा मनुष्यांनीं घेतलेला विषयानंद हा 'ब्रह्मानंदांशरूपभाक्' असा असतो असें त्यांचें सांगणें आहे. सत्ता, चिति व सुख हे ब्रह्माचे स्वभाव आहेत आणि शांत वृतींत होणारी अनुभूति या तिन्हींनीं युक्त असते असें ते म्हणतात. सृष्टिसौंदर्य, चित्र, शिल्प, साहित्य, नाट्य या सर्वांना विषयानंद या सदरांत घालतां येतें. सृष्टीच्या सौंदर्यपूर्ण विस्तारांत परमात्मा सर्वत्र असतोच. त्याचें दर्शन शिवरूपच होणार. श्रुतींचा असा स्पष्ट अभिप्राय आहे.

सूक्ष्मातिसूक्ष्मं कलिलस्य मध्ये
विश्वस्य स्त्रष्टारमनेकरूपम् ।
विश्वस्यैकं परिवेष्टितारम्
ज्ञात्वा शिवं शांतिमत्यंतमेति ॥

—श्वेताश्वरतोपनिषद् ४:१५

शांत मनाला प्राप्त होऊं शकणाऱ्या सुखाची ही सीमा आहे. निराळा राहून पाहणाऱ्याला जें दिसूं शकेल त्या दृश्यापासून होणारा परिणाम शांतिमय असतो. वरील श्रुतींत योजलेला 'कलिल' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. विस्ताराच्या झगझगटांतून सूक्ष्माकडे पाहण्याचा हा प्रसंग. पण तोहि मनांत चैतन्याचा अभाव असल्यामुळें त्याची झेप मर्यादित. खरें परतत्त्व त्यापलीकडे आहे. तें पाहणें म्हणजे तें होणें. त्या स्थितीचें वर्णन नासदीय सूक्तांत आहे. कोणी त्याला सृष्टीची उत्पत्ति झाली त्याची आदि वर्णन करणारें सूक्त असें म्हणतात. पण सृष्टि अनाद्य व अनंत आहे असा सिद्धान्त आहे. त्याला या बोलण्यानें बाध येतो. म्हणून तो विचार दूर सारून ज्यानें त्या अवस्थेचा स्वतः अनुभव घेतला अशा साधकाला आलेला प्रत्यय आहे असें समजावयास पाहिजे. त्या अवस्थेला गेल्यानंतरची स्थिति या सूक्तांत सांगितली आहे ती अशी—

तम आसीत्तमसा गूढमग्रेऽप्रकेतम् सलिलं सर्व मा इदम् ।

—ना. सू. ३

वर उद्धृत केलेल्या मंत्रांत 'कलिल' असा शब्द आहे. या मंत्रांत 'सलिल' असा शब्द आहे. दोन्हींचीं रूपें भिन्न व अर्थहि भिन्न आहेत. कलिल शब्दांत शांत मनाचा निर्देश आहे आणि सलिल शब्दांत चैतन्ययुक्त बुद्धीचा निर्देश आहे. हा परिवर्तित मनाच्या अत्यंत शुद्ध स्वरूपाचाच आविष्कार आहे. या शुद्ध बुद्धीचें आवरण त्या परतत्त्वाला असतें असें नासदीय सूक्त म्हणतें. तेव्हां त्या तत्त्वावर लक्ष नसून तें जाणणाऱ्या बुद्धीचा किंवा जाणिवेचा तो उल्लेख आहे.

त्या बुद्धींत त्या तत्त्वाचा प्रवेश झाला म्हटलें काय किंवा त्या बुद्धीनें तत्त्वाला आवरण केलें म्हटलें काय दोहोंचा अर्थ एकच. कारण, एकरूपताभिन्नत्वाचा निरास हा परिणाम येथें मुख्य आहे. सौंदर्याच्या आनंदाचा उद्भव होण्यासारखी कृति निर्माण करण्यांत कलाकारांची आणि कवींची जणू काय चढाओढच लागलेली असते. मराठी शाहिरांतहि ती होती आणि तींत त्यांनीं कशा आस्थेनें भाग घेतला आहे, हें आतां पाहावयाचें आहे.

बालकृष्ण व त्याची माता यांचा अन्योन्य प्रीतिसंगम हा शाहिरांनीं वर्णिलेला एक सोज्ज्वळ भाग आहे, म्हणूनच तो उपेक्षिला गेला आहे. मला तसें करावयाचें नाहीं. यासाठीं यशोदेचा भाव व्यक्त करणारें एक कवन अंशतः सुरुवातीला देतों :—

म्हणे यशोदा कृष्णाबाई ।
गालबोट लावूं दे दृष्ट तुज होइल करूं काई ॥ ध्रु० ॥
आईक बाळा मेघश्यामा ।
आंगणांत नको जाऊं खेळ ओसरींत गुणधामा ॥
साझिया मानसविश्रामा ।
शब्द बोबडे करून रांगसी पाहूं आत्मारामा ॥
गुंतलें मी तर गृहकामा ।
दुष्ट जवळ घातकी टपतसे कौंस तुझा मामा ॥
आणिक भय दुसरें नाहीं ।
गोकुळांत रहा गुप्त नको करूं लीला सहसा ही ॥ १ ॥
आणवितें मुलें शेजाऱ्याचीं ।
नको बसूं उघडा मध्यें घालू दे तूं आंगडें कुंची ॥
मोड शिरीं कुरळ्या केसाची ।
प्रभा पडे आंगणीं आतसी कुसुमाच्या रंगाची ॥
बाळलेणीं त्यावर उंची ।
यास्तव जपणें मला ऐक ही गोष्ट माझ्या मनची ॥
होती तुज विघ्नें ठाईं ठाईं ।
बाहेर नये जाऊं घरीं राही ॥ २ ॥

आतां यापुढच्या वयांतल्या लीला सुरू झाल्या त्याची गौळणीची प्रतिक्रिया रामजोशी लावणींत वर्णन करतो ती अशी :—

वर्ण सांवळा गडे अंगि फिरस्ता किति हा बेढंगी ॥ ध्रु० ॥
वेणुच्या रवें हृदय फोडी ।
वदाव्या किति याच्या खोडी ।

कोवळ्या मुली पाहुनि गोडी ।
हार कंठीचा झटुन तोडी ।
मुलीच्यावर करतो कुरघोडी ।
आज होरिच्या श्रीरंगी ।
अशाच्या बसुं नये अवलंगी ॥ १ ॥
नंद चांगला भला भाई ।
तशाला सुत ऐसा काई ।
धुंद मातला कठिण गाई ।
खराबा किति याच्या पायीं ।
फंद्या होतो करूनी घाई ।
वळाव्या यानें गोकुळीं गाई ।
नित्य भोंवरा जसा जंगी ।
रांड जातिच्या फिरे संगी ॥ २ ॥

या कवनांत रामजोश्याच्या कवित्वाची व शब्दयोजनेची वानगी मिळूं शकते. गोकुळांत तेव्हां काय प्रकार चालू होता तें बरवर कळूं शकेल असें हें कवन आहे. निरनिराळ्या दृष्टींनीं पांहणाऱ्या शाहिरांनीं हा भाग निरनिराळ्या बाजूंनीं रंगविला आहे. त्यापैकीं रामजोशी शाहिराचा नमुना असा :—

कुंद रदन तनु शाम सुलोचन
कोण बाई मज हा नित्य हाटकी ॥ ध्रु० ॥
मोरमुकुट शिरिं करिं धरि वेणू ।
पीत वसन वनिं चारित धेनू ।
कोण कोठिल गाई मी तर नेणूं ।
धीट खुणावुन वाजवि चुटकी ॥ १ ॥

* * *

याची माझी कधिं ओळख नव्हती ।
काय पीडा आली ही मजभोंवतीं ।
हा परनर आग लागो माझी नवती ।
काय तऱ्हा ' कविराय ' उद्भवली ॥ ३ ॥

ही रचना करतांना कविरायाच्या नजरेपुढें ' जयदेव ' कवीची सुप्रसिद्ध अष्टपदी ' हरे रिह मुग्ध वधूनपरे ' ही नसेल असें मी म्हणूं शकत नाहीं. मूळ संस्कृत कवनाचें कै. ' नाथमाधव ' या सुप्रसिद्ध ललित साहित्यिकानें भाषांतर केलें आहे तें ताडून पाहण्याजोगें आहे :—

हा मुग्ध वधूंचा संग । विलासी दंग । क्रीडाशाली ।
यामधें साजे पहा वनमाळी ॥ ध्रु० ॥
कृष्णाचें कलेवर निळें । वरीं पिवळें । वस्त्र तो नेसे ।
चंदन चर्चित तनु हरिची विलासे ॥
मणि कुंडल मंडित गंडयुगुल उदंड शोभे तैसे ।
गालांत पहा गडे मंद मंद हरि हासे ॥ १ ॥

जयदेवाची वर्णरचना रामजोश्यांच्यापेक्षां कितीतरी पटीनें सरस यांत संशय नाहीं, पण खुणेचे शब्दमात्र तेच आहेत एवढेंच येथें सुचवून ठेवतों.

कृष्णाच्या बालपणाच्या खोड्या अथवा लीला यांचा ज्यांच्याशीं विशेष संबंध येतो असे तीन वर्ग स्पष्ट दिसतात. पहिला वर्ग सवंगड्यांचा. ते सर्व खेळांत त्याचे साथी आहेत. त्यांतहि कोणाची कांहीं तक्रार आहे. श्रीएकनाथांनीं ' **कुस्ना थमालरे थमाल आपुल्या गाई** ' या पदांत ती तक्रार रंगविली आहे. असें असूनहि त्यांचें सहकारित्व कृष्णाला नेहमींच लाभलें आहे. दुसरा वर्ग संसारांत निमग्न अशा प्रौढ स्त्रियांचा. वात्सल्यरसांत साहजिकपणें डुंबणारा हा स्त्रीवर्ग कृष्णासारख्या मोहक बालमूर्तीनें आकर्षित आहे. पण त्यांना आपल्या संसारांत उपयुक्त असें ' गोरस ' आदि धन कृष्ण हरण करतो त्याप्रमाणें चोरून खाल्लेलें अगर सांडलवंड केलेलें पाहवत नाहीं. त्यासाठीं त्यांची यशोदेकडे तक्रार असतेच. पण या धनापेक्षांहि सच्छीलपणाचें धन त्यांना बहुमोलाचें वाटतें आणि म्हणून कृष्ण जेव्हां ' मुग्ध ' मुलीबाळींशीं लगट करतो तेव्हां ती तक्रार तीव्र होते. वर दिलेल्या नमुन्यांत हें स्वच्छ दिसून येईल. शाहीर संसाराचें चित्र रंगवितात हें म्हणणें असें खरें. तिसरा वर्ग मुग्ध वधूंचा आहे. पहिल्या दोहोंत कवींना आपलें चातुर्य दाखविण्याला वाव बेताचा आहे. येथें तो बराच जास्त फावतो. जयदेवासारख्या सगुणभक्तीच्या मार्गांतला संस्कृत कवि काय, किंवा तुकारामबुवां सारखा त्याच मार्गांतला मराठी कवि काय दोघेहि एकाच पातळीवरून कवित्व करतांना दिसतात. या मुग्धावस्थेंतील गोपींचा बालकृष्णाशीं संपर्क कसा येत गेला त्याचा नमुना पुण्याच्या होनाजी शाहिरानें केलेल्या कवनाच्या रूपानें येथें दाखविण्यांत येत आहे :——

राधे हा मुकुंद उचलुनि कडिये घेई घेई ॥ ध्रु० ॥
करुं देईना हा माझा दूधदुभत्यास कांहीं ।
मंथिता दह्यातें धरितो रवि करीं ठाईं ठाईं ।
हरि ही, कदापि नुमजे समजाविल्यास बाई ।
बरा समजावुनि यासी तुझ्या घरीं नेई नेई ॥ १ ॥
हरिसी आनंदें राधा मृदु मृदु बोलविते ।
माझे घरीं चाल कृष्णा दूधभात कालविते ।

पाळण्यांत घालुनि तुजला हालवून निजविते ।
यशोदेसी सोडी कान्हा माझेजवळ येई येई ।

अशा रितीनें कृष्णाला समजावून आपल्या घरीं नेत जाणाऱ्या गोपवधूंना कृष्णाचें आकर्षण मुळापासूनच होतें. आपल्याच संसारांत म्हणजे तज्जन्य सुखांत वा विवंचनेंत मग्न असणाऱ्या पुरुषांच्या बाबतींत ही कोवळिकेची वागणूक शक्य असत नाहीं. संसारी स्त्रिया त्यांच्यापेक्षां जास्त मृदु अंतःकरणाच्या म्हणून कृष्णाचें कौतुक व त्याच्या खोड्यांबद्दल तक्रार अशा मिश्र वागणुकींत असलेल्या दिसतात. मुग्ध गोपींना मात्र प्रथम लागलेली आकर्षणाची चटक पुढें वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या स्त्रीसुलभ जाणिवेमुळें सोडतां येईना व राखतां येईना अशी द्विविध अवस्था झाली. स्त्रीपुरुषसंबंध जाणण्याइतकें कृष्णाचें वय नव्हतें. पण गोपबालिका वयांत येत होत्या, आल्या होत्या. त्यांना तें कृष्णाचें लगट करणें कसेसें वाटे. तें लौकिक दृष्टीनें गैर हें त्यांच्या आयासासवांना उमजत होतें. म्हणून त्यांची यशोदेकडे तशी स्पष्ट तक्रार होत असे. पण गोपबालांना आकर्षण तोडवत नव्हतें ही स्थिति माता यशोदेच्या ध्यानांत येऊन चुकली होती. पण तिचें मातृहृदय कृष्णाच्या कुशलावर केंद्रित झालेलें होतें. कृष्ण चमत्कार करी, त्यामुळें तिच्या वात्सल्यांत आणि त्याच्या कुशलत्वाविषयींच्या काळजींत आणखी भर पडत असे. एका लावणींत तो भाग असा वर्णिला आहे :—

यशोदा शेजारणीला सांगते.

निःसंग जाहला हरि हरि ।
नाहीं ऐकत कांहीं तिळभरी ।
घरधंदा बाई त्यजुन जपावें ।
नित्य उठून कुठवरी ॥ ध्रु० ॥
सुटला पान्हा स्तनीं मज बाई
काय करूं सुंदरी ।
कंस रात्रंदिवस छळ करूं पहातो
दिसतो काळापरी ॥ १ ॥

* * *

गाईसवें नित्य खेळत फिरतो
कुंजवनाभीतरी ॥
गोपाळ गोपी मिरवुनि नाचे
मुखांत मुरली धरी ॥ २ ॥
मुख मला पसरुनि दाखवी
दूध पीत हा हरी ।

ब्रह्मांडाची रचना पहातां
नवल होत अंतरीं ॥ ४ ॥

कृष्णाविषयीं गोपींना जें आकर्षण होतें त्याला त्याचें सुंदर रूप इत्यादि स्वतःचें व्यक्तिमत्त्व कारण होतें, त्यांतच भर घालणारीं आणखी कांहीं बाह्यांगें होतीं. त्यांतच त्याच्या मुरलीवादनाचा समावेश आहे. ध्यानांत घेण्याची बाब अशी आहे कीं, हें मुरलीवादन कृष्णाचें असें खास आहे, अनन्यसाधारण आहे. शंख, वीणा, मृदुंग हीं वाद्यें वाजविण्याचें कार्य एकेका देवतेचें म्हणून संकेतरूपानें प्रसिद्ध आहे. त्यापेक्षां जास्त दृढ असा हा मुरलीचा प्रकार आहे. हा मुरलीध्वनि काढण्याचा अधिकार फक्त कृष्णाचा आहे. कोणीहि देवता तें कार्य करूं शकत नाहीं. कृष्णाच्या अलौकिकत्वाची स्पष्ट खूण हें मुरलीवादन आहे. पण हा गूढ प्रकार सध्यां येथें सांगण्याचा मानस आवरला पाहिजे. कृष्णाच्या संबंधांतलीं गूढें उलगडण्याचा प्रसंग पुढें साधावयाचा आहे. असो.

कृष्ण लौकिक रीतीनें गोवत्सांच्या रंजनासाठीं मुरलीवादन करीत असे. पण त्या मुरलीचा रव गोपस्त्रियांनाहि मोहित करीत होता, असें अगदीं साहजिक स्थितीचें वर्णन भागवतांत आहे. रूपानें डोळे प्रभावित होणें आणि ध्वनीनें कानांवर परिणाम होणें हा आवडींतला भागच आहे. ' कानाआधीं दृष्टि ' हा अनुक्रम सिद्ध आहे, आणि त्याला अनुसरून एकदा पाहून आवडलेलें सौंदर्य पुनः पुनः पाहावें, तसें एकदा ऐकलेला मधुर ध्वनि वारंवार ऐकण्याची इच्छा होणें अगदीं क्रमप्राप्त आहे. ती आवडी चटक लावते आणि ती चटक त्या अनुभवाची इच्छा प्रबळ करते. ही इच्छा धरण्यास लौकिक व्यवहारांतला नियम प्रत्यवाय करूं शकत नाहीं. कारण लौकिक नीतीच्या अथवा संकेताच्या आड ती येत नाहीं. उलट ध्वनि रूपांतल्या सुंदरतेचें अशिव नव्हे असें हें गमक आहे. अर्थातच तें आनंददायी आहे आणि व्यावहारिक निषेधाच्या निर्बंधाचें उल्लंघन होत नसल्या-मुळें सत्‌हि आहे. तिन्ही अंगांनीं युक्त असें हें सौंदर्यदर्शन परमानंदाच्या अनुभवाचें द्वार ठरण्याला कोणताहि प्रत्यवाय नाहीं. गोपींना या आनंदाची चटक लागली ती एका लावणींत कांहीं तपशिलानें वर्णन केली आहे.

मुरलीनें ग मन अवघ्यांचे मोहिलें । सखे बाई ॥ ध्रु० ॥
मृदुमंजुळ वाजवि वेणू मधुसूदन वामन मूर्ति ।
गोपिकांस मोहनी पडली गेली भेदून अंतरिं पुरती ॥
वनिं लगबग धावत जाती कोठली तयांला स्फूर्ति ।
बाई कदंब वृक्षाखाली ।
गोधनें उभीं भवतालीं ।
तत्स्वरूप राधा झाली ।
तिचे मागील पूर्वकमाई ॥ १ ॥

मागें एका लावणींत प्रथम जिचा उल्लेख केला आहे तीच ही राधा. मुरलीच्या वेधानें ती तल्लीन, तत्स्वरूप झाल्याबद्दल ही गोपी तिचें कौतुक करते आहे. तेंहि खरेंच आहे. राधा ही आदर्श गोपी आहे. इतर गोपी तिच्या मार्गानेंच जाणाऱ्या पण मुक्कामास पोंचलेल्या नाहींत. त्या सर्वांच्या पूर्णपणाचें प्रतीक म्हणून राधा आहे. गोपी म्हणते—

मंदिरांत बसले होते विंचरीत आपली वेणी ।
मन चंचल जाहालें गेलें विसरूनि सर्वहि लेणीं ।
घडोघडी मज भ्रांती पडते अशि मुरली कशी घरधेणी ।
संसारीं चित्त जडेना
पतिसेवा कांहीं घडेना
सुखशय्या गडे आवडेना
कोणी उपाय सांगा कांहीं ॥ २ ॥

या कथनांतला रस इरसाल पाडाच्या अंब्यासारखा आहे, म्हणून कोणी त्याचा आस्वाद पसंत करील, तर कोणी तो भडक नाहीं, फिका आहे म्हणून नापसंतहि करील. पक्वतेखेरीज चटकदार माधुरी येत नाहीं हें खरें, पण त्या त्या अवस्थांत क्रमाक्रमानें भरणारी माधुरीहि आदरास पात्र होऊं शकते. या माधुरीची प्रस्तावना अगदीं मोजक्या पण अर्थपूर्ण शब्दांत शाहीर सगनभाऊ अशी करतो. त्याची गोपी म्हणते—

अरे कान्हा वाजवि मुरली तनों तनों ॥ ध्रु० ॥
मंजुळ मुरली मधुर ध्वनि
वाजवी श्रीहरि वृंदावनीं
सुधारसाची उधत्तर ध्वनी ॥ १ ॥
गाई वत्सें चारी कान्हा ।
शोभे मुरली लक्ष्मीरमणा ।
तल्लीन झालों आम्ही व्रजललना ।
रंग अनंता नानापरिचे वाजवी श्रीहरी ॥ २ ॥

या रंगाचें आणखी थोडेंसें प्रकटीकरण शाहीर होनाजीच्या लावणींत असें आहे:—

कुणि ध्यागे मुरली करिचीं ।
शुद्ध विसरले मी घरची ॥ ध्रु० ॥
ऐकुनिया श्रवणीं मुरली ।
भ्रांति नाहीं मज उरली ।

नादें वृत्ति तंव हारली ।
वाजवी माधव परोपरीची ॥ १ ॥

या दोन्ही कडव्यांत चढत्या क्रमाचा आशय स्पष्ट होत आहे. श्रीविद्यारण्यांनीं विषयानंदासाठीं जीं पथ्यें सांगितलीं आहेत तीं तंतोतंत सांभाळणाऱ्या गोपींची स्थिति अधिक दृढ होत चालली आहे. ' सुधारसाची उद्धत्तर ध्वनि ' आणि ' भ्रांति नाहीं मज उरली ' हे शब्दप्रयोग जणू काय पंचदशींतील सिद्धान्ताचीं उदाहरणेंच आहेत. शुद्ध म्हणजेच शांत, शिव. ' उद्धत्तर ' हें रूप पंडितांना खटकण्यासारखें आहे. पण त्याचा वापर करणारा पाठिक पंडित नव्हे पण आत्मज्ञानाच्या परिभाषेशीं संपर्क आलेला आहे हें निश्चित. शाहिरांत असे लोक होते. आणि ते मूळ शब्दांतला अर्थध्वनि आपल्या अडाणी जिभेंतून निघालेल्या अडाणी रूपानें व्यक्त करीत असत. शाहीर अज्ञानदासानें ' उद्धरण ' च्या जागीं उध्राण असें रूप अफझुलखानाच्या पोवाड्यांत वापरलें आहे. सगनभाऊ तर बोलून चालून मुसलमान शिकलगार. सिद्धनाथ राऊळ या नाथपंथी गुरूचा परमार्थमार्गातला शिष्य. लावणींतला त्याचा गुरु बाईचा गोविंदराव. होनाजी हा पिढीजाद लावणी रचनाकार घराण्यांतला. पुण्यांत गवळ्याचा व्यवसाय करणारा लिंगायत शांतलिंग स्वामी या साधूचा शिष्य सातापा याचा नातू. सातापाचा सासरा सुप्रसिद्ध वासकर फडांतला वारकरी आणि जांवई सातापा वरचेवर देहू-आळंदीला जाणारा. अशा या कवींच्या तोंडून निघालेले उद्गार कोणत्या अर्थाचे आहेत याविषयीं वास्तविक भ्रांति पडण्याचें कारण नाहीं.

प्रस्तुत अवलोकन चालू आहे तें मुरलीवरील कवनांचें. मुरलीरव मंजुळ होता आणि म्हणूनच तो वेधक होता. त्यानें गोपींचा मनु वेधला यांत विशेष कांहींच नाहीं. मुरलीला पावा, बांसरी अशीं आणखी नांवें आहेत. हल्लीं रूढ असलेलें अलगुज किंवा फ्ल्यूट म्हणजे मात्र मुरली नव्हे. मुरलीचा मूळचा संकेत निराळा आहे. ती नाकाच्या सरळ रेषेंत धरून वाजविण्याची वस्तु नव्हे, तर आडवी धरून वाजविण्याची आहे. तसेंच तिच्या रचनेंतहि फरक आहे. खरी मुरली फक्त चार स्वरांची आहे, म्हणजे स्वर निघण्यासाठीं तिच्या एका टोंकाला फक्त चार छिद्रें असतात व वारा भरण्यासाठीं दुसऱ्या टोंकाला एक छिद्र असतें. ही चार स्वरांची मुरली म्हणजे सप्तस्वरांचे अलगुज नव्हे हें आतां स्पष्ट होईल. या चार स्वरांत डावीकडून उजवीकडे निषाद, षड्ज, रिषभ व गांधार असा अनुक्रम आहे. हा निषाद-गांधार भाव आहे. जसा षड्जपंचम भाव अथवा मध्यमषड्ज भाव असाच हा निषाद-गांधार भाव आहे. निषाद व गांधार हे मुख्य स्वर येथेंच स्थिर व्हावयाचे; अशा रितानें चार स्वरांत पुनः पुनः आवृत्ति केली तर मुरलीचा रस प्रत्ययास येतो. आळवणी, प्रेमाची हाक, आर्तपणाचा बोध हीं अनुभवास येतात.

वैदिक वाङ्मयांत त्याला उद्गीथ असें नांव आहे. वस्त्रहरणाच्या प्रसंगीं द्रौपदीनें भीष्म-द्रोणादींना उद्देशून केलेलें भाषण गांधारग्रामाची मूर्छना घेत घेत केलें असें वर्णन महाभारतांत आहे. कृष्ण संगीतशास्त्रप्रवीण असा दाखविण्याचा कवींचा हेतु नव्हता, परंतु अंतःकरणाला वेधणारा असा मंजुळ ध्वनि काढणारा बांसरी-वादक होता हें त्यांना मुख्यत्वें सांगावयाचें आहे. तेथें शास्त्रशुद्ध संगीतकलेची महति नाहीं, तर प्रेमळ ध्वनीचें सामर्थ्य प्रकट करण्यावर भर आहे. प्रेम भावाच्या उत्पत्तीचें हें स्थान आहे.

या गांधारग्रामांतील संगीताचा प्रकार गौहरनीबानीचे मरहूम अबदुल-करीमखां यांच्या गाण्यांत प्रभावानें दिसून येत होता हें प्रसिद्ध आहे. त्यांच्या शिष्यांपैकीं ज्यांना त्यांच्या गाण्यांतलें हें वैशिष्ट्य आत्मसात् करतां आलें अशांच्या मैफली कां आणि कशा रंगतात तें सध्यांदेखील अनुभवास येऊं शकतें. ही गौहरनी-बानी गाईसारख्या पशूंना मोहनी घालील अशी आहे, मग प्रेमळ मनुष्यांची तर काय स्थिति होईल हें सांगावयासच नको. असो.

दर्शन व श्रवण हीं बाह्य विषय भोगण्याचीं प्रमुख साधनें मानलीं आहेत. जिह्वा, त्वचा हीं त्यानंतरचीं. येथें दोन व्यक्तींतला परस्पर आकर्षण भाव दाख-विण्याचा प्रसंग आहे. त्याकरितां हीं दोन्हीं साधनें पुरेशीं आहेत. त्यापलीकडे जाण्याची जरुरीच नाहीं, इतकेंच नव्हे, तर तसें झाल्यास मुळांतल्या शुद्धतेला कलुषितपणा येण्याचा फार संभव आहे. प्रथम शुद्धता स्थिर झाल्यानंतर तो पुढचा प्रकार झाला न झाला दोन्ही सारखेच. कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम गोपीं-वर झालेला शाहिरांनीं कसा रंगविला आहे, हें पाहणें चालू आहे. म्हणून टप्प्या-टप्प्यांचा हा प्रवास डोळे उघडे ठेवून करणें प्राप्त आहे. जेथें जो रस असेल त्याचें ग्रहण करीत पुढें जावयाचें आहे. प्रेमरसाच्या उद्भवापर्यंत वाट झाली आहे. त्याचें वर्णन ' प्रभाकर ' शाहिराच्या या लावणींत केलें आहे. गोपी म्हणते—

वेडे करी विचरतां घरीं, हरि तुझी मुरली ॥ ध्रु० ॥
दधिमंथन करीत मी होतें, उठूनि गोविंदा ।
रवि दोरी धरून घुसळितां पडे तीनतीनदां ।
मन चंचल गे गमे कुठे सुचेना धंदा ॥
वेणीसुमनें गुंफितां शिरिं राहिला हात ।
नादें अंबर कोंदलें, वाटे जाहली रात ।
अशी वृत्ति फिरली ॥ १ ॥

कृष्णाच्या मुरलीच्या ध्वनीनें व्यवहारांतलें मन चंचल झालें, पण सर्वत्र तोच ध्वनि भरला असें वाटलें. तो बाहेरचा ध्वनि आंतहि घुमूं लागला. हा अनुभव एकटीचा नाहीं तर सर्वांचा तसाच होता. त्या गोंधळाचें वर्णन पुढीलप्रमाणें :—

लगबग धांवती गोपिका घालुनि गळीं वांकी
काढुन नथ अडकविलें वर्णफूल नाकीं ।
हातीं चंद्रहार गळीं जवे आरसीं विलोकी ।
भाळीं अंजन लाविलें नेत्रीं कुंकू करें ।
मोहित झाल्या एकसरें, अज्ञान ज्ञानीं थोरें ।
सकळ मनें हरिलीं ॥ २ ॥

श्रीतुकोबारायांनीं या स्थितीचें वर्णन ' पांगुळली स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण ' अशा शब्दांनीं केलें आहे. तेंच येथें दिसतें :—

न्हाणखाण जेवण विसरूनि वौध्यरूप धरिती ।
कुणि धान्य कांडिता हात राहिला वरती ।
कुणि जाउनि कुंजवनीं विलोकिती मूर्ती ।
गाईवत्सें ऊंर्ध्वमुखें देती हरितें मान ।
मुरलीनादें त्यागिती गोपी साऱ्या भान ।
प्रेमरसें भरलीं ॥ ३ ॥

या प्रेमरसापुढें शास्त्रें, पुराणिकांचें पांडित्य, वेदाध्ययन करणारांचा जड अभ्यास हीं सारीं स्तब्ध होत असें सांगून कवि ' स्थिर झालीं यमुनाजळें, मुहूर्त न वाहली ' असें अखेरीचें विधान करतो. या विधानानें कवीला असें सुचवायचें आहे कीं, अष्टांग योगसाधनांनीं प्राप्त होणारी चित्तवृत्तिनिरोधांतली पहिली मुख्य अवस्था जी ' यम ' ती सिद्ध झाली. शरीर व तत्संबधींची प्रपंचाची वृत्ति सुटणें ती कोणत्याहि कृत्रिम उपायांनीं नाहीं तर केवळ प्रेमामुळें असा अर्थ येथें संदर्भावरून घेणें योग्य होईल असें मला सुचवावयाचें आहे.

शाहिराच्या शब्दयोजनेंत श्रेष्ठ ज्ञानाचा प्रत्यय येऊं शकेल कसा ? अशा भ्रांतींत असणाऱ्यांनीं अर्थ सोडून खुशाल शब्दांच्याभोंवतीं भ्रमण करावें. त्याला माझी ना नाहीं. या नटनाटक कृष्णाच्या मुरलीचा प्रभाव मथुरेंतल्या गोपींवर त्या काळींच झाला असें आकुंचित अर्थाचें हें बोलणें नाहीं. तर त्याला दिक्कालाची मर्यादा नाहीं. तो प्रभाव सर्वत्र सदाकाळीं असतो. म्हणून प्रभाकर गोपींच्या मुखानें म्हणतो :—

घ्या हिसकुनि कोणी मुरली ॥
त्रिभुवनांत कशी संचरली ॥
नाहीं निवांत जागा उरली ॥
अशी भरली सर्वां ठायीं ॥
मुरलीनें ग मन अवघ्यांचें मोहिलें, सखये बाई ॥

आतांपर्यंत कृष्णाच्या लीलांनीं गोपींना कसें वेधिलें, त्याचें लावणीकारांनीं केलेलें वर्णन पाहिलें. ही स्थिति एकाच व्यक्तीची नाहीं, गोकुळांतील मुग्धप्रौढ अशा सर्व गोपींची पृथक्त्वें पाहिलें. सर्वांना समान असें हें कृष्णाविषयींचें प्रेम म्हणा कीं वेड म्हणा, त्यांना समान पातळीवर आणण्यास कारण झालें. व्यष्टीवरून समष्टीवर मजल आली, हा समष्टींतला रसाचा भोग त्या सर्वांनीं मिळून घेण्याचा प्रसंग क्रमानें आला. यावर एका शाहिरीची लावणी अशी :—

नारी नगरीच्या नटल्या गोपी नेसुनि शालु गुलाली ।
रंगभरित करीं घेऊनीया पिचकारी त्वरें आलबेली ।
धन्य ती राधा कृष्ण कसा तिज सनिद्ध पाहुनि भुलली ।
नेत्र हारपदिं निवती । तेव्हां बोलती ।
जा गे सख्यांनो कोणी आणाया हरि
ब्रजवनिता रंग खेळती ॥ १ ॥
दैवबळें त्या गोपिकांस झाली प्राप्त हरिची तनु ही ।
ऐशि होरी खेळतात नारी उद्धव कृष्ण तेथें कीं ।
वंदन करिती नारद तुंबर कीर्ति गाती निजजनहीं ।
धन्य ध्वनी ते ऐकती । तेव्हां बोलती ।
कोणि जागे सख्यांनो इ. ॥

पाहावें तर लहान मूल आणि प्रभाव मात्र अगदीं आश्चर्य करण्यासारखा असा प्रकार अनेक किंवा सर्व गोपींच्या ध्यानांत प्रत्यक्ष अनुभवानें येत गेला. तो त्यांनीं आपसांत एकमेकींना सांगितला. तो अनुभव घेण्याचें सुख व मिळालेलें सुख जवळच्यांना सांगण्यांतलें सुख हीं दोन्हीं परस्परांस वाढवीत जात असतात. भाविक भक्तहि ' तें सुख काय सांगूं ' असें म्हणत म्हणत दुसऱ्यांना सांगतातच. ती त्या भोगाची प्रकृति आहे आणि तिला डावलून जाण्याला कोणी समर्थ होत नाहीं. तसें नसतें तर हा आनंदोपभोगाचा प्रसार झालाच नसता. कविहि त्या आनंदाचे अनुभवी रसभोगी असतात म्हणून त्यांना अशा असाधारणाचें कवित्व स्फुरतें. शाहीर रामजोशी एका लावणींत एका गोपीच्या मुखानें सांगतो :—

कुंजांत वाजवी वेणू । भोंवताल्या चरती धेनू । कीं उडती रेणू ॥ ध्रु० ॥
सावळा सगुण जगजेठी । ब्रह्मांडें ज्याच्या पोटीं । ठेवणी काठी ॥
देहुडा पदाची घाटी । दिलि यशोदेनें तूपरोटी । बांधी पोटीं ॥
घोंगडें शिंकें लंगोटी । काल्यानें भरली वाटी । न्याहारीसाठीं ॥
विटुदांडू लगोऱ्या गोटी । सर्वें गोपाळांची दाटी । गडबड मोठी ॥
डोईस लहान चिंधोटी । डोघालित यमुनेतटीं । बोटें चाटी ।

काय सांगूं याची करणी । खेळतां न तापे धरणी ।
बरि शीतळ होतो तरणी । पशुबाळही लागत चरणीं ।
आम्ही म्हणों कीं मुल हें पिसें । उगिच फिरतसें । म्हणुन भलतेसें न मानूं ।
मानु मानु याचा खेळ, कसा काय नेणूं ॥ १ ॥

मुलासारखें मूल पण असाधारण, त्याचा प्रभाव अलौकिक, त्याला कांहीं मान्यता देण्याचें रामजोश्यासारख्या विद्वानाला शोभूं नये, पण तो सहृदय होता. रासिक होता. त्याला हा खेळ पटला म्हणूनच त्यानें कवितेंत रंगविला. मात्र तो खेळ 'कसा काय' म्हणजे कां चालला आहे हें त्याला समजलेलें नाहीं. तें कोणालाच समजलेलें नाहीं. आकर्षण फैलावत चाललें होतें आणि तक्रारीहि चालू होत्या. खोड्यांचें रूपांतर थट्टामस्करींत होत होतें. रुसवाफुसवा होता.

यापरि रुसली घरीं बसली हरि समजावीं ।
न कळत झाली गडे चाल तूं दुजी चिडवावी ॥
खेळ खुषीचा तेथें मर्जी कां बिघडावी ॥
दो दिवसांची सखि होरी रति पुरवावी ॥
तूं मल बाली, साऱ्यांनीं जुट बांधावी ॥
बरि कीं माझी रंगांत तनु भिजवावी ॥
गोपी जमल्या कुंजांत धूम कळवावी ॥
तुज म्हणालों कांहीं मसलत मज सांगावी ॥

कुंजवनांत झालेल्या रासक्रीडेची–भागवतांत रासपंचाध्यायी या नांवानें अति प्रसिद्ध असलेल्या भागांत वर्णन केलेली–प्रस्तावना मराठी शाहिरींत ही अशी आहे.

ऐकुनि उठली, खटपट हीं मनामधें होती ॥
हरिचा धरिला तिनें हात भिळविली ज्योती ॥
आंतुनि वर यदुपतीला भर देती ॥
मिसळुनि मेळीं भिजविलाच कंसाराती ॥

रामजोशी सुंदर रचना करणारा तर खराच, पण या ठिकाणांतल्या इतका पाझर त्याला इतर प्रसंगांत क्वचितच फुटला आहे. पंडित कवि रामजोशी शेवटीं म्हणतो—

यशोलीला अनंत करी जो अवतारी ।
त्याची होरी ' कविराय ' गातसे थोरी ।

संपूर्ण मराठी शाहिरीचा परिचय करून देण्याला मी बसलों. पण या कृष्णलीलेच्या रंगाच्या रससागरांत माझा पाय पुनः पुनः रोवून बसतो आहे. अजून किती दीर्घ प्रवास करावयाचा आहे याची जाणीव असूनसुद्धां या प्रसंगाशीं तल्लीन झाल्याचा आनंद मलाहि सहज ओलांडून जाववत नाहीं. या

माझ्या रेंगाळण्याबद्दल कांहीं वाचक माझ्यावर रुष्ट होतील हें मला कळतें, पण वळत नाहीं. तो रंगाचा प्रसंग शिगेला पोहोंचलेला शाहिरांनीं वर्णन केला तो अजून दाखवावयाचा आहे. आतां त्याच्याकडे वळावयाचें.

येथें पुनः रामजोश्यांची सुप्रसिद्ध लावणी उद्धृत करीन असें सर्वांना सहजच वाटेल. पण मीं तसें करण्याचें योजलेलें नाहीं. त्या लावणींतला मुख्य भाग दृश्य आहे. शांतारामबापूंनीं तो रसच रंगवून दाखविला आहे आणि सर्वांना त्यानें चटका लावून सोडला आहे. त्याबद्दल त्यांनीं धन्यवादहि मिळविला आहे. तेंहि योग्य असेंच झालें आहे. तथापि या केवळ दृश्याच्या अगर श्राव्याच्या मार्गानें त्या-पलीकडे जाण्याला साधनीभूत अशीं कवनें शाहिरींत आहेत. त्यांपैकीं एक प्रथम देतों. दुर्दैव असें कीं, या कवीचें नांव अजून मला माहीत झालेलें नाहीं. एका बाडांत ती लावणी मला सांपडली:—

घेउनिया पिचकारी रुपेरी । केली तयारी वसंत भरे । ध्रु० ॥
बहार वसंत हे राग मुखानें गायन ऐकुन वसंत बहरे ।
कंचुकी आंगची कोर जरीची रंगरसें भरली ।
रंगांत रंगली वसनें गर्द गुलाल प्रभा न दिसे ।
त्यांत तुम्ही मम नेत्र वेधुनि अवचित भरसूठ मारलीसे ।
गुप्त असे कसे खेळ खेळुनी वरवर सात्त्विक भाव दिसे ।
मर्जी रिझली झाली बहारी ।
सेवा करू या प्रसंगें ।
तरणी स्मरणी, हेत निधानीं, मौजा करू रसरंगें ॥

हें कवन अपुरें मला मिळालें. पण त्यांतला रंग ध्यानीं येण्याइतकें तें अर्थ-पूर्ण आहे. रासक्रीडेंत रंग खेळण्याचा भाग मुख्य आहे. येथें प्रासादिक कवींना अवकाश मिळतो. कृष्णाच्या लौकिक गुणरूपावर लुब्ध झालेल्या गोपी यापूर्वीं शाहिरांनीं वर्णन केलेल्या आपण पाहिल्या आहेत. तेथें लौकिक व अलौकिक यांचें मिश्रण आहे, आणि तीच अलौकिकांत स्थिर होण्याची संधि आहे. शुद्ध मनाच्या गोपींना त्या संधीचा उपयोग झाला. प्रथम देहबुद्धीशीं संबंध ठेवून असणाऱ्या गोपी दिसल्या. त्या नेत्रकर्णांच्या वारंवारच्या तृतीमुळें कृष्णाकडे कशा आकर्षित झाल्या तेंहि पाहिलें. ज्या रसाचा आस्वाद घेतांना त्यांना सुख वाटे, तो रसहि ध्यानीं आला आहे. शांत गोपींचें प्रथम इंद्रियगम्य विषयांत स्थिरावलेलें मन पुढें कसें व कोठें गेलें तें आतां या कवनांत प्रत्ययास येत आहे. शाहिराचें चातुर्य येथें अगदीं कसाला लागत आहे. ‘ दुनियाके शायर ’ ‘ तुकबंद ’ रचना करतात असा कवि कैलास यानें दिलेला निर्वाळा मीं पूर्वीं उल्लेखिला आहे. त्यांच्या सत्यतेची पूर्ण प्रचीति आतां येते, असें मला विश्वासानें सांगावेसें वाटतें. नमुन्यासाठीं घेत-

लेल्या कित्येक महत्त्वाच्या बाबी सूचित केल्या आहेत. हातीं रंगाच्या सुशोभित पिचकाऱ्या घेऊन गोपी सज्ज झाल्या आहेत. तो प्रसंग म्हणजेच मोसम अथवा ऋतु योग्य आहे. घनघोर पावसानंतरचा अथवा गारठून टाकाणऱ्या थंडीच्या नंतर येणारा वसंत हा ऋतु आनंदोत्सवासाठीं कां प्रशस्त मानला जातो हें अनुभवावरून सर्वांना माहीत आहे. त्यांत श्रीज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणें ‘ वसंतीं बरवा आरामू ’. आणि तेथें ‘ प्रियसंगमू. ’ आधींच्या गोड दुधांत साखरच. श्रीव्यासांनीं शरद् चांदणी रात्र साधली आहे. तसाच आल्हादकारक ऋतु वसंत आणि त्यांचा भोग कुंजवनांत घेण्याचा गोपींचा हेतु कृष्णाच्या सान्निध्यानें पूर्ण होत असल्याचें शाहीर दर्शवीत आहे. हा रंगांतला रस कीं रसाचा रंग अनुभवीत असतांना गोपीला कांहीं एक आणीक आनंदाची प्राप्ति होतांना दिसते. वसंताची बहार, बहार वसंताचें गायन, रंगानें बहुमोल अशी जरीची चोळी भिजणें आणि तरी त्याबद्दलचा किंचित् व्यावहारिक राग अथवा खरें म्हटलें तर अनुराग, गुलालाची मूठ डोळ्यावर मारल्याबद्दल तिचा बाह्यात्कारी वरवरचा रोष आणि अगदीं साधेंपण दाखवून केलेल्या गोड खोडीमुळें झालेला आनंद या सर्व प्रकारांचें पर्यवसान मात्र मर्जी रिझविण्यांत होणें आणि या प्रसंगांत त्या आनंदाचें सेवन करण्याकडे दृढ उद्युक्तता होणें हें कशाचें सूचक आहे हें सांगण्याची वास्तविक आतां जरुरीच नाहीं. गोपींच्या स्मरणांत जो आशय ठसला तो ज्ञानोदयाचा. आणि त्याच निधानावर तिचा भाव दृढ होऊन बसला हें अगदीं स्पष्ट आहे. रंग आणि रस हे दोन नाहींतच. ‘ रसो वै सः ’ अशी श्रुतीची सिद्धवाणी आहे.

हा रंगाचा अथवा रसाचा आनंद गोपींना अनुभविता आला. तो सर्वांना प्राप्त व्हावा, होणें शक्य आहे अशी इच्छा धरणाऱ्या मोठ्या मनाच्या महात्म्यांविषयींचा आदर समाजांत असतो. शाहिरांना अर्थातच तो मान्य आहे. शास्त्रीय परिभाषेंत त्यांना आप्त म्हणतात. पण प्रेमाच्या परिभाषेंत त्याला सखी, सखा अशी संज्ञा मिळते. अशा एका सखीनें वर वर्णिल्यासारखा प्रसंग आल्याचें पाहून त्यांत सामील होऊन आनंदप्राप्ति करून घ्यावी म्हणून एका सखीला मोठ्या प्रेमानें सूचना केलेली धोंडी शाहिरानें एका कवनांत वर्णिलेली आहे. तें कवन असें :—

ऐक सखे गडणी, कुंजवनीं हरि खेळतो, बसलिस निजभुवनीं ॥ ध्रु० ॥
या वनांत नंदाचा नंदन करी आनंद त्यासभोंवतां अरविंदाचा ।
तशांत रंगाचा संगम यदुपति अंग भिजवितो बहर अनंगाचा ।
रस नंदलालाला, लाल गळ्यामधें लाल भडकला लोळ गुलालाचा ।
नाचत लपेट पवनाचा अवतंसकरी शिरि सुंदर सुमनाचा ।
तूं अशांत झडकरी उठ
रंगाची होतसे लूट

नको हरिशीं पाडूं तूट
तो कन्हैया केवळ वूट
घे गुलालाची भरमूठ
तों तननननननन वेणु रवाची ध्वनी, मंजुळवाणी ॥ १ ॥
सखे गुलाल पिचकारी धरुनि करि हरि मुग्ध गोपिला हळूच चुचकारी।
करि कौतुक कंसारी।
असे पहाशिल हरिशि खेळशील सुख तरि संसारीं।
विरहणीस तवारी।
कारंजाचे तुषार धारा सुगंध तवारी।
मधुकर वनचारी
कुंजांतचि गुंजारव करिती हरिमुख संचारी।
तो अनंत गिरिधारी।
चंपक बकुल कुसुम सुर वर्षिति नभिहून अवधारी।
मी आतांच आले चाल।
तुज बाहतसे नंदलाल।
कां सोडुन बसलिस बाल
करूं नको जिवाचे हाल
श्रीहरिचे पदधनमाल
रंगलूट झाली काल
तुज हरिचा लागो ख्याल
छुम छनननननन नूपुरचरणीं नाचती गौळणी ॥ २ ॥

सखीच्या या अतिप्रेमाच्या सूचनेंत भक्ति, योग या दोन्हींच्या सहप्रवासी परिभाषा ग्रथित केली आहे. सर्वांना प्रिय जें आत्मदर्शन त्याच्या अनुभवाच्या प्रसंगांत साधकाच्या शरीरांत आपोआप उन्नत मार्गानें होणारी वायूची हालचाल, जीं कुंडलीकृत, कुंडलाकृति असते म्हणून ज्ञानी लोक सांगतात ती, मुखावर आपोआप उत्पन्न होणारी रक्तवर्णाची प्रभा आणि अंत:करणाला भासणारा अत्यंत मधुर ध्वनि या सर्वांचा समावेश कवीनें केला आहे. पुढचें पर्यवसान असें :—

त्या सखीनें गोपिला, अतिशय यत्नें तिला।
रिझवुनि नेलें चौसोपीला।
पहातांच तिजला हरि कवटाळुन धरी
काय तो तिचा वसनांकित भिजविला।
मग अनंग वळविला।
गोपिनें यदुपति रंगीं मिळविला।

निजकामचि पुरविला ।
हरिपदपंकज विलोकुनि
स्वभाव नुरविला ।

अशा रितीनें

रतिराल संग सरला ।
अनंत कविजन वर्णिती परि वर्णाया जागें उरला ।

आतांपर्यंतच्या विवेचनाच्या बैठकीवरून या वर्णनाकडे पाहिलें असतां त्यांतील आशय ध्यानीं आल्यावांचून राहणार नाहीं. आतां या कीर्तनांत कवीचें स्थान कसें तें मात्र लक्षांत घेण्याजोगें आहे. कवि म्हणतो :—

कोण जाणें त्याचा पार
तो अनंत धरी अवतार ।
वेदाला न कळे सार ।

विचारांतीं असें ध्यानीं येईल कीं, या बैठकीवरून काढलेले हे उद्गार म्हणजे नुसती शब्दाची चाउटी नव्हे. शाहीर सांगतो :—

करि नागेश वेडेचार ।
ते स्वरूप तरि अविचार ।
धोंडी शाहिर संगें गुलजार ।

नागेश म्हणजे कृष्ण. धोंडीच्या गुरूचें नांवहि नागा आहे. त्याला वेडा नागा असेंहि म्हणत असत. एकाच शब्दप्रयोगांत श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या गुरूचें आणि इष्ट देवाचें नमन केलेलें प्रसिद्ध आहे.

श्रीनिवृत्तिनाथाख्य दैवतं आश्रये ।

या पंक्तींत तें साधलें आहे. तोच प्रकार येथें आहे. नागेशानें वर वर्णन केलेलें जें कांहीं कार्य केलें तेथें त्याच्याबरोबर आपणहि होतों असें शाहीर सांगूं लागला तर कोणत्या अर्थानें खरें आहे हेंहि उमजण्यासारखें सुलभ आहे. त्या पातळीवरून बोलणें चालविणाऱ्या सर्वांना श्रीतुकोबारायांप्रमाणें

जे जे झाले अवतार । तुका त्यांचे बरोबर ।

असें भासलें तर त्या कवींना आड कोण येऊं शकेल ?

कृष्ण व गोपींनीं जी क्रीडा केली तिच्या वर्णनांत अनेक कुतर्क काढून खिस्ती मिशनऱ्यांनीं जी नालस्ती केवळ राजसत्तेच्या बळावर केली तिची जबरदस्त पकड

इंग्रजी भाषाप्रवीण झालेल्या आमच्या लोकांवर होती आणि अजूनहि ती कायम आहे. देवाकडे पाहण्याच्या आमच्या पद्धतीविषयीं प्रथम निराधार नापसंती आणि नंतर देवाविषयीं उदासीनता असा परिणाम झाला आहे. त्याचा दुष्परिणाम भोगणें समाजाला भाग पडलें आहे. सुशिक्षितांचें अनुकरण करण्याचें अशिक्षितांनीं आरंभलें आणि आतांच्या पिढीकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास हा परिणाम आतां सर्व समाजावर झाला असल्याचें दिसतें. मात्र चमत्कार असा कीं, नृत्य व संगीत यापुरतें कृष्णगोपींचें स्थान कायम आहे. संगीताला शब्दांचा आधार घेतांना पूर्वींच्या रचनाकारांनीं रामकृष्णांच्या चरित्रांचा आश्रय केला. पण आतां त्या संगीताचें सेवन शब्दांकडे पूर्ण दुर्लक्ष करून केलें जातें. परिणाम असा कीं, केवळ स्वरांच्या विस्तारा-वर नजर खिळून राहिली आहे ते स्वर काढण्यासाठीं कोणते शब्द योजिले जातात याची फिकीर कोणी करीत नाहीं आणि त्या शब्दांनीं कोणता भाव उत्पन्न होतो याकडे कोणी पाहात नाहीं. स्पष्ट शब्दांचा उच्चार करून फार तर अस्ताईचा चरण म्हटला जातो; आणि हिंदी भाषेचा नित्य परिचय होत असला तरी संगीतांत त्या भाषेंत काय म्हटलें जातें याचा विचारच मुळीं कोणाच्या मनास शिवत नाहीं. पण हें कृष्णगोपी आख्यानच संगीताच्या ख्याली पद्धतींत अगदीं महत्तर प्रमाणांत असतें असें सांगितलें तरी त्यावरून कांहीं परिणाम होणार नाहीं. कृष्णगोपी मनांतून दूर झाल्या मग भले त्या नांवाचा उच्चार हरप्रसंगांत होवो अगर दृश्यांत दिसो. परि-णाम शून्य. या स्थितीचा झपाटा एकंदर मराठी वाङ्मयावर बसला तसा शाहिरी वाङ्मयावरहि बसला आहे. ह्या प्रसंगाचा आस्वाद घेण्याची शक्ति कमी झाली किंवा बिनचूक बोलावयाचें झालें म्हणून असें निश्चित म्हटलें पाहिजे कीं, समाजाच्या मनावर भ्रांतीचें पटल आलें आहे, तें प्रथम दूर झालें पाहिजे. आतांपर्यंत ज्या भागाचा विचार झाला तो शाहिरी वाङ्मयांतला एक महत्त्वाचा भाग होता. संतवाङ्मयांतल्या समानविषयक भागाशीं समांतर राखून समपातळी गांठणारा होता असें मला वाटलें म्हणून मीं इतका अट्टाहास केला व इतकी जागा अडविली. मला त्या वाङ्मयाचें ऋण अंशतः फेडावयाचें होतें म्हणून मीं तें केलें, त्याचा बोजा इतरांवर कशाला, असेंहि कोणीं म्हटलें तरी त्याबद्दल विषाद वाटूं नये.

गवळण प्रकाराचा परिचय करून देतांना कथानुक्रमानें पाहात जातांना एक भाग अजून शिल्लक असल्याचें ध्यानांत येणें साहजिक आहे. संतवाङ्मयांत या शिल्लक असलेल्या भागासकट कृष्णगोपीसंबंधाच्या सर्व भागाला ' गवळण ' असें सामूहिक नांव आहे. शाहिरी वाङ्मयांत थोडा फरक केला आहे. शाहिरी कवनाच्या कार्य-क्रमांत गणानंतर जो ' गवळण ' भाग येतो त्याचें स्वरूप एकांगी आहे. म्हणजे फक्त कृष्णगोपींचा वरवरचा संघर्ष गीतसंवादाच्या रूपानें श्रोत्यांपुढें सादर केला जातो. आतांपर्यंत जीं कवनें येथें दाखविलीं तीं अशा कामाला उपयोगी पडणारीं नाहींत. त्याचा समावेश पुढील कार्यक्रमांत निराळा केला जात असे. आतां तें

मान पुष्कळच कमी झालें आहे. ' महाजनो येन गतः स पंथाः ' अशिक्षित समजावरहि परिणाम झाला आहे याचें हें एक गमक आहे. मुख्यत्वें संघर्ष व शेवटीं मनःपूर्वक मीलन असा कुतूहलोत्पादक भाग तेवढा जास्त चटकदारपणें रंगवितां येतो म्हणून कार्यक्रमांतील गवळणींत त्याचा उपयोग होतो.

शाहिरांच्या कवनांना प्रेरक अशी रचना संतवाङ्मयांत सांपडते. सादृश्य निश्चित आहे. त्यांतलें ज्ञान संतांचें आहे हें निर्विवाद. पण त्याचा बाह्य आराखडा कोणीं कोणापासून उचलिला, याविषयीं संदेह असण्यासारखी स्थिति आहे. प्रथम प्राकृत व मग संस्कृत असा अनुक्रम मानणारा पक्ष विचारांत घेण्यासारखा आहे. ज्ञान ज्या समजांत फैलावयाचें त्याच्या भाषिक पातळीवर जाऊन आपलें कार्य करणें संतांना इष्ट कां वाटूं नये, याला कांहीं सयुक्तिक कारण दाखवितां येत नाहीं. उलट बाजूनें पाहतां असें डोळ्यापुढें उभें राहतें कीं, ज्ञानाचा प्रसार संतांनीं आपल्या अनुभवाच्या आधारावर केला. ते संत तरी कोण ? त्यांच्या त्या योग्यतेला कांहीं प्रमाण लागून संतपण ठरलें, आणि ती मान्यता असेल तेच जेवढे संत, बाकी कोणी नव्हेत कीं काय, असा व्यामोहाचा प्रसंग आहे. मान्यतेसह प्रसिद्धि कीं गुणांवरून ओळख, हा निकष मानावा असाहि प्रश्न आहे. शाहिरांच्या बाबतींत असा प्रश्न उत्पन्न होतो. शाहिरीचा परिचय करून देणाऱ्या कांहीं विद्वानांनीं याचा तडकाफडकी निकाल लावून टाकला आहे. मान्यतेसह प्रसिद्धि असेल तो संत, इतर कोणी त्या अधिकाराला पात्र नाहींत असा त्यांचा अभिप्राय. पण मला तो सुतराम् मान्य नाहीं. अनुभविक ज्ञानी तो संत. त्याची प्रसिद्धि किती विशाल क्षेत्रांत आहे, हा भाग गौण आहे असें माझें म्हणणें. येथें नाट्यरूपानें प्रकट होणाऱ्या काव्यरचनेचें प्रकरण चालू आहे. म्हणून नाट्यमंदिराचें स्वरूप डोळ्यांपुढून दूर जाऊं देणें इष्ट नाहीं. त्या मंदिराचा आलेख " प्रज्ञाविधृष्टप्रतिभामणिदीपप्रकाशितं । संसारालेख्यभांडारं पश्येदं रंगमंदिरम् ॥ " या सूक्त सूत्रांत आहे. या मंदिरांत ' प्रज्ञाविधृष्टप्रतिभा ' प्राप्त झालेल्या कवींच्या कृतींचें दर्शन होणार. प्रज्ञा व प्रतिभा असे दोन शब्द आहेत. दोहों मिळून पूर्ण अर्थ होतो. पण पहिल्यांत ज्ञान व दुसऱ्यांत त्याच्या प्रकटीकरणाचा निर्देश आहे. ज्ञानाचा स्फुलिंग आच्छादित आहे. तें आवरण निघण्याला साधनीभूत असें कांहींतरी बाह्य उपकरण जरुरीचें होतें. यालाच गुरुमुख असें व्यावहारिक नांव आहे. आवरण दूर होण्याला काल अगदीं अल्पहि पुरतो किंवा दीर्घातिदीर्घकालहि पुरेसा होत नाहीं. हें गुरुमुख देणारा जो कोणी असेल तो संत म्हणून प्रसिद्ध असो नसो. तो संतच. संत कांहीं टांकसाळींत निर्माण झालेले नसतात व छापामुळें त्यांना संतपण येतें असें नाहीं.

शाहिरी रचनाकार आपल्या गुरूंच्या विषयीं आदरयुक्त उद्‌गार काढतात ते अनाठायीं आहेत असे विचार याविषयीं संशोधन करणारांनीं प्रकट केलेले आहेत. त्याची दुसरी बाजू पुढें येणें जरूर म्हणून मी हें येथें लिहीत आहें. विद्याल-

यांत सध्यां तरी अध्ययन होतें तें अशा अनादरयुक्त लेखांवरून काढलेल्या तर्कांव अधिष्ठित असतें. पूर्वग्रहाचा पुरावा चुकीचे ग्रह बनविण्यास साधन म्हणून वापरल गेला आहे. कृष्णलीलेवर शाहिरांनीं केलेली रचना लक्षपूर्वक वाचणाराला त्यां कांही प्रसाद आहे असें दिसेल अशा विश्वासानें मला कांहीं सांगावयाचें होतें तें म सांगितलें आहे. असो.

आतां नाट्यरूपानें दाखविल्या जाणाऱ्या ' गवळण ' प्रकाराकडे पुनः वळा वयाचें. शाहिरांच्या कवितेच्या मेढीच्या आधारावर उभारलेला तमाशाचा मंड म्हणजेच या शाखेचें नाट्यमंदिर. तेथें जें गीतानें व नाट्यपूर्ण संवादानें दाखविले जातें, त्याचें तंतोतंत रूप श्रीतुकारामांच्या एका ' गवळणींत आहे. ती अशी :-

गोरस घेउनि, साते निघाल्या गौळणी ।
पुढें कृष्णाची करणी, काय करी तेथें ।
झाला पानसरा, मिठि घातली पदरा,
" आधीं दान माझें सारा, मग चला पंथें " ॥ १ ॥
" सर जाऊं दे परता, सुळीं भेटलासि आतां,
वाट लागेल संचिता, खेपा खुंटलिया "
येरी आसुडी पदरा, धरी आपण दुसरा,
येकी झोंबती करी, ' काय वेडा होसी
आलों बहुवेळा, नेणों काळा कीं गोरा,
सर परता गोवळा, काय बोलतोसी " ॥ २ ॥
जडला जिव्हारीं, फाको नेदी तया मारी,
जेथें वर्म ते वरीं जाऊं पाहे तीचे
" आम्ही येथें अधिकारी " " मागें केली तुम्ही चोरी,
आतां सांपडल्यावरी, मारो कळे त्याचें " ॥ ३ ॥
बोलल्या हासोनी, " आम्ही सासूरवासिनी
कारे झोंबसी, दुरुनी करी मात कांहीं.
वाया परनारी कैसा धरिशिल करीं
तया कळलिया उरी, तुम्हां आम्हां नाहीं ॥ ४ ॥
तया हातीं सांपडल्या, हाटपाट चुकविल्या,
कृष्ण मिळणी मिळाल्या, त्याही न फिरती,
तुका म्हणे चित्तीं कांहीं न करावी खंती,
होतें तुमच्या संचीती, ओढवलें आजी ॥

या गवळणीचा अर्थ सुशिक्षितांच्या ध्यानांत येऊं शकणार नाहीं असा प्रकार वास्तविक नाहीं. तथापि मला तो जसा समजला जसा सांगून जें पूर्वग्रहाचें

किल्मिष असेल तें दूर करावयाचें आहे. यासाठीं पुनः भरपूर अवकाश घेतों. हें कवन रचणारा श्रीतुकाराम आहे. त्याच्या स्थानाविषयीं तरी कांहीं शंका असूं नये. तो कोणी हीन दर्जाच्या ‘ छक्कडी ’ बनविणारा, सुशिक्षितांनीं ज्याची चांगली ओळख करून घेतली आहे असा नजरेंत ‘ ठसक्या ’ मुळें भरलेला तमासबिन नाहीं. त्याच्या कवनाचा परिचय तशाच योग्य चित्तस्थितींत जाऊन केला पाहिजे. कृष्ण-गोपींच्या संबंधाचें पर्यवसान यांत आहे. म्हणून त्या पातळीवरून सांगणें चालू करतों.

संसारांत मग्न असलेल्या गवळणी आपला नित्याचा दहींदूध विकण्याचा व्यवसाय करावयास निघाल्या असतां, गांवाबाहेर त्यांची कृष्णाशीं गांठ पडते. आधीं माझें देणें देऊन टाका आणि मग आपल्या वाटेनें जा असें गोपालकृष्ण त्यांना धिटाईनें आडवून अंगावर चालून जाऊन बजावतो. त्यावर संसाररत अशा गौळणींचें उत्तर तशाच धिटाईचें आहे. आम्ही आतांच तुला प्रथम पाहतों आहों, आमच्या व्यवसायासाठीं चाललेली ये-जा कुंठित होईल तेव्हां तूं आमची वाट आडवूं नको, बाजूस हो. आमच्या व्यवसायाच्या साधनाला नाट लावूं नकोस. या हुमरीतुमरींत अलगट, मर्मस्पर्श सर्व प्रकार झाले. कृष्णाच्या चोरी करण्या-बद्दलच्या पूर्वींच्या बोभाट्याची गवळणींना आठवण होती. त्यांनीं तें वर्माचें हत्यार त्याच्यावर उगारलें; पण झगडा मिटेना. शेवटीं सामावर गवळणी आल्या. आम्ही संसाराशीं जखडलेल्या आहोंत, परनारी आहों, आमच्याशीं लगट करूं नकोस. आमच्या ‘ त्यांना ’ हें कळलें तर तुझी व आमची धडगत उरणार नाहीं. येथ-पर्यंत मजल आल्यावर शेवटमात्र झाला आहे तो कृष्णाच्या विजयांत. त्याच्या हातीं सांपडल्या त्यांच्याशीं कृष्णाचें मीलन झालें आणि ओघानेंच त्यांचा हाट-पाटाचा व्यवसाय चुकला. यावर श्रीतुकारामांनीं गोपींना सांगितलें आहे कीं, यांत खंती धरण्याचें कांहीं कारण नाहीं. तुम्ही जी कमाई, जो संचय केला होता त्याचा हा परिपाक आज झाला आहे. श्रीतुकारामांनीं ही गंमत म्हणून कविता रचलेली नाहीं. त्यांच्या एकंदर अभंगांच्या अनुरोधानें तिच्यांतील भावार्थ ध्यानीं येतो. अगदीं प्रामाणिकपणानें संसारांतील कार्यभाग करीत असलेल्या मनुष्याला देवाची ओळख आठवणदेखील नसते. पण देव आपलें देणें (due) देण्याची मनुष्याला कांहीं-तरी प्रसंगानें संधि देतो. तीच त्याच्या अंतःकरणांत क्रांति करविते, आणि तिचा परिणाम शेवटीं देवाशीं तद्रूप होण्यांत घडतो. हा अगदीं सरळ अर्थ पटवावयाचा होता म्हणून हें रूपकानें सांगितलें आहे. कृष्ण देहरूपानें होता पण आतां नाहीं, तशाच गोपीहि त्या शरीरांत आतां नाहींत. पण कृष्णभाव, गोपीभाव हीं चिरंतन आहेत. त्याचा प्रत्यय रूपकानें जास्त स्पष्ट येतो. आतां या कवनाचा मागोवा घेत शाहिरांनीं आपल्या तमाशांतल्या गवळणी कशा रचल्या आहेत, हें होनाजीच्या एका कवनांत पाहा. होनाजीनें रंगभूमीसाठीं वरच्याच प्रसंग उभा करून गोपींच्या मुखानें वदविलें आहे तें असें—

श्रीरंगा कमलाकांता, हरि, पदरातें सोड ॥ ध्रु० ॥
आम्ही व्रजललना नारी । जात असों कीं बाजारीं ।
अहो, कान्हा मुरारी । अडवितां कां कंडारी ।
मथुरेच्या बाजारीं । पाहु मजा गिरिधारी ।
विकूनि नवनित दधि गोड ॥ १ ॥
ऐका लवलाही । गृहीं गांजिती सासुबाई ।
परतुनिया याच पायीं । येऊं आम्ही ईश्वरग्वाही ।
दान देउनी कांहीं । मग जाऊं आपुले ठायीं ।
पतिभयानें देह रोड ॥ २ ॥
गडी तुमचे धरिती । नानापरी चेष्टा करिती ।
जुल्म आम्हावरती । मधुसूदना लज्जा हरिती ।
आबरूच्या गरती । कळली तुमची बदमस्ती ।
बाइट शिकला खोड ॥ ३ ॥

पहिल्या गवळणींतला आटोपसर भाग रंगमंचकावर पुरेसा रंगणार नाहीं म्हणून शाहिरानें त्यांत भर घातली आहे. संसारांतील सामाजिक बंधनें आणि संभावितपणाची कदर मनुष्याला देवाच्या कीर्तनभजनांत भाग घेण्याला कशी नडते, संसार करून झाल्यावर फुरसतीनें देवाकडे लक्ष देण्याचा संकल्प हा भाग शाहिरानें कवनांत आणिला आहे. प्रतिष्ठितपणाला धक्का लागण्यासारखे प्रसंग प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळीं भरीस घातले जातात हें सांगावयास नको. पण ते मूळ आशयाला सोडून नसावेत म्हणजे हेतु साध्य होईल. इतका सारासार विचार राहण्यानेंच रंनभूमीचें वैशिष्ट्य सिद्ध केलें जातें. अज्ञानी नट व तसेच प्रेक्षक यांचा तोल सुटण्याची ही जागा असते म्हणूनच तमाशा तो तमाशा आणि भजनाच्या सप्ताहाच्या अखेरच्या काल्यांत गवळण गायन तें भारूड गायन. पण दोन्ही रचनांची बैठक मात्र एकच हें मला दाखवावयाचें आहे. शेवट असा :

विनवुनि कृष्णासी । शरणागत झाल्या दासी ।
आणिल्या महालासी । होनाजी बाळासी ।
मशि आगळी कविरायासी । धोंडी सदाशिव जोड ॥ ४ ॥

आधुनिक शाहीर श्रीधर कृष्ण कुलकर्णी ऊर्फ पट्ठे बापूराव (इ. स. १८६६–१९४५) यांच्या गवळण भागाचा नमुना दाखवून मग पुढें जावयाचें आहे. गवळणींना स्वतः कृष्णानें दान मागितलें. दानाचा रूढ अर्थ भिक्षा, असहायाला अन्नद्रव्याच्या रूपानें केलेलें सहाय असा आहे. पण देव आणि भक्त यांच्या संबंधांत भक्तानें देण्याचें (due) तें ज्ञान असा आहे. आरंभींच्या प्रकरणांत ‘ ज्ञान हेंचि

गायदूध दोहिले भरणा ' या श्रीज्ञानेश्वरांच्या गवळणीचा उल्लेख केला आहे. तेथें हाच अर्थ आहे. पठ्ठे बापूरावांनीं हा भाग अधिक स्पष्ट केला आहे :—

तुम्ही गवळणी बालट ग । जातां चुकवुनी माझी वाट ॥ ध्रु० ॥
द्या हिशेब करुनी नीट । खालीं ठेवा दह्यादुधाचे माठ ॥ १ ॥
बारा तपं झालीं थेट । नित्य करितां मथुरेचा हाट ॥ २ ॥
दान माझें काढा काढा ।
द्या हाशील ज्ञानाचा झाडा ।
बारा वर्षं बाजार केला
चोरून ग मला ।
हिशेब किती झाला ।
व्याज नको सोडा सोडा ।
मुदलाची रक्कम निवडा ॥

मनुष्य संसार करूं लागल्यापासून बारा वर्षें झालीं तरी देवाची आठवण-देखील नाहीं. देवाकडे लक्ष असावें, त्यांत दिवसानुदिवस वाढ व्हावी तें राहोच, पण त्याचें भान असावें, त्याचें ज्ञान असावें म्हणून गवळणीच्या रूपानें एकंदर संसाररत पण देवाला विसरलेल्या मनुष्यांना शिकवण देण्याचा हा प्रसंग शाहिरांनीं कसा साधला आहे तें पाहण्यासारखें आहे. केवळ देहभावाच्या मूढपणांतच प्रौढी मिरविणाऱ्या सर्वकालींन सर्व देशांतील लोकांना यांत आपलें प्रतिबिंब दिसावें व त्यांनीं उमज पाडून घ्यावा अशा शुद्ध हेतूनें निर्माण केलेला हा प्रसंग आहे. कृष्णानें आडविलें, पण त्याला तसें करण्याला अधिकार काय असा धाष्ट्र्ययुक्त प्रश्न, जो सुशिक्षित म्हणविणाऱ्यांना सहज सुचतो त्याचें उत्तर पठ्ठे बापूरावांनीं याच प्रसंगांत देऊन ठेविलें आहे.

श्रीमद्भगवद्गीतेच्या ९ व्या अध्यायांतील हा उल्लेख पाहा—

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥ ११ ॥

या श्लोकाचें लो. टिळकांचें भाषांतर असें:— सर्व भूतांचा मोठा ईश्वर असें जें माझें स्वरूप तें न जाणणारे मूढ लोक मला (मनुष्यदेहधारी समजून) अवमानितात. परमेश्वराचें विभूतिमत्त्व न ओळखणाऱ्यांना गीतेच्या दहाव्या अध्यायांत तें तपशिलानें सांगितलें आहे (श्लोक १९ ते ४०) आणि त्याचें सार ४१ व्या श्लोकांत सांगितलें आहे.

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवाऽवगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥

पद्धे बापूरावांनीं हें विभूतिदर्शन कसें उत्कृष्ट घडविलें आहे तें विस्तारानें दाखविण्याचा मोह आवरत नाहीं म्हणून त्यांची वानगी येथें देतों:—

या गोकुळींचा सरदार ।
राधे मी स्वयंसिद्ध कर्तार ॥ ध्रु० ॥

मत्स्यकूर्मादि अवतारांच्या अनुक्रमांत—

आणि आतां हा गोकुळीं ।
आठवा कृष्ण अवतार
गुणक्षोभिणी मायेचा भर्तार ॥ १ ॥

अनंत विभूतींपैकीं कांहीं अशा:—

मी देवाच्यामाजीं इंद्र ।
मी स्थूलसूक्ष्मी कारणी ।
आणि मीच नांदें हिरण्यविराट् देहीं महाकारणी ।
मी अणुरेणूहून बारका
आणि ब्रह्मांडायेवढा मोठा गगनासारखा ।
मीच तारक मारक मी सुखकारक
आणि मीच दुःखाचा संचारक ।
मी पातंजल योग कलेचें केंद्र ।
आणि मीच पंडित दहा छिद्र ।
मी मंगल भद्र आणि मीच अमंगल अभद्र ।
आणि मीच जिवशिवाची नदरानदर ।
भगवान मी भगवान मी ॥ ध्रु० ॥
पुरुषामध्यें चक्रवर्ति भूप मी ।
देहामध्यें मन मी ।
इंद्राचें नंदनवन मी ।
कुशदर्भांकुर तृण मी ।
अठराभार वनस्पतिमधें मीच पिंपळ ।
पाषाणांत परीस मी । सहा ऋतूंत वसंत मी ।
नारीचें नवयौवन कंदर्प मी ।
जैसा हय उच्चैःश्रवा सूर्याचा रथ मी ।
कृतांताचा कृत मी जिवशिवाचा जन्म मी ।

या स्थूलसूक्ष्मांच्या पलीकडे जाऊन कवि म्हणतो:—

अखंड अक्षय्य शांति मी ॥

मराठी मनोरंजक शाहिरीपैकीं प्रवेशक भाग आतांपर्यंत पाहिला. आतां पुढचा भाग. तो विशाल आहे आणि मर्यादितहि आहे. जें जें सुंदर असेल त्याचें दर्शन घडविण्याचा कवीचा हेतु असतो. त्याच्या चक्षूंपुढें असीम विश्व असतें, आणि त्याच्या आंत भरून असलेलें पण सामान्य नजरेनें न दिसणारेंहि त्याला दिसतें. या सामान्य-असामान्यांची चवदार खिचडी त्याला बनवावयाची असते. तें केवळ स्वेच्छेनें होत असलें तरी सर्वस्वीं निर्हेतुक मात्र नाहीं. जनांच्या उपयोगी पडावें हा हेतु असतोच. पूर्वीं सृष्टिनिर्मितीच्या व अवतारांच्या हेतूंचा उल्लेख येऊन गेला आहे. दोहोंत फरक आहे आणि तो विचारवंतांच्या मनांत घर करून बसलेला आहे. पण—

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिती शक्त्यनुसार पक्षी

या न्यायानें कवींच्या रचनेकडे पाहावें लागतें. शाहिरांची कविता या दृष्टीनें विशालहि आहे व मर्यादितहि आहे. बाण कवीनें पुंडरीकाचे दोन जन्म होऊन जाईपर्यंत महाश्वेतेचें तारुण्य कायम ठेवलें पण माणदेशी हरदासाची मजल धनवडी रेशिमकाठी लुगड्यापलीकडे जाऊं शकत नाहीं. त्याच्या तोंडून भरजरी रेशमी पैठणी निघूंच शकत नाहीं. हा शक्तीच्या व माहितीच्या मर्यादेचा प्रश्न आहे. म्हणून कवीकवींच्यामध्यें फरक दिसतो. कवीला बसल्याजागीं मर्यादितपणें लौकिक दिसतें पण अलौकिक किती दिसावें याची मर्यादा ठरवितां येणार नाहीं. एक शाहीर म्हणतो :—" जें पाहिलें नाहीं रवीनें तें केलें कवीनें. " डोळ्यांची शक्ति मर्यादित, डोळ्यांच्या डोळ्यांची शक्ति अमर्यादित. आणि त्यानें जें दिसतें तें अलौकिक. हा विचार येथें मांडण्यांतला आशय उघड आहे. कवि व काव्य यांच्याविषयीं कल्पना किंवा शास्त्र काय असेल तें असो. पण शाहिराच्या कवितेकडे कोणत्या दृष्टीनें पाहणें जरूर तेवढेंच मीं दाखविलें आहे.

प्रौढ वयांतील मनुष्यांना जें जें दृश्य अगर श्राव्य आकर्षक वाटेल त्यानें त्याचें मनोरंजन होतें. बालांचें अथवा वृद्धांचें मन त्या विषयाचें आकलन करण्यास असमर्थ अथवा विन्मुख असतें. सर्वांचें मनोरंचन एकाच प्रकारानें होण्याची खात्री नाहीं. पण जें शाहिरांना ऐकवावयाचें असतें तें अशा मधल्या अवस्थेंतील प्रौढांना. ओघानेंच तारुण्यसुलभ मनोवृत्तींवर तेथें नजर असते. तीन पिढ्यांनीं एकत्र बसून पाहावें असें नाट्य हा एक आदर्श मानला गेला आहे. पण तो सिद्धान्त नव्हे. ' श्यामची आई ' हा चित्रपट तशा स्वरूपाचा आहे, पण ' श्यामसुंदरा ' इतका तो बालांना चटका लावीत नाहीं, आणि ' कुंकू ' पेक्षां ' माणूस ' तरुणांना आवडतो असा अनुभव आहे. ' जस मू तस थप्पा ' अशी हिंदी म्हण आहे. घासाच्या आकाराचें एकच प्रमाण ठरविणें चुकीचें आहे. तोंडाच्या आकारावरून बदल

व्हावा असा अर्थ आहे. मनोरंजक शाहिरीचे भोक्ते कोण तें पाहून तशी रचना होणें हें क्रमप्राप्त झालें. आतां तिची विविधता पाहावयाची.

प्रसंग, आख्यान व स्थल इत्यादींचें कथन हे स्थूल भेद. त्यांत पुनः निरनिराळे प्रकार. कथाकीर्तनांत जें आणलें जात नाहीं, तें येथें असेल. देवाकडे नेणारें असा पहिला दंडक. तोच देवाशीं विन्मुख नसणारें अशा शब्दांत सांगितला तर ती प्रतारणा खास नाहीं. विधान सर्वथामान्य ठेवून मधली रंगत साधण्यांतहि कुशलता आहेच, आणि ती विधानाच्या ध्येयाला पोषकहि होऊं शकते अशी सूचना पूर्वीं पाहिलीच आहे. ती आहे एवढेंच मला सांगावयाचें आहे.

आतां प्रसंगवर्णन या भागाकडे वळावयाचें. या भागांतहि मन गुंतविणारे अनेक प्रकार असतात. त्यांत शृंगार हा मुख्य. वीर, करुणा, हास्य हे भाग उत्पन्न करणारे त्याशीं संमिश्र स्वरूपांत असले तर अगदीं साधारण बुद्धीचा मनुष्य आनंदित होतो. त्याच्या मनाचें रंजन होतें. तो थोडासा जास्त समजदार असला तर त्या रंजक प्रकारांत जास्त गढतो. डोळ्यांनीं पाहिलेलें दृश्य अथवा कानांनीं ऐकलेलें कथन आपणच अनुभवीत आहों, अशी स्थिति येण्यापर्यंत मजल जाऊं शकते. ही मानवी मनाची साहजिक भूक आहे. तिची तृप्ति होत असतांना केवळ शिष्टाचार म्हणून किती मर्यादेंत पाळावा हेंदेखील त्याच्या मनानेंच ठरविण्यांत त्याला आनंद मिळूं शकतो. नाहींपेक्षां नुसतें सूचक दृश्य अथवा श्राव्य चालूं असतांना त्यानें सामाजिक प्रतिष्ठेसाठीं आपल्या आनंदानुभवावर किती दडपण आणावें याला कांहीं सुमार राहणार नाहीं. शृंगाराचा विषय आला म्हणून येथें थोडा विचार ओघांत आला म्हणून बोलून दाखविला.

शृंगार, वीर, करुण या रसांनीं भरलेलें कथानक हा शाहिरीचा हातखंडा आहे असें दिसून येतें. त्यांत गुणावरून सरसनीरस असा प्रपंच करून दाखविणें, वरवर वाटतें तितकें सोपें नाहीं. कथावस्तु, शब्दसौष्ठव, कल्पनाविलास आणि उपक्रमोपसंहारांतलें ऐक्य हीं सर्वच अंगें सर्व कवींना सारखींच साधत नाहींत आणि त्यामुळें अमुक कवि सर्वांत श्रेष्ठ असें न्यायानें म्हणतां येत नाहीं. संस्कृत साहित्यकारांनाहि ही अडचण भासली, म्हणून त्यांनीं निरनिराळ्या गुणांसाठीं निरनिराळ्या कवींचीं नांवें प्रतीक म्हणून ठरविलीं व तीं मान्य झालीं. मराठी शाहिरांचा आतांशा कोठें परिचय होत आहे तो करून देतांना अगोदरच एकतर्फी निकषानें गुणानुक्रम लावणें मला प्रशस्त वाटत नाहीं. तें काम यानंतर होणारें आहे. याकरितां कोठून तरी या काव्यसरांत प्रवेश करावयाचा एवढेंच ध्यानीं ठेवून कांहीं नमुने मी दाखविणार आहें.

परंपरेनें जुन्या घरचा, वयानें ज्येष्ठ व वृत्तीनें त्यांतल्यांत्यांत प्रौढ अशा शाहीर होनाजी शिलारेखानें याची एक लावणी अशी :—

भरज्वानीमधें मस्त तुझी भरनौतीची बहारी ।
पाहुनि लुब्धलों तुसीं आतां किति दिवस चाळविसी नटधारी ॥ ध्रु० ॥
सरळ भांग वेणीचा बुचडा मानेच्या मिसळी । अनार दाणेदार
तंग चोळी छातीवर जोबन कोवळे रसरसले ।
आधींच कंबर बारिक त्यावर महेश्वरी पातळ कसलें ।
तूं रत्नाची खाण तुझे गुण बहुत योग्य दिसले ।
शरम तुझ्या नयनांत पाहुनिया मन आमचें तुजवर बसलें ।
येतां जातां भेटत जा उभी राहुनी द्वारीं ॥ १ ॥
तुझ्या गळयाची आण वळखिलें आम्ही पुरतें तुजसी ।
लई अंतरची खोल मोठी बरनट केवळ सात्विक दिससी ॥
गरीब रीतीनें करून आकरीतपणीं जनीं अससी ।
खेळुनि अवघे खेळ बरवे गुप्तपणें मौजा करिसी ॥
खुबसूरत गुण प्यारे पाहणाराचे मनीं भरसी ।
आर्जवांत मर्जीनें गडे तूं रडत्याचे डोळे पुसशी ।
जिकडे तिकडे करून टाकसी अशीं वारासारी ॥ २ ॥

आकर्षक दर्शन, कांहीं बरासा अनुभव येण्यासारख्या गुणांची झाक असे प्रकार कोणाहि साधारण मनुष्यावर विलोभनाची मोहिनी घालावयास कारण झाले, तर त्यांत आश्चर्य कशाचें ? तें विलोभन पत्करणेंदेखील विपरीत कसें ठरेल ? मात्र होनाजीनें पुढील भागांत स्पष्ट केलेली पूर्ण समजाची तयारी असली म्हणजे तेंहि एक सौंदर्यदर्शनाचें अंग ठरावयास काय हरकत आहे ?

जसें बोलतसी तुजपासून तसें न घडे ।
देउनि आम्हां भुलथाप अजून किति दाखविसील छंदफंदडे ॥
मी तुमची तुम्ही माझे शब्द मंजुळ मिठडे ।
कंठाळीस हात लावूं नये हे तुझे मनांतील वर्म गडे ॥
लपंडावाचे डावपेंच माहित तुजला ठकडे ।
नवेंच कारस्थान सखेग तूं तर शिकलिस कोठुन येवढें ॥
मोहुनिया कैकांस ठेविलें त्वां आपुलें आहारीं ॥ ३ ॥

या कडव्यांत आषकाला माषुकाची पुरती ओळख पटली आहे असें असून तो म्हणतो:—

सोड मनांतिल आढी घडी ही लाखाची जाती ।
पहा शोधून अंतरीं शेवटीं स्वरूपाची होईल माती ॥
रूप ईश्वरी म्हणूनिया लोक तुला चाहाती ।
त्यांत सवड पाहून आम्हाला दे सोबत एके रात्रीं ॥

बसुनि जरा एकांतीं भिडूं दे छातीसी छाती ।
कर वचनाचा धुवुन घे हात भरली गंगा वाहती ॥

हल्लींच्या मासिकांच्या मुखपृष्ठांवर शोभेल असें हें स्त्री-शरीराचें वर्णन आहे, अर्थात् त्याचें विलोभन अनेकांना वाटलें तर तो निसर्गच आहे. त्याच्या आस्वादाचा रस वाढविण्याला पोषक गुणांची रेलचेल आहे, बेचव सात्त्विक अर्पणाऐवजीं आसक्ति वाढविणारें नाटक आहे. बंधमुक्तता आहे. हें ईश्वरनिर्मित सौंदर्य भोगण्याची इच्छा धरणें कोणत्या दृष्टीनें वावगें ठरेल ?

हा नमुना नेहमींच्यासारखा वाटतो, पण तो तसा नाहीं. दोघांचें मीलन घडण्याला कांहीं अडचण नसतांना तें घडत नाहीं, या द्वैतांत शिरून

होनाजी बाळा म्हणे बैस गडे हंसाशेजारीं ॥ ४ ॥

यापूर्वीचें वर्णन साधें नागर असतांना हा ' हंस ' शब्द वापरून कवीनें कांहीं खूण दाखवून दिली आहे. तेथून मागें गेल्यास हें कोडें उलगडतें, पण हें एकच उदाहरण अपवादात्मक वाटेल म्हणून आणखी कांहीं पूरक असें सांगतों. जेजुरीचा राहणारा पण पुण्यांत व शेवटीं साताऱ्यास राहणारा सगनभाऊ हाच प्रसंग कसा उभा करतो तें पाहावें:—

माशुक उभी रंगमहालीं, कधिं उतरेल खालीं ॥ ध्रु० ॥
कवळी कळी डाळिंबाची टवटवीत लाली ॥ ध्रु० ॥
गोरा रंग तुझा पाहुनिया । आम्ही आलों धावुनिया ।
चौमदीं लाल पसरले । मधिं बोले सुनया ।
मी इष्कबाज रोखुन वाटा पाहायास मुखवटा ।
कैका ये प्राण अवस्था, किति द्वार धरुनिया ।
पावेल इष्क पेचाचा मार पेच त्याचा ।
तसा डौल तुझ्या शरिराचा नाजुक बनुनिया ।
उजव्या गालावर तीळसा ग चमकतो निळसा ।
दोन्ही नैन विखारी कहरी रोखित निघाली ॥ १ ॥

हा आणखी एक दुसऱ्या प्रकारचा भोगी, माषुकावर लुब्ध, तिच्या संगसुखासाठीं लाळ घोटतो आहे. त्याच्या डोळ्यांत या माषुकाचें रंगरूप व त्यापेक्षांहि जास्त तिचा थाटमाट भरला आहे. तो नूर, कपडा व नखरा पाहणाऱ्यांना कसे घायाळ करतो—:

रत्नखचित कंकण करिचें खोदिव जडिताचे ।
उंच बऱ्हाणपुरचा शालू बुटवेल तऱ्हेचे ।

वाणी उदमी राजेन्द्राचें, देहभान तयाचें ।
त्या प्राणवल्लभेसाठीं उभे हाडुन केव्हांचे ।
गेले होष उडून कितिकांचे, बोलेनात वाचे ।
लोथीवर लोथी दुरस्ता घेरले केव्हांचे ।
सरदार चार ते गुंगले घोड्यावर गुंगले ।
जिकडे नेत्रांचा गरका तिकडेच धूम केली ॥ २ ॥

होनाजीचा आषक म्हणजे सौंदर्यभोक्ता आणि आतांचा सगनभाऊच्या लोभी आसक्तांचा थवा यांत स्पष्ट फरक आहे. तो ध्यानीं आला म्हणजे अशा कवनांतील सूत्र हातीं येईल. माषुक दोन्ही कवनांत सारखीच आकर्षक, चंचल, असत् वचनाची आहे. एकाच राजेंद्राच्या सत्ताकक्षेंतलीं दोन्ही प्रकारचीं आषक व माषुक हीं आहेत. होनाजीनें उभा केलेला आषक विरळा असा एक आहे. सगननें उभा केलेला बहुसंख्याकांचा थवा आहे. त्यांतहि प्रमुख असे चार सरदार आहेत. पण ते घोड्यावर बसलेले असून गुंगलेले आहेत. म्हणजे ते स्वार असून नसल्यासारखेच आहेत. अशा प्रसंगाचा परिणाम मात्र व्हावयाचा तोच झाला.

नार जखमी करून आम्हाला कोणीकडे गेली ।

असा रडतराउतांचा टाहो फोडीत त्यांना जागच्या जागीं बसावें लागलें. सगनचें रचनाचातुर्य येथें अगदीं शिगेला गेलें आहे :—

या जेजुरीचे बनसी सरदार लिभासी ।
रथांतून मुषाफर बुंदखडा गेली घेउन घरासी ।
शृंगारुन मंदिर खासी सुंदर विश्वासी ।
सुस्वभाव दाउन आपला भोगिलें तयासी ।

जणू काय होनाजीच्या कवनांत उभी केलेली समस्या सगननें पूर्ण केली आहे, किंवा आतांच्या रूढ भाषेंत बोलावयाचें तर त्या कवनाचें हें 'सीक्वल' आहे. होनाजीनें फक्त सूचना केली; ती येथें अमलांत आली आहे. होनाजीचा 'हंस'च येथें 'रथी' स्वरूपांत दाखविला आहे. ज्याच्या स्वाधीन रथ तोच रथी. भाडोत्र्यासारख्या रथांत बसलेला तो रथी नव्हे. 'रथांतला बुंदखडा' म्हणजे स्वतंत्र असा रथीच. लाकडाच्या चौकटीवर जडलेलीं हिरें माणकें म्हणजे 'बुंदखडा' नव्हे जो 'हंस' (अहः) तोच हा बुंदखडा. 'स्वतंत्रश्च स्वतंत्रात्मा', ज्याच्यावर कोणत्याहि बाह्य विलोभनाचा परिणाम होऊं शकत नाहीं, आणि तरीहि त्या बाह्याच्या बाबतींत अवलंबावयाचें तंत्र ज्याच्या स्वाधीन तो. रूपगुणैश्वर्य हा त्याचा भाग आहे. होनाजीनें 'तिसऱ्याची' भूमिका घेऊन तें सुचविलें—

गडे बैस हंसाशेजारी

तेंच सगननें ' हंसा ' ची भूमिका घेऊन प्रत्यक्षांत घडलेलें दाखविलें आहे.

श्रीमान् लोक, घोडेस्वार, रथ वगैरे प्रकार कोणत्याहि राज्याच्या वैभवाच्या काळांत असतात आणि सुंदर स्त्रीचें आकर्षण व तिच्या प्राप्तीचा आवेश ओघानेंच त्यांना येतो. तेव्हां उत्तर पेशवाईतले हे शाहीर तोच प्रसंग पहात होते. तोच त्यांनीं कवनांत वठविला, यापेक्षां जास्त कांहीं नाहीं, आणि तसें असल्याचें कोणी दाखवूं गेला तर ती एक ' करामत ' म्हणून निकालांत काढण्यासारखी बाब आहे, असा समज रूढ झाला आहे. पण तो मात्र खोटा आहे.

कवि म्हणजेच विद्वान् सर्वकालांत असे विद्वान् कमी अधिक प्रमाणांत असतात. त्यांची विद्वत्ताहि कमी अधिक असते. त्यांचें जीवन बहुधा या विद्वत्तेंतून प्राप्त झालेल्या द्रव्यसाधनावर चालू असते. म्हणजे ती त्यांची 'वृत्ति'च होऊन बसते. या वृत्तीचें रूप भिन्नभिन्न असतें. तमाशासाठीं कवनें रचणें ही 'वृत्ति' त्यांपैकींच एक आहे. तींत शाहिरांना लभ्यांश होत होता हेंहि निर्विवाद आहे. पण तेवढ्यामुळें त्यांनीं आपल्या 'कवि' पणावर तिलांजली दिली होती आणि केवळ चाटु स्तुतींत आपलें स्वत्व गमावलें असा आक्षेप घेणाऱ्यांना आव्हान देण्यासारखा भाग वरील दोन कवनांत आहे असा इषारा मी देतों आहे.

होनाजीचें व सगनचें कवन पाहिलें आहे. पहिलें सर्वदेशीय व सर्वकालीन स्वरूपाचें आहे; दुसरें त्यापेक्षां कांहीं बाबतींत जास्त सूचक वाटतें. आतां हें तिसरें त्यापेक्षां स्थलनामांनीं स्पष्ट आहे. पण कथाकहाणी आहे. पहिल्या दोहोंत दिसलेली पातळी कहाणींत कायम राहिली नाहीं. वस्तुनिष्ठ कथानांत जखडबंदी जास्त. म्हणून तसें होतें. पण वस्तुस्वरूप जास्त निकटचें, अनुभवांत येणारें असल्याकारणानें समज चटकन पटते. म्हणून मोघमापेक्षां कहाणीवर शाहिरांनीं भर दिलेला आहे. कहाणीकवनाचा उपक्रम असा :—

परस्त्रिचे हो पाई खोरी होईल तक्षणास ।
चांडाळ कोण दुर्जन करील अभिलाष ॥ ध्रु० ॥

शाहीर दादू गोपाळाचें हें कवन. मोरू व मोती हे त्याचे साथी. तेहि पुढें कवन करणारें झाले. ही परंपरा अशी चालत असे. पण मूळच्यांत कांहीं विशेष असलें तर परंपरा चालते. येथें कवीनें सर्वांना लागू असा कांहीं बोध उदाहरणानें सांगण्याचा उपक्रम केला आहे. पुढें कथा सुरु होते ती अशी :—

गुजरण चंद्रवदनी नार । चंद्रगवळी तिचा भ्रतार ।
त्याच्या द्रव्यास नाहीं पारावार ।
पांचशा गवळ्यांचा सरदार ।
त्या पांचशा गवळ्यांची वेगळीं घरं ।

आणिक गाईम्हशींचीं खिल्लारं।

असा हा चंद्रगवळी आपल्या जमावासह परदेशीं व्यवसायासाठीं गेला. घरीं त्याची बायको एकटीच राहिली. ती चंद्रवदना कशी होती--

धन्य ईश्वराची कळा कीं चांगूलपण।
तिला रूप दिलें भगवंतानं।
तिच्या स्वरूपाचें चांदणें पडे राजमंदिरीं।
अशी परी रूपसुंदरी।

या चंद्रवदन गुजरणीस वाटलें आपण दहींदूध विकावयास नजीकच्या उदापूर नगरास जावें. पण सासूनें नकार दिला. कारण—

तिथें उदेभान राजाचा पुत्र मवास।

सासूनें कारण सांगून परवानगी नाकारली, तरी ही गवळण आणखी दहापांच गवळणींबरोबर उदापूर नगरास दहीं विकावयासाठीं हट्टानें गेली.

येऊनि पोहोचली उदापूरनगर।
चौकांत मारी ललकारी गुजरीनार।
आठ पेठा गल्लोगल्ली। दहीं घ्या म्हणून सांगूं लागली।
तिच्या स्वरूपाची मात पसरली दूरवर।
दुरस्ता जमला थाट पहाती जनसार।
वाणी उदमी दुकानदार आणि मोठे सावकार।
लागली जखम काळजापार, झाले कीं चूर।
गपगपा झाकले नेत्र पहातां नूर।
जन म्हणती अरे भगवंता।
अशी निर्मिली सुंदर ही कांता।
नार गवळ्याची ही पतिव्रता सुंदर।
धन्य धन्य प्राणी असला हिचा भ्रतार।

रूपानें सुंदर आणि 'चांगुलपणा' असल्यामुळें त्याचा प्रभाव सर्वसाधारण जनांवर असा झाला. हा 'चांगुलपणा' शाहिरी कवनांत वारंवार येतो. त्याचा अर्थ सात्त्विक भावाचें तेज असा आहे. त्याचा ठसा साधारण जनांवर तसा उमटला आणि ते तिच्याविषयीं अभिलाषबुद्धीनें वागले नाहींत. पण तिची ख्याति राजवाड्यांत राजपुत्रापर्यंत जाऊन पोहोंचली. हा राजपुत्र तरुण आहे. अनेक सुंदर गुणवान् स्त्रियांचा पति आहे. पण 'मवास' आहे. नगरच्या लोकांवर झालेला परिणाम त्याच्या कानीं असा आला कीं, त्यांच्यापैकीं कित्येकांना—

तिला पाहून या पडली भ्रांत नको घरदार ।
ऐकून राजपुत्रास धरवेना धीर ।
हारकारा करून तयार बोलावून आणिली गुजरीनार ।
तिचें रूप पाहुनिया अनिवार राजकुमार ।
" दह्यासहित ज्वानीचें मोल बोल करार ।
आम्ही सौदागर व्यापारी सौदा करूं चाल महालास ।
जें मागशिल तें देऊं नाहीं खुमास "

असा पेचप्रसंग कवीनें उभा केला आहे :–

गुजरण म्हणे रे राजाला ' ऐका ।
सवा लाख दह्याचा पैका ।
बोल ऐकून लागला चुरखा ।
ज्वानीचें मोल काय सांगूं मूर्खा ।
आहे पातिव्रत्य माझा धर्म सांगतें तुला ।
घर कांहीं शरम, अशा गोष्टिनें भोगशिल
कर्मघात जीवाला ।
तूं एकुलता एक पुत्र आहेस राजाला ।
ईश्वरी दया तुजवरी ।
सातीजणी स्त्रिया राजमंदिरीं ।
कीं सिंहलद्वीपच्यापरी । विषयभोगाला ।
आग लागो हें परद्वार व्हावें कशाला ।
जळो जळो हें चांगुलपण कशाला दिलें भगवंतानं ।
संचितीं काय लिहिलें ब्रह्मयानें । कळेना मजला ।
हें संकट कसें ओढवलें सांगुं कवणाला ।
आतां सांगतें, गोष्ट कर जतन, परावी नार
जिवाला घातण ।
अशा गोष्टींनें पावले पतन । मुकले प्राणाला ।
हें पुरतेपणीं शोधुन पहावें मनाला ।
लंकापति रावण । पहा त्याची गति झाली कोण ।
राज्य बुडाविलें सीतेच्या पायीं कुलक्षय झाला ।
कीचक द्रौपदीस लुब्ध झाला ।
पतिव्रतेसि डाग लावीला

त्याचा कुलक्षय होईल जाईल भंगाला ।
इंद्राला पडलीं भगें सर्व अंगाला ' ॥
ऐशी बोलून गुजरीनार निघून चालली सूळ ठायास ।
ऐकून जखम लागली राजपुत्रास ॥ ३ ॥

आठ कड्यांचें हें कवन आतां तिसऱ्या कडीपर्यंत आलें आहे. गुजरीनार रूपानें सुंदर पण ' पतिव्रता ' धर्मानें वागणारी आहे. तिनें परस्त्रियेच्या पायीं धुळीस मिळालेल्या रावण, कीचक, इंद्रादिकांचे दाखले दिले आहेत. ते पुराणांतले दाखले आतां चघळून चोथा झालेले आहेत, असा अभिप्राय सध्यांच्या कित्येक साक्षरांचा असला तरी कवि त्यांच्या काळांतला नाहीं. आतांच्या वाचकांवर परिणाम करणार नाहींत म्हणून अन्य कांहीं दाखले त्यानें अगाऊच देऊन ठेवले नाहींत ही त्याची चूकच आहे. दुसरें असें कीं, पतिव्रता धर्म हा आतां अनाकलनीय असा एक जुनाट संकेत आहे. अर्थात् त्याची मातबरी किती ? गफलतीमुळें परपुरुषाशीं संग घडलेला ध्यानीं आल्यावर देहविसर्जन करणारी ग्रीक वाङ्मयांतील लुक्रेशिया किंवा आपला शांत पति कांहीं घोर विचारांनीं भारावून जाऊन मुग्ध झालेला पाहून विषादानें देह सोडणारी ब्रूटसची पत्नी पोर्शिया, अनुरूप नसलेला पण प्रेमळ असलेला पति अथेल्लो याच्याशीं निष्ठेनें वागणारी डेस्डेमोना या स्त्रिया इंग्रजीच्या द्वारानें माहीत होतात. तो अंधकारयुगाचा काळ. त्याची आठवण कोठपर्यंत करीत बसणार ? आतां ' प्रेमाच्या ' त्रिकोणांत, चौकोनांत वा पंचकोणांत रममाण होणाऱ्या आणि मध्यंतरीच्या काळांत कोठेंच कायमचें जमेनासें झाल्यामुळें जें मिळेल तें विषमहि स्थान निमूटपणें पत्करून तेथील बेगडी ऐश्वर्यांत समाधान मानण्याचा काल आहे ! त्याच्या उलट तरुणपणांत केवळ मोकाट स्वातंत्र्यांत वरवरचे रंगढंग केल्यावर सत्पात्र स्थानांची प्राप्ति आणि तेथें मात्र मध्यंतरीच्या सर्व उच्छृंखलपणावर बोळा फिरविणारी वागणूक, अशी हीं क्वचित् उदाहरणें आहेत. या प्रकारांत स्थैर्याची कल्पना नाहीं हें उघड आहे.

कवनांतली गुजरीनार अशी अस्थिर नाहीं. राजपुत्राच्या अविचारी व अतिरेकी वागणुकीचा तिच्या मनावर कांहीं परिणाम झालेला नाहीं.

राजपुत्राच्या बोलण्यावरून रागावून गुजरीनार निघून जाऊं लागली तेव्हां प्रेमानें वेडावलेला--

राजा म्हणे ऐक नारी तुजवर नाहीं करीत बळजोरी ।
खुशीचा सौदा करूं परद्वारीं ।

हें सारें प्रेमाचें प्रकरण आहे. कोणीं कोणावरहि प्रेम करावें असा सरळ मामला आहे. यांत आप कसलें आणि पर कसलें. पण आतांच्या तात्पुरत्या स्थिर

प्रेमालादेखील बँक अकौंटची बैठक लागतेच. अगदीं तात्पुरतें प्रेमसुद्धां खर्चिक साधनांखेरीज सफल होत नाहीं. राजपुत्राला तो सारा प्रकार अवगत होता—

तुला सोन्यानें मढवीन सारी ।
नारि ऐक सांगतो तुला, बोल एकदा करूं दे सल्ला
तुझ्या ज्वानीचा पाहूं मासला, चाल एकांतीं ।
मना चैन पडेना फेड मनाची भ्रांती ॥

राजपुत्रानें यानंतर आपल्या इच्छेप्रमाणें वागल्यास आपल्या सर्व ऐश्वर्याचें विलोभन तिच्यापुढें मांडलें. इतकेंच काय, तिला पट्टराणी करण्याचें आमिष दाखविलें. तिच्या कंटकमय अरण्यवासाची व आपल्या प्रासादाची तुलना केली. असें नानापरीचे प्रयोग करूनहि ती मान्य होईना तेव्हां—

मग उतावळा तिला जाउनि धरिली पदरास ॥ ४ ॥
गवळण म्हणे ' रावराजींद्रा । विनंति ऐका सुखचंद्रा ।
तुला काय कमी आहे भाग्येंद्रा ।
सोड जाऊं दे नको धरूं पदरा । '

माझ्या संगतीच्या गवळणी परत घरीं जावयास निघाल्या असतील. अस्तमान होत आला. मला जाऊं दे. तरी तो सोडीना. तेव्हां ती म्हणते—

अरे सूर्खा कांहीं धर सुमार
किती सांगशिल तरी पडिभार गोष्टी मजला ।
आग लागो तुझ्या धनद्रव्याला, हवें कुणाला ।
माझ्या घरीं निवंता नाहीं धनद्रव्याला ।
तुझ्या घरीं हत्तीघोडे लाव लष्कर ।
पालखी पागा दास चाकर ।
माझ्या घरीं गाईम्हशींचीं खिल्लारं गणति नाहीं त्याला ।
हिऱ्याची लागली खाण, कोण पुसतो माणिकमोत्याला ।
तुझ्या पट्टराण्या सातीजणी, तशा माझ्या दासी कुणबिणी ।
नित्य राबती सदा निशिदिनीं घरकामाला ।
मी जशी राधा गोकुळीं तसे सुखसोहळे भोगी ।
त्याला कर्दनकाळ माझा भ्रतार ।
पांचशा गवळ्यांचा सरदार, राजदरबारीं कुल अखत्यार ।
त्याचा बोलबाला । तुजसारखे चाकर आहेत सेवेला । '
अशी ऐकुन लागली जखम राजपुत्राला ।
हा जिव गेला तर जाऊं हात लावीन इच्या मालास ॥ ५ ॥

अशा त्वेषानें राजपुत्रानें तिला मागील अंगणांत ओढून नेऊन बसविलें. गुजरीला अत्यंत दुःख झालें. ती देवाची करुणा भाकूं लागली :—

भक्तकैवारी शंकर भोळा करुणा आली कणवला ।
झाला सुवर्णाचा कावळा आला त्या ठायीं ।
भगवान तिनें वळखिला, मग लागली पाई ।
मग नेत्रींचें अंजन काढी पत्र लिहिलें बहु तातडी ।
कावळयापुढें ठेविली घडी, धाव या समयीं ।
प्राणपती मला आणुनि भेटवी लवलाही ।

हें पत्र कावळ्यानें तत्काळ जाऊन गवळणीचा भ्रतार जो चंद्र गुजर ह्याला पोहोंचविलें. तो टाकोटाक आपल्या पांचशें गवळ्यांच्या सैन्यासह शहरांत नाकेबंदी करून राजवाड्यांत निर्भयपणानें गेला व आपल्या भार्येसाठीं आपण प्राणपणानें लढणार असा आपला निर्धार त्यानें जाहीर केला. राजानें राजपुत्राला कळवून त्याला आणविलें; आणि गुजरणीस सोडून देण्याचा उपदेश केला. पण व्यर्थ—

मग बोले राजकुमार ' गवळया पहा पुरता सुमार ।
गुजरी नाहीं तुला देणार । लखाखित आहे खड्गाची धार ।
तीन हातांचा नेम निर्धार ।
ज्याची फत्ते होईल समशेर ।
त्यानं न्यावी गुजरीनार घराकारण ।'
असा सभेमधिं बोलला राजनंदन ।
खड्ग घेऊन अतिलवलाही ।
म्हणे ' अरे गवळया सावध होई ' ।
हातांमधि हात मारले घाई करूनि संधान ।
तीन हात ढालेवर चुकविले गवळयानें ।
गवळी उठतां पडली भ्रांत
एका हातांत करावा घात
येऊन गुजरीनें धरला हात
' द्यावा सोडून, हा एकुलता एक पुत्र राजाकारण ' ।
उदेभान राजा नृपती चंद्र गुजराची करी विनंति ।
' बरी आज मेहेर केली मजवरती, दिलं जिवदान ।
ही गुजरी माझी कन्या गुणनिधान ' ।
त्याला पोषाक दिला भरजरी ।
मोत्या पवळयांनीं ओटी भरी । करी बोळवण ।

पाश्चात्त्यहि आहे. मला तें फक्त नांवानें ठाऊक आहे. त्याची चर्चा करण्याचा मला अधिकार नाहीं; पण शाहिरी वाङ्मयांत सौंदर्य असतें, म्हणून त्याकडे विद्वानांचा ओढा असतो हें मला माहीत आहे. घटनासौंदर्य, आकारसौंदर्य असे कांहीं प्रकार त्यांचे मला दिसतात. त्यांच्या अनुरोधानें मला त्यांचा विचार करणें प्राप्त आहे. घटनासौंदर्याचे शाहिरींतले नमुने मीं आतांपर्यंत कांहीं दाखविले. आतां आकारसौंदर्यापर्यंत प्रवास आला आहे, म्हणून त्याचें स्वरूप प्रथम निश्चित करणें जरूर आहे. मराठी कवनांत तें विशेष प्रमाणांत असतें. यामुळें त्यावर कांहीं लोक तुष्ट असतात, तर दुसरे कोणी रुष्ट आहेत. यांत सूचनेमुळें हा फरक पडतो हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. पण खरें सौंदर्य म्हणून कांहीं निरपवाद असें असूं शकतें. यावर दृष्टि ठेवून शास्त्रकारांचें बोलणें असतें. रूपसौंदर्याच्या विचारांना चालना देतांना त्याचा 'मूळ पाया' 'मुळारंभींची कथा' ऐकून पाहावयाची आहे. ज्ञानाचा बोध व्हावा म्हणून जें श्रुतिरूप उपनिषद् वाङ्मय निर्माण झालें तेथपर्यंत गेल्यावर दिसतें तें असें:—एकदा असुरांवर जय मिळाल्याच्या आनंदांत इंद्र, वायु व अग्नि यांसहित असतां त्याला प्रतीत झालेल्या यक्षाला त्यानें जाणलें नाहीं. त्या यक्षाच्या सामर्थ्यापुढें हतबल झाल्यानंतर त्याला जाणण्याची तीव्र इच्छा इंद्राला झाली असतां त्याच्या दृष्टीसमोर 'बहुशोभमाना उमा हैमवती' प्रकट झाली, व तिच्याकडून यक्ष तेंच ब्रह्म होतें असें ज्ञान झालें.

येथें यक्षाच्या आकाराचें अथवा रूपाचें वर्णन नाहीं. पण उपनिषत्काराला इंद्राला दर्शन देणाऱ्या उमेचें बहुशोभमाना व हैमवती असें वर्णन करणें जरुरीचें वाटलें आहे. ही सोनपुतळी इंद्राला ब्रह्माचें ज्ञान करून देती झाली आहे.

ही पहिली जोडी. एक अरूप व दुसरी दीप्तिमान्. तिच्या मार्फतीनें शुद्ध दृष्टीच्या इच्छुकाला बृहत् झालेल्या ब्रह्माचें परोक्षदर्शन अर्थात् त्रैलोक्याचें ज्ञान होणारें. ही कथा केनोपनिषदांतली आहे. त्यावरून विस्तारलेलें एक संस्कृत शाहीर कवन असें :—

गौरांगी नवयौवना शशिमुखी तांबूलगर्भानना
मुक्तामण्डनशुभ्रमाल्यवसनां श्रीखंडचर्चाङ्गिताम् ।
दृष्ट्वा कामपि कामिनीं स्वयमिमां ब्राह्मी पुरो भावये-
दन्तश्चिन्तयतो जनस्य मनसि त्रैलोक्यमुन्मीलिनम् ।

सत् सौंदर्याचें दर्शन हें त्र्यैलोक्याच्या दर्शनाचा भाव निर्माण करण्यास समर्थ आहे असा भावार्थ आहे. आतां या अनुरोधानें मराठी शाहिराची रचना पाहा –

साक्षात् कला चंद्राची इच्या अंगीं वसली ।
ईश्वरें हातानें कृति घडूनिया कसली ।

शृंगार करून लाल झुरक्यामधें बसली ।
करि आदा पाहुन जीव फिदा मनामधें ठसली ॥
गोरे गाल गुलाबी नाजुक अपूर्व चेहेरा।
दीक्षा शीक्षा मधें एक देखणी भार्या ।
करि झगझगाट चकचकाट प्रकाशित सूर्या ।
चकलोट चमाचम गगनीं चमकली बिजली ।
मारी नयन शयन करी गर्द उभी चौमजलीं ।
नटदार नार देखणी दिव्य रूप सजली ॥ १ ॥
सडपातळ कुरळे केश शिरावर झुलती ।
मुखचंद्रकळा कोकिळा गळा सरदार ।
वदनांत रंगला विडा मसालेदार ।
पायीं बिजव्याचा झणकार छबक छबिदार ।
अनिवार फार दिव्य रूप सजली ॥ ·

नरपतिजयचर्या या स्वरशास्त्रांतल्या प्राचीन ग्रंथांतला वर दिलेला संस्कृत श्लोक पुढें ठेवून शाहिरानें हें कवन रचलें कीं काय असा भास होण्याइतका सादृश्यभाव दोहोंमध्यें आहे. शाहिरींतील स्त्रीस्वरूपवर्णनाचा मूळ पाया हा असा आहे.

रामजोशीबावांना वडिलपणाचा मान देणें सर्व बाजूंनीं योग्य. पण आणखी कित्येक शाहीर हा रंग उभा करण्यांत सिद्धहस्त होते. अशांच्यापैकीं होनाजी कवीचें एक कवन येथें देतों. दोन्ही कवींच्या वर्णनांत म्हणजे शब्दरचनेंत व योजलेल्या अलंकारांत सारखेपणा आहे, पण फरकहि आहे. मूळचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवून हीं कवनें झालीं असल्याकारणानें सादृश्य ओघानेंच आलें. पण प्रकृतिभेदानें वैचित्र्यहि आलें. होनाजीचें कवन असें :—

सखे गुलअनार गुलचमन निशीचा रमण,
तसा गोजिरा तुझा मुखवटा ।
कंठामधि कोयल मधुर बोलणें रंग तुझा गोरटा ॥ ध्रु. ॥
बांधिव बुचड्याची लबक पदर अति सुबक
खोविला तिनपदरी वेणिचा ।
चंदन डाहाळिस लपेटा काळ्या नागिणीचा ॥
मुलतानी भुंवया कशा कमाना जशा,
बहार मधिं कुंकाचे टिकलिचा ॥
नरम ओठ पोवळे नासाग्रीं झोक तुझ्या नथनिचा ॥
कंबर बारिकसी बुंद छाति तुझी रुंद,
सडक बांधा तुझ्या देहाचा ॥

या द्वंदांतील पराजयामुळें हिरमोड झाल्यामुळें राजपुत्रानें आपल्या हातानें आपल्या शरीरास अग्नींत भाजून मरण पतकरलें--

राजकुमार मृत्यु पावला बातम्या गेल्या चंद्र गुजराला ।
गुजरीसहित परतुनि आला राजसभेला ।
म्हणे ठीक नाहीं झालें आग लागली दर्याला ।
मग चंद्र गुजर समजुन चित्तीं ।
बोले ' गुजरी तयाच्या संगें जावें सति ।
सांगतो तुजला जनामधिं लौकिक होईल सांगायला ' ।

चंद्र गवळ्याची ही सूचना गुजरीनें मान्य केली आणि ती राजपुत्राबरोबर त्याच्या सात राण्यांसह सती गेली. राजानें आपलें राज्य चंद्र गवळ्याला दिलें. सारांश,

या विषयापायीं बहुजण मुकले प्राणाला ।

हें दाखवून कवीनें आपला कथाकवनाचा संकल्प पूर्ण करून दाखविला आहे.

यापूर्वीं पाहिलेल्या दोन कवनांतील सूचित प्रसंग येथें कथारूपानें उभे केलेले आहे. तिन्हींमध्यें गर्भसूत्र एकच आहे. त्याची गुंफण व उलगडा यांच्यांत मेळ आहे, तो कसा हें सांगणें जरूर आहे. हीं कवनें मनोरंजक म्हणून रचलेलीं दिसतात आणि तीं तशीं परिणामतः आहेतहि. शाहिरींत जन्म घेतलेला कवि अशीच मिश्रस्वरूपाची रचना करण्यांत आनंद मानणारा असतो. हा नुसता कोरडा निर्वाळा देऊन काय उपयोग ? कांहीं रोकडें असलें तर त्याच्यावर नजर जाईल.

आषकांच्या तीन तऱ्हा पाहिल्या. माषुकाची एकच तऱ्हा आहे. आणि तेथेंच खूण आहे. पहिला आषक पुनः तिसऱ्या कवनांत पतीच्या रूपानें आहे. माषुकाची प्राप्ति पहिल्याला सत्वर झाली. तिसऱ्यांतला तर मान्य असा पतीच आहेत. पहिला आषक माषुकाला ओळखून आहे. हा आपलाच भाग आहे हें त्याला पूर्णपणें माहीत आहे. माषुकाचा स्वभाव तो जाणतो. ती आपल्याकडेच येणार हेंहि त्याच्या ध्यानीं आहे, म्हणून तो सहजासहजीं घडेल त्याचा स्वीकार करणारा आहे. त्यासाठीं तडफडणारा नव्हे. म्हणजे तो भोग्याची वास्तविक किंमत कबूल करूनहि त्याविषयीं आसक्ति धरीत नाहीं. दुसऱ्या कवनांत बुंदखड्याविषयीं माषुकानें आपली पसंती सर्वांच्या देखत राजरोसपणें दाखवून दिली आहे. पहिल्या दोन्ही कवनांतले बहुसंख्य नामधारी आषक चुरमुरे खात बसले आहेत. त्यांच्या कर्मांत तेंच आहे. तिसऱ्या प्रसंगांत खरे आषकमाषुक परस्परांत जणू काय एकजीव झालेलीं असतां राजपुत्राच्या रूपानें एक अतिरेकी नामधारी आषक तिच्या रूपावर भुलला आहे. त्याची मर्यादा तितकीच आहे. म्हणजे तो

दुर्बळ जीव आहे. त्याचें चंचळ मन त्याच्यावर पगडा बसवून आहे. आणि सहाजिकपणें इंद्रियांच्या द्वारा उपभोगता येणाऱ्या सुखाची तीव्र अभिलाषा त्याला आहे. त्या सुखाचा त्रास त्याच्या मनाला होईल, त्याला नाहीं. तो सत्ताधीश असूनहि मनाच्या ताब्यांत गेल्यामुळें इच्छेनें प्रबल पण शक्तीनें दुर्बल आहे; आत्मविश्वासाच्या अभावाचा परिणाम त्याच्या पराभवांत झाला आहे; आणि तीच दुर्बलता त्याला प्राणत्याग करावयास कारण झाली आहे. ही पाहणी येथें संपली तर कवीचें हृद्गत पूर्णपणें प्रत्ययास येणार नाहीं. लौकिकांत कधीं न घडणारा प्रसंग येथें उभा करून कवीनें आपल्या आशयाची स्पष्ट खूण दिली आहे. आपल्या पत्नीवर नजर ठेवणाऱ्या राजपुत्राबरोबर आपल्या पत्नीनें सती जावें असा आदेश देणारा कोणी जीव लौकिक इतिहासाला सहज दाखवितां येणार नाहीं. तो अलौकिक आहे. त्याचें अंतरंग नुसत्या लौकिक दृष्टीनें कळणारें नाहीं. समान प्रसंगांत पत्नीला अभिलाषी जीवाला देहार्पण करूं लावणारा असा महात्मा कबीर एखादाच असतो. तोच शिव. ‘ द्रष्टा, साक्षी, अंतरात्मा ’ अशा स्वरूपाचा. ही शास्त्रीय संज्ञा आहे. शिवरूपी गवळ्यानें राजपुत्र व पत्नी या दोहोंचें देहविसर्जन घडवून आणलें आहे. देहभाग होता तोंपर्यंत जीव असणारा आतां शिवच आहे. गुजरीच्या रूपांतली शक्ति त्याचीच आहे. गवळी व राजपुत्र दोन्ही एकच झाल्यावर म्हणजे शिवस्वरूपीं झाल्यावर तेथेंच शक्तीचाहि वास असणार.

आसक्त व अनासक्त असे जीवाचे दोन प्रकार उपनिषदीय तत्त्वज्ञानांत स्पष्ट आहेत. श्वेताश्वतर उपनिषदांत (४ : ५) हा भाग आला आहे.

अजामेकां लोहितशुक्लकृष्णां ।
बह्वीः प्रजाः सृजमानां सरूपाः ॥
अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते ।
जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्यः ॥

बकरीच्या रूपकानें हें सांगितलें आहे. एका बकरीवर एक बकरा आसक्त, दुसरा भोगतो पण सोडून देतो. येथें भोग्य वस्तूचा निर्देश आहे. एकाची आसक्ति आणि दुसऱ्याची अनासक्ति स्पष्ट करण्यासाठीं हा दृष्टान्त आहे. आसक्ताला भोग जिंकतां येत नाहीं, पण अनासक्ताचा तो भोग सहजच होतो. श्रीज्ञानेश्वर म्हणतात —

‘ जेवी सकामा न जिणवेची वनिता ’

ज्ञानेश्वरी ७ : १६

सौंदर्य व त्याचें दर्शन —

सौंदर्यदर्शन घडविणें हा वाङ्मयाचा एक हेतु मान्य झालेला आहे. सौंदर्य म्हणजे काय याविषयीं शास्त्र निर्माण झालें आहे. तें भारतीय आहे तसेंच आतां

पाश्चात्त्यहि आहे. मला तें फक्त नांवानें ठाऊक आहे. त्याची चर्चा करण्याचा मला अधिकार नाहीं; पण शाहिरी वाङ्मयांत सौंदर्य असतें, म्हणून त्याकडे विद्वानांचा ओढा असतो हें मला माहीत आहे. घटनासौंदर्य, आकारसौंदर्य असे कांहीं प्रकार त्यांचे मला दिसतात. त्यांच्या अनुरोधानें मला त्यांचा विचार करणें प्राप्त आहे. घटनासौंदर्याचे शाहिरींतले नमुने मीं आतांपर्यंत कांहीं दाखविले. आतां आकारसौंदर्यापर्यंत प्रवास आला आहे, म्हणून त्याचें स्वरूप प्रथम निश्चित करणें जरूर आहे. मराठी कवनांत तें विशेष प्रमाणांत असतें. यामुळें त्यावर कांहीं लोक तुष्ट असतात, तर दुसरे कोणी रुष्ट आहेत. यांत सूचनेमुळें हा फरक पडतो हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. पण खरें सौंदर्य म्हणून कांहीं निरपवाद असें असूं शकतें. यावर दृष्टि ठेवून शास्त्रकारांचें बोलणें असतें. रूपसौंदर्याच्या विचारांना चालना देतांना त्याचा 'मूळ पाया' 'मुळारंभींची कथा' ऐकून पाहावयाची आहे. ज्ञानाचा बोध व्हावा म्हणून जें श्रुतिरूप उपनिषद् वाङ्मय निर्माण झालें तेथपर्यंत गेल्यावर दिसतें तें असें:—एकदा असुरांवर जय मिळाल्याच्या आनंदांत इंद्र, वायु व अग्नि यांसहित असतां त्याला प्रतीत झालेल्या यक्षाला त्यानें जाणलें नाहीं. त्या यक्षाच्या सामर्थ्यापुढें हतबल झाल्यानंतर त्याला जाणण्याची तीव्र इच्छा इंद्राला झाली असतां त्याच्या दृष्टीसमोर 'बहुशोभमाना उमा हैमवती' प्रकट झाली, व तिच्याकडून यक्ष तेंच ब्रह्म होतें असें ज्ञान झालें.

येथें यक्षाच्या आकाराचें अथवा रूपाचें वर्णन नाहीं. पण उपनिषत्काराला इंद्राला दर्शन देणाऱ्या उमेचें बहुशोभमाना व हैमवती असें वर्णन करणें जरुरीचें वाटलें आहे. ही सोनपुतळी इंद्राला ब्रह्माचें ज्ञान करून देती झाली आहे.

ही पहिली जोडी. एक अरूप व दुसरी दीप्तिमान्. तिच्या मार्फतीनें शुद्ध दृष्टीच्या इच्छुकाला बृहत् झालेल्या ब्रह्माचें परोक्षदर्शन अर्थात् त्रैलोक्याचें ज्ञान होणारें. ही कथा केनोपनिषदांतली आहे. त्यावरून विस्तारलेलें एक संस्कृत शाहीर कवन असें :—

> गौरांगी नवयौवना शशिमुखी तांबूलगर्भानना
> मुक्तामण्डनशुभ्रमाल्यवसनां श्रीखंडचर्चाङ्किताम् ।
> दृष्ट्वा कामपि कामिनीं स्वयमिमां ब्राह्मी पुरो भावये-
> दन्तश्चिन्तयतो जनस्य मनसि त्रैलोक्यमुन्मीलिनम् ।

सत् सौंदर्याचें दर्शन हें त्यैलोक्याच्या दर्शनाचा भाव निर्माण करण्यास समर्थ आहे असा भावार्थ आहे. आतां या अनुरोधानें मराठी शाहिराची रचना पाहा —

> साक्षात् कला चंद्राची इच्या अंगीं वसली ।
> ईश्वरें हातानें कृति घडूनिया कसली ।

श्रृंगार करून लाल झुरक्यामधें बसली ।
करि आदा पाहुन जीव फिदा मनामधें ठसली ॥
गोरे गाल गुलाबी नांजुक अपूर्व चेहेरा।
दीक्षा शीक्षा मधें एक देखणी भार्या ।
करि झगझगाट चकचकाट प्रकाशित सूर्या ।
चकलोट चमाचम गगनीं चमकली बिजली ।
मारी नयन शयन करी गर्द उभी चौमजलीं ।
नटदार नार देखणी दिव्य रूप सजली ॥ १ ॥
सडपातळ कुरळे केश शिरावर झुलती ।
मुखचंद्रकळा कोकिळा गळा सरदार ।
वदनांत रंगला विडा मसालेदार ।
पायीं बिजव्याचा झणकार छबक छबिदार ।
अनिवार फार दिव्य रूप सजली ॥

नरपतिजयचर्या या स्वरशास्त्रांतल्या प्राचीन ग्रंथांतला वर दिलेला संस्कृत श्लोक पुढें ठेवून शाहिरानें हें कवन रचलें कीं काय असा भास होण्याइतका सादृश्यभाव दोहोंमध्यें आहे. शाहिरींतील स्त्रीस्वरूपवर्णनाचा मूळ पाया हा असा आहे.

रामजोशीबावांना वडिलपणाचा मान देणें सर्व बाजूंनीं योग्य. पण आणखी कित्येक शाहीर हा रंग उभा करण्यांत सिद्धहस्त होते. अशांच्यापैकीं होनाजी कवीचें एक कवन येथें देतों. दोन्ही कवींच्या वर्णनांत म्हणजे शब्दरचनेंत व योजलेल्या अलंकारांत सारखेपणा आहे, पण फरकहि आहे. मूळचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवून हीं कवनें झालीं असल्याकारणानें सादृश्य ओघानेंच आलें. पण प्रकृतिभेदानें वैचित्र्यहि आलें. होनाजीचें कवन असें :—

सखे गुलअनार गुलचमन निशीचा रमण,
तसा गोजिरा तुझा मुखवटा ।
कंठामधि कोयल मधुर बोलणें रंग तुझा गोरटा ॥ ध्रु. ॥
बांधिव बुचड्याची लबक पदर अति सुबक
खोविला तिनपदरी वेणिचा ।
चंदन डाहाळिस लपेटा काळ्या नागिणीचा ॥
मुलतानी भुंवया कशा कमाना जशा,
बहार मधिं कुंकाचे टिकलिचा ॥
नरम ओठ पोवळे नासाग्रीं झोक तुझ्या नथनिचा ॥
कंबर बारिकसी बुंद छाति तुझी रुंद,
सडक बांधा तुझ्या देहाचा ॥

लाजुन बसलिस दूर, पदर शिरिं सरसावुनि युक्तिचा ॥
नैनाचा कहरी झोंक, जराशी नोक,
कळे नाकळे फिरविशी पटा ॥ १ ॥
कानांत काप, साखळ्या, दंडिं दंडुळ्या,
शिरिं शोभे केकत राखडी ।
चोळि अंगामधिं तंग, बहुत नादर दिससी फाकडी ॥
हिरकण्या दंतपंक्ति, अधर संगति,
त्यांत सखु तुझी रंगली विडी ।
कंठामधें पीक दिसे अशि ग तूं रूपसुंदर फुलछडी ॥
तुझी आमची सोहबत, पाक झालों मुश्ताक,
तुजवरि आम्ही इष्की गडी ।
चैन पडेना कुठं याद सखु होति तुझी घडिघडी ।
वाटे दर्दाचें भय, भरवंसा नये,
तुम्हि नारि केवळ चंचल नटा ॥ २ ॥

श्रीशंकराचार्यांच्या शतश्लोकींतील वर्णनाचाच हा विस्तार आहे. म्हणून त्याविषयीं विशेष लक्ष ठेवण्याचें कारण उरलेलें नाहीं. अशा स्त्रियांना उद्देशून एक विशेषनाम या कवनांत आलें आहे. ' सखु ' हें तें नांव.

उंबर सोळासत्रांत, शरम नेत्रांत, दशा तारुण्य लहान आकृति ।
रूप रंग आणि सुवास निर्मळ जसिं पत्रें केकती ॥
या तीन गुणांची निधि, गजाचे पदीं गमन तुझे मधिं मर्यादा किती ।
या चिन्हें मंडित पाहुन खुष तुजवर चित्तवृत्ति ॥
चातुर्यपणें मन धरून आर्जवावरून सखे तूं मोहिलेस मजप्रती ।
रसिक भाषणामधीं उभयतां नित घडती जागृति ॥
गोड गोड ऐकुनी शब्द, होतसों लुब्ध, कशि सहजांत उडविसी घटा ॥ २ ॥
सखे तुझ्या गळ्याची आण आम्हाला ध्यान लागलें फार तुझें सुंदरी ।
जीवा वाटे हुरहुर गडे तूं दृष्टिस न पडसी जरी ॥
मुख पहातों तुझें गडे जेव्हां मनामधें हर्ष आमचा न मावे अंबरीं ॥
पाक स्नेहामधि कलप कदा काळीं न पडे तें करी ॥

हें कवन ज्या पातळीवरून रचलें आहे तिची प्रचीती शाहिराच्या शब्यांतून निश्चित येते.—

जेथ अशा स्नेहाचि जात तेथ उभयतांत नसावा द्वैतभाव ओखटा ॥
होनाजी बाळा म्हणे ने पाक प्रीति शेवटा ॥ ४ ॥

या कवनांतील सखे, सखु या शब्दांवर मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. सखा, सखी हे शब्द व्यवहारांत कमी असले तरी संस्कृत वाङ्मयांत वारंवार येतात. नायिकेच्या बरोबर एक सखी असावयाची. ती मोलानें ठेविलेली नौकराणी नसते तर मनें जुळल्यामुळें जवळ आलेली अशी नायिकेचें हित चिंतणारी असते. ती चतुर असते. तिची सूचना व तिचें साहाय्य फार होतें. पुढें वाङ्मयांत 'आप्त' शब्द आला आहे. तो पुरुषवाचक असला तरी मुळांत त्याच अर्थाचा आहे. अर्थानें नाम व पुढें सखा हा शब्द उपनिषदांत व गीतेंत सारख्याच अर्थानें आहे. 'द्वा सुपर्णा सयुजाः ससखाः' परमतत्त्वानें आकार धारण केला, तें एका अर्थानें पतन आहे. पण तें होतांना त्यानें शिव व जीव अशा दोन आविर्भावांचें रूप धारण केलें ते दोन्ही आविर्भाव एकाचेच आहेत, म्हणून ते एकमेकांचे सखा आहेत. दोहोंच्या वृत्तींत फरक आहे. हा भाग पूर्वीं येऊन गेलाच आहे. सखी, सखा या शब्दानें स्वतःचें सत् मन असा अर्थ निघतो. सज्जन मन समर्थांनीं बोधाला उद्देश्य धरलें आहे. दुसरा अर्थ प्रतिबिंब रूप. तें अत्यंत आवडणारें. म्हणून तें स्त्रीलिंगी कल्पून त्याच्यासाठीं सखे, अथवा पुल्लिंगी कल्पून सख्या अगर सखया असें संबोधन योजण्याचा परिपाठ शाहिरी कवनांत आहे. तो कसा शुद्ध आहे हें दर्शविणें जरूर वाटलें. श्रीज्ञानेश्वरांचें 'रया' हें संबोधन समर्थांनीं स्वीकारलेल्या अर्थाचेंच आहे. शाहिरींत त्याचा अपभ्रंश 'राया' असा झाला आहे, तो याच अनुषगांत शाहिरी कवनांत वापरला जातो. दोन्ही एकच आहेत. पण प्रसंगपरत्वें अर्थांत फरक पडतो, तो ध्यानीं असावा.

पुरुषाकृतीचें सौंदर्य —

आतां पुरुषरूपाच्या वर्णनाचा विचार करावयाचा. 'पुरुष' मुळांतच अरूप. त्याचें रूप घेतलें तेव्हां त्याचें वर्णनहि असेंच पण बहारीचें करण्याकडे सर्व कवींची प्रवृत्ति आहे. ती इच्छा पूर्ण करण्याकरितांच कीं काय औपनिषदीय षोडशकल पुरुषाचा प्रतिनिधि असा पूर्ण अवतार श्रीकृष्ण ही नररूपाची पराकाष्ठा होती. बालकृष्णरूपाच्या वर्णनांत शाहिरांनीं आपल्या परीनें भाग घेतला आहे. गवळण प्रकार सांगतांना तो भाग येऊन गेलाच आहे.

तथापि या ओघांत एक मोलाचें कवन उल्लेखावेसें वाटतें. कृष्णाची पालक माता यशोदा त्याला सकाळीं उठून इतर सवंगड्यांबरोबर गाई चारावयास जाण्या-साठीं उठवीत आहे. असा प्रसंग साधून शाहीर होनाजीनें एक अत्यंत हृदयंगम कवन रचिलें आहे. तें त्या काळापासून भूपाळ्यांच्या सदरांत अग्रमान पटकावून बसलें आहे. या कवनांत कृष्णाचें रूपवर्णन अगदीं थोडें व गुणवर्णन बरेंचसें आलें आहे. यशोदा 'घनश्याम सुंदरा श्रीधरा 'ला उठवूं पाहात आहे. रूपाचें वर्णन या

तीन शब्दांतच आहे. पण त्या तीन शब्दांत सर्व वेदान्तशास्त्र आलें आहे. परमात्मा सर्वत्र आहे. अपरिचित म्हणून घन आहे. तो आंत आहे म्हणून श्याम आहे.

हिरण्मये परे कोशे विरजं ब्रह्मनिष्कलम् ।

कारण वरचा आकार श्रीचा आहे, व ती श्री त्यानें धारण केलेली आहे. अर्थात् तो सुंदर आहे, इतकें वर्णन आकाराचें करतां आलें. शेवटीं गुणवाचक विशेषणांनीं कृष्णाचें वर्णन आहे. त्याकडे सामान्य वाचकांचें लक्ष कमी जातें म्हणून तें येथें समग्र देतों.

मुनिजनमानसहंसा, हे गोपिमनकमलभृंगा ।
मुरहरपंकजपाणि, पद्मनाभश्रीरंगा ।
शकटांतकसर्वेशा, हे हरि प्रतापतुंगा ।
कोटि रवीहुन तेज आगळे तव वदनाला ।

या बाळकृष्णरूपाहून निराळा असा थाट श्रीज्ञानेश्वरांनीं उभा केला आहे. एक बागलाणी भक्त देवाला उद्देशून म्हणतो :—

में दुरथी कर जोडूं । तान्हो सेवा न जाणू ॥ १ ॥
मन्हारे कान्हा मन्हारे कान्हा ।
देखि का न गेणारे मन्हारे कान्हा ॥ ध्रृ० ॥
तान्हा मराठा देश । मन्ही बागलाणी भाष ।
घटि पटि विजार । खंडे भाले सरवार ।
बाप रखुमादेवीवरु जाण । मन्हारे कान्हा ।

ज्ञानेश्वरांचा ‘ कान्हा ’ हाच बाप रखुमादेवीवरु आहे. पण त्यानें ‘ घटिपटि-विजार ’ परिधान केली असून हातीं खंडेभाले तरवार हीं आयुधें आहेत. हा चमत्कार आहे म्हणजे कवि ज्ञानेश्वरांचें हें बुद्धिलाघव आहे असें कोणी म्हणेल, किंवा शूरवीर मराठ्यांचा देवहि तसाच ‘ वीर ’ असला पाहिजे, म्हणून ‘ मराठी ’ वैभवाचे पुरस्कर्ते ज्ञानेश्वर महाराष्ट्राला हा वीर देव देण्यास उद्युक्त झाले आहेत, असा अभिमानहि कोणीं धरला तरी तें चुकणार नाहीं. पण गोम आहे ती दृष्टी-मधें. ज्ञानेश्वर एकदेशीय नाहींत, आणि त्यांनीं जाणून हृदयसंपुष्टीं कोंडून ठेविलेला देवहि असा प्रत्येक भूमिभागासाठीं निरनिराळा नाहीं. तो ‘ विष्णु ’ आहे, ‘ प्रभव ’ आहे आणि ‘ भीमपराक्रम ’ हि आहे. हें लोकांच्या ध्यानीं आणून देण्यासाठीं त्या प्रभावी कृतिसंपूर्णतेचें प्रतीक जें वज्र उपनिषदांत उल्लेखलें आहे, तेंच मराठी भाषेंत श्रीज्ञानेश्वरांनीं येथें सांगितलें आहे. शारङ्गधन्वा, गदाधर हीं देवाचीं नांवें आहेत. प्रस्तुतचा उद्योग देवाची ओळख करून घेण्यासाठीं चालू नाहीं हें खरें. शाहिरी कवनांची ओळख करून घ्यावयाची आहे. त्यांत ‘ बाजीराव ’ आहे असे

कोणी म्हणतात. माझें म्हणणें असें कीं, जो कोणी शाहिरींत दिसतो तो 'बाजीराव' आहे कीं देव आहे, तें नीट पाहून पडताळून पाहा; आणि मग हवा तो निर्णय ठरवा. असो.

'पुरुषाचें' वर्णन करतांना आकृतीच्या वर्णनापेक्षां त्याच्या तेजानें डोळे दिपल्याचें शाहीर सांगतात. शाहिरांच्या ज्ञानयुक्त संयमाची येथें प्रचीति येईल. कै. कृष्णाजीपंत खाडीलकरांच्या कीचकवध नाटकांत सैरंध्रीवेषांतील द्रौपदीच्या तोंडीं घातलेल्या एका वाक्याची येथें आठवण होते. 'स्त्रियांनीं पुरुषांच्या रूपाचें वर्णन करूं नये; गुणांबद्दल बोलावें' असा आशय त्या वाक्यांत आहे. शाहिरांनीं हें मर्म ध्यानीं ठेवून रचना केल्या आहेत. रूपांत तेज आणि त्याहून प्रभावी असे गुण त्यांच्या नजरेपुढें आहेत. म्हणून 'गुणांचा' उच्चार कवनांत वारंवार होतो. 'गुणी राया', 'गुणांसि लुब्धले' असे उल्लेख होणें हें एक नामवंत शाहिरीचें गमक आहे, पण त्या गुणांचा तपशील बहुधा शाहिरींत नसतो. हे गुण सद्‌गुणच असले पाहिजेत. दुर्गुणी मनुष्याचे देव्हारे माजविणारे शाहीर आहेत अशी निराधार कल्पना करणारांनीं थोडासा विचार करावा. लावणींत, विशेषतः पेशवाई अखेरीच्या लावणींत, अशा दुर्गुणी मनुष्याचा उल्लेख 'बिसनी' अशा शब्दानें होतो. तो वर्ग निराळा ठेवून कवनांकडे पाहण्याची दृष्टि हवी.

लक्ष मनुष्यांमधें आकृति राजबीज दिसती ।
प्रकाशीं गगननभस्ती ।
नधी नवती तारुण्य लावण्य स्वरूपकळासती ।
राज अंबीर दिसे दस्ती ।

❀ ❀ ❀

लावण्यरूप सुकुमार ऐन भरज्वानी उमेदवार सोळासत्रांत ।
लक्षांत सिरा ग बाई नक्षत्र नाथ ।

❀ ❀ ❀

सुरतपाक देखणा पुरुष ऐसा । अमृतकर नभमंडळांत जैसा ।
बत्तीस लक्षणी गुण सगुणराशी । कोठून मुशाफर आले पुसा त्यांसी ॥
स्वरूपवान लावण्य राजबनसी । सडपातळ आकृति लहान खाशी ॥
गौरवर्ण कोमल अंग सुखवासी । पंचप्राण लुब्धले सख्यापाशीं ॥

❀ ❀ ❀

शिरिं पनडी बलदार सजला दिलदार पहिली पंचविशी ।
कंठिं पां मोत्यांची कानिं भिगबाळी हिऱ्याची जोत जशी ।

सोळा कळी तेजेंद्र पूर्ण नभीं चंद्र पाहुनि रावे रिझती अशी ।
मी भुललें राजसा निश्चित पाहुनी तुझी आकृति जशी ॥
निजध्यास तुझा लागला ।
गुणवान पुरुष चांगला ।
हा जीव तुजपदीं रंगला ।
जाय दुरित माव भंगला ।

ही शेवटची नायिका म्हणते, ' राजसा, तुझी जशी आकृति आहे तशीच ती पाहून मी भुललें आहें. माझें तुझ्या ठिकाणीं मनानें ऐक्य झालें आहे, मन रंगलें आहे. '

प्रस्तुत पुरुषसौंदर्याचें दर्शन घडविणें चालू आहे, यासाठीं एक शाहिरी कवन तेवढ्यापुरतें येथें देतों :—

पगडी कंगणीदार अंगावर ज्वाहार छबेला गडी ।
करून सब्ज पोषाख घेतली हातीं फुलाची छडी ॥ धृ. ॥
मुक्त तुरा शिरपेच कानीं चौकडा सुरत फाकडी ।
गळां पाचुचे हार सदोदित एकाहुन एकचढी ।
हातीं आंगठ्या पेट्या पाहुनि पडले झडी ।
सखा मजकडे पहातो घडिघडीं ।
हें राजस रूप चांगलें ।
मज बघुन वेड लागलें ।
हें मन माझें रंगलें ।
मी शय्यावेगळी होईन गति पुढें कैसी शेवटीं ।
सखे असें वाटतें सखा कवळुन मारावी मिठी ।
जसा आकाशीं चंद्र तसा राजेंद्र पाहिला दृष्टी ॥ १ ॥

' राजेंद्र ' या शब्दावरून बराचसा गैरसमज पसरला आहे. कोणा राज्यवैभवी पण अनीतिमान् व्यक्तीला उद्देशून हा शब्द वारंवार लावणींत येतो, व तो त्या व्यक्तीला खूष करून त्याच्यापासून धनद्रव्य संपादन करण्यासाठीं ही शाहिराची चाटुस्तुति आहे असा अभिप्राय शोधक विद्वानांचा आहे, तो सर्वस्वीं मान्य नाहीं; पण अमान्यहि नाहीं. अशा हेलकाव्याच्या स्थितींत शाहिरीची प्रतिष्ठा आहे. विद्यापीठ मूग गिळून आहे. अभ्यास चालू आहे. शाहिरी कवनें नुसतीं किळसवाणीं नव्हेत तर अनीतिसूचक आहेत, असें निश्चित ठरण्याला गेल्या दहा बारा वर्षांचा काल पुरेसा झाला आहे. पण निर्णय न घेतां व्यासंग चालू आहे. बाहेर आलेलीं मतें मात्र अनिष्टतेच्या बाजूचींच आहेत. यामुळें शाहिरीचें स्वरूप दाखविणाराला

आपण एखाद्या घोर अपराधी व्यक्तीची न्यायासनापुढें वकिली करण्यास उभे आहों असा अनुभव येतो. अपराध ठरलाच आहे. फक्त कांहीं अपवादविषयक बाबी पुढें आल्यास शिक्षेची कमीअधिक माफी होईल, ती वकिलानें पदरांत पाडून घ्यावी, असा प्रसंग आहे. पूर्वी राजपदावर असणाऱ्या कोणा व्यक्तीची मेहेरनजर संपादण्यासाठीं 'राजेंद्र' हा शब्दप्रयोग झाला आहे हा पक्ष खरा ठरला, तर चालू जमान्यांत भयंकर अनवस्था येईल. आतां राष्ट्रपतिपदावर असलेल्या 'राजेंद्र' नामक व्यक्तीपुढें हें शाहिरी गीत गाऊन दाखविण्याचा योग संभवनीय आहे. त्या वेळीं ह्या पूर्वीच्या रोखावर नजर पोहोंचली तर कसें याचा विचार माझ्या मनांत येऊन कालवाकालव होते. राजेंद्र शब्दानें संशोधकांनीं सुचविलेली व्यक्ति व आतांची राजेंद्र व्यक्ति यांच्यांतलें जमीन अस्मानाचें अंतर कोणी कसाहि समन्वयी असला तर त्याला तोडतां येणार नाहीं. म्हणून 'राजेंद्र' शब्द सामावलेलीं कवनें दिल्लीस राष्ट्रपतींच्या सन्मुख गाईलीं जाऊं नयेत असा दंडक घालणें शक्य, नव्हे आवश्यक ठरेल. अशी छाटाछाट करण्याची जरुरी सर्व वाङ्मयांत असते. त्यांत शाहिरी अपवाद होणारी नाहीं. पण ती कृति करण्याला दृष्टि न्यायाची, ज्ञानाची असली तर उत्तम. नाहींपेक्षां बेबंदशाही, झोटिंगशाही माजेल, असा स्पष्ट इषारा मी देतों.

'राजेंद्र' या शब्दावरून हा विचारकल्लोळ उद्‌भवला. कारण तो शब्द शाहिरीच्या अधिष्ठानाची किल्ली आहे. इंद्र म्हणजे ज्याला आत्मज्ञान झालें तो. हा अर्थ पूर्वी पाहिला आहे. परोक्ष पद्धतींतल्या आधिदैविक व आधिभौतिक अशा दोन परी आहेत. त्यांतली ही पहिली हातीं घेऊन हा शब्द रूढ झाला आहे. महान्, प्रधान, भूत, गुहा, काक, मसूर, बाला, सुंदरी, आंगण, तिसरें अथवा चौथें ताल, भोग, शय्या, रसरंग, नथ, जोबन, हंस, चांगूलपण, राघूमैना इत्यादि अनेक व्यवहारांतले शब्द अध्यात्मिक सारिणींत पारिभाषिक झालेले आहेत. अशा सर्व शब्दांत जो धागा आहे त्याच्या अनुरोधानें शाहिरींतलें गूढ उलगडूं शकतें. नाहींपेक्षां अनवस्था होते हें अगदीं खरें आहे. यांत दृष्टीचा प्रश्न आहे, इच्छेचा संबंध नाहीं व करामतीचा तर नाहींच नाहीं.

दर्शनाची आसुशी :—

मराठी लावणीकारांपैकीं वरच्या प्रतीच्या कांहींचा दर्शनाची आसुशी हा फार आवडता असा विषय आहे. आपलें स्वतःचें रूप म्हणजे आपलें देहरूप नव्हे, तर आत्मिक रूप, कांहीं साधन केल्यानंतर दिसतें. या आत्मरूपदर्शनाची मनुष्याला सर्वांत जास्त आवड बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य आपली पत्नी मैत्रेयी हिला अमरत्वाचें साधन असें आत्मज्ञान सांगतांना अनेक उदाहरणें देतो. पति, पत्नी, पुत्र, वित्त हीं सर्व त्या त्या वस्तूच्या कारणानें प्रिय होत नाहींत, इतकेंच काय प्रत्यक्ष ब्रह्मदेखील ब्रह्माच्या कारणानें प्रिय होत नाहीं. तर—

आत्मनस्तु कामाय ब्रह्म प्रियं भवति ।

आत्म्याला आवडीमुळें ब्रह्म प्रिय होतें. आपलें रूप पाहण्याच्या प्रबल इच्छेनें परमात्मा प्रत्येक रूपाचे ठिकाणीं तें तें रूप धारण करता झाला.

रूपं रूपं प्रतिरूपं बभूव ।

—*बृहदारण्यक*

ही परमेश्वराची लीला आहे. तें आत्मरूप दिसावें ही तळमळ सहजासहजीं मनुष्याच्या मनांत उत्पन्न होत नाहीं. तें रूप बाहेरच्या दृश्यांत कोठें दिसत नाहीं. अंतर्दृष्टीपुढें तें उभें राहतें, आणि तें अत्यंत विलोभनीय असें असल्याकारणानें त्याकडे वळलेला मनुष्य त्याशिवाय इतर सर्व रूपें तुच्छ मानतो. ही एक आत्मोन्नतीची प्राथमिक पायरी आहे. पण तो मार्ग मात्र सत्य आहे. येथें आनंद आहे. तो खऱ्यासारखाच आहे. म्हणून तो अनुभवण्याला शास्त्रानें प्रत्यवाय केलेला नाहीं. पण तेथेंच घुटमळत राहण्यानें पुढचा प्रवास कुंठित होईल म्हणून त्याविषयीं अनादरहि आहे.

लयविक्षेपकषायरसास्वादेभ्यो रक्षितं चित्तं अविघ्नेन ब्रह्मण्यवस्थितं
भूयात् इति भवन्तो महान्तो अनुगृह्णन्तु

—*श्रीविद्यारण्य*

आपल्याला शाहिरांनीं आत्मस्वरूपदर्शनोत्सुक व्यक्तींचा परिचय कसा करून दिला आहे, हें पाहावयाचें म्हणून अपसमज असेल तर तो दूर व्हावा म्हणून ही अगोदर सूचना केली. शाहिरांची बैठक आतां ध्यानीं आलीच आहे. त्यांनीं हा विषय रंगविला नसता तरच आश्चर्य.

सगनभाऊचा शिष्य पुण्याचा रामजी गोंधळी हें दृश्य कसें उभें करतो तें पाहा :—

आम्ही अब्रूच्या नारी। सजणा लाजुन उभी मी द्वारीं ॥ ध्रु० ॥
छेलबटाऊ मी मनमोहना।
पाकव्रत मी आहें मनपवना ।
सुवासिक सुगंध गुलाब दवणा
अपहस्तें मज मारी ॥ १ ॥

रामजीला आपल्या गुरूच्या परंपरेंत चालत आलेली सारिणी अवगत आहे. रावळपरंपरा, नाथपंथीय आणि होनाजीची भक्तिमार्गी असें फार तर म्हणावें. पण

त्यांतहि कांहीं खरा अर्थ निघणार नाहीं. ज्ञान व भक्ति हीं जर दोन नाहींत तर नाथपंथी, पंढरीपंथी असे भेद दाखविणें ज्ञानाच्या दृष्टीनें व्यर्थ आहे. असो, नाथ-पंथांत योगावर भर आहे. तेव्हां त्यांतले संकेतरूप शब्द त्यांच्या वाङ्मयांत येणारच. त्या शब्दांनीं दर्शविली जाणारी स्थितिमात्र इतर पंथांत अनुभवास आलेली नसते असें नाहीं. फक्त साधनांत फरक. परिणामीं एकाच मुक्कामावर पोहोंचणारे हे पंथ परस्परांस पूरक होत आले आहेत. महाराष्ट्रांत तो अनुभव स्पष्ट आणि टिकावू असा आहे. नागर व ग्रामीण भागांत हे दोन्ही पंथ चालू आहेत. त्यांच्या अधि-कारी प्रवर्तकांमध्यें एकमेकांविषयीं आदर आहे. निष्ठावान् अनुयायीदेखील तेंच अद्वैत संभाळून असतात. मूढांचीं लाथाळीं नागरांत, ग्रामीणांत, जाणत्यानेणत्यांत सर्वदा सर्वकालीं प्रत्ययास येतातच. पण त्याच्यामुळें मूळांतला सत्य भाग कोणी नाकारीत नाहीं, नाकारतां येत नाहीं. रामजीच्या कवनांतला ' मनपवना ' हा नाथपंथांतला खुणेचा शब्द याकडे पाहावयाची दृष्टि साफ करण्याला उपयोगी पडणार आहे. आत्म-दर्शन होणें म्हणजे तिकीट काढून सिनेमा पाहणें नव्हे. त्याला सदाचार आणि मना-वर व शरीरांतील पवनावर स्थिर प्रभुत्व यांची अत्यंत जरुरी आहे. एका वाक्यांत जें सांगतां आलें, तें एकाच काय पण अनेक जन्मांतहि साधत नाहीं. कोणा बलवंताला तें याच देहीं साधतें. तें आत्मशक्तीच्या वृद्धीवर अवलंबून आहे. ' नायमात्मा बलहीनेन लभ्यः ' —या श्रुतीचा अर्थ तरी हाच आहे. रथाचा मालक जसा रथी, मन नव्हे, तर स्वात्मा होईल तेव्हां हें साधणार. अशा रीतीनें झालेली साधना शेवटीं केव्हां तरी फळास येते. त्या होत जाणाऱ्या क्रियेचा तपशील येथें सांगावयाचा हेतु नाहीं. फक्त शाहिरानें उभी केलेली स्थिति पडताळून पाहण्यासाठीं थोडासा सूचना-त्मक आधार येथें दिला जात आहे. या विषयाशीं समाजाचा संबंध दुरावला असल्याकारणानें असें करणें प्राप्त आहे, इतकेंच समजावयाचें.

आत्म्याला देह नाहीं अर्थात् लिंगभेदहि संभवत नाहीं. पण त्याच्या दर्शनाची इच्छा धरणाऱ्यांत तो आहे. त्याचें कौतुक वर्णन केलेलें पाहणाऱ्या ऐकणाऱ्यांत तो भेद आहे. म्हणून चटकन ध्यानीं येणारा कांहीं अडाखा योजावा लागला. सुंदर स्त्री पुरुष व्यक्तीच्या दर्शनाच्या रूपकानें शाहिरांनीं हा प्रसंग उभा केला आहे. परस्पर अनुरक्त स्त्रीपुरुष एकमेकांच्या दर्शनासाठीं उत्सुक असतात, अगदीं व्याकुळ होतात, हा व्यवहारांतला दाखला हातीं घेऊन कवींनीं रचना केली आहे. येवढी प्रस्तावना अगदीं जरुरीची म्हणून केली आहे. विस्ताराबद्दलचें समर्थन असें आहे :—

बाळपणाची प्रीत रसाची
आली घटका सज वेळ रुताची ।

भेट जाली आज या हंसाची ।
जाई सखा परभारी ॥ २ ॥

या सारिणींतले ऋतु, हंस हे शब्द आतां नुकतेच अर्थासह परिचित झाले आहेत. दर्शन झालें तें क्षणैक.

आज लइ दिवसा मज सांपडला ।
तुज पहाता विषय चढला ।
जसा मृगाचा पाऊस पडला ।
सगनभाऊ अवतारी । रामजी ब्रिदाचा अधिकारी ॥

या क्षणैक दर्शनानें आसुशी वाढली. आणि मग कशी स्थिति होते तिचें वर्णन माहूरगडचे साधु विष्णुदास यांनीं एका लावणींत केलें आहे तें असें—

साजन कां नये मंदिरीं, अतां ग सुंदरी, दुरदुर रहातो ।
पहा माझ्या वाड्यावरून झरझर जातो ॥ ध्रु० ॥
विरहानें केलें घाबरं, वाटेना बरं, जिवाला कांहीं ।
सख्यावांचुनि क्षणभर मला ग करमत नाहीं ॥
वाटतो जीव हारपला, देह करपला, झाली ग लाही ।
भेटवा सखा एकदा, जा ग लवलाही ।
कीं खावि विषाची पुडी, अथवा उडी भरल्या डोहीं ।
टाकावी वाटते मला ग याचे पायीं ।
कर्मानें कपाळीं थोर लावला घोर जीव तळमळतो ॥ १ ॥

या स्थितींत स्त्रीस्वभावसुलभ असे विचार मनांत येणार. आपली साधना शुद्ध असतांहि आणि त्यापायीं लौकिक अर्थावर पाणी सोडलें तरी

उभा राहून दुरच्या दुरीं, वरच्यावरी मजकडे पहातो ।

अशी स्थिति. शेवटीं ती विरहिणी म्हणते—

आम्ही मूर्ख स्त्रियांची जात, यास्तव घात दग्यानें होतो ।
हा विष्णुकवीचा छंद गुणिजन गातो ॥

प्रथमच्या ओझरत्या दर्शनानंतर पुन: लवकर दर्शन न झालेल्या विरहिणीची अवस्था अशी :—

'पतिविण जीव व्याकुळ झाला ।
आतां कुणी जा गे सख्यांनो ।
आणा विषाचा प्याला ॥ ध्रु० ॥

तीन वर्षें झालीं ऋतासी
हें काय श्रुत नाहीं तयासी ।
जा तरी कळवा पितयासी ।
ऐकुनि बहु दुःख होईल कीं माझे आईला ॥ १ ॥

संसार व परमार्थ या दोहोंत मन असल्यामुळें अशी स्थिति. मुदतींत दर्शन नाहीं तर तो मार्ग सोडून देणारे लोक असतात. त्यांना संसाराचा ओढा असतोच. येथें आईबापाच्या उल्लेखानें कवीनें तेंच सूचित केलें आहे. तिची तक्रार अशी :–

मी आलें जशि ज्वानिभरांत ।
तधीपुन पति नाहीं घरांत ।
युगसमान मज दिनरात ।
यामागें कोणी कसा गे नाहीं बोध केला ॥ २ ॥
यापूर्वीं बाळपणातें ।
दुःख ना कळतें अपणातें ।
साधिलें कसें या टिपणातें ।
ऋतुसमयांत कसा गे निसटून गेला ॥ ३ ॥

आत्मकल्याणाच्या मार्गांतहि बेसबूर (Impatient) साधक असा भांबावतो. अशा प्रसंगांत आप्तांचा आधार उपयोगी पडतो. ' प्राप्तकाळघडी ' आल्यावांचून तांतडी काय कामाची. मनाचें चांचल्य स्थिर करणें हाच मार्ग :–

सखीनें मग धरिली उरीं ।
दिलि उटी चंदनें शुभ केशरकस्तुरी ।
शीत उदक पाजिती करी ।
श्रमि सख्या होऊन पंखे वारिती वरी ।

आप्त, सख्या, गुरु यांचें यासमयींचें कार्य शांत करण्याचें असतें. तो उपचार झाल्यावर–

सावध झाली अंतरीं ।
ते साजण आले घरीं ।
मग नेले सदनांतरीं ।
' तुम्ही आला सख्या
मज आज ' गणपती ' पावला ' ॥ ४ ॥

दर्शन स्थिर झालें, मीलनाची वाट सुगम झाली. ‘ गणपती ’ कवीच्या या लहानशा कवनांत व्यावहारिक व आध्यात्मिक दोन्ही रंग शब्दाशब्दांत सारखेच भरले आहेत. याबद्दल मी त्याचें कौतुक करतों आणि वाचकांनाहि तशीच दृष्टि ठेवण्याची सूचना करतों.

सहवासाची आसुशी :—

तात्पुरतें दर्शन होण्याचा काळ जाऊन स्थिर दर्शन, सहवास व मीलन या पायऱ्यांनीं पर्यवसान होतें. अशा अनुक्रमामुळें निरनिराळ्या कवनांतला निरनिराळा रस ध्यानीं येण्याला सुलभ होतें. एकदा त्यांत प्रवेश केलाच आहे, तेव्हां तोच भाग पुरा दाखवावा असें वाटणें साहजिक. यासाठीं जुन्नरचा पेशवाईअखेरीस व नंतर पुण्यामुंबईत प्रसिद्ध असलेला शाहीर गोविंदराव साळी याचें एक कवन घेतलें आहे. यांत कथा आहे. तींत छेलबटाऊ व मोहना हीं मुख्य पात्रें. प्रसंग कोणत्या ठिकाणीं घडला याचा निर्णय हिंदी व मराठी भाषांतील कवींनीं आपआपल्या इच्छेप्रमाणें किंवा दृष्टान्ताच्या सुकरतेच्या अनुरोधानें केला आहे. कोणी ती कथा दिल्लीस घडल्याचें सांगेल तर कोणी ती अहमदाबादेस घडली असें म्हणेल. या सर्वांच्या डोळ्यांत तें स्थान अति उच्च आहे. शाहिरांच्या कवनांत कोठें काय खूण ठेवलेली असेल, तें सहज सांगतां येणार नाहीं. याबाबतींत सगनभाऊ वस्ताद. पण आपण खूण ठेवतो असें स्वतः तो कवनांत सांगतो—

रामा समजेल या खुणा।

रामा म्हणजे आतांच ज्याचें कवन पाहिलें तो रामजी पचांगे, गोंधळी. (पुण्यास याचा नातू डिस्ट्रिक्ट कोर्टाचा लायब्रेरियन आहे. गोंधळ घालण्याचा व्यवसायहि चालू आहे. होनाजीच्या पुण्यतिथीच्या दिवशीं प्रारंभाचीं कवनें होनाजीच्या कडेतुंबरीवर म्हणण्याचा हा मानकरी आहे.) गोविंदरावानें केलेल्या कवनांतील कथा नागनाथ पारनेरकर, त्र्यंबक वगैरे अनेक शाहिरांनीं रंगविली आहे. मराठींत येण्यापूर्वीं ती हिंदींत कधींपासून होती तें सांगतां येत नाहीं. पण भक्तराज सूरदास यांच्या सहस्रशः कवनांच्या सूरसागरांत पुढील पद आढळतें.

गये हरि परदेश बहुत दिन लायेरी ॥ ध्रु० ॥
कारि घटा देखि बादर की नयन नीर भर आयेरी ॥ १ ॥
बीर बटाऊ पन्थी हो तुम कौन देश ते आयेरी ॥ २ ॥
यह पाती हमरी ले दीजो जहां सावरे छायेरी ॥ ३ ॥
दादुर मोर पपय्या बोलत सोवत मदन जगायेरी ॥ ४ ॥
सुरदास गोकुल ते बिछुरे आपभये परायेरी ॥ ५ ॥

सूरदासांचें सुखनिधान श्रीकृष्ण परमात्मा. त्यांचेकडे आपलें पत्र घेऊन जा असें ज्याला सूरदास सांगतात, त्याचें वर्णन ' बीर बटाऊ पन्थी ' असें आहे. हेंच आत्मरूप. त्यालाच परमात्म्याची भेट घेऊन आपलें मनोगत कळवावयास भक्तराज सांगत आहेत. हा पंथी म्हणजे प्रवासी, बीर म्हणजे पौरुषानें युक्त आणि बटाऊ (लीलामय बाल-बटु) या नांवानें लौकिकांत प्रसिद्ध असलेला, असा आहे. सारांश इतकाच कीं, मराठी शाहिरांनीं रंगवलेला बटाऊ भारतीय साहित्याच्या मधुकांडांत मान्यता पावलेला आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या इष्काच्या मैफली रंगविण्यासाठीं इकडून तिकडून धरून आणलेला कोणी ' बिसनी ' नव्हे. मराठी शाहिरींत या कथेवर अनेक कवींनीं कवनें केलीं आहेत. येथें त्यांपैकीं गोविंदरावाचें कवन सांगावयाचें आहे तें असें :—

' ओतिव स्वरूप तेजस्वी चंद्रमा जसा ।
कोण देश कुठिल रहिवासी, सख्यांनो पुसा ।। ध्रु० ।।
भासतो कुणि सरदार डौल अंबिरी ।
मंदील शाल शिरपेंच तयाचे शिरीं ।
शोभली गळा मोत्याची माळ दुहेरी ।
फाकलें तेज चमक ती नक्षत्रापरी ।
अबलख घोड्यावर कलगी साजरी ।
कंडे पट्टे जिन कलाबतु झालरी ।
ईश्वरें यासी चांगुलपण दिलं कुठून ।। १ ।।

कथेच्या नायकाच्या थाटानें प्रभावित होऊन नायिका त्याची चौकशी करविते आहे. मनांत विचार चालू—

निर्मळ तनु सोन्याची घडली अटून ।
हें राजहंस पाखरूं आलें येथें कुठून ' ।

हा प्रसंग पाणोठ्यावर घडत आहे.—

पाहून शीतळ छाया उतरला सगुणराशी ।
उदकें गुळणा करूनिया बैसला सुखवासी ।
पाहे पनघट न्याहाळुनिया, मोहना मुखरण खाशी ।
प्रत्यक्ष मदनपुतळी सख्यासी खुण सांगे ।
' मी धुते इथें चोळीस तवर तुम्ही जा गे ' ।
डाळिंबी कळी कवळी राहिली एकली मागें ।
संशयांत चित्त प्रयत्न करावा कसा ॥ १ ॥

मोहनेला हें दर्शन पाण्यांत असतां झालें आहे. आरंभापासून शुद्धबुद्धि असली तर कष्टसाध्य साधनांच्या अभावींदेखील दर्शन घडूं शकतें. तें जलतत्त्वाच्या बुद्धींत. ही बुद्धि म्हणजे तर्काला साहाय्य होणारी अशी Intellect नव्हे, तर बोधांत पर्यवसान होऊं शकणारी अशी अतिशुद्ध मनाची अवस्था. अशा स्थितींत खूण पटली, पण रूढ मार्ग अवगत नाहींत. कधीं तसा यत्न केलेला नाहीं. म्हणून—

धीट मन करून एकनिष्ठ उभी राहिली ।
तनु कर्पुरकर्दळीचें तेज पहाळी ।
उजळली दिशा महिताब प्रभा फाकली ।

नायिकेला अल्हादकारक तेजाचा प्रत्यय आला. ज्ञानरवीच्या उदयाच्या पूर्वींचा अरुणोदय झाला. बुद्धिबोधांचें मीलन होण्याच्या समयीं अत्यंत स्थिर एकलक्ष झाल्यामुळें पुढचा टप्पा गांठण्याचा धीर आला. नायकानेंहि—

बावरी तऱ्हा छबदार अचुक पाहिली ।
गुणवती चतुर जाणुनिया बोलावली ।
'अहो, याहो या' गौरव शब्दें मोहिली ।
'सौभाग्यवती तूं लावण्याची सुंदरी ।
कां आलिस येथें, काय विचार अंतरीं ।
उभयतांचें विघ्न, नकोस पडूं विषयाचे भरी' ।

नायिकेचा धीर चेपत गेला होताच. आतां सवालहि आला. त्यावर ती प्रति सवाल करते—

'सांगा मजसी गुणवंता किमर्थ उदासी धरली ।
त्यागिली घरीं कांता, ती तुम्हांस अंतरली ।
एकले मुलखीं फिरतां, दिसे चित्तवृत्ति बावरली ।
अतां घरासी चलावें जिवलगा आजची रात ।
वचनासी मानावें, धरूं नये संशय चित्तांत ।
मी दासी जाणावें, करू विलास रंगमहालांत ।
पदिं प्राण करीन कुर्बान निश्चय ऐसा' ॥ २ ॥

या आळवणीचा योग्य तो परिणाम झाला :—

बोलणें रसिक ऐकून कळवळला गुणी ।
झाले विषयांध उभयतां निर्भय मनीं ।

या ओळींत आलेले दोन शब्द खुलासा मागतील. ' गुणी ' व ' विषय ' हे ते शब्द. हें रूपक आहे. तेव्हां दृष्टान्तासाठीं घेतलेल्या वस्तूच्या अनुषंगानें जें जें कांहीं असेल तें तें त्या त्या ठिकाणच्या अर्थाला योग्य अशा शब्दांनीं वर्णित करणें जरूर. येथें सांगावयाची वस्तु आध्यात्मिक आहे. व्यावहारिकाचा देखावा आहे. मूळबिंब जो परमात्मा त्याचें प्रतिबिंब तो शरीरधारी जीव. बिंबाला आपलें रूप पाहण्याची इच्छा. ती प्रतिबिंबाच्या दर्शनानें पूर्ण होते. प्रतिबिंबाला आपलें रूप पुनः प्रतिबिंबांत दिसतें. ' रूपं रूपं प्रतिरूपम् ' तें शरीरधारी असतांना प्रतीत होणारें रूप सूक्ष्म असल्यामुळें चर्मचक्षूंना दिसत नाहीं हें खरें. पण सृष्ट प्रकृतीशीं संबंध ठेवून असल्यामुळें कांहीं स्थूल अशा माध्यमांतच प्रगट होणें शक्य. तें माध्यम तेज आहे. परमात्मा अरूप, अनाम अर्थात् प्रकृतीच्या त्रिगुणांचा आविष्कार जेथें नाहीं असा. पण प्रतिबिंबाच्या दर्शनाच्या, मीलनाच्या प्रसंगांत रूपगुण धारण करावा लागतो, आणि त्या मार्गानेंच शरीरधारी मनुष्यांना हें प्राथमिक दर्शन तरी घडणें शक्य होतें. सगुण, गुणी, हे शब्द परमात्म्याच्या या आविष्काराला उद्देशून लावले जातात. बिंबप्रतिबिंबांचें हें द्वंद्व दर्शनापर्यंत द्वैतरूपी आणि मीलनानंतर अद्वैतरूपी अर्थातच असणार. दोन्ही जर एकच तर द्वैत कोणाचें? कोणाशीं? दर्शनानें आत्मीय भावाची वृद्धि, पूर्ण बोध हे भाग क्रमानें आले ही आत्मसुखाची, सहवासाची प्रबल इच्छा विषय, अनंग, इत्यादि व्यावहारिक कामशास्त्रांतले शब्द वापरून व्यक्त करण्याची पद्धति रूढ आहे. त्याखेरीज रूपक पूर्ण होणार नाहीं. संत अशी मान्यता ज्यांना आहे त्यांनीं शेवटीं या शब्दांचा आश्रय केला आहे. या पोट प्रकरणाचे आरंभीं भक्तराज सूरदासांचें पद दिलें त्यांत ' मदन जगावेरी ' असा उल्लेख आहे. ' आत्माराम शेजे आला ' वगैरे उल्लेख संतवाणींतून प्रकट झालेले दिसतात त्यांचा उलगडा हा असा आहे. येथें व्यावहारिक विषयांतली कमालीची बेछूट वृत्ति डोळ्या-पुढें ठेवून आणि तिच्या पलीकडे मनुष्याला कल्पनेनें जातां येत नाहीं म्हणून ती येथें आधाराला घेतली जाते. यासाठीं संतवाङ्मयावर अशा प्रसंगीं दृष्टि देतांना सावध-पण राखून अनर्थ टाळला पाहिजे. एकदा हा अर्थ ध्यानीं आला म्हणजे व्यावहा-रिक परिभाषा रूपकाच्या पूर्ततेसाठीं कशा ओघानें येते, तें सांगावयास नको. गोविंदरावाची काव्यकथा पुढें चालू करावयाची. मोहनेचा रसयुक्त भाव पाहून ' गुणी 'लाहि आनंदाचा पाझर फुटला आणि मग साहजिकच—

झाले विषयांध उभयता निर्भय मनीं ।
रस्त्यांत झुलत चालली लगबग मोहनी ।
वाड्यांत नेला उतरला खुण दावुनी ।
' पाहुणा आला ' सासूशीं सांगे जाऊनी ।
' बहिणीचा मूल तुमचा ' केली संपादणी ।

अंदर बोलावून भेटविला नेउनी ।
भोजन करविलें स्वहस्तें वाढुनी ।
टाकी बिछोने दासीला सांगूनी ।
शृंगार करी मोहनी कळी खुलली गुलाबाची ।
तनबागांतिल खिरणी, मूर्तिमंत कनकाची ।

या आत्मसाक्षात्काराचा अनुभव घेत असलेल्या व्यक्तीच्या अंगावरच सभोंवतीं अलौकिक तेज पसरतें, असा संतांचा अनुभव आहे. त्याचें हें वर्णन व त्यांत लौकिक साजाची कवीची भर—

कोमल नवी तरगी, साडी नेसून भरजरीची ।
अनुसरली सख्यासी आलिंगी प्रीतीनें ।
निजली सुखशेजेसी करि विलास गमतिनें ।
कर्मिली रात्र ऐसी, धुंद झाली जागृतीनें ।

त्या सुखानुभवाचें कवीनें केलेलें हें व्यावहारिक वर्णन. या अनुभवाच्या योग्य वेळेला ' रात्र ' असें सांकेतिक नांव आहे. सर्व विचार-विकार स्थिर व सुरक्षित असण्याची वेळ म्हणजे व्यवहारांतली सुषुप्ति आणि अध्यात्मांतली समाधि लागण्याची वेळ. खानदानी संगीतांत विरहिणीचें वर्णन चालू असतांना प्रियाचें आगमन, दर्शन घडण्याच्या वेळेला ' मधेरात ' या शब्दानें उल्लेखलें जातें. मराठी शाहिरांनीं तोच संकेत पाळून ' माथ्यावर चंद्र कीं ग ढळला, येण्याचा वक्त टळला ' असें विरहिणीच्या मुखानें वारंवार वदविलें आहे.

सारखे उभयतां एक रूपाचा ठसा ॥ ३ ॥

या चरणांत कवीनें हें काय चाललें आहे याविषयीं यत्किंचित् संशय उरूं नये असा स्पष्ट निर्देश केला आहे. दोन सुरूप व्यक्ति एकमेकांस अनुरूप आहेत असें निवळ व्यावहारिक कथक म्हणेल. उभयतां एकासारखे एक इतकेंच नव्हे तर एक रूपाचा ठसा म्हटल्यानें कांहीं निराळाच बोध होतो. प्रसंगच आला म्हणून किंचित् अवकाश घेऊन सांगावेंसें वाटतें कीं, श्रीनिवृत्तिनाथांनीं या शब्दाचा अर्थ पूर्वींच दाखवून दिला आहे.

पहातां तुझें नामरूप दृश्य नोहे ।
तो भक्तालागी होय कृष्ण ठसा । नि. अ. ॥३३१॥

लावण्यांचा अर्थ लावतांना श्रुतीचें वचन आधारासाठीं घेतांना मी कचरलों नाहीं. ज्ञानदेवांच्या वचनाशींहि लगट केली. श्रीनिवृत्तिनाथांपर्यंत पोहोंचण्याची

हाव धरली खरी, पण येथें मी घाबरलों होतों हें कबूल करतों. तो कां याचें कारणहि मला सांगतां येत नाहीं. असो. ' रूपं रूपं प्रतिरूपम् ' याच तो ठसा.

बिंब प्रतिबिंबा द्योतक ।
प्रतिबिंबा अनुमापक । *अमृतानुभव १:२६*

तेंच शाहिरानें म्हटलें आहे. प्रगनभाऊहि अशा प्रसंगांत ' समसमान आकृति ' असें म्हणतो तें कां ? याविषयींचा उलगडा हा असा आहे. हें कवन पुढें चालू—

उठली अबला करविली कुचाची त्वरा ।
सांगितलें ' पळभर बागामधिं उतरा ' ।
होणार गति तिचा भ्रतार आला घरा ।
त्यासी कळलें सकळ, घेइना विसावा जरा ।
कंबरबस्त तैसाच तेथुन चालला ।
निद्रित मुशाफर बागामधिं पाहिला ।
उपसून खांडा हात मानेवर मारला ।
झुरक्यांत उभी सुंदर, न्याहाळी चरित्र ऐसे ।
भिजला घर्में पितांबर, निस्तेज वदन दिसे ।
मस्तकीहून छेलित पदर, देहीं भान कांहीं नसे ।
सद्गदित ' सगुण दोहिता (?) क्षोभलास परमेष्ठी ।
आग लागो संचिताला, दुःख लिहिलें ललाटीं ' ।
भागली शोक करतां क्षणाक्षणा होती कष्टी ।
' गेलास जिवें मजकरितां हें राजसा ' ॥ ४ ॥

रूपाच्या दर्शनाचा, मीलनाचा आनंद पूर्ण नव्हता. त्यानें धुंदी मात्र आली होती. तोहि स्थिर आनंदांतला एक मोठा विक्षेप आहे. या मार्गांतल्या महान् आचार्यांनीं या विक्षेपापासून आपलें रक्षण होण्याची इच्छा प्रकट केली आहे. शरीरसंबंधांतलें विघ्न पुढें उभें राहिलें. रूपदर्शनाचा भंग झाला. तो मोहनीला सहन झाला नाहीं म्हणून तिनें स्वतःच्या हस्तानें देहत्याग केला. तें शेवटचें कडवें असें :—

घाबरली राजबाळा भिरभिरा पाहे भवतीं ।
दाटला दुःख उबाळा, घेतला खंजिर हातीं ।
भेदलें हृदयकमळा । मान वाकली मानेवरती ॥

हा आनंददर्शक पण दुःखपर्यवसायी कथाभाग पूर्ण करतांना कवि पुनः भानावर येऊन व्यावहारिक भाषेनें म्हणतो,

गोविंदराव म्हणे इष्काचा फिरका असा ।
अविचार स्त्रियांची जात, मनाला पुसा ॥५॥

कवन संपलें तरी शेवटीं सांगावयाचें राहिलें आहे. इष्काचा फिरका कसा असतो तो आतांपर्यंत पाहिला. लौकिक, अलौकिक अशा दोन्ही दृष्टींनीं पाहिला, पण प्रेम करणारी व्यक्ति अविचारी अशी स्त्रीजातीची असें भासवून कवीनें आणखी एक कोडें घातलें आहे. समान हक्क, स्त्री-स्वातंत्र्य या व अशा अर्थांकडे ज्यांचा ओढा आहे त्यांना कवीचा पक्षपात दिसेल. पण अविचाराचा मक्ता कांहीं स्त्रीजातीला दिलेला नाहीं. प्रेम करणारा पुरुष निसटून जातो म्हणावें तर कवनांत बटाऊचा अंत याच प्रकरणीं झालेला दाखविला आहे. आणि त्यानंतर मोहनेचा स्वहस्तें प्राणत्याग झाला आहे. याचा उलगडा व्यावहारिक रीतीनें निराळा होणें शक्य असलें तरी इष्ट नाहीं. दोहोंमध्यें जास्त दोषी कोण याचा निर्णय होणें शक्य नाहीं. दोघांचाहि भाग परिणामांत सारखाच मानणें योग्य आणि तें शास्त्रशुद्धहि आहे. हें ' आपलीच आवडी ' धरणारें युग्म नामरूपांत आलें तेव्हां भिन्नता भासली, पण वस्तुतः तीं एकच आहेत, म्हणून रूपाचा निरास करून त्यांचें ऐक्य कवीला ठसवावयाचें होतें. आत्म्याचा लिंगभेद शास्त्र मानीत नाहीं हें वर आलेंच आहे. स्त्रीदाक्षिण्याच्या अभावाचा हा भाग अशा रीतीनें साफ होतो.

मुशाफर

मराठी शाहिरी वाङ्मयाचा परिचय करून देतांना कांहीं गूढ भागांत जो एकदा गणापासून शिरलों तो अजून बाहेर पडतोसा दिसणार नाहीं. याच भागावर इतका मुक्काम करण्याचें कारण आतां वाचकांच्या ध्यानीं आलें असेल. मला शाहिरीवर वाङ्मय तयार करावयाचें आहे, शब्दार्थांच्या टिपणी करावयाच्या नाहींत. स्वरूपाच्या दर्शनासाठीं उत्सुक असणाऱ्यांच्या कथा सांगितल्या. पण त्या साध्य-साधकाच्या संबंधाच्या होत्या. तोहि भाग अलीकडचा आहे. प्रत्यक्षांत शरीर-धारी असणाऱ्यांच्या अवस्था कवींनीं कशा वर्णिल्या तें मीं नुसतें दाखविलें. आतां आमचे शाहीर त्यापलीकडे उडी मारून कशी रंगत करतात तें दाखवावयाचें आहे. यासाठीं त्या रंगतीला सुलभ असें मुशाफर प्रकरण आतां पाहावयाचें आहे. सगन-भाऊच्या मुशाफराची सुरुवात अशी :—

आम्ही मुशाफर लोक प्रीत करूं चहातो साजणी ।
दीपकळीचा रंग पाहुनी पतंग झुरतो मनीं ॥ ध्रु० ॥

येथें एक मामुली मुशाफर आहे, पण त्याचा हेतु मात्र सुंदर देखावे पाहण्याचा अथवा चातुर्यसंपादनाठीं पंडित मैत्री, सभेंत संचार करण्याचा नाहीं. त्याला प्रेम करावयाचें आहे व त्यासाठीं तो पात्र शोधीत आहे. दीपपतंगाच्या नेहमींच्या दृष्टान्तावरून हें स्पष्ट होत आहेच. मुशाफराला कोणी एक व्यक्ति त्याच्या हेतूच्या पूर्ततेला हवी तशी भेटली. तिच्या हुजुरांत मुशाफर आपली कैफियत पेश करतो ती अशी : —

'कां प्रवासी आम्ही जाहलो, सांगतो, आहोत घरचे सुखी ।
घोर जिवाला लावुन गेली परम जिवाची सखी ॥
जिवंत अथवा मृत्यु पावली आम्हास केलें दुःखी ।
कारण काय तुम्हां सांगावें, जाहला असा घात कीं ' ॥

आणि आतां गांठ पडलेल्या व्यक्तीची पसंती करण्याचें कारणहि सांगतो—

'चलण वळण, पाहण्यांत बरि दिसतीस रत्नपारखी ।

त्या व्यक्तीची परीक्षा यानें केली तशी तिनेंहि चार सवालजबाबांत त्याची परीक्षा केली.

'प्रीत परीक्षा करून काहाडसी दुसरी जागा चुकी ।
या कर्मानें जर्जर – साजणी ।
नाहीं येत पुण्याची सर -- साजणी ।
पहिले गडे गंगातीर -- साजणी ।
पाय उतारा आलों, शरीर घेऊन, उभा अंगणीं ।
लोटुन देऊं नको फिरून, आम्ही जाऊं कोणत्या वनीं ॥१॥

या आळवणींत कांहीं अर्थ भरलेला आहे. खुणेचे शब्द आहेत. पण त्यांचा अर्थ पुढचें कडवें पाहून नंतर उलगडूं शकेल.

आहो मुशाफर बरे बोलतां कर ठेवुनिया कटीं ।
कासाविस झाल्याविण कोण करी शीतळ अशा संकटीं ।
या कर्मानें निसूर बैसले घरामधिं एकटी ।
प्रीतिच्या मंत्राची नाहीं दिधली मातेनें घुटी ।
काळेंसांवळें स्वरूप माझें, राख घेऊन भरमुठी ।
नित्यकाळीं अंगास लाविते काय होइल शेवटीं ।
होइल ते होऊं कसं -- साजणा ।
नाहीं करीत कोणाची आस -- साजणा
औषधास वेडा उस -- साजणा
गोड निघेना रस -- कडूपण काढले विरळा सुती ।
ही गोष्ट मोठी कठिण पहा घर दुसरी जागा निश्चिति ॥ २ ॥

हा एक चमत्कारिक प्रसंग अडाणी सगननें उभा केला आहे. दोन्हीं पाहावीं तर 'ध्यानें' आहेत. तो घरचा सुखी आहे पण त्याची प्रिया त्याला सोडून गेली आहे. कां गेली तें जनरीतीनें उघड सांगवत नाहीं. त्याचा 'जर्जर'पणा हें कारण

असूं शकेल. पण जिची आळवणी तो करतो आहे ती तर काळी, अंगाला राख लावून, कर्मानें निसूर होऊन बसली आहे. एकटीच आहे. ' म्हसोबाला नाहीं बायको अन् सटवाईला नाहीं नवरा ' असा थाट आहे. अशा जोडीवर प्रेमकाव्य करणारा हा सगन कोणी झोटिंगच आहे कीं काय ? तो प्रेम करूं पाहतो, तर तिला प्रेमाची कल्पनादेखील नाहीं. अर्थात् कोणी कसाहि असला तरी त्याच्याविषयीं ओढा उत्पन्न होण्याला कांहीं कारण दिसत नाहीं. ती तर त्याला साफ झिडकारते आहे. शाहिरानें हें काय आरंभलें आहे ? त्याचा शेवट कशांत होणार आहे ? कांहीं कळत नाहीं. थोडी सबुरी धरून हें प्रकरण पाहिलें पाहिजे : —

' उत्तरास प्रतिउत्तर दिधलें मनिं आसच्या मानलें ।
चित्तांतिल वर्म कर्म आवघें प्रत्यक्ष जाणलें ।
गोडकडू निवडता कशाला, स्नेह उदकीं नाहले ।

प्रेमवेडा पुरुष कोणीहि झाला तरी त्याचें शेवटचें हत्यार त्याच्याजवळ असतेंच, तें त्यानें वापरलें आहे. झाल्यागेल्या गोष्टी आतां प्रेमांत बुडवून टाकण्याची ही युक्ति आतां आहे, तेव्हां होती आणि त्यापूर्वीं केव्हांपासून आहे कोणास ठाऊक !

एक दुःख उभयतां असावें कल्प दोष छाणले ।

' समानव्यसनेषु नामदुःखेषु सख्यम् ' ही जडीबुटी त्यानें उगाळली. अर्थात् तिनें त्रिदोषहि नाहींसे होणार : —

गांवींच्या मजा गांवीं राहिल्या त्यांतून गुण आणले ।
पहिल्यापासून केलें निवेदन, इष्कानें तान्हले ।
तूं बहुत योग्य चांगली -- साजणी ।
तुझ्यापासी वृत्ति रंगली -- साजणी ।
विसरावी गोष्ट मागली -- साजणी ।
जिवंत तोंपर्यंत नाहीं जाणार तुला टाकुनी ॥ ३ ॥

हा प्रेमी आहे तरी कोण ? येथें येतांना शरीर घेऊन आलो म्हणतो, आतां म्हणतो गुण बरोबर आणले, गांवच्या मजा गांवींच राहिल्या म्हणतो. शरीर नव्हतें तर गुण तरी कोठून आणले कोणास ठाऊक ? कदाचित् तेथें ते हडप्यांत झाकून ठेवलेले असतील. वृत्तीहि आली आणि रंगली म्हणतो. म्हणजे पूर्वी नव्हती तर ! शरीर नाहीं, मन नाहीं, गुण नाहीं, आणि मजा केल्या म्हणतो त्या कसल्या ? सुखी तर होता. तें सुख कसलें ? गाढ झोपेचें तर नव्हें. अशा शुंभाला दुसरें काय

सुचणार ? तो झोपला तेव्हां त्याची प्रिया मग संधि साधून दूर पळाली असली पाहिजे. :—

जैं गोसावी शेजे रिघे। तैं दंपत्यदणें जागें।

ज्ञानेश्वरांनीं—

निदैलेनि भातारें। जैं विये चराचरें।
निद्रिता समीप। चेतादुरी।

असें तिचें वर्णन केलें आहे ती माया तर नव्हे ? हा माया–ब्रह्माचा अपूर्व जोडाच असला पाहिजे. सृष्टीच्या इतिहासांत त्याच्या अनेक आवृत्ति निघाल्या आहेत. या भोळ्या शंभूला केव्हां तरी भान येतें आणि मग संसाराची चौकशी. राहणें वनांत पण तेथें तरी संसार थाटावयाचा तर 'ती' पाहिजे ! एक गेली ती शोधून सांपडेल किंवा सांपडणार नाहीं, अथवा आतां सांपडली आहे ती आपलीच असली पाहिजे, कारण आपला हेतु तिच्यावर गेला आहे, असा कालिदासाच्या दुष्यंताप्रमाणें याचाहि 'निश्चय झाला मनीं' असेंहि असेल. अशा भोळ्या शंभूला योग्य अशी दुसरी कोण असणार ? खास तीच ती. त्यापलीकडच्या देशांत, वरल्या रानीं असाच प्रकार असावयाचा. इकडे अलीकडे अशा रीतीच्या जोड्या जमावयाच्या नाहींत, टिकावयाच्या नाहींत, आणि फुटल्या म्हणजे पुनः जुळावयाच्या नाहींत. हें पलीकडचें प्रेमीयुग्म एकमेव असें तेंच असलें पाहिजे. पण ती जरा छद्मी खास आहे. तिनें ओळख न देतां त्याचा अंगीकार केला आहे; आणि पुनः कलहाला जागा आतांच निर्माण करून ठेविली आहेत. ती म्हणते—

धन्य चतुर सामर्थ्यवान् सन्मान करिते आतां॥

हे बोवा भोळेच. ओळख पटविण्याची अट तरी घालावयाची कशाला ? त्यांना सर्व कांहीं दिसतें आहे. पण पुनः त्या उरफोडींत वेळ जाणार आणि यांच्या झोपेंत व्यत्यय येणार ! !

अडाणी गणल्या गेलेल्या, नव्हे कांहीं विद्वानांनीं ओवाळून टाकलेल्या सगनभाऊ शाहिराचें हें कवन आतां वाचकांना उलगडलें असेल. 'चट्टीपट्टीचा बोभाटा आणि झिपरी मारी झपाटा !' रामजोशी, प्रभाकर हे शाहीर व्युत्पन्न पंडित होते. पण त्यांना जें साधलें नाहीं, तें सगनभाऊनें करून दाखविलें आहे. रामजोशी घसरतो म्हणून दूर आणि प्रभाकर तर बोलून चालून कारकूनबच्चा. त्यांना केव्हां तरी जवळ करावें एरव्हीं ते दूर आहेत तेच बरे. पण या सगनचें काय करावयाचें ? तो तर आव्हान देतो 'पद कडवें कवन शोधणें अर्थ घेऊ घेऊ। इश्क गातो

सगनभाऊ ! ' त्यांत तो खुणा ठेवतो त्या जे ' रसभोगी सूज्ञ ज्ञाते ' अंशांना ओळखतां येतील. ज्यांना तशी नजर नसते अंशांच्याबद्दल त्याचा स्पष्ट शेरा असा--

आंधळे बहिरे अशापुढें संतवचनाची बाजी ।
करूं नका फळ नाहीं बिघडेल मर्जी ॥

अनेक विषयांचें ज्ञान असल्याचा पुरावा देणारा पण ' आत्मज्ञानीं फुडा । जात्यंधुतो ।' हा शेरा ज्ञानेश्वरांनीं पूर्वीच मारून ठेवला आहे. शाहिरांचा ॲडव्होकेट जनरल म्हणून सगननें आव्हान दिलें आहे. तें स्वीकारावयाची इच्छा कोठें दिसते. पण फडांत प्रत्यक्ष दिसेल तेव्हां खरें.

प्रेमपुराण :–

हें प्रेमपुराण शाहिरीचा गाभा आहे आणि म्हणूनच जाणते अजाणते सर्व लोक त्याच्याकडे वेधले जातात. शाहीर संधि साधून त्यांत कांहीं ज्ञानाचा अंश कां आणि कसा साखरेंत घोळून पाजतात तें पाहणें चालू आहे. त्यांत पुष्कळ जागा अडली तर कांहीं बिघडणार नाहीं.

सगनभाऊचा साथीदार खुणा ओळखणारा रामा याचें एक कवन येथें नमुन्यासाठीं देतों. व्यावहारिक पातळीवर राहून हा रंग खुलविण्याची हातोटी याला साधली आहे. म्हणून याच्या कवनांत चटक असते. कवन असें—

मी उभीं आंगणीं पाहु राजसा गृहिं चला सख्या सजणा ॥ ध्रु० ॥
आज कांहीं चुकले सेवेला, पदरीं घाला उभी रहाते ।
संकेत मनाचा केला, घरीं नसेल, तुझी वाट पहाते ॥
जिव जळून रक्षा झाला, पाहून तुला विषयाचें आलें भरतें ।
प्रीतींत नका वितुष्ट पाडूं, किति हात जोडूं, लोटला एक महिना ॥

अंगणांत उभी, मनाचा संकेत, जीव जळून रक्षा झाला, विषयाचें भरतें हे उल्लेख कोणत्या अर्थानें घ्यावे असा कवीचा मानस आहे तें आतांपर्यंतच्या पाहणीवरून ध्यानीं येईल. येथें एक नवीन प्रकार आहे. मागील पदांत झालेला प्रकार लक्षांत ठेवून पाहणाराला हा खटकणार. आलेला म्हणतो :—

' तूं नको आम्हासी, साळू थायर जाळू,
किति सांगावें तुजसी ।
तुजपेक्षां घरची कांता गुणवंता
आहे नादर सुखवासी ॥

तुझी आपली संगत घडली प्रीत जडली
नेशिल रंगमहालासी ॥
होईल जनामधें ठावें फिरूं काय ? जाये
तूं चंचल मृगनयना ॥ २ ॥

लावणीच्या वरवरच्या वाचकांपैकीं कांहींना येथें रंगावेसें वाटतें. फुलपाखराची मौज पाहण्यांतहि कांहीं चव आहे. तेंच दृश्य येथें आहे. एकवार झालें, तें झालें, आतां पुनः पुनः तेंच कशाला? लोकांत बोभाटा होतो. 'करियर' धोक्यांत येते. आमचें आपलें आहे तेंच चांगलें, तेंच संभाळून असणें बरें असा पोक्त विचार कवीनें उभा केलेला दिसतो. जसा प्रेमी आतां दिसतो तसा तेव्हांहि होता. तो सर्वकाल असणार. पुढें रंग वाढता आहे. तोहि चालू जमान्यांतहि अनुभवांत असल्याचा बोभाटा आहे. खरें खोटें देव जाणें. मी कवि थोडाच आहे:—

मी आशावंत स्वामिची, तुमच्या करची,
आधीं लाविलिस माया ।
ममतेचा घालुनि फासा राजहंसा
कशी घेतली क्रिया ।
भुलले मी तुमच्या स्वरूपा ज्ञानदीपा
कर मजवरती छाया ।
तुम्ही कुटुंबवत्सल असें कळतां
कां लाविलिस माया ।

तुमच्या पायांत आधींपासून 'लग्नाची बेडी' असतां हा 'घराबाहेर' मला माया लावण्याचा उपद्व्याप कां केलांत आणि आतां माघार कां घेतां असा 'उद्यांच्या संसारांत' ऐकावयास येणारा सवाल पाहून आपण कोणत्या काळांतलें हें कवन वाचीत आहोंत असा संभ्रम उत्पन्न होईल. पण अन्यांना जें आतां सुचलें आहे तें शाहिरांना पूर्वींच सुचलेलें आहे. त्यांच्या दृष्टीनें हा अनादि सवाल आहे. त्याचा जबाब कवीनें तपशिलांत दिलेला नाहीं. तो येवढेंच सांगतो—

आली माया आंत करूनी इष्कील
धरूनी रंगमहालामधिं नेली ।

वाचकांना काय कोणत्यातरी रीतीनें शेवट झाला म्हणजे झालें. माया कोठें कशी आली, इष्किलपणा (कीं मिष्किलपणा) कोठें कसा झाला हें या फंदांत आतांपर्यंत आलेल्या अनुभवानें कळण्याला अडचण कोठें आहे ? पुढें—

जाई जुई मालती मरवा, पाच हिरवा
शेज पलंगावरि केली ।

आणि नंतर 'नानापरि विलास करिती'–वगैरे, हेंहि समजण्यासारखें आहे. या कवनाची—

जडण मोतिहारी महादूच्या चालीं ।
रामालीछमन बाणींत गाती
सभा चहाती सर गवळ्यासी येईना ॥ ४ ॥

रामाच्या म्हणजे सगनभाऊच्या रावळ परंपरेच्या नाथ सांप्रदायाची फडाची वारकरी सातापाच्या सांप्रदायांतल्या होनाजी गवळी फडाशीं अशीं कवनें प्रचारांत आणण्यांत मोठी चुरस असे. तिला अनलक्षून शेवटचे उल्लेख आहेत. दोघेहि कलगीवाले असतांना एकाच आखाड्यांत हे दोन पठ्ठे मोठ्या हिरीरीनें झुंजत असत. असो.

हा प्रीतीचा ऋतुरंग आणखी थोडा पाहूं. नंतर दुसऱ्या विषयाकडे वळूं. शाहीर प्रभाकराच्या अशा कवनाचा नमुना पाहा:–

कुणासंगें खेळूं रंग तुम्ही तरी सांगा ॥ ध्रु० ॥
छेलछबेला तो रंगेला गुलहौशी ।
लंपट झाला कोठें निश्चयें परस्त्रीशीं ।
घालती गळ त्याच्या मैत्रिणी धरिती त्यासी ।
मजकडे कैंचे मन, लवंडून द्या रंगा ॥ १ ॥

रामानें उभा केलेलाच हा एक प्रसंग आहे. प्रियकर एकच पण प्रेयसी अनेक असा हा बहुकोणीरंग शाहिरांच्या काळीं होता म्हणून त्यांना तो दाखविण्याची इच्छा झाली. असे बहुरंगी बहुढंगी लोक होते म्हणून त्यांच्या कवनांची कदर झाली. आतां फक्त केव्हांतरी, कोठेतरी त्यांचा आस्वाद घ्यावा, पण त्याला मान्यता देऊं नये; आणि द्यावयाचीच झाली तर कांहींतरी मोठें अगडबंब असें नांव देऊन तेथें ही हौस राजरोस फेडून घ्यावी असा जमाना आहे. तो बहुकोणी रंग अनुभवण्याचा मक्ता शाहिरीच्या उत्कर्षाच्या काळांतच मुदतीबंदीमुळें खलास झाला, नवीन मक्ता दिला गेलाच नाहीं, असें भासवून जगाची नजरबंदी खुशाल करावी. त्याला शाहिरांची ना नाहीं. असो.

मोत्यांचें पातळ मोत्यांची चोळी ।
घालुन तंग अशी जीव तळमळी ।
कोणास दावूं नखरा ? प्रियकर नाहीं जवळीं ।
न्हाणींत असतां तेथें तेलें लावीना अंगा ॥ २ ॥

चतुर बहुरूपी कोणत्याहि सोंगाची बतावणी करीत असला तरी लोकांनीं अगदीं पडद्याआड केलेल्या तऱ्हेतऱ्हेच्या गंमती तो उघड्यावर सांगतो; आणि तसें करतां करतां आपली खूणहि ठेवतो, एवढी सूचना पुरे.

वसंत पंचमी आज सण सुना जातो ।
मंगलदायक रुसुनी गेला कां तो ।
घालुनि पाखर कोणी आणा घरीं सांगातो तो ।
संचित माझें फुटकें, नका लावूं मोती भांगा ॥ ३ ॥

पंच प्रकारें वाढुनि ठिवलें ताट ।
घालून रांगोळी, तिष्टते, पहाते वाट ।
गंगू हैबती म्हणे पुढें करी सखये पाट ।
महादेव प्रभाकर म्हणे येकचित्तें वागा ॥ ४ ॥

प्रियकराला सजविलें

त्या पल्याडल्या, वरच्या रानच्या प्रेमळांची प्रेमाराधना दाखविण्यासाठीं शाहीर हातीं कडेंतंबोरी घेऊन उभे ठाकले तरी तेथचा आहारविहार यांना कोठून माहीत असणार. रुपया रोजच्या खानावळींत जेवणाराला सव्वाशें रुपये रोज भाड्याचें दिल्लीचें हॉटेल काय उपचार देत असेल तें कोठून माहीत असणार? टर्किश हमामखान्यांत पांच रुपये देणाऱ्या गिऱ्हाइकाला मऊ पायाकडून अंग रगडून मिळतें, तें पुष्कळांना ठाऊक असेल. पण शंभराची नोट सरकावणाऱ्याला काय लाभ होतो तो कसा कळणार? तो आपल्याच सुखसाधनांची कांहीं पांच दहा पट करून सांगेल. त्यापलीकडे शब्दांनीं जातां येत नाहीं. पण शाहिरांची खोड वाईट; आणि त्यांच्या परात्पर गुरूंचीहि खोड त्यांना भर देण्याची. त्यांनीं आपलें आत्मज्ञानपर लिखाण करतांना जे दृष्टान्त दिले, त्यांचा शाहिरांनीं उपयोग करून घेतला तर त्याबद्दल जबाबदार कोण? सुंदर सृष्टीची उभारणी आणि त्यांत परतत्त्वाचा प्रवेश हें अगदीं साधेंसुधें प्रकरण सांगतांना ज्ञानेश्वरमहाराजांना दृष्टान्त दण्याची इच्छा झाली. ते म्हणतात शिवशक्ति ही जोडी. शक्ति ही सृष्टि वाढविते. तींत शिव भरलेला असतो. पण तें समजेल न समजेल म्हणून म्हणतात—

लाजोन पतीचे अरूपपणें ।
लेववी विश्वाचें लेणें ॥

शाहीर टपूनच होते. ही पडत्या फळाची आज्ञा मिळतांच शाहिरांनीं तिचा चाहेल तसा उपयोग केला. कोणी प्रिया आपल्या प्रियकरावर अनुरक्त असलेली त्यांना दिसली म्हणजे त्याला नटविण्यासाठीं वस्त्रें-आभरणें पुरविण्याला शाहीर एका पायावर तयार. त्यांच्या नजरेच्या टापूंत असणाऱ्या साऱ्या पेठांचे व बागांचे मालकच ते. गोदाकांठचा तुकनगीरच्या सांप्रदायांतला कवि विश्वनाथगिरीचा हा नमुना असा :—

एक निष्ठावंत प्रेयसी म्हणते—

नाजुक साजुक कळ्या पिवळ्या गुंफिन आपल्या हस्तकीं ।
प्राणविसाच्या बैस मंचकीं, तुरा खोविन मस्तकीं ॥ ध्रु० ॥

सत्यवचन इमान, प्राण संकल्प करीन तुजवरून ।
नाहीं तुसी बेमान, कापलिस मान हातीं शिर धरून ।
तुझ्या पदरची दासी जिवलगा सनद देते करून ।
तुळशीपत्र भंडार, दिवस रविवार घ्या मूठ भरून ।
लागली चटक या जिवा । प्रियकरा ।
मज मैनेच्या राघवा । प्रियकरा ।
तुजमज सारखा जवा । प्रियकरा ।
चालवा कीं माझा लळा, पडलें गळां, पाहुनी वस्तु कीं ॥ १ ॥

तुझी काळजी मला जिवलगा जासुद पिटिले इथून ।
बऱ्हाणपूर पैठण थेट पोषाख आणिले तिथून ।
अगाबानी, चंदेरि महामुदी सांगितल्या ग्या इथून ।
ज्यावरि तुमची रीझ बुझाली त्याच आणविल्या तिथून ।
देईन जिवासी जीव । प्रियकरा ।
जाण पैशावर जाचव । प्रियकरा ।
मी तशी लालची नव्ह । प्रियकरा ।
खोटी असेन तुजविशीं करावी चौकशी आज पुस्तकीं ॥ २ ॥

ही प्रिया कोणी छटेल उनाड मैना आहे कीं दुसरीच कोणी खरोखरीच निष्ठावंत आहे याचा पडताळा या कागदी व्यवहारांत तरी पुस्तकावरून होणार. जिज्ञासूंनीं पुस्तकें शोधावीं.

नानापरिचे पदार्थ पुरविन बसल्या नाना परी ।
शहर पुण्यामधें कराव्या मौजा झोंक लावून भरजरी ।

पुणें शहराचा हा उल्लेख आहे असें वाटून पुणेंकरांच्या अंगरख्यांचे बंद कदाचित् तुटले असतील, पण खरा प्रकार निराळा आहे. हा शब्द वारंवार या चालू संदर्भात येतो. पुण्य या मूळ शब्दाच्या रूपाला विभक्तिप्रत्यय लागतांना किंवा विभक्तिदर्शक अव्यय पुढें येतांना पुण्य व पुणें या दोन्ही शब्दांचीं रूपें एकच होतात. पुण्याचे, पुण्यामधिं असा उच्चार व्द्यर्थीं योजला गेला आहे. ध्वनिसादृश्याचा उपयोग करून घेण्याच्या खोडीमुळें त्या शहराचा लौकिक वाढतो, आणि कांहीं वेळां कमीहि होतो. मी कांहीं शास्त्रज्ञ नाहीं. मला या उठाठेवी हव्यात कशाला!

मुखचंद्राची प्रभा तेज अनमोल तनु गोजिरी ।
स्वरूप पहातां मुखरण पद्मीण झुरते बंगल्यावरी ।
नको जाऊं कुणाचे इथं ।
ध्या दृष्टीचा ताईत ।
ह्या सवती मला माहित ।
वेड्या होऊन तुजभोवताल्या घालितील गस्त कीं ॥ ३ ॥

तिसऱ्या ताळीं, चवथ्या ताळीं मजा मारूं म्हणणाऱ्या अगदीं निष्ठावंत स्त्रिया आपल्या प्रियाला 'आपणच एकटी' अशी असावी हा व्यावहारिक निसर्ग कवीनें दृष्टीआड न करतां कवन रंगविलें आहे. हा सवतीमत्सराचा रंग रुक्मिणी-सत्यभामा, गंगा-पार्वती या आख्यानांतहि शाहीर रंगवतात.—

जाईजुई शेवंती मोगरा बरा पाच हिरवा ।
केतकी महतकी मालती दवणा पलंगावर मरवा ।
लावा गंध केशरी कपाळीं, मधीं टिळा भरवा ।
पहा माझी चतुराई गुंफिला तुरा नजर ठरवा ।

पत्रपुष्पांची यादी दिली आहे ती कित्येकांना मामुली वाटते हें खरें आहे. पण थोड्याशा नजरेनें हें ध्यानीं येईल कीं, त्या सर्वांचा भर एका विशिष्ट ऋतूंत असतो. महतकी व (मधु) मालती हीं दोन्हीं तर नित्य परिचयाचीं नाहींत. त्या काळच्या शृंगारांत शाहिरानें केशरी गंध आणलें आहे. तो आजच्या काळचा असतां तर कदाचित् पॉंडकोटींचीं प्रसाधनें येथें आणता; आणि फुलांत टी रोज, जेसमीनचा उल्लेख करता. हा तुरा गुंफण्यांतली चतुराई पाहा असें कवि प्रेयसीच्या मुखानें प्रियाला विनवितो आहे आणि वाचकांना हीच विनंती करतो आहे. पण तो नुसत्या शब्दाचा तुरा त्याचा आहे.—

कवि विश्वनाथगिरि म्हणे ।
गुंफिला तुरा युक्तिनें ।
आदिमाया आदिशक्तिनें ।

हा सर्व शृंगारथाट करविणारी कोण तें कवीनें शेवटीं सांगितलें आहे आणि तो तिचा प्रियकर कोण तेंहि सूचित केलें आहे. तसाच कोणी बाजीराव असेल आणि त्याच्या पदरांत हा थाट कोणी बांधूं लागला तर आडवा कोण येणार ? :-

म्हणे विठोबा नांदे लक्ष्मण निझामपुरीं वस्ति कीं ।
मलु दसु कवि बाळ करिती कवन शिरीं दस्ता कीं ॥ ४ ॥

सौंदर्यदर्शन

लावणी म्हटली म्हणजे त्यांत सौंदर्यदर्शन हा भाग असणार अशी ठाम समजूत आहे. माझ्या वाचकांना मीं आतांपर्यंत त्याच्यापासून शक्य तों दूर ठेविलें आहे, म्हणून पुष्कळसे माझ्यावर रुष्टहि असतील. शब्दांनीं ज्याचें वर्णन पूर्णपणें करतां येत नाहीं त्या 'प्रेमाची' ओळख करून देण्याच्या नीरस खटाटोपांत इतका दीर्घ पाल्हाळ केला. पण तें प्रेम ज्याच्यावर बसतें तें सौंदर्य आतां प्रत्ययास येईल म्हणून अधीर झालेल्या वाचकांना पूर्ण परिचित असणारा वाण दाखवून त्यांची सहानुभूति मिळविण्याचा प्रयत्न केल्यावांचून मला गत्यंतर नाहीं. 'मजमून-इ-हुस्न और इष्क' यांवर कवन रचणाऱ्या मराठी शाहिरांची ओळख करून देतों असें आश्वासन देऊन 'हुस्ना' पासून वाचकांना दूर ठेवीत आलों ही वंचना झाली, याची जाणीव मला आहे. पण त्याला सयुक्तिक कारण मीं स्वीकारलेल्या सारिणींत आहे. गवळणी, भारुडें हीं म्हणणें चांगलें, पण त्याची योग्य वेळ भजनसप्ताहाच्या पूर्णतेच्या दिवशीं, काल्याच्या प्रसंगांत. शाहिराच्या वाङ्मयाला मी तरी, खालच्या नंबरचें पण भजनच समजतों. अर्थात् त्यांतला उच्चनीच भाव मला राखला पाहिजे. एका बाजूनें लावणीचा किळस आल्यासारखें दाखवावयाचें आणि दुसऱ्या बाजूनें भडक रंगांत काढलेलीं स्त्रीशरीरांचीं चित्रें पाहात मिटक्या मारीत बसावयाचें अशी सध्या सुशिक्षित समाजाची स्थिति आहे. कृष्णराव मराठ्यांना शाहीर भीत नाहींत, कारण ते त्यांना पचवून बसले आहेत, असा आवाज मी भरसभांतून काढीत असतों; पण समाज त्याचा अर्थ बरोबर समजत नाहीं. शाहीर मर्यादा संभाळीत होते. आतांचा दुटप्पी पण निर्बळ समाज त्यांना मर्यादेचें उल्लंघन करावयास लावील अशी भीति मला वाटते. येथें इतकाच इषारा पुरे.

स्त्रीसौंदर्याचें वर्णन करण्यांत शिगेला पोहोंचलेला रामजोशी शाहीर व्युत्पन्न पंडित होता, पुराणीक होता, व शेवटीं कथेकरी झाला. एका जन्मांत असे तीन प्रकार त्यानें केले आहेत. कवितेच्या अनेक अंगांवर त्यानें प्रभुत्व मिळविलें आहे. तो शाहीर आहे. व्यंकटपतीचें स्मरण करणारा आहे. पंढरीचें दर्शन शब्दांनीं घडविणारा आहे. पुराणांतल्या कथेंत केव्हां केव्हां कालक्रम ध्यानीं ठेवीत नाहीं, पण वाचकांना अगर श्रोत्यांना मोहनी घालूं शकतों हें अगदीं खरें. म्हणून वाचकांची अपेक्षा पूर्ण करण्यासाठीं त्यांचें सुप्रसिद्ध कवन येथें देतों :—

सुंदरा मनामधें भरली, जरा नाहीं ठरली, हवेलिंत शिरली, मोत्याचा भांग।
अरे गड्या हौस नाहीं पुरली, म्हणोनी विरली, पुन्हा नाहीं फिरली, म्हणोनी सांग ।ध्रु०।

या पद्यींतल्या कर्णमधुर वर्णीत कांहींतरी 'रूप' या रसिकवरानें सांठवून ठेविलें असावें असा भास होतो. 'नाहीं तेंच पाही डोळेभरी' अशा सामर्थ्याचे कोणी शाहीर असतात.

जशि कळी सोनचाफ्याची न पडूं पाप्याची
दृष्टि, सोप्याची नसल ती नार ।
अति नाजुक तनु देखणी, गुणाची खाणी,
उभी नवखणी चढुन सुकुमार ।
जशि मन्मथरति धाकटी सिंहसम कटि
उभी एकटी गळ्यामधें हार ।
अंगीं तारुण्याचा बहर ज्वानिचा कहर
मारिते लहर मदन तलवार ।
पायीं पैंजण झुबकेदार कुणाची दार
कोण सरदार हिचा भरतार ।
कुलविद्याजडाव टिकली मनामधें टिकली
नाहीं हटकली तेज अनिवार ।
नाकामधें बुलाख सुरती चांदणीवरती
चालते गड्या गजाची चाल लड सुटली कुरळे बाल
किनखाप अंगिचा लाल हिजपुढें नको धनमाल ।
शोभवी दिठोणा गाल हिला जरि शाल
विषय भोगाल फिटतिल पांग ।
ही शुद्ध इंदुची कळा मलिस ना कळा
इतर बाकळा न हिजहुनि चांग ॥ १ ॥

एक तेजस्वी नार, सुंदरा, बाला अशा शब्दांनीं योगमार्गीतील वाङ्मयांत उल्लेखली जाते.

उदाहरणार्थ : उंचा उंचा पावत ताहिं बसइ सबरी बाली।
मोरंगी पिच्छ परहिण सबरी गिंवत गुंजरी माली
उमत सबरो पागल शबरी माकर गुली गुहाउर।
तोहोरीणिअ धरणी णामे सहज सुंदरी ॥

——*शबरपाद*

रामजोश्याची नजर तेथेंच खिळली आहे कीं काय तें आतांच न ठरवितां कवनाचा पुढचा भाग प्रथम पाहणें बरें. तूर्त स्त्रीसौंदर्याच्या विविध अंगांचें वर्णन चालू आहे, तें पाहावयाचें :—

सुंदरी मूर्ति मदनाची अमृतवदनाची
मदनकदनाची विखारी धार ।
बाहुली कामसूत्रांत मदन नेत्रांत
कोकशास्त्रांत निपुण ही फार ॥

शुक पिक यांनीं धरिली लाज जाहले बाज
कंठिं आवाज विण्याची तार ।
ही मन्मथ नवरस हवा काय पहावा
वूट व्हावया सफल संसार ।
कचवनांत सौदामिनी दिवस यामिनी
जपावी मनीं किं नकळे सार ।
वेणींत सूद राखडी कोर चोखडी
माडीवर खडी विडा रंगदार ।
मणि कुसुम कर्ण शोभवी, मतिस लोभवी
मला तरी भवीं वाटली सार ।
नव्हे सुगंधा प्रौढा बाल दाविते तरु घोताल
जितकंबुक तिचें नाल अप्सरा गुणी गुंजवाल ।
वाटली मदन करवाल, काय करवाल
कसें ठरवाल हिचें कनक अंग ।
धाकुटि म्हणून कैकांची तुम्ही ऐकाची
हिणें कैकांची उतरली भांग ॥ २ ॥

सुजबंद छंद नग नवा, बसविला जवा,
तंत ताजवा, न नग बहु भार ।
त्रिवळीं तळीं कांची दाम मौक्तिकोद्दाम
हिचा दरदाम जाणतो मार ।
नखिं नखिं मेंदि रंगलाल अंगठीवर लाल
बहुत गुलजार चमक हिल्लाल ।
सोन्याचे पाय जीवतळीं मदनपूतळी
टाकि भूतळीं मंजु झुमकार ।
सुंदरी म्हणासि बाहेर चाल बाहेर
हिचें माहेर कुठें घरदार ।
ती उभी जवळि तिचि बटिक चढून जा हटिक
बोल चाल ठीक माडीवर वार ।
दैवानें ध्यावि लाधली नार बांधली
बहुत साधली विरळ कुणिवार ।
यापरि होउनि बेताल
तो तरुणहि कुनका बाल
पुरविला मनाचा ख्याल
हा दर्द कठिण बेताल

म्हणवून जरी टाकाल नाहक बहकाल
सुरस चाखाल कुठुन मग सांग
कविराय चमकला हीर लोकजाहीर
इतर शाहिर काजवे वांग ॥ ३ ॥

विश्वमोहिनी अशा 'तम' मायास्वरूपाचें हें मूर्तिमंत रूपक आहे. भारतीय किंबहुना जागतिक तत्त्वज्ञानांतला हा एक अटळ भाग आहे. श्रीमच्छंकराचार्यांनीं मायेच्या 'तम' रूपांतल्या आविष्काराचें अतिसंक्षेपानें एका श्लोकांत व्याख्यान केलें आहे. शतश्लोकींतला २६ वा श्लोक असा--

चत्वारोस्याः कपर्दा युवतिरथ भवेन्नूतना नित्यमेषा ।
माया वा पेशला स्याद्घटनघटनापाटवं याति यस्मात् ॥
स्यादारंभे घृतास्या श्रुतिभववयुनान्येवमाच्छादयन्ती ।
तस्यामेतौ सुपर्णाविव परपुरुषौ तिष्ठतोर्थप्रतीत्या ॥

श्री. विष्णुशास्त्री बापटांनीं या श्लोकाचा अर्थ असा केला आहे--

ह्या मायेचे चार उत्कर्ष आहेत: १ ही माया नित्य नूतन (तरुणी) असते म्हणून ही युवती होय. २ ज्याअर्थी ही अत्यंत दुर्घट अशीं कृत्यें करत्ये त्याअर्थी ही अत्यंत कुशल आहे. ३ प्रथमतः ही मोठी रमणीय वाटते व ४ उपनिषदांतील प्रतिपादनाला झाकून टाकिते. अशा या मायेमध्यें दोन पक्ष्यांप्रमाणें जीव व शिव हे विषय भोगीत राहतात.

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषवजाते
—मुंडकोपनिषद् ३ : १

या श्लोकांतील 'तम' हा शब्द मूळ नासदीय सूक्तांतला, पुढें उपनिषदांतहि घेतला गेला. त्याचा अर्थ केवळ भौतिक घेण्यानें अर्थांत फार फरक झाला आहे. हें भौतिक पद्धतीचें रूपक आहे. त्रिगुणांतला तमहि हा नाहीं, तर त्रिगुणांच्या साम्यावस्थेचा निर्देश या शब्दानें केला आहे. ती साम्यावस्था अनुभविली जाते अशी स्थिति म्हणजे गाढ निद्रा. तींत आनंदाचा उत्कर्ष असतो. येथेंच जीवशिवाचें पूर्ण मीलन झालेलें असतें. या एकत्वाच्या मीलनाच्या आनंदांतून सृष्टीची उत्पत्ति. 'आनंदात् इमानि भूतानि जायन्ते' अशी श्रुति आहे. या आनंदाला कारण ती माया. ती निंद्य नाहीं. तथापि ती स्वाधीन ठेवण्याला दुर्घट. ती 'दुरत्यया' आहे. यासाठीं शाहीर रामजोश्याची सूचना यथार्थ आहे. तो म्हणतो—

'हा दर्द कठिण बेताल, म्हणवून जरी टाकाल,
नाहक बहकाल, सुरस चाखाल कोठून मग'.

" ' आगरींचें क्षीरसागरीं पैलडोंगरीं दुभते गाय रे '
दोही त्याचे दुभते, जेवी, त्याची मेली माय रे "

—श्रीज्ञानेश्वर

रामजोशी तुरेवाला असला तरी कलगी पक्षाचें मर्म या शब्दांत त्यानें यथार्थ वर्णिलें आहे. रामजोश्यानें उभा केलेला रंग कोणता आहे व तो कशा अर्थानें घेणें जरूर आहे, याचा उलगडा असा होऊं शकतो.

गंगथडीचा नमुना

आतांपर्यंत पुणें प्रांतांतल्या शाहिरांचीं कवनें पाहिलीं. पण त्यामुळें असा आक्षेप निघेल कीं, फक्त पुण्याच्याभोंवतीं अशीं हीं कवनें पिकलीं आणि त्याबाहेरचा भाग अगदीं नापीक असा आहे कीं काय? महाराष्ट्रांतील चारी टोंकांची भूमि कवनांसाठीं सुपीक आहे. पण सर्व ठिकाणचा माल हवा तसा व हवा तितका उपलब्ध नाहीं. शंभरांचेवर कवनें उपलब्ध आहेत पण त्यांच्या कर्त्यांचें नांव व ठावठिकाणा नकलकारानें नकल करतांना वगळला आहे. यामुळें ही पुणेंप्रांतींची मिरास वाटेल अशी प्रसिद्धि झाली आहे. गोदाकांठ व कृष्णाकांठ हे शाहिरी कवनांचे आश्रयदाते होते. पण मनोरंजक शाहिरी कवनें कृष्णकांठचीं बापूराव रेटरेकरांच्यावांचून दुसऱ्यांचीं हातीं लागत नाहींत. गोदाकांठांत वावी देवपूरचा परशराम जुनाच आहे. पण त्याचा बोलबाला बडोद्यास झाला तितका पुण्यास झाला नाहीं. म्हणून पुण्यास मिळणाऱ्या बाडांत त्यांचीं कवनें थोडींच मिळतात. तथापि चित्रशाळेनें मिळालीं तीं व तशीं प्रसिद्ध केलींच आहेत. आतां सुशिक्षितांचें लक्ष त्या विषयाकडे पुनः लागत आहे, याचीं चिन्हें दिसत आहेत. म्हणून तूर्त हातीं आलेल्यांचा परिचय नमुन्याच्या रूपानें करून देणें प्राप्त आहे. असो.

आतांपर्यंत पाहिलेले शाहीर बहुधा सगळे नाथपंथी अगर तदंगभूत उपपंथांतले होते. वारकरी पंथ नाथपंथाशीं पदर जुळवावयास तयार नसतो म्हणून त्याच्या छायेखालच्या गवळी फडांतल्या शाहिरांना मी नाथपंथी म्हणत नाहीं वा वारकरीपंथी म्हणण्याची सोयच नाहीं. हें सोंवळेंओवळें कांहीं मर्यादेसाठीं ठेवणें योग्यच आहे. आता मी दाखविणार आहें ते गोदाकांठचे शाहीर अशा भिन्न भासणाऱ्या पंथांतले आहेत. वावी देवपूरचा परशराम आणि दुसरा पैठणचा बाळकृष्ण. विषयांच्या वर्गवारीनें कथन चालू होतें. त्यांत विकासावर नजर होती. आतां मध्यभागीं शोभणाऱ्या कांहीं संकीर्ण बाबी सांगावयाच्या आहेत. त्यासाठीं परशरामाचें एक कवन थोडें दीर्घ आहे तरी येथें देतों:—

पतिव्रता खुण करून पतीला गुंफून दिधला तुरा।
परपुरुषीं जर मी रत होईन तरी सुकेल चातुरा ॥ ध्रु० ॥

परमुलखीं जाउन राहिला बारा वर्षें जरी।
नाहीं सुकणार तुरा जराभर हीच प्रतिज्ञा खरी॥
ऐसे ऐकून नारिचे शिपाई हर्षले अंतरीं।
आम्ही जातों लष्करी, कामिनी खुशाल रहावें घरीं॥
चार कामें तुज सांगून जातों निक्षुन हृदयीं धरी।
विन पैशाविण महाल बांधून बाग लाव रसभरी॥
पुरुषाविण स्त्री पर्णुन आण एक आम्हास गुणरूपपरी।
पुत्र पतिविण पैदा करून ठेव आपले मंदिरीं॥
असें सांकडें घालून गेला फंदी फाकडा झुरा।
रात्रंदिवस काळजी नारिला चैन पडेना जरा॥ १॥

नव गेंदाचा तुरा मस्तकीं फुलाशीं फुल दाटलें।
हुजूर चाकरी राजापाशी कांहीं दिवस लोटले॥
ताहादार नित्य नवा सुकेना अभिलोळ तुटले।
कुठून लावितो न कळे शोधितां सहा महिने लोटले॥
कांहींतरी किमया असेल पराक्रम आश्चर्य वाटलें।
वर्म पुसाया त्यासि एकांतीं राजानें गांठलें॥
तो म्हणे आमची नार सती घरीं सुवर्ण मुशीं आटलें।
तिचें ब्रीद हें लावून आम्ही चार मुलुख खेटले॥
ऐकुन राजा झाला बाण जिव्हारीं पुरा।
तुरा सुकेल तरी नक्षा राहिल यावर आपला कुरा॥ २॥

पलंगाची चाकरी शिपाई जवळ हुजूर ठेविला।
पतिव्रतेचें व्रत भंगाया प्रधान पाठविला॥
शहराबाहेर मुक्काम करूनी कागद भेटविला।
गोष्ट लावितां तिशीं पतीचा हुकूम आठविला॥
बाग महाल जर बांधुन देशिल तर जीव बाटविला।
दासी हातीं संदेसा मनसुबा थोडक्यांत आठविला॥
बागमहाल त्यानें सहा महिन्यामधें तयार करून ठेविला।
आपल्यासारखी सजवुनि दासी तिशी रंग लुटविला॥
पतिव्रताव्रत राखुन आपलें अभंग अक्षइ हिरा॥ ३॥

पुणें-जुन्नरच्या शाहिरांच्या कवनांच्या पाहणीनंतर ही गंगथडीच्या शाहिराची वानगी, ही कथानकरूपाची आहे. तेव्हांचा काळ जसा होता त्याला अनुरूप असें आख्यान आहे. ‘प्रेम’ या शब्दाच्या नांवाखालीं धुडगूस नाहीं. खुला मामला

आहे. कवि खऱ्या अर्थानें ग्रामीण आहे. पण तो देवपूरचा आहे. कथा सादर करतांना लोकांच्या मनाचा ठाव घेणारा आहे. स्वतः विठ्ठलमात्रा घेतलेला आहे आणि पथ्यें संभाळून लोकांनींहि ती मात्रा घ्यावी असें इच्छिणारा आहे. त्यानें उभी केलेली गुंतागुंत कशी उलगडली तें पाहण्यासारखें आहे. आतां तें कदाचित् कोणाला अद्‌भुत वाटेल; परंतु मुख्य भाग केवळ सत्य वस्तूच्या पुनर्दर्शनाचा आहे, असा समज पटेल असा मला विश्वास आहे :–

कुच करून मग प्रधान आपल्या नगराशीं जाता।
सर्वे निघाली गवळण होउन कोणा न कळता ॥
पत लावून तिनें पती भोगिला पाहून दिस चौथा।
पोषाक खंजीर खूण मागितली लावून मोहममता ॥
करून साज पुरुषाचा निघाली परतुन घरीं येता।
खंजिराशीं लग्न लावून आणिली दुसरी दुहिता ॥
नव महिन्या घरीं पुत्र प्रसवली आनंद बहु चित्ता।
वर्तमान लिहून पाठविलें ' झालें मूल ' वार्ता।
पत्र वाचितां हरुष झाला मग वाटी साखरा।
आज्ञा मागे बहु युक्तीनें ' जातों आपल्या घरां ' ॥ ४ ॥

दासी भोगून प्रधान थकला विनोद राजा करी।
नाही सुकला तुरा जराभर नार सती ते खरीं ॥
तलब चुकवून पोषाख दिधला खुप उमदा भरजरी।
यशाचा शिरीं तुरा लावून जय घेऊन आला घरीं ॥
' चार कामें हीं करून ठेविली वाईट अथवा बरी '।
पोषाख खंजीर खूण दाविली याला साक्ष हरी ॥
दोघी बायका आणि पुत्र प्रीतीनें बसून अंकावरी।
लाखांमध्यें कोणी विरळा असली नाहीं घरोघरीं।
नामी विठ्ठल परशुराम गुण येसू गातो शिरा।
रामकृष्ण रामाचे तोड हे ऐकुन नवशिक झुरा ॥ ५ ॥

स्त्रियांचें पातिव्रत्य हें बहुमोलाचें मानलें जात होतें अशा काळांतील आणखी एक तसाच नमुना दाखवितों. पैठणचा कवि बाळकृष्ण याची कविता पुण्यासहि प्रसिद्ध झाली होती. अलीकडे पुनः त्याचें नांव उजेडांत येत आहे. हा पैठणचे महिपतिनाथ यांचा शिष्य अथवा अनुयायी. या नाथांची कविता विपुल आहे. त्यांचा उल्लेख मीं मनोविनोदात्मक शाहिरीच्या प्रकरणांत केला आहे. ते स्वतः साधु होते आणि आतां त्यांना गुरुस्थानीं मानणाऱ्या कवीची कविता

सांगण्याचा सुयोग आला आहे. शाहिरांची परंपरा शुद्ध आहे असें ठासून सांगत असतांना माझ्या डोळ्यांपुढें जे आधार होते त्यांपैकींच हा एक आहे. एका पतिव्रतेला कोणी मूर्खानें अयोग्य आवाहन केलें असतांचा हा प्रसंग असा आहे.--

नाहीं तोचि बोल बोलिला कठिण संचारला जिव्हाळी।
करील मार शब्दाचा तिची कर सखया सावली ॥ ध्रु० ॥

पतिव्रतेला झालेली सूचना कितीहि अयोग्य असली, ती तिच्या काळजाला जाऊन भिडली, तरी तिनें स्वतःची सात्त्विक भूमिका सोडूं नये अशी अपेक्षा करणारा कवि आहे. त्याचा आशय अत्युच्च पातळीवरचा आहे. पण सात्त्विक क्रोध म्हणून कांहीं एक आहेच. त्या आधारावरून पतिव्रतेनें आगळिक करणाऱ्याची कशी खरडपट्टी काढली आहे तें पाहतांना कवीची भूमिका मात्र स्पष्ट होईल. ती भूमिका खचित एकदेशीय वा एककालीन नाहीं. पतिव्रता म्हणते--

आम्ही कुळवंताचे कुळीं जन्मलों कुळवंत जोडिला।
नाहीं उभयवंशांत पाय आडवाटेवर पडला ॥
जरि समय असा वर्तला, सूर्य भूतलावरी पडला।
भूमिनिराळा जाये निघोनी जिवंत गडबडला ॥

कांहीं पूर्वदोषी यामुळें जन्म हा स्त्रीजातीचा घडला।
आतां नाचरूं दोष, नेम सिद्धांत जीवीं जडला ॥
तेजापासी शीतता, शीतते आणि उध्दान।
चंचळी अचळता, अचल चलन निर्माण ॥

मेरूसी मशकाकरीं घडे अपमान।
मशका मेरुसम तुल्य घडे महिमान ॥
सोडी शांति भूमिका, धरी क्रोध वरदान।
सोडी समुद्र मर्यादेसी असें विंदान ॥
जाण वर्तल एकवेळीं।
पतिव्रता हा धर्म न पावे भंग कदाकाळीं ॥ १ ॥

जाणता नेणता कसा निघसी निर्याणाचे कपाटीं।
लाविसी निज जिव्हेसी काष्ट या काममदासाठीं ॥
जिव्हाग्रीं वसे लक्ष्मी मित्रभ्रातुये जिव्हे निकटीं।
जिव्हाग्रीवासे महिमान राजसन्मान परिपाठी ॥
जिव्हाग्रीं करूनी बंधन होय तात्काळ।
मानिला तोचि उपदेश म्हणे फटमाल ॥

नरनारी नपूंसक नव्हे थोरला बल।
कविछत्र महीपति राव रनभीड कनुवल।
रघुहरी जननी प्रतिपाळी।
बाळकृष्ण म्हणे भवानी आनंता गातो नवी नव्हाळी ॥ २॥

मुक्तेश्वराचें वसतिस्थान, त्याचें आराध्य दैवत 'लीलाविश्वंभर' यांच्याविषयीं शोधकांची चर्चा चालू आहे. पण तो श्रीएकनाथांचा नातू, मुलीचा मुलगा, याविषयीं वाद नाहीं. पैठणपरिसरांत मुक्तेश्वरी भारताचा आदर विशेष कां याचा उलगडा करण्याचेंहि कारण नाहीं. तूर्त पुढें चालू :—

पाहे आणिक दुसरी कथा राजसूय यज्ञ संनिधानी।
विप्रपंक्तिमाजि अन्न वहाडितां याज्ञसेनी॥
ते समयीं हृदय ग्रंथिका कंचुकी सुटली तये स्थानीं।
कर गुंतले अन्न वहाडितां उभय पाणी॥
नये पल्लव सरसावितां, कौरवादिक म्हणती वहिनी।
भिन्न मागती अन्न, टाळीवर टाळी वाजवोनी।
जाली लज्जित अबला करुणा स्वरें बोभाये।
म्हणे धाव पाव कृष्णा ये प्राणसखे माये।
तंव भक्तवत्सलें करूनि दाविले काय।
केलि चतुर्भुज द्रौपदी ठाय प्रति ठाय॥
खल दुर्जन घालिती घोण, पाहती पाय,
साधुजन वाजविती टाळी।
आनंद ब्रह्मानंद कोंदला न माये अंतराळीं॥ ३॥

ही कथा सुप्रसिद्धच आहे. पाठ्य कवनांतून हेच रंग वाचकांच्या परिचयाचे झालेले असणार. परंतु श्राव्य काव्यांत ते कसे वठतात, हें शाहिरींत दिसतें. म्हणून हीं कवनें सविस्तर मी देत आहें. आतां 'बालकृष्णा'च्या शाहिरी कवनाचा आणखी एक नमुना देतों. पदरीं पडलें तें प्रिय व्हावें असा आशय आहे—आणि तो दाखल्यांनीं रंगविला आहे. दाखले ताडून पाहण्याजोगे खास आहेत. कवनाचा उपोद्घात असा—

परमदीन, मी रूपहीन हा द्वैतभाव झाला।
नाहीं तुम्हा मी योग्य, स्वामी, म्हणुनी तुम्हासी वीट आला ॥ध्रु०॥
पूर्वीं म्या गिरिजापति पूजा करूनी तोषविला।
म्हणुनी तुमच्या पदकमलाचा लाभ मला झाला॥

तुम्ही गौरिसी लाथ मारिली सन्मान नसल केला ।
म्हणून तुम्हांस मीं जोडले स्वामी तुम्ही चुकला ॥
तुम्ही गोरे मी काळी हा कसा संयोग घडून आला ।
राजहंस पक्षाचे गळा कावळा बांधियेला ।
गरज लागल्या भलती तुम्हासी 'या ' म्हणाल बोला ।
तुम्हाविण गती नाहीं मजला ।
करूं नये अंगिकार केला ।
टाकितां नये समर्थाला ।
जंबुकाचे रक्षणालागीं सिंह म्हणे प्राण दिधला ॥ १ ॥

यावर दाखला प्रथम महाभारताच्या आदिपर्वांतील एका कथेचा दिला आहे. मुक्तेश्वरी भारत १२ येथें ताडून पाहण्याजोगें आहे. नंतर भागवतांतील आहे.

सरितातटिं नवलांत ती नार होती दुर्गंधा ।
पाराशरऋषिसंग करितां झाली योजनगंधा
जांबुवंताची कन्या पहाती जांबुवती मुग्धा ।
स्वरूप सीन असतां हरिनें पर्णिली करून स्पर्धा ॥
कोणी कुब्जा सर्वांगीं तिला शापाची असे बाधा ।
हरिचरणिं लागतां झाली दिव्यांगी शुद्ध बांधा ॥
केसरीचीं पाउलें उमटतां पहा भुलला लोक ।
शेळीनें तो आश्रय केला ।
त्यास तो अभिमान झाला ।
श्वापदा ठेवी रक्षणाला ।
अहंकार धरला ।
म्हणून बसवी गजामस्तकाला ॥ २ ॥

अंगिकार केलिया पुन्हा दाविता भाव दोन ।
यांत नाहीं उचित घडलें, घडो तुम्हाकडून ॥
अंगिकारले वडवानल भीतरी सागरानें ।
प्राप्ती झाली उदकासी परि त्यागिले नाहीं त्यानें ।
अंगिकारलें हलाहल गिरिजाधवानें ।
नीलकंठ पावला नाम परि न त्यागी त्या लागून ॥
वोहळ जसा गंगेसी मिळाला गंगारूप झाला ।
फिरून गंगेनें निवडिला, कोणि देखिला न ऐकिला ॥

वेगळें कां करितां मजला
काठी मारिल्या जळीं न होती दोन भाग त्याला ॥ ३ ॥

फार काय बोलूं झडो ही रांड माझी जिव्हा ।
निज पल्लव पसरिते सर्व अपराध मला द्यावा ॥
कविछत्र महिपति राव रणभिड म्हणे धन्य दैव ।
नाहीं रूपासी काम कुणाचा सगुण गुण घ्यावा
रघु हरि म्हणे होय ज्ञानप्राप्ती हा पूर्वीचा ठेवा ॥
बाळकृष्ण लडिवाळ लेकरू सर्वांसी व्हावा ।
स्वरूपहीन असे नार परंतु ज्ञान असे तिजला ।
पहाता जेवि त्या फणसाला
दिसती वर काटे त्याला
अंतरीं प्रेमरस भरला ।
भवानी अनंता म्हणे दृष्टांत साजला हो तिजला ॥ ४ ॥

संगमनेर तरी गंगथडीचें रहाळ. तेथचे सातपिढ्या कवित्वाचा वर मिळालेले अनंतफंदी सबंध उत्तर पेशवाईंत महशूर. सगळ्या शाहिरांत लौकिक. ‘ अजिंक्य ज्याचा हातकंडा ’ म्हणून आदर. पिढिजाद वृत्त्यंशी, देवीचे गोंधळ घालणारे, पुढें कांहीं काल तमासगीर व शेवटीं कीर्तनकार असा चतुरस्र प्रकार. पेशवाईतले शेवटचे प्रकार जवळून पाहण्याची संधि यांना लाभली होती. तिचा त्यांनीं उपयोग करून कवन केलें. पोवाडा भागांत त्याचा नमुना येईलच. पण त्या प्रत्यक्ष पाहिलेल्या लोकस्थितीवरून केलेली त्यांची रचना पुढें इतरांना स्फूर्तिदायक झाली. पेशवाईच्या अस्तानंतरच्या पन्नास वर्षांत जो इंग्रजी-मराठी असा मिश्र साक्षर वर्ग उदयास आला. काप जाऊन भोकें राहिलेल्या इनामदारांच्या द्रव्याच्या साधनावर हा समाज आपली सुख चैन भागवूं लागला. त्यांच्यासाठीं कित्येक नव्या लावण्या रचल्या गेल्या. त्यांत भडकपणा आहे. चटका, ठसका सर्व कांहीं आहे. पण त्यांपैकीं बहुधा सर्व कवितांचा कर्ता अनाम आहे. त्यांची व जुन्या शाहिराची गल्लत सुरू झाली; आणि त्यामुळें शाहिरांवर शिंतोडा आला. अशा नूतन काव्याला स्वरूप येण्याला फंदीबोवांची एक रचना स्फूर्तिदायक झाली. तें कवन असें—

हे मूर्खा खूण तर्का परका पुरुष आपला नसे ।
तशामधि कोणी विरळा प्रीत चालवीतसे ॥ ध्रु० ॥

मध्यमवर्गीयांच्या बैठकींत आद्यासह म्हटल्या गेल्यास ही व हिच्या नमुन्यावर केलेल्या लावण्या श्रोत्यांवर कसा परिणाम करीत असतील तें सांगावयास नको. ‘ तुम्ही माझे सावकार, ’ ‘ तुम्हा झालें स्वयंवर ’ इत्यादि कवनें अशींच आहेत

आणि तींच पुढें पन्नास वर्षें लोकप्रिय होतीं व आहेत. पण त्यांनीं शाहिराचें नांव मागें पाडलें, हें खरें आहे. 'खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनीं' हें नाटकांतलें पद त्यांतील भावदर्शनाच्या सोयीमुळें गाणारणींच्या गाण्यांत वारंवार शिफारसलें जातें तें कां हें ध्यानीं येईल. असो. कवन पुढें पाहावयाचें—

म्यां म्हटलें हा यक रुपया दिसतो माल खरा।
वाजून जो पहातो तों आंत तांब्याचा भुरभुरा ॥
म्यां म्हटलें हा शुरा शिपाई फांकडा खूब तऱ्हा।
झुंझाचे जेव्हां तोंड लागलें फिरतो माघारा।
म्यां म्हटलें हा सुरेख उमदा आंगठीवरला हिरा।
बसता घण मस्तकीं कसा झाला चुरा ॥
म्यां म्हटलें कोणी आहे मिजाशी फार नाजुक दिसे।
हस्तचरण सनकाड्या क्षयरोगानें जिंकिले असे ॥ १ ॥

× × ×

म्यां म्हटलें हा घोडा शुरा किमतीचा दिसतो।
त्याहाळून पुरतेपणीं पहाते तो गर्धभ दिसतो ॥
म्यां म्हटलें राघू पिंजऱ्यामाजीं डोकावतो।
जवळ जाऊन पहाते तों कावळा आदा दावितो ॥
म्यां म्हटलें कोणी चतुर शहाणा योगी बोलावितो।
संबंध घडल्यावरी कळूं आला मूर्खसा मजकी तो ॥
म्यां म्हटलें कोणी गायक गातो तान झोकितसे।
फंदी अनंताचे छंद जिव्हारी शस्त्र भोस्कीतसे ॥ ४ ॥

शिवनेरीचा नूर

आतांपर्यंत कांहीं भिन्नभिन्न रंग कवनांतले पाहिले. त्यांत चपखल बसणारा असा पण अगदीं सोवळा रंग जुन्नरच्या शाहिरांनीं बनविला आहे. जुन्नरकडे बहिरू मल्हारी, गोविंदराव असे शाहीर झाले. त्याचप्रमाणें इंग्रजी राज्याच्या सुरुवातीनंतर किंवा त्याच सुमारास दुला रखमा हे शाहीर मुंबईकडे प्रख्यात झाले होते. नांव दुर्लभ, त्याचें दुला हें रूढ रूप. नांवावरूनच तो व्युत्पन्न असेल कीं नाहीं याविषयीं तर्क होऊं शकतो. त्याची प्रभावळहि मोठी होती. अडाणी आणि अचरट कविता करणारे ते शाहीर असे अभिप्राय देणाऱ्यांची भांग उतरवील असा या शाहिराच्या कवितेचा नमुना आतां पाहा :

स्मरारे पांडुरंग भक्तभवरंग श्रीरंगाप्रती।
कटिकर ठेवुनि नीट विटेवर अक्षयी रुक्मिणीपति ॥ ध्रु० ॥

कमलानन कमलाक्षा कमलावरा कमललोचना ।
नाभीकमळीं कमळामाजीं जन्म चतुरानना ॥
लक्ष्मीकुचकुंकुमांकारका आदी नारायणा ।
सनक सनंदन मनरंजना निर्जर पटलेखना ।
मधुसूदना मनमोहना मुरारी भवगजपंचानना ।
त्रिविधतापदाहशमना त्रिविक्रम बळीबंधना ।
दीनरक्षक दीनबंधु करुणासिंधु त्रिजगत्पती ॥ १ ॥

विश्वकारणा विश्वपालणा विश्वमतीचालका ।
विश्वजीवना विश्वेशा विश्वंभरा भक्तपालका ।
गोरक्षक गोवर्धनधर गंगाधर हालहारका ।
गोविंदा गोपाळा गोलांगुल कपिउद्धारका ।
आगम निगमागम अज अजित सौख्यदायका ।
नंदनंदा आनंदकंदा निंदकसंहारका ।
सुखाब्धि सुखकरा सर्व ही तव सत्तें वर्तती ॥ २ ॥

रमाधवा माधवा यादवापति हरी गुणनिधी ।
इंद्रचंद्र रवि महान् योगी नित्य ध्यान तव पदीं ।
पीत पितांबर कटीं भक्तसंकटीं धावसी आधीं ।
चतुर्भुजें येऊनी चतुर्भुज केली सती द्रौपदी ।
पार्थरथीं सारथी होउन पण नेला सिद्धी ।
भक्तकाम करी स्वतां न्यूनता पडूं देइना कधीं ।
अंतपार न कळे शेष वर्णितां खुंटली मती ॥ ३ ॥

पुंडलिकाचे द्वारिं उभा हरि चंद्रभागेचे तिरीं ।
कर जंघनीं ठेवून बौध्य होउन वसे पंढरी ।
दुलाजी कवि गुरुकृपें अनुभवी धाले अंतरी ।
नित्य हरीचे गुण गात धुंद भजनांत शहर जुन्नरी ।
बापू तुळसिराम नित्य करुणाकर कवन करी ।
संत समागम सदां ध्यान संताचे चरणावरी ।
आवडिनें गुण गाई बसुन खुब सिरा गुगी गणपती ॥ ४ ॥

शाहिरांच्या मनोरंजक विभागाचें दर्शन घडवीत असतां मी हें कवन देत आहें. असें पाहून या क्षेत्रांत पूर्वीच खरोखरीच्या गुणांनीं यशवंत झालेले कांहीं रसिक ' ही काय शाहिरी आहे ! ' असा खडा सवाल करतील हें मी जाणून आहें. नव्हे, मला तो अनुभव आहे. मला अशा वेळीं ज्ञानेश्वरांच्या ओव्यांची आठवण

होते. कृष्णार्जुनसंवादाला अगदीं भरती आली, नव्हे शेवटचा गोड घास अर्जुनाच्या मुखांत पडत असल्याचें संजय वर्णन करीत असतां त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून युद्धांत आपल्याच पुत्रांना यश येणार अशी आशा चघळीत बसलेल्या अंध धृतराष्ट्राला असा फटकारा खाण्याचा प्रसंग आलेला आहे.

रावो म्हणे संजयापरी। कैशी तुझी गा॥ १६२३॥
तेणें तूंतें येथें व्यासें। बैसविलें कासया उद्देशें।
अप्रसंगामाजीं ऐसें। बोलसी कांई॥ २४॥

—ज्ञानेश्वरी

पण मी त्याकडे किंचित् काणाडोळा करून म्हणतों, 'सनकसनंदन मनरंजन' अशा प्रभूची स्तुति शाहिरांनीं मनोरंजक प्रकारांत केली तर बिघडलें कोठें? नुसत्या रंगावरून काव्य म्हणण्यालादेखील हे लोक तयार नाहींत. त्यानें तसा कांहीं अशनचमत्कार करून दाखविला तर त्याची मिठी यांचे जिभेवर बसणार! मग अशालाच ते काक तरी म्हणणार. वास्तविकपणें तो कोकिळ असतांना परीक्षकांच्या अंधत्वामुळें त्याला अशी विटंबना भोगावी लागते. असो.

संगीत – कला व शास्त्र

मनोरंजक शाहिरी विविध अंगांनीं नटलेली आहे. त्यांत वर्णनाचा भागहि आहे. वर देवाच्या गुणांचें वर्णन आलें. स्त्रीसौंदर्याचें वर्णन हाच मुख्य भाग आहे, हा समज जितका खोटा आहे तितकाच तो त्याज्यमान्य मानला जावा असेंहि मीं म्हटलें तर त्यांत कांहीं वावगें नाहीं. गायन हें एक सौंदर्य आहे. त्याचा आस्वाद प्रत्यक्ष श्रवणानेंच घेतां येतो हें खरें. शाहिरांनीं ती कला कायम ठेविली, जोपासली. ती नुसती कला म्हणजे नकळत साधूं शकेल अशी नसून एक विद्याहि आहे. सृष्टीच्या स्थितिरीतीचा आधार घेऊन तिचें नियमबद्ध असें शास्त्रहि बनलें आहे. महाराष्ट्रांत आतां ती कला व तें शास्त्र यांचा परिचय पुष्कळच झाला आहे. पण शंभर दीडशें वर्षांपूर्वींची तत्संबंधांत स्थिति काय होती तें दाखविण्याला एक आधार म्हणून शाहिरांचीं कवनें ऐकण्याजोगीं आहेत. प्रभाकर शाहिराचें एक कवन उदाहरणादाखल दाखवितों. शाहीर एका गायिकेला उद्देशून म्हणतो :

कंठ तुझा मंजूळ सुसंगित, फिरक स्वरामधें स्वर फिरती।
क्षणोक्षणीं मेनका विलोकुनि अमरपुरीं तारिफ करिती॥ ध्रु०॥
ग्रीष्म ऋतु नव्हे वसंत ऋतु हा असुन अकाळीं ढग वळती।
मध्यभागीं आदित्य उन्हें तीं दोन प्रहरचीं टळटळतीं॥
सूरसंच प्रारंभीं गोड तुझें गीत संगीत स्वर सारे मिळती।

आरंभाला कवीनें संगीतांतल्या सर्वसाधारण आवश्यक गमकांवर लक्ष वेधलें आहे. योजलेले शब्द पारिभाषिक नसूनहि समर्पक आहेत. हें गेय गीत आहे. त्यांत पुढें बराच चमत्कार साधणार आहे. म्हणून त्याची बैठक वसंत रागाची धरावी असेंहि सूचित करून ठेविलें आहे. तालासाठीं साधी विलंबित धुमाळी ठेवली आणि शब्दांच्या स्पष्ट अर्थबोधाला पुरेसें स्वरनिष्ठ संगीत ठेवलें म्हणजे कांहीं और रंग भरेल. पुढें चरणाचरणांतून निरनिराळ्या रागांचीं नांवें व जमेल तेथें त्या रागाच्या गायनाचा परिणाम हीं कवीनें मोठ्या अनुभवशीर चातुर्यानें कवनांत गुंफिलीं आहेत. रागाच्या उल्लेखाचा भाग त्याच्याच स्वरांत प्रकट करतां यावा अशी सुलभ योजना आहे. या दृष्टीनें पुढील कवन पाहावें:--

आलापितां **मल्हार** थेंब तळिं मेघमंडळांतुनि गळती ।
उदास धून **सारंग** ऐकतां ब्रह्मचारी वेळां टळती ।
शिस्त धरुनि वनिं करोल वेधितां हरिण टिकाणीं अडखळती ।।
आलम उभी रस्त्यांत गवय्ये त्यजुन लाज गल्लींत ठरती ।।१।।

हें पहिलें कडवें सारंग, मल्हारांत म्हटलें जावें. ही बैठक एकदा जमली म्हणजे पुढील चरणाचरणांतील निराळ्या सुरसारिणींतून प्रवास सुलभ होतो :--

दिवसा अथवा रात्रि म्हणाला योग्य सदोदित तो **सोहोनी** ।
मूर्तिमंत **केदार** वरूनि तूं आणिलास जसा बोहोनी ।।
मालकंस हिंदोल अवंतर रागरागिण्यांमधें पोहोनी ।
ताल तडिस लावुनी निवडलीस धन्य भूमंडळीं जगमोहिनी ।।
पाळी करून पूर्वींच पाहिली थाप लावून चहुकून चोहोनी ।
आजपासून पखवाज न वाजवूं देति मुचलका करि लिहुनी ।।
विश्ववसु भ्रतार भासतो परिणिलास अमृतमुहूर्तीं ।। २ ।।

आतांपर्यंत सात रागांचा स्पष्ट उल्लेख झाला. पुढें आणखी आहेत :--

आधींच स्त्रियांचा कंठ तशामधिं **पूर्वि** खुले तिसरे प्रहरीं ।
हावभाव प्रत्यक्ष दाविसी नेत्र तुझे केवळ जहरी ।।
जाइल वाटे प्राण मनाला श्रवण होतां **गंगालहरी** ।

कवीनें किती संयमानें लिहिलें आहे तें पाहण्यासारखें आहे आणि या संयमपूर्ण कवनाचें श्रवण कोणीं करविलें तर सुशिक्षितांना तें नकोसें होतें. केवळ पूर्वग्रहाचा परिणाम आहे. आतां आतां म्हणजे दहावीस वर्षांपूर्वींपर्यंत पंडित जगन्नाथरायांच्या गंगालहरींतले श्लोक भोजनाच्या पंक्तींत व इतर मंगलप्रसंगीं म्हटले जात असत. शाहिरानें त्याचाहि उल्लेख केला आहे. हें कवन गातांना येथें गंगालहरींतलें एखादें मधुर कडवें नुसतें स्वरालापांत सोडून दिलें तर रंग खुलेल. यासाठीं—

तरंगाः प्रोतुंगाः भवतु भवभंगाय भवताम्।

या चरणाची नुसती सूचना करतों :—

नको घेऊं तरी तान आतां त्या **परज वसंताची** कहरी।
गुप्तरूपें घरीं सरस्वतीच्या भरल्या असतील दारीं विहिरी।
दैव मुळीं प्राधान्य पतीचें लाधलीस वस्तु पुरती ॥ ३ ॥

दीप भूप कल्याण तूं गातां प्रकाश साऱ्या स्थळीं पडती।
छत बांधुनि रागाचें खुले धुन रात्र होतां जव जव चढती ॥
तटस्थ गुणी गाणार बिलिंदे सुखासनीं आपल्या दडती।
विभास भैरव ललत मूर्छना मधुन प्रबंधादिक झडती ॥
होउन राहिली **रामकलीची** घडी प्रसंगामधें बढती।
अरुणोदय होतांच तंबुरी तळी ठेवूनि गानी कुडती।
'रत्न असलें कठिण आम्हाला तपश्चर्येंविण न ये आरती'।
महादु प्रभाकर म्हणे 'कळुन कां वेड घेतां तूर्तातूर्ती' ॥ ४ ॥

सोळा रागांची ही रागमालिका शाहिरानें बनविली आहे. हीच जर हिंदी भाषेंत उत्तरेकडून आलेली असती तर पुण्या-मुंबईच्या रसिकांनीं तिच्यासाठीं खांसाहेबांना फर्माइष् केली असती. पण निव्वळ मराठी आणि शाहिरीचें नांव असलें तरी अळणी अशी ही कविता उपेक्षिलेली आहे.

वरील कवनांत संगीताची एक बाजू शाहिरींत प्रकट झालेली दाखविली. आतां त्यापलीकडची म्हणजे शास्त्राची बाजू दाखवावयाची आहे. महाराष्ट्राचें संगीतशास्त्र कोणतें हा एक विवाद्य प्रश्न आहे. त्याचा उलगडा होण्यास कांहीं साहाय्य होईल असा भाग शाहिरींत ग्रथित करून ठेवला आहे. चालू मन्वंतरास शोभेसा ज्ञानकोश मराठींत कधीं निर्माण होईल तो होवो. पण शाहिरांनीं आपल्या परीनें त्या मार्गानें अल्प प्रयत्न केला होता, असें निश्चितीचें विधान करतां येण्यासारखा पुरावा शाहिरी कवनांत सांपडतो. स्त्रियांच्या कुचनितंबांचीं वर्णनें म्हणजे शाहिरीचें सर्वस्व असें मानून तींच वेळीं अवेळीं चघळीत बसणाऱ्यांना धक्का बसेल असा भाग शाहिरींत आहे. सुमारें शंभर वर्षांपूर्वी होऊन गेलेला शाहीर हैबती – सातारा जिल्ह्यांतील पुसेसावळीचा – या विचारासाठीं पहिल्या प्रतीचा ठरेल. त्याच्या कवनाचा नमुना येथें देतों. शाहिरींत ज्ञानप्रसार प्रश्नोत्तररूपानें होतो. हैबतीबुवांनीं प्रश्न उपस्थित केला आहे तो असा :

तूं काय गाशिल भेद गाण्याचा तुझी अक्कल समजून आली।
रुहा राग हे कोठून आले, खूण ठिकाणीं लावावी।

मातापिता कोण तयांचा वस्ती सांग कोणे गांवीं ।
नांवें मुख्य रागांचीं कोणतीं खुण शास्त्राची लावावी ।
दिवस मास नक्षत्र कोणतें कोण कोठून झालीं ।
स्त्रिया एक एकाच्या सहा सहा त्याच रागाच्या छत्तीस ।
ज्याची त्याला करा वाटणी सहा सहा नांवें गणतीस ।
त्या कन्या कोणाच्या मातापिता कोणते वस्तीस ।
कोणता मास कोणता संवत्सर कोण कोणे दिवशीं व्याली ।

अशा प्रश्नानें हैबतीनें प्रतिपक्षाच्या उरावर शूळ उभा करून आव्हान केलें आहे. आत्मविश्वासाच्या प्रदर्शनाचे वेळीं प्रकट होणारा आवेश बाद वजा घालून सुद्धां कांहीं दबदबाट निर्माण करतो आणि त्रयस्थांची उत्सुकता वाढवितो. हा अनुभव सर्वदेशीय आहे, सर्वकालीन आहे. हैबतीबुवांनीं उत्पन्न केलेल्या सवालाचा जबाब त्यांना स्वतःच द्यावा लागला आहे. सवालाला 'चढ' व जबाबाला 'उतार' अशीं गांवठी नांवें आहेत. तीं अर्थपूर्ण आहेत व म्हणूनच रूढ पारिभाषिक आहेत. चढाचा उतार असा :—

ऐकुन व्यावी आतां सांगतों उत्पन्न रागांची ।
एका एका सहा कन्या छत्तीस रागिण्यांची ।
श्रम युगांत निद्रिस्त शिव तो एका समयाला ।
हृदयांतुन हुंकार शब्द तो वदनास हो आला ।
त्या शब्दापासून पुरुष आले सहा जन्माला ।
विद्याधर गंधर्वकन्यका सहा स्त्रिया सहाला ।
त्या सहापासून सहा राग ते आले आकाराला ।
सहा रागापासून जन्म छत्तिस रागिण्यांना ।

या प्राथमिक निवेदनांत स्वराचा म्हणजे नादाचा उगम कसा झाला तें सांगितलें आहे आणि त्याचें सहांत उत्क्रमण कसें झालें तें सांगितलें आहे. त्याला आधार आहे. महाराष्ट्रांत गेल्या तीनशें वर्षांपासून सहा मूळ राग व तज्जन्य छत्तीस रागिण्या असें मत प्रचलित आहे. समर्थ रामदासांनीं ही सहाछत्तिसांची संख्या उल्लेखिली आहे. आतां महाराष्ट्रांत रूढ असलेलें म्हणजे पेशवाईच्या अस्तानंतर पंचवीस वर्षांनीं उत्तर हिंदुस्थानांतील धार व ग्वालियर येथून आलेलें संगीतशास्त्र हेंच पूर्वीं येथें रूढ होतें कीं नाहीं, याची चर्चा अजून कोणी करीत नाहीं. नवीन आलेल्या शास्त्रांतहि भिन्नभिन्न मतें आहेत, त्यांचा विचार होतो. पण महाराष्ट्रांत रूढ असलेलें असें शास्त्र कोणतें याचा निर्णय सशास्त्र पद्धतीनें कोणीं लाविलेला नाहीं. सारांश असा कीं, हैबती शाहिरानें कवनांत जें जें कांहीं प्रतिपादन केलें आहे तें

वरच्यावर उडवून लावतां येणार नाहीं. हा इषारा मी मुद्दाम देत आहें. कारण कवनांत तसेच कांहीं लक्ष वेधूं शकणारे प्रश्न उभे केले आहेत. त्यांचा परिचय प्रथम करून घ्यावयाचा :—

जंबुद्वीपीं **श्री** राग पिता तो चंद्रमौली त्यासी ।
गौड माता संभव षष्ठी मार्गेश्वर मासीं ।
पौष शुद्ध षष्ठीस जन्म स्त्री **मालती** नामासी ।
कन्या **कौसुकी देववाळी गांधारी गृहवासी** ।
मंडळी दशांती सहा पुढें राग **वसंतासी** ।
मंद्र पिता माता **गोत्री** कुटचळीं सिंहलद्वीपासी ।
संभव माघ जन्म शुद्ध पौर्णिमा काल गुणासी ।
जयवंती स्त्री कन्या **वैराटी धनाश्री** ज्यासी
करमंजरी पटमंजरी कंसा देवगौडी साची ।
क्रौंचद्वीपीं उत्पन्नता ऐका पुढें बहिरवाची ।
जयत् पिता **कोलाटी** माता त्या संभव चैत्रांत ।
वैशाखमधीं शुद्ध एकादशीस मानितात ।
सुपर्णिका स्त्री कन्या **भैरवी** उललीत म्हणतात ।
बेलावली गुर्जरी कर्नाटी हंसवाळी त्यांत ।
ऐशा झाल्या सहा पुढें पहा **पंचम** रागांत ।
शालद्वीपीं **श्रुत** पिता माय **आंधावली** नामांत ।
संभव ज्येष्टीं जन्म शुद्ध सप्तमी आषाढांत ।
स्त्री **देशकारी** मुली **थोटकी मोटकी** म्हणतात ।
कुशद्वीपीं उत्पन्नता पहावी **मेघ** राजाची ।
द्रावळी पिता **श्रयंता** पर्वत गांधारी ।
श्रावणीं संभव जन्म विनायक चतुर्थी निर्धारी ।
ज्योतिका स्त्री कन्या **कल्याणी** आणि **मधुकारी**
वंगालिका सोरठी भुपाळी अवधारी ।
ऐशा सहा झाल्या तों **नट** राग विचारी ।
जन्म तयाचा झाला पहा काश्मिरांत अधिकारी ।
पिता तयाचा **विनट** असे बोलती प्रजा सारी ।
माता ते **मंगला** सहावी शेवटची बारी ।
अश्विन मासीं शुद्ध सप्तमी संभव खुण याची ।
कार्तिक मासीं शुद्ध एकादशी तारिख जन्माची ।
कमलाविलासी वधु कन्यका **बलमाही** जाण ।

रंगाश्री आसावरी बंगदानी चौथी पहाण।
गांधारी जयवंता त्यांस नामाभिधान ।
न्यारीं न्यारीं नांवें सांगितलीं याप्रमाणं ।
सहा राग छत्तीस रागिण्या ऐशा निर्माण ॥

शाहीर हैबतीचें सहा राग छत्तीस रागिण्यांचें मत कोणत्याहि रूढ प्रणालीशीं तंतोतंत जुळत नाहीं, म्हणून तें थोतांड मात्र ठरत नाहीं. हल्लीं प्रचलित अशा निदान सहा प्रणाली उत्तरीय संगीतांत रूढ आहेत. त्यांत संख्येच्या, नांवाच्या बाबतींत कोणाचा कोणाशीं पूर्ण मेळ नाहीं. हैबतीबुवांनीं उद्धृत केलेलें मत मीं इतर मतांशीं जुळवून पाहिलें. हनुमानमत याच्याशीं जुळत नाहीं, तसेंच पुंडरीक विठ्ठलाचें मतहि जुळत नाहीं. नारदाच्या चत्वारिंशच्छत राग निरूपणकर्त्याच्या तक्त्याशीं कांहीं अंशीं हैबतीचें मत जुळतें. तथापि त्यांत मूलग्राही फरक आहे. हैबती व उत्तरेकडचे शास्त्रकार सहा संख्येवर ठाम उभे आहेत. नारद संख्या दहा धरतो आणि नांवांतहि फरक करतो. त्याचीं कांहीं नांवें हैबतीच्या नांवांशीं जुळतात. म्हणजे हैबतीचें मत इतरांपेक्षां नारदाशीं जास्त जुळतें आहे. लखनौचा संगीतप्रेमी नबाब आसफउद्दौला याच्या पदरचा महमद रेझा सहा छत्तीस संख्या कायम धरतो. पण पुढें तपाशिलांत इतरांशीं जुळत नाहीं. सारांश इतकाच कीं, संगीतशास्त्रांतील एक विशाल समस्या अजून पूर्ण झालेली नाहीं. हैबतीच्या टिपणाचा त्यांतच समावेश होण्याला तरी काय हरकत आहे ?

मुख्य रागांच्या नांवावर लक्ष देतांना असें दिसून येतें कीं, त्या त्या स्वर-विस्ताराला अनुकूल अगर क्षोभक ऋतु हैबतीच्या सारिणींत स्पष्ट सुचविलेले आहेत. तसेंच संभव व जन्म यांच्यांतला बारकावाहि ध्यानीं येण्यासारखा आहे. कवनाचा शेवट असा :—

कवि हैबती नाथ निरंजन वरदान।
कृपाहस्त आहे शिरीं देत कवितेसी वरदान ।

आतां सर्वांचा दिल खुष करणारें असें रत्नगर्भ कवन आहे तें देतों. हें कवन असें—

गोऱ्या भुरक्या पातळ पुतळ्या छेलछबेल्या पऱ्या ।
एकाहुन एकचढी गोजिऱ्या ॥
थाटमाट किति दाट करुन डुब दागिन्यांत बावऱ्या ।
तुझ्यावर त्या झेपविती मोहऱ्या ॥
फिदा सदा सर्वदा रूपावर अधीर होती किती खऱ्या ।
पहा तरि दृष्टि भरून नोवऱ्या ॥

कोणि नेत्रखुणा करकरून दुरून बाहती ।
कुणि पदर धरून आड झडुन उभ्या राहती ।
कुणि समारंभ सुखसंपत्तिचे पाहती ।
कुणि कर जोडुन विनंत्या करिती सुंदर सुलक्षणी ।
कुणी पुढें गाती गंधर्विणी ॥ १ ॥
अलाबला कुणि घेउन आनंदें लिंबलोण उतरिती ।
आभरणें कुणी चहुंकडून आवरती ॥
हार गजरे कुणि गेंद फुलांचे मुरमुरकुनि मारिती ।
भिजाजिनें कुणि चौऱ्या वारिती ॥
छपरपलंगीं शेज फुलांची कुणी करीं शृंगारिती ।
कुणी सरपोस वरूनि पसरिती ॥
कुणि विड्या करून वदनांत सुगर घालिती ।
कुणि हस्त धरून ठुमकत चमकत चालती ।
कुणि नटुन थटुन चौफेर बसल्या खालती ।
कुणि गोड बोलती, परंतु या कांता रंगणीं ।
मुख्य मी शुक्राची चांदणी ॥ २ ॥

'सुख-संपत्ती 'चें वर्णन, व्यावहारिक असो कीं आत्मिक असो कोणीहि रसिक असेंच करणार. हाहि रोख कुणाहि गायिकेनें आपल्याकडे लावून घ्यांवा. रंग जमेल, आदा केला तर तो जास्त खुलेल.

कुणि शिरीं शिरपेंच खुशालित बळें बंदीं बांधिती ।
कुणि गळीं पडुन समय साधिति ॥
कुणि आपल्या राहून तयारित क्षणक्षणां शोधिती ।
कुणि रिझवुनि हृदय बोधिती ।
केवळ कुणि मदनाचे गलोलें प्राणपाक्षि विंधिती ।
कुणि मन आर्जवून वेधिती ।
कुणि गंगू हैबतीचे छंद मुखें वाणिती ।
कुणी प्रत्यक्ष रसा आणिती ।
कुणि शब्दधनें महादेव गुणी न्हाणिती ।
कुणि कवन नित प्रभाकराचे गाति सभारंगणीं ।
कुणि गंगाधर म्हणती गुणी ॥ ३ ॥

गंगु हैबतीच्या फडाच्या बैठकींत बसणाऱ्या आणि त्याच्या कवनाच्या रसिक चहात्यांना उद्देशून हा शेवटचा रोख मात्र खरा दिसतो. बाकीचें सर्व कवीचें लाघव ! शाहीर प्रभाकर खऱ्या अर्थानें 'मुरब्बा' म्हणजे चौकोनी चिरा आहे.

त्यानें श्रोत्यांना वर खालीं चोहोंकडे भिरभिरवून आणलें आहे; आणि शेवटीं मात्र तो तमासगिराच्या मूळ पदावर आला आहे. त्याच्या या आवाहनाला साद देणें रसिकांचें काम आहे.

चौसरबाजी

दुसऱ्या बाजीरावाच्या विषयलोलुपतेच्या पूर्तीसाठीं जीं कांहीं साधनें उपयोगीं पडलीं, त्यांत सोंगट्यांचा डाव हा एक प्रकार आहे. निरनिराळ्या रंगाचे पोशाख केलेल्या स्त्रिया विस्तीर्णपटावर बसवीत व ज्याला हुकमी डाव पडेल त्याचे हातून नरद मरे! ही क्रिया प्रत्यक्षांत घडविण्याची योजना होती असा प्रवाद आहे. तो खराखोटा मला माहीत नाहीं. त्या काळचा अस्सल पुरावा हातीं असलेल्यांनीं त्यावर अधिकारयुक्त वाणीनें बोलावें. मला त्या खेळांतला रंग बाजीरावाची तथाकथित मैफल बाजूस ठेवून एका शाहिरानें कसा वर्णिला आहे तें दाखवावयाचें आहे. शाहीर सगनभाऊचें कवन विद्वानांना कळत नाहीं, असाहि प्रवाद आहे. पण दृष्टि शुद्ध असली तर त्यांत न कळण्यासारखें कांहीं नाहीं. उलटपक्षीं मी असें म्हणतों कीं हा रंग खुलवावा सगननेंच. कालगतीनें इतर शाहिरांच्या परंपरा आतां विस्मृतीच्या अंधारांत गेल्या आहेत. परंतु पुणें-सातारा प्रांतांत सगनची परंपरा सांगणारे आखाडे अजून आहेत. तमाशा परिषदेच्या प्रसंगानें झालेल्या कार्यक्रमांत हें ठळकपणें दिसतें. असो. विठ्ठलनामीं रंगलेला शाहीर सगन म्हणतो :—

गुलचमन तुम्ही, आरजी ऐका आमची स्वामी।
करूं मौजा रंगबहारामधिं ऐषआरामी ॥ ध्रु० ॥
खुषरंगांत बसला फुलबागांत।
कांहीं रमुज करावी सर्वत्रांचे मनांत।
जेउनी तृप्त, त्रयोदश विडा मुखांत देतात।
छबिल्या चोहोंकून आनंदांत।
कृष्णनाथ गोपिगणासहित।
खेळती खेळ नाना परी कुंजवनांत।
भंवताल्या आम्ही पात्रा नामी नामी ॥१॥
फुलबाग सिरा मंजुळ सुटला वारा।
त्यामधीं उडविल्या तऱ्हेतऱ्हेच्या लहरा॥
बंगल्यांत जरा ठरुन बसावें चतुरा।
आम्ही निसग खेळूं चरणावर सुकुमारा॥
आलबेली तऱ्हा पाहून भुलले चेहरा।
लागलें वेड प्रीतिच्या जीवीं कटारा॥
केलें काय कमी पात्रा नामी नामी ॥ २ ॥

आम्ही चौघीजणी चौसर खेळूं बसुनी।
टेकून बसावें लोटुं नका तुफानी॥
घ्या डाव गुणी फासा घर पाहुनी।
मागितला डाव पडला अचुक संधानी।
राजींद्रधनी जवळ बसा घेउनी।
देहीवर करावी मात जिवलग स्वामी।
शरिराची हमी देती भरमाभरमी॥ ३॥

चारचौघीजणी गुणी प्रियकराला बागेंत नेऊन मिष्टभोजन, तांबूल इत्यादींनीं खूष करून प्रसन्न वाऱ्याच्या झोकांत बंगल्यावर घेऊन बसल्या आहेत. त्यांनीं सोंगट्यांचा चौसरीचा डाव मांडला आहे. आम्ही हातीं फासे घेऊन टाकतों. त्यांत पडेल तें दान पाहून आमच्या सोंगट्या कोणकोणत्या घरांत बसतात तें तुम्हीं पाहून त्या घरांत मांडा, अशी विनंती एका प्रियकरणीनें प्रियकराला केली आहे. प्रियकरणी चौघी आहेत. जिला अचूक संधानीं हवा तोच फासा पडेल, तिच्यावर तुमची कृपा होऊं द्या. अशी चौघींच्या वतीनें एकीनें हमी दिली आहे. व्यवहारांत असा प्रसंग क्वचितच दृष्टीस पडेल. नरदा बिचाऱ्या निर्जीव. त्यांच्या जागीं बाजीरावाच्या संबंधांतल्या लोकवार्तेनें म्हटल्याप्रमाणें जिवंत सुंदरी बसविल्या आणि एका खेळणाराला जरूर तो डाव पडला : तर कोणत्या तरी नरदेवर त्याची वरकडी होईल. ती त्यानें जिंकलेली, तिच्यावर मात केलेली अशी होईल. मग तो तिचा धनिच होय. पण या धनीपणांत तिची अगर इतर नरदांची संमति असेल असें नाहीं. कांहीं व्यावहारिक लाभासाठीं हा खेळ तिनें पत्करला इतकाच अर्थ निघेल. सगनभाऊच्या या कवनाचा अनर्थ करून जनवार्ता निर्माण झाली असेल. पण सगनचें कवन कोणत्या पातळीवरून रचलेलें आहे हें ध्यानीं येणें जरूर आहे. भक्तीचीं साधनें नवविधा आहेत. पण भक्तीचे प्रकार मात्र चार आहेत. ज्ञानेश्वरी अध्याय १८ येथें ओवी क्रमांक १११२ मध्यें ज्ञानेश्वर सांगतात—

येर आर्तु जिज्ञासु अर्थार्थी। हे भजती जिये पंथी।
ते **तिन्ही** पावोनि **चौथी**। म्हणिपत आहे॥ १८ : १११२
एरवीं तिजी ना चौथी। पहिली नासरती।
पैं माझिये **सहस्थिति**। भक्तिनाम॥ १११३.

या चारचौघी कोण आणि त्यांनीं कोणाबरोबर कशाचा खेळ आरंभला होता याविषयीं आतां शंका उरूं नये. मला बाजीरावाविषयींच्या लोकवार्तेचें खरेंखोटेंपण पडताळून पाहावयाचें नाहीं, तर सगनची कविता कळत नाहीं असा पढिक विद्वानांचा कबुलीजबाब मिळतो, म्हणून सगनची कविता उलगडून सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

खुषरंगाचा झाला डाव मजेचा।
असा खेळ खेळला कृष्ण द्वारकेचा।
ब्रिज ललनेचा मुरलीधर मायेचा।
तसे पदरीं पडल संकेत जीवित्वाचा।
हक करण्याचा इष्कबाज छंद त्याचा।
ज्यावर त्याची मर्जी बसेल त्याला त्याची प्राप्ति.

यमेष वृणुते ते न लभ्यः।

अशी श्रुति आहे. पण अचूक संधानीं नेमकें दान पडणें हा भाँग आहेच. सगननें ही पुस्ती या श्रुतीला जोडली आहे. तिलाहि आधार आहे. पण तो येथें सांगण्याची जरुरी वाटत नाहीं. सिद्धान्त कोणाच्याहि मुखानें ऐकला तरी त्या सिद्धान्तपणाला बाध येत नाहीं. अधिकारीवाणींतून सिद्धान्त निघणार हें खरें. पण तो सिद्धान्त दुसऱ्या कोणीं उद्‌धृत करूं नये असा अंहकार फक्त पंडितांनीं धरावा. कवींच्या राज्यांत अशी हुकुमशाही मान्य नाहीं. शेवटचें चरण असें :—

गाइ नोक ठेवुनी सगनभाऊ जेजुरीचा।
विठ्ठलनामीं रंगलोंच ते आम्ही ।। ४ ।।

सौभाग्यकांक्षिणीचें प्रेमपत्र

मराठी शाहिरी वाङ्मय अगदींच मागासलेल्या वर्गांतील लोकांनीं तशाच लोकांसाठीं ट ला ट जुळवून बनविलेलें. त्यांत आतांच्या सौभाग्यकांक्षिणीचें प्रेमपत्र कुठून येणार ? प्रश्न बरोबर आहे. त्यांतहि गोम अशी कीं प्रेमपत्रें जात-येत असतां शेवटीं आमंत्रण-पत्रिका काढतांना घरच्या वडील माणसांनीं जनरीति म्हणून लावलेलें ' सौभाग्यकांक्षिणी ' हें उपपद संपादण्यासाठीं हा प्रेमपत्रांचा उद्योग आरंभीं नसतोच. ती केवळ ' लीला ' असते. अवचित डाव साधला व तो सर्वांना मानवला तर मात्र उपपद सत्तेचें होतें. ही आतांची गोष्ट. पण शाहिरांच्या काळीं भावी वधूवरांची नजरभेटहि अशक्य होती. मग निरोपशिरोप तर दूरच. पण शाहिरांनीं ती अडचण दूर करून आपली हौस पुरविली आहे. पुराणाकडे त्यांनीं धाव घेतली. पण तेथें निराशा झाली. सुप्रसिद्ध वधुवरें तीनच. शिव-पार्वती, राम-सीता आणि कृष्ण-रुक्मिणी. पहिल्या जोडींतल्या पार्वतीनें शिवाला मनोमन वरून बसल्या जागीं तप आचरिलें. रामानें सीतेला विवाहापूर्वीं पाहिल्याचें देखील वाल्मीकि सांगत नाहीं. रसिक भक्तवर श्रीतुलसीदासांनीं मात्र कांहीं पूर्वसंकेतावांचून उद्यानांत रामसीतेची नजरभेट घडविली आहे. तो प्रसंग 'रामचरितमानसा'मध्यें अति हळुवारपणें हाताळला आहे. बिंबप्रतिबिंबांचें प्रथम दर्शन व नंतर मीलन हा सिद्धान्त नजरेपुढें ठेवून तें साधलें आहे. आतां राहिली कृष्ण-रुक्मिणींची जोडी. भागवतकारांनीं

पत्रिकेचा उल्लेख केला आहे. आशयाला वाचा फुटली आहे. पुढें मराठी टीका झाल्या त्यांत ही पत्रिकेची कल्पना मान्य झाली, आणि आतां साहित्यिकांमध्यें त्या कल्पनेविषयीं चर्चा चालू आहे. मराठी शाहिरांनीं ती मागेंच म्हणजे शंभर वर्षांपूर्वीं ग्राह्य धरून अंमलांत आणली आहे. शाहीर होनाजीनें कवन केलें आहे. त्यांत रुक्मिणीची पत्रिका ब्राह्मणानें येऊन कृष्णाचे हातीं दिली तेथून पुढचा प्रसंग आहे :—

पत्र दिधलें द्विजवरें करीं।
वाचितां आनंदकंद तो मुकुंद मंद मंद हासत नंदसुत श्रीहरी ॥ध्रु.॥
द्वारकाधीशा त्वरित येइ हो।
चैद्य जंबुक काग हे समग्र
छेदणार व्याघ्र तूं अवश्य सिद्ध होइ हो ॥
अंबिकालयीं भेटि देइ हो।
समय पाहून त्वरित धावून
येऊन या गवि गवून स्वधेनु घेऊन जाइ हो।
भुवनसुंदरा सिद्ध होइ हो।
रुक्मियासि क्लेश देउन द्वेष धरून
ये शरणीं निःशेष त्या अपेश देइ हो।
पतितपावना येइ लवकरी ॥ १ ॥

हा शाहीर व्यावहारिक शब्दयोजना करण्यांत प्रभाकराइतका तरबेज नाहीं. पण 'पलीकड'च्या विषयाचा धागा लागला म्हणजे त्याची वाणी रसवंती होते :—

म्हणसी तूं जरी निर्लज्ज मानसी।
राजीवाक्ष सर्वसाक्ष कर्माध्यक्ष ।
आपरोक्ष तूं प्रत्यक्ष लक्ष जाणसी ।
कल्प वाउगे हृदयिं नाणसी।
धन प्रदीप्त भीमक आप्त
देइन गुप्त होउन तृप्त वाणसी।
सावळी तुझी मूर्ति लहानसी।
ग्यां न देखितांच श्रवणि मननीं
पठणी स्वसनीं नयनीं शयनीं
तूं झणीं वृत्तीस जाणसी।
ऐकिली अशी कीर्ति मंदिरीं ॥ २ ॥

हें दुसरें कडवें हीच रुक्मिणीची प्रेमपत्रिका. अशा पत्रिका देवाचे भक्त पाठवीत असतात.

' यह पाती हमरी ले दीजो जहां सांवरे छायेरी '

—सूरदास

रुक्मिणीच्या निमित्तानें होनाजीनें एक व्याकुळ भक्त उभा केला आहे. दर्शन घडलेलें नसतांहि देवाचा ध्यास घेतल्याची खूण आणि ही भक्ताची वृत्ति जाणणारा सर्वसाक्ष देवाचा निर्देश हे संकेत या कवनांतला सार्वदेशीय आशय सिद्ध करण्याला पुरेसे आहेत. रुक्मिणीची पत्रिका वाचून झाल्यावर कृष्णानें —

उठुन त्या सुदेवास आदरें ।
देवून क्षेम परिस हेम दृष्टि सूक्ष्म
मनीं सप्रेम करुन नेम प्रेम गहिंवरें ।
भीमके तुझें वदन गोजिरें ।
स्यां न पहातां रूपास भास
हा जिवास तुझी आम्हांस आस सुंदरे ।
लिहिल्या विधें येइन मी त्वरें
तुज परिणिन राजसे जसे तुझ्या मनिं कसे
ते सखे विशेष उत्तरें सांग ।
जा द्विजा गोष्ट ही खरी ॥ ३ ॥

कृष्णानेंहि रुक्मिणीला प्रत्यक्ष पाहिलेलें नव्हतेंच. पण रूपांत सत् कोठें आहे ? तो केवळ जीवाला होणारा भास आहे. त्याला महत्त्व नाहीं. केवळ भावावरून तिच्याकडे कृष्णाची ओढ आहे. ही उभयपक्षीं ओढ असली म्हणजे मीलनाला अडचण कसली. देव भक्ताकडे कशा नजरेनें पाहतो यांचें एक गमक श्रीज्ञानेश्वरांनीं असें दिलें आहे :—

' तो प्रिया मी कांतु '

होनाजी कवि साधी दिसणारी पौराणिक कथा देखील कोणत्या पातळीवर रंगवितो हें ध्यानीं घेण्यासारखें आहे. पुढें कृष्ण-रुक्मिणी विवाह झाला. शेवटीं—

ध्यातसे होनाजीबाळ हे कृपाल
सरस कोमल चरणकमल दावी आपले ।
लक्ष हें वसो तव पदावरी ॥ ४ ॥

कथा भागवताची पण रंग स्वतःचा अशा या कवनांत शाहीर होनाजीनें सहज उभा केलेला हा रंग इतर अनेक कृत्रिम रंगांना फिका पाडणारा आहे. म्हणून त्याची खुमारी दाखविण्याचा माझा अट्टाहास.

सौभाग्यवतीचें सौभाग्य

सौभाग्यकांक्षिणी विवाह होऊन सौभाग्यवती झाली. तिच्या वैभवाचें वर्णन करण्याला शाहीर विसरले नाहींत. एक नमुना असा :—

एकाग्रचित्तेंकरुन गौर गडे जन्मांतरि पुजिली ।
म्हणून स्वरूप संपदा तुला ईश्वरें अचळ दिधली ॥ ध्रु० ॥
खुब केला शृंगार हिरेमाणिकमुक्ताभरणीं ।
उजेड पडे चहुकडे थेट बनलिस चंद्रकिरणीं ॥
करून प्रातःस्नान अगोदर वंदुनिया तरणी ।
पद्मासनिं बसलीस लक्ष ठेवुनी नामस्मरणी ॥
डौलदार सोन्याची झगझगित बहुत उपकरणीं ।
दोहों बाजूंस ब्राह्मण सदय वेदांती पुरुश्चरणी ॥
धन्य तो नवरा तूं नोवरी ।
दैव काढिलेंस जोरावरी ।
कोणी सखि शालजोडी आवरी ।
पदर कोणी पल्लेदार सावरी ।
वारी कोणी माशा वरचेवरी ।
पुढें चौरंग संगमरवरी ।
मेघडंबरी देव्हारा वरी ।
लिंग त्यामधें शुद्ध नरवरी ।
गवई गर्जतात आसावरी ।
वाद्यें वाजती वाजती दिवा शर्वरी ।
ऐकुन आशा उपजली ।
दर्शन होतां भ्रांत उडाली सहज मनामधली ॥ १ ॥

आतांच्या नागरी जीवनसमृद्धतेंत अनुभवणाऱ्या लोकांना देखील हा थाट अपरिचित वाटेल. इतकेंच नव्हे तर सरंजामशाहींतला म्हणून त्याचेविषयीं अनादरहि व्यक्त केला जाण्याचा संभव आहे. शंभर सवाशें वर्षांपूर्वींच्या थाटाला आतांची कसोटी लावणें योग्य नाहीं. कवि प्रभाकर हा स्वतः गरीब कारकून असला तरी रास्त्यांच्या सारख्या श्रीमंत सावकारांच्या आणि रघुनाथरावासारख्या राज्यकर्त्यांचा घरीं वावरलेला होता. त्यानें पाहून अनुभवून केलेलें वर्णन त्या काळच्या स्थितिरितीचा परिचय करूं इच्छिणारांना उपयुक्त वाटेल. या दृष्टीनें हें कवन संपूर्ण देत आहें :—

चार चंबु चहुकडे चकचकित चहुकडे भरले ।
आगरबत्तीचे सुवासानें सखे पंचप्राण मुरले ॥
झिलइदार आपखरें वाटतें आज चरकिं धरले ।
बिंब दिसे कलशांत शुद्ध अवयव शरिरावरले ॥
सुरेख चौक्या सुरेख समया मोर सुबक वरले ।
तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ ताटीं भरून किती उरले ॥
कालपीची साखर लोणी साय ॥
दुधानें हातच पोळेल हाय ॥
फुलांस्तव केले कचे उपाय ॥
पाच मरवा दवणा याशिवाय ॥
सन्मुख निर्मळ कृष्णा गाय ॥
वसिष्टें पाठविली काय ॥
अलंकारांनीं नटली माय ॥
सुशोभित दिसती चारी पाय ॥
वासरू दुडदुड चौहुंकडे जाय ।
सदा सुप्रसन्न बाजीराय ।
तयांच्या कृपेनें विराजली ।
थोर तुम्हांला श्रमें साध्य ही पदवी लाधली ॥ २ ॥

या सौभाग्यवतीचा पति ' बाजीरावा 'सारखा कोणी ऐश्वर्यसंपन्न आहे. खुद्द बाजीराव नव्हे. हा इषारा देणें जरूर आहे. त्या नांवाशीं अनेक अनिष्ट प्रकार चिकटलेले आहेत. त्यांत आणखी शाहिरीच्या संशोधकांच्या सूचनांची भर पडली आहे. पण पुढील कडव्यावरून संशयनिवृत्ति होण्यासारखी आहे :—

गुळगुळित शुईखालीं छताला वर आरसे जडले ।
वेलबुट्टि सारखी खांब सुरुदार कसे घडले ॥
रंगीत गज झरुक्यास कारगीर अमोल सांपडले ।
ठीक ताट्या तावदानी अमेरी डौल कोणिकडले ॥
इतर स्त्रिया काजवे तुला ते पाहुनिया दडले ।
अलंकार छत स्वरूप याचें पहा प्रकाश पडले ॥
भिंतीवर लिहिलीं चित्रें फार ।
गजानन शंकर पार्वतीकुमार ।
सागरमंथन दशावतार ।
पुरंदर ऐरावतावर स्वार ।
रामरावण युद्ध अनिवार ।

हे कौरवपांडवांचे दळभार।
चतुर्भुज मुरलीधर सुकुमार।
गजेंद्र नक्राचा उद्धार।
वर्षती अमर सुमनसंभार।
मांडिला महिषासुरसंहार।
अंबिका अति सुंदर सजली।
भुतें गोंधळ घालिती हातीं घेऊन पोत बुधली ॥ ३ ॥

जानकीचें सौंदर्य पाहुनी लंकेश्वर भ्रमले।
धनुष्यास उचलितां सर्व बळ खर्च करून दमले।
रुक्मिणीच्या स्वयंवरास नृपवर भले भले जमले।
असाध्य झाली सती तिनें वैकुंठपती नमिले।
द्रुपदराजाघरीं भीमार्जुन अधीर ब्राह्मण गमले।
शरसंधानें यंत्र भेदिता कैक रिपू शमले।
काढिलें गोकुळवृंदावन।
द्वारकेसभोंवतीं जीवन।
अयोध्या मथुरा नंदनवन।
रमा करी हरिचें पदसेवन
जाळी मुचकुंद कालियावन।
पंढरी संतांचें भुवन।
अमोलिक जागा हें उपवन।

अशा प्रकारें निरनिराळ्या प्रसंगांचीं चित्रें भिंतीवर काढलेलीं होतीं. आतां अति आधुनिक नजरेनें यांत कांहीं लक्ष देण्यासारखें दिसणार नाहीं. पण जमाना जसा होता तसा कवीनें वर्णिला आहे. शाहिरीची ही पाहणी आतांच्या विकृत नजरेच्या पसंतीसाठीं चालविलेली नाहीं. काय होणार तें मी जाणून आहें. स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिनाच्या प्रसंगीं सुप्रसिद्ध कवि ' गिरीश ' यांनीं केलेल्या सुंदर कवनांत ' दुड्डम तुड्डम दुमदुमे चौघडा ' अशा शब्दयोगानें सुरुवात आहे. पण अति आधुनिक नजरेच्या एका दुबळ्या जीवाला, टीकाकाराला, तें अति निंद्य वाटलें. यशाचे चौघडे झडण्याची कल्पनाहि ज्यांना झेंपत नाहीं अशांच्यासाठीं तें कवन नव्हतें, इतकेंच.

चित्रें, वस्तु इत्यादिकांनीं भरगच्च भरलेल्या त्या मंदिराच्या अधिष्ठात्री श्रीरूपी देवतेकडे पाहून कवि म्हणतो—

पहावेना दुष्टांनें तव यौवन ।
करो कल्याण पतितपावन ।
गंगु हैबती केवी गावन ।
महादेव कविची मति झिजली ।
सुगर 'प्रभाकर' म्हणे इमारत खाशी बांधली ।
एकाग्रचित्तेंकरून ॥ ४ ॥

सौभाग्यवतीचें ऐश्वर्य :

वरच्या कवनांत वाचकांच्या दृष्टीपुढें असलेली सौभाग्यवती सात्त्विकवृत्तीची आहे. पण तिच्यामध्यें राजसगुणहि आहे. तो तिच्या सभोंवतीं असलेल्या ऐश्वर्यानें सूचित केला आहे. सत्त्वरजांनीं युक्त अशी गृहिणी आपल्या अधिकारांत पूर्ण सत्तेनें वागतांना आपल्या भोंवतालीं तृप्तीची घनदाट छाया पसरविण्यास समर्थ न झाली तरच आश्चर्य. अशा आशयाचा रंग दाखविणारें प्रभाकराचें एक कवन येथें उद्धृत करून ही तीन पदरांची सांखळी पुरी करावयाची आहे.

मोहिनी जशी सुरसभेमधें अमृत वाढी करी ।
तशी नार पंक्तित आग्रह करीं ॥ ध्रु० ॥
नटनाटक कलियुगांत ही आली राधा दुसरी ।
सगुणसंपन्न कलाकुसरी ॥
सुखसोहोळे दोहोंकडे होती अति माहेर सासरीं ।
हुकुम झेलिती किती एक्यासरी ।
मर्यादेनें राहती उभे घडोघडीच्या अवसरीं ।
चौफेर मांडुनी पंगती ।
वाढी सजुन सख्या संगती ।
पाहून प्राणी गुंगती ।
पदार्थ जे मागती सुखें पुरवी त्यांस लौकरी ॥ १ ॥

आतांचें कांहींहि असो, पण त्या काळीं गृहिणीचा मुख्य अधिकार अन्नपूर्णेचा होता. अन्नग्रहणाच्या वेळींच इतरेजनांना थोऱ्यामोठ्यांच्या स्त्रियांचें दर्शन घडावयाचें. आतां गरिबांच्या घरांत देखील पति, मुलेंबाळें, दीरभाऊ अशांना आमटीभाताचें जेवण वाढीत असतांना सत्त्वरजोगुणांचें ऐश्वर्य अन्नपूर्णेच्या मुखावर दिसतें. तेंच तशाच गुणसमुच्चयानें युक्त असलेल्या श्रीरूपी अन्नपूर्णेच्या मुखावर पंगतींत पंचपक्वान्नें आग्रह करून वाढीत असतांना दिसतें असा कवीचा आशय आहे. या गुणांत गर्भश्रीमंतीच्या तेजाची आणि सुंदर रूपाची भर पडली तर—

गर्भश्रीमंतिण सहज जिचा सर्वांवर वारसा।
हलवी रूप सुंदर आरसा ॥
चतुर स्त्रियांची धनिन जशी ऐन आली भर रसा।
कुणासवें शब्द न करी फारसा ॥
डौलामधें लाजवी सदां आणुन हरि सारसा ॥
बनली जणुं हळदीचा नारसा ॥
दुधीं कांचन झाऱ्या भरून ॥
घ्या घ्या म्हणे आदरें करून।
हावभावी दावी पदरावरून।
धरुनि सीतेचें स्वरूप वनीं भुलवी राम शांकरी ॥ २ ॥

येथें कवि थोडासा खोल पाण्यांत शिरला आहे. दंडकारण्यांत रावणानें सीतेचें हरण केल्यावर राम शोकाकुल अवस्थेंत फिरत असलेला शिवपार्वतींनीं पाहिला. पार्वतीला रामाच्या पूर्णत्वाविषयीं शंका होती, पण तशी ती शिवाला नव्हती. पण पार्वतीला अनुभव यावा म्हणून शिवानें तिला रामाची परीक्षा पाहण्यास अनुज्ञा दिली. पार्वतीनें सीतेचें रूप घेऊन रामाशीं लगट करण्याचा प्रयत्न दुरून आरंभला. पार्वती सीतेच्या रूपांत असली तरी शिवाची पत्नी होती. राम तिला परका होता. नकली आविर्भाव हातचा राखून पार्वतीनें आणला. पण सुज्ञ रामाला तो कृत्रिमपणा ओळखूं आला. येथें पार्वतीनें रामाला स्वत्व न सोडतां जे कांहीं भुलविण्याचे प्रकार झाले असतील ते या कवनांतल्या नायिकेकडून सहज घडत. त्यांत भुलविण्याचा हेतुहि नाहीं. मूढ जन मात्र त्यामुळें जागचे जागीं मरून जात. गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यास नाटकांतील नायिका व बेअकली नूपुर या जोडीची आठवण या प्रसंगांत मला होते. कोणाला तें साम्य वाटेल किंवा नाहींहि :—

ठाइठाईं ठेवि दागिने तळीं लगबगींत नावरी।
शरीर सुकुमार
विशाल नयनीं शुभानती चाले ठुमकत बावरी ॥
कुण्यातरि अमिराची नोवरी।
पात्र पाहुन उभी राहून जरा नजर करी ज्यांवरी।
उजेड पडे चपलेपरि त्यावरी ॥
लोकांस चंद्रि लागली।
नाहीं शुद्ध मागली।
अशि फार सुगर चांगली ।
स्वच्छंदावरि घाली वनिं गुंजारव मधुकरी ॥ ३ ॥

मागील कडव्याच्या शेवटच्या ओळींतला आशय या कडव्यांत स्पष्ट झाला आहे.—

नभ रंगाचें वसन कटिं निरी चोपिव ना फुटे।
पदर पल्लेदार मागें सुटे ॥
सतेज सरी शोभती वरी दाट जरीचे सुटे।
चमक जणू नक्षत्रांची सुटे ॥
धन्य धन्य निर्मिता विधि नाहीं विसरला कुठें।
केवळ धगधगीत तारा तुटे ॥
गंगु हैबती कवी गावन।
लाविती ब्रीदें बावन।
झाले महादेव गुणी पावन।
प्रभाकराची कवन कडी गुणिजनांस प्रियकरी ॥ ४ ॥

सात्विक विलासिनी

सत्त्वगुण व विलास यांची पूर्णपणें फारकत, म्हणजे शाहिरींतला रंग असा ग्रह झालेला आहे. मला या वेळीं पत्त्यांच्या एका डावाची–बिझिकची–आठवण होते. कोणत्याहि एकाच रंगाच्या राजाराणींच्या जोडीला वीस मार्क. हुकमाचा तो रंग असला तर चाळीस मार्क. पण इस्पिक राणी व चौकट गुलाम अथवा किलवर राणी व बदाम गुलाम यांच्या जोडीला चाळीस मार्क असत. अशी ही विजोड जोडी कायम राखून दुसरी लावली तर एकदम पांचशें मार्क, दोन्ही राखून तिसरी लावली तर पंधराशें आणि तिन्ही राखून चौथी दाखविली तर दोन हजार मार्क असत. चार, सहा अथवा दहा हजार मार्कांच्या गेमच्या डावांत बिझिकला इतकें महत्त्व होतें. शाहिरींत बिझिकला महत्त्व असें असल्याचा अट्टाहास आतांपर्यंत चालू आहे. या तथाकथित शाहिरी बिझिकांतला निम्म्यापेक्षां अधिक भाग अर्थ समजण्यास थोडासा अवघड आहे. पण तो बिझिकच्या स्वरूपाचा नाहीं, इतकेंच नव्हे तर फार उच्च स्वरूपाचा आहे हें उलगडून दाखविण्याचा प्रयत्न मी करीत आलों आहें. आतां खरेंखुरें राजाराणीचें जोडपें अनुकूल साधनांच्या उपयोगानें विलास करीत असल्याचें दाखविणार आहें. प्रभाकर कवि ज्यांच्या फडांसाठीं कविता करीत असे ते गुंगहैबती स्वतः चांगल्यापैकीं कवि होते. ते अमर्याद उंच झेप घेणारे नव्हते तरी खातेऱ्यांत लोळूं लावणारेहि नव्हते. सुध्या नादाचे होते. विवाहित हौसी पतिपत्नींचा विलास असे कवि रंगवूं शकतात. तें कवन असें :—

बहार झाला रात्रीं मोतिया फुलला गे ॥ ध्रु० ॥
द्राक्षीचे मंडप बाई छाया अति दाट गे।

पांचवे मजल्यावरति सफेली थाट गे।
पडदे चिकाचे भवतीं सफेमधें चोर वाट गे।
काचेचि कारंजी कंदिल शोभती।
घोंस फुलांचे वरुनि सुगंधित लोंबती।
विलासांत स्वामी येऊन मजला घेऊन बैसती।
तेव्हां असें वाटे ईश्वर पूजिला गे ॥ १ ॥
झुळझुळ वारा वाहतो, चांदणें थंड गे।
झगमग तारे करिती, आकाशीं उदंड गे।
पहातां आनंद वाटे मनाला अखंड गे।
लावून रुपेरी हलके हिंदुळे बांधिले।
तऱ्हेतऱ्हेचे रंग छताप्रति दीधले।
खांब सुरूचे सूत्र नकासून साधिले।
इंद्रभुवन भासे पाहुनियां मजला गे॥ २ ॥
प्रियकर हौसी माझा प्रियकर वसंत गे।
डोईस बसंती फेटा, दुपेटा बसंती गे।
आपल्या गुणें मी झालें तयाला पसंत गे।
वरखालीं पाहून मर्जिनें वागतें।
अलावला घेउन तिनदा चरणासी लागतें।
खुशालींत चारी प्रहर सख्यासवें जागतें।
दुसरें सुचेना कांहीं असा जीव रिझला गे ॥ ३ ॥
काय सुख सांगूं सखये विलासी भ्रतार गे।
घिरव्या--सभोंवत्या करिते मी होउनी घार गे।
चतुर सखा मी त्याची प्रियकर नार गे।
असा असो जन्मोजन्मीं आवडता स्वामी गे।
रत नसो परक्या ठायीं परस्त्रीच्या कामीं गे।
म्हणे गंगु हैबती नाद सुधा मी गे।
महादेव गुणी गाती आनंद सभेला गे॥ ४ ॥

पंचरंग

आत्म्याच्या ठिकाणीं लिंगभेद नाहीं, तसा तो आत्मरूपदर्शनांतहि नाहीं. केव्हां तें प्रतिबिंब पुरुषरूपांत कल्पून तसें वर्णन कवि करतात, तर केव्हां ती बाला सुंदरा आहे असें कल्पून स्त्रीरूपांत वर्णन होतें. संतपरंपरेंतील हा वारसा शाहिरांनीं चालविला आहे. हें रूप म्हणून जें म्हटलें जातें तें वास्तविकपणें नुसतें तेज असतें. त्याचे रंग मात्र निरनिराळे असतात. याविषयीं केवळ माझ्या विधानावर विश्वास बसणार नाहीं, म्हणून श्रीमत् शंकराचार्यांचें वचन येथें देतों :

दृश्यं यद्रूपमेतद्भवति च विशदं नीलपीताद्यनेकम् ।

—शतश्लोकी ॥ १३ ॥

नीहारधूमार्कानलानिलानां खद्योतविद्युत्स्फटिकशशीनाम् ।
एतानि रूपाणि पुरःसराणि ब्रह्मण्यभिव्यक्तिकराणि योगे ।

श्वेताश्वतर उपनिषद् ॥ २ : ११ ॥

ऋतं पिबन्तौ सुकृतस्य लोके गुहां प्रविष्टौ परमे परार्धे ।
छायातपौ ब्रह्मविदो वदन्ति पञ्चाग्नयो ये च त्रिणाचिकेताः ॥

—कठ. ॥ ३ : १ ॥

टीका : दृश्यमिति । एतत् इदं तया प्रतीयामानं रूपम् रूप्यते प्रकाश्यत इति रूपं प्रकाशितं तत्सर्वं दृश्यं दृग्विषयज्ञानैकरूपं नीलपीतादि नीलं श्यामं पीतं गौरं इत्यादि विविधगुणवत्वात् एतस्य प्रतीयमानस्य सर्वस्य अनेकविधस्य रूपस्य दृग् दृश्यते ।

या चरणाचा भावार्थ असा आहे कीं, दृश्य जें रूप तें निळें, पिवळे इत्यादि अनेक रूपांनीं स्पष्ट भासतें. हा रंगापासून मिळणारा अवकाश घेऊन कवन रंगविण्याची शाहिरांना हौस असते. बिंबाला प्रतिबिंबाच्या दर्शनानें आनंद तसा प्रतिबिंबालाहि बिंबदर्शनानें आनंद होतो. म्हणून या परस्परांच्या स्वरूपदर्शनाच्या समयीं प्रतिबिंबांत बिंबाच्या बरोबर असलेल्या उपाधींचा रंग उमटणें स्वाभाविक आहे. तेच हे नीलपीतादि रंग. या रंगाच्या आभरणानें युक्त असलेल्या प्रतिबिंबांचें वर्णन जाणते शाहीर करीत असतात. त्या अनेक कवनांपैकीं या कार्यासाठीं योग्य असा विश्वास ज्याच्या ठिकाणीं उत्पन्न होईल अशा साधु तुकनगीरचें कवन येथें देतों. या तुकनगीरची समाधि औरंगाबादेस आहे. त्याची उत्तर हिंदुस्थानांतहि मान्यता होती. त्यानें मराठी व हिंदी अशा दोन्ही भाषांत सरस कवनें केलीं आहेत. ग्वाल्हेरचे भक्तराज भक्तिनिधि श्री. सरदार बलवंतराव भैयासाहेब शिंदे यांच्या भजनसंग्रहांत याच्या कवनांचा समावेश आहे. मराठी पद्धतीची लावणी रचणारे कांही हिंदी कवि याचे शिष्य म्हणवितात. भेदिक डफगांण्याच्या शाखेंतली याची परंपरा औरंगाबादेकडे आहे. ती तुरेवाल्यांची आहे. शंभर वर्षांपूर्वी हा कवि होऊन गेला असावा. अलीकडचा नाहीं हें खचित. त्याचे भेदिक गाण्यांतले शिष्य महादू मल्हारी व यांचे शिष्य आसारामजी हे आतां पोक्तवयाचे आहेत. या तुकनगीर कवीची कविता उच्च दर्जाची आहे. एक पंचरंगाचा नमुना असा :—

अलंकार गोरीचा रे नाना परिचा ॥ ध्रु० ॥
पहिला रंग नारिचा सफेत ।
जशि चंद्राची ज्योत रे ।
जवळ चांदणी लखलखित ।

शुभ्र दंत गोरे हात रे।
घुंगरू जोडवी पायांत।
शुभ्र मोती नाकीं नथ रे।
कमरे दाब तिचा जडिताचा ॥ १ ॥

दुसरा रंग नारिचा पहा काळी।
नेसली चन्द्रकळा रे ॥
काळी जरी गजनीची चोळी।
काळीच माथा जाळी रे ॥
काळी गळ्यांतली गळसरी।
काळाच पोत मणी रे ॥
काळा साज तिचे वेणिचा ॥ २ ॥

तिसरा रंग नारिचा पहा पिवळा।
अलंकार पिवळा रे ॥
सुंदर नेसली पाटोळा।
पितांबर पिवळा रे ॥
पिवळ्या तापत्याची चोळी।
पिवळीच रत्नजाळी रे ॥
पिवळ्या झुबक्याची कानीं बाळी।
कर्णफुल झळाली रे ॥
पिवळा हार गळां पुतळ्यांचा ॥ ३ ॥

चौथा रंग नारिचा पहा बरवा।
झुणा नेसली हिरवा ॥
हिरवी अंगि चोळी पहा बरवी।
शाल ओढनी हिरवी ॥
माथा राखडी जडावी।
वर हिरकणी हिरवी ॥
हिरव्या जडिताचा चुडा तिचा ॥ ४ ॥

पांचवा रंग नारिचा पहा लाल।
गळ्यांत हिरामणि लाल रे ॥
मुखामधिं विडा नारिच्या पहा लाल।
ओठ पोंवळे लाल रे।

माथा भांग तिचा पहा लाल ।
कुंकु कपाळीं लाल रे ।
बोले तुकनगिरी कवि लाल ।
हमेश झेंडा लाल रे ।
धोंडी बजावा खरी ख्याल ।
छंद धरणपर बोल रे ॥ ५ ॥

दिवाणाची चतुराई

शाहिरी वाङ्मयांतला चातुर्याचा रंग आतां पाहावयाचा आहे. दौलताबादेस बहामनी निजामशाहीची राजधानी असतां त्याचा दिवाण साबाजी अनंत चोरघोडे रनाळेकर या नांवाचा होता. अकबराचा दिवाण बीरबल जसा तसाच हा चतुरपणाबद्दल प्रसिद्ध होता. त्याच्या चातुर्याचा प्रत्यय बादशहाला कसा आला त्याचें वर्णन असलेलें एक कवन पुढें देत आहें. यांत प्रकट झालेलें चातुर्य आतांच्या पुढारलेल्या काळांतहि तसेंच मानलें जावें असा आग्रह धरल्यानें शाहिरीची मोठीशी तारीफ केल्यासारखें होणार नाहीं, हें खरें. पण कथानक मनोवेधक आहे, याचा प्रत्यय अलीकडे आला आहे. स. १९५७ च्या दिवाळी प्रसंगीं 'लोकसत्ता' पत्रानें काढलेल्या विशेष अंकांत डॉ. वर्टी यांनीं हेंच कथानक या कवनाच्या अनुषंगानें मोठ्या अद्भुतरम्य रीतीनें रंगविलें आहे. हें कवन सगनभाऊचा गुरु सिद्धनाथ याचें आहे. पण चुकीनें तें सगनच्या नांवावर विकलें जात आहे. तें कवन असें :—

कस्तुरी वाळवीत होती माडीवरती ।
बेदरची कामसेना चतुर गुणवंती ॥ ध्रु० ॥
बेदर शहर आदि ठिकाणा । पात्रा नांदे कामसेना ।
चतुर गुणवंत रेखिव वदना । घरिं अमित द्रव्य खजीना ।
चढती नवती ॥
सहा राग छत्तीस रागिण्या जाणत होती ॥
कंठांत जशा कोयला बोलुन पुरती ।
होति एके दिवशीं बसली माडीवरती ।
अमल अडचा प्रहराचा दुपार कलती ।
कस्तुरी वाळवीत होती आपले हातीं ।
मध्यम सुटला वायु त्याच वक्तीं ।
त्या कस्तुरिचा वास वायुसंगती ।
दौलताबादेस गेला राव बाच्छायाप्रती ।

‘ आज कस्तुरी कोणापशीं श्वास मारिती ’ ।
याउपर दिवाण बोले बाच्छायाप्रती ॥ १ ॥

दिवाण बोले ‘ बाच्छाया अवधारी ।
बेदरीं वाळत असे कस्तुरी । कीं कामसेनेचे माडीवरी ।
कीं पवनें श्वास आला येथवरी । कीं सत्य जाणा ’।
बाच्छाय म्हणे ‘ संभाळून बोला वचना ’ ॥
‘ हें लटकें झालें तर सिर मारावा ’।
ती वेळ लिहिली त्याच दिनमाना ।
मग जासुदाची जोडी केली रवाना ।
ती गेली बेदरीं जिथें कामसेना ।
ऐकतां पुसूं लागली धुंडतां कवणा ।
जासुद म्हणे बाच्छाय धाडिलें आपणा ।
पत्र दिधलें तिजपाशीं वाचि कामिना ।
विचित्र हास्य कस्तुरी नांव निघतांना ।
‘ वाळविली कोण दिवशीं वेळ सांगा ना ।
लिहुन पाठवा ठिक या अर्थीं ’
मग बहिरी निजामशहाला गणिका लिहिती ॥ २ ॥

बेदर हें ठिकाण बहामनी राज्याच्या एका शाखेची राजधानी. संत दामाजी यांची कथा याच बेदरच्या बादशाही अंमलांत घडली. दौलताबादेहून बेदर आग्नेयीस सुमारें २५० मैलांवर आहे. कवन ख्याल पद्धतीनें गाण्याचें नाहीं, तर पोवाडा पद्धतीवर जलद लयींत खड्या व चढ्या सुरांत म्हणण्याचें आहे.—

‘ असुक दिवस असुक वेळ । पत्र लिहिती गणिका वेल्हाळ ।
लाखोटे दिले करून त्या वेळ ।
दिधले जासुदाजवळ । कीं जोडी फिरली ।
दौलताबादेस ताबडतोब गेली ॥
बाच्छाई कचेरी होती तेव्हां भरली ।
खुर्निसा करून जासुदें पत्र अर्पीली ।
साबाजी अनंतानें हुजुर वाचीली ।
तो दिनमान ती वेळ ठीक निघाली ।
ऐकून हासे बाच्छाय शाबासकी दिधली ।
‘ आज मात्र तुझी चतुराई आम्हा कळली ’।
ही वार्ता दुनियामधें प्रगट झाली ।

साबाजी रनाळेकर चातुरवल्ली ।
बहिरी निजामशाहिची जोडी बनली ।
तिकडे कामसेना पाहुन झुरती ।
साबाजी अनंताला पाहून म्हणती ॥ ३ ॥

कवनाचें एक कडवें संपवितांना पुढच्या कडव्यांतला संदर्भ नुसता सूचित करून कडवें संपविण्याची व पुढील कडव्यांत काय आहे याविषयीं श्रोत्यांची उत्सुकता वाढविण्याची ही हातोटी लक्षांत येण्यासारखी आहे. कै. हरि नारायण आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत ती कशी साधली आहे, तें वाचकांना स्मरल्यावांचून राहणार नाहीं.—

गणिका तेव्हां कामसेनानें ।
सर्व शृंगार काढिला तिनें ।
बिंदि शिसफूल गळ्यामधें रत्नें ।
नथनि बुलाख सुढाळ वदनें ।
गळ्यांत चिंचपेट्या मनगव्या मगी ।
कुसुंबी जरी पिसव्राज कठीं ।
रुणझुण पायीं पोल्हारें जोडवे बोटीं ।
वरकड दागिन्यांची घेतली पेटी ।
बत्तिस आभरणें अवचळ द्रव्य गांठी ।
गाडींत बसुन चालली बाच्छाय भेटी ।
स्वर्गीहून आली रंभा सुखाचे साठीं ।
ही उपमा साजे तिला चतुर मोठी ।
पोहोंचली दौलताबादेस हर्ष चित्तीं ।
चांभार टेकडीजवळ घेतली वस्ती ॥ ४ ॥

दौलताबाद हल्लीं अगदींच उजाड आहे. पण पूर्वीं म्हणजे जेव्हां तेथें राजधानी होती तेव्हां शहराच्या सभोंवतालच्या तटांच्या व खंदकांच्या आंत विस्तीर्ण जागा आहे. तेथें विशाल शोभिवंत मंदिरें असणें शक्य आहे. पण चोहों-बाजूस लहान लहान टेंकाडें व त्यामुळें खुरटें जंगल असलें पाहिजे. तें अजूनहि आहे. अशा एका ठिकाणीं कामसेनेनें मुक्काम ठोकला व—

गायन करी कामसेना पुरती ।
जंगली हरणें तेथें होतीं ।
आलाप केला त्या ठायाप्रती ।
गौरी रागिणी झाली बोलती ।

तो राग आळविला तिनें ।
त्या नारिजवळी आलीं जंगली हरणें ।
बैसलीं तिचे सन्मुख रागज्ञानानें ।
हार गळ्यांतिल काढिला त्या गणिकेनें ।
हरणाच्या गळां घातला आपहस्तानें ।
मग बाच्छाया फिर्याद केली त्या नारीनें ।
तुमच्या नगरामधें मला झाली आठवण रात्रीं ।
गळ्यांतुन हार नेला चोरून ।
त्याचा ठिकाणा लावावा मेहेरबान ।
ऐकून बाच्छाय म्हणे दिवाणाप्रती ।
' हार हिचा इजला द्यावा, ' ऐसें म्हणती ॥ ५ ॥

डॉ. वर्टी यांच्याप्रमाणें काव्यरसिक वृत्ति माझी असती तर या प्रस्तावनेंतून काव्यनिर्माण केलें असतें. पण मला मूळ कवीचें कवन सांगावयाचें आहे. तें पुढें असें.—

हुकूम बाच्छाय ऐका ऐसा जाहला ।
साबाजी अनंत तेथून निघाला ।
संगें घेऊन कामसेनेला ।
तेव्हां तो तिशीं पुसूं लागला ।
कोणे ठिकाणीं घेऊन गेला चोर त्या रानीं ।
मग दोघें चाललीं तेव्हां हस्त धरूनि ॥
हार गेला तेथें बसलीं दोघेजणीं ।
मग काय केलें साबाजी अनंतानीं ।
तो सर्वगुणसंपन्न पूर्ण चतुर ज्ञानी ।
आळवी राग तेव्हां त्याच मैदानीं ।
हा सर्व मेळ हरणांचा ऐकुन कानीं ।
त्या दोघांजवळ आलें प्रीति करूनी ।
त्यामधीं नाहीं आला हाराचा धनि ।
तो मागून आला तयाचे पंक्ती ।
तो आणिला कचेरीस बाच्छाय तेव्हां पहाती ॥ ६ ॥

या कवनांत संगीतज्ञानाचे संबंधांत सहा राग छत्तीस रागिण्यांचा निर्देश आला आहे. चालू प्रकरणांत हैबतीचें कवन येऊन गेलें आहे. त्यांतल्या उल्लेखाशीं हें जुळतें आहे. त्या दोन्ही कवींच्या काळांत सुमारें पाऊणशें शंभर वर्षांचें अंतर

आहे. पण दोहोंच्या स्मरणांत ही सहा-छत्तीस संख्या आहे. ही महाराष्ट्रांत रूढ असल्याचा हा आणखी एक दाखला मिळाला. गायनानें हरीण लुब्ध होऊन गाणाऱ्या मनुष्याजवळ निर्भयपणें येतात असा दाखला तानसेन व बैजुबावरा यांच्या सिनेमा कथेंत मिळतो. साबाजीच्या व तानसेनाच्या काळांत फार तफावत नाहीं. पण स्थळांत आठशें मैलांचें अंतर आहे. पण कथा तें अंतर तोडून आणि तीनशें वर्षांचें कालाचें अंतर तोडून पुनः लोकवाणींत अवतरली आहे. हरणें मंजुळ गायनाला लुब्ध होतात म्हणून कथेंतली घटना घडली कीं कसें, हा एक प्रश्न आहे. माळरानांत चरणारीं हरणें एरव्हीं मनुष्याच्या वाऱ्यालाहि उभीं राहात नाहींत, पण बैलगाडीच्या चाकांचा माळाच्या कडक पृष्ठभागावरून जातांना जो आवाज होतो त्याचें कुतूहल हरणांना असतें व बेभान स्थितींत तो आवाज ऐकत तीं उभीं राहतात, आणि या रीतीनें शिकार साधते असा एक अनुभव आहे. तानसेन हे ध्रुपदपद्धतीचे गाणारे होते. त्यांच्या साथीला ख्यालीपद्धतींतला तबला नसून मृदंग असावयाचा. मृदंगवादन गंभीर प्रकृतीचें असतें. या वादनानें हरणें आकर्षित होत असावीं असा एक कयास आहे. असो—

फिर्याद झाली त्याच दिनमानीं।
हार आणविला तिसऱ्या दिनीं।
बाच्छाय खुषी त्यास पाहुनी।
धन्य एकाहून एक ज्ञानी।
झाली गणिकेसि मेहेरबानी।
मोहोरा दिधल्या तबकभर।
ती म्हणती माझा हेत आहे साबाजी अनंतावर।
एक रात्र द्यावी मजला घटका चार।
हो बरें म्हणून बाच्छायें दिलें उत्तर।
सांगितलें साबाजिला तिचें उजूर।

पण तिची अट आहे ती मोठी बिकट, तिचा नुसता निर्देश करणें ही देखील बिकट समस्या आहे. म्हणून मीं पूर्वींच कांहीं सांकेतिक शब्दांचा अर्थ नीट ध्यानीं घेण्याची सूचना देऊन ठेविली आहे. कवि सिद्धनाथ हा रावळ म्हणजे जिवंत समाधि घेणाऱ्यांच्या वंशांतील आहे. अशी एक समाधि कोल्हापुरास अजून दिसते. योगमार्गाचा पूर्ण अभ्यास असणाऱ्यांना मात्र हें साध्य होतें. पूर्वीं फार श्रेष्ठ व्यक्ति अशा रीतीनें अखेरची अखंड समाधि लावून बसल्याचीं उदाहरणें आहेत. त्यांचा नामनिर्देश या कथेच्या अनुसंधानांत करणें गौण वाटण्याचा संभव आहे. फक्त प्रस्तुत कवीला तो मार्ग अवगत असल्याचा दाखला पटावा म्हणून हा भाग मी येथें सांगत आहें. 'सगन कळत नाहीं' अशी शोधक विद्वानांची तक्रार

साधार आहे. त्याचा गुरु हा सिद्धनाथ. या दृष्टीनें याच्याकडे पाहणें क्रमप्राप्त आहे. येवढें सुचवून मी पुढें जाऊं इच्छितों. कामसेनेनें घातलेली अट अशी—

तीं म्हणती भोग मजला समोर ।

यांतला गूढ भाग नाहींसा व्हावा, अनिष्ट भागाकडे लक्षहि जाऊं न देतां या कवनाचा कर्ता व त्याचा हेतु यांचा विचार करून या अटीचा अर्थ लावणें शक्य आहे. असे अर्थ उठल्यासुटल्या कोणत्याहि कवनाचे लावतां येतील, तेव्हां तसेंच करण्यांत आनंद मानण्यासाठीं हा उद्योग आहे, या आक्षेपाला बळकट आधार मीच उपलब्ध करून देत आहें, असें कोणालाहि वाटेल. पण तो केवळ भास ठरेल, असा या कवनाचा अर्थ खरोखर आहे. यासाठीं थोडा संकेतांचा उलगडा करून घेणें जरूर आहे. चतुर ही संज्ञा अध्यात्मशास्त्रांत ज्ञानी अशा मनुष्याला आहे. कांहीं विपरीत भासणारा भाग पुढें मांडून त्याचा खुलासा मागण्याचे कवन-प्रकार संतवाङ्मयांत आहेत. अशा वेळीं ज्ञानी असा चतुरहि गोंधळून जातो. 'पैल चतुरा लागलें पिसें' असें चरण असलेलें श्रीज्ञानेश्वरांचें एक कवन मी या लेखनाच्या आरंभींच्या भागांत उद्‌धृत केलें आहे, त्यांत आहे. उमाणें, उमानपद अशा नांवानें ओळखिलीं जाणारीं कूट कवनें संतवाङ्मयांत आहेत व त्यांच्याच परंपरेनें तीं शाहिरींत आलेलीं आहेत, हें मीं पूर्वींच दाखवून दिलें आहे. तोच प्रसंग येथें आहे. आत्तां कवन पाहावयाचें. साबाजी संकेतस्थलीं होता. तें माडीवर होतें. कामसेना माडीवर जाऊं लागली असतां—

माडीला शिडी होती लाविली ।
प्रथम पायरी काढिली ।
चढतां येईना ऐशी केली ।
चढूं जातां पायरी शेवटली ।
नाहीं असें पाहुनी तेथें खुंटली ।
साबाजीस म्हणे हात द्या मजकारण ।
साबाजी अनंत उठला तेथून ।
पंजा धरतांना तिचा उतरला मदन ।
संपूर्ण जाहली भोग भोगिल्याविण ।
हरला कामसेनेचा गर्व पूर्ण ।

योग्यमार्गीतील अधिकारी व्यक्ति नुसत्या करस्पर्शानें 'शक्तिपात' करतात. तो स्पर्श तळहातानें मस्तकावर किंवा हातावर झाला किंवा हृदयावर तळपायानें झाला तर साधकाची उचंबळणारी वृत्ति शांत होते, असा अनुभव प्रसिद्ध आहे. वरदहस्त वगैरे क्रिया याच परिणामासाठीं शेवटीं केल्या जातात. या बाबतींत श्रीज्ञानेश्वरांची ही ओवी पाहा—

याकारणें श्रीगुरूनाथू । जंव मस्तकीं न ठेवी हातू ।
निवृत्तिदास असे विनवितु । तंव निवांतु केंवि होय ॥

—ज्ञा. अ. ५

श्रीरामकृष्ण परमहंस यांनीं असा परिणाम विवेकानंदांवर केल्याचें नमूद आहे. महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर यांनीं असा परिणाम केल्याचा दाखला त्या पंथाच्या वाङ्मयांत आहे. सिद्धनाथ शाहिरानें याच क्रियेचा परिचय कवनांत करून दिला आहे. ज्ञानमार्गांत असलेल्या दोन व्यक्तींपैकीं एक शांत, दांत व दुसरी स्वतःच्या ज्ञानाच्या अभिमानामुळें उणी अशी असतां, पहिली व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीला कशी शांत करूं शकते येवढें तात्पर्य या कवनांत वाचकांना मिळालें तरी कवीचें व माझें काम झालें. डॉ. वर्टींनीं आधुनिक रंग खासा जमविला आहे. पण कवनांतला रस मात्र आपल्यासाठीं राखून ठेवला आहे. तो भाग त्यांनीं सोडून दिला आहे.

शाहिरींतलीं रत्नें व गुंडेगोटे

सगनभाऊ शाहीर समजत नाहीं असें कित्येक जाणते विद्वान् म्हणतात. मला त्यांचें बोलणें खरें वाटतें. कारण त्यांनीं प्रयत्न केला असतांहि तो समजत नाहीं. यांत उणेपणा फक्त दृष्टीचा आहे. दुसरे कोणी म्हणतात, सगन आम्हाला पुरा समजला. त्याच्याइतका त्याज्य कवि महाराष्ट्रांत झालेला नाहीं. हें बोलणें मला पटत नाहीं. म्हणजे उमजतें आणि साफ नाकारावेसें वाटतें. सगनभाऊ रूपकाशिवाय जणू काय बोलतच नाहीं. त्याच्या डोळ्यांपुढें सारिणी अजूक उभी असते, पण त्याचा स्वभाव एकदम लांबवर उडी मारणाराचा आहे. मध्यबिंदू-पासून अगदीं दूरवर कसा केव्हां जाईल याचा नेम नाहीं. भक्त कबिराची तऱ्हा हीच आहे. साध्या नामजपाचा उपदेश करणाऱ्या कवनांत तो योगमार्गांतला कांहीं भाग केव्हां आणील याचा नेम लागणार नाहीं. अस्सल मुसलमानी कवींची ही लकब अभ्यासण्याजोगी असते. ती लकब न उलगडली तर कवीचें कवन निष्कारण घोटाळ्यांत पाडतें, अर्थांपासून वाचकांस दूर नेतें. हा कवीचा दोष मानण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मस्त शायर असें न करतील तर ते मस्त कसचे आणि शायर कसचे ! या प्रकाराचा नमुना म्हणून सगनभाऊचें एक कवन विस्तारानें पाहावयाचें आहे.—

' जाते ग बयानो, ' नार चंचल मनिं घाबरी ।
' पुरुषाचा पोषाख करूनिया, झालें रानभरी ' ॥ ध्रु० ॥

वास्तविकपणें ही स्त्री. पण प्रियकराचा वियोग असह्य झाल्यानें पुरुषी पोषाखांत त्याचा शोध करावयास निघाली आहे. त्या तयारीचा तपशील असाः—

'कर जोडुन विनविते सख्यांनो मला न्हाऊ घाला।
चर्चुन मैलागिरी उंच सुवासिक अत्तर तेला।
पांचपेच अलबेली आणा कोणि बांधुन पगडीला।'
अंगिं रेखिला जामा, रुंद पटीचा बुंद सेला।
सजवुन सुरंग खासा ठेविला।
ढाल लाल गेंडाचि रंगित हातीं समशेर भाला।
खंजिर तेगा कंबरेस कसुन फाकडी।
तीरकमान दुसरे हातीं फुलाची छडी।
अश्वावर स्वार जाहली थेट कानडी।
रंगली बत्तिसी घवघवित मुखीं विडी।
मैत्रिणी उभ्या त्या एकाहुन एक चढी।
अश्रुपात वाहती हुंदतात घडिघडि।
बोळविसी आवडी कां जणु जाते माहेरीं।
'लोभ असूं द्या आतां मायबहिणी आम्हावरी' ॥ १ ॥

पुरुषी थाट सुचविण्यांत कवीनें चतुरता दाखविली आहे. प्रवासांत स्त्रीवेषामुळें येणें शक्य असलेल्या अडचणींचा धोका टाळण्यासाठीं हें सयुक्तिकच आहे. त्यापलीकडचा एक अर्थ या सूचनेंत आहे. स्त्रीत्व विशेषतः मानसिक प्रभावांत प्रत्ययास येतें. पुरुषत्वाचा आविष्कार प्रथमतः किंवा विशेषेंकरून शारीरिक बलांत दिसतो. येथें प्रियदर्शनाची तीव्र इच्छा प्रकट झाली आहे. साधक व्यक्ति रानभरी झाली आहे. शांत मनानें होणारें साधन अवलंबण्याच्या स्थितींत नाहीं. त्यासाठीं शारीरयोगाकडे प्रवृत्ति झाली आहे. तो मार्ग प्राणायामादि कृत्रिम उपायांचा. याची खूणहि कवीनें पुढच्या कडव्यांत दिली आहे. संसारकर्त्या स्त्रीला माहेराचें कांहीं एक असामान्य प्रेम असतें. त्याला व्यवहारांत दुसरी तोड नाहीं. संतांनीं देवाच्या स्थानाला माहेराची उपमा दिली आहे. तिच्यापेक्षां जास्त समर्पक उपमा त्यांच्या कल्पनेंत उद्भवूं शकली नाहीं. तिचें स्वारस्य शब्दांनीं संपूर्णपणें सांगतां येत नाहीं. संस्कृतीच्या अनुभवांत कांहीं विशेष असतें म्हणतात त्यांतलें हें एक गमक आहे—

घेऊन मुशाफर भेष फाकडी अप्रतिम सजली।
मर्दानि दागिने अंगावर चमचमाट बिजली।
दाही बोटीं आंगठ्या डुब वस्तांमधें गजबजली।
थवथवित शिरिं केस अत्तर चमेलीमधें भिजली।
गुप्तरूपीं एकान्तीं मागल्या द्वारानें धजली।
निरवानिरव करून सखि जाते मजलोमजली।

मार्गे हेत धरून मार्गानें चालली त्वरें।
दरकूच निघाली ती विषयानें त्वरें।
मग तृषा लागली व्याकुळ जाहली बरें।
करिं भरून घेतली झारी प्राण घाबरे।

या कवनांत पातंजल योगांतील एका अवस्थेचें दर्शन कवीनें अत्यंत सूक्ष्म रीतीनें घडविलें आहे. अष्टांग योगसाधन हें कांहीं विशेष इच्छा धरून साधक करीत असतो. सहजसमाधि ही वृत्तिविरहित असते. एकचित्तानें नामस्मरण ध्यान या साधनांनीं ही साधते. पण कमीजास्त कालावधि मनाच्या स्थिरतेवर अवलंबून राहते. कृत्रिम अष्टांग योगांत आसन, मुद्रा, प्राणायाम इत्यादिकांनीं उन्नत होणारें वायूचें गमन साधतें. त्यासाठीं बहिर्मुख चित्त प्रथम अंतर्मुख करण्यावर यश अवलंबून राहतें. वायु ऊर्ध्व मार्गानें गमन करीत राहण्याच्या क्रियेला पश्चिम मार्ग असें पारिभाषिक नांव आहे. आपल्यासमोर दृष्टि ती पूर्वमार्गाची. तिच्या उलट म्हणून तिला पश्चिममार्गाची असें सांकेतिक भाषेंत म्हणतात. कवीनें मागच्या दारानें नायिका गेल्याचें सांगून ही खूण पटविली आहे. लोकांत बोभाटा न व्हावा म्हणून तिची ही खबरदारी व्यावहारिक दृष्टीनें सुद्धां योग्य आहे. पश्चिममार्गाचा अवलंब केल्यावर टप्याटप्यानें साधना साधत गेली. हे टप्पे प्रथम सांसारिक घडामोड मग किंचित् शांति, नंतर वैराग्य अशा क्रमानें अवस्थांतराचे असतात. पाणी नजिक आलें. पाणी म्हणजे अतिशुद्ध बुद्धि. दर्शनाचें आयतन. बुद्धि जलतत्त्व आहे. शाहिरांच्या कवनांत, उत्तर हिंदुस्थानांतील कृष्णगोपींच्या कवनांत पानोथा, पनघाट, जमुनाकिनारा, गंगाकिनारा यांचा निर्देश दर्शनमीलनाचें सांकेतिक स्थान अशा अर्थानें येतो त्याचें स्पष्टीकरण हें असें आहे. केवळ व्यावहारिक अथवा भौतिक अर्थानेंसुद्धां जलाशय आकर्षक असतोच. तो आधार कायम ठेवून त्याचा रंग अध्यात्मिक पद्धतींत वाढविलेला आहे. मनाची शुद्धि होत आली आहे. सत् मन सुविचार सुचवितें. कवीनें तो प्रकार पुढच्या भागांत चातुर्यानें आणला आहे. :—

त्या वनामधें वृक्षांवर वनचरें।
किजबिज करिताती जातिवंत पाखरें।
मृदु उत्तरें बोलती ' कां परदेश शिरी '।
राघु साळुंकीला सांगतो इष्कबाज कुमरी ॥ २ ॥

मागें ' द्वा सुपर्णा 'चें दर्शन करून दिलें आहे. शास्त्रांत त्यांना शिव व जीव अशा संज्ञा आहेत. पहिला भोगी पण अनासक्त आणि दुसरा आसक्त भोगी. हे दोन्ही आविष्कार वास्तविक एकाचेच आहेत. पहिला शुद्ध आहे. दुसरा अशुद्ध आहे. त्याचें रूपांतर शुद्धांत होतें. तेव्हां तोहि शिवस्वरूपी होतो. नायिकेची चित्ताची अवस्था कांहीं स्थिर होऊं लागली आहे. सुविचारांचा उद्गम होऊं

लागला आहे. तो प्रकार राघू मैनाच्या संवादाच्या रूपानें कवीनें हृदयंगम रीतीनें वर्णिला आहे. सगनचें वैशिष्ट्य येथें प्रत्ययास येतें. प्रीति ही परिपूर्ण असावी. जिवापाड असावी तर ती खरी प्रीति, हें तत्त्व ठसविण्यासाठीं राघूनें दृष्टान्तादाखल एक कथा सांगितली आहे. तींत दोघे मित्र व त्यांपैकीं एकाचें व एका राजकन्येचें प्रेम आहे. राजानें तें पाहून त्या प्रियकराला ठार मारण्याची शिक्षा फर्माविली. ती अमलांत येण्यापूर्वीं दुसरा मित्र व ती प्रियकरीण राजकन्या या दोन्ही त्याच्या-साठीं स्वतः मरण पत्करण्यास सिद्ध झाली. ही कथा मराठी शाहिरींत गंगु हैबतीनें एक दीर्घ कवनांत गुंफिली आहे. कवनाची सुरुवात 'मैत्र मोत्याची जात' अशा शब्दांनीं आहे. ती कथा सगनभाऊनें संक्षिप्तांत सांगून तसें पक्कें प्रेम तुझें असेल तर खुशाल आपल्या प्रियकराच्या शोधाला जा असें सुचविलें आहे. हा सूचक विचार आत्मनिरीक्षणाचा भाग म्हणून आहे. त्यावर नायिकेचें उत्तर असें:-

ऐक राघवा मी बत्तीस लक्षणी चतुर भार्या ।
तसाच माझा सत्पुरुष तो गुणप्रकाशसूर्या ।
सर्वसंपन्न गुणसंपन्न गुणातीत त्याच्या सौंदर्या ।
उपमा द्यावया न मिळे पुरुष स्वामि ऐश्वर्या ।
आज्ञा द्यावी मला पाखरा वळखलीस चर्या ।
निवडून सांगितला चांगला प्रीतिची पर्या ।

नायिकेनें घोड्याला घरीं चलण्याचा इषारा दिला. ती म्हणते—

'हे कंटकवन दारुण ऐक दाखला ।
चलावें घोड्या दूर पंथ राहिला ।
घोकणी करीत तिथें असेल सखा एकला' ।
यास्तव लवकर भेटावें राजबन्सिला ।
मग जीव संतोषला सुखाची रात्र जाईल सारी ।
'रुसुरुसुन बोलणें बरें केलें हो घरबारी' ॥ ४ ॥

नायिका स्वस्थळीं परत आली. श्रीतुकाराम म्हणतात, 'ठायींच बसोनी करा एक चित्त ।' कवनाचा शेवट असा—

सख्याकडील वर्तमान निर्मळ पंचमीचे दिवशीं
वृंदावनिं चालले कृष्णजी द्वारकानिवासी ।
जे वेळीं सय जाहली प्रियकरिण नाहीं त्यापाशीं ।
उदासले अंतरीं लागला चरका चतुरासी ।
अकस्मात येउन पोहोंचली कामिना सगुण गुणराशी ।
जवळ नव्हतीं सुखें लोटल्या द्रव्याच्या राशी ।

हा दुसरा प्रसंग तसाच. चतुर उदासले. तोंच त्यांची प्रियकरीण त्यांचेपुढें उभी राहिली. मागील कडव्यांतील स्थिति व येथील स्थितींतला फरक सूक्ष्म आहे. पण ध्यानीं आला तर कवनाचा हेतु उलगडून सांगण्यास समर्थ आहे—

म्हणे ' उभे असावें चरणावर लोळतें ।
घालुनी गळ्यासी मिठी हो कवटाळितें ।
मुखचंद्र तुमचा आदरें कुरवाळतें ।
कल्पना घेउन आज्ञा सांगा पाळितें ।
आज सख्या रंग बहारिनें खेळतें ।
मनिं इच्छा पुरवुनि घ्यावी कशी टळते ।
राया ओवाळितें ' मागली कथा प्राणप्यारी ।
सगनभाऊ म्हणे रत्नपारखी ऐकतील सारी ॥ ५ ॥

या जोडींतला पहिला आसक्त जीव व दुसरा अनासक्त असा शिव आहे. जे या विषयाचे ज्ञाते व भोक्ते असतील ते ही उत्तम कथा ऐकतील अशी कवीची खात्री आहे. शाहिराची सूचना उन्मत्तपणाची नाहीं. पण भौतिक खास आहे. शाहिरींतलीं रत्नें हुडकून त्यांची परीक्षा करण्याचे सोडून गुंडेगोटे नुसते हाताळण्यांत काय स्वारस्य आहे ?

पंचविध रंग

रंगांत प्रकार आहेत. कच्चा, पक्का, स्वस्त, महाग असे निरनिराळे रंग. पिवळा, निळा वगैरे पांच प्रकार पूर्वीं पाहिले आहेत. त्या प्रत्येकांत हे आणखी दोन दोन भेद आहेत. शाहिरी वाङ्मय मुख्यत्वेंकरून रंगाचें आहे, तेव्हां त्यांत सर्व प्रकार असावयाचे. हे किती आहेत व त्यांतहि पुनः पोटप्रकार किती आहेत याची गणती अजून कोणीं केली नाहीं. रंगाची ' मज्मून ' पाहण्याची जी जागा, तीच पाहणारांच्या दृष्टीनें विकृत झालेली असली, किंबहुना खरें बोलावयास पाहिजे, म्हणून दृष्टि विकृत असली, तर पुढचा ग्रंथ थांबलाच. कावीळ झालेल्याला सगळेंच पिवळें दिसतें. त्याच्या उलट, गढूळ झालेल्या दृष्टींत शुद्ध करणारें अंजन घातलें म्हणजे सर्व कांहीं ज्याच्या त्याच्या स्वरूपांत, रंगांत, भावांत दिसतें. रूप, रंग व भाव हे निव्वळ मराठी शब्द. मराठी लावणीची ओळख अशाच शब्दांनीं होईल. याचा पडताळा पाहावयाचा तर पुढील कवन पाहावें :—

शाम रंग दिसे अभंग झालों दंग राजसे ॥ ध्रु० ॥

लावणींतला म्हणजे शाहिरी कवनांचा मूळ पाया ध्यानीं घेऊन हें कवन पाहावें. हा कवि प्रथमच या लेखनांत येत आहे. ' वीरक्षेत्री ' असें टोपण नांव

असलेल्या कोण्या कवीचीं सुमारें शंभर कवनें मिळूं शकतात. होनाजी व सगन यांच्याशीं तो समकालीन होता. बडोद्याचा आपलुकीनें उल्लेख करतो यावरून तो बडोद्याचा रहिवासी असावा. नांव काय तें प्रकट नाहीं. पण कांहींचा तर्क चालतो. कवनांतला भाव होना–सगन यांचा आहे. शब्दरचना वगैरे गुणांत सरसनिरस कोण तें ज्याचें त्यानें ठरवावें. निदान माझ्यापुरतें मी असें म्हणतों कीं, हे गुण सर्वांना म्हणजे सर्व श्रोत्यांना सारखेच पसंत पडणारे नाहींत. त्यांत रुचिवैचित्र्याला अवकाश आहे. त्याचें जखडबंद शास्त्र होऊं शकणार नाहीं. 'वीरक्षेत्री' या नांवावरूनच थोडा ओबडधोबडपणा डोळ्यांपुढें उभा राहतो. कवि तसाच आहे. पण वरून कळाहीन दिसणाऱ्या पत्थरांच्यामधून मधुर जीवनाच रस वाहतो, असाहि अनुभव आहे. कवीच्या नायकाला शामवर्ण दिसला, नव्हे, तो स्थिर झाल्यामुळें तो फार खुषींत आला आहे. तो शामवर्णावर खुष झाला आणि त्याच्या मनांत होतें तेंच बोलला —

वर्ण तुझा पूर्ण पाहून करणें संग तुजसी।
काळी नार सकत फार विषयीं सार तिजसी।

जिची प्राप्ति व्हावी अशी इच्छा तिलाच तो काळी म्हणतो आहे; पण त्या रंगांत विशेष खुमास आहे असें म्हणून आपल्या पसंतीचें कारण सांगतो आहे. आफ्रिका खंडाबाहेरच्या प्रदेशांत काळा रंग विशेष पसंत असल्याचें व्यवहारांत दिसत नाहीं. पण तो तेलियाकुमाईत रंग मजबुतीचा द्योतक आहे हें शालिहोत्राला म्हणजे अश्वविद्येलाहि मान्य आहे. त्या विद्येशीं निकट संबंध असणाऱ्या 'वीरक्षेत्री' नायकानें तो रंग पसंत करणें क्रमप्राप्त आहे. पण नायिकेला त्यांत थोडी कुचेष्टा दिसली. ती म्हणते—

शामरंग माझा मला गोजरा ज्याचा त्याला।
भलीबुरी ज्याची त्याला गरज काय तुजला।
नांवें ठेवी दुसऱ्याला काय म्हणूं याजला।
वाटे जातां वर्म असे ही रीत भल्याची नसे ॥ २ ॥

ही भाषा आतांपर्यंत पाहिलेल्या कवनांतल्या भाषेहून उघड निराळी दिसते. या कवीच्या व बापूराव रेटरेकरांच्या भाषेंत पुष्कळ साम्य दिसतें. पूर्वीची लावणी थोडीशी नागरपद्धतीनें रचलेली दिसली. नंतर गांवठी रूप आलें आणि त्याचा नमुना आतांच्या रूढ लावण्यांत दिसतो. ही वाटचालहि चिंतनीय आहे. असो. नायकाचें प्रत्युत्तर —

राग आला सखे तुला वर्म काय भासलें।
होतें तसें सांगितलें यांत काय नासलें।

खरेंच आपगरजेमुळें वचन तुशीं असलें ।
बोल सखे त्वरित कसें करूं तूं असे ॥ ३ ॥

नायकाचें हें वास्तववादी उत्तर आतांच्या जमान्यांतहि पटण्यासारखें आहे. इंग्रज मनुष्य खरें सांगून दुसऱ्याला फसवितो असा प्रवाद होता. आतां इंग्रज गेला, इंग्रजीहि गेली, तेव्हां त्यांतली मख्खी कळणें जरा कठीणच आहे. आपगरजीपणा कबूल करून प्रामाणिकपणा पदरांत पाडून घेण्याची ही युक्ति विचारांत घेण्यासारखी आहे. नायिका त्यामुळें फसली पण आपल्या स्तुतीमुळें झालेल्या हर्षाचे भरांत :—

बोले सखि हसुनि कीं रंग महाग फार हा ।
हळद बरी, कस्तुरी ही भाव तोळेवार हा ।
कबुल करून हातीं धरून विषयिं झाला गार हा ।
'वीरक्षेत्रांत' असे तोळेवार विकतसे ॥ ४ ॥

'बलवंत' आण्णा किर्लोस्कर

लावणीकारांत नाट्याचार्य आण्णा किर्लोस्कर यांचेंहि स्थान आहे. त्यांची या प्रकारचीं सुमारें शंभर कवनें असावींत असा निदान माझा समज आहे. हीं कवनें किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीच्या मुक्कामीं शिमग्यांत धुळवडीच्या दिवशीं सकाळीं गाइलीं जात असत. भाऊराव कोल्हटकर यांच्या शेवटच्या आजाराचे वेळीं पुणें येथें आर्यभूषण नाटकगृहांत सकाळीं मैफल झाली. तेव्हां यांपैकीं चार दोन लावण्या म्हटल्या गेल्या होत्या हें मला आठवतें. मोरोबांनीं लावणीच्या चालीवर अभंग म्हटले. भाऊरावांचे भाऊ उत्तम लावणीगायक होते. तसेच बडोदकर नांवाचे एक बारीक व गोड आवाजाचे नट वाशीमकर मंडळींत होते, तेहि लावणी उत्तम गात असत. या बैठकीच्या कवनांत लय, ठाय, स्वरांत रागांची छाया स्पष्ट दाखविणें आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे सर्व शब्दांचे स्पष्ट व शुद्ध उच्चार, अशी या गाण्याची रीति होती. असो. आण्णांच्या लावणीचा एक नमुना येथें देतों:—

सुमन मंचकीं, जाई मोगरी ।
करुनि थाट दीप दाट चकचकाट बसले वाट
पहात मंदिरीं ।
कोण भेटली स्वरूपसुंदरी ।
मोहनमाळ घालुनि माळ क्रमुनि काळ
नित्य सकाळ येसि तूं गृहा रे ।
काय जाळुनी नवतिच्या भरा ।

चार मास लावुनि आस न ये घरास
किति त्रास देसि प्रियकरा।
प्राणवल्लभा कोणती तऱ्हा।
करिसि क्रोध कां विरोध करुनि शोध
म्हणसि बोध पाहे अंतरीं।
चुकलें काय मी स्नेहमनोहरा।
वरित ऊठ नवति लूट भरूनि मूठ
पाडुनि तूट जाउं नको घरा।
लाविन मी कधीं प्रीतिचा तुरा।
अहो श्रीमंत करिते खंत ऋतु वसंत
म्हणे 'बलवंत' विषय करी पुरा॥ १॥

आण्णांच्या वेळीं बाजीराव पेशवेपदावरून जाऊन पाऊणशें वर्षांवर दिवस होऊन गेले होते. तरी होनाजीप्रभृति शाहिरांच्या कवनांतला थाट या कवनांत दिसतो. त्याचें कारण हें कीं, पेशवाईच्या कालांत वावरणारे शाहीर व त्यानंतर शंभर वर्षांपर्यंतच्या काळांत वावरणारे लोक-कवि समान संस्कृतींत वाढलेले होते.

संतवाङ्मयाशीं संबंध हा त्या संस्कृतींतला एक भाग होता. आतांच्या काळांतलें कथावाङ्मय बऱ्याच अंशानें रशियन, नॉर्वेजियन किंवा इंग्लिश वा फ्रेंच वाङ्मयावरून स्फूर्त झालेलें असतें त्याप्रमाणें त्या काळांतलें लावणीवाङ्मय संतवाङ्मयावरून स्फूर्त झालेलें होतें असें दिसून आलें तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें वास्तविक कारण नाहीं. पण तें कबूल होण्याला किती अडचणी आहेत. संत व शाहीर यांनीं निर्मिलेल्या वाङ्मयांत शब्द व भाव दोन्ही पुष्कळ वेळां समान असतात. तरीदेखील त्यांच्यामधील सादृश्य मान्य नाहीं. पण शब्दांच्या जागीं शब्द आले पण भिन्न संस्कृतींतला भाव आला तर विपरीत अवस्था प्राप्त होते, हा अनुभव आहे. पण तें नडत नाहीं. याचें कारण म्हणजे सुशिक्षित साहित्यिकानें तशाच समाजासाठीं रचलेलें वाङ्मय विपरीत म्हणणें पत्करत नाहीं. पण अडाणी म्हणून आधींच निराधार शिक्का मारलेल्या शाहिरांनीं मात्र समान संस्कृतींतल्या शिष्टांशीं सलगी करतां कामा नये असा आडमुठेपणाचा वाद विद्वान् घालतात म्हणून हा विचार मांडणें प्राप्त होतें. प्रस्तुत आण्णा किर्लोस्करांच्या लावणीचा परिचय चालू आहे. त्या लावणीचें सादृश्य पूर्ण पटेल असा श्रीज्ञानेश्वरांचा एक अभंग कविता येथें देतों :—

सुमनाचे शेजें विरहिणी विराजे।
शयनीं सुलजे आरळ शेज।

माजयानें हरी मुखकमळ टेकी ।
निळिये अवलोकी कृष्णमूर्ती ।
कमळिणी आमोद सुस्वाद मकरंद ।
चंदनाची अभेद उटी अंगीं ।
कर्पूर परिमळें दिव्य खाद्य फळें ।
ठेवून सोज्वळें वाट पाहे ।

—ज्ञा. अ. गो. ३१४

प्रवासरहित केला

तरुणपणीं घरीं तरुण पत्नी असतां व घरीं कशाची ददात नसतां, तरुणानें दीर्घ मुदतीच्या प्रवासास जाणें म्हणजे, पत्नीला विनाकारण विरहदुःख देणें होय. हा अगदीं साधा भाग उभा करणारें ' वीरक्षेत्री ' कवीचें एक कवन असें—

घरधनी आज जाती प्रवासीं टाकुन मजला सखे घरीं ।
रहाण्याचा कोणी विचार ठरवा सांगुन त्यासी परोपरी ॥ ध्रु० ॥
स्वारी झाली तयार बरोबर उमेदवारही किति असती ।
भर देऊनि सर्वांनीं ठरविलें प्रौढ त्यांमधें कुणी नसती ॥
सर्वहि बाजार पोरपणाचा थोरासी न सल्ला पुसती ।
वाटेल तैसे छंदफंद समवयी मिळुन सारे बसती ॥
अनुकूळ सारे श्रीमंत घरचे म्हणून येऊन सारे घुसती ।
भाऊबंद गणगोत अवघे मतलबांत सारे रुसती ॥
किति समजून सांगते परंतु ऐकत नाहीं जरा भरी ॥ १ ॥

या कवनांत खोल अर्थ शोधण्याचें सुद्धां कारण नाहीं, इतका स्पष्ट देखावा आहे. तो सर्वकालीन व सर्वदेशीय आहे—

ऋतुस्नात नवयौवन असतां ठेवुन जाती सखे मजला ।
कोण दशा तरि होईल माझी यासाठीं जिव गजबजला ॥
नाहीं पुरता विषय भोगिला म्हणून जीव फारच रिझला ।
यासाठीं प्रार्थितें हरघडी हात जोडितें मी तुला ॥
हरगोष्टी पहा उपाय करूनी कांहीं मनीं जरि उमजला ।
निदान ऐसें तरि ठरवावें बरोबर न्यावें तुम्हि इजला ॥
मीही आज सखयासी प्रार्थितें करून विनवणी बहुत परी ॥ २ ॥

हें सखीशीं बोलणें झालें. त्यांत सांगितल्याप्रमाणें आतां खाशांशीं बोलणें—

प्राणपति आपल्यास विनंति करितें ऐका गुणिराया ।
कोणे कार्यालागीं जातां आपण प्रवासीं फिराया ॥
कांहीं निवंत नसून उगिच कां गोडी ही प्रवास करावा ।
मजलागीं घरिं टाकुन जाणें योग्य तुम्हांसि नसे राया ॥
अंगीं नीतिचा पूर मला कां लावितां व्यर्थ झुराया ।
तुम्हांविण मज उणें सर्वही काय करूं घरदारा या ॥
पुढें दिवस आहेत बहुतही मुलुख पहाणें असेल जरी ॥ ३ ॥

नायिकेनें हा युक्तिवाद प्रसंशनीय संयमानें पण चातुर्यानें केला आहे. आपल्या गुणरूपाचा प्रभाव पाडून हें तिला साधलें नसतें असें नाहीं. तें सारें तिनें सखीपाशीं उघड केलें आहे. पण पतीशीं बोलतांना त्याचा चुकूनसुद्धां उल्लेख कवनांत नाहीं, यांत कवीची तिच्या संस्कृतीविषयींची आदरबुद्धि जागी आहे, हें स्पष्ट आहे. या कवनांत भाव हळुवारपणानें दर्शित केला आहे, त्यामुळें कोणी रसग्राही संतुष्ट होतील तर लावणी म्हणून तींत चटका, ठसका शोधणारे आंबट-शोकी ती अगदींच फिकी म्हणून त्याज्य ठरवितील. आपल्याला तें जसें कसें आहे तें पाहावयाचें आहे—

प्रियवचन ऐकून नारिचें करीत विचारासी बसले ।
तंव त्या प्रियेच्या सख्या येउनी वर्तमान सारें पुसलें ।।
नंतर त्या समजावून सांगती विचार कां करतां असले ।
नारीसी या वयांत टाकुन जाणें काय बरें दिसलें ।
रहाण्याचा ठरविला बेत, मग खुषी होउन सारे हसले ॥
प्रेमभरें आलिंगन देउन केली समजूत होते रुसले ।
' वीरक्षेत्री ' धर्मपुरी हिचि कोण करील आज बरोबरी ॥ ४ ॥

प्रवासाचा बेत खरा नव्हताच. तो निवळ रुसव्यांतून निघालेल्या ढोंगाचा होता. त्या रुसव्याला कारण काय तें कळलें नाहीं, पण बहुधा तें आपगरजी पुरुषी-पणाचें असावें. त्या रुसव्यामुळें पुढें उभा राहिलेला विरहाचा प्रसंग व त्या रुसव्याचें कारण या दोन्ही अवस्थांत नायिकेनें आपलें स्थान कसें शुद्ध ठेविलें होतें हें पाहण्या-साठीं ही लावणी एकवार वाचनीय आहे. कारण कोणा तिऱ्हाइताला कळावयाचें नाहीं व कळलें तरी शब्दांत आणणें संस्कृतीच्या कारणानें शक्य नाहीं. तथापि, आहे तें पुष्कळच आकर्षक आहे.

आपगरजी प्रवास

केवळ हौसेनें प्रवास सर्वांना कोठून शक्य होणार ? कांहीं कां, बहुतेकांना तो गरजेमुळें पत्करावा लागतो. पूर्वीं सैनिक नात्यानें मुलुखगिरी होती. तिच्या जागीं

आतां व्यापारी प्रवासी आला आहे. फरक आहे, पण तो तात्त्विक नाहीं. पुरुषाच्या प्रवासानें प्रपंचाची सोय होते हें खरें, पण सहवासाचें सुख अंतरतें हें खोटें नाहीं. केवळ शारीरिक अगर मानसिक सुख बाजूस ठेवूनसुद्धां स्त्रियांना घरीं पुरुष असणें जरुरीचें वाटावें असा काळ होता, व आतांहि तो पूर्णपणें गेलेला नाहीं. निसर्गानें उत्पन्न केलेल्या अडचणी काळाला दूर करतां येत नाहींत. त्यामुळें प्रसंगाप्रसंगानें पुरुषाचा मुक्काम घरीं व्हावा अशी इच्छा कोणत्याहि काळांतल्या गृहणीला होणें हें स्वाभाविक आहे. अशा प्रसंगांत उभयतांचें मनोगत नेहमीं शब्दांत उमटेल तें खरें असें मानणें बऱ्याच वेळां चुकीचें असतें. खऱ्याखोट्याचें मिश्रण हाहि एक काव्यनिर्मितीला अनुकूल प्रसंग होतो. उच्च शास्त्रांतलें 'अस्ति भाति' आणि व्यवहारांतलें 'असतें नसतें' या दोहोंत फरक नाहीं. अशा एका बाजूचें वर्णन एका लावणींत केलेलें पाहण्यासारखें आहे :—

आली प्रलयंगता तुझि ग बुध नाहीं कामाची।
आलीं धन्याचीं पत्रें आम्हांला जलदी जाण्याची ॥ ध्रु० ॥

ही निवळ वास्तविक कविता आहे. पण तिच्याकडे 'अस्ति भाति'च्या इषाऱ्याच्या अनुरोधानें पाहिलें पाहिजे. नायकाला प्रवासास जाणें जरूर झालें असतां 'घरांतून' कांहीं थोडा थांबावा आला. त्याचें निवारण मुलुखगिरीच्या काळांत होत होतें, तसेंच आतांहि होतें. प्रवासांतल्या अडचणींच्या कल्पनेमुळें गृहिणीची कातरता केवळ फसव्या वर्णनानें उडवून लावण्याखेरीज आतांहि अन्य मार्ग नाहीं. नायक सांगतो—

या लष्करचें सुख साजिणी न ये ग सांगाया।
आहे धन्याची दया आम्हावर कृपेची छाया॥
उठून ताजीम देती ठाव पंगतीचा जेवाया।
पोऱ्या खिसमतगार कोतवाल घोडा बसाया।
स्वारी जपुन चाले। नउसे रंगित भाले।
बिटे पटेवाले। हत्ती बिनिवर चाले।
नौबत वाजे कडाक्याची।
नामजाद शिपाई पुढें जिलीब गारद्याची ॥ १ ॥
कर्नाटकचे स्वारीस होतों श्रीमंताबरोबर।
रणसंग्रामीं झटून आंगीं केली तलवार।
ढिगांतून फाटलों आम्ही शिपाई रणशूर।
झाडीमध्यें पिटून घातला पिटून हैदर।
पाहून मनीं चटका। म्हणती त्याला हटका।
शिरपाव द्या जरिपटका।

चौरी अबदागिरी बक्षिस कंठी मोत्याची।
अवंढाचि बोली एक पालखीची ॥ २ ॥

माझ्या जागीं कोणी एखादा आधुनिक कवि असता तर त्याला या वर्णनांत दीर्घजीवी सूट पँट, कातडी बॅग, ऑर्डरी मिळविण्यासाठीं चढाओढ, कांहीं यश मिळविणाऱ्याला मॅनेजिंग डिरेक्टरच्या ऑफिसरूममध्यें मिळणारा चहा, महान् प्रतिस्पर्ध्यांशीं टक्कर देऊन मिळविलेल्या ऑर्डरी, बोनसाच्या वाढीची सूचना वगैरे बाबी दिसत्या, आणि तो त्या कवितेंत ग्रथित करता. कोणी तसें केलेंहि असेल. माझ्या वाचनांत अशी कविता आली नाहीं, म्हणून ही कल्पना म्हणून पुढें करावीशी वाटतें इतकेंच. सर्व थाट बाहेरचा भपका आहे. सकाळ संध्याकाळ मुक्काम बदलणें, जंटलमेन गेस्ट हाउसमध्यें मिळणारा ठराविक साच्याचा कांहींसा शिजलेला खाना किंवा शेवटीं 'अडघूं भाणूं 'चा स्पर्शमात्र आदर हें व असेंच कितीतरी या वर्णनांत आणतां आलें असतें. हें खरेंखोटें उभयपक्षीं माहीत असतें. पण निरुपायानें व्यवसाय म्हणून पत्करलेल्यांत जें कांहीं ओघानें येतें त्याचें स्वागत आम्ही करीत असतों, असें भासविण्याचा हक्क मनुष्याला आहे. आणि येवढ्यावर भागलें नाहीं तर घरचींवर कडाडण्याचा हक्क पुरुषाला विधात्यानें कायमचा दिला आहे. तो त्या विधात्याची बदली झाल्याखेरीज नष्ट होणार नाहीं. पण मी येथें वहावत चाललों आहे. धागा तोडणारा एक लेखक म्हणून माझी प्रशस्ति माझ्या 'पंत 'मित्रांनीं केली आहे. ती खोटी ठरविणें मला मौजेनें देखील शक्य होणार नाहीं. शेवटचा निर्वाणीचा बाण, स्त्रीबुद्धीला प्रलयंगता म्हणून हेटाळणें, तो नायकानें वापरला आहे. शाहिरानें तेथूनच सुरुवात केली आहे. 'स्त्रीबुद्धिः प्रलयंगता ' हा श्लोकपाद मूळ श्रीमद्भागवतांतला. तो मराठी शाहिरींत हा असा आला आहे. अडाणी म्हणून प्रसिद्ध असलेला शाहीर वर्ग औपनिषदिक तत्त्वांना स्पर्श करूं शकतो, इतकेंच नव्हे तर संस्कृत शब्दप्रयोग ठसका निर्माण करण्यासाठीं का होईना, पण अलगद उचलून आपल्या कवनांत चपखल बसवितो हें ध्यानांत ठेवण्यासारखें एक गमक आहे. कमरेवर हात ठेवून दुरून लावणीकाराकडे पाहणारांना हें खटकत नाहीं याचें आश्चर्य वाटतें. असो—

पूर्वींपासून नक्षा चालत आला वडिलांचा।
आणिबाणीच्या वेळीं विडा उचलिला पैजेचा ॥
कटून मरावें खरें असा धर्म क्षत्रियाचा।
कसे रहा म्हणतीस घरीं, डाग लागेल जन्माचा ॥
नाहीं असें कधिं घडलें। यास्तव येणें पडलें।
न कळे कांहीं पुढलें।
होइल गे इतराजी आबरू आमची।
बाकीसाकी गुंतुन राहिली साल मजकुराची ॥ ३ ॥

इंग्रजींत बोलावयाचें तर ' ड्यूटी ' आणि निवळ मराठींत बोलणें असेल तेव्हां ' धर्म ' दोन्ही एकच. त्यांत पुन्हा ' वर ' ' खालीं ' आहेच. हाच संसार – चांगली घसरगुंडी. चांगल्यावाइटाचें मिश्रण असा हा संसार आहे. केव्हां तरी चांगलें आठवतें, घडतें. वाईट तर पुष्कळांच्या वांट्याला आलेलेंच आहे. तथापि, जग ओसाड पडलेलें नाहीं. चांगल्याची जाणीव व वाइटाचा अनुभव हीं दोन्हीं घेत घेत पुढें जाणारा मनुष्यप्राणी असा ' प्रवासी ' आहे. सर्व प्रसंगांत मनाला, जगाला सांगण्याला ' ड्यूटी ' उपयोगी पडते. पण ' ड्यूटी 'वर असलेला टी. सी. अडपझडपीवर नजर ठेवून असतोच. त्यालाहि वरच्यांना ' टीटोस्ट ' करावें लागतें. प्रवासी संरक्षक असला तर बेलवंडीचा भोपळा अथवा राहुरीचें बोर वर पोहोंचवावें लागतें. तेव्हां सारोळ्याच्या माळ्याला खुष ठेवून घरचीला खुषींत ठेवतां येतें. पण या सर्वांची ड्यूटीची परंपरा एक्सलंट म्हणून रिपोर्टांत नमूद असतेच. प्रवासी प्रतिनिधीला घरीं बोलून दाखवितां आलें नाहीं, तरी तीन महिन्यांचीं तुंबलेलीं भत्तेबिलें आणि बोनसची अपेक्षित शिफारस होते न होते यांची काळजी असतेच. लावणींतल्या नायकानें तो भोपळा वर उंचावर नेऊन आपटला आहे. गतवर्षींच्या मोहिमेंतल्या मुशाहिऱ्यांतली बाकी वसूल व्हावयाची तर त्यासाठीं तरी वेळेवर गेलेंच पाहिजे. हें कवन पूर्ण करतांनाचा उल्लेख असा—

कवि म्हणे बाळा बहिरू । गुणिजन सज्जन हे तरू ।
नाथपंथ्याला बहिरू
धोंडी बापू गुणी म्हणे लावणी ही मनीरामाची ।
ज्ञानबळीची फत्ते तलवार रेवडी रावळाची ॥ ४ ॥

ही लावणी होनाजीचा चुलता बाळा बहिरू याच्या फडांतली आहे. ' मनीरामा 'ची म्हणूनहि उल्लेख आहे तो रचणाराचा आहे असा समज आहे. पण तो दृढ होत नाहीं. बाळा बहिरूचा फड तुरेवाल्यांचा होता. त्यालाच ज्ञानबळी असें दुसरें नांव आहे. शके १७९९ मध्यें देऊळगांवचा शाहीर नारूबापू यानें रचलेल्या मुजऱ्यांत त्याला माहीत असलेल्या शाहिरांचीं नांवें ग्रथित केलीं आहेत. त्यांत तुरेवाल्यामध्यें बाळा बहिरूचा उल्लेख आहे. रावळ म्हणजे सगनभाऊचा गुरु सिद्धनाथ रावळ. सगनभाऊला नारूनें तुरेवाल्यांत घातलें आहे. तो ज्ञानमार्गी आहे यांत संशय नाहीं. होनाजी कलगीवाला असावा. पण स्पष्ट उल्लेख नाहीं, म्हणून संदिग्ध बोलणें आलें. नारूनें होनाजी, फंदीबुवा यांना तुरेवाल्यांत घातलें आहे, पण परशरामचा समावेश कलगीवाल्यांत केला आहे. तथापि, यांत लक्षांत घेण्यासारखी बाब अशी कीं, हा शाहीर डफगाणें रचणारा आहे. त्याची चौकसबुद्धि मानली तरी मराठवाड्याच्या उत्तर भागापलीकडच्या शाहिरांची नोंद त्याला करतां आलेली नाहीं. पेशवाईअखेरीस पुण्याकडे गाजलेल्या तमाशांतील लावणीकरांचीं नांवें त्याला माहीत होतीं तीं त्यानें नमूद केलीं आहेत. त्या प्रांतांतल्या

डफगाणेंवाल्याचें नांव त्याला माहीत नाहीं. यामुळें जराशा विवेकानें त्याच्या माहितीचा आधार म्हणून उपयोग करावयास हवा. पण समकालीन स्वजातीयांची खबर ठेवण्याची बुद्धि शाहिरांत होती एवढें तरी त्यांच्या बाजूनें एक महत्त्वाचें प्रमाण मानलें पाहिजे.

रती, चव भावाचा रंग

नुकताच तोळेवारी विकणारा 'वीरक्षेत्री' रंग पाहिला. आतां चव, रतींनीं मोजण्यासारखा मोत्यासारखा रंग पाहावयाचा आहे. खरीं मोत्यें प्रचारांत होतीं तोंपर्यंत त्यासाठीं वापरलें जाणारें वजनप्रमाण लोकांना माहीत होतें. सुरती किंवा हुरमुजी मोतीं असा शब्दप्रयोग होत असे. इराणच्या आखातांतून निघून सुरत बंदरीं हीं मोत्यें येत असत म्हणून तीं नांवें होतीं. त्यांची विक्री करण्याचें वजनाचें शास्त्र बिकट होतें. आकारावरून वर्ग ठरे. तसेंच रंग व दोषांचें न्यूनाधिक्य यांचा सामग्र्यानें विचार होऊन भाव ठरत असे. सोन्याच्या वजनांत तोळा हें जसें एक ठराविक प्रमाण आहे, तसेंच मोत्यांत चव हें ठराविक वजन प्रमाण आहे. मासे-गुंजाप्रमाणें चवाचीं रती, दोकडे अशीं अंशात्मक वजनें असत. सुमारें आठदहा रुपये चवापासून चाळीस-पन्नास किंवा त्याहून जास्त भाव असे. सोन्यांत जशी गुंज हें सर्वांत कमी वजनाचें आरंभींचें प्रमाण आहे, त्याप्रमाणें तंदुल हें मोत्याचें आद्यप्रमाण आहे. पण सोन्याप्रमाणें सरळ पटींत वाढ होऊन त्यापुढचीं वजनें ठरत नाहींत. वर्गाप्रमाणें निरनिराळीं प्रमाणें लागतात. त्यांचें अधिकृत कोष्टक मोतीबाजारांत चालू असतें.

शिवनेरचा शाहीर दुला रखमा यानें वीरक्षेत्रीवर चढ करण्यासारखें कवन रचलें आहे. यांत उभा केलेला देखावा व त्यांत प्रकट होणारे दाखले यांचा मेळ घालणें खरोखर अवघड आहे. एक प्रेमी काल न दवडतां आपणांवर प्रेम करण्या-साठीं प्रेमिकेची मनधरणी करून बोधहि करतो आहे. हें प्रेम आतांच्या सुधारलेल्या मनूंतलें विवाहोद्दिष्ट प्रियाराधन नव्हे, तर व्यवहारांतलें कोणतेंच नातें जेथें लागू शकणार नाहीं असा संबंध ठेवून तो दृढ करण्यावर नजर आहे. असे संबंध राजरोस चालू असण्याचा तो काल होता. 'राजा कालस्य कारणम्' असा ठाम अभिप्राय शोधक विद्वानांचा आहे. या व अशा कवनांच्या वाचनानें चालू नीतिव्यवहाराचे नियम मोडले जातील असा कांगावा होईल हें लक्षांत ठेवून हें कवन अवलोकनांत आणण्याची शिफारस मी करीत आहें :—

सखे छबकडे, कर वचनाचा मान।
दे सल्ला एकदां नको करूं अनमान। ध्रु०।
सोन्यासारखे दात कण्या केले।
परि नाहीं कांहीं शेवटास फळ आलें।

गडे थकला जीव करतां कालेवाले।
परि नाहीं घाम दगडा पाझर आले।
तुज काय रुसावे नशिबाचे ताले।
हा इष्क हारमतवाले।
तूं दो डोळ्यांची धर मुरवत कांहीं।
जाईल उद्यां आंब्याची सराई।
वाहती गंगाजळ हात धुवुन घेई।
कर भली भलाई फडकवि कीर्तन निशाण।
तुजपुढें काय ती मोहोना म्हणती सुजाण ॥ १ ॥

दुलाचें हें कवन. तो दुल्ला नव्हे; विष्णुसहस्रनामांतील दुर्लभ या नांवाचा आहे. मराठेशाहीच्या मध्यांत दुर्लभजी मोरे या नांवाचा सरदार उत्तर कोंकणांत कामगिरीवर होता. ही दातांच्या कण्यावरून चालविलेली आळवणी कोण काय हेतूनें कोणाची करतो आहे तें पहिल्या कडव्यावरून स्पष्ट होत नाहीं. यासाठीं पुढचें दुसरें कडवें पाहावयाचें :—

पहा दुरवर बारिक नजर करून पुरती।
कट्टू काळ दिवस वाइट कठिण वाहाती॥
नको सखे घालवूं लांबणीवरती।
'कर आजचें आतांच' कबिरादिक म्हणती।
जर झाली बयाची नजर काकरती।
तिथें कांहीं चाले मग ढाळ किंवा ती।
शरिराची सारी शुद्धबुद्ध राहिल कीं।
शूळ वामवेदना प्राण जाइल कीं।
मग जिथिल तिथें सारें हें राहिल कीं।
नको अंतकाळीं वासना फजिती हें जाण।
सांगती गितेमधिं अर्जुनासी भगवान ॥ २ ॥

मनुष्याचें जीवन क्षणभंगुर आहे. जें कांहीं साधेल तें साधण्याची तांतडी करावी असा व्यावहारिक उपदेश केला जातो. 'आज करना वो अब कर' असा कबिराचा दाखला आहे. 'अंते मतिः सा गतिः' हा गीतेचा सिद्धान्त आहे. हें सारें ठीक आहे. हा रोख कोणाकडे आहे हें कवि अजून उलगडूं देत नाहीं. कलींतलें मान प्रेमी असो कीं प्रेयसी असो दोघांनाहि सारखेच लागू. पुढें आणखी कांहीं सुगावा लागतो काय ?–

संसारीं जोड हीच भली कीं बुरी दोन।
यापरिस आणिक तिसरी ती सांगे कोण।

आढि सोड मनांतिल गुळणी दे टाकून ।
येउं दे दुधाची उकळ कळि दे खुलोन ।
पहा शारदेची मूळ कथा ग्रंथ वाचोन ।
वैधव्य तिला कां कारण सांगते कोण ।
पहा पुनः जन्म घेणें या नशिबाला ।
यास्तव आतांच करून घे बोलबाला ।
चालवी प्रीत स्नेह राखुन आबाला ।
नको मारुं उरिं गडे भाला दे जिवदान ।
करि तृषाशांत जळ पाजुनी वांचवी प्राण ॥ ३ ॥

शाहीर रामजोशी यांच्या ‘ भला जन्म हा तुला लाधला, नरनारायण गडी। करुन घे सार्थक तरिच मानवकुडी। ’ या कवनाची आठवण होते. तूं माझ्याशीं व्यभिचार कर म्हणजे तुला मला शाश्वत शांति मिळेल असें व्यावहारिक ‘ प्रपोजल ’ करणारा हा निर्लज्ज मनुष्य असला पाहिजे असा शेरा बसेल, ही जाणीव मला आहे. ‘ फडकावी कीर्तन निशाण ’ म्हणजे जगांत कीर्ति होईल असें कांहीं करण्यासाठीं ही आळवणी चालू आहे. तो आप्त व प्रियकर अशा दोन्ही भूमिकेवरून बोलतो आहे हें या कवनांत विशेष आहे. येथें पुनः ‘ अस्ति भाति ’चीं जोडी आली. ‘ भली किंवा बुरी ’ ही मराठा बोली. बोललेलें भलें तरी असेल किंवा बुरें तरी असेल. जें कांहीं आहे तें पत्करणें किंवा धिक्कारणें इतकाच प्रश्न आहे. कवीनें येथें निर्णयाची जबाबदारी ज्याची त्याच्यावर सोंपविली आहे. आधुनिक साहित्यिक तरी दुसरें काय करितात ? शारदेच्या कथेचा दाखला उलगडून पाहाव-याचा. ही देवलांच्या नाटकांतील शारदा नव्हे, तर स्कंद पुराणांतली कथा श्रीधर-स्वामींनीं शिवलीलामृताच्या १० व्या अध्यायांत सांगितली आहे, तींतली मुख्य नायिका. कथा अद्‌भुत आहे असें मी म्हणत नाहीं. पण असाधारण मात्र खास आहे. शारदेच्या पतीला दोन बायका होत्या. तिनें नवऱ्याचें प्रेम संपादून सवतीचा पुष्कळ छळ केला होता. नवरा सर्पदंश होऊन मेला. त्यानंतर एका अंधऋषीनें तिला ‘ सौभाग्यवती पुत्रवती भव ’ असा आशीर्वाद दिला. वास्तविक स्थिति समजल्यावर शिवभक्ति विधियुक्त करावयाचा उपदेश करून व आशीर्वाद खरा होणार असें निर्धारयुक्त सांगून साधु गेला. शारदेला शिवदीक्षेनंतर स्वप्नांत गर्भधारणा झाली, व या पूर्वीच्या जन्मांतील पतीचें दर्शनहि झालें. अशी कथा आहे. कवीनें हें वैधव्य शारदेला कां आलें याचें कारण कोणी सांगत नाहीं असा प्रश्न उपस्थित केला आहे. तिचें कर्म तिच्या मार्गांत आडवें आलें आहे, व तें या जन्मांत तिला नडलें आहे. म्हणून शक्य तों लवकर आत्मकल्याणाचा मार्ग चोखाळणें चांगलें असा कवनांतला भाव आहे.

नायिकाहि चतुर आहे. तिचा जबाब या साध्या उलगड्यापेक्षां पुष्कळ सरस आहे. ती म्हणते:—

ऐक तूं सख्या सज्जना सगुणराशी ।
आम्हा स्त्रियांची रीत आहे कैसी ।
मनिं हेत खरा रत व्हावें परपुरुषीं ।
दावितों भाव वरकांती या जनांसी ।
मी इष्कबाज इष्काची गुणहंसी ।
नव्हे 'शित म्हणतां भूत' लागे तशी गौशी ।
भक्तिच्या ऋणीं देवता जशी धावे ।
तशि झालें सख्या अंकित मी मनोभावें ।
दुला रखमाचे छंद रसिक गावे ।
चव रती मोती वजनांत जव्हेरी मान ।
गुण घेति गाति गुणी सखाराम खूब छान ॥ ४ ॥

या कडव्यांत प्रेयसीनें आपलें 'नारित्व' प्रकट केलें आहे. हा भाव शुद्ध स्त्रीच धारण करूं शकते. पुरुषांना, अथवा बायकी पुरुषांना तें साधत नाहीं. पुरुषी बायकांना तर नाहींच नाहीं. नारिभावच शेवटीं पूर्ण आत्मसमर्पण करूं शकतो. निसर्गांतसुद्धां तीच खूण विधात्यानें राखिली आहे. पुरुषी थाटांत म्हणजे दैहिक बलाच्या सामर्थ्याचा प्रभाव हठयोगानें पाडून शून्यांत अडखळून पडतां येतें. त्याची मजल 'पर'पुरुषापर्यंत जात नाहीं. तेथें पोहोंचावयाचें तर नारीभाव उत्पन्न झाला पाहिजे, किंवा त्याशीं समान असा वत्सभाव आला पाहिजे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात तेंच खरें. 'तो प्रिया मी कांतु'. हें गूढांतलें गूढ तोळ्याच्या भावापेक्षां रतीच्या भावानें व्यवहारण्यासारखें आहे, असा आविर्भाव शाहीर दुलानें आणला, तो यथार्थ असें मी म्हणतों. मग दुसरे कोणी कांहीं म्हणोत.

या कवनांतलें गूढ वास्तविकपणें पहिल्या चरणांतील शब्दांतून उलगडल्यासारखें आहे. 'सखे छबकडे' असा संबोधनात्मक शब्दप्रयोग कवीनें केला आहे. छबकडे या शब्दांत ग्राम्य किंवा हीन अर्थ निघतो खरा. पण तसाच कांहीं उच्च अर्थहि निघतो. छबी म्हणजे छाया. दर्शनांत जें प्रतीत होतें त्याला छाया असें उपनिषदांत म्हटलें आहे. कठोपनिषदाच्या पहिल्या अध्यायाच्या तृतीय वल्लींत पहिला श्लोक असा आहे—

ऋतं पिबन्तौ सुकृतस्य लोके। गुहां प्रविष्टौ परमे परार्धे।
छायातपौ ब्रह्मविदो वदन्ति । पंचाग्नयो ये च त्रिणाचिकेताः ॥ १ ॥

शुभकर्मांचें फलस्वरूप अशा मनुष्य शरीरांत परब्रह्माच्या उत्तम निवासस्थानांत, बुद्धिरूप गुहेंत लपून असणारीं आणि सत्याचें पालन करणारीं दोघें—छाया

व प्रकाश म्हणजे प्रतिमा व तेज हीं परस्पराशीं संलग्न अशीं असतात. छाया म्हणजे सावली नव्हे तर रूप प्रतिमा, आणि तप म्हणजे तेज अशा अर्थानें उपनिषदांत हे शब्द वापरलेले आहेत. छविः हा अशा अर्थाचा शब्द रघुवंशांतहि आला आहे —'हिमकरोदयपांडुमुखच्छविः'. छबि हें त्याचें हिंदी रूप. छबकडी हें मराठी विशेष सलगी दाखविणारें ग्रामीण रूप. तप् धातूचा अर्थ प्रकाशणें असा आहे. म्हणजे रूप-प्रकाश मिळून जें तें 'छायातपौ.' ब्रह्मतत्त्व स्वयंप्रकाश आहे. तेव्हां त्याच्या प्रतिमेला स्वतःचेंच तेज आहे. येथें हिंदी भाषेंतली ठुमरी आठवते.

छबि दिखला जा, सावरियां
ध्यान लगो मोहे तोरा रे ॥

आत्मदर्शनांत दिसतें तें हें. म्हणून त्याबद्दल संतवाङ्मयांत वारंवार अपेक्षा प्रकट झालेली दिसते. **सुकृताच्या** बाहुल्यावर आवड अवलंबून, व नंतर दर्शनसुलभ.

बहुत सुकृतांची जोडी । म्हणून विठ्ठलीं आवडी ।

नागपूरची लावणी

मी स्वतः पुणें प्रांतांत राहणारा असलों तरी शायरीचा मक्ता कांहीं त्या प्रांताला दिलेला नाहीं. भंडाऱ्यापासून कारवारपर्यंत सर्व महाराष्ट्राचा तो हक्क आहे. मागें पैठणापर्यंत व माहूरगडापर्यंत मीं वाचकांना नेलें आहे. आतां त्याच्याहि पलीकडे पूर्वेस नागपुरास जाणें आहे– 'तुका म्हणे कोणी भेटो माझ्या जातीचे.' मधें उमरावतीस मुक्काम करावयास पाहिजे. तेथें आपल्या कवनाला निःसंकोचपणें 'लावणी' म्हणणारे मान्यवर कवि आहेत. त्यांची ती तशी कविता मीं ऐकली आहे, पण हस्तगत नाहीं. आणखी एका प्रसंगांत म्हणजे पोवाड्यांच्या परिचयांत पुनः वेळ येईल. नागपुरास शाहीर असे 'बोबडे' होऊन गेले. लावणी रचणारे कवि महाराष्ट्रांस आतांहि आहेत. तें सर्वकालीन देणें आहे, पण आपण रचलेलें कवन 'लावणी' आहे असें सांगण्याला ते कचरतात. त्याचें कारणहि आतांपर्यंतच्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानीं आलें असेल. पण वऱ्हाडी नागपुरी खाक्या निराळा असेल. तसें सांगण्याच्या या गुणामुळें पुण्याकडे त्या रीतीची हेटाळणी जुन्या काळापासून होत आली आहे. 'कविभूषण' आण्णासाहेब खापर्डे विद्यमान आहेत. पण 'बोबडे' मात्र कवीच्या वतनदारीच्या स्थितींत चटका लावून मागेंच गेले. त्यांच्या लावणीचा नमुना दाखविल्याखेरीज हें लिखाण पुरें करणें योग्य होणार नाहीं. कवीनें स्वतः त्यावर बोधाचा छाप मारून ठेवला आहे. तो 'नारी तरुणाची संपदा' असा आहे. 'नारी' भावाचा परिचय चालू आहे. म्हणून हें येथें प्रासंगिकच होईल :—

नको ग मारूस मुरके वरिवरि तुझे नैन फिरवी इकडे।
जरा तोल सांभाळी पडतील नाजुक मानेचे तुकडे।
तुजवर आम्हुची बहाल मर्जी नजर करी स्थिर जरा तरी।
मधुर हासुनी मधुर बोलुनी पडदा मधला दूर करी।
खेळ वांकड्या नजरेचे हे अद्भुत जादूची करणी।
वर खालीं हृदयास नाचवी तुझ्या नैनांचें पाणी।
कमान ओढुनिया भिवयांची नैनांच्या कोपऱ्यांतुनी।
अचुक निशाणीं नेम मारिसी अद्भुत नैनांचें पाणी।
पुरे लपंडावाचा आतां नजरा-नजरांचा खेळ।
कशास हा संकोच होऊं दे भरल्या दृष्टीचा मेळ।
उदया आला हृदयाकाशीं प्रणयाचा रजनीकांत
अनुरागाची छटा पसरली लाली आली गालांत।
पटली आंतिल खूण परस्पर पारख आम्हां हृदयाची।
कशास 'उत्तर दक्षिण' एक साक्ष मनोमन प्रेमाची।
किति लाजावें किति मुरडावें किति हृदय तें लपवावें।
पुरे मूक संदेश एकदा रहस्य सारें उकलावें।
झाली प्रस्तावना, पुरे, मुख्य विषय तो या पुढती।
जें नैनांनीं सूचित केलें हृदयें करूं तें उघड रितीं।
दृष्टभेट ही इथें संपवुनि गांठी घालूं हृदयाच्या।
बहिरंगाचा परिचय झाला गोष्टी बोलूं अंतरिंच्या।
डोळ्यांना आवडले डोळे हा दृष्टीचा महोत्सव।
नयनिं पेरिलें हृदयिं उगवलें घेऊं दे त्याचा ठाव।
हृदयाची झालेली चोरी लपेल हृदयामधुनी का।
पुरे लाज संकोच एकदा जबाब त्याचा देइ निका।
तुज आवडलें जरि हृदय हें असेंच सेवेसी नजर।
तुझें हृदय तरि दे मज मजला प्रसाद मानिक मोदकर।
अदलाबदली दिसते परि हा एक जीव दो हृदयांचा।
द्वैताचा अद्वैत भाव हा आत्मसमाधि प्रेमाचा।

♣ ♣

प्रकरण पांचवें

शाहिरींतलें कीर्तिकाव्य

आतां शाहिरी वाङ्मयापैकीं तिसऱ्या भागाचा विचार करावयाचा. यांत पोवाडा, प्रशस्तिपर कवन इत्यादि प्रकारांचा समावेश आहे. पोवाड्याची व्याख्या व व्याप्ति यांचा विचार आरंभीं केलेला आहेच. आतां स्वीकारलेल्या ' कीर्तिकाव्य ' या शब्दाची थोडी छाननी करून त्यांत प्रकट होणारे घटक नमुन्यादाखल दाखविणें आहे.

कीर्ति या शब्दांत कृति या शब्दाचा धात्वर्थ ध्यानांत ठेवणें जरूर. कृति बरी, वाईट कशीहि असूं शकेल. त्यांत निवड करून जें कवनांत ग्रथित करावेसें वाटलें त्यावर शाहीर रचना करतात. फक्त मराठीमधील कीर्तिकाव्यासंबंधानें हें बोलणें लागूं व्हावें आणि इतर भाषांत रचल्या गेलेल्या तत्सदृश वाङ्मयप्रकाराकडे निराळ्या नजरेनें पाहण्याला पुरेसें कारण नाहीं. काव्य रचलें जाण्यासारखी कृति ती सुकृति असावी, असा सर्वसाधारण अर्थ अभिप्रेत आहे. सुकृति या शब्दाची फोड अर्थासाठीं करावयाची झाली तर दीर्घ प्रवास करावा लागेल. निरनिराळ्या दृष्टींनीं बरें, वाईट भिन्नभिन्न परिस्थितींत ठरतें. पण शेवटीं कांहीं एक निरपवाद असें गमक सांपडतें.

भारतीय वाङ्मयांत प्रथम शोध करण्यावर माझी नजर आहे. म्हणून त्या दिशेनें पाहिलें असतां ऐतरेयोपनिषदांत (अध्याय १ खंड २ मंत्र ३)

पुरुष वाव सुकृतम्

असा उल्लेख सांपडतो. त्याचा प्रसंग असा :—परमेश्वरानें सर्व सृष्टि निर्माण केल्यानंतर शेवटीं पुरुष म्हणजे मनुष्यप्राणी निर्माण केला. तेव्हां अग्नीनें

वाक् रूपानें, वायूनें प्राण रूपानें, सूर्यदेवतेनें नेत्रांत याप्रमाणें निरनिराळ्या इंद्रियांत प्रवेश केला. आपल्याला योग्य आश्रयस्थान मिळालें असें पाहून त्या देवतांनीं त्या मनुष्यशरीराला उद्देशून 'सुकृतम्' असें म्हटलें. परमात्म्यानें मस्तकाच्या वरच्या भागांत छिद्र पाडून त्यांतून प्रवेश केला. हा मनुष्यदेह याप्रमाणें पूर्ण झाला असतां आपणच हें सर्व सृष्टिकार्य केलें असा भ्रम त्याला झाला. सर्वव्यापी परब्रह्माचा साक्षात्कार आपणाला झाला असें त्याला वाटलें. 'स एतमेव पुरुषं ब्रह्म तदहमपश्यत्' यावरून हें पाहणारा आदिपुरुष इंद्र असें नांव पावला. तें नांव परोक्ष पद्धतीनें रूढ झालें. हा आदिमानवचा भ्रम कसा दूर झाला तें केनोपनिषदांत दाखविलें आहे. तेथें भगवति उमेमुळें त्याला आपला देह म्हणजे आपण नव्हे तर त्यांत असणारा ब्रह्माचा अंश तो आपण अशी समज मिळली. देह हा शक्तिहीन आहे. त्यांत असणारें ब्रह्म हें सर्वशक्ति आहे असा समज पडल्यामुळें इंद्राचें नांव सार्थ झालें. मनुष्यदेह ही सर्वांत चांगली कृति, तेव्हां ती उत्तम वस्तु प्राप्त झाली असतां त्या देहाविषयींच्या वृथा अभिमानांत गुंतून पडणें साहजिकपणें अयोग्य. तो अभिमान नाहींसा होऊन आपलें सत् स्वरूप आपण जाणणें हेंच मनुष्याला योग्य. त्यासाठीं परमेश्वरानें तो उत्तम देह बनविला. देहाभिमानामुळें मनुष्याला परतंत्रता आली ती दूर करणें हें मनुष्यजन्माचें अंतिम. स्वातंत्र्यप्राप्तीचा पर्याय शब्द मोक्ष आहे. जाणणें म्हणजे तद्रूप होणें. मनुष्य देह व त्याच्यासंबंधानें आगंतुक आलेले अभिमान आणि आसक्ति यांच्या मोहांतून पलीकडे जाऊं शकणारा तो वीर. अशा वीरांचे पोवाडे गाइले गेले जाणें हें योग्य. तशी कांहीं कृति झालेली असली तर तिची कीर्ति पसरणें ओघानें आलें. हें निवळ शाब्दिक शास्त्रज्ञान नव्हे. प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं तें स्वभावतः आहेच. त्याच्याकडे मनुष्याचें मन वेधणें हें सुद्धां पूर्वसुकृतीचें फल आहे.

बहुत सुकृताची जोडी
म्हणुन विठ्ठलीं आवडी.

—*ज्ञानेश्वर*

विठ्ठल हें आत्म्याचें प्रतीक नांव आहे. अशा रीतीनें आपल्या स्वतःच्या देहविषयक स्वार्थाला न लालचावतां, म्हणजेच मनोविकारांना ताब्यांत ठेवून केलेली प्रत्येक कृति सुकृति ठरते. व्यावहारिक नीति या तात्त्विक विचारावर आधारलेली असणें आवश्यक. त्याचप्रमाणें व्यवहारांत मान्य झालेले सद्गुण म्हणजे स्वदेशप्रीति, स्वामिकार्यावर निष्ठा इत्यादींच्या विस्तारांत हें गमक मुळांत असल्यानें विरोध टळतो. केवळ देहाविषयीं बेफिकिरीमुळें झालेली कृति सुकृति ठरूं नये. ती आततायी मनुष्यहि करूं शकतो. पण कोणत्याहि पद्धतीनें तिला मान्यता मिळूं शकत नाहीं.

मनुष्याला असा बहुमोल जन्म मिळाल्यामुळें त्याचा शेवट होण्याची त्याला सर्वांत जास्त भीति वाटते. ती भीति ज्याला वाटत नाहीं, तो शूर. जो प्रथम भ्यालेला त्याच्याकडून निर्भयपणें कृति होऊं शकणार नाहीं. कर्णाला शल्यानें जी वारंवार टोचणी केली, तिला कर्णानें उत्तर दिलें त्यांत हें गमक सांपडतें.

भ्याडास भेडसावी मी भ्याया उपजलों नसें कांहीं।
विक्रम यश साधाया झालोंसे चाल पथ पुढें पाही ।।

मोरोपंत–कर्णपर्व

जो भ्याड असेल तो अशा भीतिदायक दृश्यानें भिऊन स्वीकृत कार्यापासून मागें सरेल. मी मरणाला भीत नाहीं अशा आशयाचें उत्तर कर्णानें दिलें आहे. म्हणजे अनासक्ति व निर्भयता या दोहोंच्या साहचर्यानें निर्माण झालेल्या कृतीचें कौतुक होणें ओघानें आलें. या कौतुकाचें प्रकटीकरण म्हणजेच पोवाडा.

अशा वाङ्मयीन कृति बहुधा सर्व विकसित भाषांत आहेत. मराठी वाङ्मयांतहि त्या आहेत. येथें त्यांपैकीं फक्त शाहिरी वाङ्मयाचा विचार चालू आहे. यासाठीं तेवढ्यापुरतें मर्यादित बोलणें भाग आहे.

मराठी पोवाड्यांचें दर्शन दोन प्रकारांनीं घडूं शकतें: वाचनानें किंवा श्रवणानें. वाचनाला आतां पुष्कळ साधन उपलब्ध झालें आहे. त्याचा तपशीलवार उल्लेख करण्याचें कारण उरूं नये असें वाङ्मय श्री. यशवंत नरसिंह केळकर यांनीं निर्माण करून ठेविलें आहे. त्यांचीं (१) ऐतिहासिक पोवाडे भाग १ व २ हीं पुस्तकें अत्यंत उपयोगी अशीं झालीं आहेत. त्यांचा हवाला मी मोठ्या आनंदानें देतों. त्या दोन्ही पुस्तकांत मिळून ७८ पोवाडे आहेत. हे पोवाडे ऐतिहासिक प्रसंगांत घडलेल्या कृतींवर रचलेले आहेत. त्या त्या कृतींचा संदर्भ, प्रचारांत आतां नसलेल्या शब्दांचे अर्थ आणि कांहीं खुलाशाच्या टीपा यांमुळें हीं दोन्हीं पुस्तकें अढळ स्थान मिळवून बसलीं आहेत. आतां कोणी नव्यानें तें प्रचंड उद्योगाचें कार्य करूं म्हणेल तरी तें तसें साधणार नाहीं.

वाङ्मयांत स्वीकृत निश्चित गमक तंतोतंत सांपडण्याचा निर्वाळा देतां येत नाहीं. त्याचें मूल्यमापन स्थूल मानानें करावें लागतें. पोवाड्याच्या बाबतींत हा अनुभव येईल. तथापि मुख्य तत्त्वावर नजर ठेवली म्हणजे झालें.

आत्मज्ञानाच्या वाङ्मयाचा प्रसार करण्याला जें कारण समर्थक ठरतें, तेंच अशा कीर्तिकाव्याच्या रचनेंत लागू करावयाला मला अडचण वाटत नाहीं.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनाः।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते।

भगवद्गीता ३ : २१

या श्लोकाचा लो. टिळकांनीं केलेला अर्थ असा:— श्रेष्ठ (आत्मज्ञानी कर्मयोगी) पुरुष जें जें करतो तें तेंच इतर म्हणजे सामान्य लोक करीत असतात. तो जी गोष्ट प्रमाण म्हणून अंगीकारतो, तिलाच लोक अनुसरितात.

यावरून सुकृतीचा आमच्या संस्कृतींतल्या अर्थाविषयीं शंकेला जागा राहूं नये असें मला वाटतें. तानाजीसारख्या वीराची कृति वर्णितांना तुळशीदास शाहिरानें शेवटीं अशी सूचना केली आहे—

पोवाडा गात्याला उद्राण ऐकत्याला घडो पुण्य।

या चरणांतला उद्राण हा शब्द उद्धरण या शब्दाचें गांवठी रूप आहे.

पोवाडा रचणाऱ्याची अवस्था उन्नत झाली होती तेव्हां कथन त्याच्या मुखांतून निघालें. अर्थात् कथानायकानें तशाच कांहीं उन्नत अवस्थेंत जें कांहीं केलें तें पोवाडा करण्यासारखें असलें पाहिजे. आत्मज्ञानप्राप्तीचा मार्ग दाखविण्याचें कार्य करतांना त्या ज्ञानाशीं तद्रूप होणें जरूर. श्रीज्ञानेश्वर सांगतात :—

अनुभवी गुरुपुत्र तोचि स्वयें बुझला।
ऐकत्या उद्धरणा गायक सहज उद्धरला।

—ज्ञा. अभंग अनुक्रम ४१४

पोवाड्याची फलश्रुति सांगतांना शाहीर तुळशीदासानें नेमकें हेंच डोळ्यांपुढें ठेवलें आहे, असें वाटण्याइतका सारखेपणा येथें स्पष्ट आहे. यावर जास्त विवेचनाची जरुरी वाटूं नये.

ज्या कृतींत स्वतःच्या शरीरविषयक आसक्तीचा त्याग असेल अशा कृतीची प्रशंसा होणें स्वाभाविक. येथपर्यंत मजल आली. आतां हा कस लावून मराठी पोवाड्यांतले नमुने दाखवावयाचें काम करणें शिल्लक आहे. आरंभींच्या अभ्युत्क्रोशांत इतका पूर्ण अर्थ येतो असें मी म्हणत नाहीं, पण इंद्रानें कांहींतरी विशेष कृति केली म्हणून त्याच्या यशाचें गायन विश्वेदेवांनीं केलें. त्यांत इंद्र हा स्वयंप्रकाश, राज्यपालक, क्षत्रियांची परंपरा उत्पन्न करणारा, असुरांचा घातक असा वेदरक्षक हीं बिरुदें मुख्य आहेत. ज्या लोकसमूहांत इंद्राचें स्थान अत्युच्च असें होतें त्यांतील श्रेष्ठींच्या तोंडाचें हें स्तवन सर्वदेशीय अथवा सर्वकालीन आहे असा आग्रह माझा नाहीं. नवीन नवीन विचार उत्पन्न होतात व नष्ट होतात. पण त्यांची जखडबंदी समाजानें सारखी पत्करली तर शेवटीं अनवस्था प्रसंग निर्माण होतो. राजकीय मतप्रणालींत हा अनुभव स्पष्ट येतो. पण त्यासाठीं अडून बसण्याचें कारण नाहीं. समन्वयानें कांहीं उलगडा होऊं शकतो, इतकें तरी खास खरें आहे.

पोवाड्याचा विषय होणारी कृति कशी असावी याचा विचार करतांना प्रारंभींच अडचणी आल्या. त्या इतर विचार करणाऱ्यांना भासल्या अगर नाहींत तें मला माहीत नाहीं. पण येथें दृष्टींतच फरक आहे हें खरें कारण आहे. पोवाडा झाला आहे, आतां त्यांत सरसनिरस ठरवावयाचें येवढेंच कार्य मला करावयाचें असतें, तर तें सोपें झालें असतें. त्यांतहि कष्ट किती आहेत याची प्रचीति श्री. यशवंतराव केळकरांच्या पुस्तकांत येते. राजकीय इतिहास घडत असतांना आलेले निरनिराळे सामूहिक किंवा व्यक्तिगत विशेष कृतीचे प्रसंग घडले. त्यांवर शाहिरांनीं पोवाडे रचले. ते रचनाकार आतां साहित्यिकांत समाविष्ट केले जात असले तरी त्यांतले सर्वजण सर्वकालीं तात्त्विक गमकांवर दृष्टि खिळवून आपापलें साहित्य निर्माण करीत होते असा वाद मी घालीत नाहीं. त्याचप्रमाणें इतरांनींहि प्रखर तात्त्विक कसोटी लावून पाहण्यानें कांहीं अर्थनिष्पत्ति होणार नाहीं, येवढेंच माझें म्हणणें. मनोविनोद व मनोरंजन यांतील भेद तात्त्विक कसोटींत कांहीं प्रमाणांत तरी टिकूं शकतो. हें यापूर्वीं पाहिलें आहे. म्हणून सुरुवातीला मी अवकाश घेण्याची कल्पना सूचित करून ठेविली आहे.

मराठी वाङ्मयांतलें किंवा हिंदीसारख्या इतर भारतीय भाषांतील कीर्तिकाव्य विशेषेंकरून वीरांच्या यशोगानासंबंधीं आहे. वीरांना आपलें कर्तृत्व दाखविण्याला योग्य संधि युद्धांत अथवा संघर्षांत मिळते. शत्रुविजय करणाऱ्या वीरांची उपमा मनोविजय करणारांनाहि दिली जाते.

" वीर विठ्ठलाचे गाढे " ॥

या चरणांत विठ्ठल पक्षाच्या प्रतिपक्षावर कोणत्या तरी बलानें जय मिळविणारांचें कौतुक केलें आहे. हें बल शारीरिक अथवा केवळ बुद्धीचें नाहीं, तर आत्मिक आहे. त्यांत यशस्वी होणारा स्वतःची उन्नति करून घेतो व इतरांनाहि तसेंच करण्याला साहाय्य होतो. ऐतिहासिक प्रसंगांतील वीर स्वतः उन्नत होऊन स्वकार्य करतो. तेंच इतरांनाहि मार्गदर्शक होतें. म्हणून अशा कवनांची जरुरी पटते. या कवनांचा घोष वारंवार कानावर येण्याचेंहि प्रयोजन आहे. एकवार अद्भुत कार्य करणारी व्यक्ति जर कार्य करून झाल्यावर स्वस्थ बसेल तर त्याच्या अंगच्या शक्तीचा उपयोग कांहींच नाहीं. म्हणून ती शक्ति कार्यान्वित करणें हाहि अशा अभ्युत्क्रोशांतला एक मुख्य हेतु आहे. प्रत्येक व्यक्तीच्या अंगीं आत्मज्ञान व आत्मबल हीं असतात, पण तीं सुप्त स्थितींत असतात. त्यांना जागें करणें हें ज्ञानवंतांचें कार्य असतें. गीतातत्त्वोपदेश याच हेतूनें व याच मार्गानें झालेला आहे. वाङ्मयांत एका विशिष्ट अंगाची उणीव आहे, ती भरून काढण्यासाठीं नव्हे. आज्ञेबरहुकूम अथवा विद्वत्ता मिरविण्यासाठीं निर्माण झालेलें साहित्य तें खरें नाणें नव्हे असा अभिप्राय आतांहि प्रसंगानें प्रकट होतो. संतांनीं सामान्य जनांच्या कल्याणाच्या

तळमळीनें आपलें वाङ्मय निर्माण केलें. पुस्तकविक्रेत्याच्या नजरेनें तें झालेलें नाहीं. ही सुप्तशक्ति जागृत करण्याचीं उदाहरणें पुराणग्रंथांत आहेत. प्रल्हाद, ध्रुव व हनुमान यांचीं उदाहरणें येथें नमूद करण्यासारखीं आहेत. साहित्याची चर्चा ही अशा रीतीनें करण्यांत मुरारीचा पंथ मीं स्वीकारला आहे असा आक्षेप निघाला तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. माझी नजरच निराळी, म्हणून हा प्रसंग उद्भवतो. त्याला माझा नाइलाज आहे. माझी पूर्वतयारी निराळी असती तर अशा अवघड अवस्थेंत स्वतःला मीं घालून घेतलेंच नसतें.

आतांपर्यंत पोवाडे रचणाऱ्यांच्या भूमिकेचा विचार झाला. त्या कवनांतली प्रधान व्यक्ति अथवा साहित्यिक भाषेंत बोलावयाचें तर त्या कथेंतली नायकव्यक्ति पोवाडा होण्याइतक्या उंच पातळीवर कोणत्या अवस्थेंत कृति करूं शकते हेंहि पाहिलें. आतां कांहीं उदाहरणांनीं हें विशद करावयाचें आहे.

पोवाड्याच्या संबंधाचा विचार करतांना स्थल, काल, परिस्थिति या बाबींचा विसर पाडण्यानें कांहीं विशेष साधणार नाहीं. तसेंच उलटपक्षीं त्यावरच लक्ष केंद्रित करण्यानेंहि कांहीं निराळा अर्थ निष्पन्न होणार नाहीं. या कारणामुळें सध्यां उपलब्ध असणाऱ्या पोवाड्यांकडे मी निराळ्या नजरेनें पाहात आहें. कोणाचाहि अधिक्षेप माझ्या लेखनानें न व्हावा अशी इच्छा आहे. म्हणून असें मोघम बोलणें मला भाग पडत आहे. निरनिराळे राजकीय सत्ताविषयक संघर्ष हे मनुष्याच्या अंगचे उच्च दर्जाचे गुण प्रकट होण्याला संधि देतात. त्यांत संघर्ष ज्यांच्यामध्यें होतो त्या समूहाच्या बाजूची पाहणी न करतांहि व्यक्तींनीं प्रकट केलेल्या सद्‌गुणांची पारख करणें शक्य आहे. भिन्न पक्षांच्या हितसंबंधांत न्याय देण्याचें कार्य प्रथम करून न्याय्य बाजूकडेच सर्व कांहीं सत् असलें पाहिजे, असा आग्रह धरल्यानें कीर्तिकाव्याचा परामर्श करून देतां येणार नाहीं व करून घेणेंहि योग्य नव्हे. मोगली सत्तेचें उच्चाटन व स्वातंत्र्य या दोन बाजू शिवछत्रपतींच्या कार्यांत आहेत. तो प्रसंग चालू असतांना अनेक व्यक्तींच्या अंगच्या सद्‌गुणांना कसोटी लागली असली पाहिजे. महाभारत ग्रंथांत दोन बाजू कमीअधिक बलाच्या दाखविल्या आहेत. त्यांपैकीं पांडव विजयी झाले. पण जय-अपजय हें तो ग्रंथ निर्माण होण्याचें एकमात्र कारण नव्हे. त्या संघर्षाच्या निमित्तानें अनेक सूक्ष्म व स्थूल बाबींची चर्चा झाली आहे. भगवद्‌गीतेंत कालाला किती महत्त्व आहे हें सांगावयाची देखील गरज लागूं नये. पण तेथेंहि कालानें बदलणाऱ्या मूल्यांना महत्त्व दिलेलें नाहीं. त्रिकालाबाधित सत् तत्त्वांवर भर दिला आहे. तें तत्त्व व्यक्तिगत आहे. सामूहिक दृष्टीनें विचार त्यांत निघूं शकेल. पण प्रथम व्यक्तीवर नजर आहे. तीच परंपरा पुढें संतांनीं चालविली आहे. याबद्दल त्यांना दोष देऊन अनेक अप्रस्तुत वाद निर्माण झाले आहेत.

कीर्ति होण्यासारख्या कृतींवर मराठींत रचलेल्या पोवाड्यांतले कांहीं येथें उल्लेखावेसे वाटतात. श्री. केळकर यांच्या पुस्तकांत ते समाविष्ट आहेत.

क्रमांक	नांव	शाहीर
१	अफझुलखानाचा वध	अज्ञानदास
२	तानाजी मालसुरी	तुळशीदास
३	रमाबाईचा पोवाडा	अज्ञात
४	नारायणरावाच्या वधाचा अस्सल पोवाडा	लहरी मुकुंदा पृ. १६८
५	खडकीची व अष्टीची लढाई	रत्नू केरू
६	आनंदराव धुळपाचा पोवाडा	भिकू बाळा
७	दत्ताजी जाधवाचा पोवाडा	अज्ञान यमाजी पृ. १७ भाग २
८	सेखोजी आंग्र्याचा पोवाडा	अज्ञात
९	टिपूवरील स्वारीचा पोवाडा	राजू सुलतान
१०	अकीवाटच्या वेढ्याचा पोवाडा	मानसिंग भोवाना रजपूत
११	उमाजी नाइकाचा पोवाडा	जीरखान

ही यादी ऐतिहासिक कालांतील रचनेची आहे. आधुनिक कालांतहि तशी रचना अनेकांनीं केलेली आहे. त्या सर्वांचा परिचय या लेखनांत करून देणें शक्य होणार नाहीं. तथापि नासिकचे कै. गोविंदराव दरेकर, मुंबईचे श्री. खाडिलकर, कोल्हापूरकडचे श्री. माधवराव नानिवडेकर, उमरावतीचे प्रा. अण्णासाहेब खापर्डे असे कित्येक कवि पोवाडे रचणारे झाले व आहेत. इ. स. १९४२ च्या आंदोलनांत असे कित्येक पोवाडे रचले गेले होते व म्हटलेहि जात होते. त्यांतील आशय आंदोलनांत भाग घेण्याला उत्तेजन देण्याचा होता. त्यांतील कांहीं कदाचित् छापले गेले असतील. पण ते उपलब्ध झाले नसल्यामुळें मी त्याविषयीं कांहीं बोलूं शकत नाहीं.

ऐतिहासिक पोवाड्यांपैकीं वर नमूद केलेल्या पोवाड्यांची पाहणी आतां करावयाची.

अफझुलखानाचा वध

अफझुलखानवधाचा पोवाडा हा उपलब्ध कवनांत सर्वांत जुना आहे. शाहिरी कवनांचीं सर्व अंगें यांत आहेत. गणाला व शारदेला नमन, गुरूचें स्मरण, शिवाजीराजाची प्रशस्ति आणि पुढें प्रत्यक्ष प्रसंगाचें तपशीलवार वर्णन आणि शेवटीं ' आपल्या मतें ' बीरमाल राजाचा गाइला असें सांगून या ३७ कडव्यांचा हा दीर्घ व अत्युत्कृष्ट पोवाडा पुरा केला आहे. अफझुलखानवधाचा प्रसंग शिवरायांच्या चारित्र्यावर निष्कारण व निराधार शिंतोडे उडविण्याला कारण झाला आहे. त्याचें निराकरण मराठी इतिहासकारांनीं केलें आहे. त्याच्या आधाराशीं पोवाड्यां-

तलें कथन बव्हंशीं जुळतें आहे. घटनांचा अनुक्रम कायम ठेवून शाहिरानें केलेलें वर्णन, त्यांत कवित्वशक्तीचा मार्मिक वापर, शब्दयोजनेची कुशलता आणि प्रसंगनिष्ठ रंगाची खुलावट या गुणांमुळें हा पोवाडा या प्रकारच्या मराठी वाङ्मयांत श्रेष्ठपद पावला आहे. इतकी उत्कृष्ट रचना करण्याची हातोटी साधण्याला पूर्वपरंपरा कांहींतरी असलीच पाहिजे.

अफझुलखानवधप्रकरणीं शिवाजीराजांनीं केलेली सर्व योजना एखाद्या अगदीं शिस्तबद्ध मोहिमेची होती. कै. कॅप्टन मोडक यांनीं या विषयावर लिहिलेल्या पुस्तकांत तें सप्रमाण सिद्ध केलें आहे. अज्ञानदासानें पोवाड्यांत कथन केलेला भाग त्याशीं सुसंगत आहे. इतका महत्त्वाचा व गुंतागुंतीचा प्रसंग अडाणी म्हटला जाणारा एक शाहीर श्रोत्यांच्या डोळ्यांपुढें हुबेहूब उभा करूं शकला कसा, हा एक मोठाच कुतूहलाचा भाग आहे. श्री. केळकरांच्या तीक्ष्ण ऐतिहासिक नजरेंतून पाहिलें तर या पोवाड्याचें अपूर्वपण लक्षांत येईल. इतिहासलेखनाला साहाय्यक होणारे पोवाडे त्या त्या प्रसंगांशीं समरस होऊन रचले गेले असले पाहिजेत. माहिती व प्रसंगांत येणाऱ्या संवादांची जुळवाजुळव या दोन्ही अंगावर अज्ञानदासानें सारखीच नजर ठेविली आहे. मुळांत प्रसंगच अगदीं नाट्यपूर्ण असल्यामुळें त्याला साजेशी बतावणी करणें हें कवीचें कौशल्य त्याच्या अंगीं पूर्णपणें होतें, हें अनुभवानें ध्यानीं येईल. मोठ्या अभिमानाचा विषय होण्यासारखा हा प्रसंग प्रतिकूल पूर्वग्रहामुळें आणि विपरीत नीतिप्रणालीच्या आधीन झाल्यामुळें मोठ्या नामुष्कीचा ठरूं पाहात होता. पण त्याची निवृत्ति आतां कायमची झाली आहे. हा भाग चिंत्य आहे.

तानाजी मालुसरी

शिवचरित्रांतील असाच दुसरा प्रसंग म्हणजे सिंहगड घेण्याचा. त्यावर तुळशीदास शाहिरानें रचलेला पोवाडा वरच्यासारखाच उत्कृष्ट आहे. अजिंक्य म्हणून विख्यात असलेला हा किल्ला तानाजी मालसुरे यानें जिंकून घेण्यांत आपल्या देहाचा बळी दिला. कोणा भ्याड व्यक्तीचें परबलाच्या आधारावर केलेलें यशपर्यवसायी कृत्य नव्हतें. तानाजीनें प्रत्येक प्रसंगांत वीराला उचित असें वर्तन केलेलें पोवाड्यांत दाखविलें आहे. या मोहिमेची कामगिरी कळल्या वेळीं तानाजीच्या मुलाच्या लग्नाची तयारी, तो मोह पाडणारा प्रसंग बाजूस सारून तानाजीनें कामगिरी स्वीकारणें, गडाची माहिती काढण्यासाठीं स्वतःचा जीव धोक्यांत घालून रक्षकांच्या गेटांत प्रवेश, नंतर गडावर चढण्यासाठीं लावलेल्या सोलाला सर्वांच्या अगोदर हात घालणें इत्यादि प्रसंग अतिशय हृदयंगम आहेत. प्रत्यक्ष उदेभानूशीं झालेल्या द्वंद्वयुद्धांत ढाल गळून पडली असतांहि तानाजीनें युद्ध चालू ठेवलें व त्यांत देहार्पण केलें. या वेळीं तानाजीचा ऐशी वर्षांचा शेलारमामा याच्या अंगीं ‘ सुभेदार मेलेला मुरदा इरयानें झाला ’ आणि त्या आवेशांत मामाच्या

हातून उदेभान पुरा झाला. तानाजीचा मृत्यु झाला आणि उदेभानहि मेला, तर 'गड जिंकला कसा' असा प्रश्न साहजिक निघणें शक्य. त्याचा उलगडा शाहिरानें फार चतुरपणानें केला आहे. शिवाजी, जिजामातुश्री, तानाजी व त्याचा भाऊ सूर्याजी इत्यादि व्यक्तींचें स्वभावचित्र शाहिरानें मोठ्या कुशलतेनें रंगविलें आहे. शाहिरानें पोवाड्याचे शेवटीं मारलेला शेरा सर्वकालीं लागू होणारा आहे. तो म्हणतो, 'शूर मर्दाचा पोवाडा, शूर मर्दानें ऐकावा.' पोवाड्यांचा हेतु यांत स्पष्ट आहे, आणि फलश्रुति सांगितली आहे ती 'पोवाडा गात्याला उद्धाण, ऐकत्याला घडो पुण्य.' हा या कीर्तिकाव्याचा रचनेचा आधार आहे. तो पूर्वी दर्शविलाच आहे.

रमाबाईचा पोवाडा

वरील दोन्ही पोवाड्यांहून कांहींसा निराळा प्रसंग रमाबाईच्या पोवाड्यांत आहे. यांत राजकारण अथवा शारीरिक बलाचा संबंध नाहीं. तथापि, कीर्ति व्हावी अशी कृति आहे. ती केवळ आत्मिक बलाच्या आधारानें. माधवराव पेशव्यांच्या निधनानंतर रमाबाईनें सतीचें वाण घेऊन सहगमन केलें. या प्रकाराच्या सामाजिक अगर व्यावहारिक बाजूपेक्षां आत्मिक बाजूवर भर दिला आहे. शाहीर म्हणतो,

'रमाबाई पाषाण हिय्या केला।
प्राण ज्योतिशीं मिळविला।
उभी धर्मशिळे ठाकली।
हातची टाळी पिटली।
धवराळ जळूं लागली।
हांक इंद्रसभेला गेली
विमानें धाडून दिलीं।
दोघे विमानीं बैसविलीं।
सती शोभली जशी सुलोचना नार।'

बिचाऱ्या शाहिराला कल्पनाहि नसेल, कीं जी कृति रमाबाईनीं केली तिच्याविषयीं कालांतरानें आदर राहणार नाहीं. करारपद्धतीच्या विवाहांत हा नमुना घडण्याला कांहींच कारण नाहीं. कालानें मूल्यें कशीं बदलतात त्याचें हें एक उदाहरण आहे. पण त्यामुळें पोवाड्याची किंमत कमी होऊं शकत नाहीं. सती रमाबाईविषयीं आदर अजूनहि समाजांत आहे. थेऊरला प्रतिवर्षी होणाऱ्या रमा-माधव उत्सवावरून हें सिद्ध होतें.

नारायणरावाच्या वधाचा पोवाडा

वरील नमुन्यांच्यापेक्षां पुष्कळच निराळा असा नमुना नारायणरावाच्या वधाच्या पोवड्यांत आहे. ही कीर्ति होण्याजोगी बाब नाहीं, तर अपकीर्ति होण्या-

जोगी बाब होती. तथापि, राजघराण्यांतील कलहामुळें झालेला एक विपरीत प्रकार आणि राज्याच्या स्थैर्याला ओहोटी लावणारा एक अश्लाव्य भाग म्हणून ऐतिहासिक महत्त्वाचा असा प्रसंग शाहिरांनीं वर्णिला आहे. रघुनाथराव पेशवे व नारायणरावाचा हत्यारी सुमेरसिंग यांच्यामध्यें अगदीं निकराच्या वेळेला झालेलीं बोलणीं मोठीं विचारप्रवर्तक आहेत.

राव हात जोडी दादाला। सोडा राग म्हणे आतां वांचवा।
जीवदान मागे। डोइ घातली पोटांत।
आली माया हृदयांत। नका करूं बालकाचा घात।
दादा ठेवी वर हात वांचवा याला।
बोले सुमेरसिंग गारदी तुम्ही वांचवितां।
पुढें आमचीं मनुष्यें घाण्यांत पिळितां।
तुम्ही मुळीं आपल्या प्राणांसी कां दवडितां।

वधाच्या ईर्षेनें पेटलेल्या सुमेरसिंगानें असा रोकडा जाब दिल्यावर तुळाजी पवारानें मधें तोंड घालून चुलत्याच्या हातून नारायणरावास अलग केलें. गारद्यांनीं वार केले. चाफाजी टिळेकर खिजमतगार मध्यें पडला. तो ठार झाला. एकानें अपकीर्तिकारक व दुसऱ्यानें कीर्तिकारक कृत्य केलें. त्याला तशी संधि मिळाली. यासाठीं स्वीकृत व्याख्येनें ही रचना कीर्तिकारक ठरण्याला हरकत नाहीं. पण व्यवहारांत मात्र अपकीर्तिकारक कृतीविषयींची चर्चा जास्त झाली. टिळेकराला लोक कधींच विसरून गेले आहेत. श्री. केळकरांनीं या प्रसंगानें बराचसा ऊहापोह आपल्या पुस्तकांत केला आहे.

खडकीची व अष्टयाची लढाई

बाजीराव पेशव्याच्या दरबारीं असलेला इंग्रजांचा वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा पंढरपुरास कोणी अज्ञात मारेकऱ्यांनीं विठ्ठलमंदिरांत खून केला. हें कृत्य पेशव्यांच्या अंगास आलें आणि मराठी राज्याचा कांठोकांठ भरत आलेला अस्ताचा घडा तुडुंब भरला. इंग्रजानें या कृत्याचा सूड उगवण्यासाठीं जय्यत तयारी करून लढाई आरंभिली ती खडकीची लढाई या नांवानें प्रसिद्ध आहे. बाजीराव पर्वतीवर बसून दुर्बिणीनें लढाई पाहात होता. इंग्रजांची सरशी झालेली पाहतांच तो तसाच परस्पर कात्रज घाटाच्या मार्गें पळत सुटला. वाटेंत अष्टी येथें पुनः एक लढाई झाली. तींत बापू गोखले धारातीर्थीं पतन पावले. तेव्हांची बापूंजी वीरवृत्ति हा एक स्वतंत्र पोवाडयाचा विषय खास झाला असता. पण विनाशाचा वणवा चोहोंकडून पेटला असतां बापूंच्या निष्ठेच्या सौम्य तेजाकडे शाहिरांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. 'फितुर करून सर्वांनीं राज्य मात्र बुडविलें' 'भरी घालून चहुकडे

गेले चार बारभाई ' या दोन ओळ्यांवरून पेशवाईच्या अंताविषयीं सर्वसाधारण जनमत काय होतें तें कळून येतें.

दत्ताजी जाधवाचा पोवाडा

सर्वच पोवाडे स्वीकृत तत्त्वाशीं तंतोतंत जुळते असतील असें नाहीं. तथापि जेथें कोठें दुरूनहि का होईना ' त्याग ' दिसून येईल ती कृति सुकृतिच म्हणावी लागेल. कवीला जें कांहीं विशेष स्वरूपांत जाणवलें त्यावर त्यानें कवन रचलें. यापेक्षां जास्त जखडबंदीचा नियम सर्वत्र असा लागूं पडणार नाहीं. जगांत अशा अनेक घडामोडी सारख्या चालू असतात. त्यांत अमूकच एक सत्पक्ष व दुसरा असत् असा निर्णय देतां येत नाहीं. मतमतांतर निर्माण होतें तें यामुळेंच. आतां जो भाग पाहावयाचा आहे त्यांत असा प्रसंग आहे.

या पोवाड्यांतला नायक दत्ताजी जाधव हा शिवरायांचे आजोबा (आईकडून) लुखजी जाधव यांचा मुलाकडून नातू. शिवाजीनें जयसिंगाशीं तह करून मोंगलांशीं मिळतें घेतल्यावर मोंगल सैन्य विजापूरकरांच्या मुलखावर चाल करून गेलें. त्या सैन्याबरोबर शिवाजीचीहि फौज होती. तींत दत्ताजीची जाधव होता. करकमभोसें, मंगळवेढें, निलंगे या स्थळांच्या आसमंतांत मोंगल व विजापूरकर यांचीं सैन्यें एकमेकांशीं लढत होतीं. अशा एका चकमकींत दत्ताजीची व विजापूरच्या लोकांची गांठ पडली, आणि त्या गर्दींत प्राणपणानें लढतां लढतां दत्ताजी पडला. विजापूरच्या सैन्यांतील सर्जेखान यानें त्याचें शिर कापून नेलें. नुसत्या धडाला अग्निसंस्कार करणें योग्य नाहीं. शिवाय दत्ताजीच्या बायकोला सहगमन करावयाचें होतें. म्हणून शिराची मागणी केली. तेथें निराशा होण्याची वेळ आली होती. पण बाबाजी घाडगे या मराठा सरदारानें रदबदली करून शिर जाधवांच्या लोकांच्या स्वाधीन करविलें. परकीयांच्या दुराग्रही सत्तेंतसुद्धां स्वकीयांची सहानुभूति अशी उपयोगी पडते. मराठा इतिहासांत अशीं उदाहरणें अनेक सांपडतात. फलटणच्या बजाजी निंबाळकराचा प्राण अशाच एका मराठा सरदाराच्यामुळें वांचला. शाहिरानें या मदतीबद्दल बाबाजीची स्तुति केली आहे. घाटग्यांनीं ' बोल ' केला म्हणजे कीर्ति करून ठेवली असा त्याचा शेरा आहे. या पोवाड्याच्या रचनेचे वेळीं शाहिराचें अंतःकरण उचंबळून आलें होतें असें दिसतें. ' ददा दे मज प्रति ' अशी त्यानें देवतांची प्रार्थना केली आहे. ' रणामधें रणशूर म्हणविती, प्राण त्यजून त्याग करिती ' म्हणून भगवंताची सेवा करणाऱ्या अज्ञान यमाजीनें हृदयीं लक्ष लावून हा बीरमाल गाइला आहे.

सेखोजी आंग्र्याचा पोवाडा

व्यक्तिगत वीरत्वाप्रमाणेंच सेनापतीची कृतिहि वाखाणण्यासारखी असते. मराठ्यांच्या लढायांत असे प्रसंग जे आले त्यांपैकीं हा सेखोजीच्या विजयाचा प्रसंग

आहे. आरमारी युद्धांत इंग्रज फार जोरदार होते, असा साधारण समज आहे. पण तो अपुऱ्या ज्ञानामुळें तसा झाला आहे. मराठी आरमारानें निदान चार वेळां आरमारी युद्धांत जय मिळविल्याचें निश्चित आहे. मराठी आरमाराचे सरखेल कान्होजी आंग्रे यांनीं खांदेरी, विजयदुर्ग व हिराकोट या तीन लढायांत इंग्रजांवर जय मिळविला. त्यानंतर त्याच्या पुत्रानें सेखोजीनें चौलजवळ हा चवथा विजय मिळविला. त्याची हकीगत या पोवाड्यांत आहे. या प्रसंगाचें वर्णन निरनिराळ्या कवींनीं केलें. तीं सर्व कवनें एकमेकांना पूरक आहेत. देशावर राहणाऱ्या मराठी भाषिकांना समुद्रकांठच्या भौगोलिक स्थितीची व आरमारी युद्धाची प्रत्यक्ष माहिती नसते. ती मिळण्याला हे पोवाडे फार उपयोगी आहेत.

टिपूवरील स्वारीचा पोवाडा

शाहीर राजू सुलतान याचा हा पोवाडा. तो मुसलमान आहे. पण गैबीनाथाचा भक्त आहे. कोल्हापूरप्रांतींचे अनेक शाहीर गैबीचे भक्त आहेत. त्या उल्लेखावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. पोवाड्याच्या आरंभींच त्यानें या पोवाड्याचें कारण स्पष्ट केलें आहे. तो म्हणतो ‘ थोर होऊनशान अभिमान होउनी । रावण होउनी पाच्छाई द्वाही फिरविली परगण्यासी । ’ हा उल्लेख टिपूला अनुलक्षून आहे. म्हैसूरचें पूर्वीचें राज्य टिपूच्या बापानें म्हणजे हैदरनाइकानें कैद करून ठेवलें, ब्राह्मणांच्या जबरदस्तीनें सुंता करविल्या, असे कांहीं जुलूमजबरदस्तीचे प्रकार पिता-पुत्रांनीं केले होते. ते तत्कालीन समजुतीप्रमाणें सहज खपणारे नव्हते. म्हणून त्यांना आळा घालण्यासाठीं पेशव्यांनीं केलेल्या स्वारीकडे शाहिराचें लक्ष वेधलें. पोवाड्यांतील कथाभाग व वर्णन हीं ऐतिहासिक निवेदनाशीं बव्हंशीं जुळतीं आहेत, हें एक मोठें आश्चर्य आहे. शाहिरांचा अडाणीपणा आतां सुशिक्षितांच्या मनांत ठाम बसला आहे. म्हणून अशा पोवाड्यांचें विशेष महत्त्व आहे. त्यांत कोणत्याहि एका व्यक्तीच्या स्तुतीवर नजर नाहीं. पण अशा प्रसंगांत निरनिराळ्या व्यक्तींनीं जें कर्तृत्व केलें त्याचें दर्शन शाहिरानें घडविलें आहे. युद्धस्थितींतला तपशील जणू काय समक्ष डोळ्यांपुढें घडत असल्याप्रमाणें वर्णिलेला आहे. या कारणामुळें शाहिरांच्या अंगच्या साहित्यिक गुणांची प्रचीति येते. पोवाड्यांच्या आस्वादानें हाहि एक मोठाच लाभ होतो. तो घेण्याला अनुकूल मनस्थिति म्हणजे इच्छा पाहिजे. ही इच्छा जेथें जेथें असेल तेथें तेथें ती पूर्ण होण्याचें योग कवींनीं आणले आहेत. इतर साहित्यिक तरी दुसरें काय करतात ? प्रचलित मराठी गद्य वाङ्मयांत त्यावर वरचढ केलेले नमुने क्वचितच दाखवितां येतील. इतिहासलेखकांत व पोवाडे रचणाऱ्यांत साम्य व निराळेपण कसें व कोठें असतें हें पाहण्याला हा पोवाडा उपयुक्त व्हावा असा आहे.

अकीवाटच्या वेढ्याचा पोवाडा

मराठी राज्याचे सातारा व कोल्हापूर असे दोन भाग झाल्यानंतर जे अनेक संघर्षांचे प्रसंग उद्‌भवले त्यांतला या पोवाड्याचा प्रसंग हा एक मासला आहे. धनगीर गोसाव्याचा अनुयायी मानसिंग भोवाना रजपूत हा या पोवाड्याचा कर्ता असें मानलें गेलें आहे. हा शाहीर तुरेवाला आहे. 'नागीशा आतां किंमत तुझी पाहूं' या उद्‌गारानें तें सूचित होतें. नागेशवळी म्हणजे कलगीपक्ष हें पूर्वी दाखविलेंच आहे. वास्तविकपणें तुरेवाला पक्षाच्या तत्त्वज्ञानांत हें कवन कोणत्याहि कारणानें बसत नाहीं. फक्त एकमेकांवर कडी करण्यासाठीं ही रचना करावयाची ती या शाहिरानें केली आहे. या प्रकारामुळें दोन्ही पक्षांच्या भूमिकेविषयीं शुद्ध ज्ञान समाजांत कायम राहूं शकलें नाहीं. तमासगिरांच्या लावण्यांतहि हीच अडचण प्रत्ययास येते. परशुरामभाऊ पटवर्धनांनीं अकीवाटच्या किल्ल्याला वेढा घातला असतां तेथील येल्लाप्पा व जेठाप्पा या लोहारबंधूंनीं मोठ्या शौर्यानें प्रतिकार केला व शेवटीं त्या कार्यांत देह अर्पण केले. शाहिराच्या नजरेपुढें त्यांची कृति होती: तो म्हणतो, 'दोवे लव्हार ठार पडले हणमंता म्होर। भले होते लव्हार ॥'

दामाजी नाइकाचा पोवाडा

अपयशी होऊन शत्रूच्या कृपेनें जीव जगविणें व स्वीकृत कार्यांत देहार्पण करून यश संपादन करणें, या दोहोंतला दुसरा मार्ग पसंत करणाऱ्या दामाजी नाइकाचा हा पोवाडा आहे. मराठी राज्यांतले आरमारी सरखेल विजयदुर्गचे धुळप यांच्या पदरीं असणाऱ्या दामाजी नाइकावर इंग्रज आरमारानें कितीतरी पटीनें जास्त असलेल्या आपल्या बलानिशीं जो भडिमार केला त्यांत या शूरवीराचें लढाऊ जहाज जर्जर झालें असतां निरुपाय होऊन दामाजीनें इंग्रजांच्या कौलाच्या लोभास बळी न पडतां आपल्या गलबतास आग लावून देऊन त्यासकट जलसमाधि घेतली. 'दामाची नाइक शर्थ करून मेला' 'केलें हलाल धन्याचें अन्न' असे उद्‌गार शाहिराला काढावेसे वाटले.

इंग्रजी शालेय पुस्तकांत असे प्रसंग वर्णन केलेले होते. पण त्या वेळीं मराठींत तसेच प्रसंग वर्णिलेलीं लिखाणें शाळांतून चालू नव्हतीं. यामुळें स्वदेशी लोकांपेक्षां हे परकीय लोक कितीतरी जास्त योग्यतेचे असले पाहिजेत असा गंड निर्माण झाला होता, हें नाकरण्यांत हंशिल नाहीं. हा भाग नुसत्या शौर्यापुरता नव्हता तर इतर अनेक सद्‌गुणांच्या संबंधांतहि अनुभवास आला होता. तुलनेनें स्वकीयांबद्दल अनादर व राज्यकर्त्यांविषयीं कौतुक यांचा प्रभाव पडला होता. मराठींतल्या पोवाडे वाङ्मयामुळें हा भ्रम खास दूर होईल. पण आतां मराठी समाजाची भूमिका शुद्ध राहिलेली नाहीं ही मोठी अडचण आहे.

या पोवाड्याचा कर्ता ' आत्मागीर ' फकिराचा शिष्य आहे. पोवाड्यांत ' फकीर ' असें उपपद असलें तरी नाथपंथी लोकांवर पंजाबांतल्या वास्तव्यामुळें मुसलमानी प्रभाव पडल्याचें तें द्योतक आहे.

आधुनिक पोवाडे

पोवाड्यांची रचना मराठी राज्याच्या काळांत झालेली उपलब्ध आहे. पण त्यानंतरच्या काळांत तशी रचना झाली, अजूनहि होत आहे. इंग्रजांचें राज्य झाल्यानंतर उमाजी नाईक, तंट्या भिल, राघू भांगरे, वासुदेव बळवंत असे अनेक स्वातंत्र्यप्रेमी लोक निघाले. त्यांच्यावर पोवाडे रचले गेले आहेत, किंबहुना मी तर असें म्हणतों कीं, उमाजी नाइकाचा पोवाडा झाला म्हणून पोवाड्याच्या पद्धतीची सांखळी अखंड राहिली. या काळांतले कांहीं कवि विशेष शिक्षित तर कांहीं अल्पशिक्षित होते. मराठी काळांतल्या कांहीं प्रसंगांवर या कालांत पोवाडे रचले गेले. मुंबईचे पांडुरंगपंत खाडिलकर, नाशिकचे दरेकर, आणि माधवराव नानिवडेकर हीं नांवें या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत. दरेकरांचे पोवाडे सध्यां कदाचित् उपलब्ध होऊं शकणार नाहींत. स्वा. वी. सावरकरांच्या ' अभिनव-भारत ' भारत संघांतले हे कवि. तेव्हां त्यांची कविता इंग्रज राज्यकर्त्यांच्या नजरेंतून सहीसलामत निसटून शिल्लक राहिली असेल असें वाटत नाहीं. पुरंदरचा किल्लेदार मुरारबाजी, सिंहगड इत्यादि विषयांवरचे दरेकरांचे पोवाडे फार लोकप्रिय झाले होते. त्यांत तेजहि तसेंच होतें. पण नमुन्याखेरीज शाब्दिक प्रशस्तीनें खरें स्वरूप कळणें शक्य नाहीं. त्यानंतर पोवाडे रचणारांत खाडिलकर (एम्. ए.) व नानिवडेकर हीं नांवें उल्लेखनीय आहेत असें म्हटल्यानें सुद्धां त्या कवींच्या कवितेचा योग्य मान होणार नाहीं. म्हणून त्यांतलीं एकदोन नमुन्यादाखल कडवीं येथें उतरून घेतों.

बार्डोलीचा सत्याग्रह

श्री. नानिवडेकरांचा ' महात्मा गांधीजी ' पोवाडा छापून प्रसिद्ध आहे. त्याची भाषा जुन्यानव्याला मिळविणारा सांधा आहे. नागर व ग्रामीण यांपैकीं ग्रामीण विभागाकडे त्यांचा साहजिक ओढा आहे. त्यांत कृत्रिमता नाहीं. हा पोवाडा त्यांनीं दिल्ली येथें भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे प्रसंगीं राजघाटावरील महात्मा गांधींच्या समाधीपुढें म्हणून दाखविला. त्या वेळीं राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद हे तेथें गीतापाठ करीत बसले होते. नानिवडेकरांच्या शाहिरी कारकीर्दीतला तो एक अविस्मरणीय प्रसंग होता. पूर्वकालीं शिवछत्रीपुढें तानाजी मालसुऱ्यावरील पोवाडा गाणाऱ्या शाहिराच्या आनंदापेक्षां कितीतरी जास्त आनंद या योगानें शाहिराला वाटला असला तर तो वाजवीच म्हणावा लागेल. हा मान आतां इतरांनाहि मिळण्याची शक्यता आहे. या पोवाड्यांतला पांचवा चौक असा :

बार्डोलीला सारा वाढविला। जुलूम चालविला।
अशा समयाला। झुंजाया निघे पटेल सरदार।
घेउनी किसानांचा कैवार। जेर करी सैतानी सरकार॥
नका देऊं फुटकी कवडी करा निर्धार।
किति वेळ टिकाव धरिल पाहू सरकार।
न्यायाचि असुन मागणी आमची साचार।
नाहीं पर्वा करित सरकार। गर्व त्या फार। करूं बेजार। आम्ही झुंजार॥

जगतसे राज्य आम्हांवर।
तुम्हा आम्हा शेतकऱ्यांवर।
जर बिघडेल हा व्यवहार।
राज्ययंत्र नाहीं चालणार।

तर उठा चला सत्याग्रह लढवू आतां।
आशिर्वाद गांधी गुरुजींचा तुम्हाला पुरता।
गुजराथी वीर झाले सज्ज ऐकुन वार्ता।

एकीचा किल्ला मजबूत।
अहिंसेची ढाल हातांत।
सत्याग्रह खड्ग फिरवीत।
जुलमाचे घाव झेलीत।

अन्यायाचा नाश करू रणांगणि पुरता॥
सरकाराची पाशवी शक्ति। जुलुम जबरदस्ती।
कपट भेदनीति। सत्याग्रहापुढे फिक्की पडली।
म्हणून सारावाढ बंद केली। बार्डोली विजयशिखरीं चढली॥

भाषा व प्रसंग हीं युद्धाचीं. पण शस्त्रास्त्रें आत्मिक बलावर आधारलेलीं असा विरोधाभास येथें उत्पन्न होईल. पण त्यामुळें कवीच्या रचनेंत न्यून येत नाहीं. बदललेल्या कालाचा तो महिमा आहे.

मुरारबाजीचा पोवाडा

श्री. खाडिलकरांचे बहुतेक पोवाडे ऐतिहासिक कालांत घडलेल्या अविस्मरणीय प्रसंगावरचे आहेत. त्यांची भाषा व त्यांतील कल्पना रचनाकाराच्या सुविद्यतेला साजेशीं आहे.

शिवकालांत पुरंदर किल्ल्याला मोगलांनीं वेढा घातला असतां तेथील किल्लेदारानें मोठ्या शौर्यानें किल्ला लढविला. त्यांत किल्लेदार मुरारबाजी रणांगणांत पडला. त्याला असंख्य जखमा होऊन देह छिन्नविच्छिन्न झाला होता—

'देहाचे तुकडे जमविले। किल्ल्यावर नेले।
मावळा मग बोले मुरारजीच्या बायकोला।
'बाईसाहेब मोठा घात झाला। जिवाचा मोहरा ठार झाला।
प्राण आमचा सोडुन गेला। झाला घोटाळा।
ऐन वेळेला। खान घेईल आता किल्ल्याला।
काय आम्हीं करावें बोला। अशा निकराचे समयाला।'
नाथांचें प्रेत पाहून। साध्वीचें मन भरलें दुःखानें।
एक क्षण आली घेरी तिजला। डोळ्यांतुन अश्रु फार गळला।
अंगाला कंप सारा सुटला। पण दुःख सारं आवरून।
त्वेषानं लाल होऊन। बोलली साध्वी जोरानं।
पळतांना मावळा पाहून॥ 'कुठें जातां धीर सोडून।
मी आलें खड्ग घेऊन। ह्या दुष्ट शत्रूला हाकलून
जा मरा झुंजुझुंजून'। असं बोलली साध्वी मावळ्यांला।
नवऱ्याच्या प्रेतावर शेला। टाकून गेली युद्धाला।
मावळ्यांना चेव तेव्हां आला। अन् करतो घोर युद्धाला।
खानानं पाहिल्यावर तिला। अन् तोंडांत घातलं बोटाला।
मग बोलला आपला आपणाला। 'सैतानखाना हा झाला।
आतां आली औरत लढण्याला। सोडावं आतां नादाला।
काढावं आतां वेढ्याला। सर करणं असल्या किल्ल्याला।
फार बिकट काम हें मला'। असं म्हणून वेढा काढून खान चालला॥

मुरारबाजीची व त्याच्या पत्नीची कृति दोन विरुद्ध हितसंबंधांच्या पक्षांना दोन निरनिराळ्या प्रकारची वाटली असें कवीला दिसतें. म्हणून त्यानें खानाच्या तोंडीं 'हा सैतानखाना झाला' असे शब्द घातले आहेत. व्यवहारांत हें असें पुष्कळ वेळां घडतें. निरपवाद सुकृति गाण्याचे प्रसंग कमीच सांपडतात. ते तसेच बहुमोल असतात.

प्रारंभीं 'वीरांचा' उल्लेख केला आहे. शरीरसामर्थ्यानें दुसऱ्याच्या पाशवीशक्तीशीं झुंज देणारे तेच केवळ वीर नव्हेत हेंहि पूर्वीं पाहिलें आहे. म्हणजे निर्भयता व त्याग यांचा उत्कर्ष दिसण्याची जागा आणखी कोठें आहे हेंहि शोधणें जरूर आहे. माझ्या दृष्टीनें कोणत्याहि समाजांतले संत व भक्त अशा कीर्तिकाव्याला पात्र आहेत. पण त्या कवितेला पोवाडा न म्हणतां इतर कांहीं नांव समाजानें दिलेलें असतें. रूढ नांव निराळें असलें तरी वस्तु तीच असतांना केवळ शाब्दिक फरकामुळें बिचकण्याचें काय कारण? स्तुतिपर रचनेला पोवाडा म्हणतात. तशी स्तुति संतांची केली तर त्या कृतीला या सदरांत बसविण्याला अडचण

कोठची ? दोन्हीमध्यें सादृश्य इतकें आहे कीं, दोन्ही अलग करतांच येत नाहींत. वीराला अर्पण केलेली माला म्हणून ' बीरमाल ' असा शब्द रूढ आहे. तो बीरमाल श्री. केळकरांनीं ऐतिहासिक पोवाड्यांत सामील करून घेतला आहे. प्रतापगडच्या पोवाड्याविषयीं खुद्द शाहिराचा उल्लेख असा आहे, ' बीरमाल राजाचा गाइला '. येथें स्तुतिपात्र कृतीची स्तुति हा अर्थ अभिप्रेत आहे. हा बीरमाल शब्द मराठींत आहे तसाच हिंदींत आहे. त्याप्रमाणें ' भक्तमाल ' हा शब्द आणि ती रचना दोन्ही भाषांत सारखीच रूढ व मान्य आहे. उदाहरणासाठीं मराठींतील शाहीर होनाजीचा भक्तमाल घेतां येतो. कीर्तिकाव्याचा हेतु निश्चित करतांना स्वीकृत केलेलें गमक येथें सांपडतें. आरंभीचें कडवें असें :—

गा वदनीं कृपावंतांची । सफळ चरित्रें संतांचीं ॥ ध्रु० ॥
समागमाच्या मूळ संसर्गें । सरसी ज्याला अपपरवर्गें
वसवून स्वकरें तीं बोधखड्गें । निरसुन अहंकारतम दुर्गें ।
लाविती जडमूढ तारक मार्गें । नामें तयांचीं स्मरण करा ।
भव तारा तारा ।

यानंतर सुमारें तीनशें भक्तांच्या नामाचा उल्लेख केला आहे. त्यांत कोठें कोठें तीनचार शब्दांत कोणा भक्ताचा महिमा वर्णिला आहे. शेवट असा—

संत नामावळी वाहुनी पुष्पांजळी पदीं
भाळ ठेउनी दीन दयाळ पूजिला ।

होनाजीचें हें कवन लावणीसंग्रहांत ग्रथित आहे. (श्री. शाळिग्राम संपादित चित्रशाळा आवृत्ति ३ पृ. ७० कवनक्रमांक ४७.)

आत्मबोधाच्या शस्त्रानें स्वातंत्र्य संपादणाऱ्या या वीरांची माला अथवा त्यांना अर्पिलेली माला कीर्तिकाव्यांत समाविष्ट करण्याला अडचण कां यावी हें निदान मला तरी समजत नाहीं. त्याचें समर्थन फक्त रूढ भाषाप्रयोगाच्या आधारावर करतां येतें. हा प्रकारहि विद्वानांना एक मस्तकशूल होईल हें माझ्या ध्यानांत आहे. पण मीं तो दूर करण्याऐवजीं आणखी वाढविण्याच्या मार्गावर आहें.

संतांचीं कीर्तिकाव्यें मराठींत विपुल आहेत. त्यांना रूढ नांव ' आरती ' असें आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास यांच्या आरत्या सुपरिचित आहेत. त्यांत प्रत्येक संताचें वैशिष्ट्य वर्णन केलेलें असतें.

' प्रकट गुह्यबोले ' व ' विश्व ब्रह्मचि केलें ' हे दोन निर्देश ज्ञानेश्वरांच्या कृतीचे सार आहेत. ' एकनाथ नाम सार । वेदशास्त्रांचें गूज ' हीं गमकें एकनाथांच्या संबंधांत अविस्मरणीय आहेत. तसेंच ' वाळवंटें परीस केलीं व हारपली विषमता ' हें नामदेवांचें कर्तृत्व विशेष आहे. तुकारामाच्या संबंधांतहि असेंच वेंचक

गमक रामेश्वरभट यानें आपल्या आरतींत नमूद केलें आहे. 'तुकितां तुळणेंसी। ब्रह्म तुकासि आलें'.

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।

—भगवद्गीता.

आत्मज्ञान होणें म्हणजेच तत्समता हा सिद्धान्त त्यांत सांठविला आहे. कल्याणस्वामींनीं रचलेल्या समर्थांच्या आरतींत 'ज्ञानबोध प्रकटला तेणें प्रकाशली ज्योती' हें विशेष म्हणून सांगितलें आहे. हनुमंत म्हणजे मारुती हा साक्षात् वायु. तो अनुकूल करण्याकडे सर्व योगांची नजर आहे. समर्थांनीं केलेल्या मारुतीच्या आरतींत हें विशेष आहे. 'तुमचेनि प्रसादें न भिये कृतान्ता'. ही सर्व आरती म्हणजेच साधकाच्या शरीरांत जागृत झालेल्या शक्तीची प्रचीति होय.

हा विचार चालू असतांना आणखी एका महत्त्वाच्या गमकाची आठवण होते. वीराला कोणत्याहि प्रकारच्या भीतीमुळें अथवा संमोहामुळें जें भ्याडपण येतें तें घालविण्यासाठीं त्याच्या अंगीं असलेल्या शक्तीची आठवण करून देण्याचा अशा कवनांचा एक हेतु असतो. हें पूर्वीं पाहिलेंच आहे. त्याचें स्पष्ट उदाहरण या अर्थीं थोडासा उतारा येथें देणें जरूर वाटतें. अर्जुन युद्धास उभा राहिला असतां, आप्तस्वकीयांना पाहून तो मोहवश झाला व युद्धास प्रवृत्त होईना. त्या वेळीं सारथी श्रीकृष्णानें म्हणजेच भगवंतांनीं त्याला शास्त्रज्ञान सांगण्यापूर्वीं प्रथम या उपायाचा अवलंब करून पाहिला. भगवद्गीतेंत दुसऱ्या अध्यायांत भगवंतांनीं अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर दिलें आहे. तो श्लोक असा :—

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

—भगवद्गीता २:२

ज्ञानेश्वरांनीं यावर व्याख्यान केसें आहे तें येथें चिंतनीय आहे.

म्हणे अर्जुना आदि पाहीं । हें उचित काय इये ठायीं ।
तूं कवण हे कायी । करीत आहासी ॥ ६ ॥
तुज सांगे काय जाहालें । कवण उणे आलें ।
करितां काय ठेलें । खेदु कायिसा ॥ ७ ॥
तूं अनुचिता चित्त नेदिसी । धीरू कहीं न संडिसी ।
तुझेनि नामें अपयशी । दिशा लंघिजे ॥ ८ ॥
तूं शूर वृत्तीचा ठावो । क्षत्रियामाजी रावो ।
तुझिया लाडेपणाचा आवो । तिन्ही लोकीं ॥ ९ ॥
तुवां संग्रामीं हरू जिंकिला । निवात कवचांचा ठावो फेडिला ।
पवाडा तुवां केला । गंधर्वासी ॥ १० ॥

पाहतां तुझेनि पाडें । दिसे त्रैलोक्यही थोकडें ।
ऐसें पुरुषत्व चोखडें । पार्था तुझें ॥ ११ ॥
तो तूं कि आजि एथें । सांडूनिया वीरवृत्तीतें ।
अधोमुख रुदनातें । करितु आहासी ॥ १२ ॥

❀ ❀ ❀

म्हणोनी अझुनी अर्जुना । झणें चित्त देसी या हीना ।
वेगीं धीर करूनिया मना । सावधु होईं ॥ १७ ॥
सांडी हें मूर्खपण । उठी धनुष्यबाण ।
संग्रामीं हें कवण । कारुण्य तुझें ॥ १८ ॥
हा गा तूं जाणता । तरी विचारिसी कां आतां ।
सांगे झुंजावेळे सदयता । उचित कायी ॥ १९ ॥
हे असति कीर्तीस नाशु । आणि पारत्रिकासि अपभ्रंशु ।
म्हणे जगन्निवासू । अर्जुना तें ॥ २० ॥

हाहि अगदीं खऱ्या अर्थानें पोवाडाच आहे. कीर्ति होण्यासारखी वेळ असतां अपकीर्तीला कारण होणारी कृति करणाऱ्या मनुष्याला त्याचें स्वतःचें व इतरांचें सुकृत स्मरण करून देण्यासाठीं कीर्तिकाव्याची रचना. संतांचे उपकार यासाठींच मानणें योग्य. ते रात्रंदिन ' जागवीती '. मनुष्याला जागा ठेवणाऱ्या संतांचे जगावर जेवढे उपकार आहेत, त्यांच्या पासंगाला देखील कोणा दानशूर पुरुषाचे उपकार पुरणार नाहींत. अशा संतांचें स्मरण कीर्तिकाव्याच्या प्रसंगीं न करणें हा केवळ गुन्हा होईल. म्हणून ' वीरमाला 'बरोबर ' भक्तमाला 'हि येथें आपल्या हक्काच्या जोरावर येते.

रूपसादृश्य, ध्वनिसादृश्य व अर्थसादृश्य हीं गमकें वर्गीकरणाच्या वेळीं विचारांत घेणें आवश्यक आहे. साहित्याच्या वर्गीकरणांत मात्र तीं गमकें लागूं न करतां अगदीं निराळा असा गट पाडण्याच्या प्रवृत्तीमुळें आपल्या संस्कृतीच्या परंपरेची सांखळी तुटे, हें ध्यानीं राहणें फार जरूर आहे. संस्कृतीशीं संबंध न ठेवतां इतर कोणाच्या तरी डोळ्यांनीं पाहण्याची संवय जडल्यामुळें सध्यां बहुधा सर्व क्षेत्रांत अस्थिर व अशास्त्रीय विचारांचा कल्लोळ माजला आहे. पण असें म्हणणारा स्वतःच टवाळीला पात्र ठरतो.

लो. टिळकांचें स्मरण संतांच्या बरोबरच व्यावयास पाहिजे. खाडिलकर-शिष्य निळकंठराव भिडे यांचा पोवाडा यासाठीं मननीय आहे.

निस्पृह म्हणुनी ख्यात असे जो, गातो त्याच्या कवनाला ।
सत्याचा अभिमानी मोठा जागृत जो निज शब्दाला ।

असें वर्णन साररूपानें पोवाड्यांत केले आहे. आणि

सागरीं उभा राहून स्फूर्तिला । स्वराज्याचा मंत्र जो देई शूर वीराला ।
त्या थोर पुरुषाच्या चरणीं या वेळा । निळकंठ अर्पण करतो कवनमाला ।

असा शेवट केला आहे. प्रारंभ व पर्यवसान या दोहोंत रचनाकाराचें हृद्गत सांठविलेलें असतें. केवळ अर्थवादाच्या नजरेनें पाहण्याचा तो विषय नसतो.

कीर्तिकाव्याचा भाग झांशीच्या राणी लक्ष्मीबाईच्या उल्लेखावांचून अपुरा राहील, इतकें महत्त्व त्याला आहे. अनेक कवींनीं तें उदात्त चरित्र वर्णिलें आहे. शाहीर खाडिलकरांनीं तें वाखाणलें आहे :—

सती लक्ष्मीबाई हिरकणी । भंगली रणीं । नाव त्रिभुवनीं ।
रणीं रक्तानें न्हाली तलवार । मेघांत वीज चमकली ।
भूमिवर आली । गेली पाताळीं । धन्य ती नार ।

या संबंधांतला कथाभाग आतां सर्वांना माहीत झाला आहे. त्याची उजळणी करण्यानें राणीच्या तेजाचें जास्त स्पष्ट दर्शन घडणार आहे असें नाहीं.

शाहिराला तें जसें दिसलें तसें त्याच्या मुखांतून प्रारंभीं बाहेर निघालें आहे. पोवाड्यानें प्रसंगाला अथवा विषयाला थोरवी येत नाहीं. त्याच्या उलट प्रकार असतो म्हणून पोवाडा रचला जातो. मराठी पोवाड्यांच्या गुणांवर पोवाडे करण्याइतकें महत्त्व त्यांना आहे हें आतां सिद्ध मानलें जाण्याला हरकत उरली नाहीं.

हा पोवाड्यांचा भाग हातानिराळा करण्यापूर्वीं कै. राम गणेश गडकरी यांच्या ' महाराष्ट्रगीता'चा परामर्श घेणें जरुरीचें वाटतें. तें गीत असें सुरू होतें—

मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा ।। ध्रु० ।।

महाराष्ट्राच्या प्राकृतिक वर्णनानंतर कवि म्हणतो—

भावभक्तिच्या देशा । आणिक बुद्धीच्या देशा ।
शाहिरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ।
निशाणावरी ।
नाचतें करी ।
जोडी इहपरलोकांसी ।
व्यवहारा परमार्थासी ।
वैभवासि वैराग्यासी ।

जरि पटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा।
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा ॥ १ ॥

कवि गोविंदाग्रजांच्या या कवनांत (वाग्वैजयंति पृ. २०७) महाराष्ट्राचें रूप दिसतें असें म्हणण्यापेक्षां तें कवीला कसें दिसलें तें त्यानें चित्रित करून ठेवलें आहे. गडकरी हे अगदीं खऱ्या अर्थानें मराठी शाहीर आहेत. त्यांनीं शाहिरीच्या तिन्ही अंगांत रचना केली आहे. मनोविनोदात्मक शाहिरींत त्यांचें कलगीचें गाणें उच्च प्रतीचें आहे. आत्मदर्शन होण्याचा प्रकार शुद्ध सारिणीनें वर्णिला आहे. तें कवन अत्युत्तम असतांहि त्याचा उल्लेख फारसा होत नाहीं. मनोरंजक भागांत तर गडकऱ्यांचें उच्च स्थान अजून अबाधित आहे. पदोपदीं पुरोगामी म्हटल्या जाणाऱ्या साहित्यिकांना त्याच्यावर कडी करतां आलेली नाहीं. कीर्तिकाव्याचा जो नमुना आतांच उल्लेखला आहे, त्याच्या तोडीचें कवन मराठींत दुसरें क्वचित् असेल. त्यांत प्रथम भौतिक मूल्यांनीं महाराष्ट्राची गाइलेली महति व नंतर महाराष्ट्रीय थोर व्यक्तींच्या चिरस्मणीय कृतींचा साररूपानें उल्लेख केल्यावर शाहीर गडकऱ्यांनीं मुकुंदराजापासून तुळशीदास शाहिरापर्यंत अनेक कवींना केलेला प्रणाम आहे.

'गुणि गुणिनं वेत्ति' हें अगदीं खरें. या अपूर्ण कवनाचा उत्तरार्ध येथें देतों—

रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंद राजाला।
पहिला वहिला अष्टांगांनीं प्रणाम हा त्याला।
शहर पुण्याच्या शिवनेरीच्या पंढरिच्या देशा।
पुंडलिकाच्या शिवरायांच्या टिळकांच्या देशा।
अनंत कोटि ग्रंथ रचुनिया जोडी तुझ्या नामा।
वाल्मीकीचें शतकोटि यश विष्णुदासनामा।
मयूरकविच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्र देशा।
कवि [1] कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्र देशा।
देवी ज्ञानेश्वरी करी जिथें भक्तीचा खेळ।
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ।
जिथें रंगलीं साधींभोळीं जनाइचीं गाणीं।
तिथेंच खेळे [2] श्रीपादांची कलावती वाणी।
विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी।
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी।

---

१ केशवसुत २ श्री. कृ. कोल्हटकर

तुला जागवी ऐन पहाटे गवळी गोपाळ।
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ।
मर्दांनी इष्काचा प्याला तुझा भरायासी।
उभा ठाकला सगनभाऊ हा शाहुनगरवासी।
प्रभाकराची जडण-घडण कडकडित म्हणायाला।
दो हातांचा मुजरा माझा तुळशीरामाला।
भीमथडीहुन चहुमुलखावर फिरले धारकरी।
भीमथडीवर चहुमुलखांतुनि जमले वारकरी।

वारकरी-धारकऱ्यांविषयींचा निरर्थक वाद गडकऱ्यांच्या डोळ्यापुढें स्पष्ट होता. पण त्यांनीं तत्त्वावरची नजर ढळूं दिलेली नाहीं. म्हणून त्यांनीं 'शाहीराच्या रसवंतीला भावभेटिचें लेणें' अर्पिलें आहे.

♣ ♣

प्रकरण सहावें

शाहिरीची रंगभूमि

मराठी शाहिरी वाङ्मयाचा परिचय करून देतांना शाहिरी या नांवावरून जो विकल्प साहजिकपणें उत्पन्न होतो, त्याचा निरास यापूर्वींच केला आहे. तसें करतांना नांवाखेरीज आणखी कांहीं परकीय संस्कृतीच्या बाबी समाविष्ट झाल्या आहेत असें सूचित करून ठेविलें आहे. त्याचा विचार होणें जरूर आहे. तो करण्याची वेळ आतां आली आहे.

कलगीतुरा

मनोविनोदात्मक शाहिरी वाङ्मयाचा परिचय करून देतांना नमुन्यादाखल पांच सहा कवनें दाखविलीं आहेत. त्या त्या वेळीं रचनाकाराचें नांव सांगतांना 'कलगीवाला', 'तुरेवाला' असे त्यांचे पक्ष उल्लेखिले आहेत. वास्तविक 'शिवशक्ति' हें एकच आध्यात्मिक मत व्यापक असतां त्यांत दोन निराळे पक्ष कसे उत्पन्न झाले असा प्रश्न येथें येईल. त्याचें उत्तर इतकेंच कीं, श्रुति या एकच एक आहेत, व उपनिषदांचाहि एकपणा कोणी नाकारीत नाहीं. असें असून अद्वैती, द्वैती, विशिष्टाद्वैती (द्वैताद्वैती) असे भेद उत्पन्न झालेले आहेत. त्या भेदांच्या आधारावर पुष्कळ पूर्वोत्तर पक्ष झाले आहेत आणि पुढेंहि बहुधा होत राहतील.

हें फक्त वैदिक तत्त्वविचाराविषयींचें बोलणें आहे. शाहिरी वाङ्मयांतहि तसाच प्रकार झाला आहे. 'शिवशक्ति' तत्त्वविचार सर्वमान्य असतांहि शाहिरींत दोन भिन्न वर्ग पडले आहेत. एक फक्त शिवतत्त्वालाच मानतो, शक्तितत्त्वाचा विचार करीत नाहीं, त्याला मान्यता देत नाहीं. तो पक्ष तुरेवाला पक्ष म्हणून ओळ-

खला जातो. तुरा हा शब्द खास भारतीय भाषेंतला नाहीं, फारशी आहे. मात्र तुरीय म्हणून जी अवस्था उपनिषदांत सांगितली आहे, तिचें नांव येथें ध्वनि-साद्दश्यानें चिंत्य आहे. मराठींत तो शब्द वाद्याचें नांव म्हणून रूढ होता. एकनाथकालीन कवींच्या काव्यांत मंगल प्रसंगीं ' तुरे वाजती ' असा उल्लेख येतो. तीं वाद्यें म्हणजे हल्लींचीं सूर, सनई, कर्णा हीं होत. राजपदस्थ व्यक्तींच्या अथवा देवतामूर्तींच्या शिरोभूषणावर, वरून खालीं लोंबणारा जो मोत्यांचा अलंकार असतो त्याला तुरा असें म्हणतात. उदाहरणार्थ, शिवछत्रपतींच्या तसबिरींत पागोट्याच्या मागच्या बाजूला खोचलेला मोत्यांचा अलंकार असतो, तो तुरा. निरनिराळ्या अनेक मोत्यांच्या लडी एकत्र करून हा अलंकार बनवितात. कंठ्याप्रमाणें लडींचीं दोन्ही टोकें एकत्र करीत नाहींत. एका बाजूचीं टोकें एकत्र जुळवून दुसऱ्या बाजूचीं टोकें अलग अलग मोकळीं सोडतात. एकीकडे सर्व माळांचें एकीकरण व त्यांतून जणू काय निघालेल्या लडींचा विस्तार अशी ही आकृति असते. अत्यल्प आकृतींतून विस्तार व त्यांतच लय हें आपल्या तत्त्वज्ञानाप्रमाणें सृष्टीच्या घडामोडीचें वर्णन केलें जातें. अत्यल्प आकृति हा तुरा व विस्तार ही कलगी. समारंभांत फुलांचे गुच्छ पानसुपारीबरोबर देतात. त्या विशिष्ट रचनेच्या गुच्छांना कलगी हें नांव बडोद्यास चालू होतें. मुंबईस ती आकृति ' बटन ' या नांवानें ओळखतात. मी फक्त शब्दकोशांत दिलेले अर्थ सांगितले आहेत.

या पक्षभेदामुळें मनोविनोदात्मक शाहिरी कवनांतील तात्त्विक सारिणींत फरक होऊं शकत नाहीं. पण वादांतल्या आग्रही भूमिकेचा प्रत्यय मात्र येतो. मनोविनोदात्मक शाहिरीचा सर्वसाधारण लोकांशीं संबंध त्या कवनांचे गायनाचे प्रसंगीं. तो गायनप्रसंग दोनचार शब्दांत सांगतां येणार नाहीं. प्रत्यक्ष अनुभवानें त्याची प्रचीति येते. यात्रास्थलाच्या कमी अधिक मान्यतेमुळें लोकसमूह कमी अधिक असणार. अशा लोकसमूहाच्या मध्यभागीं या कवनांचे गायक उभे राहतात. कमींत कमी ती एक जोडी असते. मुख्य गायकाच्या हातीं डफ असतो. त्याच्या साथीदाराजवळच्या तुणतुण्यानें गायनाला स्वराची मदत मिळते. गाणारा डफावर ताल धरतो. तुणतुणेवाला गायकानें म्हटलेलें कडवें पुनः म्हणून श्रोत्यांच्या कानांत पक्कें बिंबवतो व गाणाऱ्याला विश्रांति देतो. पुणें-सातारा प्रांतांत हे दोघे असतात. मराठवाड्यांत चार पांचजण असण्याची रीत आहे. कार्यक्रमासाठीं आलेल्या दोन्ही पक्षांचीं ब्रीदें फडांत उच्चस्थानीं शृंगारून ठेवलेलीं असतात. मोठा डफ व त्यावर निशाण याला ब्रीद म्हणतात. तुरेवाल्यांचें निशाण शुभ्र आणि कलगीवाल्यांचें भगवें किंवा जरतारी असतें.

कलगीतुऱ्याचें भांडण

प्रणवांतला बिंदु तो तुरा. युक्लिडच्या बिंदूच्या व्याख्येशीं सद्दश असें हें स्थान. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर यांनीं ' बिंदुलें ' असा उल्लेख अभंगांत केला आहे.

परमतत्त्व हें निष्कल व सृष्टि ही सकल आहे. हें उभयपक्षांचें अधिष्ठान ध्यानीं
आलें म्हणजे त्यांची तात्त्विक मतप्रणाली समजूं शकते. दोहोंनाहि ज्ञानेश्वरप्रणीत
' ज्ञान ' हें सामान्य आहे. असें असूनहि जास्त उच्चपणा मिरविण्यासाठीं सकल
अशा शक्तिपक्षाची कवनांत हेटाळणी केलेली असते. कलगी पक्षहि या हेटाळणीचा
निरास होईल अशीं प्रत्युत्तराचीं कवनें म्हणत असतो. या तात्त्विक भेदांत वादांचे
मुद्दे अगदीं कमी आहेत. पण त्यांत कांहीं कूटांची भर घालून दोन्ही पक्ष हा वाद
रंगवितात. यामुळें जाणत्या लोकांनीं याला भांडण असें म्हटलें आहे, असें मला वाटतें.

शाहिरांचें शीघ्रकवित्व

येथें दोन पक्षांची परस्पर विरोधी अशी कवनकृति एकामागून एक अशी
ऐकावयास मिळत असतां जो कांहीं परिणाम श्रोत्यांच्या मनावर होतो त्यावर नजर
दिली, तर अमका पक्ष खरा व दुसरा खोटा असा निर्वाळा देतां येणार नाहीं. तें
मुद्द्यांचें खंडनमंडन असलें तरी श्रोत्यांकडून निर्णय मिळणें तात्त्विक मुद्द्याच्या बाब-
तींत अशक्य आहे. कित्येक कूट प्रश्नांचा तात्त्विक मतप्रणालीशीं संबंध नसतो. फक्त
विचारलेल्या प्रश्नांचें उत्तर कवनरूपांत मिळालें पाहिजे असा कटाक्ष असतो. मिळ-
णारें उत्तर तंतोतंत बरोबर आहे किंवा नाहीं यावर फारशी नजर नसते. त्या मुद्द्यासंबंधीं
उत्तर असलें म्हणजे झालें. प्रश्न मुळांतच तत्त्वाचा असला तर मान्य अशा ग्रंथाच्या
आधारानें उत्तर मिळूं शकतें. पण कूटाचें सांकेतिक उत्तर मिळण्याच्या जागा अशा
सर्वमान्य नाहींत. ' मूलस्तंभ ' या नांवानें कांहीं रचना जुन्या संतकवींची म्हणून
प्रसिद्ध आहे. त्यांतले हे प्रश्न बहुधा असतात. कांहीं ज्योतिषशास्त्राचें सहदेवभाडळी
मत म्हणून रूढ आहे त्यांतले असतात. प्रश्न घालणाऱ्या पक्षाजवळ त्याच्या उत्तराचें
कवन तयार असतें. त्याच्या आधाराचें प्रमाण तेंच मान्य, असा प्रकार आहे.
तें अवगत असण्यावर फडांतील यश अवलंबून असतें. उत्तराचें कवन तयार नसेल
तेव्हां तत्काल स्फूर्तीनें कवन रचून तें म्हणून दाखवावें अशी अपेक्षा असते. शीघ्र-
कवित्वाबद्दल या शाखेंतल्या शाहिरांची प्रसिद्धि आहे. त्याचें गमक हें आहे. चालू
जमान्यांतील पंडिती काव्यगायकांच्या बाबतींत असा निर्देश नसतो. पण मागच्या
पिढींत संगमनेरचे भगवंतराव तोडेवाले, नासिकचे बळवंत खंडूजी पारख असे
कांहीं रचनाकार शीघ्रकवित्वासाठीं प्रसिद्ध होते. पण ते ' शाहीर ' नव्हते. इतर
कवींमध्येंच ते मोडत असत. तेव्हां शाहिरांचा असा निराळा वर्ग विद्वानांत मान्यता
पावत नसे. तो प्रकार अगदीं अलीकडे निघालेला आहे. कारण शाहिरी कवनांपैकीं
पोवाडे गोंधळाच्या प्रसंगानें कानावर येत. किंवा स. १८९४ नंतर जी राष्ट्रीय
लाट उसळली तींत अशा सभांच्या प्रसंगीं कोणा वीर पुरुषाचे पोवाडे म्हणण्याची
रीत होती. पण पोवाड्यासाठीं खास कार्यक्रम असा क्वचित् होई. ती जागा
मेळ्यांच्या कार्यक्रमानें कांहीं वर्षें घेतलीं होतीं. पूर्वीच्या इंग्रजांच्या राजवटींत

मेळ्यांवर कडक नजर होती व आतांहि आहे, तिचें बीज येथें आहे. मेळ्यांवर व पोवाड्यांवर भर देऊन प्रचार करण्याचे प्रकार चालू आहेत. पक्षोपपक्षांचे पोवाड्यांचे फड अस्तित्वांत आहेत, आणि त्यांचा उपयोग बिनदिक्कत होत असतांना ही शाहिरी विद्या अथवा कला प्रचारासाठीं वापरूं नये असा विचार मनांत डोकावतो. पण त्या डोकावण्याचा परिणाम कांहीं नाहीं. निराळे फड काढून त्यांच्या द्वारें आपल्या पक्षाच्या मतप्रणालीचा प्रसार करण्याचा पायंडा अलीकडच्या जमान्यांत मुंबईस कामगारांचें हित पाहणारा जो कोणत्या नांवाचा पक्ष होता त्यानें पाडला. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर सत्तारूढ पक्षानें त्याला उत्तर देणारा फड काढला. पण त्यांत स्वयंस्फूर्त कलाकारांचा भरणा होऊं शकला नाहीं. तो प्रकार शेवटीं सोडून द्यावा लागला. पोवाड्यांच्या फडावर न थांबतां मनोरंजक तमाशापर्यंत मजल गेली. पण ती तर आंवळ्यांची मोट ठरली. तमाशा सुधारणा कमिटीनें कामगारांच्या पथकाच्या कलेचें कौतुक केलें, पण प्रचारासाठीं तिचा उपयोग करण्याचें प्रशस्त मानलेलें नाहीं. त्यांत कवनांतली अभिनिवेशाची भाषा व अभिनयांतील टवाळी हे भाग कोणालाहि शांत चित्तानें पाहणें अशक्य होणार हें उघड आहे. करमणुकींत अनेक रंग असणें जरूर हें खरें. त्यासाठीं निरनिराळ्या वागणुकीच्या व्यक्तींची योजना कार्यक्रमांत करावी लागते, पण त्यामुळें वर्गविग्रह-कल्पना उत्पन्न होत नाहीं. पूर्वीं तमाशांत अशी व्यक्तिगत स्वभावभिन्नता दाखविली जाई, पण ती व्यक्ति कोणा वर्गाची प्रतिनिधि आहे असें मानून व्यक्तीचे दोष वर्गांच्या अंगीं चिकटविण्याचें कोणी मनांत आणीत नसे, म्हणून तमाशा सर्व वर्गांना सारख्याच प्रमाणांत मनोरंजक होण्याची सोय होती. राजसत्ता त्यांत कांहीं मुद्द्यांवर नजर ठेवीत असे. तो भाग फार स्थूल होता. प्रचारकी प्रकारांत स्थूलापेक्षां सूक्ष्मावर जास्त भर असतो. त्या त्या जागांवर कटाक्षानें तीव्रता वाढविण्यानें भडक परिणाम घडतो. समजूत पटण्याऐवजीं द्वेष मात्र उत्पन्न होतो व वाढतो. स्वयंसेवक कलाकारांना तें विशेष नडत नाहीं, पण धंदेवाईक कलाकारांना तें फार नडतें. हा अनुभव असलेले लोक शेवटीं या प्रचारकी कार्यक्रमापासून दूर झाले. ही आठवण ताजी असतांना तोच विचार पुन: प्रयोगांत आणण्यानें पूर्वीच्या परिणामांची सुधारून वाढविलेली आवृत्ति मात्र निघेल. हा इशारा केवळ या विद्येच्या व कलेच्या स्वास्थ्यासाठीं देणें मला जरूर वाटतें, इतकेंच समजावयाचें.

शाहिरी कला

शाहिरी वाङ्मयांत विद्या आहे तशीच त्याचा आस्वाद सामूहिक पद्धतीनें घेऊं देतांना कलेची फार जरूर आहे, हें अगदीं क्रमप्राप्त आहे. या कलेंत गेयत्वाला आवश्यक तें संगीत व अभिनय यांचा प्रामुख्यानें समावेश होतो. मनोविनोदात्मक कवनांच्या गायनांत संगीत उत्कर्षानें नसतें. तें अगदीं साधें व आबाल-

वृद्धांना अर्थबोधाला न नडणारें असें असतें. पुणें, सातारा, कोल्हापूर प्रांतांत ठाय
लयींत म्हणण्याची पदपद्धति चालू आहे, तर मराठवाड्यांत जलद लयींतील छंद
अगर कटावपद्धति चालू आहे. अति जलद गतीनें कवन म्हटलें गेल्यास अर्थबोध
होत नाहीं. शब्दाच्या अर्थाचा बोध होऊं न देतां सुराच्या विविध रचनांनीं श्रोत्यांना
भारून टाकण्याची ख्यालगायन पद्धति म्हणजे शाहिरींतील पदपद्धति नव्हे. तर
हरदास-कीर्तनकारांनीं स्वीकारलेली संगीताचा अल्प आधार घेऊन चालविलेली
पद्धति. मनोरंजक शाहिरीच्या कार्यक्रमांत म्हणजे तमाशांत ठाय व जलद लयीचे
असे भेद आहेत. पहिल्या प्रकाराला कडेतंबोरीची साथ घेतली जाते म्हणून त्याला
तें नांव दिलें गेलें आहे. दुसऱ्यांत तुणतुणें व ढोलकी यांची साथ असते. म्हणून त्या
प्रकाराला ढोलकीची लावणी असें नांव आहे. लहान समूहांत म्हणजे बंदिस्त जागेंत
होणाऱ्या बैठकींत पहिला प्रकार खुलवितां येतो, म्हणून त्यासाठीं सोयीचीं कवनें
रचण्याचा प्रघात होता. उघड्या-मैदानांतील कार्यक्रमाला 'फड' असें म्हणत.
त्याहून निराळी ती बैठक. पन्नाससाठ वर्षांपूर्वीं अशा कवनांचे संग्रह शिळा छाप-
खान्यांत छापून निघाले. त्यांत बैठकीचे व फडाचे असे कवनांचे दोन्ही प्रकार
निराळे संग्रहित केलेले आहेत. पहिल्या प्रकारांत हावभाव दाखविण्याला अवकाश
जास्त आहे. गायक स्त्री असेल तर तें भावदर्शन प्रेक्षकांना जास्त पसंत पडणें साह-
जिक आहे. स्त्रीवेषधारी नाचेपोरेहि ही कला आतांच्या संगीत नाटकांतल्या
कित्येक नामवंत नटांप्रमाणें उत्कृष्टपणें दाखवीत असत. मराठी नाटक निघण्याच्या
पूर्वीच्या समाजाला तमाशा हेंच एकमेव असें करमणुकीचें साधन असे. त्यांत
बसणारे सर्व वर्गांतील सर्व दर्जाचे लोक खुष होऊं शकतील इतपत तरी चांगला
अभिनय तेव्हां होत असे. म्हणूनच लोकांनीं त्याला आश्रय दिला. या आश्रय-
दात्यांत विद्वान्, श्रीमंत, सत्ताधीश असे सर्व श्रेणींतले लोक असत. बैठकींत कला-
वंतिणीचीं गाणीं महाराष्ट्रांत अठराव्या शतकाच्या मध्यापासून रूढ आहेत. ती कला
उत्तरेकडून आलेल्या व्यक्तींनीं इकडे प्रभावी केली व स्थानिकांनीं ती त्यांच्या-
पासून शिकून घेतली. तीच गति शेवटीं लावणीगायक स्त्रियांत परिणति पावली.
या लावणीगायनाचा फक्त पेशवाईशीं संबंध ठेवण्याचा अट्टाहास झाला आहे,
पण त्यामुळें या कलेच्या परंपरेच्या प्रवासाचे टप्पे दृष्टिआड झाले आहेत. पेशवाई-
नंतर सर्व सत्तेचें व समृद्धीचें केंद्र पुण्याऐवजीं मुंबई हें शहर झालें. तेथें पुन्हा
पुण्याकडच्या लावणीगायकांनीं आपला प्रभाव पाडला होता. ते फड विशेष करून कडे-
तंबुरीचे असत. पुणें व मुंबईमधील दळणवळण रेल्वेमुळें वाढल्यानंतर पुनः पुण्यास
केंद्र वाढूं लागलें. तेव्हां म्हणजे इ. स. १८६० च्या थोडेंसें अगोदर पुण्यास तमाशाचे
कार्यक्रम लोकप्रिय झाले होते. साहजिकच त्याच्या आश्रयदात्यांत पूर्वीप्रमाणें सर्व
दर्जाचे लोक असत. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचें नांव यासंबंधांत येतें तें प्रतीक
रूपानें समजावयास पाहिजे. आतांच्या पदवीधर प्राध्यापकांची जागा तेव्हां शिक्षकां-

कडे होती. तसेंच वकील, दुय्यम न्यायाधीश (मुन्सफ), डॉक्टर हा सुविद्य वर्ग श्रोत्यांत भाग घेत असे. माझ्या माहितीप्रमाणें पुण्याचे कै. डॉ. भिकाजी अमृत चोभे यांचा लावणीसंग्रह प्रसिद्ध होता. आतां तो कोणाजवळ आहे तें मला माहीत नाहीं. सुशिक्षित व प्रतिष्ठित लोकांनीं असे कवनसंग्रह केले म्हणून हें वाङ्मय आज उपलब्ध होऊं शकत आहे. ते संग्रह विपुल आहेत असें नाहीं. अल्प प्रमाणांतच आहेत. पण त्यावरून तें वाङ्मय कोणीं आमच्याविषयीं विरोधी वृत्ति धरणारांनीं जाणूनबुजून नष्ट केलें असा निर्णय करण्याला आधार नाहीं.

शाहिरीचे संग्राहक

या सुशिक्षित वर्गाखेरीज या कवनांचा संग्रह करणारा दुसरा वर्ग म्हणजे त्यांच्याविषयीं आवड धरणाऱ्या सर्वसाधारण लोकांचा. त्यांच्या संघाला अगर समूहाला आखाडे असें नांव रूढ होतें. ही कल्पना महाराष्ट्रांत कुस्तीच्या संबंधांत परिचित आहे. तो शब्द जरी निवळ मराठी नसला तरी त्यानें ओळखली जाणारी वस्तु निराळ्या नांवानें महाराष्ट्रांत रूढ असणें अशक्य वाटण्याला कारण नाहीं. आतांच्या सोशल क्लबची अगर हौशी नाट्यमंडळांची त्यांच्याशीं तुलना होऊं शकते. शाहिरींतल्या अशा आखाड्यांचे उल्लेख कित्येक कवनांत आहेत. या आखाड्यांत आपापले विशेष असें वाङ्मय अगर कार्यक्रमप्रणाली अभ्यासली जोपासली जाते. याकारणानें तेथें त्या वाङ्मयाच्या प्रती लिहून ठेवल्या जात असत. असे आखाडे होते इतकेंच नव्हे तर अजूनहि आहेत. त्यांची साक्ष थोड्याशा निरीक्षणानें पटूं शकते. या संघसदृश आखाड्यानें तयार करून ठेवलेल्या कवनसंग्रहांचा उपयोग पुष्कळच होऊं शकतो. यावरून इतकें समजावयाचें कीं, हें वाङ्मय अजीबात नष्ट झालेलें नाहीं, होऊं शकणार नाहीं.

आतांपर्यंत लिखित वाङ्मयाचा विचार झाला. आतां त्याच्या परामर्शाच्या पद्धतीचा विचार होणें जरूर. हें वाङ्मय मुख्यत्वें गेय आहे. त्याच्या गायनाचा कार्यक्रम होईल तेव्हां त्याचें गुणगान श्रोत्यांना कळावयाचें, त्याला प्रसंग पाहिजे. भिन्नभिन्न रसांचा आस्वाद भिन्नभिन्न वातावरणांत घेणें शक्य व जरूर अनुकूल व शोभेसें कारण असल्याखेरीज कोणतीहि कृति योग्य ठरत नाहीं. तशी कृति होण्याला प्रसंग पाहिजे. शाहिरी कवनांचा आस्वाद योग्य प्रसंगांत घेतला तर शोभेल. समाजांतील विचारवंतांनीं त्यासाठीं निरानिराळे सण आणि उत्सवप्रसंग रूढ केले. केवळ कृति निर्माण झाली आहे, तिचा आस्वाद घेण्यासाठीं प्रसंग निर्माण करण्याचा हल्लींचा काळ आहे. पण त्यांत अपवाद होऊं शकतो. म्हणून हें प्रकरण प्रवाही झालें आहे. स्थिरता व गति हीं दोन्हीं पोषक आहेत. पण त्यामुळें निरनिराळीं म्हणजे विरोधी भासणारीं गमकें उत्पन्न होतात. तीं प्रत्येक वेळीं

अंतिम मूल्याशीं संबंध ठेवून असतातच असें नाहीं. पण तसा समज करून देण्याकडे कल असतो असा अनुभव येतो.

निरनिराळीं मूल्यें कायम असतांना त्यांचा समन्वय करणें अशक्य. यामुळें एका काळांतील मूल्यांच्या आधारावर भिन्न काळांत गुणांची छाननी करणें योग्य होत नाहीं. शाहिरी वाङ्मयाची तशी स्थिति झाली आहे. आम्हांला त्याचा आस्वाद घेण्याची इच्छा झाली आहे. यासाठीं तें वाङ्मय आम्हांला दाखवा असें म्हणणाऱ्यांचें समाधान करणें शक्य नाहीं. तो प्रसंग नाहीं, तें वातावरण नाहीं. मूल्यें निश्चित नाहींत. अशा स्थितींत होणारे कार्यक्रम हेतूची पूर्तता करूं शकत नाहींत. मराठी शाळेच्या बक्षिससमारंभांत होणाऱ्या संवादरूपाच्या कार्यक्रमांशीं तुलना केल्यास माझा आशय समजेल. मध्यंतरीं खंड न पडतां प्रवाह कायम राहता तर पुढें झालेले फरक इतक्या तीव्रतेनें भासले नसते, पण काल कोणाकरितांहि थांबत नाहीं.

हा विचार करून शाहिरी वाङ्मयाचें दर्शन घेणें व घेवविणें इष्ट आहे, असें मला वाटतें. तो विचार शिल्लक न ठेवतां त्याची उपपत्ति व त्याचें मूल्यमापन सुरू झाल्यानें अनवस्था प्रसंग आला आहे. संस्कृत नाटकांतील निरनिराळे उल्लेख पाहून त्यावरून सर्वसामान्य सिद्धान्तरूप अभिप्राय प्रकट करण्यांत येतात. त्याचेंच अनुकरण या शाहिरीबाबतींत झालें आहे. तें अर्थात् यथातथ्य रूप प्रकट करण्यास अपुरें पडणार, किंबहुना विपरीत रूप दाखविण्यास साहाय्यक झाल्याचें माझ्यासारखें कोणीं म्हटलें तर जो अनुभव येतो, तो कोणाच्याहि वांट्याला येऊं नये असें मला मनापासून वाटतें. अभ्यासानें सर्व कांहीं ग्रहण करतां येतें हें खरें. पण तो अभ्यास कलुषित अगर विपरीत दृष्टीनें झाला तर वास्तविकाशीं द्रोह होण्यांत त्याचें पर्यवसान होऊं शकतें असें मीं म्हटलें तर त्यांत चुकलें कोठें ? हल्लीं तो प्रकार चालू आहे, म्हणून हा विस्तार करावा लागत आहे.

जिथचें तिथें

शाहिरी वाङ्मयाचा आस्वाद घेण्याला निरनिराळ्या शाखांच्यासाठीं निरनिराळे प्रसंग असत व आहेत. आतां त्यांत गल्लत सुरू झाली आहे. गोंधळी हे बहुढंगी लोक. ते निवळ देवधर्माचे कार्यक्रम करणारे. लग्नकार्याचे प्रसंगीं शेवटीं गोंधळ हा कार्यक्रम बहुधा सर्व थरांत आहे. त्या गोंधळांत मुख्य कवनें देवाविषयींचीं. पण तीं ऐकून झाल्यावर पोवाडे ऐकण्याची इच्छाहि गोंधळी पुरवितात. पण लावणी मात्र तेव्हां म्हणत नाहींत. ती निराळ्या प्रसंगानें पूर्ण करण्याचा प्रघात जो पडला आहे त्यांत अजून फरक नाहीं. फरक झाला आहे तो फक्त तमाशांत गोंधळाचा नमुना दाखविण्याचा; आणि तोहि विशेष प्रसंगीं म्हणजे तमाशा-परिषद् अथवा तमाशा-महोत्सव अशा वेळीं हा प्रकार घडल्याचें आतां दिसतें. भारुड

म्हणण्याचा वास्तविक तमाशाशीं कांहीं संबंध नाहीं. पण त्याचें दर्शन महोत्सवांत नुकतेंच झालें. हा प्रकार घडल्याचें पाहून 'गल्लत' असें मी म्हणतों. यांत अप्रयोजकत्वाची प्रचीति येते असें माझ्यासारखा कोणी म्हणाला तर त्याच्यावरच उलट गहजब होईल. एक कधीं न ऐकलेली, न पाहिलेली नवी नवाळी अशी कलात्मक कृति समाजापुढें येण्यांत कांहीं बिघडत नाहीं. तें त्या कलेला उत्तेजन दिल्यासारखें आहे. पण तसें करूं जातांना अडाणी गणले जाणारे कलाकार योजकांना हसणार नाहींत, याची खबरदारी घेणें जरूर. पण घडतें तें अज्ञानामुळें, असें कोणीं म्हटलें तर योजकांना तें खपत नाहीं. त्याचा परिणाम मात्र अशा उत्सवांकडे संतवाङ्मयाच्या प्रेमिकांकडून अनादरानें पाहण्यांत होतो. तें शाहिरीला परवडणार नाहीं. इतका तरी स्पष्ट इषारा मला देणें जरुरीचें वाटतें.

शाहिरी वाङ्मयाचें साकल्यानें निरीक्षण करतांना मीं प्रथम त्याचे मनोविनोदात्मक, मनोरंजक व कीर्तिकाव्य असे भाग पाडले. त्या पृथक्करणावर दृष्टि न ठेवतां, म्हणजे त्यांतील गुणांच्या भिन्नतेवर लक्ष न देतां एकाच अंगाला तिन्ही अंगांनीं पूर्ण असें मानून पुढील व्यवहार चालू राहिला हें या सर्व प्रकाराचें कारण आहे. माझी नजर विश्वविद्यालयानें स्वीकारलेल्या 'शाहिरी' या नांवावर होती. मीं तेंच उचललें, आणि तेंच मला नडलें. अशी गल्लत जर कोणी रूढ वाङ्मयप्रकारांत करूं जाईल तर त्याची अवस्था काय होईल याचा विचार झाला नाहीं.

या विचारावर मी घोटाळत बसलों आहे तो कां, याचा उलगडा आपोआप होण्यासारखा आहे. पण तो करून घेण्याची तयारी दाखविण्याला जबाबदार सुशिक्षित वर्ग तयार नाहीं. केवळ एकांगी विद्वत्तेच्या आधारावर सर्व कांहीं साध्य होऊं शकतें असा भ्रम उत्पन्न झाला आहे. केवळ शाहिरीपुरताच तो झाला आहे असें नाहीं. आपल्या संस्कृतीशीं संबंध ठेवून असणाऱ्या अनेक बाबी अशा भ्रमाच्या जंजाळांत सांपडलेल्या दिसतात. त्याचा प्रत्यय येत असतांहि त्याकडे डोळेझांक करून सध्यांचा जबाबदार सुशिक्षित वर्ग वागत आहे, हवें तसें उलटेंसुलटें प्रतिपादन करीत आहे. अंतर फार मोठें आहे. हें ध्यानीं न घेतां तापुरत्या कलाटण्यांनीं काम भागेल असा गैरसमज पसरविला गेला आहे. जात आहे, यामुळें कांहीं ठराविक प्रश्नांची चर्चा होण्याची लाट मधून मधून उसळते. त्यांतून निष्पत्ति अथवा निर्णय मात्र कांहीं निघत नाहीं. हल्लींचे परिसंवाद स्थिर निर्णयाला साहाय्यक होत नाहींत. भोंवऱ्यांत सांपडलेल्या गवताच्या काडीसारखी अवस्था झाली आहे.

इतक्या व्यापक क्षेत्रांत शिरण्याचें वास्तविकपणें कारण नव्हतें, पण प्रस्तुत विषयाशीं त्याचा घनिष्ठ संबंध आला आहे. त्यामुळें हें बोलणें प्रासंगिक होऊं शकेल. या विषयाचा विचार सुरू करतांना मला तो सर्व भाग आपोआप दिसूं लागला. विश्वविद्यालयांत शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास आणि तमाशावर बंदी या दोन्ही

बाबी जवळ जवळ एकाच कालांत आल्या. त्यांत चित्रपटांत ' रामजोशी ' या लावणीकाराचें कथानक आलें हें निमित्त मोठें परिणामकारक झालें. मराठी वाङ्मयाचा अभ्यास अगदीं निराळ्या दृष्टीनें सुरू झाला. त्याचा चांगला परिणाम व्हावा अशी उमेद प्रथम वाटली. परिणाम मात्र आवर्तांत झाला. माझ्या आठवणी-प्रमाणें हा धोका कै. पांगारकरांनीं पूर्वींच सूचित करून ठेवला होता. त्यांची तेव्हां हेटाळणी झाली, पण त्यांचा इषारा खरा होता हें आतां अनुभवास येत आहे.

शाहिरी वाङ्मयाच्या आस्वादासाठीं होणाऱ्या कार्यक्रमांत गेयत्वाला पोषक अशा बाबींचा विचार केल्यावांचून हें अवलोकन पुरें होणार नाहीं. गेयत्वाला साधन होणाऱ्या बाबी म्हणजे गीताचे छंद, सूर व लय यांसाठीं वापरलेलीं उपकरणें. शाहिरी हें लोकगीत आहे याविषयीं दुमत नाहीं. तेव्हां त्यांतले छंद पंडिती वाङ्मयांतल्या वृत्तापेक्षां निराळे असणें कांहीं अस्वाभाविक नाहीं. शास्त्रीय संगीत म्हणून जें कांहीं फार पूर्वीं असेल तें अनुभवास आणून देण्यांत कोणत्या ' रीति ' अथवा ' जाति ' वापरीत असत त्यांचा उल्लेख अजून कोणी स्पष्ट करीत नाहीं. पण एक स्वराच्या आधारांतून तीन अथवा पांच स्वरांचा प्रवास करून परत ठिकाणावर येतां येईल इतक्या बेताच्या पंक्ति असाव्या. हें सहज ध्यानीं येण्या-सारखें आहे. संस्कृत नाटकांत गेय भाग म्हणून श्लोक व क्वचित् चूर्णिका असतात. त्यांचें गायन करण्याची जी कांहीं पद्धति तेव्हां असेल तिचा जो अवशेष स्मृतींत राहिला होता, त्याचा अवलंब मराठी वृत्तांच्या गायनांत झाला असला पाहिजे. त्याला ताल नसला तरी लय होती. महानुभाव पंथीय वाङ्मयांत उल्लेखलेले पद, गीत, धुवा हे तीन गेय प्रकार आतां रूढ असलेल्या तत्सदृश प्रकारांशीं ताडून पाहून कांहीं गमकें बसविलीं पाहिजेत. त्यांचा विस्तार अन्वय, व्यतिरेक पद्धतीनें करतां येईल. पण संगीत नाटकें दोन पिढ्या रूढ असतांना व मराठी नाट्यसंगीतानें अग्रस्थान मिळविलें असतांहि त्या मुद्द्यावर अधिकारी व्यक्तींनीं लक्ष दिल्याचें अनुभवास येत नाहीं. ही सांखळी जुळविल्याखेरीज वाङ्मयाचें निरीक्षण पूर्ण झालें असें म्हणतां येणार नाहीं.

पोवाड्यांत व वगाच्या लावणींत योजलेली चाल शिंगणापूरच्या महादेवाचे गायक ' दांगड ' यांच्या गायनाची आहे. सध्यां रूढ असलेली ढोलकीची लावणी त्या प्रदेशांत निर्माण झाली आहे, फोफावली आहे. कन्नड भाषेंत जें डफगाणें म्हटलें जातें तेंहि मराठी डफगाण्याच्या चालीवर. उत्तरेकडे ' लावनी ' म्हणून जो गेय ' लोकगीत ' प्रकार रूढ आहे त्याची चालहि अशीच असते. स्वर व लय यांचा आधार कायम ठेवून तीन शब्दांत गायन कसें करतां येतें याचें प्रात्यक्षिक कोल्हापूरचे श्री. बाबूराव जोशी वकील करून दाखवितात, तें फार महत्त्वाचें आहे. अगदीं दक्षिणेकडील मराठी वसतीचें केंद्र ' तंजावर '. तेथील शरफोजी राजांनीं आपल्या तीर्थयात्रांच्या

वर्णनांच्या कवनांचा एक दीर्घ संग्रह रचला आहे. त्यांतील शब्दयोजना मराठी लावणीचीच आहे. या राजानें मराठी लोकगीतांचा परामर्श आदरपूर्वक करून त्यांचें शुद्ध स्वरूप राखण्याचा व तें रूढ करण्याचा अट्टाहास केला होता. तो लावणीसंग्रह मद्रास सरकारनें खर्च करून अलीकडे (इ. स. १९५०) प्रसिद्ध केला. त्याबरोबर अनेक कूटकवनें 'लोकगीत' या शीर्षकाखालीं प्रसिद्ध केलीं आहेत. त्या दोन्ही पुस्तकांचा परिचय 'केसरी' पत्रांत आला होता. पण त्यांत सांपडणाऱ्या गमकांचा उपयोग ग्रंथकारांनीं करून घेतल्याचें दिसत नाहीं. महाराष्ट्र सरकारनें मद्रास सरकारचें अनुकरण करण्यास हरकत कांहींच असणें शक्य नाहीं. रीतिगायनाची सांखळी मराठी लावणीशीं जोडणें शिल्लक असतें तरी त्या गायनाचीं साहाय्यक हत्यारें चिंतनीय आहेत. सुरासाठीं तुणतुणें हें आतां नव्यानें वर्णन करण्याला कारण होण्यासारखें वास्तविक नसावें. तें नर्मदेच्या दक्षिण भागांत आहे. उत्तरेकडे त्याची जागा एकताऱ्यानें घेतली आहे. एक चपटा भोपळा, दांडी व एक तार यांनीं सज्ज केलेलें हें वाद्य तिकडे भजनासाठीं व करमणुकीसाठीं वापरतात. हार्मोनियमहि आतां तिकडे रूढ आहे. एकताऱ्याला एक तार असल्यानें एकाच तालाकडे व सुराकडे गायकाचें गाणें वेधलें जातें. ही अडचण दूर व्हावी आणि सूरभरणाहि जास्त व्हावा म्हणून एकाखालीं एक अशा दोन तारा लावलेले पण 'एकतारी' हें नांव कायम राहिलेलें वाद्य सराईत भजनसांप्रदायी लोक वापरतात. महाराष्ट्रांत तो प्रकार क्वचित् आढळतो. गोंधळांत हा 'ताऱ्या' वापरीत नाहींत. त्यांत तुणतुणेंच वापरतात. पूर्वी मराठी नांव 'तुणतुणी' असें होतें. पुरुषी आवाजाचा सर्वसाधारण आधार स्वरपेटीची दुसरी काळी पट्टी असतो. त्या षड्जाच्या मध्यमाचा षड्ज करून तुणतुण्याची तार लावतात. यामुळें साधारण गायकांना तो सूर चढा वाटतो. डफगाण्यांत प्रथम गण म्हणतात तेव्हां हा स्वर किंचित् खालीं असतो. नंतर पदगायनांत तो चढवितात. तमाशांत स्त्री-पुरुषमिश्रित संच असतो. सर्वांना झेपणारा स्वर लावणें जरूर असतें. स्त्रियांच्या स्वराची नक्कल करणारे कांहीं थोडेसे पुरुष-गायक असतात. त्यांच्या आवाजाला गळी आवाज असें म्हणतात. तालासाठीं महाराष्ट्रांत ढोलकी असते. ती त्या उंच स्वरांत लावतात. हालगी म्हणून डफाची लहान आवृत्ति असते तिचाहि उपयोग ढोलकीच्या बरोबर होतो. मराठी ढोलकी ही हिंदुस्थानी ढोल व मृदुंग या दोहोंच्या मधली पायरी आहे. ती कर्नाटकांतून वर आलेली असावी. डफगाण्याच्या कार्यक्रमांत तालासाठीं डफाचा उपयोग होतो, पण त्यानें ठाय लय सांभाळली जाते. त्याहून दुपटीची लय संभाळली जावी म्हणून मराठवाड्यांत ढोलकीचाहि डफाबरोबर उपयोग करतात. त्या गायनपद्धतीला 'छंद' पद्धति असें म्हणतात. ठाय लयीची पद्धति ती 'पद' पद्धति. शब्दांचा शांतपणें स्पष्ट उच्चार होऊन ऐकणाऱ्याला त्यांचें आकलन होण्याला ठाय लयीची जरुरी. तुणतुणें

व ढोलकीच्याबरोबर ताल कायम ठेवण्याला लहानशी झांज अथवा टाळहि उपयोगी पडते. लहान आकारामुळें चढ्या सुरांत तिचा आवाज चांगला मिसळतो. ढाल्या स्वराची झांज या कार्यक्रमाला स्वरभेदामुळें उपयोगी पडत नाहीं. आतां तमाशांत या वाद्यांना पूरक म्हणून क्लारिओनेट व ट्रायंगल हीं वाद्यें वापरतात. व्हायोलिन व सारंगी हीं वाद्यें अजून रूढ नाहींत, पण पेटीतबला आला आहे.

वरील हत्यारें जलद लयीच्या लावणीगायनाला उपयोगी पडत असल्यानें हल्लीं महाराष्ट्रांत सर्वत्र जास्त रूढ असलेल्या ढोलकीच्या तमाशांत वापरांत आहेत, म्हणून त्यांचें वर्णन प्रथम केलें. या जलद लयीच्या लावणीगायनाहून निराळा असा प्रकार तो कडेतंबुरीचा. त्याची उत्पत्ति उत्तर पेशवाईंत झाली असें श्री. य. न. केळकर यांचें मत आहे. त्याच्या विरुद्ध पुरावा उपलब्ध नाहीं, तेव्हां तें मत ग्राह्य करण्याला कांहीं अडचण नाहीं. येथें संगीतशास्त्राचा प्रांत आला. त्यासंबंधांत धागेदोरे जुळविण्याचे शिल्लक आहेत. सध्यां तमाशांत 'संगीत बारी' या नांवाचा एक भाग असतो. त्यांत वास्तविक ठाय लयींतील लावणी म्हणणें योग्य, पण तें आतां गेल्या पंचवीस वर्षांत मागें पडलें. त्याची जागा हिंदी सिनेमांतील अति उत्तान हावभाव होण्याला अवकाश असणाऱ्या गीतांनीं घेतली आहे. सुरुवात उर्दु गझलापासून झाली. आतां गझलहि गेले, आणि भडक अभिनयाचीं सिनेमा गीतें आलीं. तो भाग मराठी तमाशाचें हें स्वरूप दाखविण्याला पोषक नाहीं हें उघड आहे. पण तमाशा कार्यक्रमाच्या श्रोत्यांत बहुसंख्य लोकांच्या अभिरुचीच्या पातळीवर नजर ठेवून हा प्रकार चालू आहे. उंच पातळीवर जावें असें म्हणणें सोपें, पण त्यामुळें धंद्यांत घट येते ती उच्च अभिरुचीचे प्रेक्षक भरून काढतील अशीं चिन्हें नाहींत. ग्रंथांतलें वाङ्मय प्रत्यक्ष प्रयोगांत न दिसल्याचा परिणाम गैर-समज पसरविण्यास कारण झाला आहे.

आतां अभ्यासल्या जाणाऱ्या वाङ्मयांतील बहुतेक भाग अशा संथ लयींत म्हणण्याच्या कवनांचा आहे. त्यासाठीं भावदर्शक शब्दप्रयोग आहेत. पण ते तशा स्वरांत म्हटले गेले पाहिजेत. त्याला संगीतशास्त्राची साधना करणें जरूर. हल्लींचा गायकांचा संच त्याविरुद्ध पद्धतींत तरबेज आहे. पण त्या संचाला संथ लयींत शास्त्रोक्त पद्धतीचें लावणीगायन खुलवितां येत नाहीं. आतां पोक्त वयाचीं स्त्रीपुरुष कलाकार माणसें नमुन्यासाठीं विशेष प्रसंगांत तो प्रकार करून दाखवितात. पण त्याकडे पुरेसें लक्ष सर्वसाधारण प्रेक्षकांचें जात नाहीं. 'हलकेंफुलकें' व भडक प्रत्येक क्षेत्रांत मान्यता पावत आहे. त्याचा परिणाम भोगावा लागल्यावांचून राहणार नाहीं. संस्कृत वाङ्मयाच्या बाबतींत जी निराशा झाली, तशी मराठी शाहिरीच्या बाबतींतहि झाली, तर त्यांत आश्चर्य कसलें ?

परिशिष्ट १

हैबती शाहिराची परंपरा

आतां आमची गुरुवंवसावळ आनावी ध्यानाला ।
आधिनाथाचा शिष्य चैतन्यनाथ म्हणती ज्याला ।
चैतन्यनाथाचे गोपाळनाथ त्याचेच हैबतीनाथ ।
हैबतीचा जोती गोपाळ अजिंके सर्वाला ।
जोती गोपाळाचा शिष्य कोंडिबा शाहिर कलगीवाला ।
कोंडिबाचा शिष्य बाबाजी ज्ञाणी म्हणती त्याला ।
बाबाजीचा शिष्य गणपती माहित अवघ्याला ।
गणपतीचा शिष्य मारुती कवित्व करण्याला ।
मारुतीचें ज्ञान तात्याबा बंधु खाशाबाला ।
नबीलाल खाशाबा करिती वैऱ्यावर हल्ला ।
नादध्वनीचा सुर जमवुन ज्ञाण गायन करिती ।

या कवीचें नांव अज्ञात आहे.

♣ ♣ ♣

परिशिष्ट २

मनोविनोदात्मक शाहिरींचे रचनाकार व गायक

याखालीं दिलेली माहिती पुणें, सातारा, सोलापूर प्रांतापुरती आहे. ती श्री. आबाजी गुंडाराम मोरे शाहीर यांजकडून मिळाली.

शाहिराचें नांव	स्थळ	पक्ष
संभु राजू	भिलवडी	तुरेवाले
गुंडुबाळा	,,	,,
नाथा पिराजी माने	भुडलेंगरे	,,
जानमहमदभाई	सातारा	,,
रामचंद्रपंत दळवी	खेड	,,
कृष्णा दादा ढोर	दिघंची	,,
हैबतीबुवा	पुसेसावळी	कलगीवाले
काशिनाथ मार्तंड	काराजंगी	,,
बजरंगवाणी	शिंगणापूर	,,
भसाप्पावाणी	नाझरेबडवडी	,,
वाणी	कुंडल	,,
लहिरी हैदर	कोल्हापूर	,,
बंडू दरवेश	कऱ्हाड	,,
माळी	वाई	,,
खंडू शेटी	फलटण	तुरेवाले
भिवा महार	काळज	,,
सावळा नारू	,,	,,
रामा गोविंदा	फोंडशिरस	कलगीवाले
ओंकारगिरी	मिरढें	,,
बजरंग भारती	धर्मपुरी	,,
दादा पाटील	मोही	,,
वामनराव	पंढरपूर	तुरेवाले

मलसिद्धय्या	पंढरपूर	तुरेवाले
गौरू माळी	शेळगांव	,,
रूपचंद गुजर	माढें	,,
यशवंत माळी	करमाळें	,,
राघू धवशा	माहुरगड	तुरेवाले
चांदभाई	पुणें (महानुभाव)	कलगीवाले
बापू हरिजन	पुणें	तुरेवाले
आदिनाथ सांप्रदायिक	पाडेगांव	,,
आंदु राघू रामोशी	महिमानगड	कलगी
कोंडी रंभाजी	शिंदीभांडवली	तुरेवाले
तात्याबा शिंदे	वारूगड	कलगी
तुकाराम फडतरे	खटाव	तुरेवाले
बाळा धोत्रे	घारपुडी खातगुण	कलगी
गणेशगिरी	पिराचे खातगुण	,,
महादू खाटिक	पुसेगांव	तुरेवाले
मारुति शिंदे	लाडेगांव	कलगी
पांडू काळे	लोणीभोसरें	,,
शिवा हरिजन	तासगांव	तुरेवाले
मारुति शिंदे	वझरडे	कलगी
साधू देवजी	माळाची अनवडी	,,
महादू हरिजन	आंबोडेपिंपोडें	,,
पिराजी हरिजन	लावंगार करंजे	तुरेवाले
सुल्तानभाई पिंजारी	मलवडी	,,
बापू पंढित हरिजन	म्हसवड	कलगी
लघू मारुती हरिजन	कुकुडवाड	,,
जोती न्हावी	कटफळ	,,
दिगंबर अंबिके	वडूज	,,
दासगणू	पंढरपूर	,,
संतराम तेली	रहिमतपूर	,,
बजरंगबुवा तेली	,,	,,
शिरपा माने	,,	,,
भाऊ कासार	,,	,,
मारुती माने	,,	,,
गोविंदा रसाळ	कलेढोण मायणी	तुरेवाले

एकनाथ तेली	लेंगरें	तुरेवाले
ज्ञानोबा माने	,,	,,
मारुती काळे	आंधळी	,,
गेनु माळी	,,	,,
गोपिनाथ सोनार	,,	,,
बाळा मारुती	,,	,,
आबाजी मोरे	,,	,,
आमीनभाई	बारामती	कलगी
गंगाराम कोष्टी	सावळीकोर्टी	,,
तुकाराम भोई	बारामती	,,
बुवा रावळ	बारामती	,,
धोंडीबा कोष्टी	,,	,,

अहमदनगरकडील शाहिरांचीं नांवें.

रामचंद्र पंडित	साकुरी	तुरेवाले
देवंग बाबाजी	भिंगार	,,

पिराजी कारंजकर, राघो रंगेल, सीताराम, विठ्ठल लक्ष्मण, महादेव शेडगे, गणपत खंडूजी चौरे माळी (वडगांव अमली), विठ्ठल (पानोली), हरिभाऊ (मढेगांव), वामन कृष्ण (कान्हूर), भागुजी किन्ही, काशिनाथ (पिंपरखेड), गंगाराम माळी (ढवळपूर) इत्यादि.

परिशिष्ट ३

शाहिरी कलावंत पुरुष

तमाशांत भाग घेणाऱ्या पुरुष कलावंतांची नामावळी कै. पठ्ठे बापूराव रेटरेकर यांनीं एका लावणींत गुंफिली आहे. ती अशी—

नंद गोकुळीं छंद लागला नाद गौळणीचा। आधीं नारायण विष्णु ओंकार मी अवतार त्याचा ॥ १ ध्रु. ॥ बळिराम हा कळीचा गे बंधु शेष आधीं मूळचा । बज्या वांकडा पेंद्या सुदामा मी यादव गोकुळीचा ॥ २ ॥ अंब्या माळी ग लिंब्या तांबोळी रंभ्या साळ्याचा । अंतु येताळा संतु गोपाळा चिंतु कोळ्याचा ॥ ३ ॥ रामा धर्मा नामा भरमा उमाजी अंतरचा । मी गोरा आणि संभ्या काळा आहे कवलापुरचा ॥ ४ ॥ उत्ताणखाट ग्यानुभाट पाडळी हेळगांवचा । हिजड्यावाणी ब्रोचका ओवळतो सावळ्या महागांवचा ॥५॥ आब्या येथेऱ्या आणि सख्या जुनऱ्या सुभान्या कोल्हारचा । नाम्या घोलवड्या हैबत्या सोंगाड्या बुधाजी डिंगुरचा ॥ ६ ॥ बाळ्या मांगाचा काळ्या भंग्याचा भाग्या महाराचा । धोंड्या कवठ्याचा कोंड्या कुसगांवचा पांड्या कुरकुमचा ॥ ७ ॥ आशन्नादादा हिराणा एकदा बोल एकेळ तुमचा । प्रसंग पडला सर हाजी कासम आहे सावकार आमचा ॥ ८ ॥ कवठ्या बाबू सुल्तान जाबू बांगडिच्या धीरा-वरचा । सावळ्या म्हराटा दगडूबेटा वेडा औरंगपुरचा ॥ ९ ॥ बचऱ्याचा धोंड्या शिवण्याचा खंड्या दगड्या सखुबाईचा । भाऊ बापू मांग नारायण-गांवकर बापु पुणेकर आमचा ॥ १० ॥ कैऱ्या गैबी नाऱ्या धोबी बाब्या म्हैदाचा । जोत्या वाघेरी मोत्या डोंबरी तात्या शिंद्याचा ॥११॥ करीमभाई बुऱ्हाण हालवाई कसाइ वांद्याचा । रुस्तुम काझी पेस्तुम दरजी माहिम दादरचा ॥१२॥ शंकर वाणी अकबर मुलाणी दिनकर ब्राह्मणाचा । गब्दुल झालाय डुलत चाललाय अबदुल मुमनाचा ॥१३॥ हासन कलाल हुसेन दलाल किसन होलाराचा । पिर्वती चिवस्या मारुती कवड्या हलालखोराचा ॥१४॥ शिवा खेडाचा भिवा वाड्याचा लव्हा मूळचा वऱ्हाडचा । डबरी लक्ष्मण अंगचा सुलक्षण नट मांबुडर्याचा ॥ १५ ॥ महाद्या चांभार साध्या कुंभार दाद्या लोहाराचा । चंद्या पिंजारी बंद्या वंजारी गंद्या उकलवाराचा ॥ १६ ॥ साहेब्या घडशी महिब्या जोशी बाब्या कसाइचा । कंठ्या भिल कंठ्या तांडेल गोंद्या गोसाव्याचा ॥१७॥ बाबू कुरणकर शिवा तासगांवकर तुरेवाला

सर आंगचा । उमा नान्नीचा तुकाराम वऱ्हाडया ताडया हल्गीचा ॥१८॥ जयवंता एक पट्टशिष्य संभू गोपाळाचा । आवजी कृष्णा बनपुरीचा त्याचा नखरा कायमचा । पुण्यांत शमसुदिन कवी शामभाई रहाणार गुजरीचा ॥१९॥ संभू राखू कोष्टी भिलवडिचा कवीश्वर गुरुघरचा ॥ २० ॥ कवी हैबती पुसे सावळी माथ्या लेंगऱ्याचा । भाऊ फक्कडकर हाऱ्या वडगांवकर धंदा चोरा-पुरीचा ॥ २१ ॥ उमा चांडोलीकर गुणाजीमास्तर शंकर अवसरीचा । लाखों सोंगाडयावरती पगडा दगडू साळ्याचा ॥ २२ ॥ वरल्या आळीचा कणखर फळीचा मालक भरण्याचा । अट्टल कवींत पट्टे बापूराव आहे कुल्कुर्ण्याचा ॥ २३ ॥

या मालिकेंतील कांहीं नांवें भेदिक व डफगाणीं रचणाऱ्यांचीं आहेत. उदा. हैबती पुसेसावळीचा व संभूराजू भिलवडीचा हे रचनाकार कवि होते, तमासगीर नव्हते.

(बापूराव जिंतीकर प्रकाशित लावणीसंग्रह भाग २ पृ. २३)

परिशिष्ट ४

शाहिरी कलावंत स्त्रिया

तमाशांत कामें करणाऱ्या स्त्रियांची नामावळी कै. पठ्ठे बापूराव रेटरेकर या सुप्रसिद्ध लावणीकारानें एका लावणींत गोंविली आहे. ती अशी—

आज दुपारीं मथुरेबाजारीं जाणार चंद्रावळी। स्त्रियांचा मेळा सहस्र सोळा उभा केला वेशीजवळीं ।।ध्रु.।। रंगु माळ्याची गंगु साळ्याची। न्हायी भागी तांबोळी। तानी सोनारिण। राणी महारिण। चांभारिण गोकुळी ।। २ ।। सैना धनगरिण। बैना सनगरिण। बैना ल्व्हारिण काळी। आकी सुतारिण। बकी आतारिण। ठकी वतारिण खुळी ।।३।। गजी न्हाव्याची बजी भुयाची। जिजी गुरवाची साळी गौळ्याची मथी आणि गोंधळ्याची सिती। गिती रजपुताची कवळी ।।४।। हावाई वंजारिण। सवाई कंजारिण। गवाई पिंजाऱ्याची धुळी। पाथरवटिण सुंदरा भटिण। चंद्रा महारिण पौळी ।।५।। चौळी मांगिण गौळी भंगिण। लंगाडी तराळीण सावळी। सारजा पाटलिण। गिरजा परटीण। मंजा खाटकीण बळी।।६।।तापी वडारिण पारी ढोरीण। वारी डौरिण तिरळी। ।।७।। आर्जी सारष्टिण गजी भाटिण। सजा कोष्टिण आंधळी। नमा जिनगरिण गमाइ गुजरिण। उमा रंगारिण तुळी ।।८।। हिरी मारवाडिण चौरी भराडिण। गौरी घिसाडिण पिवळी। गया दलालिण सया कलालिण। हलालखोरीण कमळी। येसा कासारिण कासा भुसारिण। तुळसा पिसारिण मुळी ।।९।। न्हाई वाण्यांची माई ब्राह्मणाची। ताई जंगमाची भोळी। इंद्री फुलारिण चंद्री होलारिण। सुर्तीनें चाफेकळी। ।। १० ।। साडेतीनशें गवळणीच्या मेळी। राधा राजसबाळी। पठ्ठे बापुराव कवि म्हणे बाजार आला द्या हाळी ।। ११ ।।

(पठ्ठे बापूरावांचे एक चहाते व शिष्य श्री. बापूराव जिंतीकर यांच्या ढोलकी-वरील रंगबाजी लावण्या भाग २ पृ. १४.)

☘ ☘ ☘

परिशिष्ट ५

मराठवाड्यांतील शाहिरांचीं नांवें एकत्र असलेलें एक कवन याखालीं देत आहें. तें 'प्रतिष्ठान' मासिकाच्या ऑगस्ट १९५५ च्या अंकांत 'मराठवाड्यांतील शाहिराचा मुजरा' या मथळ्याखालीं मीं लिहिलेल्या लेखांत समाविष्ट आहे. कवन असें--

मुजरा

मजलसकू सलाम मुजरा रामराम छोटे बडेसे बंदगी मेरी ॥ ध्रु. ॥ ब्रह्मा विष्णु महादेव शक्तीसे मुजरा कहो । तेहतीस कोटी इंद्र गंधर्वका नाम लेओ । सप्तऋषि अठ्यायशी हजारके बगदगीमें रहो । साधुसंत फकीरसे दर्शन भाई । गुरु अक्कलकी रोषनाई । नमो दत्तात्रय गोसावी । उनसे नवनाथ मजा पाई । सिद्ध चौऱ्याशी, सिद्धाई अष्टभैरव वीर वेतालकू, चांदसूरजकू, हनुमान पाताल शेषकू, जोगी, जंगम जती सतीकू, अवलिया पीर पैगंबरकू । पवनपाणी, आकाशांगणि पंचप्राण धरित्रीकू ॥ १ ॥

गुणीवंत जे शाहिर झाले नांव गांव सांगतां ।
सेलगांवपर बाबू कुंभार त्याचे गुण वर्णितों ।
त्याचा शागीर्द गोसावी म्हणवितो ।
पैठण गंगातीरीं ज्याकू कविज्ञन होउन गेले ।
पुढें यमाजी साळी झाले ।
महादु भुजंग कळंबवाले ।
बालेघाटी गुणि आलबेले ।
संत लाडुनं कवन केलं ।
बावन बापूच्या ठाईं आहे ।
बाळा बहिरू जोड सवाई ।
बीड परगण्यामधें आवाई ।
भिकु सुतार माजलगांवीं ।
छगनभाऊ जेजुरी बढाई ।
श्रीमंतापुढें शाहिरी पहाची ।
होनाजी बाळा पुण्यांत रहातो ।
फंदी संगमनेरीं ।
राजाका किनगांव सवाई ॥ २ ॥
शिदरामका आखाडा
सेवल परगनेमें पात्र कमळु कुंभार बडा ।

शिंदखेडमें शाहिर गणू सोनार नामपे चढा ।
अचली वस्ती म्याने रहता सटवा कुंभार ।
दाजी ब्राह्मण लोणकर सोनपेठ वस्ती गुलजार ।
अहिल साळीं कविशर सुदुभर रिसूल अंधर
अरब साहेब शाहिर व्हांका ।
ल्कफूल्शा बालापूरका ।
जिवाजी माळीं खामगांवका ।
पटेल पहाडसी खामखेडका ।
इब्राम पटेल गेवराईका ।
भवाई राऊत लोणगांवका ।
टेंबी माकुडीवाले शेख चांद खाटनीचे शाहिर ॥३॥
वस्ती जाफराबाद बालापांड्यासी मुजरा कहो ।
बापू बम्मन या सीतल प्रसादके छंद सुनते रहो ।
कलगी तुरेके हिंदु मुसल्मीन सलाम आलेकुम लीओ ।
योगीराज बम्मन नरोबा आंबेकर दाना
सबी तुरेवालेमें शहाना ।
जगनाथ गोंदूगावमें ठाना ।
वखतपर गोदाजी होना ।
आये तुरेवाले तमाम ।
वो गये भागे परशराम ।
निसारअल्ली हाकन्नी कलाम ।
नरसू कृष्णाका आहे नाम ।
विठ्ठल चैतन कर गये काम ।
शाहाली कादर डफपर कलगी निशाण भडके जरी ॥४॥
शहर जाल्ना बाळा शिवराम ।
गिरप्पाचा असे आसकरा ।
सखाराम सटवाजी ।
सदू नागाप्पा गातो शिरा ।
पेठ कादराबाद रामा देवंग आहे वस्ताद पुरा ।
त्याचा शागीर्द किसन बन्सी ऐका गुणिवंत ।
संतराम रामचंद तेय ।
रहिमान साहेब छावणींत ।
गोविंदराव सोनार कसब्यांत ।
रावजी देवळगांवांत ।

संत नागुजी विठ्ठल म्हण विठ्ठल म्हण ।
शके १७९९ खूण मुजरा केला नारु बापुन ।
यादव लक्ष्मण जोड संगीन ।
दगडू गणपत त्याचप्रमाण ।
पुरन म्हणेना कमळूवांचून
सुनी मंडळी सारी ॥ ५ ॥

शाहिरी कवनांच्या कार्यक्रमाच्या शेवटीं मुजरा नांवानें कवन म्हणण्याचा प्रघात आहे. त्यांपैकीं हा मुजरा आहे. यांत मराठवाडा व त्यालगतचा वऱ्हाडचा भाग यांतल्या शाहिरांचीं नांवें असून पुणें, नासिक, नगरकडच्या पेशवाईकालीन शाहिरांचीं थोडीं नांवें आलीं आहेत. सर्व मुजऱ्यांत अशी अनेक शाहिरांची नामावळी नसते. म्हणून नारु बापूच्या या मुजऱ्याचें विशेष कौतुक मला वाटलें.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	११	तिसरा	दुसरा
३	७	देशावरचें	देहावरचें
७	६	महाकाव्यावर	महावाक्यावर
२०	८	भाग	माग
२०	३२	आत्मा	शरीर
२६	१८	तयानें	तपानें
३२	२२	त्रिपुरी	त्रिपुटि
३९	शेवटची ओळ	टिपण	निपट
४६	२८	एकागाची	एकांगाची
४६	३०	द्वैताचे निपांगे	द्वैताचेनि पांगे
५४	९	श्रीहार	श्रीहाट
५५	२०	गोल्हार	गोल्हाट
५७	७	श्री. ढेरे यांचें पुस्तक अलीकडे प्रसिद्ध झालें आहे. अशी पुस्ती.	
५७	१८	गुरु	आजेगुरु
५७	२०	करणारी	करणाऱ्या
५९	शेवटची ओळ	सइसो	वइसो
६७	६	इमर्शिनी	विमर्शिनी
६७	१७	अँ	ॐ
६७	१७	भावरूपस्ते	भावरूपस्तेजसाम्
६७	२१	नवांचति	नवांछति
६७	३०	स्वतंत्रमैश्वयम्	स्वतंत्रमैश्वर्यम्
६८	७	सा स्मृतः	सा स्मृता
८१	४	सकलायमात	सकलार्थमति
९३	७	अवतरणांतील ‘ पांगुळली ’ हा शब्द गाळावा.	

९४	१०	हारपदिं	हरिपदीं
९७	२९	नंदलालाला	नंदलालाचा
९७	३३	लूट	लूट
९९	१६	अतिवार	अनिवार
१०१	१	समजावर	समाजावर
१०१	१५	वाट	नाट
१०२	२३	मारो	माग
१०२	३३	असा	तसा
१०३	१४	अंल्गट	अंगलट
१०८	३४	शिलारेखाने	शिलारखाने
१०९	३	' अनार दाणेदार ' हे शब्द अनावश्यक.	
१११	२८	(अहं)	(अहंसः)
११४	१०	' पैका ' या शब्दापुढें अवतरण पूर्ण चिन्ह.	
११४	१२	सुरुवातीला अवतरण सुरू चिन्ह असावें.	
१२५ खालून	२	पनडी	पगडी
१२८ शेवटच्या ओळींत ' रावळपरंपरा ' या शब्दापुढील स्वल्पविराम नको.			
१२९	२	' असो ' या शब्दापुढें पूर्णविराम चिन्ह असावें.	
१३५	१६	'क्रमानें आलें' यापुढें पूर्णविराम चिन्ह असावें.	
१४१	३	' जैं गोसावी ' इ. अवतरण अनावश्यक.	
१४२	२	अंशाच्या	अशांच्या
१६९	२७	नासरती	ना सरती
१७०	७	ते न	तेन
१८८	१९	अजूक	अचूक
१९६	८	प्रवासरहित	प्रवास रहित

रॅपर छपाई व्ही. राजेन्द्र आर्ट प्रेस पुणें २